THE BOOK WAS DRENCHED

# मराठ्यांच्या लढायांचा इतिहास.

१८०२ ते १८१८.

( सन १९३४ )

लेखकः–शिवराम महादेव परांजपे.

किंमत २ रुपये.

UNIVERSAL
LIBRARY
OU_192076
UNIVERSAL
LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M954 P22M Accession No. PG M1684

Author पराांजपे, शिवराम महादेव.

Title मराठ्यांच्या लढायांचा इतिहास.

1802 - 1818.

This book should be returned on or before the date last marked below.

# मराठ्यांच्या लढायांचा इतिहास.

## १८०२ ते १८१८.

लेखकः

शिवराम महादेव परांजपे.

---

आवृत्ति दुसरी.

मुद्रक व प्रकाशकः

रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें.

१९३४

किंमत २ रु.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | खडकीची लढाई | १ |
| २ | येरवड्याची लढाई. | २४ |
| ३ | कोरेगांवची लढाई. | ३१ |
| ४ | अष्ट्याची लढाई. | ४० |
| ५ | रायगड किल्ल्याचीं दोन स्थित्यन्तरें. | ५८ |
| ६ | महाराष्ट्रांतील किल्ले. | ७० |
| ७ | असईची लढाई. | १०८ |
| ८ | अरगांवची लढाई. | १७५ |
| ९ | कोईलची लढाई. | १८४ |
| १० | अलीगडची लढाई. | १९५ |
| ११ | दिल्लीची लढाई. | २०६ |
| १२ | लासवारीची लढाई. | २१२ |
| १३ | होळकराशीं युद्ध. | २२४ |
| १४ | दीगची लढाई. | २६२ |
| १५ | भरतपूरचा किल्ला आणि इंग्लिशांचे तेथील चार पराभव. | २७७ |


# नकाशांची यादी.


| | | |
|---|---|---|
| १ | खडकीच्या लढाईचा नकाशा. | पान १६ च्या पुढें. |
| २ | येरवड्याच्या लढाईचा नकाशा. | पान २४ च्या पुढें. |
| ३ | बाजीरावानें ज्या मार्गानें कूच केलें तो मार्ग. | ३३ |
| ४ | कोरेगांवच्या लढाईचा नकाशा. | पान ४० च्या पुढें. |
| ५ | अष्ट्याच्या लढाईचा नकाशा. | पान ४८ च्या पुढें. |
| ६ | रायगडच्या आसपासच्या प्रदेशाचा नकाशा. | पान ६० च्या पुढें. |
| ७ | असईच्या लढाईच्या वेळचा हिंदुस्थानचा नकाशा. | १३७ |
| ८ | शिंद्यांच्या छावणींतलि एक देखावा. | १६० |
| ९ | अहमदनगर ते असईच्या मार्गाचा नकाशा. | १६२ |
| १० | असईच्या लढाईचा नकाशा. | १६५ |
| ११ | अरगांवच्या लढाईचा नकाशा. | १८२ |
| १२ | अंतर्वेदीच्या मुलुखाचा नकाशा. | १८५ |
| १३ | कोईलच्या लढाईचा नकाशा | १८९ |
| १४ | अलीगडच्या लढाईचा नकाशा. | २०० |
| १५ | दिल्लीच्या लढाईचा नकाशा. | २०७ |
| १६ | लासवारीच्या लढाईचा नकाशा. | २१६ |
| १७ | क. मॉन्सनची पिच्छेहाट | २४५ |
| १८ | दीगच्या किल्ल्याचा वेढा. | २६९ |
| १९ | भरतपूरचा वेढा. | २८१ |
| २० | भरतपूरचा किल्ला. | २८७ |


Library

## महाराष्ट्रांतील किल्ल्यांचे नकाशे.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ सिंहगड. | ... | ... | ... | ८० |
| २ सातारा. | ... | ... | ... | ८३ |
| ३ वासोटा. | ... | ... | ... | ८६ |
| ४ बेळगांव. | ... | ... | ... | ८९ |
| ५ सोलापूर. | ... | ... | ... | ९२ |
| ६ राजदीर. | .... | ... | ... | ९५ |
| ७ मालेगांव. | ... | ... | ... | ९८ |
| ८ तालनेरचा समोरून दिसणारा देखावा. | | ... | ... | १०३ |
| ९ तालनेर. | ... | ... | ... | १०४ |


---

## इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं चित्रें.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ यशवंतराव होळकर | ... | ... | | प्रस्तावनेच्या आधीं. |
| २ बापू गोखले | | ... | | प्रस्तावनेच्या पुढें. |
| ३ दुसरे बाजीराव | ... | ... | | ८ |
| ४ राजा प्रतापसिंह महाराज | ... | ... | ... | ५३ |
| ५ आप्पासाहेब महाराज | ... | ... | ... | ५६ |
| ६ हत्यारबंद अरब शिपाई | ... | ... | ... | १०० |
| ७ नेपोलियन बोनापार्ट | ... | ... | ... | १०९ |
| ८ टिपू सुलतान | ... | .... | ... | १११ |
| ९ दौलतराव शिंदे | ... | ... | ... | ११६ |
| १० रघोजीराव भोसले | ... | ... | ... | १२१ |
| ११ शहाआलम | ... | ... | ... | १२७ |
| १२ बेगम समरू | ... | ... | ... | १३१ |


---



यशवंतराव होळकर.

# प्रस्तावना.

या पुस्तकामध्यें मराठ्यांच्या कित्येक लढायांचीं वर्णनें देण्यांत आलेलीं आहेत. हीं वर्णनें पूर्वी चित्रमयजगत्च्या निरनिराळ्या अंकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेलीं असून हल्लीं तीं सर्व वर्णनें एकत्र करून या पुस्तकाच्या रूपानें महाराष्ट्र वाचकांच्या पुढें ठेवण्यांत येत आहेत. या युद्धविषयक वर्णनांच्या लेखमालेला प्रथमतः इ० स० १९२५ सालाच्या ऑगस्ट महिन्यापासून सुरुवात करण्यांत येऊन ती लेखमाला इ० स० १९२८ च्या मे महिन्यापर्यंत चाललेली होती. ही लेखमाला चित्रमयजगत्च्या प्रत्येक महिन्याच्या अंकामध्यें नियमितपणें प्रसिद्ध होत असे, असें नाहीं. अनेक कारणांमुळें मध्यंतरीं कित्येक वेळां प्रत्येक महिन्याला हीं वर्णनें छापण्याकरितां देणें शक्य झालेलें नाहीं. तेव्हां अशा प्रकारचे हे कांहीं अपरिहार्य अपवाद सोडून बोलावयाचें झाल्यास ही लेखमाला चित्रमयजगत्मध्यें सुमारें तीन वर्षेपर्यंत चालू होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या लेखमालेंत ज्या लढायाचीं वर्णनें देण्यांत आलेलीं आहेत, त्या लढायांच्या दृष्टीनें या लेखमालेचे एकंदर अदमासें पंधरा भाग कल्पिलेले आहेत. त्यांपैकीं चवदा भागांत चवदा स्वतंत्र आणि मोठमोठ्या अशा लढायांचीं वर्णनें असून " महाराष्ट्रांतील किल्ले " या मथळ्याच्या एकाच भागामध्यें कुलाबा, सातारा, बेळगांव, सोलापूर, नाशिक, खानदेश, वगैरे जिल्ह्यांतील निरनिराळ्या किल्ल्यांवर ज्या लढाया झाल्या, त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या लढायांकडे कालाच्या दृष्टीनें पाहिलें असतां इ० स० १८०२ पासून इ० स० १८१८ पर्यंतच्या सोळा वर्षांच्या कालावधीमध्यें या लढाया झालेल्या आहेत. परंतु ही कालमर्यादा जरी सोळा वर्षांची असली, तरी या सोळा वर्षांपैकीं दरवर्षी या लढाया एकसारख्या एका पाठीमागून एक चाललेल्या होत्या, असा मात्र याचा अर्थ नाहीं. इ०स० १८०२ मध्यें जी या लढायांची एक मोठी लाट उसळली, ती इ०स० १८०५ पर्यंत कायम टिकली होती. पुढें त्यानंतर बरींच वर्षेपर्यंत मध्यंतरीं जरी आंतून लढाईचा त्वेष धुमसत होता, तरी त्या लढाईच्या प्रत्यक्ष ज्वाला फिरून इ० स० १८१७ मध्यें बाहेर भडकून त्या सुमारें एक वर्षभर जळत राहिल्या होत्या. अशा दोन विभागांमध्यें ही सोळा वर्षांची कालमर्यादा विभागली गेलेली आहे. या सगळ्या लढाया एकट्या इंग्रजांच्याच विरुद्ध लढल्या गेलेल्या आहेत. परंतु इंग्रजांच्या विरुद्ध या लढाया लढणारे मराठे मात्र निरनिराळ्या वेळीं निरनिराळे होते. इ०स० १८०२-३ या सालांत प्रथमतः ग्वालेरचे दौलतराव शिंदे आणि नागपूरचे रघोजीराव भोसले या दोघांनीं मिळून इंग्रजांशीं लढाई सुरु केली. यांच्या या लढायांपैकीं असई आणि आरगांव या दोन लढाया निजामच्या सरहद्दीवर महाराष्ट्रांत झाल्या. परंतु यानंतर दौलतराव शिंद्यांच्या हाताखालील फ्रेंच सेनापतींनीं आणि मराठे सरदारांनीं कोइल, अलीगड, दिल्ली, लासवारी, वगैरे ज्या लढाया केल्या, त्यांचें रणक्षेत्र उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीच्या आसपास होतें. त्यांच्या पाठीमागून इ० स० १८०४–५ या सालीं

इंदूरचे यशवंतराव होळकर यांनीं मथुरा, दिल्ली, भरतपूर, वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील रणक्षेत्रांमधून इंग्लिशांशीं लढाया करून त्यांना नामोहरम करून टाकलें. पुढें अखेरीस शिंदे, होळकर, भोसले, यांच्याशीं तह होऊन या लढाया ज्या संपल्या होत्या, त्यांची फिरून सुरुवात महाराष्ट्रांत इ०स० १८१७-१८ सालीं पुण्यांतील दुसऱ्या बाजीरावसाहेबांनीं केली. या दुसऱ्या बाजीरावसाहेबांच्या धामधुमींमध्यें खडकी, कोरेगांव, अष्टें, वगैरे ठिकाणच्या लढाया या मुख्य आणि महत्त्वाच्या लढाया होत. व या लढायांच्या पाठीमागून महाराष्ट्रांतील निरनिराळे किल्ले सर करून घेण्याकरितां त्या त्या किल्ल्यांवर कित्येक लहानमोठ्या लढाया झालेल्या आहेत.

ऐतिहासिक कालक्रमाच्या दृष्टीनें वर दिलेल्या लढायांचा असा हा या प्रकारचा क्रम आहे. व हा जो या लढायांचा वास्तविक क्रम आहे, त्याच क्रमानें या लढायांचीं वर्णनें एकामागून एक येणें अवश्य आहे. पण ज्या क्रमानें हीं वर्णनें यावयाला पाहिजेत, त्या क्रमानें तीं या पुस्तकांत आलेलीं नाहींत, ही गोष्ट कोणाहि वाचकाच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे. तेव्हां हा क्रमभंगाचा दोष कसा घडून आलेला आहे, याच्याबद्दल दोन शब्द लिहिणें अवश्य आहे.

हिंदुस्थानच्या सांप्रतच्या राजकीय परिस्थितीचें पर्यालोचन करणारांना हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांतील कोणत्याहि लढायांचें अध्ययन हें नेहमीं शिक्षणप्रदच आहे. व अशा दृष्टीनें पहातां या सर्वच लढायांचा अभ्यास करणें अत्यंत आवश्यक आहे. परंतु त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रीय. मनुष्याची पहिली जिज्ञासा स्वाभाविकपणें कोणत्या लढाईबद्दल बरें असणार ? आपण महाराष्ट्रीय. आपण महाराष्ट्रांत रहातों. पुणें हें त्या महाराष्ट्रांतील मुख्य शहर. त्या पुणें शहरांत थोड्या वर्षांच्या पूर्वींपर्यंत पेशव्यांचें राज्य होतें. तें राज्य आज कोठें आहे ? त्या राज्याचीं अवशिष्ट चिन्हें येथें सर्व जागच्या जागीं कायम असतांना त्यांच्यामधील तें राजवैभव आज कोठें गेलें आहे ? पूर्वी आपल्या राज्यांत आपण स्वतंत्र होतों. पण ती आपली स्वतंत्रता नष्ट होऊन आज कोणीकडे गेली आहे ? पूर्वींचे राजवाडे आहेत, पण त्यांत राजे मात्र नाहींत ! पूर्वींचे किल्ले आहेत, पण त्या किल्ल्यांवर किल्लेदार कोणी नाहींत ! पूर्वींचे सेनापति आहेत, पण त्यांच्या हाताखालीं त्यांच्या सेना मात्र हल्लीं नाहींत ! अशी ही आपली स्थिति कशानें झाली ? अशा प्रकारचे अनेक प्रश्न महाराष्ट्रांतील आणि विशेषतः पुण्यांतील प्रत्येक मनुष्याच्या मनामध्यें पदोपदीं प्रादुर्भूत होतात आणि या सगळ्या प्रश्नांना आपला इतिहास असें उत्तर देतो कीं, पुण्यांतील आपल्या या राजसत्तेचें वैभव खडकीच्या लढाईनें शेवटाला गेलें ! हे त्या वृद्ध इतिहासाच्या तोंडचे शब्द ऐकल्याबरोबर हल्लींच्या नवीन पिढींतील तरुण अंतःकरणांची काय स्थिति होते, याचें पूर्णतेनें वर्णन करणें केव्हांहि शक्य नाहीं. हे शब्द ऐकल्याबरोबर छातींत धस्स होतें, हातपाय मोडून जातात, डोळ्यांत अश्रु उत्पन्न होतात, उमेदीचे उंच उभारलेले सर्व किल्ले कोसळून पडूं लागतात, आणि मनांतील महत्त्वाकांक्षा मावळून जाण्याच्या मार्गाला लागतात ! खडकीच्या एका लढाईनें पुण्यांतील हिंदुपदपातशाहीचें सगळें राज्यवैभव एकदम लयाला गेलें असेल तरी कसें, त्या वेळीं झालें असेल तरी काय, त्या वेळच्या स्वदेशाभिमानी आणि स्वराज्यप्रेमी

लोकांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं कांहींच प्रयत्न केले नसतील काय, आणि त्यांनीं अनेक प्रयत्न केले असतांहि त्यांच्या त्या प्रयत्नांना यश येऊं नये इतका आपल्यावर दैवाचा कोप झाला तरी कसा, असे अनेक प्रश्न मनामध्यें उद्भवतात. व त्यांच्या विवेचनाकरितां स्वाभाविक रीतर्नेच आपलें मन त्या खडकीच्या युद्धसंग्रामाच्या इतिहासाच्या निरीक्षणाकडे वळतें. आपण त्या वेळचीं इतिहासाचीं निरनिराळीं पुस्तकें वाचूं लागतों, त्यांतील हकीकती आपण एकमेकांशीं ताडून पाहूं लागतों, आपल्या लोकांनीं केलेलीं वर्णनें आणि परकीयांनीं लिहिलेले लेख यांच्यामधील सत्यासत्यतेचा आपण विचार करूं लागतों, कोणतीं सैन्य कोठें उभीं राहिलीं असतील आणि कोणी कोणावर कसे हल्ले केले असतील याचीं चित्रें आपण आपल्या डोळ्यांपुढें उभीं करितों, आणि आपली इतकी तयारी असतांना आपला पराजय कां व्हावा असे प्रश्न आपण जी जी तत्कालीन वस्तु आढळेल तिला विचारूं लागतों ! आपण खडकीचें रणक्षेत्र न्याहाळून पाहतों; तेथील मैदानें, टेकड्या, ओढे, नाले आणि नद्या यांचें परीक्षण करितों; संगमावरील एल्फिन्स्टन साहेबांच्या बंगल्यामधून खडकीला पळून जाण्याच्या मार्गाचे नकाशे आपण तपासून पाहतों; आणि बाजीरावसाहेब ज्या पर्वतीच्या गच्चीवरून ही खडकीची लढाई पहात होते, तेथून पाहिलें असतां या खडकीच्या रणक्षेत्राचें स्वरूप कसें दिसतें, याचाही आपण पडताळा घेतों. अशा प्रकारचें हें त्या वेळच्या लढाईचें वातावरण आपल्या सभोंवती निर्माण झालें असतां आपण त्या योगानें इतके तद्रूप होऊन जातों कीं, त्या वेळच्या शत्रूवर चालून जाणाऱ्या आपल्या घोड्यांच्या टापा आणि आपल्या सैन्यांतील शिपायांच्या रणगर्जना आपण ऐकत आहों आणि आपल्या गोलंदाजींनीं उडविलेल्या तोफांचे लाल गोळे आकाशांतून धांवत असतांना आपण प्रत्यक्ष पहात आहों, असा भास उत्पन्न होतो. अशा प्रकारची स्थिति कोणाही महाराष्ट्रीयाच्या मनामध्यें मूर्तिमंत उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. आणि अशाच भावना प्रस्तुत लेखकाच्या मनांत उत्पन्न होऊन त्याचें लक्ष ऐतिहासिक कालक्रमाला न जुमानतां इतर सर्व लढायांच्या आधीं खडकीच्या लढाईकडेच प्रथमतः वेधलें गेलें, तर ही चूक जरी योग्य नसली, तरी ती आत्मीयत्वाच्या भावनेनें क्षम्य आहे, असें कोणाही सहृदय वाचकाला वाटल्यावांचून राहणार नाहीं. अशा मनःस्थितीमध्यें खडकीच्या लढाईच्या वर्णनाला सुरुवात करण्यांत आल्यानंतर त्या लढाईचे कनिष्ट परिणाम पुढें कसकसे होत गेले, याचें समग्र वर्णन करणें हें ओघानेंच प्राप्त होऊन त्या ओघामध्यें येरवडें, कोरेगांव, अष्टें, वगैरे ठिकाणच्या लढायांचीं व सिंहगड, सातारा, वासोटा, बेळगांव, सोलापूर, राजदीर, मालेगांव, तालनेर, वगैरे किल्ल्यांवरील लढायांचीं वर्णनें देणें जरूर झालें.

परंतु दुसऱ्या बाजीरावसाहेबांचे वेळीं आपल्या स्वातंत्र्यविनाशाचा हा जो हृदयद्रावक परिणाम घडून आला, त्याला पूर्वकालीन कारणें काय काय झालीं असलीं पाहिजेत, याचा विचार मनांत आला असतां तें विचार करणारें मन साहजिकपणेंच बाजीरावसाहेबांनीं १८०२ सालीं वसई मुक्कामीं इंग्रजांशीं जो तह केला, त्या आद्य कारणाकडे वळतें. तो वसईला इंग्रजांनीं केलेला तह म्हणजे आपल्या देशांत आपल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणाकरतां मराठ्यांनीं त्या वेळीं बनविलेल्या मराठा कॉन्फिडरसीच्या किल्ल्याला लाविलेला एक गुप्त सुरुंगच होय.

तेव्हां त्या संकटाच्या निवारणासाठीं शिंदे, भोंसले, होळकर, यांनीं इंग्लिशांच्या विरुद्ध लढाई पुकारणें हें त्या वेळीं त्यांना अगदीं अपरिहार्यच होतें आणि म्हणून अशा परिस्थितीमध्यें शिंदे, भोसले, होळकर, यांनीं ज्या लढाया केल्या, त्यांचींही वर्णनें यापुढें क्रमाक्रमानें देण्यांत आलेलीं आहेत व अशा कारणांमुळें या लढायांचा क्रम येथें उलटा-सुलटा झालेला आहे.

या दृष्टीनें पाहातां हें प्रस्तुत बाबतींतील लेखकाच्या मनःस्थितीचें स्वरूप असून हें कांहीं या क्रमाचें समर्थन नव्हे, हें कोणाही वाचकाच्या लक्षांत येण्यासारखें आहे. शिवाय एखाद्या स्वतंत्र रीतीनें लिहिलेल्या पुस्तकामध्यें जशी क्रमबद्धता स्वाभाविकपणेंच असते, तशी ती एखाद्या मासिक पुस्तकांत निरनिराळ्या वेळीं लिहिलेल्या निरनिराळ्या लेखांमध्यें असणें शक्य नाहीं. ते निरनिराळे स्फुट लेख असतात; व ज्या ज्या वेळीं जे जे विचार प्रबळ असतात, त्यांच्या त्यांच्या अनुरोधानें ते लेख बहुधा लिहिले गेलेले असतात. यामुळेंही या लढायांच्या क्रमामध्यें जी विसंगतता उत्पन्न झालेली आहे, तिच्याकडे वाचकवर्ग भावनामूलक सदयतेच्या दृष्टीनें पाहील, अशी आशा आहे. पण इतक्यानंतरही ज्यांच्या मनाला ऐतिहासिक कालक्रमाची आत्यंतिक अपेक्षा असेल, त्यांनाही ती येथें भागवून घेतां येणार नाहीं, असें नाहीं. कारण, याच पुस्तकांत त्यांच्या पुस्तकाचा प्रारंभ असईच्या लढाईपासून होऊन महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या स्वातंत्र्याच्या अंताबरोबर त्यांच्या पुस्तकाचा अंत होतो, असें त्यांनीं मानलें म्हणजे झालें.

पण हल्लींच्या या पुस्तकांतील लढायांच्या वर्णनामध्यें कालक्रमाच्या भंगाचा जरी दोष असला, तरी त्या दोषापासूनही येथें एक अकल्पित रीतीनें मोठा गुण उत्पन्न झालेला आहे. एखादा भ्रमर एखादें लांकूड कोरीत असतो. त्या लांकडावर एखादें वर्णाक्षर खोदून काढावें, असा कांहीं त्याचा संकल्प नसतो. तरी पण एखादे वेळीं तो लाकूड कोरीत असतां त्यापासून " श्री " " ग " वगैरेंसारख्या कांहीं तरी अक्षरांच्या आकृति कोरल्या जातात. यालाच घुणाक्षरन्याय असें म्हणतात. या घुणाक्षरन्यायाप्रमाणें या हल्लींच्या पुस्तकाच्या उलट्या क्रमामध्येंहि यदृच्छेनें एक अनुकूल गुण उत्पन्न झाला आहे आणि तो असा कीं, या सगळ्या पंधरा वीस लढायांच्या वर्णनांमध्यें आपल्याला दुर्दैवानें असें आढळून येतें कीं, जेथें तेथें अखेरीस मराठ्यांचाच पराजय झालेला आहे! ही स्थिति जरी इतिहासाला कांहीं अंशीं धरून असली, तरी एकंदर पुस्तकाच्या वाचनानें महाराष्ट्रीय वाचकांच्या मनांवर जो परिणाम घडवून आणावयाचा, त्याच्या दृष्टीनें ही स्थिति फारशी स्पृहणीय नाहीं. मागील इतिहासाचीं पुस्तकें वाचावयाचीं कशाला? तर त्यांच्यापासून आपल्या देशाच्या भावी इतिहासाच्या बाबतींत आपल्या मनाला कांहीं तरी उत्साह उत्पन्न व्हावा म्हणून. पण आपल्या पूर्वजांनीं पूर्वी केलेल्या अनेक प्रयत्नांतून त्यांना लागोपाठ सदोदित अपयशच येत गेलेलें पाहिलें असतां त्याच्या योगानें मनांत उत्साह उत्पन्न होण्याच्या ऐवजीं, आपल्या प्रयत्नांची कंबरच मोडून जावयाची. खरा उत्साह विजयानेंच उत्पन्न होतो, आणि एका विजयाच्या उदरांतून दुसरे विजय उत्पन्न होत असतात, अशी वस्तुस्थिति असल्यामुळें आपल्या विजयांच्या वर्णनांची वाचकांच्या मनांना असल्या

बाबतींत किती आवश्यकता असते, याची कोणालाही कल्पना येण्यासारखी आहे. शिवाय अनेक काळोखांमधून जात असतां अखेरीस जर एखादा उजेड आढळला, तर मनाला आनंद होतो. अनेक दिवसांपर्यंत ढगांनीं आच्छादित झालेल्या पावसाळ्यांतील आकाशामध्यें अखेरीस एखादे वेळीं सूर्यप्रकाश दिसला तर चित्तवृत्ति उल्लसित होते आणि एखाद्या करुणरसात्मक कथानकाच्या संकटपरंपरांमधून जातां जातां अखेरीस जर त्या कथानकाचा शेवट काल्पनिक रीतीनेंच कां होईना गोड झाला, तर वाचकाच्या मनाला त्यापासून प्रसन्नता प्राप्त होते. अशा दृष्टीनें पाहतां या लढायांच्या कथानकाचा यदृच्छेनें कां होईना जो शेवट झालेला आहे, त्यामध्यें एक प्रकारचें औचित्य आणि आनंददायकत्व आकस्मिक रीत्या उत्पन्न झालेलें आहे, हें मार्मिक आणि सहृदय वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. कारण, मराठ्यांच्या अनेक लढायांतून जरी त्यांचे पराजयच झालेले आहेत, तरी निदान यशवंतराव होळकरांची मोहिम तरी यशस्वी होऊन कर्नल मॉन्सन् या इंग्लिश सेनापतीला मराठ्यांच्या सैन्यासमोर हार खाऊन माघारें पळत जावें लागलें, ही या पुस्तकांतील शेवटीं दिलेली हकीकत वाचून महाराष्ट्रीय वाचकांच्या मनाला थोडें तरी समाधान वाटेल, यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या देशांतील अनेक किल्ल्यांना जरी या वेळच्या युद्धांत शत्रूच्या हस्तगत होणें भाग पडलें असलें, तरी आपल्या देशाच्या इतिहासामध्यें भरतपूरच्या किल्ल्यासारखा असा एक तरी यशस्वी आणि भाग्यवान् किल्ला निघाला कीं, ज्यानें शत्रूचे चार पांच हल्ले माघारे परतवून त्यांचा तितके वेळां पराभव केला, आणि अशा रीतीनें शेवटपर्यंत आपलें स्वातंत्र्य कायम टिकविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ही या पुस्तकाच्या शेवटीं आलेली हृदयस्पर्शी हकीकत वाचून कोणाचें मन उल्लसित होऊन जाणार नाहीं ?

असा या पुस्तकाच्या रचनेमध्यें असंकल्पितपणानें एक गुण साधलेला आहे. पण हा गुण अगदीं गौण आहे. आणि या लढायांपैकीं बहुतेक प्रत्येक ठिकाणीं शेवटीं आपला पराजय होतो, ही गोष्ट मनाला लागल्यावाचून रहात नाहीं. व असें कां होतें, या प्रश्नाच्या विचाराकडे आपलें मन साहजिकपणेंच वळतें. असे आपले पराभव कां होतात ? आपल्यामध्यें काय वैगुण्य आहे ? लढायांतून विजय मिळविण्याइतकी शौर्याच्या बाबतींत आपली कधींच लायकी नव्हती काय ? आणि असें असेल, तर या शंभर दीडशें वर्षांच्या पूर्वीच्या अनेक लढायांतून आपल्याला जे जय मिळालेले आहेत, ते कसे मिळालेले असावेत ? आणि पूर्वी जर आपल्याला विजय मिळत होते, तर ते गेल्या दीडशें वर्षांतच आपल्याला कां मिळेनासे झाले आहेत ? अशा अनेक जिज्ञासा इतिहासाच्या विद्यार्थ्यांच्या मनामध्यें प्रादुर्भूत होतात व त्या जिज्ञासा त्यांच्या मनांना आत्मपरीक्षणाकडे जोरानें वळवून नेतात. या पुस्तकांतील लढायांच्या वर्णनांतूनही मधून मधून हे प्रश्न विशेष प्रसंगीं उत्थापित करून त्यांचें त्या त्या ठिकाणीं अनेक वेळां विवेचन केलेलें आहे. व आपला मराठे लोकांचा ठिकठिकाणीं पराभव कां होतो, यांबद्दलचीं इंग्लिश सेनापतींनीं दिलेलीं कारणेंही या पुस्तकांत उद्धृत केलेलीं आहेत. त्या सगळ्यांवरून असें दिसून येतें कीं, हे आपले पराभव शत्रूच्या अंगच्या अधिक शौर्यापेक्षां आपल्या अंगच्या अधिक दुर्गुणांमुळेंच झालेले

आहेत. आपल्या लोकांमध्यें शौर्य नाहीं असें नाहीं. पण शौर्याचा कसा उपयोग करावयाचा, या विषयींचें योग्य ज्ञान मात्र आपल्यामध्यें नाहीं, हें खास. लोकांच्या अंगांत शौर्य असलें, तरी तें सुसंघटित केलेलें असलें, तरच त्याचा योग्य उपयोग होतो. शिवाजी महाराजांचे वेळीं आपल्या सर्व महाराष्ट्रामध्यें श्रीसमर्थ रामदास वगैरे सारख्यांच्या प्रयत्नांमुळें असा सुसंघटितपणा उत्पन्न झाला होता व त्याचा फायदा आपल्याला कित्येक वर्षेपर्यंत मिळाला. रामदास स्वामींची संघटना ही धर्माच्या पायावर रचलेली होती. कित्येक मुसलमान राजे त्या वेळीं धर्मच्छल करण्याला प्रवृत्त झालेले होते. या गोष्टीचा फायदा घेऊन त्या वेळच्या राजकारणी पुरुषांनीं धर्माच्या नांवाखालीं लोकांमधील जागृतीचें आणि संघटनेचें कार्य घडवून आणलेलं होतें. धर्मासारखी जलद पेट घेणारी आणि एकदम धडाका उडवून देणारी दुसरी दारू कोणतीच नाहीं. त्यामुळें त्या वेळचा बार चांगला उडाला. पण इ. स. १८०० पासून इ. स. १८१८ पर्यंतच्या प्रस्तुत पुस्तकांतलि ज्या लढायांच्या काळासंबंधानें आपण हल्लीं विवेचन करीत आहों, त्या काळामध्यें लोकांचीं मनें उद्दीपित करण्याला रामदासांच्या धर्मकारणासारखें कारण उरलेलें नव्हतें. शिवाजीमहाराजांच्या सुरवातीपासून तों नानाफडणिसांच्या समाप्तिपर्यंतच्या काळामध्यें मुसलमानांच्या धर्मच्छलाची तीव्रता पुष्कळच कमी होऊन त्यांचा राज्यविस्तारही या वेळीं बहुतेक संपुष्टांत आलेला होता. परंतु मुसलमानांचा राज्यविस्तार जरी अशा रीतीनें संपुष्टांत आलेला होता, तरी त्याच्या जागीं दुसरें एक राज्य त्या वेळीं जें हळूहळू विस्तार पावत होतें, त्याच्या विस्ताराच्या भावी संकटाकडे त्या वेळच्या लोकांचें जितकें लक्ष जावयाला पाहिजे होतें, तितकें तें गेलें नाहीं. हा राज्याचा विस्तार म्हणजे अर्थातच ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्याचाच होय. मुसलमानांचे धर्मच्छल उघड उघड होत असल्यामुळें त्यांच्याकडे पूर्वीच्या लोकांचें लक्ष गेलें. पण ईस्ट इंडिया कंपनीच्या मिशनरी आणि मुत्सद्दी लोकांच्याकडून जीं मर्यादातिक्रमणें चाललेलीं होतीं, तीं अगदीं गोगलगाईच्या पावलांनीं चाललेलीं असल्यामुळे व तीं बाह्यात्कारीं गोगलगाईच्या इतकींच निरुपद्रवी दिसत असल्यामुळें त्यांच्याकडे कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं. प्रचलित परिस्थितीचें यथायोग्य पर्यालोचन करणारे रामदास जसे शिवाजीच्या वेळीं निर्माण झाले, तसे या अठराव्या शतकाच्या शेवटची आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीची राजकीय परिस्थिति पाहून तिच्यावर उपाय योजणारे कोणीही रामदास त्या वेळीं उत्पन्न झाले नाहींत. नाना फडणीस हे मुत्सद्दी होते आणि महादजी शिंदे हे योद्धे होते, पण ते कांहीं रामदास नव्हते. त्यांच्या दृष्टीला पुढचें थोडेंबहुत दिसूं लागलें होतें; पण एखाद्या भगवत्कृपापात्र रामदासाला भविष्य काळांतील जितक्या दूरचें दिसलें असतें, तितकें कांहीं नाना आणि महादजी यांना दिसूं शकलें नाहीं. पण त्यांना जें थोडेंबहुत दिसूं लागलें होतें, त्याचा आपल्या राष्ट्राला फायदा करून देण्याला ते पुढें जिवंत राहिले नाहींत आणि जिवंत असते, तरी त्यांनीं या पुढल्या पडत्या काळांत काय केलें असतें ? नाना फडणिसांनीं आपल्या फडांत बसून कागदी कारस्थानाचीं सूत्रें हलाविलीं असतीं आणि महादजी शिंद्यांनीं एखाद्या रणांगणावर आपलें शौर्य गाजविलें असतें. पण आपल्या देशांतलि लोकांची जी आंतून नैतिक अवनति होत चाललेली होती

तिच्याविरुद्ध यांना कांहीं उपाय योजितां आले नसते. सगळें राष्ट्र जागृत करून त्यांतील सर्व लोकांना हालवून सोडण्याचें कार्य ईश्वरी प्रसादाच्या आणि प्रेरणेच्या लोकांकडूनच होत असतें; व यासाठींच आध्यात्मिक स्फूर्तीचे शिवाजी आणि रामदास हे राष्ट्रांना मधून-मधून लागत असतात. पण तसे ते या वेळीं आपल्या हिंदुस्थानाला दुर्दैवानें कोणीही लाभलेले नव्हते. ब्रह्मेंद्रस्वामींच्या सारखे कित्येक स्वामी पेशव्यांच्या कारकीर्दीत उत्पन्न झालेले होते. पण ज्यांनीं आपल्याला मिळालेल्या सनदा शिवाजीच्या पदरांत परत टाकल्या, अशा रामदास स्वामींच्या सारख्या निरपेक्ष स्वामींची योग्यता इतर स्वामींना कोठून येणार ? "इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि" या श्लोकांत वर्णिलेलें जें ब्रह्मवर्चस आणि जें क्षात्रतेज पूर्वकालीं एकदां परशुरामाच्या ठिकाणीं एकत्र झालेलें होतें, तेंच पुढें महाराष्ट्राच्या उद्धाराकरितां रामदास आणि शिवाजी या दोघांच्यामध्यें द्विधा विभक्त होऊन आपल्यामध्यें अवतीर्ण झालें होतें. तसल्या ब्रह्मवर्चसानें आणि तसल्या क्षात्रतेजानेंच पतनशाली राष्ट्रें फिरून अभ्युदयाला येतात. त्यांच्या संसर्गानें सर्व राष्ट्रामध्यें प्रेरणा उत्पन्न होते. आपण सर्व एक होऊं आपण मोठमोठीं कामें करूं, आपण परोपकार करूं, आपण नीच कृत्यें कधींहि करणार नाहीं, आपण आपल्या देशाला गुलामगिरींतून सोडवूं, आपण आपलें स्वातंत्र्य मिळवूं . अशा प्रकारच्या उदात्त आणि राष्ट्रीय भावना सर्व लोकांमध्यें उत्पन्न होण्याला उदार वृत्तीचे सत्पुरुषच कारणीभूत होत असतात. या भावना लोकांत उत्पन्न होतात तेव्हांच ते लोक आपलें स्वराज्य संस्थापित करण्याला आणि सुरक्षित ठेवण्याला समर्थ होतात. मुसलमानी धर्माच्या अनुयायांची जी उन्नति झाली, तिलाही मूळ कारण त्यांचें धार्मिक ऐक्य हेंच होतें; त्यांचा धर्मसंस्थापक जो महंमद पैगंबर, त्याच्याहि मनांत धर्माची प्रेरणा होती आणि हातांत शौर्याची तरवार होती; आणि त्यामुळें धार्मिक प्रेरणांनीं उज्ज्वालित झालेल्या अशा तरवारीच्या जोरावर मुसलमान लोक आपला राज्यविस्तार युरोपखंडाच्या एका टोकापासून तों आशियाखंडाच्या दुसऱ्या टोकापर्यंत पसरवूं शकले. पंजाबांतील शीख लोकांचा इतिहासही हेंच तत्त्व प्रस्थापित करीत आहे. शीख धर्माचे आद्यसंस्थापक गुरु नानक, गुरु गोविंदसिंग, वगैरे पुढाऱ्यांनीं धर्माच्या नांवाखालीं आपल्या ज्ञातिबांधवांना एकत्रित केलें. आणि त्या धार्मिक प्रेरणांनीं शीख लोकांचें शौर्य इतक्या प्रखरतेला जाऊन पोंचलें कीं, त्यापुढें दिल्लीच्या मोठमोठ्या मोगल बादशहांचेही कांहीं चालूं शकलें नाहीं. राजस्थानांतील रजपूत लोकांच्या मध्येंही त्यांची क्षात्रवृत्ति हा त्यांचा एक धर्मच बनून गेलेला होता व त्या क्षात्रधर्मामुळें त्यांच्या अंगांत इतकें शौर्य उसळून येत असें कीं, प्रसंग पडला तर ते मरून जात असत किंवा आपल्याला प्रत्यक्ष जाळून घेत असत, परंतु ते शत्रूच्या हातांत सांपडून पराजय पतकरण्याला कधींहि तयार होत नसत. ग्रीसच्या इतिहासामध्यें स्पार्टन लोकांचीं उदाहरणें जशीं आढळतात, किंवा रोमन लोकांच्या तत्त्वज्ञानामध्यें जीं स्टोइक पंथाचीं मतें आहेत, त्यांच्याशीं या रजपूत लोकांच्या इतिहासाचें पुष्कळ साम्य असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. पूर्वी फ्रान्समध्यें राज्यक्रांति झाली, किंवा हल्लीं रशियांतलि झारशाहीच्या विरुद्ध सगळ्या लोकांनीं उठून आपली सत्ता प्रस्थापित केली, या बाबतींत किंवा अशाच प्रकारच्या युरोपखंडांतील इतर उलाढालींत जरी

प्रत्यक्ष धर्म हें मूळ कारण नव्हतें, तरी तिकडच्या लोकांच्या मनःस्थितीप्रमाणें त्यांच्या मनांमध्यें अशी कांहीं तरी एखादी प्रेरणा उत्पन्न होते कीं, तिच्यामुळें ' मरूं किंवा मारूं' अशा निर्वाणीच्या शौर्यानें ते लोक लढण्याला उद्युक्त होतात आणि विजयश्रीची माळ बळजबरीनें आपल्या गळ्यांत घालून घेतात. सारांश, कांहीं तरी एखादी उच्च भावना देशामध्यें उत्पन्न झालेली असली पाहिजे, म्हणजे तिच्याभोंवतीं सर्व लोक सहजच एकत्र गोळा होतात. आणि त्या भावनेच्या प्रेरणेनें एकदां डोक्यांत पेट घेतला, म्हणजे हातांत शौर्य येणें हा त्याचा स्वाभाविकच परिणाम होतो. एखादें उच्च ध्येय अंतःकरणामध्ये प्रदीप्त झालें, म्हणजे त्याच्या योगानें लहान मुलेंही पराक्रमी होतात आणि स्त्रियांनाही वीरश्री चढते. उच्च भावनांना पराजय हा शब्द माहीतच नाहीं. जीं पावलें उच्च ध्येयाच्या मार्गावर पडूं लागलीं, त्यांना कोणता शत्रु मागें हटवूं शकणार आहे ?

पण एकोणिसाव्या शतकांतील प्रारंभींच्या ज्या पाव शतकाशीं आपला प्रस्तुत संबंध आहे, त्या काळच्या परिस्थितीकडे आपण पाहिलें, तर त्या काळांत धार्मिक अगर इतर प्रकारच्या अशा कोणत्या उच्च भावना लोकांमध्यें प्रज्वलित झालेल्या होत्या ? रामदासांचे उपदेश आणि शिवाजीचीं शौर्यें यांच्यांतील सामर्थ्य या वेळपर्यंत क्षीण होऊन जाऊन त्याची जागा घेण्याकरितां त्या वेळीं दुसरें कोणतेंहि नवीन सामर्थ्य उत्पन्न झालेलें नव्हतें. सगळ्या देशांतील लोकांना एकत्र आणि एकदम मारून टाकील अशी कोणतीहि सर्वसाधारण भावना त्या वेळीं आपल्या देशांत कोणी तत्त्ववेत्त्यांनीं किंवा राजकारणी पुरुषांनीं उत्पादित केलेली नव्हती. धर्माचा छळ विशेष होत नव्हता, म्हणून धार्मिक भावना झोंपीं गेल्या होत्या; आणि हें आपलेंच राज्य आहे आणि तें राज्य जात नाहीं तोंपर्यंत आपलें स्वातंत्र्यहि कोठें जात नाहीं, अशा चुकीच्या विचारपद्धतीमुळें स्वातंत्र्याच्या भावनेचे निखारेहि राखेखालीं झांकून जाऊन थंड पडले होते. कोणत्याहि देशाच्या इतिहासामध्यें जीं महत्कृत्यें घडतात किंवा जे विजय संपादिले जातात, त्यांच्या मुळाशीं धार्मिक भावना आणि स्वातंत्र्यप्रीति या गोष्टी बहुधा असतात, असें आढळून येतें. परंतु या वेळीं वर निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमुळें हीं दोन्हींहि कारणें गैरहजर होतीं. त्यामुळें सर्वांना योग्य अशी एकच वाट दाखविणारा कोणत्याहि उच्च भावनेचा सूर्य आपल्या क्षितिजावर तळपत नसल्याकारणानें रात्रीच्या काळोखांत ज्याला जिकडे वाट सांपडेल तिकडे तो जातो, तशी आपली या वेळीं स्थिति झाली होती. आपल्या देशांतील त्या वेळच्या लोकांच्या अंगामध्यें शौर्य नव्हतें असें नाहीं; परंतु त्या शौर्याचा योग्य उपयोग कसा करावयाचा, हेंच त्या वेळीं कोणाला समजत नाहींसें झालें होतें. एखाद्या घोड्याच्या पायांत धांवण्याची पुष्कळ शक्ति असते. पण नुसत्या त्या शक्तीचा काय उपयोग ? त्या घोड्याच्या तोंडांत लगाम घालून त्या घोड्याला इष्ट मार्गानें चालवून नेणारा जर कोणी असेल, तर त्या घोड्याच्या गतीचा चांगला उपयोग होईल. नाहीं तर तो घोडा सैरावैरां धावून आपल्या उपजीविकेचें जें धान्य, तेंच तो तुडवून टाकण्याला प्रवृत्त होईल. आपल्या अंगांतील जें शौर्य असेल तें आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्यसंरक्षणाच्या पायींच समर्पण केलें पाहिजे. आपल्या शौर्यावर आपल्या देशाचा ताबा आहे, तें शौर्य आपण दुसऱ्या

कोणालाहि विकतां कामा नये, हीं राजकारणांतील अगदीं सामान्य तत्त्वें आहेत. पण हीं सामान्य तत्त्वें सुद्धां त्या वेळीं आपल्या लोकांना समजेनाशीं झालीं होतीं. आपलें सौंदर्य हें आपल्या पतीच्या मालकीचें आहे, तें आपण पाहिजे त्याला विकतां कामा नये, हा जसा पतिव्रतेचा पातिव्रत्यधर्म, त्याचप्रमाणें आपल्या शौर्यावर आपल्या देशाची सत्ता आहे, त्या शौर्याचा आपण बाजारांत पाहिजे त्याच्यापुढें विक्रय करितां कामा नये, हा स्वदेश-भक्तीचा पवित्र धर्म होय. पण हा धर्म त्या वेळीं पुष्कळ लोक विसरून गेले होते आणि जो भाकरी देईल त्याची चाकरी करावयाची, ही क्षुद्र वृत्ति त्या लोकांच्या डोळ्यांना भुरळ पाडूं लागली होती. आणि त्यामुळें आपल्या देशांतील लोक इंग्लिशाच्या नोकरीला राहून आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या विरुद्धहि लढण्याला तयार होऊं लागले होते. एक चूक झाली म्हणजे तिच्यापासून दुसऱ्या अनेक चुका उत्पन्न होतात, हा नेहमींचाच अनुभव आहे. आणि तीच गोष्ट या बाबतींत हिंदुस्थानच्या प्रत्ययाला आली. आपण इंग्लिशांच्या चाकरीला राहून आपल्या देशी राजांच्या विरुद्ध लढतों, यांतील नीचपणा, अधमपणा, गुन्हेगारपणा, आणि निमकहरामपणा कोणाच्याहि त्या वेळीं लक्षांत येऊं नये, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. हा लोकांच्या डोळ्यावरील मोतिबिंदु काढून टाकण्याला त्या वेळीं रामदासांच्या सारखा कोणी तरी राजकारणी धर्मवैद्य पाहिजे होता. इंग्लिश लोकांनीं त्या वेळीं आपल्या राजांच्या पाशीं जे तह केले आहेत, त्यांत त्यांची ही एक मुख्य अट आहे कीं, तुम्ही कोणाहि युरोपियन लोकांना आपल्या चाकरीस ठेवितां कामा नये व पूर्वीं तुमच्या चाकरीला जे युरोपियन असतील त्यांना तुम्हीं काढून टाकलें पाहिजे. ही इंग्लिशांची अट पाहून तरी आपल्या इंडियन लोकांना सुचावयाला पाहिजे होतें कीं, ते ज्याप्रमाणें युरोपियन लोकांना आपल्या चाकरीला राहूं देत नाहींत, त्याचप्रमाणें आप-णाहि त्यांच्या चाकरीला राहतां कामा नये. पण इतका साधा विवेकहि कोणाच्या मनाला शिवला नाहीं. आणि आपले लोक राजरोसपणानें आणि शिष्टपणानें इंग्लिशांच्या चाकरीला राहून स्वदेशाशीं मात्रागमनीपणा करूं लागले. त्या वेळीं आपल्या लोकांनीं इंग्लिशांच्या पलटणींतील व इतर नोकऱ्या पतकरण्याचा क्रम सुरू केला, हे तर वाईटच. पण याच्या-हिपेक्षां दुसरी जास्त वाईट अशीहि एक गोष्ट आपले लोक त्या वेळीं करूं लागले होते. ती अशी कीं, नोकरी पतकरावयाची आपल्या राजांची, पण आंतून फितूर असावयाचें इंग्रजांना. असल्या या नीचपणाच्या मानवी स्वभावाला काय म्हणावें ? या पुस्तकामध्यें ज्या लढायांचीं वर्णनें दिलेलीं आहेत त्यांपैकीं किती तरी लढायांतून केवळ आपल्या लोकांच्या फितुरीमुळें आपल्या राजाचे पराभव झालेले आहेत. इंग्लिश लोक गुप्तपणें लांच देण्यांत निष्णात ! आणि आपल्यापैकीं कित्येक लोक ते लांचाचे पैसे घेऊन गुप्तपणें फितूर होण्याच्या कामांत निष्णात ! अशी जोडी जमल्यानंतर आपल्या लढायांतून आपले पराजय होण्याला आणि आपल्या देशांतून आपलें स्वातंत्र्य नष्ट होण्याला किती अवकाश लागणार ?

मराठ्याच्या या लढायांमधून त्याचे हे पराभव कां झाले, या गोष्टीच्या कार-णांची निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या प्रकारानें उपपत्ति लाविलेली आहे. त्यांपैकीं कित्येकांचें असें मत आहे कीं, इंग्लिशांच्या बाजूकडील शिपायांच्या हातांत मराठी

सैन्याच्या पेक्षां जास्त चांगल्या प्रकारच्या बंदुका होत्या, आणि त्यामुळें त्यांना ठिक-ठिकाणीं यश येत गेलें. परंतु या उपपत्तीमध्यें फारसा तथ्यांश नाहीं. हल्लीं पाश्चिमात्य लोकांनीं कित्येक आधिभौतिक शास्त्रांमध्यें पुष्कळ प्रगति केलेली आहे; त्यावरून गेल्या एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीच्या वेळींहि इंग्लिशांच्या बाजूकडील शिपायांच्या हातांत सुधारलेलीं शस्त्रास्त्रें असलीं पाहिजेत, असा एक सामान्य आणि सार्वत्रिक समज होण्याचा संभव आहे. परंतु हा समज चुकीचा आहे. शंभर सव्वाशें वर्षांच्या पूर्वीच्या इंग्लिशांकडील शिपायांच्या हातांतील हत्यारें फारशीं सुधारलेलीं नव्हतीं. जुन्या काळांतील आपल्या इकडील तोड्याच्या बंदुका घेऊन कोणी इंग्लिशांशीं लढत असले, तर त्यांच्यापेक्षां इंग्लिशांच्या हातांतील काडतुसाच्या बंदुका सरस होत्या, हें उघड आहे. पण असईच्या लढाईपासून अडगांवच्या लढाईपर्यंत जे मराठे शिपाई इंग्लिशांच्या विरुद्ध लढत होते, त्यांच्या हातांत यावेळीं तोड्याच्या बंदुका राहिलेल्या नव्हत्या; इतकेंच नव्हे, तर दौलतराव शिंदे यांनीं आपल्या पदरीं जे फ्रेंच लष्करी अंमलदार नोकरीला ठेविले होते, त्यांच्याकडून युरोपियन हत्यारें मिळविण्याचीहि तजवीज करण्यांत आलेली होती. असईच्या लढाईपासून अडगांवच्या लढाईपर्यंतचा आपल्या इकडील जो काळ आहे तो काळ युरोपखंडाच्या इतिहासांतहि एक अतिशय महत्त्वाचा काळ आहे. त्या काळांत इंग्लिश आणि फ्रेंच यांचें हाडवैर माजलेलें असून तिकडे त्या वेळीं नेपोलियनचें महायुद्ध चाललेलें होतें. त्या महायुद्धांतील इंग्लिशाचा कट्टा वैरी जो महापराक्रमी नेपोलियन, त्यालाच खुद्द हिंदुस्थानांत इंग्लिशाच्या विरुद्ध लढण्याकरितां ज्या इंडियन राजांनीं बोलाविलें होतें, त्या राजांना फ्रान्समधील शस्त्रास्त्रांचा पुरवठा होत नसेल, असें मानणें शक्य नाहीं. आणि खुद्द फ्रेंचांचा मुख्य नायक नेपोलियन हा जरी हिंदुस्थानांत येऊं शकला नाहीं, तरी दुसरे पुष्कळ फ्रेंच लोक इकडे येऊन ते देशी राजांच्या चाकरीला राहिलेले होते. ते युरोपांतील हत्यारें आणवीत असत, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या देखरेखीखालीं येथें दारुगोळा तयार करण्याचे आणि तोफा ओतण्याचेहि कारखाने सुरू करण्यांत आलेले होते व शिवाय तिकडच्या धर्तीवर मराठ्यांचे कवायती कंपूहि इकडे शिस्तवार रीतीनें तयार करण्यांत आलेले होते. या सर्व गोष्टी इतिहासांत नमूद आहेत. तेव्हां अशा स्थितींत इंग्लिशांच्या बंदुका हें आपल्या पराजयाचें कारण, ही कारणमीमांसा बरोबर जमत नाहीं.

शिवाय, इंग्लिशांच्या बंदुका हें जर इंग्लिशांच्या विजयाचें कारण असेल, तर यशवंतराव होळकराच्या लांडगेतोडीच्या पाठलागापासून परावृत्त होऊन मॉन्सन्‌साहेब जेव्हां पाठीमागें पाठीमागें पळ काढीत सुटला होता, तेव्हां त्यानें काय आपल्या शिपायांच्या हातांतल्या लांब पल्ल्याच्या बंदुका यशवंतराव होळकराच्या शिपायांच्या हातांत देऊन त्यांच्या आखुड पल्ल्याच्या बंदुका आपल्याजवळ घेतल्या होत्या ? त्याचप्रमाणें इंग्लिशांच्या बंदुका हें जर इंग्लिशांच्या विजयाचें कारण असेल, तर भरतपूरच्या तटाच्या भिंतीपुढून इंग्लिश सैन्य लागोपाठ चार वेळां पराभव पावून मागें हटलें, त्या वेळेला त्यांच्या त्या सुधारलेल्या बंदुका कोठें गेल्या होत्या ? सारांश, इ. स. १८०४–५ सालीं यशवंतराव होळकरानें आणि भरतपूरच्या राजानें इंग्लिशांच्या विरुद्ध जें यशस्वी युद्ध केलें,

त्यावरूनही सुधारलेल्या बंदुकांची कल्पना अगदीं कमकुवत ठरते आणि ईस्ट इंडिया कंपनीचे लोक आपल्याकरितां नव्या बंदुका ठेवून आपल्या जुन्या बंदुका मराठ्यांना विकत देऊन त्यांना फसवीत असत, ही गोष्ट क्वचित् प्रसंगीं खरी असली, तरी मराठ्यांच्या सर्व पराजयांचा भार या असल्या एकाच क्षुल्लक कारणावर ठेवणें हें केव्हांहि योग्य होणार नाहीं.

मराठ्यांच्या पराजयाचें दुसरें एक कारण सांगण्यांत येतें, तें असें कीं, मराठ्यांनीं आपली गनिमी काव्यानें लढण्याची जुनी पद्धत सोडली, आणि ते पाश्चिमात्य लोकांच्या धर्तीवर आपल्या शिपायांच्या लष्करी पलटणी बनवूं लागले. या नव्या पद्धतीमुळें त्यांचे पराजय झाले. हें मत कित्येक तज्ज्ञ अशा इंग्लिश लोकांकडून व्यक्त करण्यांत आलेलें आहे. व खुद्द जनरल वेलिंग्टन यानेंही अशाच अर्थाचे जे उद्गार काढलेले आहेत, ते पुढील पुस्तकांत नमूद करण्यांत आलेले आहेत. इंग्लिश लोक आपल्याबद्दल जीं विधानें करतात, त्यांचा स्वीकार आपण फार सावधपणानें केला पाहिजे हें तत्त्व आतांच्याप्रमाणें जुन्या काळाच्या बाबतींतही आपण पूर्णपणें लक्षांत ठेविलें पाहिजे. भोळसर मनुष्य एकाच सरळ मार्गानें चाललेला असतो; पण धूर्त माणसाचे त्याला फसवण्याचे मार्ग अनेक असतात, हें आपण विसरतां कामा नये. शिस्तवार पद्धतीनें आपल्या सैन्याच्या पलटणी बनवून त्यांच्या द्वारानें आपली लढाई इंडियन राजे शिस्तीनें लढूं लागले, तर त्यामुळें त्यांचा पराभव व्हावा, असें त्यांत काय बरें दोषार्ह आहे ? इंग्लिश लोकांनीं म्हणावें आणि आपण त्यांना माना डोलवाव्या, हें ठीक आहे. पण ज्या शिस्तीमुळें इंग्लिशांचीं सैन्यें विजय मिळवूं शकतात, त्याच शिस्तीमुळें आमच्या सैन्याचे पराभव व्हावे, हा न्याय कोठला ? बाकीचे लोक अन्न खाऊन धष्टपुष्ट होत असले, तरी हे इंडियन राजांनो, धष्टपुष्ट होण्यासाठीं तुम्हीं तें अन्न खाल्लें, तर तुम्ही खात्रीनें मरून जाल, अशी सृष्टिविरुद्ध एखादी गोष्ट खुद्द एखाद्या वेलिंग्टन् साहेबानें सांगितली, म्हणून ती आपण खरी मानावयाची कीं काय ? आणि गनिमी काव्याची पद्धत ही आपली मराठ्यांची मूळची लढाईची पद्धत, ह्या म्हणण्यांत तरी अर्थ काय आहे ? " गनिमी कावा " हा शब्दही आपला नव्हे. तर त्या शब्दानें व्यक्त होणारी लढाईची पद्धत तरी आपली कोठून होऊं शकणार ? शिवाजीनें कित्येक प्रसंगीं गनिमी काव्याच्या लढाईच्या पद्धतीचा अंगीकार केला, हें खरें; पण शिवाजीचें सैन्य प्रथमतः थोडें आणि मोगलांचें सैन्य फार मोठें, अशा स्थितींत त्यांच्यावर आडून छापे घालावेत आणि घोड्यावर बसून दुसरीकडे निघून जावें, अशी पद्धत शिवाजी महाराजांना पहिल्या पहिल्यानें स्वीकारणें जरूरच होतें व याच पद्धतीचा पुढें धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनींहि याच कारणासाठीं अवलंब केला होता. आणि तशी वेळ पडेल तेव्हां कोणींहि सेनापतींनीं या पद्धतीनें लढाई करण्याला कांहीं हरकत आहे असें नाहीं. यशवंतराव होळकरांनीं कर्नल मॉन्सन यांच्या विरुद्ध जी पाठलागाची लढाई चालविली होती, तीहि कांहीं अंशीं याच पद्धतीची होती. पण म्हणून याचा अर्थ असा नव्हे कीं, दौलतराव शिंद्यांनीं युरोपियन राष्ट्रांच्या पद्धतीवर आपले कवायती कंपू बनविण्याला सुरुवात केली, म्हणून त्यांचे लढाईंत पराभव झाले. शिस्तीपासून लढाईंत केव्हांहि फायदाच झाला पाहिजे. आणि आपलें इंडियन लोकांचें जर कांहीं नुकसान झालें असेल, तर तें शिस्तीमुळें नसून शिस्तीच्या

अभावामुळें झालेलें आहे. आपला युद्धविषयक प्राचीन इतिहास आपण पाहिला, तर आपल्या सैन्याची सगळा रचना शिस्तीविरच केलेली असल्याचें आपल्याला आढळून येईल. अशा स्थितींत आपण आपले भलतेच ग्रह करून घेऊन आपल्या विजयाच्या कारणांमध्यें आपण आपल्या पराजयाचीं कारणें पाहूं लागलों, तर तें केव्हांहि योग्य होणार नाहीं.

सारांश, आपल्यापाशीं चांगलीं हत्यारें नव्हतीं, किंवा आपण कवायती कंपू तयार करून लढूं लागलों म्हणून आपले हे पराजय झाले, ही कारणमीमांसा बिलकुल चुकीची आहे. हे आपले पराभव आपल्या नैतिक अधःपातानें घडवून आणलेले आहेत. या पुस्तकांत पुढें ज्या लढाया दिलेल्या आहेत, त्यांपैकीं किती तरी ठिकाणीं निव्वळ फितुरीमुळें आपले पराजय झाले असल्याचें आपल्याला आढळून येतें. आणि ज्या लोकांच्या मनावर आपल्या धर्माच्या किंवा देशाच्या बंधनांचा मुळींच दाब उरलेला नसतो, आणि ज्यांना केवळ स्वार्थाशिवाय दुसरें कांहीं दिसतच नसतें, असेच नीच आणि निमकहराम लोक असलीं हीं फितुरीचीं कामें करण्याला उद्युक्त होतात. असले लोक पेशवाईच्या शेवटच्या दिवसांत आपल्याइकडे फार झालेले होते. आपल्या देशाचें आणि आपल्या राजाचें कांहीं कां होईना, आपल्याला एखादें इनाम मिळालें म्हणजे झालें, अशा मनोवृत्तीच्या अधम आणि आप्पलपोट्या फितुरी लोकांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या लढायांतून आपले पराभव करून घेतले आणि आपलीं राज्यें बुडविलीं. अशी वस्तुस्थिति या पुस्तकांतलि लढायांच्या अध्ययनावरून स्पष्टपणें दिसून येते. आणि ही स्थिति जर आपल्याला यापुढें तरी बदलावयाची असेल, तर आपली नैतिक उन्नतिच झाली पाहिजे. आपला धर्म, आपला देश, आपलें स्वातंत्र्य, आपलें राज्य, आपलें ऐक्य, आपलें बंधुत्व या गोष्टी ज्यांना आपल्या प्राणापेक्षांहि प्रिय होतात, त्या लोकांनाच लढायांतून विजय मिळतात, त्यांचींच राज्यें प्रस्थापित होतात आणि त्यांचींच स्वातंत्र्यें कायम टिकतात. आणि हेंच तत्त्व भगवान् श्रीकृष्णांनीं आपल्या भगवद्गीतेंतील शेवटच्या श्लोकामध्यें सांगितलेलें आहे. तो श्लोक असा—

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥**

पुणें
विजयादशमी शके १८५०. } **शि. म. परांजपे.**



बापू गोखले.

# खडकीची लढाई.

खडकीची सुप्रसिद्ध लढाई दुसरे बाजीरावसाहेब पेशवे आणि इंग्लिश यांच्या दरम्यान ता. ५ नोव्हेंबर १८१७ रोजीं झाली. व पुढें थोडक्याच दिवसांत पुण्यांतील पेशव्यांची सत्ता नाहींशी झाली. या लढाईला आधींची कारणें काय झालीं आणि ही लढाई झाल्यानंतर त्या लढाईचा इतका दुष्परिणाम इतक्या ताबडतोबीनें कां झाला, हे इतिहासदृष्ट्या विचार करण्यासारखे आणि फार महत्त्वाचे प्रश्न आहेत. इ. स. १८१७ च्या नोव्हेंबर महिन्यांत झालेल्या खडकीच्या लढाईचीं कारणें १८१७ सालांतील नोव्हेंबरच्या आधींच्या कांहीं महिन्यांमध्येंच कोठें तरी पुष्कळांकडून शोधण्यांत येतात. पण तीं कारणें तेथें नसून पहिल्यानें राघोबादादा आणि मागाहून खुद्द बाजीराव जेव्हां इंग्लिशांची मदत मागण्याकरितां त्यांच्याकडे गेले, तेव्हांपासूनच घडून येऊं लागलेलीं होतीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पेशवे, शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, वगैरे महाराष्ट्रांतील मोठमोठ्या राजांनीं आणि सरदारांनीं मिळून जी एक मराठा कॉन्फिडरसी स्थापन केली होती, तिच्यामध्येंच मराठ्यांचें खरें सामर्थ्य होतें. ती कॉन्फिडरसी एकदां मोडली आणि पेशवे, शिंदे, होळकर, वगैरे राजे एकमेकांपासून वेगळे पडले, म्हणजे त्या एकएकट्या राजांचीं राज्यें गिळंकृत करून टाकण्याला इंग्लिशांना फारसें कांहीं अवघड होतें, असें नाहीं. व हेंच इंग्लिशांचें त्या वेळच्या राजकारणामधील मुख्य धोरण होतें, आणि तें धोरण सिद्धीस नेण्याला बाजीरावानें आपल्या वसईच्या तहानें ( ३१ डिसेंबर १८०२ ) इंग्लिशांना आयतीच संधि आणून दिली. पेशव्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, या राजांच्यापाशीं स्वतंत्र रीतीनें कोणताही संबंध ठेवतां कामा नये; त्यांच्याशीं पेशव्यांना जें कांहीं बोलणें करावयाचें असेल, तें त्यांनीं इंग्लिशांच्या मार्फत केलें पाहिजे; व पेशवे आणि शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, यांच्या दरम्यान कोणत्याही बाबतींत कांहीं तंटा उपस्थित झाला, तर त्याचा निकाल इंग्लिशांचे विद्यमानें व्हावा; हें तत्त्व इंग्लिशांनीं पेशव्यांशीं केलेल्या तहामध्यें जेव्हां समाविष्ट करून घेतलें, तेव्हांच मराठ्यांची मराठा कॉन्फिडरसी नष्ट झाली, आणि तेव्हांच पेशव्यांचें वर्चस्व नामशेष झालें.

पेशवे आणि इतर राजे यांच्यामधील भांडण इंग्लिशाच्या विद्यमानें तोडण्यांत आलें पाहिजे, या वर सांगितलेल्या तहांतील घातुक अटीचा उपयोग करण्याचा प्रसंग

बडोद्याच्या गायकवाडापाशीं पेशवे सरकारचा कांहीं देण्याघेण्याच्या संबंधानें जो वाद होता, त्या बाबतींत उपस्थित झाला. त्या कामीं बोलणें चालणें करण्याकरितां गंगाधरशास्त्री पटवर्धन हे गायकवाडचे वकील म्हणून इंग्लिशांच्या संरक्षणाखालीं पुण्यास पेशव्यांकडे आले. त्या गंगाधरशास्त्रयांचा मराठी राज्याच्या दुर्दैवानें पंढरपुरास खून झाला. बाजीरावसाहेबांच्या मसलतीनें त्रिंबकजी डेंगळे यानें हा खून केला, असें गायकवाडच्या वतीनें इंग्लिशांचें म्हणणें पडलें. व त्रिंबकजी डेंगळ्याला तुम्हीं धरून आणून आमच्या स्वाधीन करावें, अशी इंग्लिशांनीं बाजीरावसाहेबांपाशीं मागणी सुरू केली. त्याप्रमाणें त्रिंबकजी एकदां पकडला जाऊन त्याला ठाण्याच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलेलें होतें. पण तेथून तो पळाला ( १८१६ ), तेव्हां त्याला फिरून आमच्या स्वाधीन करून द्यावें, असा बाजीरावाच्या मागें इंग्लिशांचा तगादा लागला. परंतु त्रिंबकजी डेंगळ्याला आपल्या स्वाधीन करून देण्याच्या कामीं बाजीरावसाहेब मुद्दाम टाळाटाळ करीत आहेत, या सबबविर इंग्लिशांनीं अखेरीस इ. स. १८१७ च्या मे महिन्याच्या ८ व्या तारखेला पुणें शहराला आपल्या इंग्रजी फौजेचा एकाएकीं वेढा दिला. त्या वेळीं निरुपाय होऊन इंग्लिशांनीं घातलेल्या अटी बाजीरावसाहेबांना कबूल करणें भाग पडलें. या अटी ज्या तहानें मान्य करण्यात आल्या, त्या तहाला पुण्याचा तह असें नांव देण्यांत आलें आहे. व हा तह ता. १३ जून १८१७ रोजीं करण्यांत आला. या तहानें पेशव्यांच्या राज्यांतील बराच मुलुख इंग्लिशांच्या ताब्यांत गेला; पेशव्यांच्या सैन्याची संख्या बरीच कमी करण्यांत आली; आणि इ. स. १८१३ मध्यें पेशव्यांनीं इंग्लिश अधिकाऱ्यांकडून कवाईत शिकवून आपल्या स्वतःकरितां जी एक पलटण तयार करविली होती, ती पलटण पेशव्यांच्या ताब्यांतून काढून इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतली. अशा प्रकारच्या या तहाच्या योगानें इंग्लिशांची सत्ता जास्त वाढली आणि बाजीरावाची सत्ता जास्त संकुचित झाली. त्यामुळें ही गोष्ट बाजीरावाच्या मनाला फार लागून राहिली व इंग्लिशांच्या या वाढत्या संकटातून आपली कशी सुटका होईल, याचा तो विचार करूं लागला.

याच वेळीं हिंदुस्थानांतील पेंढारी लोकांचें बंड मोडून टाकण्यासाठीं इंग्लिशांनीं एक मोठें सैन्य जमा केलें होतें व या कामीं शिंदे, होळकर, वगैरे राजांनीं आपल्याला मदत करावी, अशीही इंग्लिशांनीं त्यांच्याकडे मागणी केली होती. व तशीच मागणी इंग्लिशांकडून बाजीरावाकडेही करण्यांत आलेली होती. म्हणून या सुमारास बाजीरावानें सैन्याची जमवाजमव करण्याला सुरवात केली होती. हें सैन्य पेंढाऱ्यांच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्याकरितां आपण जमवीत आहों, असेंच बाजीराव सांगत असे. पण बाजीरावाचें हें म्हणणें केवळ बाह्यात्कारी असून त्याचा आंतील खरा उद्देश आपल्या विरुद्ध लढाई करण्याचा आहे, असा इंग्लिशांच्या मनानें संशय घेतला. जून महिन्यांत पुण्याचा तह झाल्यानंतर जुलै महिन्यामध्यें आषाढी यात्रेच्या निमित्तानें बाजीरावसाहेब पंढरपुरास गेले आणि कांहीं दिवसांनीं तेथून येऊन ते साताऱ्याजवळच्या माहुलीच्या वाड्यांत राहिले. तेथें असतांना हैद्राबादेहून सर जॉन मालकम हे

बाजीरावसाहेबांच्या भेटीला आले. त्यांच्या जवळ बाजीरावसाहेबांनीं आपलीं सर्व गाऱ्हाणीं प्रेमानें आणि खुल्या दिलानें सांगितलीं व इंग्लिशांनीं पुण्याच्या तहानें आपल्याला कसें व्यापून टाकलें आहे, याबद्दलची हकीकत त्यांनीं मालकम साहेबापुढें ठेविली. तेव्हां मालकम साहेबांनीं त्यांना अशी सल्ला दिली कीं, तुम्ही इंग्लिशांपाशीं इमानेंइतबारें वागावें व इंग्लिशांनीं पेंढाऱ्यांच्या विरुद्ध जी मोहीम सुरू केली आहे, त्या मोहिमेंत तुम्हीं आपलें सैन्य पाठवून इंग्लिशांना मदत करावी. ही मालकमसाहेबांची सल्ला बाजीरावाला पटली व त्याप्रमाणें तो पेंढाऱ्यांच्या विरुद्ध पाठविण्याकरितां सैन्य ठेवूं लागला. मालकमसाहेब आणि बाजीरावसाहेब यांचा पूर्वापार सलोखा फार होता आणि त्यामुळें मालकमसाहेबांचा बाजीरावावर विश्वास होता. आणि म्हणूनच पेंढाऱ्यांच्या विरुद्ध पाठविण्यासाठीं सैन्य ठेवण्याविषयींची त्यांनीं बाजीरावाला परवानगी दिली होती. परंतु पुण्याच्या दरबारांतील इंग्लिशांचे रेसिडंट, एल्फिन्स्टनसाहेब यांचा बाजीरावावर मालकमसाहेबांप्रमाणें विश्वास नव्हता आणि त्यामुळें बाजीराव नवीन सैन्य जमवीत आहे, या गोष्टीबद्दल त्यांना दिवसें-दिवस जास्तच संशय येऊं लागला. या वेळीं बाजीरावानें सैन्य जमा केलें नसतें, तर तो पेंढाऱ्यांच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्याच्या कामीं कांहींच खटपट करीत नाहीं, असा आरोप इंग्लिशांना बाजीरावावर आणतां आला असता; आणि तो सैन्य जमवूं लागला, तर तो तें सैन्य खुद्द इंग्लिशांच्या विरुद्धच लढण्याकरितां जमवीत आहे, असा संशय इंग्लिशांना प्रत्यक्ष आलाच. या कामीं बाजीरावाचा सैन्य ठेवण्यांतील खरा हेतु कोणता होता, याबद्दल पेशव्यांच्या दप्तरांतील असा प्रत्यक्ष उल्लेख कोठेंही नाहीं. परंतु सैन्य जमा न केलें तर दूषण, आणि सैन्य जमा केलें तर संशय, अशा दुहेरी कात्रीमध्यें इंग्लिशांनीं आपल्या डावपेचांनीं बाजीरावाला धरलेलें होतें, यांत संशय नाहीं. परंतु तें कसेंही असलें, तरी बाजीराव या वेळेपासून आपल्या फौजा जमा करूं लागला, ही गोष्ट निश्चित आहे. या वेळची पेशव्यांच्या बखरींतील जी हकीकत आहे, ती अशी कीं:—"श्रीमंत फौज ठेवूं लागले. अवघे बोलावून पुण्यास आणिले. नवे फौजेची कलमजारी केली. आला स्वार, पायदळ, याची हजिरी घेऊन चाकरीस ठेविलें. १०,००० आरब चाकरीस ठेविले व ३००० गोसावी नंगे असे चाकर ठेविलें. तेव्हां इंग्रजांचा नेट भारी होत चालला. त्यांनींही पलटणांची तयारी केली. श्रीमंतांची लाख फौजेची हजिरी झाली. तोफखाना पानशे यांजकडून करवीत चालले. नवे बाण करण्याचा आरंभ केला. दारूगोळा याचाही सरंजाम चालविला."

याच सुमाराला उत्तर हिंदुस्थानांतील पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां म्हणून मार्क्विस ऑफ् हेस्टिंग्ज यांच्या योजनेप्रमाणें इंग्लिशांचें जें एक मोठें थोरलें सैन्य ठिकठिकाणीं जमा होत होतें, त्यापैकीं ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या ताब्यांतील फोर्थ ( चवथ्या ) डिव्हिजनमधील लष्कर खानदेशांतून कूच करीत हळूहळू अहमदनगरकडे येत चाललेलें होतें व मुंबईची एक युरोपियन पलटण, मद्रास नेटिव्ह घोडेस्वारांची दुसरी पलटण, आणि मद्रास नेटिव्ह इन्फंट्रीच्या पंधराव्या रेजिमेंटमधील दुसरी पलटण, अशा प्रकारचें सैन्य मुंबईहून

निघून पुण्याकडे चाल करून येत होतें. व हें मुंबईकडून येणारें सैन्य आणि अहमदनगरकडे येणारें स्मिथसाहेबांच्या हाताखालचें सैन्य हीं एकत्र व्हावयाचीं होतीं. या सगळ्या वर सांगितलेल्या इंग्रजी लष्कराला ' आर्मी ऑफ् दी डेक्कन ' असें नांव देण्यांत आलेलें होतें. पेंढाऱ्यांच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्याच्या नांवाखालीं बाजीरावानें पुण्यांत सैन्य गोळा करण्याला सुरुवात केली, हा जसा इंग्लिशांचा बाजीरावावर आक्षेप आहे, त्याच-प्रमाणें पेंढाऱ्यांच्या लढाईच्या निमित्तानें इंग्लिशांनीं आपलें सैन्य पुण्याच्या आसपास गोळा करण्याला सुरुवात केली आहे, असा संशय बाजीरावाच्याही मनामध्यें या वेळीं उत्पन्न होणें अगदीं साहजिक होतें. व त्याप्रमाणें तसा संशय बाजीरावाच्या मनामध्यें उत्पन्न झालाही. पेंढारी मुख्यत्वेंकरून उत्तर हिंदुस्थानांत नर्मदेच्या पलीकडे विंध्याद्रीच्या डोंगरांत; आणि त्यांच्या पारिपत्याकरितां म्हणून उभारलेल्या सैन्यापैकीं ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या हाताखालील फोर्थ डिव्हिजनमधील लष्कर पुण्याच्या रोखानें खानदेशांतून अहमदनगरकडे चाल करून येत असलेलें; अशा प्रकारच्या या सैन्याच्या हालचालीवरून कोणाच्या मनांत संशय उत्पन्न होणार नाहीं ? या वेळचें बाजीरावाचें वर्तन जर दुटप्पीपणाचें होतें, तर या इंग्लिश सैन्यांच्या हालचालीवरून इंग्लिशांचे वर्तनही तितकेंच दुटप्पीपणाचें नव्हते काय ? पण इतकेंच नव्हे तर, कांहीं तरी निमित्तानें पेशव्यांचें राज्य लयाला न्यावें, असा इंग्लि-शांचा स्पष्ट हेतु होता, असें लेफ्टनंट कर्नल ब्लॅकर यानें आपल्या इतिहासांत दिलेल्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे:—It may be proper to mention, that these orders of The Supreme Government were dated on the 16th of May, 1817; at which period the affairs at Poona, previous to the treaty, were in that unsettled state which has been described. Accordingly, Sir Thomas Hislop's instructions embraced, in the first instance, *the object of reducing the Peishwah's Power*.

इंग्लिशांच्या अंतःस्थ हेतूंच्या संबंधानें तूर्त हा एकच पुरावा आहे. पण या संबंधाचे इंग्लिशाचे गुप्त कागदपत्र जर इंडियन लोकांना पहावयाला सांपडतील, तर बाजीरावसाहेब हे इंग्लिशांनीं बनवून दिलेल्या आपल्या हल्लींच्या कल्पनेपेक्षां निदान या लढाईच्या कार-णाच्या बाबतींत तरी किती तरी जास्त चांगले ठरतील, यांत शंका नाहीं. इंग्लिशांनीं बाहेरची आपलीं सैन्यें पुण्याच्या आसपास आणण्याला सुरुवात केली, इतकेंच नव्हे, तर ते महा-राष्ट्रांतील आणि पेशव्यांच्या ताब्यांतील मुलखातून नवीन नोकरही आपल्या चाकरीस ठेवूं लागले आणि या कृत्याला बाजीरावाच्या रत्नागिरीकडील कोंकणांतील कित्येक अम्लदारां-कडून प्रतिबंध करण्यांत आला असतां, हें बाजीरावाचें कृत्य इंग्लिशांच्या द्वेषाचें द्योतक आहे, असें इंग्लिशांकडून प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें ! बाजीरावाच्या मुलखांतील शिपाई लोकांना बाजीरावाच्या विरुद्ध लढण्याकरितां इंग्लिशांनीं आपल्या नोकरीला ठेवावें, असें जर एका बाजूनें चाललेलें असलें, तर दुसऱ्या बाजूनें बाजीरावाच्या लोकांनीं त्याला हरकत घेतली तर त्यांत गैर तें काय झालें ? आणि अशा प्रसंगीं इंग्लिशांनीं तरी काय केलें असतें ? जो न्याय इंग्लिशांनीं आपल्याला लाविला असता, तोच न्याय त्यांनीं बाजीरावालाही लावावयाला नको काय ?

दुसरी गोष्ट अशी कीं, पावसाळ्याचे दिवस हे सैन्यांच्या हालचालींना सोईचे नसल्यामुळें पेंढाऱ्यांच्या पारिपत्यासाठीं बाजीरावानें जें सैन्य जमा केलें होतें तें दसरा झाल्यानंतर आपल्याकडून पेंढाऱ्यांच्या मोहिमेवर रवाना करण्यांत येईल, असें बाजीरावाचें म्हणणें होतें. व त्याप्रमाणें त्यानें तें सैन्य कदाचित् पाठविलेंही असतें. परंतु इंग्लिशांचीं सैन्यें आपल्या मुलखाच्या आसपास गोळा होत आहेत, असें पाहिल्यानंतर त्यानें आपलें सैन्य आपल्या मुलखांतून बाहेर पाठविलें नसलें, तर त्यांत तरी त्याचा काय अपराध आहे? दुसऱ्यांचीं सैन्यें आपल्या मुलखांत घुसत आहेत अशा वेळीं आपलें सैन्य आपल्या मुलखाच्या बाहेर पाठविण्याला कोण बरें तयार होणार आहे? इंग्लिशांचें हें एकंदर धोरण पाहून बाजीरावाच्याही मनामध्यें इंग्लिशांच्या सद्धेतूबद्दल संशय उत्पन्न झाला असला पाहिजे, यांत शंका नाहीं. आणि म्हणून त्यानेंही आपल्या सैन्याची जमवाजमव जास्त जोरानें करण्याला सुरुवात केली. शिंदे, होळकर आणि भोंसले, यांच्याकडे मदतीकरतां निरोप पाठविण्यांत आले. सर्व किल्ल्यांची दुरुस्ती करून तेथें शिबंदीचे लोक आणि दाणागोटा यांची तयारी करण्यांत आली व आपल्या आरमाराचीही तयारी असावी, म्हणून पेशव्यांकडून हुकूम सुटले.

या वेळीं दोन्हीही पक्ष अशा रीतीनें आपआपल्या बाजूच्या सैन्यांची जमवाजमव करीत असतांना बाजीरावसाहेब इंग्लिशांच्या बाजूकडील लष्करामध्यें फंदफितूर करण्याचे प्रयत्न करीत होते, असा इंग्लिशांचा त्यांच्यावर एक आरोप आहे. पण हा आरोप खरा आहे, असें क्षणभर मानलें, तरी इंग्लिशांनीं पेशव्यांच्या लष्करांत आणि दरबारांत असे फंदफितुरीचे काहींच प्रयत्न केलेले नव्हते काय? एका नेटिव्ह ऑफिसरला दहा हजार रुपये आणि दुसऱ्या एका एजंटला पन्नास हजार रुपये इंग्लिश सैन्यांत फितुरी करण्याकरितां बाजीरावाकडून देण्यांत आले होते, असें इंग्लिशांचें म्हणणें आहे. पण आपण या कामाकारितां कोणाला किती पैसे दिले होते, हें मात्र इंग्लिशांनीं सांगितलें नाहीं! पण त्यांनीं जरी तें सांगितलेलें नसलें, तरी असल्या बाबतींतील त्यांचें गुप्त वर्तन जगजाहीर झालेलें आहे. सोहनीकृत पेशव्यांच्या बखरीमध्यें इंग्लिशांनीं चालविलेल्या फितुरीच्या संबंधानें पुढीलप्रमाणें स्पष्ट उल्लेख आहे:—' श्रीमंतांनीं लढाईची तयारी केली. परंतु मसलतदार कोणी नाहीं. अवघें मंडळ नवेंच. त्यांत इंग्रजांचा फितूर सगळ्या सरदारांत जहालेला. कोणी इंग्रजाचा पैका खाल्ल्याशिवाय राहिला असें नाहीं. '...' सारे सरदार फितुरलेले, इंग्रजांचा पैका खाल्लेला तेव्हां ती फौज इंग्रज याशीं म्हणजे लढते असें घडत नाहीं. ' पण इंग्रजांनीं केलेल्या फितुरीचीं वर्णनें फक्त त्या वेळच्या बखरींतूनच नसून त्या वेळच्या कित्येक पोवाड्यांतूनही या गोष्टीचा उल्लेख आढळतो.

**फितुर होता ठाव नवता चोर बातमी फिरंग्याची ॥**
**तयारी झाली सैनेची ॥**

असें खडकीच्या लढाईवरील एका पोवाड्यामध्यें वर्णन असून शिवाय शेवटले बाजीराव पेशवे यांच्या सबंध कारकीर्दीवर प्रभाकर कवीनें जो एक प्रसिद्ध पोवाडा रचलेला आहे, त्यांत प्रभाकर एके ठिकाणीं म्हणतो कीं,

**ईश्वरसत्ता विचित्र सारें दैवानें घडविलें ।**
**हरिश्चंद्र आणि रामचंद्र नळ पांडवास रडविलें ।**
**फितुर करुन सर्वांनीं अपलें राज्य मात्र बुडविलें ।**

अशा रीतीनें पोवाडे रचणाऱ्या शाहीरांपर्यंत देखील ज्या इंग्रजांच्या फितुरीची बातमी जाऊन पोंचलेली होती, ती फितुरी किती मोठ्या प्रमाणावर त्या वेळीं चोहोंकडे पसरलेली असली पाहिजे, याची कोणालाही कल्पना करतां येण्यासारखी आहे. शिवाय यशवंतराव घोरपडे आणि बाळाजीपंत नातू हे पेशव्यांच्या दरबारांतील सगळ्या बातम्या इंग्लिशांना सांगत असत, ही गोष्ट ग्रँट डफनेंही कबूल केलेली आहे. तेव्हां जी पद्धत इंग्लिश लोक इतक्या राजरोस आणि सर्रास रीतीनें अंगीकारीत होते, त्याबद्दल बाजीरावाला दोष देण्याला इंग्लिशांना मुळींच हक्क पोंचत नाहीं. याशिवाय आणखीही एक गोष्ट या ठिकाणीं नमूद करण्यासारखी आहे ती अशी कीं, 'पूना ऑक्झिलिअरी फोर्स' या नांवाची पेशव्यांनीं १८१३ सालामध्यें इंग्लिश अंमलदारांकडून कवाईत शिकवून जी एक ब्रिगेड तयार करविली होती, तिच्याबद्दलची एक चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं, या पलटणींतील शिपायांनीं नोकरीला राहतेवेळीं पेशव्यांशीं इमानानें वागण्याची शपथ घेतली होती. पण ही शपथ घेतल्यावर त्यांनीं त्या शपथेला आणखी अशी एक पुरवणी जोडली कीं, पेशवेसरकार ब्रिटिश सरकारपाशीं जोंपर्यंत सलोख्यानें वागत आहेत, तोंपर्यंतच आमची ही इमानदारीची शपथ आमच्यावर बंधनकारक आहे. ( On entering the battalion the men took an oath of faithfulness to the Peshwa, but, of their own accord, they added the proviso, so long as the Peshwa continues in alliance with the British Government. ) वरील शपथेच्या संकल्पामधील " पेशवे सरकार ब्रिटिश सरकारपाशीं जोंपर्यंत सलोख्यानें वागत आहेत तोंपर्यंतच आमची ही इमानदारीची शपथ आमच्यावर बंधनकारक आहे, " ही जी पुरवणी जोडलेली आहे, ती शपथ घेणाऱ्या शिपायांनीं आपण होऊन आपल्या स्वयंस्फूर्तीनें जोडली आहे, असें वरील इंग्रजी वाक्यांतील of their own accord या शब्दांमध्यें सांगितलेलें आहे ! अशी ही शपथेंतील अट इंडियन शिपाई लोक आपण होऊन घालतील किंवा ती इंग्लिशांनींच त्यांच्याकडून घालविली असून फिरून वर of their own accord अशी त्यांच्या स्वयंस्फूर्तीबद्दलची मखलाशी केली असेल, हें कोणी कोणाला सांगावयाला पाहिजे असें नाहीं ! अशा रीतीनें पेशव्यांनीं आपल्या पैशानें पोसलेली सबंध पलटणच्या पलटण थोड्याशा शब्दयोजनेच्या युक्तीनें ऐन प्रसंगीं पेशव्यांच्याच विरुद्ध उलटविण्याचीं कारस्थानें ज्यांनीं आधींपासून योजून ठेविलेलीं होतीं, त्यांनीं बाजीरावानें चालविलेल्या फितुरीबद्दल एवढा गवगवा करुन सोडावा, हें मोठें आश्चर्य आहे !

पण अशा रीतीनें उघडपणें आणि अन्य तऱ्हेनें जरी उभयपक्षांकडून सैन्याची जमवाजमव चाललेली होती, तरी या वेळीं पेशव्यांनीं इंग्लिशांपाशीं लढाई करावी किंवा न करावी, हा एक मोठा महत्त्वाचा प्रश्न होता. आपला मुलूख कमी करण्यांत आलेला आहे, आपलें सैन्य कमी करण्यांत आलेलें आहे, आणि आपल्याला पेंचांत आणून इंग्लिश लोक

मात्र आपलें सैन्य वाढवीत आहेत, याबद्दल बाजीरावाला मोठी दहशत वाटत होती. सर जॉन मालकम यांच्याशीं माहुली येथें झालेल्या भेटीमध्यें बाजीरावाची हीच तक्रार होती. विश्राम बागेमध्यें एल्फिन्स्टन आणि बाजीरावसाहेब यांची जी अखेरची मुलाखत झाली, त्या मुलाखतीमध्येंही इंग्लिशांनीं आपलें सैन्य येथें जास्त जमा केलें आहे, तें कमी करावें, अशीच बाजरीरावाची मागणी होती, आणि खडकीची लढाई खुद्द ज्या दिवशीं झाली, त्या दिवशींही लढाईच्या आधीं दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास विठोजी नाईक गायकवाड याजबरोबर बाजीरावानें एल्फिन्स्टनसाहेबांना जो निरोप पाठविला होता, त्यांतही बाजीरावाचें असेंच म्हणणें होतें कीं, इंग्लिशांनीं पूर्वी मे महिन्यामध्यें पुण्याला वेढा घातला होता, तसा हल्लीं आपलें लष्कर जमवून पुण्याला फिरून वेढा घालण्याचा तुमचा विचार असला पाहिजे, अशी मला भीति वाटत आहे. म्हणून तुम्हीं आपलें सैन्य पुण्याहून हालवून दुसरीकडे दूर कोठें तरी न्यावें. या दोन्ही तिन्ही वेळच्या मागणीवरून बाजीरावाच्या मनाला मुख्यत्वेंकरून कशाची भीति वाटत होती, आणि तो कां लढाईला तयार झाला, हें लक्षांत येण्यासारखें आहे. इंग्लिशांचें आपल्या सभोंवतालचें सैन्य दिवसेंदिवस जास्त वाढत जाणार, तेव्हां तसें होण्याच्या आधींच आपण त्याचा बंदोबस्त केला पाहिजे, अशा इच्छेनें बहुतकरून बाजीराव लढाईला उद्युक्त झाला असावा. पण या कामीं ज्या वेळीं बाजीरावानें आपल्या सरदारांची सल्ला घेतली, त्या वेळीं लढाईला अनुकूल असे फारच थोडे सरदार होते. विठ्ठल शिवदेव विंचुरकर हे आपल्या लष्करासह कांहीं दिवस ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या सैन्याबरोबर होते. त्या वेळीं त्यांना इंग्रजी सैन्यांतील शिस्तीची, टापटिपीची आणि कर्तबगारीची चांगली माहिती झालेली होती. त्यांनीं सांगितलें कीं, इंग्रजांची फौज आपल्यापेक्षां सरस आहे, तेव्हां त्यांच्याशीं लढाई करून आपल्याला यश मिळावयाचें नाहीं, पण ती गोष्ट बाजीरावाला पटली नाहीं. तेव्हां जरी विंचुरकर स्वतः लढाई देण्याचे विरुद्ध होते, तरी पेशव्यांची आज्ञा मोडावयाची नाहीं, अशा पूर्ण स्वामिनिष्ठेच्या भावनेनें विंचुरकर आपल्या फौजा घेऊन लढाईला आले. त्याचप्रमाणें बारामती येथील मुत्सद्दी गोविंदराव काळे यांचेंही मत लढाईच्या विरुद्ध होतें. त्यांनीं अशी मसलत सांगितली कीं, " तूर्त इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग घालूं नये. तुमचा सरंजाम अवघा नवा. काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें घडत नाहीं. वर्ष दोन वर्षें फौज अशी बाळगावी व इंग्रजांशीं सख्यत्व आहे तेंच चालवावें. दुसरें, लढाईचा प्रसंग शहरापाशीं करूं नये. एखादी मोहीम परराज्यांत सरकारची बाहेर काढावी आणि इंग्रजांस समागमें घेऊन जावें व तिकडे गेल्यानंतर लढाईचा प्रसंग करावयाचा [ तो ] करतां येईल. सध्यां लढाई उभी केली असतां इंग्रज म्हणजे हटला जातो असें घडत नाहीं. "

गोविंदराव काळे यांची जशी ही मसलत होती, तशीच बाकीच्याही बऱ्याच सरदारांची मसलत होती. परंतु तिकडे लक्ष दिलें गेलें नाहीं, हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय. वर दिलेल्या गोविंदराव काळे यांच्या मसलतीमध्यें एक मुद्दा तर लष्करी परिणामाच्या दृष्टीनें फारच महत्त्वाचा होता. पुणें शहरच्या जवळ लढाईचा प्रसंग आणूं नये, या गोविंदराव

काळे यांनीं सांगितलेल्या मसलतीमध्यें फारच दूरदृष्टीचा विचार भरलेला होता आणि एकाच लढाईमध्यें पुणें शहरचें राज्य आणि सगळी पेशवाई कशी बुडाली, असा जो एक प्रश्न साहजिकपणें कोणाच्याही मनामध्यें उद्भवतो, त्या प्रश्नाचें उत्तर गोविंदराव काळ्यांच्या या सल्ल्यामध्यें आहे. या लढाईचें रणांगण खडकीच्या इतकें जवळ नसून तें पुण्यापासून



दुसरे बाजीराव.

पुष्कळ दूरवर असतें, तर हल्लीं आपल्याला अनुभवावा लागत आहे, तसा त्या दूरच्या लढाईचा घातुक परिणाम आपल्याला भोगावा लागला नसता. पहिल्यानें खडकीची आणि नंतर दुसरी येरवड्याच्या टेकडीजवळची अशा दोन लढाया झाल्याबरोबर एकदम पुण्यावर जो शत्रूचा घाला आला, तो हीच लढाई दूर अंतरावर झाली असती तर इतक्या लवकर कधींही येऊं शकला नसता. पुण्यापासून दूरच्या एकाद्या ठिकाणीं जरी पराभव झाला असता आणि तेथून बाजीराव आणि बापू गोखले हे हळूहळू पुण्याकडे मागें हटत आले असते, तरी पहिल्या पराभवापासून पुण्यावर इंग्लिशांचा हल्ला येऊन पोंचेपर्यंत मराठ्यांना मध्यंतरीं किती तरी अवकाश सांपडला असता, व त्या अवकाशांत त्यांना पुण्याच्या संरक्षणाची किती तरी योग्य तजवीज करतां आली असती. पण आपल्या दुर्दैवानें हा क्रम-उलटा झाला. बाजीरावसाहेब पुण्यातून ता. १७ नोव्हेंबर १८१७ रोजीं निघून गेल्यापासून तों अशीरगडजवळ ता. १७ मे १८१८ च्या सुमाराला ते मालकमसाहेबाच्या स्वाधीन झाले, तेथपर्यंतच्या मध्यंतरींच्या ६ महिन्यांमध्यें बाजीरावसाहेबांनीं इंग्लिशांच्या पाठलाग करणाऱ्या सैन्याला एकापाठीमागून एक झुकांड्या देण्यामध्यें जें लष्करी आणि गनिमी कौशल्य दाखविलें आणि जी चिकाटी धरली, त्याबद्दल इंग्लिश ग्रंथकार देखील लष्करी हुलकावणीच्या दृष्टीनें बाजीरावाची तारीफच करीत आहेत. पण बाजीरावसाहेबांनीं हें धोरण आधीं स्वीकारिलें असतें, तर कदाचित् आजला महाराष्ट्राचें स्वरूप आजच्यासारखें मुळींच झालें नसतें ! पण ईश्वराच्या घरचीं जी भवितव्यता ठरलेली असते, तिच्यापुढें मनुष्याचें कांहीं चालत नाहीं !

असो. गोविंदराव काळ्यांचा वर सांगितलेला सल्ला जरी चांगला होता, तरी तो बाजीरावसाहेबांना पटला नाहीं आणि त्यांनीं पुण्याचे लढाईची जोरानें तयारी सुरू केली. या प्रसंगासबंधानें पेशव्यांच्या बखरींतील जें वर्णन आहे, तें येणेंप्रमाणें आहे.—" पुण्यांत तमाम सरदार जमा झाले. निपाणकर, अक्कलकोटवाले भोसले, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचूरकर, पटवर्धन, बापू गोखले, राजेबहादर, भोईटे, पुरंदरे, किरकोळ सरंजामी असे मिळून ( व ) नवीन ठेवलेली फौज मिळून लाख सव्वा लाख घोडे मिळाले. खेरीज पायदळ आरब, रोहिले, पठाण, शिद्दी, गोसावी, शिवाय रजपूत, रांगडे, मुसलमान असे, ५०,००० पायींचे लोक नवे चाकर ठेवलेले असा सरंजाम तयार जाहला. " व या सगळ्या लष्कराचें आधिपत्य बापू गोखले यांजकडे देण्यांत आलेलें होतें. बाजीरावाचें हें जें नवीन सैन्य आसपासच्या भागांतून तयार होऊन येत होतें, तें पुण्यास आल्यावर गारपीरच्या बाजूला त्या सैन्याची छावणी पडूं लागली. परंतु गारपिरावर कर्नल बर यांच्या हुकमतीखालीं इंग्लिशांचीं कांहीं पलटणें आधीं पुष्कळ दिवसांपासून रहात होतीं. या इंग्रजी लष्करात नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या सहाव्या आणि सातव्या रेजिमेंटमधील मिळून एकंदर १२०० शिपाई लोक होते. व शिवाय त्यांच्यापाशीं दोन तोफाही होत्या. हें इंग्रजी लष्कर मुठा नदीच्या उजव्या हातच्या किनाऱ्याच्या बाजूला हल्लीं जेथें पुण्याच्या कलेक्टरचें ऑफिस आहे, त्याच्या आसपास गारपिरावर रहात असे आणि त्या लष्कराकरितां ड्यूक ऑफ वेलिंगटन यांच्याकडून इ. स. १८०३ सालापासून ही जागा मुकर करून देण्यांत आलेली होती.

गारपिरावरील इंग्लिश लष्कराच्या या छावणीच्या सभोंवार पेशव्यांच्या लष्कराच्या छावण्या येऊन पडल्या आणि गोसावी लोकांचीं पलटणें वानवडीच्या मैदानावर येऊन उतरलीं. त्याचप्रमाणें संगमावरील रेसिडेंट, मि. एल्फिन्स्टन, यांचा बंगला आणि भांबुर्डे गांव यांच्या दरम्यानच्या मैदानामध्यें विंचुरकरांचे घोडेस्वार, पायदळ आणि तोफखाना यांचा तळ येऊन पडला. अशा रीतीनें गारपिरावरील इंग्लिशांची फौज ही पेशव्यांच्या लष्कराकडून चोहों बाजूंनीं हळुहळू वेढली जात होती. शिवाय गारपिरावरील इंग्लिशांच्या छावणीच्या बाजूनें शहरांतील कित्येक बागाचीं मोठमोठीं कुंपणें असल्यामुळें त्यांच्या आडून शहरांतील पेशव्यांच्या शिपायांना इंग्लिशांवर हल्ले करण्याला सोईचें पडत असे, व इंग्लिशांच्या छावणींतील फितुर झालेल्या लोकांना पेशव्यांच्या सैन्यांत जाऊन मिळण्यालाही फार सोपें पडत असे. ही इंग्लिशांची पेशव्यांच्या विरुद्ध एक तक्रार होतीच. परंतु तक्रारीचें आणखीही एक कारण उपस्थित झालें. तें असें कीं, रेसिडेंटच्या बंगल्यापासून दोन मैलांचेंही अंतर नसेल अशा ठिकाणीं इंग्लिश लष्करांतील लेफ्टनंट शॉ याला पेशव्यांच्या तीन घोडस्वारांनीं घोड्यावरून खालीं ओढलें, आणि आपल्या भाल्यानें त्याच्या मांडीला जखमा केल्या आणि शिवाय पेशव्यांचें लष्कर इंग्लिशांच्या छावणीच्या इतक्या जवळ येऊन भिडल्याच्या योगानें पेशव्यांच्या लोकांना इंग्रजी सैन्यांत येऊन फदाफितूर करण्याला फार सुलभ होऊं लागलें. अशा रीतीनें मराठ्याच्या सैन्याची सगळी तयारी झाल्यानंतर इंग्लिशांच्या छावणीवर ताबडतोब हल्ला करावा, असें मराठ्यांच्या लष्करांतील लोकांचें मत होतें. व त्याकरितां ता. २८ आक्टोबर रोजीं रात्रीं तोफेच्या गाड्यांना बैल जुंपण्यांत आले; घोडेस्वारांनीं आपल्या घोड्यावर खोगिरें चढविलीं; आणि पायदळाच्या पलटणी लढाईला निघण्याकरितां तयार झाल्या. अशा रीतीनें त्या दिवशीं रात्रीं शहरांत मोठी धामधूम चाललेली होती, व तोफांच्या गाड्यांचा आणि घोड्यांच्या टापाचा आवाज मोठ्यानें ऐकूं येत होता. त्या रात्रीं संगमावरील बंगल्यांत रेसिडेंट, मि. एल्फिन्स्टन, यांना झोंप आली नाहीं. ते आपल्या बंगल्याच्या गच्चीवरून चिंताग्रस्त मुद्रेने या सगळ्या प्रकाराचा कानोसा घेत होते. या वेळीं सुप्रसिद्ध इतिहासकार, ग्रँट डफ, हा मि. एल्फिन्स्टन यांच्या बरोबर होता. व त्या रात्रीं त्यावेळीं पाऊस, विजा आणि मेघगर्जना यांचीही अगदीं गर्दी उसळून गेली होती आणि त्या रात्रींच कदाचित् पेशव्याच्या सैन्यानें इंग्लिशांवर छापा घातला असता. पण पेशव्यांच्या सैन्यांत बापू गोखले हे जरी दृढनिश्चयी सेनापति होते, तरी बाजीरावांचें मन फार अस्थिर होतें. त्यांनीं त्या दिवशींचा छाप्याचा बेत रहित करून ती सारी रात्र फुकट मसलतींत घालविली. नंतर दुसरे दिवशीं ता. २९ आक्टोबर रोजीं मि. एल्फिन्स्टन यांनीं पेशव्यांकडे असा निरोप पाठविला कीं, तुमचें लष्कर आमच्या सैन्याच्या अगदीं हद्दीवर येऊन भिडले आहे. तेव्हां तें लष्कर तुम्हीं तेथून दूर हलवावें. परंतु बाजीरावसाहेबांनीं तसें कांहीं एक केलें नाहीं. तेव्हां बाजीराव साहेब आतां लवकरच केव्हां तरी आपल्यावर हल्ला करणार, ही गोष्ट एल्फिन्स्टनसाहेबांच्या मनानें पक्की घेतली. याच्या पूर्वीच मुंबईच्या आणि अहमदनगरच्या युरोपियन पलटणींनीं ताबडतोब निघून पुण्याच्या पलटणीच्या मदतीला यावें, अशाबद्दलचे हुकूम मि. एल्फिन्स्टन

यांनीं पाठविलें होते. त्यांपैकी मुंबईचें गोरें लष्कर अपाख्यानें कूच करून ता. ३० आक्टोबर रोजीं खडकीस येऊन पोंचलें. नंतर गारपिरावर असलेलें आपलें सैन्य यापुढें तेथें ठेवणें सुरक्षितपणाचें नाहीं असें लक्षांत आणून तेथील कर्नल बर यांच्या हाताखालील सैन्य खडकीस नेण्याविषयीं मि. एल्फिन्स्टन यांनीं हुकूम केला. व त्याप्रमाणे गारपिरच्या छावणीचें रक्षण करण्याकरितां व रेसिडेंटच्या रक्षणाकरितां कांहीं लोक ठेवून युरोपियन पायदळाचे ८०० लोक, नेटिव्ह इन्फन्ट्रीचे १२०० लोक आणि ६ तोफा, इतकें सैन्य आपल्याबरोबर घेऊन मुठा नदी उतरून कर्नल बर यांनीं ता. १ नोव्हेंबर रोजीं खडकीस कूच केलें. खडकीस जाऊन पोंचल्यावर कर्नल बर यांनी तेथें आपल्या छावणीची ता. १ व २ नोव्हेंबर या दोन दिवसांत बहुतेक व्यवस्था लावली. त्यांनी या ठिकाणीं आपल्या छावणीची जी योजना केली, त्या योजनेप्रमाणें त्याचें सैन्य डाव्या बाजूला हल्लीं जो होळकरपूल म्हणून प्रसिद्ध आहे, त्या पुलाच्या जवळपर्यंत पसरलेलें होतें व त्या सैन्याच्या उजव्या बाजूचें टोक हल्लीं जेथें खडकीचा गांव आहे, तेथपर्यंत जाऊन पोंचलेलें होतें. ही जी इंग्रजी सैन्याची रांग लागलेली होती, त्याच्या पिछाडीकडून मुळा नदीचा प्रवाह वहात होता. ही जागा थोडीशी उंचवट्याची असून त्याच्या पाठीमागें मुळा नदीच्या पाण्याचा पुरवठा असल्यामुळें ही छावणीची जागा लष्कराच्या फार सोईची होती. त्याशिवाय येथें आणखीही एक सोय होती. ती अशी कीं, पेशव्यांनीं कर्नल फोर्ड याच्या हुकमतीखालीं जी पलटण तयार करविली होती, ती पलटण मुळा नदीच्या पलीकडे दापोडीला रहात होती. व प्रसंग पडेल त्याप्रमाणें ही कर्नल फोर्ड यांची पलटण खडकीच्या सैन्याच्या मदतीला बोलाविणें जरूर झाल्यास ती पलटण तेथून जवळच असलेल्या खडकीच्या पलटणांत येऊन मिळणें फार सुलभ होतें. त्या वेळीं दापोडी आणि खडकी यांच्यामध्यें हल्लींच्याप्रमाणें पूल नव्हता. तेव्हां दापोडी आणि खडकी यांच्या दरम्यानच्या पश्चिमेच्या बाजूकडील मुळा नदीमधून दापोडीच्या सैन्यानें कोणत्या पाणउताराच्या वाटेनें नदी उतरून खडकीला यावें, हें सुद्धां मि. एल्फिन्स्टन यांनीं ठरवून ठेविलें होतें.

इकडे ता. १ नोव्हेंबर रोजीं कर्नल बर यांनीं गारपिरावरील आपली छावणी सोडल्याबरोबर मराठ्यांचे लष्कर गारपिरच्या छावणींत शिरलें व तेथें त्यांनीं लुटालूट केली. आणि मराठ्यांचें लष्कर रेसिडेन्सीच्याही जवळ जवळ सरकत चाललें. हा प्रकार पाहून या संबंधीचा खुलासा काढून आणण्याकरितां मि. एल्फिन्स्टन यांनीं कॅप्टन फोर्ड यांची त्या कामावर योजना केली. कॅप्टन फोर्ड हा पेशव्यांच्या पलटणींतील नोकर असल्यामुळें पेशव्यांपाशीं त्याचें बरेंच वळण होतें व सदाशिव माणकेश्वर यांच्या पाठीमागून पेशव्यांचे प्रधान झालेले मोर दीक्षित वसईकर यांचा व कर्नल फोर्ड याचा विशेष स्नेहसंबंध होता. व त्यामुळें बाकीच्या कित्येक अधिकारी लोकांप्रमाणें मोर दीक्षित हेही इंग्लिशांना फितूर झाले आहेत, असा त्यांच्याबद्दल पुष्कळ लोकांचा समज झालेला होता. परंतु हा समज कितपत खरा होता, याच्याबद्दल खडकीच्या रणांगणावरील पुढें दिलेल्या कित्येक गोष्टींवरून व त्या वेळच्या मोर दीक्षितांच्या वर्तनावरून संशय येणें साहजिक आहे. परंतु मोर दीक्षित आणि

कर्नल फोर्ड यांचा स्नेहसंबंध मात्र बराच असावा, असें दिसतें. कर्नल फोर्ड हा जेव्हां मोर दीक्षित यांच्याकडे बातमी काढण्यासाठीं आला, त्या वेळचें मि. प्रिन्सेप या इतिहासकारानें दिलेलें वर्णन वाचण्यासारखें आहे. मोर दीक्षित यांनीं कर्नल फोर्ड याला असें सांगितलें कीं, बाजीरावसाहेबांचा विचार पर्वतीवर जाण्याचा आहे व त्यासाठीं ही सगळी गडबड चाललेली आहे. परंतु यदाकदाचित् पेशवे आणि इंग्रज यांच्यामध्यें लढाई झाली, तर तुम्हीं आपलीं पलटणें घेऊन पेशव्यांच्या बाजूला येऊन मिळावें, अशी मोर दीक्षित यांनीं कॅप्टन फोर्ड यांजला विनंति केली. पण कर्नल फोर्ड यानें ती गोष्ट मान्य केली नाहीं. पेशव्यांच्या बाजूला मिळून आपले देशबांधव जे दुसरे इंग्लिश लोक त्यांच्यापाशीं मी लढाई करावी, अशी गोष्ट माझ्या हातून कधींही घडणार नाहीं, असें कर्नल फोर्ड यानें उत्तर दिलें. हें उत्तर कितो तरी बरोबर आहे ! पण हें उत्तर देताना कर्नल फोर्ड यांच्या मनांत स्वदेश-बांधवांच्या प्रेमाबद्दलची जी पवित्र भावना प्रचलित झालेली होती, त्या भावनेचा एक लेश तरी इंग्लिशाच्या बाजूनें मराठ्यांच्या विरुद्ध लढणाऱ्या त्या हजारों मराठे शिपायां-पैकीं एकाच्या तरी मनामध्यें कधीं उत्पन्न झालेला होता काय ! कर्नल फोर्ड यानें आपल्या सैन्यासह निदान तटस्थ तरी रहावें, म्हणूनही मोर दीक्षितांनीं त्याचें मन वळविण्याबद्दल शिकस्त करून पाहिली. परंतु कर्नल फोर्ड हा आपल्या स्वदेशभक्तीच्या व्रतापासून यत्किंचितही च्युत झाला नाहीं. तेव्हां नंतर कर्नल फोर्ड आणि मोर दीक्षित या दोघांचेंही मन लढाईंतील भावी प्रसंगाकडे वळलें. त्या खडकीच्या लढाईंत या दोन स्नेह्यांपैकीं जो कोणी मरण पावेल, त्याच्या पाठीमागे राहिलेल्या बायकामुलांची आणि आप्तइष्टांची जो कोणी जिवंत राहील त्यानें तरतूद करावी, असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. ही जी दुष्ट कल्पना अशा रीतीनें यावेळीं बोलून दाखविण्यांत आली होती, ती अखेरीस खडकीच्या लढाईंत मोर दीक्षितांच्या बाबतींत दुर्दैवानें खरी ठरली ! मोर दीक्षित हे खडकीच्या रणांगणावर मरण पावले ! पण पुढे त्याच्या मुलाबाळांची कर्नल फोर्ड यानें आपल्या अभिवचनाप्रमाणें काय तजवीज केली, हें मात्र इतिहासांत कोठें नमूद नाहीं !

मि. एल्फिन्स्टन यांनीं सुचविल्याप्रमाणें कॅप्टन फोर्ड आणि मोर दीक्षित यांची वर सांगितलेली मुलाखत इ. स. १८१७ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ५ व्या तारखेच्या सकाळीं झाला. त्यानंतर त्याच दिवशीं दुपारीं सुमारें २ वाजतां पेशव्यांकडून विठोजी नाईक गायकवाड या नांवाचा एक इसम संगमावर रेसिडेंटला भेटण्याकरितां आला व त्यानें बाजीरावाचा निरोप म्हणून मि. एल्फिन्स्टन यांना असें सांगितलें कीं, तुम्हीं आपल्या जवळ हल्लीं जें इंग्रजी सैन्य जमा केलें आहे, तें दूर कोठें तरी पाठवून द्यावें; आणि तुमच्या जवळ जें नेटिव्ह सैन्य आहे, तें सैन्य बाजीरावसाहेब सांगतील तेथें तुम्हीं नेऊन ठेवावें. परंतु हें म्हणणें मि. एल्फिन्स्टन यांनीं मान्य केलें नाहीं. तेव्हां तुम्हीं जर ही गोष्ट मान्य करीत नसाल, तर याचे परिणाम तुम्हांला भोगावे लागतील, असें बजावून विठोजी नाईक रेसिडेन्सीमधून निघून गेला. विठोजी नाईक हा बेटावरून परत आल्यानंतर इंग्रज आपलें म्हणणें मान्य करीत नाहीं, हे निश्चित झालें. व बापू गोखले वगैरे मंडळींनीं श्रीमंतांच्या

सल्ल्यानें तावडतोब लढाई देण्याचा बेत मुकर केला. तेव्हां बाजीरावसाहेब आपल्या-बरोबर कांहीं थोडेसे स्वार घेऊन पर्वतीवर जाण्याकरितां निघाले. व बाकीचें सर्व लष्कर खडकीस इंग्रजांवर हल्ला करण्याकरितां पुण्याहून बाहेर पडलें. ही गोष्ट ता. ५ नोव्हेंबर रोजीं दुपारीं सुमारें तीन वाजतां झाली. या वेळीं लष्कर बाहेर निघालें, तेव्हां जरीपटक्याची काठी मोडली. व हा एक अपशकुन झाला, असें कित्येकांना वाटलें. परंतु सर्व सैनिकांच्या अंगामध्यें वीरश्रीचा इतका संचार झाला होता कीं, या गोष्टीकडे फारसें लक्ष न देतां सर्व लष्कर लढाईकरितां बाहेर पडलें.

इतकी स्थिति येऊन पोहोंचली, तेव्हां आतां यापुढें आपण रेसिडेन्सीमध्ये रहाणें सुरक्षित नाहीं, असें मि. एल्फिन्स्टन यांस वाटून त्यानें रेसिडेन्सी सोडून खडकीस कर्नल बर यांच्या सैन्याचा जेथें तळ होता तेथें जाण्याचा निश्चय केला. त्यानीं आपल्या येथील मडमा वगैरे मंडळींना आधीं पुढें पाठवून दिलें व पाठीमागून ते स्वतः जाण्याच्या तयारीला लागले. विठोजी नाईक बेटावरून पुण्यांत परत गेल्यानंतर पुढें पुण्याच्या बाजूनें काय काय हालचाली होतात हें पाहण्याकरितां मि. ग्रॅट डफ हे जे त्या वेळीं त्यांचे जवळ होते, त्यांना त्यांनीं पाठविलें. हल्लीं पांचाळेश्वराचें म्हणून जे एक लहानसें लेण्यासारखें भांबुर्ड्यास देऊळ आहे, त्याच्या आसपास पूर्वी त्या वेळीं लहानशी टेकडी असावी आणि त्या टेकडीच्या खडकातच हें पांचाळेश्वराचें देऊळ खोदलेलें आहे. हल्लीं दगडाच्या खाणी खणून ही टेकडी बहुतेक नाहींशी करण्यात आलेली आहे. पण त्या वेळीं ती टेकडी बरीच विस्तृत असावी, असें दिसतें. या टेकडीच्या आड गुप्तपणानें जाऊन ग्रॅट डफनें गणेश-खिंडीच्या डोंगराच्या बाजूनें पेशव्याचें लष्कर जिकडे तिकडे पसरत चाललेले पाहिले. व त्याबद्दलची हकीकत त्यानें एल्फिन्स्टन साहेबांना येऊन सांगितली. ती बातमी कळल्यावर एल्फिन्स्टन साहेबांनीं संगमावरून खडकीला जाण्याची फारच त्वरा केली. पेशव्यांचे स्वार रेसिडेन्सीकडे येऊं लागले होते व थोडक्याच वेळात रेसिडेन्सीला वेढा पडण्याचा संभव होता म्हणून आपल्या संगमावरील रेसिडेन्सीच्या बंगल्यामधून पळून जाण्याची एल्फिन्स्टन साहेबांनीं फारच घाई केली. त्याना आपल्या बंगल्यातील कांहीं थोडीबहुत आवराआवर करण्यालासुद्धा फुरसत सांपडली नाहीं. त्याच्यापाशीं गुप्त स्वरूपाच्या पत्रव्यवहाराचे असे जे कांहीं कागदपत्र होते, तेवढे मात्र त्यानी तेवढ्यांतही घाईमध्यें आधीं जाळून टाकले आणि तें काम पुरें झाल्याबरोबर त्यांच्या अंगावर जे कपडे होते त्याच कपड्यांनिशीं ते तेथून पळून जाण्याकरितां निघाले. बाजीराव पळपुट्या होता, असा आपल्याच लेखकांनीं आपल्याच एका राजाचा लौकिक वाढविला आहे, हें खरें; पण खडकीच्या लढाईनंतर बाजीरावाला जसें पळावें लागलें, त्याचप्रमाणे खडकीच्या लढाईच्या आधीं एल्फिन्स्टन साहेबालाही पळून जाणें भाग पडलें होतें, हेंही आपण लक्षांत ठेवणें जरूर आहे एल्फिन्स्टन साहेबांनीं पळून जाण्याची फार गर्दी केली. त्यांच्याजवळ जे थोडेबहुत शिपाई होते, ते त्यानीं आपल्या सभोंवती जमा केले आणि रेसिडेन्सीच्या बंगल्यांतून पळ काढण्याला त्यांनीं सुरवात केली. या संगमावरील रेसिडेन्सीच्या बंगल्याच्या पाठीमागून खडकीकडून मुळा नदी वहात येऊन पुढें जवळच मुठेचा आणि तिचा संगम होतो. हल्लींच्या बंड-गार्डनपाशीं नदीला जें धरण


बांधलेलें आहे, तें त्या वेळीं नसल्यामुळें रेसिडेन्सीच्या पाठीमागील मुळा नदीमध्यें हल्लींच्या-सारखें पुष्कळ पाणी नसून क्लीलंड या नांवाच्या एका साहेबाच्या तेथील जवळच्याच एका बंगल्याच्या पाठीमागें नदींतून पलीकडे जाण्यास पाण्यांतून उतार होता. त्या उतारानें एल्फिन्स्टन साहेब मुळा नदी उतरून पलीकडच्या किनाऱ्याला आपल्या लोकांसह पळून गेला व मुळा नदीच्या त्या डाव्या बाजूच्या कांठाकांठानें जो रस्ता होता, त्या रस्त्यानें हल्लींच्या संगमवाडीच्या जवळून तो होळकर पुलाकडे पळत सुटला.

इकडे हा पळापळीचा प्रकार चाललेला होता, त्याच वेळीं दुसऱ्या बाजूला पुण्यांतून पेशव्यांच्या फौजा इंग्रजांशीं खडकीवर लढाई देण्याकरितां लकडीपुलाच्या बाजूनें बाहेर पडल्या होत्या. श्रीमंत पर्वतीवर गेले आणि बापू गोखले व मोर दीक्षित मराठे, चिंतामणराव आप्पा पटवर्धन व तासगांवकर व मिरजकर, पटवर्धन, आप्पाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे, राजेबहाद्दर, अक्कलकोटवाले, झाडून फौजेसुद्धां तयार होऊन गणेशखिंडीवर इंग्रज जेथें उतरला होता तेथें जाऊन इंग्रजास घेरा दिला. मराठ्यांचें पायदळ, घोडेस्वार, तोफा, वगैरे सर्व लष्कर चतुरशिंगीच्या देवळानजीक गणेश खिंडीच्या डोंगरापासून तों जवळ जवळ संगमावरील रेसिडेन्सीच्या जागेपर्यंतच्या मधल्या मैदानामध्यें चोहोंकडे एखाद्या समुद्रासारखें पसरून राहिलेलें होतें. त्या वेळीं एल्फिन्स्टनसाहेब रेसिडेन्सीमधून पळून गेल्याबरोबर मराठ्यांचे लोक रेसिडेन्सीमध्यें शिरले व त्यांनीं तेथील बंगला आणि त्यांतील सामानसुमान सर्व जाळून टाकलें. एल्फिन्स्टनसाहेब हे मोठे विद्याव्यासंगी होते आणि त्यामुळें त्यांच्यापाशीं इंग्रजींतील चांगल्या चांगल्या पुस्तकांची एक मोठी लायब्ररी होती. ती सगळी लायब्ररी या वेळीं जळून गेली. आपल्या जळणाऱ्या बंगल्याच्या ज्वाळांकडे पहात पहात एल्फिन्स्टनसाहेब मुळा नदीच्या पलीकडच्या बाजूच्या कांठाकांठानें पळ काढीत असतां त्याच मुळा नदीच्या उजव्या कांठाच्या बाजूनें पेशव्यांचें जें सैन्य उभें होतें, त्यांतील कांहीं लोकांनीं एल्फिन्स्टनसाहेबांवर गोळ्या झाडल्या. या प्रसंगाचें पेशव्यांच्या बखरींत जें वर्णन दिलें आहे, तें येणेंप्रमाणें आहे:—अलपिष्टनसाहेब मेण्यांत बसून निघाले. नंतर सरकारच्या फौजेनें बेट लुटिलें व जाळिलें. त्या वेळेस नदीच्या पलीकडून (म्हणजे एल्फिन्स्टन साहेब मुळा नदीच्या डाव्या कांठानें होळकरपुलाकडे चालला असतां मुळा नदीच्या उजव्या कांठाच्या बाजूला विंचुरकरांची फौज लढण्यासाठीं जेथें उभी होती तेथें ) विंचुरकर यांचे फौजेचा फरा उभा होता. साहेब मेण्यांत बसून त्या ( म्हणजे अर्थात् पलीकडच्या संगमवाडीच्या बाजूकडील ) फऱ्यावरून चालला. एकटा असून त्यास कोणीं अडविलें नाहीं. असा फितूर फौजेचा. एक बापू गोखले मात्र लढाईचे उद्योगांत. तेव्हां एकट्याचा निभाव कसा लागतो ? ” या वरील उताऱ्यावरून एल्फिन्स्टनसाहेब पळत असतांना त्याचा पाठलाग करणें किंवा नदीच्या पलीकडून त्याच्यावर जोराचा हल्ला करून गोळ्या झाडणें अशक्य होतें असें नाहीं. तरी पण पेशव्यांच्या फौजेंतील फंदफितुरीमुळें तसें कांहीं एक घडून न येतां एल्फिन्स्टनसाहेब आपल्या जवळच्या सुमारें ५०० लोकांसह बेटावरून निघाले ते होळकर पुलापर्यंत सुरक्षित जाऊन पोहोंचले. मि. एल्फिन्स्टन हे बेटावरून निघून नदीच्या कांठानें

खडकीला येत आहेत, अशी आगाऊ सूचना समजलेली असल्यामुळें कर्नल बर यांनीं खडकीहून आपल्या लष्करांतील एक तुकडी एल्फिन्स्टनसाहेबांना सुरक्षितपणें घेऊन येण्याकरितां पुढें पाठविली होती. त्या तुकडीच्या साहाय्यानें एल्फिन्स्टन साहेब खडकीच्या छावणींत ता. ५ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं ३॥-४ च्या सुमारास येऊन पोंहोंचले व त्यांनीं लढाईला ताबडतोब सुरवात करावयाची असें ठरविलें. दापोडी येथें कर्नल फोर्ड यांच्या हाताखालीं जी पलटण होती, ती घेऊन कर्नल फोर्ड यांनीं खडकीच्या सैन्याला येऊन मिळावें, म्हणून त्यांना आधींच निरोप पाठवून ठेवण्यांत आलेला होता. या वेळीं इंग्लिशांच्या बाजूला मराठ्यांच्या मानानें फारसें लष्कर होतें असें नाहीं. इंग्लिशांकडे घोडेस्वार फारसे नव्हतेच, असें म्हटलें तरी चालेल. पायदळाची संख्या सुमारें २८०० असून त्यांपैकीं फक्त ८०० च काय ते युरोपियन शिपाई होते. आणि त्याशिवाय त्यांच्यापाशीं फक्त ८ च काय त्या तोफा होत्या. आणि त्या मानानें पाहिलें असतां पेशव्यांच्याकडील फौज फार मोठी होती. पेशव्यांच्या फौजेचे आंकडे पेशव्यांच्या बखरींतून वगैरे निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे दिलेले आहेत व पेशव्यांची लाख फौज त्या वेळीं जमा झालेली होती, अशींही कांहीं ठिकाणीं अतिशयोक्तीचीं वर्णनें आढळतात. पण या बाबतींत इंग्लिश इतिहासकारांनीं दिलेले आकडे तरी कितपत विश्वसनीय आहेत ? त्यांच्या लिहिण्याप्रमाणें पेशव्यांच्या फौजेंत २०,००० घोडेस्वार, ८००० पायदळ आणि १४ तोफा होत्या, असें दिसतें. इतकें सैन्य खडकीच्या मैदानावर पसरलेलें असून शिवाय पर्वतीच्या आसपास बाजीरावाजवळ ५००० घोडेस्वार आणि २००० पायदळ इतकें सैन्य होतें, असा ग्रँट डफचा अदमास आहे. उभयतांच्या सैन्यांमध्यें इतका फरक होता, तरी एल्फिन्स्टनसाहेब कर्नल बर यांच्या छावणींत येऊन पोंहोंचल्याबरोबर एकदम लढाईला सुरवात करण्याचें त्यांनीं ठरविलें. पेशव्यांच्या लोकांनीं इंग्लिशांच्या नेटिव पलटणींतून फंदफितुर केलेला असल्याचा संशय असल्यामुळें ऐन लढाईच्या वेळीं हे नेटिव पलटणींतील शिपाई आपल्या बाजूनें इमानानें लढतील किंवा नाहीं, याबद्दल इंग्लिशांना मोठी भीति वाटत होती. म्हणून लवकर लढाई सुरू करणें त्यांना श्रेयस्कर होतें. त्याचप्रमाणें इंग्लिश शिपायांचें दृढ निश्चयाचें धैर्य आणि धोरण पाहूनही डळमळणाऱ्या मनाच्या नेटिव शिपायांच्या अंगांत उत्साह उत्पन्न झाला व इंग्लिशांचें उदाहरण पाहून ते शौर्यानें लढले व हा सगळा परिणाम एल्फिन्स्टनसाहेबांच्या ताबडतोब लढाई सुरू करण्याच्या मसलतीमुळें झाला, असें लष्करी तज्ज्ञ लोकांचें मत आहे. जो पक्ष लढाईला पहिल्यानें सुरवात करतो, त्याला कांहीं तरी जास्त फायदा मिळतोच, हा लढाईंतील नेहमींच एक साधारणपणें नियम आहे. या वेळीं ताबडतोब हल्ला न करतां इंग्लिशांचें सैन्य आपल्या छावणींत स्वस्थ बसून रहातें, तर हे इंग्लिश लोक भिऊन स्तब्ध बसले आहेत, असा त्यांच्याबद्दल मराठ्यांच्या सैन्यांत समज उत्पन्न होऊन त्यामुळें मराठ्यांचें धैर्य जास्त वाढलें असतें, आणि इंग्लिशांच्या सैन्यांतील शिपायांचा दम खरोखरच सुटून गेला असता. आणि आपल्या सैन्याचा धीर कोणत्याही कारणानें खचूं न देतां तो नेहमीं कायम राखणें आणि वाढविणें या गोष्टींकडेच लढाईंत विशेष लक्ष सदोदित द्यावें लागत असतें. म्हणून या दृष्टीनेंही

मि. एल्फिन्स्टन यांच्या या निश्चयाचें महत्त्व वर्णन करण्यांत येतें. अशा रीतीनें निश्चय करून इंग्लिशांच्या फौजा लढण्याकरितां खडकीच्या मैदानावर सज्ज होऊन उभ्या राहिल्या. ही इंग्लिश सैन्याची लाइन लढाईकरितां पहिल्यानें कोठें उभी राहिली होती हें नक्की ठरविणें कठिण आहे. पण खडकीस हल्लींही बर रोड आणि एल्फिन्स्टन रोड या नांवाचे दोन रस्ते आहेत. यांपैकीं कॅप्टन बर यांच्या नांवानें ओळखला जाणारा रस्ता होळकर ब्रिज वरून युरोपियन बोट क्लबकडे जाणाऱ्या रस्त्याशीं काटकोन करून खडकीच्या गांवाकडे वळलेला आपल्याला आढळतो. याच रस्त्यावर दोनतीन ठिकाणीं जुन्या मोठमोठाल्या तोफाही पुरून ठेवलेल्या आढळतात. त्याच्यापुढें इंग्लिश शिपायांच्या कांहीं बराकी लागतात व त्या बराकीच्या पाठीमागून जो एल्फिन्स्टन रोड आलेला आहे तो थेट हल्लींच्या खडकीच्या गांवापर्यंत जाऊन पोहोचलेला आहे. या बर आणि एल्फिन्स्टन रस्त्यांच्या जवळपासच कोठें तरी इंग्लिश सैन्याची लाइन प्रथमतः लढाईकरिता उभी राहिलेली असली पाहिजे असें दिसतें.

याच्या समोर दुसऱ्या बाजूला पेशव्यांचें सैन्य चतुःशृंगाच्या आणि गणेशखिंडीच्या डोंगरापासून तों संगमावरील रेसिडेन्सीच्या बंगल्याच्या आसपासपर्यंत चोहोंकडें पसरलेलें होतें. इंग्लिशांचें सैन्य आणि पेशव्यांचे सैन्य यांच्या दरम्यान सुमारे १॥-२ मैलांचें अंतर होतें. पेशव्याच्या फौजेची डावी बगल गणेशखिंडीच्या टेकडीला लागलेली असून उजवी बगल रेसिडेन्सीच्या जवळ जवळ येऊन पोहोचलेली होती. यांत विंचुरकरांच्या घोडेस्वारांचीं कांहीं पलटणें डाव्या बगलेच्या बाजूला उभीं होतीं. व मोर दीक्षित मराठे हेही त्याच बाजूला होते. पेशव्यांचा चौदा तोफांचा तोफखाना आणि पायदळ हीं मध्यभागीं होतीं आणि उजव्या बगलेच्या बाजूला आणि पिछाडीला बापू गोखले व इतर सरदार यांचे घोडेस्वार होते. या युद्धाच्या वेळीं मराठ्यांचें मुख्य जरीपटक्याचें जे निशाण तें उजव्या बगलेच्या बाजूला बापू गोखल्याच्या लष्करामध्यें कोठे तरी फडकत असावें, असे दिसतें. पण तें मोर दीक्षित मराठे यांच्या बरोबर डाव्या बगलेकडे होतें, असेंही कित्येक ठिकाणीं वर्णन आढळतें. अशा रीतीनें डावी बाजू, मध्यभाग आणि उजवी बाजू यांनीं बनलेली ही पेशव्यांच्या लष्कराची लाइन प्रथमतः कोठें उभी राहिलेली असावी, हे इंग्लिशांच्या लाइनीच्या जागेप्रमाणेंच निश्चितपणें ठरविणे जरी कठिण असलें तरी सामान्यतः असें म्हणतां येईल की, हल्ली बेटावरून डॉ. भांडारकरांच्या बंगल्याजवळून रेल्वे ओलांडून जो रस्ता गणेशखिंडीतून गव्हर्मेंट हाऊसकडे जातो त्या रस्त्यापैकीं काहीं भागाच्या बहुतेक समांतर रेषेनें पुढें खडकीच्या बाजूला कांहीं अंतरावर पेशव्यांच्या सैन्याची पहिली लाइन उभी असली पाहिजे. व त्याच्या पाठीमागे इतर सैन्याच्या रांगा बऱ्याच दूरवर पसरलेल्या असल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें संगमावरून डॉ. भांडारकर यांच्या बंगल्याच्या पिछाडीकडून दगडी बंगल्यावरून आणि वाकड्याच्या बागेवरून एक रस्ता खडकीकडे जात असतां ॲग्रिकल्चरल कॅटल फार्म जवळच्या पुलावर जेथें दोन रस्ते फुटून एक होळकर ब्रिजकडे जातो आणि दुसरा खडकीकडे वळतो, त्याच्या आसपास कॅटलफार्म, श्रीधर विठ्ठल दाते यांचा बंगला, शेट हणमंतराम रामनाथ यांचा बंगला, वगैरे ठिकाणापर्यंत उजव्या बाजूच्या बगलेचें पुढील




खडकीच्या लढाईचा नकाशा

## खडकीच्या लढाईतील सैन्यांच्या हालचालींचें वर्णन.

१ १ १ १ पेशव्यांची लाइन.

२ २ पेशव्यांचे घोडेस्वार हल्ला करावयाला पुढे जात आहेत.

३ पेशव्यांच्या पायदळाची एक तुकडी ७ व्या नेटिव्ह इन्फन्ट्रीवर हल्ला करण्याकरितां पुढें जात आहे.

४ सातव्या नेटिव्ह इन्फन्ट्रीवर हल्ला होत असतांना जरीपटक्याच्या निशाणाची जागा.

५ ५ कॅप्टन फोर्ड यांच्या दापोडीच्या पलटणीला अडविण्याकरितां जाणारे पेशव्यांचे घोडेस्वार मोरे दीक्षित यांचा मृत्यु.

६ ६ खडकी येथें ठेवलेल्या दोन तोफांनीं मागें हटविलेले पेशव्यांचे घोडेस्वार.

७ ७ इंग्लिशांवर हल्ला करण्याकरितां पुढें आलेलें, परंतु लगेंच मागें फिरवून लावण्यांत आलेलें, पेशव्यांचें पायदळ.

८ खडकी गांव आणि इंग्लिशांची छावणी येथें ६ व्या बॉंबे नेटिव इन्फन्ट्रीची एक तुकडी व दोन तोफा होत्या.

९ ९ ९ ९ खडकीच्या सैन्याला आपल्या हाताखालील लोकांसह जाऊन मिळण्याकरितां एल्फिन्स्टन ज्या रस्त्यानें गेला तो रस्ता.

१० १० इंग्लिश सैन्याच्या लायनीची पहिली जागा.

११ ११ इंग्लिश सैन्याच्या लायनीची दुसरी जागा.

१२ १२ १२ या लायनीला येऊन मिळण्याकरितां दापोडी येथून निघालेल्या कॅप्टन फोर्ड याच्या हाताखालील पलटणी पुढें येत आहेत.

१२ दापोडीची पलटण आपल्या उजव्या बाजूनें सैन्य माघारें वळवून पेशव्यांच्या स्वारांना मागें हटविते.

१४ १४ पेशव्यांचें सैन्य पुण्याकडे परत वळलें त्या वेळीं इंग्लिशांचें सैन्य जेथें येऊन पोंचलें होतें, ती त्यांच्या लाइनीची तिसरी आणि शेवटची जागा.

( पान १६ च्या पुढें. )

तोंड गेलेलें असणें अगदीं स्वाभाविक आहे. त्यानंतर हल्लींच्या ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या भव्य इमारतींनें व त्याच्या आसपासच्या टकल्याच्या बागेंतील शेतांनीं जी जागा व्यापलेली आहे, त्याच्या सुमाराला कोठें तरी आसपास पेशव्यांच्या सैन्याच्या मध्यभागांतील लोक उभे राहिलेले असावेत. आणि चतुःशृंगीच्या डोंगराच्या पुढून गव्हर्मेंट हाऊसकडे जो रस्ता जातो, त्याच्या पुढें उत्तरच्या अंगाला खडकीच्या बाजूकडे ज्या एका लहानशा टेकडीचें टोंक वळलेलें आहे, त्या टेकडीच्या पूर्व बाजूला पेशव्यांच्या डाव्या बगलेचें सैन्य उभें राहिलेलें असलें पाहिजे, असें दिसतें. अशा रीतीनें इंग्लिशांच्या आणि मराठ्यांच्या सैन्याच्या पहिल्या लाइनींच्या ज्या जागांचें वर्णन वर दिलेलें आहे, त्या दोन जागांच्या दरम्यान दोन तीन मैलांचें विस्तीर्ण मैदान चोहोंकडे पसरलेलें हल्लींही दिसतें. हें मैदान फार मोठें आहे. व त्या मैदानांतील एखाद्या उंच ठिकाणीं उभें राहून "हें तें त्या खडकीच्या लढाईचें रणक्षेत्र!" अशा दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें, म्हणजे आपल्या मनामध्यें काय भावना उचंबळतात, याचें वर्णन करणें शक्य नाहीं. त्या भावनांचा ज्यांना अनुभव घ्यावयाचा असेल, त्यांनीं त्या मैदानावर समक्ष जाऊनच त्या स्थळाचें आपल्या अश्रुपूर्ण नेत्रांनीं निरीक्षण केलें पाहिजे.

येथील ही खडकीची लढाई आश्विन व॥ ११ च्या दिवशीं संध्याकाळीं सुमारें ४ वाजल्यापासून संध्याकाळच्या सात वाजेपर्यंत चाललेली होती. त्या एकादशीच्या आदल्या दिवशीं त्या मैदानावर किती तरी शांतता नांदत असली पाहिजे! आदल्या दिवशीं आश्विन शु॥ १० रोजीं त्या मैदानावरील वारे स्वच्छपणानें आणि स्वतंत्रपणानें वहात असले पाहिजेत! त्या मैदानावर आश्विन महिन्याच्या अखेरीला उगवून तयार झालेलें हिरवेंगार गवत तेथील वाऱ्याच्या लहरींबरोबर मोठ्या आनंदानें डुलत राहिलेलें असलें पाहिजे! तेथील गणेश खिंडीच्या टेकड्यांमधून निघून मुळा नदीला मिळण्याकरितां जाणाऱ्या लहानलहान ओढ्यांतील पाणी अगदीं पांढऱ्या शुभ्रवर्णामध्यें झुळझुळ वहात असलें पाहिजे! त्या मैदानांतील आणि त्याच्या आसपासच्या शेतांतून आणि बागांतून गरीब शेतकरी तयार होत आलेल्या आपल्या पिकाकडे पाहून आता हें पीक आपल्या पदरांत पडलें म्हणजे आपली साऱ्या वर्षाची ददात जाईल, अशा प्रकारच्या सुबत्तेच्या मनोराज्याचा आपल्या मनामध्यें मोठ्या आशेनें आस्वाद घेत असले पाहिजेत! आणि तेथील शेतांतून, कुरणांतून आणि मैदानांतून मुकाट्यानें मनसोक्त चरणाऱ्या गाई उद्यां आपण याच ठिकाणीं पोटभर चरण्याकरितां फिरून येऊं अशा आशेनें संध्याकाळच्या वेळीं आपल्या घराकडे परत गेल्या असतील! आणि त्याच संध्याकाळच्या वेळीं तेथील वृक्षांवर आणि झाडांझुडपांवर किती तरी पक्षी निर्भयपणानें किलबिल किलबिल करीत आपल्या घरट्यांतून येऊन आपल्या पिलांना बाहेरून आणलेलें अन्न आपल्या चोंचीनें भरवीत बसलेले असतील!

पण त्याच ठिकाणामध्यें दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं किती तरी भयंकर स्थित्यंतर झालें! त्या मैदानावरून वहाणारे ते स्वच्छ आणि स्वतंत्र वारे बंदुकांच्या आणि तोफांच्या दारूच्या घाणीनें घाणेरडे आणि प्रतिरुद्ध होऊन गेले! आपलें डोकें वर उचलून

आनंदानें डुलत असलेलें तेथील तें हिरवेंगार गवत माणसांच्या पावलांनीं, घोडयांच्या टापांनीं आणि तोफांच्या गाड्यांनीं सगळें चिरडून आणि जमीनदोस्त होऊन गेलें! तेथील ओढ्यांतील जें पाणी दशमीच्या दिवशीं स्वच्छ आणि निर्मळ होतें, तें पाणी जखमी झालेल्या शिपायांच्या रक्तानें लालभडक होऊन मुळा नदीकडे तिच्या पाण्यांत बुडी मारून दोषरहित होण्याकरितां दुःखानें वहात चाललें होतें! ज्या परिपक्व होत चाललेल्या आपल्या शेतांतील पिकाकडे पाहून आदल्या दिवशीं त्या शेतांचा मालक आपल्या मनांत मनोराज्य करीत होता, त्या सगळ्या शेतांतील कणसांची नासधूस होऊन उभीं असलेलीं शेतें दुसऱ्या दिवशीं जमीनदोस्त होऊन गेलीं. ज्या मैदानावर मानवी प्राणी एकमेकांना कापून काढण्याकरितां हातांत तरवारी घेऊन कसायाचें काम करण्याला कंबर बांधून उभे राहिले होते, त्या ठिकाणीं गाई आणि त्यांचीं वासरें हीं कोठून येण्याला धजणार? त्या ठिकाणीं गाई आणि वासरें यांच्या ऐवजीं कोल्हीं आणि कुत्रीं हीं मात्र मेलेल्या माणसांच्या कुरणांवर चरण्याकरितां रात्रीं पुष्कळ जमा झालीं होतीं! आणि ज्या झाडांवर आदल्या दिवशीं अनेक पक्षी आनंदानें येऊन राहिले होते, तेथें दुसऱ्या दिवशीं रात्रीं आपल्या बिऱ्हाडामध्यें रहाण्याकरितां बंदुकांच्या आवाजामुळें आणि तोफांच्या गडगडाटामुळें एकही पक्षी न येतां ते आश्रयासाठीं दुसरीकडे निघून गेले! त्या रात्रीं तेथें दुसरे मात्र एका जातीचे पक्षी पुष्कळ गोळा झालेले होते; आणि ते पक्षी म्हणजे गिधाडें होत! त्या मैदानावर मरून पडलेल्या माणसांचीं हाडें चोहोंकडे विखरून पडलीं असतील! आणि आज जरी तीं जमिनीच्या पृष्ठभागावर वरतीं दिसत नसलीं, तरी तेथील जमिनीच्या पोटांत तीं अजूनही पडून राहिलेलीं असतील! आणि पुण्यांतील हल्लींचे सरदार आणि स्वदेशभक्त लोक गव्हर्मेंट हाऊसमध्यें एकाद्या खान्याकरितां मोठ्या थाटामाटानें व स्वदेशकल्याण साधण्याच्या बहाण्यानें हल्लींच्या गणेश खिंडीच्या रस्त्यानें जात असतांना शंभर वर्षांच्या पूर्वी आपलें हिंदी स्वराज्य राखण्याकरितां जे शौर्यानें आणि स्वामिभक्तीन लढले, त्यांचीं हाडें आपण आपल्या पायांखालीं बिनदिक्कतपणानें तुडवीत चाललों आहोंत आणि आपल्या गाड्यांच्या आणि मोटारींच्या भाराखालीं तीं हाडें अजूनही कण्हत असतील, ही कल्पना त्यांच्या मनाला क्वचितच कधीं शिवत असेल! पण आज दुर्दैवानें अशी वस्तुस्थिति आहे खरी!

चतुःशृंगीच्या मैदानावर पेशव्यांचें थोडें थोडें सैन्य सकाळपासूनच जमा होत चाललें होतें व पुढें दुपारच्या वेळीं तर तें सगळें विस्तीर्ण मैदान घोडयांनीं आणि माणसांनीं भरून गेलें. हें एवढें मोठें सैन्य पुण्यांतून निरनिराळ्या मार्गानें बाहेर पडून त्या मैदानावर लढाईकरितां सज्ज होत असतां पायदळ, घोडेस्वार, तोफा यांचा इतका मोठा आवाज होत होता कीं, एखादा समुद्रच फुटून त्याच्या लाटा मोठमोठ्या गर्जना करीत चोहोंकडे फैलावत आहेत कीं काय, असा भास होत होता, असें त्याचें वर्णन ग्रँट डफ यानें आपल्या इतिहासांत केलेलें आहे.

तिकडे खडकीच्या बाजूला कर्नल बर यानेंही आपलें सैन्य या पेशव्यांच्या सैन्याला तोंड देण्याकरितां लढाईच्या तयारीनें उभें केलें होतें. या सैन्याच्या मध्यभागीं मुंबईहून

आलेली युरोपियन लोकांची पलटण, रेसिडेंटनें आपल्याबरोबर आणलेले शिपाई आणि सहा-व्या रेजिमेंटच्या दुसऱ्या बॅटेलियनपैकीं एक तुकडी इतके लोक होते. त्या सैन्याच्या रांगे-मध्यें डाव्या बाजूला म्हणजे मुळा नदीच्या बाजूला सातव्या रेजिमेंटपैकीं पहिली बॅटेलियन होती. व उजव्या बाजूला, म्हणजे खडकी गांवच्या अंगावर, पहिल्या रेजिमेंटपैकीं दुसरी बॅटेलियन होती. आणि या एकंदर लाइनच्या डाव्या आणि उजव्या अशा प्रत्येक टोकाला एकेक तोफ होती. अशी ही लाईन तयार झाल्यानंतर हें सैन्य आपली पहिली जागा सोडून सुमारें एक मैलभर पुढें चालून गेलें व तेथें त्यांना येऊन मिळण्याकरितां दापोडीहून कर्नल फोर्ड यांच्या हाताखालचें जें सैन्य कूच करून निघालें होतें, तेंही जवळ जवळ येत चाललें होतें. या वेळीं संध्याकाळचे सुमारें ४ वाजून गेलेले होते. त्या सुमारास पेशव्यांचे घोडे-स्वार पुढें चाल करून निघाले. पेशव्यांच्या लाइनींमधील डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही बगलेंतील घोडेस्वार पुढें सरसावले व पेशव्यांच्या उजव्या बगलेनें मुळा नदीच्या बाजूनें आणि डाव्या बगलेनें खडकीच्या बाजूनें इंग्लिश लष्कराच्या पाठीमागें जाऊन त्यांना मध्यें कोंडावें असा पेशव्यांच्या सेनापतींचा बेत होता. व पेशव्यांचा सैन्याच्या दोन्हीही बगला अशा रीतीनें आपल्या हालचाली करीत असतांना पेशव्यांच्या लाइनीच्या मध्यभागीं असलेल्या तोफांचीही सरबत्ती सुरू करण्यांत आली. या वेळीं पेशव्यांच्या सैन्याच्या डाव्या बगलेमधीलच मोर दीक्षित वगैरे सरदारांच्या हाताखालील जें लष्कर खडकीच्या गांवच्या बाजूनें चाललेलें होतें, त्याला असें आढळून आलें कीं, दापोडीहून आपलें लष्कर घेऊन खडकीच्या इंग्लिश लष्कराला येऊन मिळण्याकरितां निघालेला कर्नल फोर्ड हा सुमारें २००० कदमांवर येऊन पोहोंचलेला आहे. तेव्हां हें दापोडीचें लष्कर आणि खडकीचें लष्कर यांचा मिलाफ होऊं देतां कामा नये. या हेतूनें मोर दीक्षित आणि रास्ते हे आपल्या हाताखालचे घोडेस्वार घेऊन कर्नल फोर्डला अडविण्याकरितां त्या दिशेला वळले. कर्नल फोर्ड आणि मोर दीक्षित यांचा विशेष स्नेह असल्यामुळें मोर दीक्षितांच्या स्वामिनिष्ठेबद्दल कित्येकांच्या मनांत संशय होता. व बापू गोखले हेही या वेळीं त्यासंबंधानें मोर दीक्षितांना कांहीं टोंचून बोलले. तेव्हां तो संशय दूर करण्याला ही संधि चांगली आहे, असें लक्षांत आणून मोर दीक्षितांनीं कर्नल फोर्डवर हल्ला करण्याचें ठरविलें. मोर दीक्षितांचे घोडेस्वार कर्नल फोर्ड यांच्या उजव्या बाजूच्या शिपायांच्या जवळ येत चालले आहेत असें पाहून त्या लोकांना मागें हटण्याचा एकदम हुकूम करण्यांत आला. व पेशव्यांचें स्वार आपल्या माऱ्याच्या आटोक्यामध्यें येण्याइतके जवळ आल्यानंतर कर्नल फोर्ड यांनीं आपल्या बॅटेलियनला आणि त्यांच्या जवळ असलेल्या तीन तोफांना गोळीबार सुरू करण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां कर्नल फोर्डच्या सैन्यावर हल्ला करण्याचें सोडून मोर दीक्षितांचे लोक खडकीच्या बाजूला वळले. पण तेथें खडकीच्या बाजूला इंग्लिशांच्या लाइनींतील दोन तोफा तयार होत्या. त्यांनीं आपली गोलंदाजी या सैन्यावर एकदम सुरू केली. तेव्हां त्यांपैकीं एक गोळा मोर दीक्षित यांना लागून ते तेथल्या तेथें मरण पावले. आपले सरदार मोर दीक्षित हे अशा रीतीनें मरण पावल्यामुळें त्यांच्या सैन्यांत धांदल उडाली. व तें सैन्य माघारें फिरलें. खडकीच्या लढाईंत इंग्लिशांच्या बाजूचे जे कोणी लहानमोठे इंग्लिश लोक मारले गेले. त्यांच्यापैकीं कांहींचें एक कबरस्थान

हल्लींच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या समोर नदीच्या कांठीं पूर्वी जी एक बर्फाची गिरणी होती, त्या गिरणीच्या जवळ एका लहानशा कंपाउंडमध्यें संरक्षित करून ठेवण्यांत आलेलें आहे. पण मोर दीक्षित मराठे हे पेशव्यांचे एक मोठे प्रधान असूनही खडकीच्या लढाईत ते कोणत्या ठिकाणीं मारले गेले, ती जागाही आज कोणाला माहीत नाहीं. पेशवाई पुढें टिकली असती, तर कदाचित् त्या जागेच्या स्मरणार्थ पेशव्यांकडून कांहीं तजवीज करण्यांत आली असती; पण पेशवाई गेली आणि ज्या कर्नल फोर्डवर मोर दीक्षित आपल्या भावी व्यवस्थेसाठीं विसंबून राहिले होते, त्यांनींही त्यांच्यासाठीं कांहीं केलेलें दिसत नाहीं. एवंच, पूर्वकालीं आपल्यांतलि कोणी कितीही मोठा असला, तरी त्याचें स्मरण रहाण्याला आज आपल्यापाशीं कांहीं साधन राहिलेलें नाहीं, हें आपलें दुर्दैव आहे.

अशा रीतीनें आपल्या मार्गांतलि या सैन्याचा अडथळा दूर झाल्यामुळें कर्नल फोर्ड हा आपल्या सैन्यानिशीं मग लौकरच कर्नल बर यांच्या सैन्याला येऊन मिळाला. या वेळीं इंग्लिश लाइनीच्या डाव्या बाजूवर पेशव्यांच्या लष्करानें हल्ला करून फारच गर्दी उडवून दिलेली होती. पेशव्यांच्याकडील तीन हजार अरब आणि गोसावी हे आपल्या लाइनीच्या मध्य-भागांतून निघून सातव्या रेजिमेंटची पहिली बॅटॅलिअन आणि सहाव्या रेजिमेंटची दुसरी बॅटॅलिअन यांच्यावर त्यांनीं हल्ला चढविला. पेशव्यांच्या सैन्यांत डी पिंटो या नांवाचा एक पोर्तुगीज सेनापति होता. त्यानें हा हल्ला चढविण्यात पुढाकार घेतला होता. व तो या हल्लयांत तेथें मरण पावला, असा एक इतिहास आहे. आणि हल्लीं डॉक्टर भांडारकरांच्या बंगल्याच्या पिछाडीकडून खडकीच्या रस्त्यानें जात असतांना मुळा नदीच्या कांठच्या दगडी बंगल्याच्या पुढील एका लहानशा ओढयाच्या कांठीं जें एक थडगें दिसतें, तें हा पोर्तुगीज सेनापति, डी पिंटो, याचें असावें, असाही कित्येकांचा तर्क आहे. वर सांगितलेलें अरबांचें आणि गोसाव्यांचें लष्कर आपल्यावर चाल करून येत आहे, असें पाहून इंग्लिश पलटणींतलि शिपाई आपली लाइन सोडून त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां पुढें सरसावले व त्यामुळें इंग्लि-शांची डावी बाजू आणि मध्यभाग यांच्यामध्यें अंतर पडलें. ही शत्रूची चूक लक्षांत आणून बापू गोखले यांनीं आपलें जरीपटक्याचें निशाण हातांत घेऊन आपल्या सहा हजार निवडक घोडेस्वारांसह शत्रूच्या सैन्याच्या त्या दोन भागांच्या मधून घुसण्याचा प्रयत्न केला. बापू गोखले यांचें हें कृत्य लष्करी हालचालींच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आणि कौशल्याचें होतें. परंतु बापू गोखल्यांच्या या युक्तीमुळें आपल्यावर केवढें संकट येणार आहे, हें लक्षांत आणून कर्नल बर हे त्या सातव्या रेजिमेंटच्या निशाणाजवळ येऊन उभे राहिले आणि त्या पलट-णींतलि जे लोक आपली लाइन सोडून डी पिंटो याच्या लष्करावर हल्ला करण्याकरितां पुढें चालले होते, त्यांना त्यानें थांबविलें; व शत्रूच्या सैन्यावर गोळीबार सुरू करण्याविषयीं त्यानें हुकूम केला. इंग्लिश सैन्याची फळी फुटून त्याच्या दोन भागांमध्यें जें अंतर पडलें होतें, त्यामधून बापू गोखले हा यशस्वी रीतीनें घुसला. परंतु इतक्यांत बापू गोखले यांच्या घोड्याला जखम लागून त्यांना माघारें परतावें लागलें. बापू गोखल्यांचे दोन आवडते घोडे होते; त्यांतील एकाचें नांव हनुमान आणि दुसऱ्याचें नांव राजबाण असें होतें. त्यां-पैकीं या वेळचा घोडा कोणता होता, हें निश्चित नाहीं. घोड्याला गोळी लागून बापू

गोखले जरी थोडें माघारे फिरले, तरी लगेंच दुसरे सरदार त्यांच्या पाठीवर होतेंच. ते पुढें सरसावले आणि इंग्लिश सैन्यांत पडलेल्या त्या फळीच्या मधून त्यांनीं मराठ्यांच्या सैन्याची दौड तशीच पुढें चालविली. अशा रीतीनें ते दौड करीत चालले असतां त्यांच्या वाटेंत पुढें एक खोल आणि दलदलीचा असा ओढा लागला. आणि त्या दलदलीच्या चिखलांत मराठ्यांचे घोडेस्वार एका पाठीमागून एक येऊन पडले. तेव्हां ही संधि पाहून इंग्लिशांनीं त्यांच्यावर गोळीबार सुरू केला. तरी पण अशा संकटांतूनही मराठ्यांचे सुमारें तीनशें घोडेस्वार त्या दलदलींतून बाहेर पडले, व त्यांनीं इंग्लिशांच्या बाजूवर हल्ला चढविला. परंतु इंग्लिशांच्या वेगळ्या पडलेल्या सातव्या रेजिमेंटच्या मदतीला कांहीं युरोपिअन कंपन्यांचे शिपाई येऊन त्यांनीं तो हल्ला परतविला.

पेशव्यांच्या सैन्याची डावी बाजू आणि उजवी बाजू यांनीं वर सांगितल्याप्रमाणें दोन्ही टोंकांना मोठया जोरानें लढाई चालविली होती. व पेशव्यांचे कांहीं घोडेस्वार इंग्रजांच्या पिछाडीला जाऊन तिकडूनही ते त्यांच्यावर हल्ला करूं लागले होते. परंतु कॅप्टन फोर्ड याच्या सैन्यांतील लोक येऊन मिळाल्यामुळें इंग्लिशांना त्यांच्या मदतीचा फायदा झाला. दापोडीहून त्या सैन्यानें ज्या तोफा आणिल्या होत्या, त्या उजव्या बगलेवर ठेवून तेथें पूर्वी ज्या तोफा होत्या त्या इंग्लिश लाइनीच्या मध्यभागीं आणण्यांत आल्या, व त्या तोफांचा मारा सुरू करण्यांत आला. त्यामुळें मराठ्यांच्या लाइनींतील मध्यभागचें सैन्य मागे हटूं लागलें. तरी पण पेशव्यांच्या लाइनींतलि उजव्या बाजूला जें पायदळ होतें, तें अजून टिकाव धरून राहिलेलें होतें. त्यांनीं एका ओढ्याचा आणि तेथील कांहीं बागांच्या कुंपणाचा आश्रय घेऊन इंग्लिशांच्या डाव्या बाजूवर खूप जोराचा मारा चालविला होता. व त्यांनीं तेथील इंग्लिश सैन्याला अगदीं जेरीस आणिलें होतें. परंतु कर्नल बर यानें आपल्या पलटणींतील कांहीं लोक आणवून तो हल्ला परतविला.

अशा रीतीनें खडकीच्या लढाईंत मुख्य मुख्य ठिकाणीं लढाया झाल्या, व याप्रमाणें लढतां लढतां आणि पुढें सरतां सरतां पेशव्यांचें सैन्य जेथें उभें होतें, तेथपर्यंत इंग्लिश लष्कर येऊन पोंचलें. इतक्या गोष्टी होत आहेत, तों संध्याकाळची सात वाजण्याची वेळ होऊन जिकडेतिकडे काळोख पडूं लागला. त्यामुळें पेशव्यांचें सैन्य पुणें शहराकडे माघारें वळलें. तरी पण इंग्लिशांच्या सैन्यानें त्यांचा पाठलाग मुळींच केला नाहीं, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. मराठ्यांचें लष्कर माघारें फिरलेलें पाहून कॅप्टन फोर्ड हा आपलें सैन्य घेऊन दापोडीला परत गेला, आणि कर्नल बर हा आपल्या ब्रिगेडसह कूच करून रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास खडकी येथील आपल्या छावणीमध्यें परत येऊन पोंचला.

या लढाईमध्यें इंग्लिशांच्या कडील मेलेले आणि जखमी झालेले मिळून एकंदर ८६ लोक होते. व त्यांपैकीं ५० नेटिव्ह शिपाई आणि एक युरोपिअन ऑफिसर इतके मरण पावले. व पेशव्यांकडील मोर दीक्षित हे मारले जाऊन एकंदर मेलेल्यांची आणि जखमी झालेल्यांची संख्या ५०० पर्यंत गेलेली होती. इंग्लिशांच्या बाजूचा सेनापति, कर्नल बर, याला अर्धांगवायूचा विकार झालेला होता; तरी पण त्या मानानें पाहतां त्यानें पुष्कळ टिकाव

धरला. लढाईत त्याचे दोन नोकर त्याचेजवळ उभे असतां गोळी लागून खालीं पडले व त्याच्या घोड्याच्या डोक्याला एक गोळी चाटून गेली व दुसरी गोळी खुद्द त्याच्या टोपीला लागली.

अशा रीतीनें खडकीची लढाई आश्विन वद्य एकादशी रोजीं संध्याकाळीं सात वाजतां संपली. या लढाईत पेशव्यांच्या सेनापतींनीं आपलें युद्धकलेंतील कौशल्य पूर्णपणें उपयोगांत आणिलें होतें. शत्रूच्या दोन्ही बगलेवरून हल्ले करून मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं त्यांच्या दोन्हीही बगला फिरविल्या होत्या व त्यांच्या पिछाडीपर्यंतही कांहीं घोडेस्वार पोंचून ते तिकडूनही इंग्लिश सैन्यावर हल्ले करीत होते. सारांश, मराठ्यांच्या फौजांनीं इंग्लिशांना चोंहों बाजूंनीं वेढलें होतें, यांत संशय नाहीं. व बापू गोखले यांच्या घोडेस्वारांनीं इंग्लिश सैन्याची फळी फोडून त्यांमधून ते कसे घुसले, हेंहीं वर सांगितलेंच आहे. अशा प्रकारची लढाई करून रात्र पडली तेव्हां पेशव्याच्या फौजा स्वाभाविकपणेंच पुण्याकडे माघाऱ्या वळल्या. या लढाईत मराठ्यांनीं जरी इतकें कौशल्य दाखविलें, तरी त्यांनीं इंग्लिश फौजेला पूर्णपणें उद्ध्वस्त करून टाकिलें नाहीं, हेंही खरें आहे. त्याचप्रमाणें इंग्लिशांनीं मराठ्यांचा त्या दिवशीं खडकीच्या रणांगणावर पूर्णपणें पराभव केला, असें इंग्लिशांनाही म्हणतां यावयाचें नाहीं. खडकीच्या रणांगणावरील विजयाच्या संबंधानें पहातां दोन्ही पक्षांची बरोबरी झाली, एवढें फार तर म्हणतां येईल. पण आम्ही खडकीच्या लढाईत मराठ्यांचा पराभव केला असें इंग्लिश लोक मागाहून जें प्रतिपादन करूं लागलेले आहेत, तें त्या दिवशींच्या लढाईच्या एकंदर परिस्थितीवरून योग्य आहे, असें कोणालाही पक्षपाताची बुद्धि धारण केल्यावांचून म्हणतां यावयाचें नाहीं. इंग्लिशांचा जर एवढा जय त्या वेळीं झाला होता, तर त्यांनीं आपल्या समोरून पाठलाग केल्यावांचून पेशव्यांच्या सैन्याला स्वस्थपणानें परत कां जाऊं दिलें? ज्याला आपल्या विजयाची आणि वर्चस्वाची खात्री आहे, त्यानें आपल्या आटोक्यांत आलेल्या शत्रूला आपल्या पुढून पाठलागावांचून कधीं तरी सुरक्षितपणें जाऊं दिलें असतें काय? तेव्हां यावरून हें उघड होत आहे कीं, दोन्ही पक्षांची बरोबरी होऊन रात्र पडल्यामुळें दोन्हीही सैन्यें आपापल्या तळावर परत गेलीं. खडकीच्या लढाईत इंग्लिशांचा निश्चित रीतीनें जय झाला, असें तर नव्हतेंच; पण उलट आपल्या खडकीच्या छावणीवर रात्रींच्या वेळीं पेशव्यांच्या सैन्याचा छापा येईल कीं काय, अशीही इंग्लिशांना भीति वाटत होती, आणि हें विजय मिळाल्याचें खात्रीनें चिन्ह नव्हे. मराठ्यांच्या सैन्याची त्या दिवशींच्या युद्धांत निःसंशयपणें बरोबरी झाली होती. आतां तीन हजार सैन्याच्या विरुद्ध तीस हजार सैन्यानें लढून फक्त बरोबरीची लढाई केली, यांत कांहीं मोठेंसें शौर्य नाहीं, असें कदाचित् कोणी म्हणेल; पण एकमेकांच्या सैन्यांची संख्या कितीही असली ( आणि पेशव्यांच्या सैन्याची संख्या जास्त होती हा त्यांचा कांहीं दोष नव्हे ) तरी त्या दिवशींच्या लढाईत दोघांची बरोबरी झालेली होती, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. आणि अशी वस्तुस्थिति असतां आपल्या पेशव्यांच्या सैन्याचा खडकीच्या लढाईत पराभव झाला, अशा इंग्लिश इतिहासकारांनीं तयार करून दिलेल्या कल्पना आपण आपल्या डोक्यामध्यें बाळगून ठेवाव्या, हें केव्हांही योग्य नाहीं. आश्विन वद्य एकादशी

नंतर दुसऱ्या दिवशीं आदल्या दिवशींच्या लढाईतील बरोबरीचा फायदा घेऊन मराठ्यांनीं इंग्लिशावर खरोखर म्हटलें असतां फिरून हल्ला करावयाला पाहिजे होता. पण मराठ्यांनीं तसें कांहीं एक केलें नाहीं. ते पुढें अगदीं स्वस्थ बसले. त्या दिवसापासून आठ दिवसपर्यंत लढाईची ढील झाली व त्या अवकाशांत इंग्रज यानें आपले पलटणांची तयारी केली असें बखरकारांनींही लिहिलें आहे.

बाजीरावसाहेब पर्वतीच्या गच्चीवरून दुर्बिणींतून खडकीची लढाई पहात बसलेले होते. त्या लढाईचा रंग इंग्रजांना आशादायक वाटला नाहीं, त्यासंबंधानें पेशव्यांच्या बखरींत असें म्हटलें आहे कीं:-" त्या समयीं इंग्रज यांचें बोलणें श्रीमंतांकडे आलें. एल्फिन्स्टनसाहेब फार घाबरले. त्या समयीं श्रीमंत यांचीं बोलावणीं बापू गोखले यांस गेलीं. परंतु बापू गोखले माघारे न फिरत. इंग्रज कोंडला ( असता ) व इंग्रज यांचे लोकांस खावयास कांहीं नाहीं अशी निकड बसली असती, म्हणजे इंग्रज कौलांत आले असते. परंतु बापू गोखले यांचा लढाईचा आग्रह मोठा. खावंदांचे मनांत इंग्रज मोडावयाचा नाहीं. तेव्हां बोलावण्या-वर बोलावणीं बापू गोखले यांस श्रीमंतांचीं गेलीं. शेवटीं निदान श्रीमंतांनीं सांगून पाठविलें, तेव्हां बापू गोखले शह सोडून माघारे आले." या उताऱ्यामध्यें ज्या परिस्थितीचें वर्णन केलेलें आहे, त्यामुळें व पुढें जी ढिलाई करण्यांत आली त्यामुळें एल्फिन्स्टनसाहेबांना घोडनदीहून ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या पलटणांची मदत आणविण्याला अवकाश सांपडून येरवड्याच्या लढाईनंतर पुण्यांत प्रवेश करतां आला; व पेशवे पुणें सोडून गेले. यामुळें पुढें घडून आलेल्या या एकंदर गोष्टींवरून पेशव्यांचा खडकीच्या लढाईंतही पराभव झाला असें इंग्लिशांनीं म्हणावें आणि आपण त्याला माना डोलवाव्या अशी जरी एका दृष्टीनें वस्तुस्थिति असली, तरी ता. ५ नोव्हेंबर रोजीं खडकीच्या रणांगणावर दोन्ही सैन्यांचा जो मुकाबला झाला, त्याच्याकडेच फक्त पाहून जर कांहीं निकाल ठरवावयाचा असेल, तर खडकीच्या लढाईंत दोन्हीही पक्षांची बरोबरी झाली, असाच निकाल निःपक्षपाती इतिहासकारांनीं देणें जरूर आहे.

# येरवड्याची लढाई.

खडकीच्या लढाईला ता. ५ नोव्हेंबर १८१७ रोजीं सुरवात होण्याच्या पूर्वीच ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या हाताखालीं फोर्थ डिव्हिजनचें जें लष्कर होतें त्या लष्करानें जलदीजलदीनें कूच करून खडकीच्या सैन्याच्या मदतीला येऊन मिळावें, असे हुकूम मि. एल्फिन्स्टन यांचेकडून ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांचेकडे पाठविण्यांत आलेले होते. परंतु तें सैन्य खडकीच्या लढाईत खडकीच्या लष्कराला मदत करण्याकरितां वेळेवर येऊन पोचूं शकलें नाहीं. आणि ती मदत येऊन पोंचण्याच्या आधींच पेशव्यांनीं खडकीच्या लढाईला सुरवात केली. ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या हाताखालचें सैन्य येऊन पोंचण्याच्यापूर्वी कर्नल बर्न याच्या खडकीच्या सैन्याला गांठून त्याचा पराभव करावा, हा बापू गोखले यांचा डाव होता; व तें सैन्य येऊन पोंचेपर्यंत कसे तरी दिवस काढावेत, अशी मि. एल्फिन्स्टन यांची एकसारखी खटपट चाललेली होती. खुद्द खडकीची लढाई चाललेली असतांनाही एल्फिन्स्टन साहेबांचे निरोप पर्वतीवर पेशव्यांकडे जात होते, असें बखरकारांनीं लिहिलेलें आहे. हे निरोप साहेबाकडून पेशव्यांकडे कां जातें आहेत, यांतील लष्करी धोरण बापू गोखले यांना पूर्णपणें समजून चुकलेलें होतें. पण बाजीराव साहेबांच्या मनांत बापू गोखल्यांचा करारीपणा आणि दृढनिश्चयीपणा दुर्दैवानें नव्हता ! इंग्रजांचे निरोप येऊं लागल्याबरोबर बाजीराव साहेबांचें मन डळमळूं लागलें. खावंदांचे मनांत इंग्रज मोडावयाचा नव्हता, असें बखरकारानें लिहिलेलें आहे. त्यामुळें खडकीच्या मैदानावर बापू गोखले शत्रूला नामोहरम करण्यामध्यें गुंतलेले असतां ती लढाई थांबवून तुम्हीं माघारें फिरावें, असे निरोप पर्वतीवरून बापू गोखल्याकडे जाऊं लागले. व या निरोपांचें स्वरूप जेव्हां अगदीं निकराचें दिसूं लागलें, तेव्हां बापू गोखले शह सोडून माघारे आले, असेंही बखरकारांनीं वर्णन केलेलें आहे. हें वर्णन जर विश्वसनीय असेल, तर बापू गोखल्यांसारखा सेनापति असतांना आणि इंग्लिशांच्या तीन हजार सैन्याच्या विरुद्ध त्यांच्यापाशीं तीस हजार सैन्य असतांना शत्रूचा बीमोड केल्यावांचून बापू गोखले खडकीच्या रणमैदानावरून माघारे कां फिरलें या असंभाव्य गोष्टींतील कोडें उकलण्यासारखें आहे. नाहींतर ता. ५ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळ झाली म्हणून परत फिरलेल्या पेशव्यांच्या सैन्यानें फिरून दुसऱ्या दिवशीं खडकीच्या इंग्लिश सैन्यावर घाला घालण्याला काय हरकत होती ? परंतु एल्फिन्स्टन साहेबांच्या निरोपावरून इंग्रज मोडावयाचा नाहीं अशा इरायानें बाजीराव साहेबांनींच पुढील लढाईचें काम तहकब करविलें असलें पाहिजे, हें उघड दिसतें.




# येरवड्याच्या लढाईंतील सैन्याच्या
# हालचालींचें वर्णन.

१ १ १ पेशव्यांच्या सैन्याची छावणी.

२ २ ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या सैन्याची येरवड्याच्या टेकडीच्या जवळची छावणी.

३ येरवड्याच्या जवळची पाय-उताराची वाट.

४ संगमाजवळची पायउताराची वाट.

५ ५ ५ ५ ता. १६ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं कर्नल मिलने याचें सैन्य ज्या मार्गानें नदी उतरून घोरपडीकडे चाललें होतें, तो मार्ग.

६ ता. १६ नोव्हेंबर रोजीं रात्रीं कर्नल मिलने याच्या सैन्यांतील लोकांनीं जेथें मुक्काम केला ती जागा.

७ ७ ७ ७ ता. १७ नोव्हेंबर रोजीं पहाटेस पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां कर्नल मिलने हा ज्या मार्गानें गेला, तो मार्ग.

८ ८ ८ ८ ता. १७ नोव्हेंबर रोजीं पहाटेस पेशव्यांच्या सैन्यावर दुसऱ्या बाजूनें हल्ला करण्याकरितां ज्या मार्गानें जनरल स्मिथ गेला तो मार्ग.

---

( पान २४ च्या पुढें. )

पण बाजीराव साहेबांनीं लढाईचें काम अशा रीतीनें तहकूब करविलें, म्हणून इंग्लिशांनींही आपली पुढील लढाईची तयारी थांबविली होती, असें मात्र नाहीं. तर वरतीं सांगितल्याप्रमाणें ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या हाताखालील फोर्थ डिव्हिजन मधील लष्कर अहमदनगराहून खडकीच्या लष्कराच्या मदतीला येण्याकरितां दर कूच दर मजल जलदीनें चाल करून येत होतें. हें सैन्य अहमदनगरहून ता. ८ नोव्हेंबर रोजीं निघून शिरूरला पोंचल्यावर तेथून पुढें पेशव्यांचे कांहीं स्वार त्याच्या येण्याला प्रतिबंध करण्यासाठीं पाठविण्यांत आलेले होते. हे स्वार इंग्लिशांच्या सैन्याला ठिकठिकाणीं वाटेंत अडवीत होते आणि त्रास देत होते. व शिरूर आणि पुणें यांच्या दरम्यान असलेल्या कोंढापूर मुक्कामीं या दोन्ही सैन्यांची एक लहानशी चकमक होऊन पेशव्यांच्या स्वारांनीं इंग्लिशांचे सामानांनीं भरलेले दोन हजार बैल पकडून आणले. परंतु या किरकोळ अडथळ्याचा फारसा परिणाम न होतां, ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या हाताखालचें हें सैन्य ता. १३ नोव्हेंबर रोजीं पुण्याजवळ येऊन, येरवड्याच्या जवळची नदीच्या कांठची शादिलबुवाची म्हणून जी टेकडी प्रसिद्ध आहे, व जिला इंग्लिशांनीं " पिकेट हिल " (Piquet Hill) असें नांव दिलेलें आहे, त्या टेकडीच्या पश्चिमच्या अंगाला तळ देऊन राहिलें. हल्लीं खडकीच्या पुलावरून, म्हणजे होळकर पुलावरून, बंड गार्डनच्या पुलाकडे जाण्याचा जो रस्ता आहे, त्या रस्त्याच्या आसपास सायपर्स मायनर्सच्या छावणीची आणि डेक्कन कॉलेजची जी जागा आहे, त्या ठिकाणीं बहुतकरून हें सैन्य उतरलें असलें पाहिजे. हें सैन्य खडकीच्या पुलाच्या पूर्व बाजूला उतरलेलें असतां त्या पुलाच्या पश्चिम बाजूला खडकीच्या गांवांत कर्नल बर यांच्या सैन्याची छावणी होती; व हीं दोन्हीं सैन्यें आतां एकत्र होणार हें अगदीं उघड होतें. आणि वास्तविक पाहिलें असतां या दोन्ही सैन्यांना एकत्र होऊं द्यावयाचें नाहीं, अशी तजवीज करणें हें पेशव्यांच्या सैन्याचें त्या वेळीं मुख्य काम होतें. पण तें त्यांनीं केलें नाहीं, आणि अखेरीस कर्नल बर आणि ब्रिगेडिअर जनरल स्मिथ या दोघांच्या हाताखालचीं सैन्यें येरवड्याच्या टेकडीच्या पाठीमागें तारीख १३ नोव्हेंबर १८१७ या दिवशीं एकत्र झालीं. बंडगार्डनच्या जवळ मुळा–मुठा नदीला जें हल्लीं धरण बांधलेलें आहे, तें पूर्वी नव्हतें. त्यामुळें बंडगार्डनच्या पुढें हल्लीं जेथें पूल आहे त्याच्या सुमाराला नदीमध्यें पाण्यांतून पलीकडे जाण्यासारखी पायउताराची एक वाट होती. व या पाण्यांतलि उताराच्या वाटेनें पलीकडे जाऊन पुण्यांतलि गारपिरावरील पेशव्यांच्या लष्करावर हल्ला करावयाचा, असा इंग्लिश सैन्याचा बेत होता; व त्यासाठीं ती नदींतील पाय उताराची वाट आपल्या तोफेच्या माऱ्यांत सुरक्षित रहावी, म्हणून इंग्लिश सैन्यानें ती पिकेट हिल ता. १४ नोव्हेंबर रोजीं आपल्या ताब्यांत घेतली व त्या टेकडीवर एक तोफ डागण्यांत आली. हल्लीं सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं या येरवड्याच्या टेकडीवर जो एक सुंदर बंगला बांधलेला आहे व ज्याच्या जवळचे दगडी पायऱ्यांचें एक महादेवाचें जुनें देऊळ आहे, तेथेंच कोठें तरी आसपास ही तोफ बहुतकरून डागण्यांत आलेली असून येथून मुळा-मुठा नदींतील पायउतारांन कोणी पेशव्यांकडील शिपाई अडथळा करण्याकरितां येऊं लागतील तर त्यांच्या विरुद्ध हिचा बरोबर मारा होईल अशा रीतीनें ही तोफ ठेवण्यांत आलेली होती. व याच टेकडीवरून समोरच्या

गारपिरावरील पेशव्यांच्या छावणीवरही नेमके गोळे जाऊन पडतील, अशी आणखीही एक तोफ येथें डागण्यांत आलेली होती.

हल्लींच्या बंडगार्डनच्या पुलाजवळ मुळा-मुठा नदीला जो एक पायउतार होता, म्हणून सांगितलें आहे, त्याच्याशिवाय त्याच्या वरच्या अंगाला संगमाजवळही आणखी एक त्या नदीला पायउतार होता. या दोन्ही पायउतारांच्या बाजूनें सैन्याच्या दोन तुकड्यांनीं नदी उतरून पुण्यांतील सैन्यावर हल्ला करावयाचा, असा विचार ठरला होता. व हा हल्ला ता. १४ नोव्हेंबर रोजीं रात्रीं करण्याचें ठरलें होतें. परंतु येरवडयाच्या पायउतारावरून तोफा जाऊं शकत नाहींत, असें आढळून आल्यामुळें त्या रात्रींचा बेत रहित करण्यांत आला; व ता. १५ नोव्हेंबर रोजीं त्या पायउताराची वाट दुरुस्त करण्याचें काम सुरूं करण्यांत आलें. परंतु त्या येरवडयाच्या पायउताराची वाट इंग्लिशांच्या पायोनियर पलटणींतील शिपायी दुरुस्त करीत आहेत व त्या वाटेनें पुण्याकडे येण्याचा शत्रूचा विचार आहे, असें समजून आल्यानंतर त्या नदींत काम करणाऱ्या शिपायांना अडथळा करण्याकरितां पेशव्यांच्या सैन्यांतील कांहीं लोक ता. १६ नोव्हेंबर रोजीं तेथें आले; व अरबांचे घोडेस्वार त्यांना हरकत करूं लागले; व तिसरे प्रहरीं त्यांच्या मदतीला पेशव्यांच्या सैन्यांतील आणखीही बरेच लोक आले. पेशव्यांच्या या सैन्यानें या वेळीं चांगला जोर केला व कित्येक तासपर्यंत दोन्ही पक्षांच्या लोकांमध्यें बरीच चकमक झडली. पेशव्यांचें सैन्य नदींतून लढत लढत येरवडयाच्या बाजूच्या तीरापर्यंत येऊन पोहोंचलें व त्यांनीं ही लढाई रात्रीं ११ वाजेपर्यंत चालविली होती. परंतु या सगळ्या पराक्रमाचा फारसा उपयोग न होता इंग्लिशांचें सैन्य अखेरीस येरवड्याच्या पायउतारानें नदी उतरून अलीकडच्या तीराला येऊन पोंचलें. इंग्रजी सैन्याचा हा भाग लेफ्टनंट कर्नल मिलने याच्या हाताखालीं देण्यांत आला होता. या सैन्यांत मुंबईची युरोपियन पलटण, रेसिडेंटच्या तैनातींतील लोक, आणि पहिल्या, सहाव्या आणि सातव्या नेटिव्ह पायदळ पलटणींतील एक एक बॅटॅलियन, याप्रमाणें निरनिराळ्या तुकडया होत्या; व निरनिराळ्या जातींच्या मिळून त्यांच्यापाशीं एकंदर दहा तोफा होत्या. हें सैन्य ता. १६ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीच्या सुमाराला येरवडयाच्या पायउतारानें नदी उतरून पलीकडे जाऊन पोंचलें. व त्यानंतर लगेच ३ वाजतां म्हणजे ता. १७ नोव्हेंबरच्या पहाटेस ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या छावणींत जें सैन्य होतें, तें संगमाजवळच्या पायउतारानें दुसऱ्या बाजूनें पुण्यावर हल्ला करण्याकरितां निघालें. या सैन्यामध्यें ६५ वी पायदळाची पलटण व दुसरी, तिसरी आणि नववी रेजिमेंट यांच्यापैकीं प्रत्येकाची एक एक बॅटॅलियन आणि घोडयावरील तोफखाना, अशा तुकड्या होत्या.

अशा रीतीनें हीं दोन्हीं सैन्यें दोन निरनिराळ्या बाजूंनीं १७ तारखेच्या पहाटेच्या प्रहरीं पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां निघालीं. ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या हाताखालील सैन्य संगमावरून गारपिराकडे वळलें व लेफ्टनंट कर्नल मिलने याच्या हाताखालचें सैन्य येरवडा येथें नदी उतरून घोरपडीकडे वळलें व तेथून पुढें वानवडीच्या दिशेनें कांहीं वळण घेऊन नंतर तें समोर पश्चिमेकडे गारपिराच्या बाजूला वळलें. अशा

रीतीनें हीं दोन्हीं सैन्यें उजाडण्याच्या सुमारास गारपिराजवळ आलीं. पण तीं तेथें येऊन पहातात, तों त्यांच्या दृष्टीला काय पडलें ? पेशव्यांचें सगळें सैन्य तेथून आपला तळ उठवून रातोरात कूच करून निघून गेलेलें आहे, असें त्यांना आढळून आलें. गारपिराच्या छावणीमध्यें जे कांहीं थोडेसे अरब लोक शिल्लक राहिलेले होते, त्यांना ताब्यांत घेण्यांत आलें. व पुढें त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं पुण्यांतील शनिवारवाड्यावर इंग्लिशांचें निशाण उभारण्याचा दुःखकारक प्रकार घडून आला.

या येरवड्याच्या लढाईचें बखरकारांनींही अशाच प्रकारचें वर्णन केलेलें आहे. बखरकार लिहितात कीं, " खडकीच्या लढाईनंतर पेशव्यांच्या सैन्यानें कांहीं एक न केल्यामुळें इंग्लिशांना जो अवकाश सांपडला, त्या अवकाशांत इंग्रज यानें आपल्या पलटणाची तयारी केली. घोडनदीहून जनरल स्मिथ हा सरदार मोठा लढवाई दोन चार पलटणें दारूगोळ्यासुद्धां तयारी करून पुण्यावर आला. इंग्रजाची लढाईची तयारी झाली. इकडे श्रीमंत दिवाळी होऊन बाहेर पडले. ते डेऱ्यास येऊन दाखल झाले. तेथें अवघी फौज जमा जाहली. तोफखानाही तयार होऊन तेथें आला. अशी तयारी होऊन कार्तिक शु॥ ८ स तिसरे प्रहरीं लढाईस प्रारंभ झाला. तेव्हां इंग्रज येऊन येरवड्यावर तयार होऊन उभा राहिला. इकडे बापू गोखले फौजेची तयारी करून लढाईच्या उद्देशानें निघालें. ते येरवड्यावर गेले. तेथें गेल्यानंतर टेकडी येरवड्यानजीक आहे ती श्रीमंतांचे फौजेने आटोपली. त्या टेकडीवर आरब, गोसावी चढले. असें होत असतां दिवेलावणीच्या संधींत लढाई सुरू झाली. कांहीं लढाई होत आहे. महाकाळ तोफ पुरंदरास होती, ती अगोदर पुण्यास आणली होती. तीच तोफ तोफखान्यांतून ओढून लढाईस नेली.

आरब, गोसावी लढत होते. दारूगोळ्याचा व खाण्यापिण्याचा पुरवठा कांहीं पाठीमागून जाहला नाहीं. इंग्रजांचे तोफेची मारागिरी मोठी होऊं लागली. त्या समयीं रात्र दहाबारा घटका जाहली. त्या वेळेस श्रमिंत ( यांनीं ) स्वारी तयार करून, सगळा आपला अजबाब आटोपून, दिव्याचे घाटाचा रस्ता धरिला. घाटांत स्वारी गेली ते वेळेस हजारों मशाली लाविल्या. असे पळाले. हें बापू गोखले यांनीं पाहून तेही त्याच रस्त्यानें चालले. सारी फौज उधळली. तो उजेड इंग्रज यानें पाहिला. तेव्हां त्यानें लढाईचा लगट भारी केला. अरब गोसावी लढत होते, त्यांजवळ दारूगोळा नाहींसा झाला. त्यांत बहुतेक माणसें ठार झालीं. आरब गोसाव्यांनीं पळ काढिला. टेकडी इंग्रजांनीं सही केली आणि तेथून पुढें चाल केली.

श्रीमंत पळतात हें पाहून इंग्रजांचीं पलटणें पाठमिागें लागलीं. तों पहांटेचा समय व्हावयास आला. इंग्रज श्रमिंतांचे तळावर येऊन पोहोंचला. येऊन पहातो तों डेरे, राहुट्या रिकाम्या उभ्या आहेत."

या येरवड्याच्या लढाईचें वर्णन कवि प्रभाकर यानें आपल्या पोवाड्यामध्यें पुढीलप्रमाणें केलेलें आहेः—

**फसले शके सत्राशें एकुणचाळीसांत रणभूमीस ।**
**ईश्वर संवत्सरांत कार्तिक शुद्ध अष्टमीस ॥**
**प्रहर दिवसां रविवारीं सर्व आले आरब गुरमाईस ।**
**खुप मोर्चा बांधून विनविती श्रीमंत स्वामीस ॥**
(चाल) **दारुगोळी पुरवावी आम्ही आज हटकून त्याशीं लढूं ।**
**गर्दीस मिळवून देऊन पलटणें क्षणांत डोंगर चढूं ।**
**शिपाइगिरीची शर्थ करून समशेरी सोन्यानें मढूं ॥**
(चाल) **लाविलें बापुसाहेबांनीं तोंड जाऊनी ।**
**दीड प्रहर रात्र होतांच श्रीमंत दम खाउनी ।**
**गेली स्वारी मशाला हिलाल मग लावुनी ॥**
(चाल प०) **जलदी करून साहेबांनीं लाविलें निशाण पुणियाला ।**
**खेंचून वाड्याबाहेर काढिलें कदीम शिपायाला ॥**

येथपर्यंत वर येरवड्याच्या लढाईच्या संबंधानें दोन्ही बाजूंच्या इतिहासकारांचीं वर्णनें देण्यांत आलेलीं आहेत. ह्यावरून असें दिसतें कीं, खडकीच्या लढाईंतल्याप्रमाणें या येरवड्याच्या लढाईमध्येंही पेशव्यांच्या सैन्याचें नेतृत्व बापू गोखले यांच्याकडेच होतें. व या लढाईमध्येंही बापू गोखले यांनीं आपल्या शौर्याची आणि युद्धकौशल्याची शिकस्त करून सोडली. तरी पण त्यांच्या सभोंवतालच्या परिस्थितीपुढें त्यांच्या पराक्रमाचें कांहीं तेज पडूं शकलें नाहीं. खडकीची लढाई आश्विन वद्य ११ रोजीं झाली. आणि त्यानंतर येरवड्याची लढाई कार्तिक शुद्ध ८ रविवार रोजीं झाली. या दोन लढायांच्या दरम्यान जे बारा दिवस फुकट गेले, ते तसे गेले नसते, तर पुढील परिणाम खात्रीनें इतका अनिष्ट झाला नसता. घोडनदीहून येणारीं पलटणें पुण्याच्या सैन्याला येऊन मिळण्याच्या पूर्वीच त्यांचा पराभव करून टाकावयाला पाहिजे होता. परंतु मध्यंतरीं कपटी एलफिन्स्टन साहेब यानें बाजीरावापाशीं जें बोलणें खडकीच्या लढाईच्या दिवसापासून सुरू केलेलें होतें, त्या बोलण्यावर बाजीराव साहेबांची जास्त भिस्त बसल्यामुळें त्यांच्या सैन्याकडून लढाईचा कांहींच उद्योग झाला नाहीं. कोंडापूर येथें थोडेसे स्वार पाठवून इंग्लिशांच्या सैन्याला जो किरकोळ अडथळा करण्यांत आला, त्याच्यापेक्षां जास्त सैन्य पाठवून तेथेंच एखादी मोठी लढाई दिली असती, तर त्याचा जास्त उपयोग झाला असता. पुण्यांत इतके घोडेस्वार, आरब आणि गोसावी नुसते रिकामे बसवून ठेवून करावयाचें होतें काय ? पण तसें कांहीं एक झालें नाहीं. तरी पण येरवड्याच्या टेकडीवरून इंग्रजांच्या तोफेचे गोळे गारपिराच्या छावणीवर येऊन पडूं लागले, तेव्हां तरी निदान पेशव्यांचें सैन्य जागें झालें; व येरवड्याच्या बाजूनें येणारा हल्ला परतविण्याकरितां तें सैन्य तिकडे चाल करून निघालें. नंतर येरवड्याच्या नदीमध्यें जी लढाई झाली, त्या लढाईंत पेशव्यांच्या कडील लोक लढत लढत पलीकडच्या कांठापर्यंत जाऊन पोहोंचले होते, असें इंग्लिश इतिहासकारांनीं म्हटलें आहे. पण बखर आणि पोवाडा यांतलि वर दिलेल्या वर्णनावरून असें दिसतें कीं, पेशव्यांचे शिपाई नुसते मुळा-मुठा नदीच्या पलीकडेच जाऊन

पोहोंचलेले होते, एवढेंच नसून श्रीमंतांच्या फौजेंतील अरब आणि गोसावी हे येरवड्याच्या टेकडीवरही चढून गेलेले होते. पण त्या सगळ्या मर्दुमकीचा अखेरीस कांहीं उपयोग झाला नाहीं. पेशव्यांचे फौजेंतील कांहीं आरब आणि गोसावी टेकडी चढून वर गेले खरे; पण बाकीचे लोक काय करीत होते ? जे आरब आणि गोसावी लढत होते, त्यांच्या जवळचा दारूगोळा नाहींसा झाला असतां त्यांना आणखी दारूगोळयाची कुमक पाठीमागून व्हावयाला पाहिजे होती. पण ती करतो कोण ? तिकडे टेंकडीवर कांहीं लोक लढाई करून शत्रूला मारीत होते, तर इकडे पाठीमागें गारपिरच्या छावणीमधील बाकीचे लोक आपआपलें बोजे बांधून पळून जाण्याची तयारी करीत होते ! महाकाळी तोफ पुरंदराहून पुण्यास आणली होती, ही गोष्ट खरी. पण ती नुसती तोफ काय करील ? तिच्यांत दारू आणि गोळे भरणारे दमदार गोलंदाज कोणी तरी पाहिजेत कीं नकोत ? माझा प्राण गेला तरी हरकत नाहीं, पण मी जिवंत आहे तोंपर्यंत मी या तोफेपासून न हलतां शत्रूचा निःपात होईपावेतों मी ही तोफ चालवीन, अशा दृढ निश्चयाचे गोलंदाज जेव्हां एखाद्या तोफेच्या पाठीमागें असतील, आणि एक मरण पावला तर त्याची जागा घेण्याला जेव्हां अशा प्रकारचे दुसरे अनेक गोलंदाज तयार असतील, तेव्हांच त्या तोफेच्या हातून कांहीं तरी काम होऊं शकतें. एखाद्या निर्जीव तोफेचें नांव महाकाळ ठेवण्यांत कांहीं मुद्दा नाहीं. तोफ ही महाकाळ नव्हे, तर मनुष्याची छाती ही महाकाळ आहे! तीं महाकाळ छातीचीं माणसें मराठ्यांच्या मधून निघून गेलेलीं होतीं, आणि महाकाळ नावाची नुसती तोफ मात्र पाठीमागें राहिली होती. पण तीही महाकाळ तोफ कालवशात् आज कोणीकडे जाऊन पडलेली आहे, याचा कोणाला पत्ता नाहीं. पूर्वी ज्या तोफा ओढण्यांत येऊं लागल्या, म्हणजे धरणी थर थर कांपत असे, आणि ज्या तोफांच्या तोंडांतून धुराच्या लोटांमधून आगीसारखे गोळे बाहेर पडूं लागले म्हणजे सगळें वातावरण हदरून जात असे, त्या तोफा छिन्न विच्छिन्न होऊन आपल्या समकालीन योद्धयांच्या बरोबर ठिकठिकाणीं जमिनींत पुरून टाकलेल्या पाहून मनाला अतिशय वाईट वाटते. ज्या आपल्या गर्जनेनें दशदिशा दणाणून सोडीत होत्या, त्यांच्यावर असा प्रसंग यावा, हें पाहून कोणाला वाईट वाटणार नाहीं ?


असो; अशा रीतीनें खडकी आणि येरवडा या दोन ठिकाणच्या लढायांनीं पेशव्यांच्या सारख्या विस्तीर्ण राज्याचा शेवट झाला. आपलें राजधानीचें शहर न सोडतां शत्रूशीं आणखी नेटानें लढावें, ही कल्पना बाजीरावाच्या डोक्यांत न येतां तिकडे येरवड्याच्या टेकडीवर आपले आरब शिपाई विजयासाठीं लढत असतां इकडे बाजीराव साहेबांनीं पुणें सोडून दिव्याच्या घाटानें सासवडाकडे जाण्याचा दुर्दैवानें निश्चय केला. बाजीराव साहेब खडकीची लढाई झाल्याबरोबरच पुणें सोडून गेले, असें जें कित्येकांनीं लिहिलें आहे, तें बरोबर नाहीं. " श्रीमंत दिवाळी होऊन बाहेर पडले ते डेऱ्यास येऊन दाखल झाले. तेथें अवघी फौज जमा जाहली. तोफखानाही तयार होऊन तेथें आला. अशी तयारी होऊन कार्तिक शु० ८, तिसरे प्रहरीं, लढाईस प्रारंभ झाला. " अशा प्रकारचें बखरीमध्यें जें वर्णन आहे, त्यावरून येरवड्याच्या लढाईपर्यंत पेशवे पुण्यांत होते व कार्तिक शु॥ ८ च्या रात्रीं ते दिव्याच्या

घाटानें निघून गेले, हें उघड होत आहे. बाजीरावसाहेब निघून गेल्यानंतर बापू गोखले यांनाही दुसरा मार्ग उरला नाहीं. आणि तेही आपल्या धन्याच्या पाठोपाठ कूच करून निघाले. तरी पण या कृत्यानें बापू गोखल्यांच्या कीर्तीला कमीपणा आला, असें मुळींच झालें नाहीं. शिपाई या नात्यानें त्यांची कीर्ति अजरामर होऊन राहिलेली आहे. १८५७ सालच्या बंडांतलि नानासाहेब पेशव्यांचा सुप्रसिद्ध सेनापति, तात्या टोपे, याच्या युद्ध-कौशल्याबद्दल ज्याप्रमाणें युरोपियन सेनापति देखील वाखाणणी करितात, त्याचप्रमाणें बापू गोखले यांच्याही युद्धकौशल्याची तारीफ युरोपियन इतिहासकाराकडून करण्यांत येते. "Fifteen years in India" या पुस्तकाचा कर्ता हा खडकीच्या लढाईमध्यें इंग्लिशांचा एक ऑफिसर या नात्यानें इंग्लिशांच्या बाजूनें हजर होता. त्यानें बापू गोखले यांच्याबद्दल सदर पुस्तकामध्यें फार प्रशंसापर उद्गार काढिलेले आहेत:—" बापू गोखले यांचा बांधा चिप्पाड असून त्यांचे नाक, डोळे सुरेख आणि पाणीदार असे होते आणि त्यांची शरीरकांति गौरवर्णाची होती. सर आर्थर वेलस्ली याच्या हाताखालीं पेशव्यांचें जें सैन्य देण्यांत आलेलें होतें, त्या सैन्यांत बापू गोखले हे एक अधिकारी म्हणून होते. त्या वेळीं इंग्लिशांच्या सैन्यांतील शिस्त कशी असते आणि लढाईमध्यें ते कशा प्रकारच्या युक्त्या करीत असतात, हें सर्व बापू गोखले यांनीं पाहिलेलें होतें. आणि शिवाय ते स्वतः फार शूर आणि अनुभवी होते. परंतु दुदैवानें त्यांच्या हाताखालीं खडकीच्या लढाईच्या वेळीं जें सैन्य होतें, त्यांत शिस्त नसून अव्यवस्था फार होती. तरी पण जनरल स्मिथ यांच्याशीं लढाई देण्याच्या कामीं त्यांनीं जें शौर्य आणि कौशल्य दाखविलें, तें खरोखर वर्णन करण्यासारखें आहे. आणि पुढें कधीं जेव्हां कवितादेवी त्यांच्या इतिहासाचें वर्णन करण्याला प्रवृत्त होईल, त्या वेळीं आपल्या देशाच्या एकनिष्ठ सेवेबद्दल ती देवी त्यांच्या डोक्यावर आपला पुष्पमंडित मुकुट घातल्याशिवाय केव्हांही राहणार नाहीं ! "

# कोरेगांवची लढाई.

येरवड्याच्या लढाईनंतर बाजीरावसाहेब आणि बापू गोखले हे पुरंदरच्या बाजूला आपल्या बरोबरच्या बऱ्याच मोठ्या सैन्यासह निघून गेले आणि त्यांच्या सैन्यापैकीं कांहीं भाग सिंहगडच्या बाजूकडे वळला. यांनीं आपल्या बरोबर कूच करतांना बऱ्याच तोफाही घेतलेल्या होत्या. कॅप्टन टर्नर हे या सिंहगडकडील तुकडीचा पाठलाग करण्याकरितां निघाले. ते ता० १९ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं सिंहगडच्या पायथ्याशीं येऊन पोंचले. त्यांनीं सिंहगड येथील पेशव्यांच्या सैन्याचा पराभव करून त्यांच्यापाशीं ज्या तोफा होत्या त्या हस्तगत करून घेतल्या. परंतु त्या तोफा पुण्यास परत आणणें शक्य नसल्यामुळें त्यांचीं नाकें तोडून त्या तोफा तेथेंच टाकण्यांत आल्या; व कॅप्टन टर्नर यांच्या हाताखालचें सैन्य ता० २१ नोव्हेंबर रोजीं पुण्यास परत आलें. अशा रीतीनें सिंहगडकडील या लहानशा तुकडीचा जरी ताबडतोब पाठलाग आणि पराभव करितां आला, तरी पेशव्यांच्या बरोबर जें मुख्य सैन्य पुरंदर किल्ल्याच्याकडे निघून गेलेलें होतें, तें अद्यापि कायमच होतें. त्या सैन्याचा ताबडतोब पाठलाग सुरू करणें ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांना शक्य नव्हतें. म्हणून ता० १७ नोव्हेंबरच्या येरवड्याच्या लढाईपासून ता० २१ नोव्हेंबरपर्यंतचे मध्यंतरींचे दिवस जनरल स्मिथ यांना आपली तयारी करण्यामध्यें घालविणें भाग पडलें. परंतु या मध्यंतरींच्या अवकाशामध्यें बाजीरावसाहेबांच्या सैन्यानें पुण्यापासून बराच लांबचा पल्ला गांठला होता. पेशवे पुरंदरच्या बाजूनें प्रथम निघाले, ते तेथून पुढें कूच करीत करीत साताऱ्याजवळ माहुली मुक्कामीं येऊन पोहोंचले. येथें एक हजार अरब आणि दोन हजार घोडेस्वार इतक्या सैन्यासह निपाणीचे आप्पासाहेब निपाणकर हे बाजीराव साहेबांच्या सैन्याला येऊन मिळाले. आपला पाठलाग करीत इंग्लिशांचें सैन्य सालप्याच्या घाटानें येत आहे, असें समजून आल्यानंतर त्यांना अडथळा करण्याकरितां कांहीं घोडेस्वार ठेवून बाजीराव साहेब माहुलीहून निघून पुसेसावळी येथें ता० २७ नोव्हेंबर रोजीं आले; व तेथें दोन दिवस मुक्काम करून ता० २९ नोव्हेंबर रोजीं पहाटेस निपाणकर आणि पटवर्धन यांचेकडील पांच हजार घोडेस्वार आपल्याबरोबर घेऊन ते तेथून मिरजेकडे जाण्याकरितां निघाले. त्या वेळीं शत्रूला आपला पाठलाग पुढें करतां येऊं नये आणि शत्रु मध्येंच अडविला जावा, या उद्देशानें बापू गोखले, विंचूरकर आणि घोरपडे यांच्या हाताखालीं पेशव्यांचें मुख्य लष्कर देण्यांत आलेलें होतें. अशी मागची तरतूद करून

पेशवे मिरजेकडे जाण्याकरितां निघाले. परंतु बापू गोखले शत्रूला अडविण्याकरितां आपल्या सैन्याशीं ज्या डोंगरामध्यें दबा धरून बसले होते, त्या डोंगरांना वळसा घालून इंग्लिशांचें सैन्य ता० २ डिसेंबर रोजीं पुसेसावळी येथें येऊन पोंचलें. त्यामुळें बाजीराव साहेबांना आपली दिशा बदलणें जरूर झालें. आतांपर्यंत पुण्यापासून पुरंदर, माहुली, पुसेसावळी, मिरज या मार्गानें ते दक्षिणेकडे कूच करीत चाललेले होते. परंतु येथून त्यांनीं आपली दिशा बदलली आणि उत्तरेकडे पंढरपूरच्या रोखानें त्यांनीं आपला मोर्चा फिरविला. पुढें पेशव्यांचा मुक्काम पंढरपूर येथें असतां इंग्लिशांचीं पलटणें ता० ८ डिसेंबर रोजीं पंढरपूरच्या जवळ येऊन पोंचलीं. पंढरपूरला येतांना बापू गोखल्यांच्या सैन्यानें इंग्रजी फौजेला फारच सतावून सोडिलें; पण इतक्या त्रासांतून आणि हालविपत्तींतून इंग्लिशांचें सैन्य पंढरपूरला येऊन पोंचतें आहे, तोंच त्याना अशी बातमी कळली कीं, बाजीरावसाहेब अहमदनगर जिल्ह्याकडे वळले असून त्यांचा मुक्काम पीरगांव येथें आहे. पण निरा आणि भीमा या नद्या ओलांडून इंग्लिशांचें सैन्य पीरगांव येथें, येतें तों तेथील मुक्काम सोडून बाजीरावसाहेब नाशकाकडे निघून गेले. जलदी जलदीनें मुक्काम बदलून आपण कोणत्या दिशेनें कोणीकडे जात आहों याचा शत्रूला मागमूस लागूं न देतां बाजीरावसाहेबांनीं शत्रूला झुकांड्या देण्याची जी ही पद्धत सुरू केली होती, त्यामुळें त्यांचा पाठलाग करणें इंग्लिश फौजेला फार कठिण पडूं लागलें. म्हणून आतां पीरगांवाहून बाजीरावसाहेबाच्या पाठीमागें लागत नाशकाला जाण्याचें सोडून देऊन कंटाळून ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांनीं आपला मोर्चा शिरूरकडे वळविला. इतके दिवसपर्यंत जनरल स्मिथ हे आपल्या बरोबर मोठमोठ्या तोफा वगैरे सामान घेऊन फिरत होते. त्यामुळें त्यांना जलदीनें पाठलाग करण्याला अडचण पडत होती; म्हणून शिरूर येथें तोफा वगैरे सामान ठेवून सड्या सैन्यानिशीं स्मिथसाहेब आपल्या कामगिरीवर फिरून निघाले ते शिरूरहून बाजीरावाचा नाशिकच्या दिशेने पाठलाग करण्याकरितां प्रवरेच्या कांठीं संगमनेर येथें येऊन पोंचले. परंतु तेथें आल्यावर त्यांना असें कळलें कीं, बाजीरावसाहेब हे नाशिककडे मुळींच न वळतां मध्यंतरीं त्रिंबकजी डेंगळ्याच्या हाताखालील पायदळाची आणि त्यांची गांठ पडून ते संगमनेरवरून मधला ओझरचा घाट उतरून जुन्नरच्या वाटेनें पुण्याकडे फिरून निघून गेले आहेत. ही जी बातमी स्मिथ साहेबाला कळली होती, त्याप्रमाणें खरोखरच बाजीरावसाहेब ओझरचा घाट उतरून जुन्नरखेडच्या रस्त्यानें ता. ३० डिसेंबर १८१७ रोजीं चाकण येथें येऊन पोंचलेले होते. आणि तेथून आतां पुणें फक्त आठ नऊ कोसच राहिलें होतें. त्यामुळें बाजीरावसाहेब आपल्या सगळ्या सैन्यासह फिरून पुण्यांत येण्याला फारसा अवकाश राहिला होता, असें नाहीं. ता. १८ नोव्हेंबरपासून ता. ३० डिसेंबरपर्यंतच्या मधल्या सुमारें दीड महिन्याच्या अवकाशामध्यें पुरंदर, सालप्याचा घाट, माहुली, पुसेसावळी, मिरज, पंढरपूर, पीरगांव, संगमनेर, ओझर, जुन्नर, खेड आणि चाकण, या ठिकाणांवरून फिरतां फिरतां स्मिथसाहेबाला हुलकावण्या दाखवीत आणि झुकांड्या देत बाजीरावसाहेब फिरून पुण्याकडे परत आले, आणि ते फिरून पुणें शहर काबीज करण्याच्या अगदीं बेतांत होते, यावरून या हुलकावण्या दाखविण्यामध्यें त्यांनीं जें कौशल्य प्रकट केलें, त्याचें महत्त्व कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. पाठलाग करणाऱ्या आपल्या शत्रूला





बाजीरावानें ज्या मार्गानें
कूच केलें तो मार्ग.

त्यांनीं अगदीं जेरीस आणलें होतें. इतक्या दीड महिन्याच्या अवकाशांत सुमारें दहा बारा ठिकाणच्या मुक्कामांत आणि एकंदर सुमारें ४०० मैलांच्या प्रवासांत स्मिथसाहेब एकदांहि त्यांना गाठूं शकला नाहीं. इतके दिवस इतके मैलांचा पाठलाग करून त्यांत एकदां सुद्धां यश प्राप्त होऊं नये, ही इंग्लिशांना अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. पण त्या सगळ्याच्या-पेक्षांहि इंग्लिशांना जास्त नामुष्कीची गोष्ट ही आहे कीं, इंग्लिशाचें इतकें सैन्य बाजीराव-साहेबाच्या पाठीवर असतां त्यांनीं जर लष्करी धोरणाच्या दृष्टीनें एखादी मुख्य गोष्ट करा-वयाला पाहिजे होती तर ती ही कीं, त्यांनीं बाजीरावाला फिरून पुण्याकडे येऊं द्यावयाला नको होतें. पण जी गोष्ट इंग्लिशांनीं करूं द्यावयाला नको होती, ती गोष्ट बाजीराव आणि बापू गोखले यांनीं इंग्लिशांच्या पाठलाग करणाऱ्या सैन्याला खडे चारून आणि त्यांना न जुमानतां हटकून घडवून आणिली, यांत बाजीराव आणि बापू गोखले यांच्या लष्करी धोरणाचा आणि लष्करी दूरदृष्टीचा खात्रीनें विजय झालेला होता, असें कोणाहि निःपक्ष-पाती मनुष्याला कबूल करणें भाग आहे. दीड महिन्यांत इंग्लिश सैन्य कांहींएक करूं शकलें नाहीं; रानोमाळ फिरून उगीच थकून मात्र गेलें; अखेरीस जड तोफा जलदीच्या पाठलागाला अडथळा करतात, म्हणून त्या तोफाहि स्मिथसाहेबानें शिरूरला ठेवून पाहिल्या. तरी पण अखेरीस तो पेशव्याच्या पुण्याकडील रोखाला प्रतिबंध करूं शकला नाहीं तो नाहींच ! आणि पेशव्यांचें सैन्य मात्र दक्षिण, उत्तर, पूर्व, पश्चिम अशा निरनिराळ्या दिशांनीं घिरट्या घालीत घालीत आणि इंग्लिशांच्या सैन्याला चुकवीत चुकवीत नेमकें पुण्याच्याजवळ चाकणला येऊन पोंचलें ! या बाबतींत बाजीरावानें दाखविलेल्या कौशल्याबद्दल खुद्द इंग्लिशांनींहि त्याची स्तुति केलेली आहे. बाजीरावसाहेबांनीं या प्रसंगीं गनिमी काव्याची पद्धत स्वीकारली होती. पाठीमागून पाठलाग करीत येणाऱ्या शत्रूला फसविण्या-करितां आणि त्याला भलत्याच दिशेकडून वळवून देण्याकरितां बाजीरावसाहेब हे आपल्या सैन्यांतील कांहीं लोक पाठीमागें एका दिशेला ठेवून आपण पुढ निराळ्याच दिशेनें दुसरीकडे कोठें तरी कूच करून जात असत. त्याच्या सैन्यांत या वेळीं तोफा वगैरेंसारखें जड सामान फारसें कांहीं नसून त्यांनीं आपल्या भोंवतीं बहुतेक घोडेस्वारांचाच भरणा ठेविला होता. व त्यांच्या सैन्यांत घोडेस्वारच असल्यामुळें लांब लांब मजला मारून शत्रूला झुकांड्या देण्याला त्यांना फारच सोईचें पडत असे. मागें जें सैन्य ठेविलेलें असे, तें अमुक दिशेला जात आहे, असें पाहून बाजीरावसाहेबहि त्याच दिशेनें जात असले पाहिजेत, असें वाटून इंग्लिश सैन्य पुष्कळ वेळां फसत असे; आणि हे पाठलाग करणारें इंग्रजी सैन्य जवळ आलें, म्हणजे पेशव्यांचे मुद्दाम मागें ठेवलेले लोक तेथून पळून निघून जात असत. पण पाठीमागें ठेविलेल्या सैन्यानें वेळ आल्यास कसें लढावयाचें हें काम बाजीरावाचे सरदार करीत असत; व आपल्या प्राणावर प्रसंग आला तरी हरकत नाहीं, पण आपल्या पुढें गेलेल्या धन्याच्या जिवाला धोका येतां कामा नये, अशा प्रकारची सर्व तजवीज बापू गोखले, विंचूरकर, घोरपडे, यांच्यासारखे सरदार मागें राहून मोठ्या प्रामाणिकपणानें आणि अत्यंत स्वामिनिष्ठेनें करीत असत. आणि हें मागील संरक्षणाचें काम आपल्या स्वामिनिष्ठ सरदारांकडे सोंपवून पुढील धोरण कसें ठरवावयाचें व पुढें कोठें जावयाचें या गोष्टी

बाजीरावसाहेबांनीं स्वतः आपल्याकडे घेतल्या होत्या. याबद्दलची व्यवस्था बाजीरावसाहेब कशी करीत असत, याविषयीं ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांनी जनरल डोव्हटन याना लिहिलेल्या एका पत्रामध्यें ज वर्णन केलेलें आहे, तें फारच मनोरंजक आहे. ते लिहितात कीं, " एखाद्या गांवांत बाजीरावसाहेबांचा मुक्काम पडला, म्हणजे ते तेथील पाटील वगैरे लोकांना बोलवून आणीत असत आणि जिकडे आपल्याला जावयाचें नाहीं, तिकडच्या रस्त्यांची व डोंगरातील आडवाटांची ते त्यांच्यापाशीं मुद्दाम ऐसपैस चवकशी करीत असत; आणि त्याना जावयाचें झालें म्हणजे अखेरीस ते निराळ्याच कोठल्या तरी रस्त्यानें निघून जात असत. इंग्रजांना फसवण्याकारतां ते आणखी एक युक्ति करीत असत, ती अशी का, आपल्या सैन्यांतील लोक कूच करण्याकरिता निघाले, म्हणजे त्यांच्या निरनिराळ्या तुकड्या करून त्याना निरनिराळ्या दिशांनीं पाठविण्यांत येत असे. या सगळ्या तुकड्यांतील लोक अखेरीस जरी ठरलेल्या मुक्कामावर येऊन एकत्र जमावयाचे असत, तरी शत्रूला गोंधळात पाडण्याकरिता या युक्तीचा चांगला उपयोग होत असे. याशिवाय दुसरी एक गोष्ट अशी होती कीं, आज आता पुढला मुक्काम कोठे व्हावयाचा आहे, हे खुद्द बाजीरावसाहेबांच्याशिवाय त्यांच्या सैन्यातील एकाहि मनुष्यास कधीं कळत नसे. ते निघाले म्हणजे त्यांच्या पाठीमागून बाकीचें सैन्य निघत असे. अशा वेळीं कूच करताना सैन्यांतील व्यवस्था अशी असे कीं, बाजीरावसाहेबाचे सामानसुमान पुढे चालत असे; त्याच्या पाठीमागून हत्तीवर घातलेला खजिना चालविण्यात येत असे; आणि त्या हत्तीच्या संरक्षणाकारतां त्याच्या बाजूने कित्येक घोडेस्वार ठेविलेले असत; त्याच्या पाठीमागून खुद्द श्रीमंतांची स्वारी चालत असे; आणि त्यांच्या पाठीमागे निवडक खास पायदळातील काही लोक असत; आणि त्याच्या पाठीमागे निपाणकर वगैरे सरदाराचे घोडेस्वार असत. आणि या सगळ्याच्या पाठीमागे बाजीरावसाहेबाच्या सैन्याच्या पिछाडीचें संरक्षण करण्याकारतां बापू गोखले हे आपल्या सैन्यासह चालत असत. त्याच्यावर पाठीमागून शत्रूच्या सैन्यानें हल्ला केला असतां पेशव्यांना दूरवर जाण्याइतका वेळ मिळेपर्यंत किरकोळ लढाई करून नंतर ते दुसऱ्याच कोठल्या तरी दिशेने निघून जात; व फिरून पेशव्याच्या सैन्याला येऊन मिळत असत. " ही जी गनिमी काव्याची पद्धत बाजीरावसाहेबानीं त्या वेळीं स्वीकारली होती, त्याबद्दल एका इंग्रजी इतिहासकारानें बाजीरावसाहेबांचे पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहेः—Bajee Rao must be allowed to have shown considerable art in the style of warfair he adopted............ He cannot be denied the praise of having exhibited much ingenuity and stratagem in his several dispositions, of which their protracted success was a sufficient evidence.

वर वर्णन केलेल्या प्रकारच्या कौशल्यानें आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज शत्रूंना फसवीत फसवीत बाजीरावसाहेब ता० ३० डिसेंबर रोजी पुण्यापासून आठ नऊ कोसावर चाकण मुक्कामीं येऊन दाखल झाले. ही बातमी पुण्यास कळताच पुण्यांतील लोकांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. आपला राजा फिरून आपल्यामध्यें येणार आणि आपलें गेलेलें

स्वातंत्र्य आपल्याला फिरून मिळणार, असा संभव दिसूं लागल्याबरोबर पुण्यांतील स्वामिभक्त लोकांची चित्तवृत्ति आनंदानें किती उचंबळून गेली असेल, याची कल्पनाहि करतां येणें शक्य नाहीं ! सर्व लोक बाजीरावाच्या भाग्याचीं आणि बापू गोखल्यांच्या शौर्याचीं वर्णनें गाऊं लागले. फक्त आपल्या फंदफितुरीनें, हरामखोरीनें आणि विश्वासघातानें पेशव्यांचें राज्य बुडवून इंग्रजांना आपल्या घरांत घेण्याला ज्यांनीं मदत केली होती, अशा देशद्रोही लोकांचें मात्र धाबें अगदीं दणाणून गेलें. व आतां बाजीरावसाहेब परत पुण्यांत आले, तर आपल्या पातकाबद्दल आपल्याला काय शासन होईल, याबद्दल त्यांना भीति वाटूं लागली. त्याच-प्रमाणें त्या वेळीं पुण्याच्या बंदोबस्ताचें काम कर्नल बर यांच्याकडे सोंपविण्यांत आलेलें होतें, व त्यांच्यापाशीं सैन्यहि फारसें नव्हतें. त्यामुळें तेहि फार घाबरून गेले. पेशव्यांचा पाठलाग करणारे ब्रिगेडिअर जनरल स्मिथ हे हल्लीं कोठें आहेत आणि पेशव्यांच्या सैन्या-च्या पाठीमागें ते किती दूर अंतरावर राहिलेले आहेत, याबद्दल कर्नल बर यांना कांहीं कल्पना येईना. आणि पेशवे उद्यां चाकणहून पुण्यामध्यें आले, तर जनरल स्मिथ हे त्यांच्या पाठोपाठ त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां येतलि, किंवा पेशव्यांना अडथळा करण्याकरितां आपण दुसरी कांहीं तजवीज केली पाहिजे, याबद्दल कर्नल बर यांना कांहीं एक निश्चय करितां येईना. म्हणून प्रसंग पडल्यास आपल्याला कांहीं तरी मदत व्हावी, यासाठीं शिरूर येथून नेव्हिट पायदळाची एक पलटण कर्नल बर यांनीं ताबडतोब बोलाविली. त्याप्रमाणें पहिल्या बॉंबे नेटिव्ह इन्फन्ट्रीपैकीं दुसरी बॅटेलियन, दोन तोफा आणि अडीचशें घोडेस्वार, इतकें सैन्य आपल्या बरोबर घेऊन कॅप्टन स्टॉटन हा ता. ३१ डिसेंबर १८१७ रोजीं रात्रीं ८ वाजतां शिरूरहून निघाला, आणि २७ मैलांची मजल मारून ता. १ जानेवारी १८१८ रोजीं सकाळीं १० वाजतां तो कोरेगांवच्या जवळील एका टेंकडीवर येऊन पोहोंचला. परंतु तेथें येऊन त्या टेंकडीवरून त्यानें पाहिलें, तों त्या टेंकडीच्या खालच्या खोऱ्यांत भीमा नदीच्या उजव्या किनाऱ्याच्या कांठानें जिकडेतिकडे पेशव्यांचे प्रचंड सैन्य पसरलेलें त्याला दिसलें. तेव्हां इतक्या मोठ्या सैन्यापासून उघड्या मैदानावर आपला बचाव होणें शक्य नाहीं असें वाटून त्यानें कोरेगांवच्या तटबंदीच्या आंत आपलें सैन्य नेऊन ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला. इकडे इंग्लिशांचें सैन्य गांवांत शिरत आहे असें पाहून त्याला तेथून हुसकून काढण्याकरितां पेशव्यांचें सैन्यहि भीमा नदी उतरून पलीकडे जाऊं लागलें. या वेळीं पेशव्यांचें सैन्य भीमानदीच्या उजव्या तीरावर असून इंग्लिश इतिहासकारांच्या अदमासाप्रमाणें त्या सैन्यांत सुमारें वीस हजार घोडेस्वार आणि आठ हजार पायदळ इतके लोक होते. ह्यांपैकीं कांहीं लोक भीमानदी उतरून इंग्लिशांना मागें हटविण्या-करितां कोरेगांवांत शिरले. या गांवाला त्या वेळीं तटबंदी फार चांगली आणि मजबूत अशी होती. या गांवांत ता. १ जानेवारी रोजीं दुपारच्या वेळीं दोन्ही बाजूंच्या लोकांची मिळून फारच गर्दी झाली. इंग्लिशांचें पायदळ, घोडेस्वार, सामानसुमानाचे बैल आणि बाजारबुणगे लोक हे सगळे आधींच गांवांत शिरून राहिले होते व त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां पेशव्यांचे लोकहि दुसऱ्या बाजूनें गांवांत शिरले. इंग्लिशांच्यापाशीं दोन तोफा होत्या. त्या त्यांनीं पहिल्यानें भीमानदीच्या पात्रांतील पायउताराच्या वाटेच्या रोखानें डागून ठेवल्या


असईच्या
लढाईचा नकाशा
बोरगांव
सिपूरा
बाभुळगाव
असई
बोरकेरी
शिंगवाडी
टाकळी
कोडुली
वरूड
पिंपळगांव
खेळणा नदी
उ


( पान ३७ च्या पुढें. )

होत्या. पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. म्हणून त्यांनीं त्या गांवच्या तटबंदीच्या आंत आणून माऱ्याच्या जागीं ठेविल्या. इंग्लिशांचें सैन्य साऱ्या रात्रभर चालून अगदीं थकून गेलेले होते; व त्याला जी विश्रांति पाहिजे होती ती न मिळतां त्याला एकदम शत्रूच्या सैन्याशीं तोंड देणें भाग पडलें. दुपारच्या उन्हामुळें त्यांना त्या वेळीं अतिशय त्रास होत होता व ते लोक जरी तहानेनें व्याकुळ झालेले होते, तरी पेशव्यांच्या माऱ्याच्या भीतीनें भीमानदीच्या पाण्यावर जाणेंहि त्यांना त्या वेळीं शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें त्या कोरेगांवच्या लहानशा तटबंदीच्या आंतमध्ये इंग्लिशांचे इतके लोक भरले होते कीं, त्यांना आजूबाजूला फिरण्यालाही वाव मिळणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत त्यांच्या हातून तेथें लढण्याचें काम काय होणार ? आणि अशा अडचणीच्या जागेंत सापडलेल्या या इंग्लिश सैन्यावर हल्ला करण्याकरितां एक एक हजार अरबांची एक तुकडी, अशा एकंदर तीन तुकड्या चाल करून पुढे आल्या. या वेळीं त्या लहानशा जागेंत या उभय सैन्यामध्ये जे युद्ध झालें, तें केवळ संगिनीचें आणि तरवारीचेंच झालें. दुरून गोळी घालणें आणि लढाई करणें हे या ठिकाणीं शक्यच नव्हतें. इंग्लिशांच्या तोफांचा मारा मधून मधून चाललेला होता, पण त्यांच्या त्या दोन तोफांपैकीं एक तोफ पेशव्यांच्या लोकांनीं हल्ला चढवून काबीज केली, आणि त्या तोफेवरील मुख्य अधिकारी, लेफ्टनंट चिशोल्म, याला ठार मारण्यात येऊन त्याच्या धडापासून त्याचें डोकें कापून तें पेशव्यांकडे विजयाचें चिन्ह म्हणून पाठवून देण्यात आलें. त्याचप्रमाणें इंग्लिशांच्या बाजूकडील लेफ्टनंट स्वानस्टन आणि लेफ्टनंट कोनेलन व असिस्टंट सर्जन वुइंगेट यांना जबर जखमा लागल्या; म्हणून गावांत जी एक देवळाजवळची धर्मशाळा होती, त्या धर्मशाळेच्या इमारतींत त्या जखमी झालेल्या ऑफिसरांना नेऊन ठेवण्यात आलें; पण काही वेळानें ती धर्मशाळाहि पेशव्यांच्या लोकांनीं हस्तगत करून घेतली आणि तेथें जखमी होऊन पडलेले असिस्टंट सर्जन मि. वुइंगेट यांना ठार करण्यांत आलें; व बाकीच्या ऑफिसरांवरहि लवकरच तसाच प्रसंग येणार होता. पण कॅप्टन स्टॉटन यांनीं लगट करून ती धर्मशाळा फिरून आपल्या हस्तगत करून घेतली. या धर्मशाळेशिवाय गावामध्यें एक मजबूत गढी होती; ती आपल्या हस्तगत करून घ्यावी, ही गोष्ट इंग्लिशांच्या ध्यानांत न आल्यामुळें ती तशीच मोकळी राहिलेली होती. ती पेशव्यांच्या लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें त्यांना ती एक सुरक्षितपणाची चांगलीच जागा मिळाली. तेथून व इतर ठिकाणांहून पेशव्यांच्या लोकांनीं जेव्हां अतिशय नेट केला, तेव्हां इंग्लिशांचें सैन्य अगदीं जेरीस आलें; व पेशव्यांच्या सैन्यानें आपल्या शौर्याची इतकी शिकस्त केली होती आणि विजयश्री इतकी निश्चित केली होती कीं, मराठा सैन्याच्यापुढें यानंतर टिकाव धरणें अशक्य आहे असें ठरवून इंग्लिश सैन्यांतील युरोपियन लोक आणि नेटिव्ह लोक असे सर्वजण शरण येण्याला तयार झालेले होते ! परंतु त्या सैन्यांतील कमांडिंग ऑफिसर, कॅप्टन स्टॉटन, याला अद्यापि थोडीशी आशा होती; व म्हणून आपल्या लोकांनीं आशा न सोडतां असेंच काहीं वेळ टिकाव धरून रहावें, असा त्यानें आपल्या सैन्याला सल्ला दिला. त्यामुळें दोन्हीं सैन्यें पुढें तशींच लढत राहिलीं; पण त्या अडचणीच्या जागेंत इंग्लिशांच्या लोकांना ठिकठिकाणीं कोंडून आणि अडकवून ठेवण्यापेक्षा

दुसरें कांहीं करतां येणे पेशव्यांच्या सैन्याला शक्य नव्हतें. यामुळे इतकें कार्य करून आणि इंग्लिशांवर शरण येण्याइतकी पाळी आणून रात्रीं ९ वाजण्याच्या सुमारास पेशव्यांचें सैन्य आपल्या छावणीकडे येण्याकरितां परत निघालें. पेशव्यांचे सैन्य पलीकडच्या कांठावर परत गेल्यानंतर रात्रीच्या काळोखांत साऱ्या दिवसाच्या तान्हेलेल्या इंग्लिशांच्या त्या शिपायांना नदीचें पाणी प्यावयाला मिळालें! कारण पेशव्यांच्या सैन्यानें साऱ्या दिवसांत त्यांना पाणीदेखील मिळू दिलें नव्हतें!


अशा रीतीनें कॅप्टन स्टॉटन यांच्या हाताखालील लोकांचा पूर्णपणें पराभव करून दुसरे दिवशीं पेशव्यांचें सैन्य पुण्याकडे वळलें. व त्या सैन्याचा तळ लोणीकंद येथें येऊन पडला. कोरेगाव येथें पेशव्यांच्या सैन्याला जो जय मिळाला होता, त्याच्या योगानें त्या सैन्यांतील शिपायांच्या मनांत पुढील विजयाच्याहि आशा उत्पन्न झालेल्या होत्या; व कॅप्टन स्टॉटन हा आपले लोक त्या कोरेगांवच्या अडचणीच्या तटबंदींतून काढून लोणी-कंदच्या मोकळ्या मैदानावर घेऊन येईल, तर तेथें आपण त्याचा फिरून पुरा फन्ना उडवून टाकूं, अशीहि त्यांना खात्री वाटत होती. म्हणून त्यानें लोणीकडे यावें, यासाठीं त्याच्या-कडे कांहीं खोटे निरोप कित्येक हेरांच्या बरोबर पाठविण्यांत आले होते, असें म्हणतात. पुण्याला कर्नल बर वगैरे जे युरोपियन अधिकारी आहेत, ते तुमच्या मदतीची वाट पहात आहेत, आणि तुम्ही कोरेगांवाहून परत न जाता तसेंच पुढे लोणीकंदावरून पुण्यास यावें, असा निरोप सांगण्याकरितां त्यानीं आम्हांला गुप्त हेर म्हणून तुमचेकडे पाठविलें आहे, असें कॅप्टन स्टॉटन यांना सांगण्यांत येत होतें. हे हेर पेशव्यांकडून खोटे पाठविले गेलेले असोत, किंवा घाबरून गेलेल्या पुण्याच्या इंग्लिशांकडून खरोखरीचेच पाठविले गेलेले असोत, परंतु पेशव्याच्या सैन्यानें कोरेगाव येथें इंग्लिशांचा पराभव करून कॅप्टन स्टॉटन यांची इतकी दुर्दशा उडवून टाकली होती कीं, त्यांनी पुढें चाल करून पुण्याला येणें शक्यच नव्हतें. आणि म्हणून स्वाभाविकपणेंच त्यांनीं शिरूर येथें परत जाण्याचा बेत ठरविला. कारण, या कोरेगांवच्या आपल्या पराभवाच्या विपत्तीमध्ये आपल्याला कोणी मदतीला येईल, अशी त्यांना कांहीं एक आशा दिसेना. पेशव्यांचें एवढे मोठें अवाढव्य सैन्य वाटेंत लोणीकंद येथें तळ देऊन पडलेलें असतांना पुण्याहून कॅप्टन स्टॉटन याच्या मदतीला कोणी येणें शक्यच नव्हतें. बाकी येऊन जाऊन आशा काय ती ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या हाता-खालील सैन्याची. पण इकडे कोरेगांवास इंग्लिशाच्या सैन्यावर इतका कहर गुजरत अस-तांना तें सैन्य कोठें आहे याची कॅप्टन स्टॉटन याना कांहीं एक बातमी नव्हती; मग त्या सैन्याच्या मदतीची गोष्ट तर लांबच राहिली. जनरल स्मिथ याचें सैन्य संगमनेराहून पेश-व्यांचा पाठलाग करीत जे निघालें, त्याला ओझरच्या घाटाच्या डोंगरांतून त्रिंबकजी डेंगळ्या-च्या रामोशांनीं इतकें सतावून सोडलें होतें कीं, त्या डोंगरातून येतांना स्मिथसाहेबाचे बरेच दिवस मोडले; आणि कोरेगावच्या लढाईंत इंग्लिशांचे सैन्य ता. १ जानेवारी रोजीं नामो-हरम होऊन गेल्यानंतर मग दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २ जानेवारी रोजीं, स्मिथसाहेबाच्या हाताखालील फोर्थ डिव्हिजनचे लोक जेमतेम चाकण मुक्कामीं येऊन पोंचले. पण आतां त्यांच्या या उशीरां येण्याचा कॅप्टन स्टॉटन याना कांहीं उपयोगहि नव्हता व तें आले

आहेत हें त्यांना माहीतहि नव्हतें. अशा स्थितींत आपले जखमी झालेले लोक घेऊन आल्या वाटेनें शिरूरला परत जाण्याशिवाय कॅप्टन स्टॉटन यांना दुसरा मार्गच उरलेला नव्हता; व त्याप्रमाणें ते ता. २ रोजीं रात्रीं निघून शिरूरला परत गेले.

येणेप्रमाणें या कोरेगांवच्या लढाईची हकीकत आहे. खडकीच्या लढाईंत दोन्ही सैन्यांची बरोबरीची लढाई झाली, व येरवड्याच्या लढाईंत येरवड्याच्या टेकडीवर जेथें इंग्लिशांच्या तोफा होत्या, त्या टेकडीवरहि पेशव्यांचें सैन्य चढून गेलें होतें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे; पण या कोरेगांवच्या लढाईंत तर पेशव्यांच्या सैन्यानें इंग्लिश सैन्याचा पुराच पराभव करून टाकला! इंग्लिशांच्या बाजूच्या सुमारें ८ शें लोकांपैकीं २७५ लोक या लढाईंत मारले गेले. यावरून पेशव्यांच्या सैन्यानें मिळविलेल्या विजयाची कोणालाहि योग्य कल्पना करतां येण्यासारखी आहे. अशी जरी खरी वस्तुस्थिति आहे, तरी या कोरेगांवच्या लढाईंतहि आमचाच जय झाला, असें इंग्लिश इतिहासकार लोकांना सांगण्याला यत्किंचित्हि कचरत नाहींत! व कोरेगांवच्या समोरच्या बाजूला भीमा नदीच्या उजव्या कांठावर आपल्या या जयाची निशाणी म्हणून ब्रिटिश सरकारनें १८२२ मध्यें एक जयस्तंभहि उभारलेला असून त्याच्यावर ज्या अनेक गोष्टी लिहिलेल्या आहेत, त्यांमध्यें One of the proudest triumphs of the British Army in the East ( म्हणजे, पूर्वेकडील देशांत ब्रिटिश सैन्याला जे अनेक विजय मिळाले आहेत, त्यांमध्यें अतिशय गर्व वहाण्यासारखा हा एक विजय आहे! ) असेंहि लिहिण्यांत आलेलें आहे! ब्रिटिश सैन्य इतक्या धडधडीत रीतीनें येथें नामोहरम झालेलें असतांना देखील अतिशय गर्व वाहण्यासारखा हा विजय होता, असें म्हणून इंग्लिशांकडून जयस्तंभ उभारिले जातात, यावरून पूर्वींचे खोटे इतिहास कसे बनविण्यांत आलेले आहेत, याच्याबद्दलची कल्पना कोणालाहि येण्यासारखी आहे!

# अष्ट्याची लढाई.

ता. १ जानेवारी १८१८ रोजीं कोरेगांव येथें इंग्लिशांच्या सैन्याचा पेशव्यांच्या लष्करानें पराभव केल्यानंतर 'श्रीमंतांच्या फौजेपैकीं दहा पांच हजार फौज नारो विष्णु आपटे घेऊन वाघोलीपावेतों आले. तेव्हां पुण्यामध्यें इंग्रज यांची पळण्याची तयारी झाली' असें बखरकारांनीं लिहिलें आहे. वाघोली हें गांव पुण्यापासून फक्त २।३ कोसांवरच आहे; आणि कोरेगांवास इंग्लिशांवर विजय मिळविलेल्या मराठ्यांच्या फौजेपैकीं दहापाच हजार फौज नारोपंत आपटे यांच्या हाताखालीं पुण्याच्या रोखानें येत असलेली ऐकून पुण्यांतील इंग्रज लोकांची गाळण उडावी आणि त्यांनीं पळण्याची तयारी करावी, हें अगदीं स्वाभाविक होतें. परंतु पेशव्यांच्या कांहीं फौजा जरी लोणीकंद आणि वाघोली येथपर्यंत येऊन पोंचलेल्या होत्या, तरी पेशव्यांची मुख्य फौज कोरेगांवाहून राजेवाडीच्या मुक्कामाकडे गेली व तेथून पेशव्यांनीं आपला मोर्चा साताऱ्याकडे वळविला. याच्यापूर्वी सातारच्या राजांना वासोट्याच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आलेलें होतें. पण पुढें त्यांना तेथून आणवून पेशव्यांनीं आपल्याबरोबर घेतलें होतें व त्यांना आपल्या स्वारींत आपल्याबरोबर घेऊन पेशवे कूच करीत असत. साताऱ्याहून श्रीमंतांची स्वारी निघाली, ती कर्नाटकामध्यें शिरली व तेथून त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रयाणें केलीं. या वेळीं इंग्लिश सैन्याच्या निरनिराळ्या टोळ्या त्यांचा पाठलाग करीत होत्या; पण त्या सगळ्या पाठलागांत इंग्लिशांना कोठेंही म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. पेशव्याच्या सैन्यापैकीं कांहीं सैन्य इंग्रजी लष्कराच्यापुढें दोनतीन कोसांवर असे; आणि कांहीं सैन्य त्यांच्या लष्कराच्या पाठीमागें दोनतीन कोसांवर असे. अशा रीतीनें पेशव्यांच्या दोन सैन्यांच्या कचाटीमध्यें बहुतेक वेळां इंग्लिशांचें सैन्य सांपडलेलें असे. त्यामुळें त्यांना फारसें कांहीं करतां येत नसे. परंतु अशा रीतीने जरी पेशव्यांचें सैन्य बाजीरावसाहेबांचें संरक्षण करीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं कूच करीत असे, तरी त्यांनीं अशा या निरर्थक प्रयत्नामध्यें तरी किती दिवस काढावयाचे ? त्याना असल्या या भुरट्या लढायांचा अखेरीस अखेरीस कंटाळा येऊं लागला व एकदां इंग्रजाला कोठें तरी गांठून त्याच्याशीं एखादी मोठी लढाई द्यावी, असें पेशव्यांच्या सर्व सरदारांना वाटूं लागलें. निपाणीजवळ ही लढाई द्यावी, असें एकदां त्यांनीं ठरविलें. पण ठरलेल्या वेळीं त्या ठिकाणीं सगळीकडच्या मराठी सैन्याची जमवाजमव झाली नाहीं, म्हणून निपाणीचा बेत रहित करण्यांत आला. पुढें फेब्रुवारी महिन्यांत सोलापूरनजीक कोठें तरी हा लढाईचा बेत जुळवून आणावा, असें ठरविण्यात आलें. बापू गोखले यांच्या चरित्रात याबद्दलची हकीगत दिलेली आहे ती अशी कीं, "शेवटील प्रसंगीं सर्व सरदारांचा बेत असा ठरला होता कीं, सोलापूर येथें




## कोरेगांवच्या लढाईतील सैन्याच्या हालचालींचें वर्णन.

१ १ १ १ भीमेच्या उजव्या कांठावरील पेशव्यांची छावणी.

२ कोरेगांवच्या लढाईचे वेळीं बाजीराव पेशवे व सातारचे राजे जेथें लढाई पहात होते ती जागा व जरीपटक्याचें निशाण.

३ शिरूरहून येणाऱ्या इंग्लिशांच्या सैन्यानें पेशव्यांचें सैन्य जेथून पहिल्यानें पाहिलें ती जागा.

४ पेशव्यांचे घोडेस्वार भीमा नदी उतरून कोरेगांवाकडे जाऊं लागले असतां त्यांना अडविण्याकरितां इंग्लिश घोडेस्वार जेथें येऊन उभे राहिले ती जागा.

५ भीमा नदीच्या डाव्या कांठावर इंग्लिशांची पलटण येऊन जेथून त्या पलटणानें पलीकडच्या कांठावरील पेशव्याच्या घोडेस्वारांवर आपल्या दोन तोफा चालू केल्या ती जागा.

६ आपल्या घोड्यांवरून उतरून इंग्लिशांच्या घोडेस्वारांनीं कोरेगांवांत जी जागा काबीज करून घेतली ती जागा.

७ जेथें इंग्लिशांचें सामानसुमान आणि बाजारबुणगे आश्रय घेऊन राहिले होते ती जागा.

८ ९ गांवांत आणून लावलेल्या इंग्लिशांच्या तोफांची जागा.

१० १० १० कोरेगांवच्या सभोंवती वेढा घालून राहिलेलें पेशव्यांचें पायदळ
१० १० १० आणि घोडेस्वार.

११ कोरेगांवांवर ठिकठिकाणीं आश्रय धरून राहिलेल्या इंग्लिश फौजेंतील लोकांना त्या त्या ठिकाणांमधून हुसकून लावून पेशव्यांच्या अरबांनीं आपल्या ताब्यांत घेतलेली कोरेगांवची गढी.

१२ इंग्लिशांचे जखमी झालेले ऑफिसर आणि शिपाई व त्यांची एक तोफ पेशव्यांच्या अरबांनीं जेथें काबीज करून घेतली ती जागा.

( पान ४० च्या पुढें. )

इंग्रेजांशीं मोठी लढाई द्यावी. सरदारास पळण्याचा फारच कंटाळा आला होता. त्या बेता-प्रमाणें पानशांचा तोफखाना सोलापुरीं रवाना झाला होता. पटवर्धनमंडळीहि सोलापुरास आली होती. बापू गोखल्यांजवळच्या, गोसाव्यांच्या व अरबांच्या पलटणी सर्व तयार होऊन राहिल्या. ही लढाई झाली असती, तर इंग्रेजांस कदाचित् तोंड मागें फिरविणें भाग पडलें असतें. कारण, या वेळीं लढाईची सर्व तयारीच मोठी विलक्षण होऊन राहिली होती." परंतु हा सोलापुरच्या लढाईचाही योग जुळून आला नाहीं. बाजीरावसाहेबांचा मुक्काम तेथून हालला आणि ता. १९ फेब्रवारी १८१८ या दिवशीं संध्याकाळीं त्यांचा मुक्काम पंढरपुरजवळील गोपाळाची अष्टी या गांवीं येऊन पडला. ब्रिगेडियर जनरल स्मिथ यांच्या हाताखालील फोर्थ डिव्हिजनमधील लष्कर पेशव्यांचा पाठलाग करीत मागाहून येतच होतें. तें ता. २० फेब्रुवारी रोजीं सकाळीं पेशव्यांच्या सैन्यापासून दोनतीन कोसांच्या अंतरावर येऊन पोचलें असतां पेशव्यांच्या छावणींतील नगारे वाजत असलेले त्यांना ऐकूं आले. व आतां पेश-व्यांचें सैन्य अगदीं जवळ असलें पाहिजे, असें जाणून जनरल स्मिथ यानें लढाई करण्याचा निश्चय केला. बापू गोखल्यांच्या बातमीदारांनीं इंग्रजांचें लष्कर अगदीं जवळ येऊन ठेपलें आहे, ही बातमी बापू गोखल्यांना सांगितली. पण ही बातमी कळते आहे तोंच इंग्लि-शांच्या लष्करातील तोफाचे आवाजही पेशव्यांच्या सैन्यांतील लोकांना ऐकूं येऊं लागले. "इंग्रेज मागें वेळापुरास होते. तेथून ते रात्रीं आष्टीस पंधरा कोश दूर मुक्कामास येणार म्हणून बातमी होती. बापू गोखल्याचे गुप्त बातमीदार होते. त्यांनीं इंग्रेज वेळापुराहून निघाल्याचा मजकूर कळविला व दुसरे दिवशीं सकाळीं सहा घटका दिवसाचे सुमारास दोन स्वार बापू गोखले यांजकडे दौडत येऊन त्यांनीं बातमी सांगितली कीं, इंग्रज नजीक आले आहेत." अशी या प्रसंगाबद्दलची हकीगत बापू गोखले यांच्या चरित्रामध्यें दिलेली आहे.

"शके १७३९ माघ शु॥ १४ रोजीं रात्रीं सातारच्या राजाचीं मुलें बरोबर घेऊन गोपाळाचे अष्टीवर श्रीमंत बाजीरावसाहेब मुक्कामाला आले होते. बापू गोखले व त्यांची स्त्री यमुनाबाई व सातारचे राजे व त्यांचे विठ्ठलपंत दिवाण हे बाजीरावसाहेबाबरोबर होते; आणि रामचंद्रपंत सुभेदार व कांहीं स्वार मागें होते. पौर्णिमेच्या दिवशीं प्रातःकाळ होण्याच्या पूर्वी जेवणाचा बेत उरकून श्रीमंतांचा पुढें जाण्याचा विचार होता. पण ब्रिगेडियर जनरल स्मिथ यांची जी टोळी चाल करून येत असल्याबद्दलची बातमी होती, त्या टोळींतील तोफेच्या आवाजांचा कानोसा दोन कोसांवरून ऐकूं आला. तो ऐकून श्रीमंतांजवळ बापू गेले आणि म्हणाले-कीं, आपण आजपर्यंत पळत आलों, परंतु आतां पळूं नये असें मनात आहे. बाजीरावसाहेबांनीं गोखल्यांचा तिरस्कार केला, आणि म्हणाले कीं, लढाईची मसलत तुम्हीं दिलीत आणि आतां त्यामुळें आमच्या जेवण्याखाण्यास देखील हरकत पडते. तें ऐकून बापूस राग येऊन ते म्हणाले कीं, आपली जरी लढाईची संमति नसली, तरी मी लढाई देणार. इतके बोलून बापू आपल्या गोटात येऊन त्यानीं तयारी करण्याचा हुकूम दिला." अशा प्रकारची या प्रसंगाची हकीगत कै. शंकर तुकाराम शाळिग्राम यांनीं तयार केलेल्या बापू गोखल्यांच्या चरित्रामध्यें दिलेली आहे. व या हकीकतीमध्ये बाजीरावसाहेबांच्या वर्तनावर आक्षेप घेतां येईल, असे कांहीं उल्लेख आलेले आहेत. कै. शाळिग्राम यांनीं आपल्या ह्या पुस्तकामध्यें बाजीरावसाहेबांच्या

बद्दलच्या कित्येक निराधार आक्षेपांचें स्वतःच खंडण केलें आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां यावयाची नाहीं. पण बाजीरावसाहेबांच्या संबंधानें इंग्लिश लोकांनीं आणि लेखकांनीं आणि त्यांना फितुर झालेल्या अशा आपल्याही कित्येक निमकहराम लोकांनीं इतके खोटे आक्षेप पसरवून ठेविले आहेत कीं, त्यामुळें आपला बाजीराव हा आपल्या लोकांनाहि एक अतिशय दुष्ट माणूस आहे, असें वाटूं लागलें होतें.

इंग्लिश मुत्सद्दयांची ही वहिवाटच आहे कीं,आपल्या शत्रूचें चित्र ते नेहमीं अतिशय काळ्या-कुट्ट रंगामध्यें काढीत असतात. आणि अशा रीतीनें आपल्या शत्रूला पुढें प्रत्यक्ष शस्त्रांनीं पराजित करण्याच्या आधीं त्यांनीं त्याला लोकमताच्या नैतिक दृष्टीनें अगदीं अधःपतनाला नेऊन पोंचविलेलें असतें. हिंदुस्थानांत बाजीराव हा १८१७ पासून इंग्लिशांपाशीं युद्ध कर-ण्याला उभा राहिला. त्याच्या पूर्वी कांहीं वर्षे युरोपखंडामध्यें नेपोलियन हा इंग्लिशांना एक अतिशय प्रबळ शत्रु उत्पन्न झालेला होता. त्याच्यासंबंधानें इंग्लिशांनीं इंग्लंडमध्यें किती नालस्ती चालविली होती आणि त्याच्या विरुद्ध त्यांनीं किती खोट्या कंड्या उठविल्या होत्या आणि किती असभ्य लेख प्रसिद्ध केले होते, याबद्दलची माहिती इंग्रजी इतिहास वाच-णारांना सांगितली पाहिजे असें नाहीं. आणि तीच पद्धत इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत अंमलांत आणिली होती. सर आर्थर वेलस्ली यालाच पुढे ड्यूक ऑफ वेलिंग्टन हा किताब मिळाला. हे साहेब हिंदुस्थानांत अधिकारावर असतांना आपल्या प्रतिपक्षाची निराधार नालस्ती, अन्तर्द्रोह, वगैरे पाश्चात्य देशांतील मॅकिआव्हेलियन मार्गांचा हे पूर्णपणें उपयोग करीत असत. व असें करण्यांत कांहीं नैतिक कमीपणा आहे असेंही त्यांना वाटत नसे, असें त्यांच्या बद्दलचें मत कित्येक ग्रंथकारांनीं स्पष्टपणें व्यक्त केलेलें आहे. (Sir Arthur Wellesly, as the Duke of Wellington then was, advised his Co-religionists to practise treachery in their dealings with their ally the Peishwa. To raise traitors in the camp of the Peishwa was the policy that he urged his countrymen to adopt.-Major B. D. Basu.) आणि अशा प्रवृत्तीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हाताखालीं एल्फिन्स्टन साहेबासारखा रेसिडेन्ट पुण्याला मिळाल्यानंतर मग तर पुण्यामध्यें या खोडसाळपणाच्या बातम्यांना आणि फंदफितुरीला इतका ऊत आला, याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. The ministers of the Peishwa were to be bribed in order to betray their master. This was a counsel of perfection, which was out-machiavelling Machiavelli himself. (Major Basu). हें जें वरून आलेलें धोरण होतें, तें सर बॅरी क्लोज हे पुण्याचे रेसिडेन्ट होते, तोंपर्यंत अमलांत येऊं शकलें नाहीं. आणि तोंपर्यंत बाजीराव हा एक वाईट राजा होऊंही शकला नव्हता ! परंतु सर बॅरी क्लोज यांच्या पाठीमागून मि. एल्फिन्स्टन हे पुण्याचे रेसिडेन्ट झाल्याबरोबर पुण्यांतील सगळें गाडें बदललें. बाजीराव इतके दिवसपर्यंत जो एक साधारणपणें चांगला राजा होता, तो अतिशय बदमाष म्हणून पुण्यांतील लोकांना दिसूं लागला ! युरोपांतील मॅकिआव्हेलीचे कुटिल राजनीतीचे मार्ग मि. एल्फिन्स्टन

यांनीं पुण्यांत फार जारोनें सुरू केले. इंग्रजी पैसा जिकडेतिकडे पेरण्यांत आला; चाहड्या सांगणारे हरामखोर लोक स्वामिनिष्ठ लोकांमधूनहि आढळून येऊं लागले; पेशव्यांच्या-कडच्या गुप्त बातम्या बेंग्रवरच्या बंगल्यांत कळूं लागल्या; आणि बाजीरावाच्या दुर्गुणांच्या राईचे पर्वत होऊं लागले! The objects, for which the East India Company used to appoint Residents at the Courts of Indian princes, were to foment intrigues and domestic dissensions and thus to pave the way for the ultimate absorption of those principalities. या वाक्यांत मेजर बसू यांनीं हें उघडपणें सांगितलें आहे कीं, ईस्ट इंडिया कंपनी ही त्या वेळीं इंडियन राजांच्या दरबारामध्यें आपले रेसिडेन्ट ठेवीत असे; त्यांतील हेतुच हा होता कीं, त्या रेसिडेन्टांनीं त्या त्या राजांच्या संस्थानांतून गुप्त कारस्थानें सुरू करावींत, अन्तःकलह पेटवून द्यावेत आणि अशा रीतीनें तीं संस्थानें इंग्लिशांच्या घशांत उतरण्याचा मार्ग सुलभ करून ठेवण्यांत यावा! आणि हा हेतु मि. एल्फिन्स्टन यांच्या हातून पुण्यांतील कित्येक सद्गृहस्थांच्या मदतीनें किती उत्कृष्ट रीतीनें शेवटास गेला, हें महाराष्ट्रांतील लोकांना सांगितलें पाहिजे असें नाहीं. मि. एल्फिन्स्टन हे या कामांत सर आर्थर वेलस्ली यांच्या हाताखालीं खास शिक्षण घेऊन आधींपासूनच तयार झालेले होते. कारण, दुसऱ्या मराठा वॉरमध्यें सर आर्थर वेलस्ली यांच्या स्टाफवर मि. एल्फिन्स्टन हे कित्येक दिवस काम करीत होते. व त्या प्रसंगानें वेलस्लीसाहेबांचे राजकारस्थानांतील सगळे डावपेच त्यांना माहीत झालेले होते. या शाळेंत त्यांनीं हें प्रावीण्य संपादन केल्यानंतर मि. एल्फिन्स्टन यांची नागपूरच्या रेसिडेन्टच्या जागीं नेमणूक करण्यांत आली होती. मि. एल्फिन्स्टन हे नागपूरचे रेसिडेन्ट असतांना तेथील बातम्या काढण्याकरितां काय काय युक्त्या कराव्या याच्याबद्दल सर आर्थर वेलस्ली यांनीं त्यांना लिहिलेल्या एका पत्रांतील पुढें दिलेला उतारा मराठी वाचकांना बोधप्रद झाल्यावांचून राहाणार नाहीं.

I beg you will do whatever you think necessary to procure intelligence. If you think that Jye Kishen Ram will procure it for you or give it to you, promise to recommend him to the Governor-General, and write to His Excellency on the subject. हें उघडकीस आलेलें एक उदाहरण आहे. पण उघडकीस न आलेलीं अशीं असल्या प्रकारचीं इंग्रजी कारस्थानांचीं उदाहरणें आणखी किती तरी गुप्त असतील! असलीं कृष्णकारस्थानांचीं कामें नागपुरांत करून करून आपल्या स्वभावांतील सगळा चांगुलपणा बिघडून गेला असल्याची साक्ष खुद्द मि. एल्फिन्स्टन हेच आपल्या एका पत्रामध्यें पुढीलप्रमाणें देत आहेत. "Since I came to Nagpur, I have been dreadfully coarse and unfeeling. This I attribute in some measure to business, which forces and leads me to despise refined thought."

इतक्या सर्व पूर्व-संस्कारांनीं कपटनीतिमध्यें सुशिक्षित झालेले मि. एल्फिन्स्टन हे जेव्हां पुण्याला रेसिडेंट म्हणून लाभले, तेव्हां पूर्वींपासून आंखलेलीं सर्व कारस्थानें फलद्रूप होऊं लागलीं. सर आर्थर वेलस्ली आणि मि. एल्फिन्स्टन या जोडीची ही कारस्थान-कुशलता लक्षांत घेतली असतां यांनीं बाजीरावाच्या विरुद्ध काय काय केलें नसेल, याची बरोबर कल्पना येणें शक्य नाहीं. बाजीरावाच्या अंगांत कांहीं थोडेबहुत दुर्गुण नसतील, असें आम्ही. कारण सर्वगुणसंपन्न असा मनुष्य सांपडणें सहसा कठिण असतें. परंतु बाजीराव हा सर्व दुर्गुणांचा पुतळा होता, असें जें चित्र आज आपल्यामधील अनेक लोकांच्या डोळ्यांपुढें अजूनही शिल्लक राहिलेलें आहे, तें कपटी आणि कारस्थानी अशा इंग्लिशांनीं काढलेलें चित्र आहे, हें आपण विसरतां कामा नये. व असल्या खोट्या कंड्यांवर आणि निराधार दुर्गुणांवर विश्वास ठेवतांना आपण फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. ग्रँट डफ यानें लिहिलेल्या आपल्या मराठ्यांच्या इतिहासामध्यें त्यानें कित्येक धडधडीत खोट्या गोष्टी घातल्या आहेत. आणि आपला इतिहास लिहून झाल्यानंतर जुने सगळे कागदपत्र त्यानें जाळून टाकले आहेत. हा इंग्लिशांच्या इतिहासदेवतेच्या सत्यपणाबद्दलचा पूर्व इतिहास आहे. तेव्हां असल्या इंग्लिश इतिहासकारांनीं आपल्या संबंधानें केलेल्या खोट्या विधानांवर आपण केव्हांही भरंवसा ठेवतां कामा नये. आपल्यांतील कित्येक जुने कागदपत्र हल्लीं नवीन उघडकीस येत आहेत. आणि त्यांवरून पाहतां बाजीरावाचें स्वभावचित्र इंग्लिशांनीं रंगविलेल्या चित्रापेक्षां भिन्न असलें पाहिजे, असें दिसून येतें.

अष्टयाच्या लढाईच्या दिवशीं सकाळीं जो प्रसंग घडून आल्याबद्दलची हकीकत कै० शाळिग्राम यांनीं लिहिलेल्या बापू गोखल्यांच्या चरित्रांतून वर दिलेली आहे, ती बाजी-रावाची नालस्ती करणाऱ्या अशा इंग्लिशांनीं पसरविलेल्या खोट्या कल्पनांनीं कलुषित झालेल्या बातम्यांच्या आधारावर रचलेली असली पाहिजे, असें दिसतें. हल्लीं रा. गोविंद विनायक आपटे यांनीं ' गोखले घराण्याचा इतिहास ' म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे; व त्यांत बापू गोखल्यांच्या संबंधाची बरीच हकीकत समाविष्ट करण्यांत आलेली आहे. त्यांत या अष्टयाच्या लढाईच्या याच प्रसंगासंबंधानें जुन्या विश्वसनीय अशा एका पाच्छापुर-करांच्या बखरीवरून त्यांनीं जी हकीकत दिली आहे, ती शाळिग्राम यांच्या हकीकती-पेक्षां बाजीरावसाहेबांच्या स्वभावचित्राच्या बाबतींत बरीच भिन्न दिसते. ती हकीकत येणें-प्रमाणें:—" श्रीमंतांनीं पंढरपुरचा बंदोबस्त करून परांडयाच्या रोखें कूच केलें व अष्टे गांवा-जवळ मुक्काम झाला. स्मिथ साहेब दोन तीन दिवसांत येणार ही बातमी कळतांच श्रीमंतांनीं रात्रीं कूच करावें असें गोखल्यांच्या विचारानें ठरलें. पण आप्पासाहेब देसाई सरलष्कर यांनीं दुसरे दिवशीं पौर्णिमेचें स्नान व भोजन करून जाणेंविषयीं आग्रह केला, व त्या दिवशीं छापा आल्यास आपण संभाळूं अशी हमी दिली. हें ऐकून गोखले चिंताग्रस्त झाले. सरदार मंडळी गोखल्यांचें तर ऐकत नव्हतीच, पण श्रीमंतांस बदसल्ला देत असत. अशी स्थिति असतां लढाई संपल्यावर मागें कांहींही होवो, असा विचार करून गोखले स्वस्थ होते. चतुर्दशीस दुपारीं कूचनगारा होऊन फौज पराडयाच्या रोखें गेली. गोखलेही तयार झाले. सूर्योदयीं श्रीमंत भोजनास बसले असतां छापा आला. गोखल्यांनीं सरलष्कर यांस बोलविणें

पाठविलें, व आपण श्रीमंतांकडे गेले व छापा आल्याचें कळविलें. मध्यरात्रीं कूच करणेंचा बेत निपाणीकर सरलष्करांच्या सल्लयानें रहित केला. न जेवतां जावें तर अधीर व बेसावध म्हणतील इत्यादि विचारानें श्रीमंत त्रस्त झाले. उत्तर देतांना गोखले यांस कठोरपणें बोलले कीं, " आपण शूर, सावध व कुशल हें जाणून तुमच्यावर आम्ही विश्वास ठेऊन बेफिकीर असावें. तों आपण नेहमीं निष्काळजीनें वागून आयतेवेळीं गडबड करावी. " हें ऐकून गोखल्यांनीं उत्तर केलें कीं, दुसऱ्यांचें ऐकून कालचा बेत बिघडविला व आमच्यावर आतां रोष झाला. सेवकांवर स्वामीची गैरमर्जी झाली असतां त्यानें लढाईत स्वामिकार्यी मरावें किंवा जय संपादून त्यास भेटावें हेंच योग्य. तेव्हां आपण भोजन सावकाश करून निघावें; आपलें चरणदर्शन पुनरपि होईल तर ठीकच, नाहीं तर हेंच शेवटचें. " असें बोलून नमस्कार केला व श्रीमारुतीचें स्मरण करीत निघाले. तों सरलष्कर " फौज घेऊन येतों सांगा " असें बोलून झाडयास गेल्याचें कळलें. "

वरील हकीकत देऊन रा. आपटे हे आपल्या पुस्तकांत बाजीरावाच्या स्वभावासंबंधानें एकंदर हकीकतीचें पर्यालोचन करून असें म्हणतात कीं, " शेवटचे बाजीराव पेशवे शूर नव्हते म्हणणें अगदीं मूर्खपणाचें होईल. ते शूर होते;व भित्रे तर नव्हतेच. रणसंग्रामामधून निघून जाण्याबद्दल बापूंनीं कित्येक वेळां श्रीमंतांचीं आर्जवें केलीं, परंतु तें न ऐकतां श्रीमंत लढाईमध्यें बापूंच्या जवळ सारखे असत. बापूंचें म्हणणें ' दहांचा पोशिंदा असावा ' म्हणून वेळोवेळीं बापूसाहेबच श्रीमंत बाजीरावसाहेब यांना लढाईतून दूर राहण्याबद्दल आग्रह करीत होते. " पाच्छापरकरांच्या बखरींतील वर दिलेल्या लांबलचक उताऱ्यांतलि "न जेवतां जावें तर अधीर व बेसावध म्हणतील," हें बाजीरावाच्या विचाराचें द्योतक असें एक लहानसेंच वाक्य आहे. पण या एका लहानशा वाक्यामध्येंही बाजीरावसाहेबांच्या व्यापक अंतःकरणाचें एक सुंदर प्रतिबिंब पडलेलें आपल्याला दिसत आहे. आणि जेवणासारख्या साध्या गोष्टीच्या बाबतींत देखील ज्यांच्या मनांत इतके सूक्ष्म विचार घोळत होते, त्यांच्या एकंदर मनाची कल्पना यावरून येण्यासारखी आहे. असें असतां व आपल्याला चांगले राजे लाभलेले असतांही त्यांचीं स्वभावचित्रें इंग्लिश मुत्सद्द्यांनीं स्वतःच्या राजकीय हेतूंसाठीं जीं काळींकुट्ट करून टाकलेलीं आहेत, तींच आपण खरीं मानीत आहों, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. आपल्या राजांना वाईट ठरवावयाचें आणि त्यांच्या नोकरांना फितूर करावयाचें,हा गेल्या शतकांतील इंग्लिश मुत्सद्द्यांचा एक धंदाच होऊन बसलेला होता. व इंग्लिशांनीं पसरलेल्या या मायावी जाळ्यामध्यें त्या वेळीं आपल्यापैकीं थोडेथोडके लोक सांपडले होते, असें नाहीं. तरी पण त्यांमध्येंही कांहीं स्पृहणीय अपवाद सांपडण्यासारखे नाहींत, असें नाहीं. पेशव्यांच्या सरदारांना फितूर करण्याचा इंग्लिशांनीं जो सर्रास सपाटा चालविला होता, त्यांत त्यांनीं आपलें जाळें खुद्द बापू गोखले यांच्यावरही मोठ्या युक्तीनें टाकण्याला कमी केलें नव्हतें. ती सभ्यपणाची इंग्रजी युक्ति कशी होती, आणि त्या इंग्रजी आमिषाला न फसतां बापू गोखले यांनीं इंग्रजांना काय सणसणीत उत्तर दिलें, याचें अतिशय चित्ताकर्षक असें चित्र वर निर्दिष्ट केलेल्या पाच्छापुरकरांच्या बखरींमध्यें पहावयाला सांपडतें. त्याचें वर्णन सदर बखरींमध्यें आहे तें असें:—

" कंपनी सरकारशीं श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं तैनाती फौजेच्या पद्धतीप्रमाणें तह केला होता; पण कंपनीचें असह्य दडपण सहन करणें अशक्य झाल्यामुळें सरदारमंडळीचा सल्ला घेऊन लढाई देण्याचें ठरविलें. त्या वेळीं लिंगो भगवान नांवाचा वकील बापू गोखल्यांचे-कडे आला. त्यानें इंग्रजांचें ' तुम्ही पेशव्यांचे नोकरीस लागलां, त्या वेळीं आम्ही आपल्या-संबंधीं खातरजमा दिली होती, ही गोष्ट न विसरता आमची दोस्ती ओळखून हल्लींच्या प्रसंगीं वागावें, ' इत्यादि म्हणणें कळविलें. या फितुरीच्या निरोपास बापूंचें उत्तर असें होतें कीं, ' तुम्ही खातरजमा दिली ही गोष्ट खरी; पण आज मी आपल्या म्हणण्याप्रमाणें वागल्यास आपणासच बरें; व शिवाय मला हरामपणा येईल. नोकरानें केव्हांहि इमानानें वागलें पाहिजे. आपण मला दौलत द्याल, पण स्वामिद्रोहानें लोकापवाद तर येईलच; शिवाय नीतिदृष्ट्या अधःपात होऊन परमेश्वराजवळ मी गुन्हेगार ठरेन. स्वामिकार्यांत प्राण गेल्यासहि हरकत नाहीं, पण माझ्या हातून आपण म्हणतां तसें होणें शक्य नाहीं. "

वर दिलेल्या सर्व हकीकतीवरून आपल्या प्रतिपक्षाची नालस्ती करण्याच्या कामांत आणि आपल्या प्रतिपक्षाकडील लोकांमध्यें फितुरी उत्पन्न करण्याच्या कामात इंग्लिशांचे कसे प्रयत्न चाललेले होते, हें लक्षात येण्यासारखें आहे. पण या प्रयत्नाना न जुमानतां बापू गोखले हे अष्ट्याच्या लढाईंत मरण पावेपर्यंत आपल्या धन्यापाशीं एकनिष्ठ राहिले. अष्ट्याच्या लढाईंत त्यांचा अंत झाला, ही अतिशय वाईट गोष्ट झाली. कारण, त्यामुळें बाजीरावाच्या जवळ जे कांहीं खरें लष्करी सामर्थ्य होतें, तें तेव्हापासून नष्ट झालें व पुढें बाजीरावसाहेब हे फार दिवस टिकाव धरूं शकले नाहीत. अष्ट्याच्या लढाईंत बापू गोखले यांनीं आपल्या युद्धकौशल्याची आणि शौर्याची शिकस्त केली. पण या गुणाचा दुर्दैवानें त्या लढाईंत कांहीं उपयोग झाला नाहीं. ता. २० फेब्रुवारी १८१८ रोजीं सकाळीं प्रहर दिवसाचे सुमारास अष्ट्याच्या लढाईला सुरवात झाली. ब्रिगेडियर जनरल स्मिथ ह्याच्या हाताखालील लष्कर शेजारच्या टेकडीवरून अष्ट्याच्या खोऱ्यामध्ये सकाळीं प्रहर दिवसाच्या सुमाराला उतरूं लागलें होतें. तें सैन्य अशा रीतीनें कूच करून डोंगरावरून खालीं उतरत असता २२ व्या ड्रगून पलटणीच्या दोन टोळ्या मध्यमार्गी चालल्या होत्या; त्याच्या उजव्या हाताला मद्रासची ७ वी नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण आणि डाव्या हाताला २ री घोडेस्वारांची नेटिव्ह पलटण चाललेली होती; आणि या सैन्याच्या तीन रांगाच्या बाहेरच्या उजव्या बाजूला कॅप्टन पिअर्स आणि डाव्या बाजूला कॅप्टन स्मिथ यांच्या हाताखालीं घोड्यावरील तोफखाना चालविण्यात आलेला होता. सैन्याच्या रांगा अशा क्रमानें कूच करीत जाऊन शत्रु जवळ आला म्हणजे प्रत्यक्ष लढाईला सोईस्कर अशी सैन्याची रचना बदलून मग शत्रूवर हल्ला करावयाचा, असा ब्रिगेडियर जनरल स्मिथ याचा इरादा होता. ज्या टेकडीवरून अशा रीतीनें इंग्लिशांचें सैन्य खालीं उतरत होतें, त्या टेकडीच्या पुढें खालीं कांहीं अंतरावर एक लहानशी नदी होती, व त्या नदीच्या पलीकडच्या कांठावर पेशव्यांच्या सैन्याची छावणी होती. ही छावणी जवळ येऊं लागली, त्या वेळीं इंग्लिश सैन्यांतील घोडेस्वारांचीं पलटणें कूच करण्याच्या वेळच्या आपल्या रांगा बदलून शत्रूला तोंड देण्याकरितां एका लांब रांगेमध्यें उभे राहण्याच्या तयारीला लागलीं. पण या

त्यांच्या रांगा पुऱ्या तयार झाल्या नाहींत, आणि इंग्लिशांच्या घोडेस्वारांना लढाईच्या शिस्तीनें उभे रहाण्याला फुरसत सुद्धां सांपडूं शकली नाहीं, इतक्यांत बापू गोखले यांचा हल्ला इंग्लिशांच्या लाइनीवर येऊन पडला! पूर्वी सांगितल्याप्रमाणें बापू गोखले यांनीं श्रीमंतांचा निरोप घेतला; त्यांची सुरक्षितपणें रवानगी करून देण्याची तजवीज केली; आणि आपण आपल्या हाताखालील लोकांनिशीं ते शत्रूवर हल्ला करण्याकरितां तडक निघाले. पेशव्यांची छावणी आणि शत्रूचें सैन्य यांच्या दरम्यान एक लहानशी जी नदी होती, ती ओलांडून बापू गोखल्यांचे स्वार एकदम आणि अचानक रीतीनें इंग्रजी सैन्याच्या ७ व्या घोडेस्वाराच्या पलटणीची जी रांग बनविण्यांत येत होती, तिच्यावर चाल करून आले. बापू गोखल्यांचा हा एकदम छापा आल्यामुळें त्या ७ व्या घोडेस्वारांच्या पलटणी-मध्यें फारच घोटाळा उडून गेला. बापू गोखल्यांचे स्वार शत्रूच्या लोकावर आपल्या बंदुकी झाडीत तसेंच पुढें चालले. २२ वी ड्रगून्सची पलटण मध्यभागीं आणि ७ वी मद्रासची नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण उजव्या बाजूला, अशा रीतीनें मागून कूच करीत येतांना या पलटणी चालल्या होत्या, हें पूर्वी सांगितलें आहे. या दोन तुकड्यांतील लोक सोबतच्या नकाशांत दाखविलेल्या ठिकाणीं आपली रांग बनवून उभे रहाण्याच्या उद्योगांत होते. आणि या रांगेमध्यें मद्रासची ७ वी पलटण उजव्या बाजूला आणि २२ वी ड्रगून्सची पलटण डाव्या बाजूला अशा रीतीनें या पलटणी आपल्या रांगा बनविण्यांत गुंतलेल्या होत्या. अशा संधींत बापू गोखल्यांचे घोडेस्वार या ब्रिटिश लाइनीच्या समोर येऊन उभे राहिले; आणि त्या लाइनीच्या उजव्या बाजूला जी ७ वी घोडेस्वाराची पलटण होती, तिला वळसा घालून बापू गोखले यांचे कांहीं स्वार सदर लाइनीच्या डावे बाजूकडील २२ व्या ड्रगून पलटणीच्या पिछाडीवरहि हल्ला करण्याकरिता पुढें सरसावले. अशा रीतीनें पेशव्यांच्या सैन्यानें शत्रूच्या २२ व्या ड्रगून पलटणीला आणि ७ व्या मद्रासच्या पलटणीला चोहोंकडून व्यापून टाकिलें. या वेळीं शत्रूचें सैन्य बापू गोखले यांनीं आपल्या घोडेस्वारांच्या वर्तुळाकार कोटामध्यें चोहों बाजूंनीं कसें वेष्टून आणि कोंडून टाकिलें होतें, हें सोबतच्या लढाईच्या नकाशावरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. बापू गोखले यांचें जें युद्ध-कौशल्य होतें, तें यांतच होतें. तेथील ब्रिटिश लष्करच्या रांगेंतील उजव्या बाजूला खुद्द ब्रिगेडियर जनरल स्मिथ हा होता. आणि डाव्या बाजूला मेजर डॉवेस हा होता. असें अस-तांनाहि बापू गोखले हे आपल्या हाताखालील थोड्याशा घोडेस्वारांच्या मदतीनें या सगळ्या इंग्रजी मेजरांना आणि ब्रिगेडियर जनरलांना चोहोंकडून हां हां म्हणतां गराडा घालूं शकले आणि इंग्रजी फौजेच्या पुढून आणि मागून अशा दोन्हीहि बाजूंनीं बापू गोखल्यांनीं शत्रूच्या सैन्यावर एकाच वेळीं हल्ला करण्याला सुरुवात केली, ही लष्करी कौशल्याच्या दृष्टीनें अत्यंत वाखाणण्यासारखी गोष्ट आहे. या लढाईंत बापू गोखले यांनीं दोन गोष्टींमध्यें आपलें युद्धकौशल्य प्रदर्शित केलें. त्यांपैकीं पहिली गोष्ट ही कीं, आपल्या सैन्याच्या रांगा व्यव-स्थितपणें बनवूं देण्याला त्यांनीं शत्रूला अवकाश मिळूं दिला नाहीं. आणि शत्रु अशा बिनतयारीच्या स्थितीमध्यें गोंधळून गेलेला असतांना बापू गोखले यांनीं शत्रूच्या सैन्याला चौफेर रोखून आणि वेढून टाकिलें, ही दुसरी गोष्ट होय.

लढाईमध्यें अखेरीस जय मिळणें किंवा पराजय होणें, ह्या गोष्टी दैवाधीन असतात. परंतु सेनापति आपलें सैन्य शत्रूवर हल्ला करण्याकरितां केव्हां नेतो, कसें नेतो, आणि त्या सैन्याच्या मदतीनें तो काय कर्तबगारी करतो, यावरच त्या सेनापतीचे गुणावगुण अवलंबून असतात. नेपोलियन हा एवढा मोठा योद्धा, पण त्याचाहि वॉटरलूच्या लढाईमध्यें पराभव झाला. परंतु त्यामुळें शूर योद्धा आणि कुशल सेनापति या दृष्टीनें त्यानें जी अजरामर कीर्ति कमावून ठेविलेली आहे, तिच्यामध्यें यत्किंचित्‌हि कमतरपणा आलेला नाहीं; आणि बापू गोखले यांचीहि तशीच गोष्ट आहे. बाजीरावसाहेबांवर अचानक छापा घालण्याकरितां बेळापुराहून इंग्लिशांचें सैन्य तातडतोबीनें कूच करून अष्टयाला आलें होतें. अशा वेळीं बाजीरावसाहेबांची आधींच पुढें दुसरीकडे रवानगी करून देऊन बापू गोखल्यांनीं आपल्या धन्याच्या जिवाला धक्का लागूं न देतां त्यांच्यावरील छाप्याचा प्रसंग आजिबात टाळला; आणि जे इंग्लिश लोक बाजीरावावर छापा घालण्याकरितां आलेले होते, त्यांनाच उलट बेसावध स्थितींत गांठून बापू गोखल्यांनीं दिवसाढवळ्या त्यांच्यावरच छापा घातला; आणि त्यांना चोहोंकडून कोंडून टाकिलें. हा पराक्रम त्यांनीं ज्या अष्टयाच्या रणांगणावर करून दाखविला त्या रणांगणावर दैवाच्या दुर्निवारतेमुळें जरी ते मरण पावले असले, तरी त्यांची कीर्ति त्या ठिकाणीं आणि महाराष्ट्रीयांच्या सर्व अंतःकरणांमध्यें अद्यापिहि चिरंतन आहे! बापू गोखले यांचा देह अष्टयास पतन पावला; पण त्यांच्या कीर्तीचीं ध्वजा त्या ठिकाणीं कायमची उभारण्यांत आलेली आहे! आणि महाराष्ट्रीय लोकांच्या अंतःकरणामध्यें जोंपर्यंत आपल्या मागील इतिहासाची स्मृति जागृत आहे, तोंपर्यंत ती ध्वजा त्या ठिकाणीं नेहमीं फडकत राहील! आपलें राज्य गेल्यामुळें त्याच्याबरोबर आपल्यांतील मोठ्या लोकांची किंमतहि गेलेली आहे! बापू गोखले! तुम्ही एखाद्या स्वतंत्र देशांत जन्मास येऊन असे पराक्रम केले असते, तर तुमची किती थोरवी गाण्यांत आली असती! तुमच्याकरितां किती रणस्तंभ उभारण्यांत आले असते! त्या रणस्तंभावर किती लोकांनीं येऊन तुमच्या पराक्रमाच्या स्मरणासाठीं पुष्पहार समर्पण केले असते! भावी पिढींतील किती तरुणांनीं तुमच्या त्या रणस्तंभाकडे पाहून 'मी या बापू गोखल्यांच्यासारखा आपल्या देशाची सेवा करणारा सेनापति होईन' असे आपल्या मनाचे दृढनिश्चय केले असते! आणि 'या बापू गोखल्याच्या सारखा शूर आणि स्वामिनिष्ठ पुत्र माझ्या पोटीं जन्मास यावा' अशी तुमच्या त्या रणस्तंभाकडे पाहून किती आयांनीं आपल्या मनांमध्यें परमेश्वरापाशीं प्रार्थना केल्या असत्या! पण बापू गोखले! हल्लीं तुमची स्थिति काय आहे! तुम्ही या हतभाग्य हिंदुस्थान देशांत कशाला जन्माला आलां? तुमचें नांव आदरयुक्त भावनेनें असें किती लोकांना माहीत आहे? पुण्यांतील तुम्ही एवढे मोठे शूर आणि स्वामिनिष्ठ सरदार! पण पुण्यांत पेशव्यांच्या राज्याबद्दल ज्यांनीं फारशी कधीं काळजी घेतली नाहीं, त्यांचे राजवाडे, त्यांचीं इनामें आणि त्यांच्या जहागिरी मोठ्या ऐष-आरामामध्यें नांदत असतांना पुण्यांत तुमचें काय उरलें आहे? पुण्यांत तुमचा वाडा नाहीं, पुण्यांत तुमचें इनाम नाहीं, किंवा पुण्यांत तुम्हांला कोठें जहागीर नाहीं! असा दैवाच्या घरचा उलटा न्याय आहे! फार काय, ज्या अष्टयाच्या लढाईंत देशसेवेमध्यें आणि स्वामिकार्यासाठीं तुम्ही मरण पावलां, त्या अष्टयाच्या रणमैदानावरील कोणता

भूप्रदेश तुम्हीं आपल्या पतनानें पवित्र केला आहे, हें देखील आज कोणाला माहीत नाहीं! इतिहासाला ती जागा माहीत नाहीं! आणि केवळ नोकरीच्या परीक्षेकरितां इतिहास घोकणाऱ्या लोकांना ती जागा कोठें आहे हें जाणण्याची पर्वा तरी काय म्हणून असावी? ज्या पवित्र जागेवर रणदेवतेचें एखादें सुशोभित मंदिर बांधलें जावयाला पाहिजे होतें, त्या ठिकाणीं त्या अष्ट्याच्या रानांतील कोल्हीं आणि कुत्रीं यांच्यासारखीं अगदीं क्षुद्र श्वापदें देखील त्या जागेची आपल्या देहधर्मानें आज विटंबना करीत असतील! पूर्वीच्या अशा गोष्टी सांगतात कीं, ज्या एखाद्या ठिकाणीं जमिनीमध्यें महादेवाची स्वयंभू पिंडी असेल त्या पवित्र ठिकाणीं एखादी गाय येऊन आपल्या स्तनांतील दुग्धाचा स्राव करीत असते. त्याप्रमाणें वास्तविक पाहिलें असतां बापू गोखल्यांच्या देहपतनाची जागा ही अशा पवित्रतेची जागा आहे कीं, त्या ठिकाणचा पवित्रपणा पाहून तेथून जाणाऱ्या प्रत्येक गाईला पान्हा उत्पन्न होऊन तिनें आपल्या दुग्धधारांनीं त्या पवित्र स्थळाचें अभिषिंचन केलें पाहिजे! तें इतक्या ऐतिहासिक पवित्रतेचें स्थळ आहे कीं, आपल्या मनांत स्वदेशाबद्दलचें प्रेम असणारा कोणीहि अनभिज्ञ मनुष्य त्या स्थळावरून पाय देऊन चालला असतां तेथें त्याला ठेंच लागावी, किंवा त्याला तेथें एखादा धक्का बसावा. आणि ज्या जागेचें मीं आपल्या अनभिज्ञतेमुळें उल्लंघन करून चाललों आहें, त्या जागेमध्यें कांहीं तरी दैवी पवित्रता आहे, असा त्याच्या मनाला तेथें कांहीं चमत्कार वाटावा! आणि ती जागा इतक्या थोर योग्यतेची आहे कीं, आणि धारातीर्थें म्हणून जीं क्षेत्रें पवित्रतेला प्राप्त झालेलीं आहेत त्या क्षेत्रांपैकीं हें क्षेत्र इतकें परमपावन आहे कीं, हिंदुस्थानाला आपण स्वतंत्र करूं अशी ज्यांनीं ज्यांनीं आपल्या मनामध्यें इच्छा धारण केली, परंतु ज्यांची ही इच्छा दुर्दैवानें पुरी होऊं दिली नाहीं, असे अतृप्त महत्त्वाकांक्षांचे सगळे दिवंगत झालेले आत्मे त्या ठिकाणीं मध्यरात्रीं जमून आकाशांतून आपल्या आगीसारख्या जळजळीत अशा सहस्रावधि अश्रुधारांनीं ते त्या जागेवर समदुःखीपणानें अभिषेकाचीं आवर्तनें करीत असले पाहिजेत! बापू गोखले! तुम्हीं इंग्लिशाशीं लढाई सुरू केली, त्या वेळीं पुण्यांतील बाकीच्या कित्येक निमकहराम लोकांना फितुर करण्यांत आलें, त्याप्रमाणें तुम्हांलाही फितुर करण्याला जेव्हां इंग्लिशांनीं आपला लिंगो भगवान या नांवाचा एक वकील तुमच्याकडे पाठवला, त्या वेळीं तुम्हीं त्याला स्वामिनिष्ठ अंतःकरणानें जें सणसणीत उत्तर दिलें, ते आज येथें कोणाला माहीत आहे? बापू गोखले! तसले ते फितुरीचे घाणेरडे आणि किळसवाणे निरोप घेऊन दुसऱ्यांना फितुर करण्याकरितां जाणारे इंग्लिशांच्या बाजूचे लिंगो भगवान आजही प्रत्येक उकिरड्या उकिरड्या गणिक किती तरी पडलेले आहेत; पण बापू, त्या निरोपांना तुमच्या सारखें उत्तर देणारा हिरा आज एकहि कोठें राजांच्या मुकुटांत सुद्धां सांपडणें दुर्घट झालेलें आहे! असल्या बिनमोल उत्तराचें मोल एखाद्या स्वतंत्र देशामध्यें लाखों रुपयांहूनहि जास्त करण्यांत आलें असतें! एखाद्या स्वतंत्र देशांत हें तुमचें उत्तर शाळांतून विद्यार्थ्यांना शिकविण्यांत आलें असतें! आणि आईबापांनीं आपल्या मुलांकडून तें दररोज पाठ म्हणवून घेतलें असतें! पण हिंदुस्थानांत हें तुमचें इतकें बाणेदार उत्तर असूनहि तें आज कोणाला माहीत

आहे ? ही तुमच्या उत्तराची गोष्ट कोणीं एखाद्यानें येथील शाळेंतील एखाद्या क्रमिक पुस्तकांत घातली, तर त्या पुस्तकाची परवानगी रद्द करण्यांत येईल ! आणि कोणी मुलें चुकून तुमच्या या उत्तराची गोष्ट पाठ करूं लागलीं, तर त्यांचे आईबाप त्या आपल्या मुलांना म्हणतील कीं, " बापू गोखले हा वेडा होता ! त्याचें तें वाईट उदाहरण आपल्याला कशाला पाहिजे ? आपल्या देशाच्या विरुद्ध आपल्याला कोणी फितुर करावयाला आला, तर बाळांनों, आपण जरूर फितुर व्हावें आणि जरूर देशद्रोही बनावें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे ! फक्त त्या आपल्या देशद्रोहाबद्दल आपल्याला जास्तींत जास्त जितकी किंमत मिळवून घेतां येईल, तितकी आपण स्वार्थसाधनासाठीं मिळवून घ्यावी, म्हणजे झालें ! " बापू गोखले ! ज्या गुलामगिरीनें ग्रस्त झालेल्या या देशामध्यें सद्‌गुणाचा आणि स्वामिनिष्ठेचा यत्किंचितहि बीज राहिलेला नाहीं, त्या देशांत अशी स्थिति असली, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे, असें नाहीं. आणि अशी ज्या देशामध्यें स्थिति आहे, त्या देशामध्यें " The muse of history wlll encircle his name with a laurel for fidelity and devotion in his country's cause," असें तुमच्या संबंधानें 'Fifteen Years in India' या पुस्तकामध्यें जरी कोणी परकीयांनीं उद्गार काढलेले असले, तरी त्यांचा काय उपयोग ? कारण, येथलि हिंदुस्थानच्या खोटया व नीरस इतिहासामध्यें काव्यदेवता आधीं आहे कोठें ? आणि ती कोठें चुकून वास्तव्य करीत असली, तरी देशद्रोह आणि विश्वासघात यांनीं धनाढय आणि गुणाढ्य झालेल्या बदमाषांच्या गळ्याकरितां हार गुंफण्यांतच ज्या काव्यदेवतेचा सगळा वेळ गुंतून गेलेला आहे, त्या काव्यदेवतेजवळ तुमच्या स्वामिनिष्ठेकरितां आणि स्वदेशसेवेकरितां हार गुंफण्याला फुलें शिल्लक तरी आहेत कोठें ? तरी पण, बापू गोखले ! या दुःखकारक देखाव्यानें तुम्हीं हताश होऊन जाण्याचें कारण नाहीं. तुमच्या पाठीमागें जरी अशी स्थिति झालेली आहे, आणि तुमच्या पाठीमागें तुमच्या त्या एकनिष्ठेच्या सद्‌गुणांपैकीं फारसें कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं,—फार काय, तुमचे प्रत्यक्ष औरस असे वंशजहि आज जरी कोणी नसले,—तरी त्याबद्दल तुम्ही वाईट वाटूं देऊं नका ! तुमच्या जरी रक्तामासाचे प्रत्यक्ष औरस वंशज आज कोणी नसले, तरी तुमच्या त्या शुद्ध आणि पवित्र, स्वामिनिष्ठ आणि स्वदेशनिष्ठ, अशा मनःप्रवृत्तीची संतति तुमच्या या देशांत गुप्तपणें किती उत्पन्न झालेली आहे, याची तुम्हांला कल्पना नाहीं ! बापू ! तुम्हीं निपुत्रिक म्हणून तुमच्या आत्म्याला बिलकूल दुःख व्हावयाला नको ! तुमचे नवीन वंशज पुष्कळ आहेत ! तुमच्या कल्पनांचीं बीजें ज्या ज्या क्षेत्रांमध्यें पडलेलीं आहेत, तेथें तेथें तुमचे भविष्यकालीन पुत्र भावी अस्तित्वामध्यें जन्माला आलेले आहेत, हें तुमचा पवित्र आत्मा आपल्या दिव्य दृष्टीनें जाणतच असला पाहिजे !

असो. बापू गोखले यांनीं शत्रूच्या सैन्याला चोहों बाजूंनीं कसें वेढून टाकलें होतें, हें वर सांगितलेंच आहे. आपल्या सैन्यावर चोहोंकडून वेढलें जाण्याचा हा दुर्धर प्रसंग आलेला पाहून मेजर डॉवेस यानें उजव्या बाजूचें सैन्य मागें घेऊन डाव्या बाजूच्या आपल्या डगूनसच्या सैन्याकडून शत्रूवर हल्ला करविला. या सैन्याचा जो हल्ला आला, त्याला तोंड देण्याकरितां बापू गोखले हे पुढें सरसावले, त्यावेळीं इंग्लिश सैन्यांतील लेफ्टेनंट वॉरंड या

नांवाचा एक अधिकारी व बापू गोखले यांची गांठ पडली. तेव्हां बापूंनीं त्याच्या खांद्यावर वार केला. त्याचप्रमाणें ब्रिगेडिअर जनरल स्मिथ हे उजव्या बाजूकडील सातव्या पलटणींतिल घोडेस्वारांच्या बरोबर होते. त्यांनाहि त्या गर्दीमध्यें त्यांच्या डोकीच्या पाठीमागच्या बाजूला तरवारीची एक जखम लागली. अशा रीतीनें इंग्रजी सैन्यामध्यें शिपाईलोकांत गोंधळ उडून गेलेला असतांना आणि त्यांच्या ऑफिसरांना जखमा लागत असतांना खुद्द बापू गोखले यांनाहि त्या लढाईच्या गर्दीमध्यें तीन पिस्तुलांच्या गोळ्या लागल्या आणि दोन तरवारीच्या जखमा झाल्या; आणि त्यामुळें ते घायाळ होऊन खालीं पडले आणि तेथें त्यांचा अंत झाला.

वर सांगितलेल्या इंग्रजी लष्करापैकीं डूगून्सची बाविसावी पलटण आणि सातवी नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण या दोन पलटणी लढाईच्या माऱ्यांत सांपडल्या असतां पूर्वी डाव्या बाजूकडून चालत असलेली जी २ री घोडेस्वारांची पलटण, ती या वेळीं डाव्या हाताकडे कांहीं अंतरावर जाऊन उभी राहिलेली होती. त्यांनीं आपल्यांतील एक टोळी आपल्या दुसऱ्या पलटणीच्या मदतीकरितां पाठविली. ती टोळी मागून येऊन पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करूं लागली. इतक्यांत आपले सेनापति बापू गोखले हे लढाईंत मरण पावले, ही गोष्ट पेशव्यांच्या शिपायांना कळल्यानंतर त्यांच्यानें रणांगणावर धीर धरवेना. व तें सगळें सैन्य पळ काढूं लागलें. या वेळीं मद्रासच्या २ ऱ्या घोडेस्वारांच्या पलटणीनें त्यांचा कांहीं अंतरापर्यंत पाठलाग केला, व पेशव्यांचें सैन्य पळूं लागल्यानंतर बाविसावी डूगून्सची पलटण आणि सातवी घोडेस्वारांची पलटण ह्या ज्या बापू गोखल्यांच्या हल्ल्यामुळें घाबरून गेल्या होत्या, त्यांनाहि आतां धैर्य चढले आणि त्याहि पेशव्यांच्या सैन्याचा पाठलाग करूं लागल्या. या लढाईंत इंग्लिशांच्या जवळ जरी बऱ्याच तोफा होत्या, तरी घोडेस्वारांच्या सोयीसाठीं आणि नदी ओलांडून जाण्याच्या अडचणीसाठीं त्यांचा फारसा उपयोग करण्यांत आला नाहीं. पेशव्यांच्या सैन्याचा सुमारें पांच मैलपर्यंत पाठलाग करण्यांत आला. परंतु त्या पाठलागापासून तादृश फायदा होत नाहीं, असें दिसून आल्यामुळें पाठलाग करणारे वगैरे सर्व लोक माघारे येऊन अग्रयाच्या नदीच्या कांठीं त्या दिवशीं तळ देऊन राहिले. या लढाईंत बारा हत्ती, सत्तावन उंटें आणि बऱ्याचशा पालख्या पाठलाग करणाऱ्या लोकांच्या हातीं लागल्या. त्याचप्रमाणें या लढाईंत पेशव्यांच्याकडील सुमारें दोनशें लोक मरण पावले असून इंग्लिशांकडील चवदा युरोपियन लोक आणि पांच नेटिव्ह घोडेस्वार मरण पावले, असे इंग्लिशांच्या तर्फेचे आंकडे आहेत.

या लढाईंत बापू गोखले आपल्याबरोबर अडीच हजार घोडेस्वार घेऊन इंग्लिशांवर हल्ला करण्याकरितां निघाले, असें इंग्रजी इतिहासकारांनीं लिहिलेलें आहे. परंतु मराठींत या लढाईबद्दलच्या ज्या हकीकती प्रसिद्ध झालेल्या आहेत, त्यांवरून बापू गोखले यांच्यापाशीं इतके घोडेस्वार होते असें दिसत नाहीं. निपाणकर आप्पासाहेब सरलष्कर यांच्यापाशीं पुष्कळ सैन्य होतें व तें सैन्य घेऊन तुम्ही बापू गोखल्यांच्या मदतीला जावें असें खुद्द बाजीरावांनींहि त्यांना सांगितलें होतें. परंतु बाजीरावसाहेबांच्या आज्ञेप्रमाणें सरलष्कर बापू गोखल्यांच्या मदतीला मुळींच गेले नाहींत. बाजीरावसाहेबांची आज्ञा झाल्यानंतर " फौज

घेऊन येतों म्हणून सांगा, असें बोलून सरलष्कर झाड्यास गेले, ” असा मजकूर पाच्छापुरकर यांच्या बखरींत आढळतो. व याच्यापुढें आप्पासाहेब निपाणकर यांच्याबद्दल त्याच बखरीमध्यें आणखी एक उल्लेख सांपडतो, तो येणेंप्रमाणेः—“ अशा प्रसंगीं निपाणकर सरलष्कर यांनीं आपला निभाव लागणार नाहीं, गोखल्यांनीं परत फिरावें, इत्यादि बोलून आम्ही श्रीमंतांकडे जातों, असें म्हणून लढाई सोडून गेले. ” परंतु बापू गोखल्यांच्या चरित्रांतील एका टीपेमध्यें मजकूर आहे, तो असा कीं, आप्पा देसाई निपाणकर यांचे चार हजार लोक आपल्या पाठीमागें रक्षणासाठीं बापू गोखले यांनीं ठेविले होते. शिवाय विंचूरकर आणि रामचंद्रराव सुभेदार यांच्याहि फौजा घाट चढून विटेगांवास गेल्या होत्या, असें चरित्रकारांनीं लिहिलें आहे. या सगळ्या लिहिण्यावरून बापू गोखले यांचेपाशीं अडीच हजार घोडेस्वार इंग्रजी इतिहासकारांच्या लिहिण्याप्रमाणें असतील, हें शक्य दिसत नाहीं. सर्व निरनिराळ्या मराठी लेखकांनीं बापूंच्या घोडेस्वारांचा जो आंकडा दिला आहे, तो सगळ्यांचा एकच जमतो. ते लिहितात कीं, बापू गोखले आपल्याबरोबर फक्त पांचशें स्वार घेऊंन निघाले. व पुढें तर त्यांच्या जवळ फक्त पन्नासच स्वार राहिले. पाच्छापुरकरांच्या बखरींतील या अष्ट्याच्या लढाईची हकीकत पुढीलप्रमाणें आहेः—“ पांचशें स्वार व घोरपडे, मुधोळकर, शितोळे, पाच्छापुरकर, वगैरेंसह गोखल्यांनीं हल्ला केला. बंदुकीच्या व तमचेच्या फैरा झडल्या. अशा वेळीं बापूसाहेब गोखले पन्नास खासे मंडळींसह मारीत चालले. पहिली तुकडी हटली. दुसरीनें गोखले वगैरेस पोटीं घेतलेलें पाहून पहिल्या तुकडीचेहि लोक आले. गोखले आदिकरून मंडळींनीं ज्याहलीम तरवारी चालविल्या. पन्नास खाशांपैकीं दहाबाराच फळी फोडून परत आली. व स्मिथ यांची गांठ पडून जखमा लागल्या, असें ऐकीव वर्तमान आहे. पण परत आलेल्या दहा बारा इसमांनीं बापूसाहेबांस कांहीं पाहिलें नाहीं. बापूसाहेब गोखले यांची अखेरी कशी झाली, याचा पत्ता नाहीं. ”

अष्ट्याच्या लढाईंतलि बहुतेक सर्व महत्त्वाच्या गोष्टी येथपर्यंत सांगण्यांत आल्या आहेत. आतां फक्त एकच गोष्ट सांगावयाची राहिली आहे. आणि ती म्हटली म्हणजे साताऱ्च्या महाराजांच्या संबंधाची होय. ही या वेळची साताऱ्च्या महाराजांच्या संबंधाची हकीकत अनेक दृष्टींनीं फार महत्त्वाची आणि मनोरंजक अशी आहे. साताऱ्च्या महाराजांना वासोट्याच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलेलें होतें आणि नारोपंत आपटे यांना पाठवून बाजीरावसाहेबांनीं त्यांना माहुलीच्या मुक्कामीं आपल्या सैन्यांत आणवून घेतलें, या गोष्टीचा उल्लेख पूर्वी करण्यांत आलेला आहे. साताऱ्च्या महाराजांना पेशव्यांच्या पक्षाकडून फोडून आपल्या पक्षाकडे वळवून घ्यावें, अशी इंग्लिशांची या वेळीं इच्छा असणें स्वाभाविक होतें. व साताऱ्च्या महाराजांच्या मार्फतीनेंहि कांहीं मध्यस्थ मंडळींच्या द्वारानें पुण्याच्या एल्फिन्स्टनसाहेबांच्या दरबारांत कांहीं अंतःस्थ खटपटी चाललेल्या होत्या, याबद्दलची बातमी बाजीरावसाहेबांनाही असली पाहिजे. म्हणून त्या कारस्थानांना जास्त अवसर सांपडूं नये, या हेतूनें बाजीरावसाहेबांनीं साताऱ्च्या महाराजांना आपल्याजवळ बाळगण्याचा निश्चय ठरविला असला पाहिजे, हें उघड आहे. इंग्लिशांशीं लढाई करण्याचा बाजीरावसाहेबांचा पहिल्यानें बेत ठरला, त्यावेळीं त्यांनीं शिंदे, होळकर, भोंसले, वगैरे

सगळ्यांना मदतीला बोलाविलें होतें. अशा स्थितींत आपले धनी सातारचे महाराज यांच्या मदतीचा आणि सान्निध्याचा फायदा आपल्याला मिळावा, असें बाजीरावसाहेबांना वाटणें, हें अगदीं स्वाभाविक होतें; व त्या हेतूप्रमाणें श्रीप्रतापसिंहमहाराज, श्रीआप्पासाहेबमहाराज आणि या उभयतां बंधूंच्या मातोश्री, श्रीमाई-साहेबमहाराज, या त्रिवर्गांना त्यांनीं आपल्या छावणीमध्यें आणविलें होतें; इतकेंच नव्हे,



## राजा प्रतापसिंह महाराज.

तर सातारच्या महाराजांनीं आपले सरदार जमवून आणि आपलें सैन्य उभारून या लढाई-तील सर्व पुढाकार आपल्याकडे घ्यावा, आणि हिंदुपदपातशाहीचा अधिकार यापुढें त्यांनीं चालवावा, अशीहि सूचना पेशव्यांकडून त्यांना करण्यांत आली होती. पण या सूचनेचा सातारच्या महाराजांनीं स्वीकार करणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांना आपल्या छावणीमध्यें ठेवून घेऊन पेशव्यांनीं इंग्रजांशीं लढण्याचें काम पूर्ववत् पुढें चालविलें होतें. पण सातार-च्या महाराजांवर इंग्रजांचेहि पेंच दुसरीकडून चालले होते. आणि त्यांत इंग्लिशांचें असें

धोरण होतें कीं, सातारचे छत्रपति हे हिंदुपदबादशाहीचे मूळचे मालक असल्यामुळें आणि छत्रपति व पेशवे यांच्यामध्यें मूळचीच तेढ असल्यामुळें सातारचे महाराज आपल्या पक्षाला मिळाले, तर पेशव्यांच्या मूळ मालकांच्या, म्हणजे छत्रपतींच्या फायद्यासाठीं आपण पेशव्यांच्यापाशीं ही लढाई चालवीत आहों, असें दाखवून लोकांच्या डोळयांत आपल्याला धूळ टाकतां येईल आणि महाराष्ट्रांतील लोकांची सहानुभूति त्या योगानें आपल्या पक्षाकडे वळवून घेतां येईल. सारांश, इंग्लिश लोक आपल्या पक्षांतील सातारच्या महाराजांना फोडतील, ती संधि त्यांना मिळूं नये, म्हणून बाजीरावानें सातारच्या महाराजांना आपल्याजवळ ठेवून घेतलें होतें. पण हे स्वकीयांचे आणि परकीयांचे एकमेकांच्या विरुद्ध चाललेले राजकारणांतील डावपेंच महाराजांच्या अल्पवयामुळें वगैरे त्यांच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें. त्यांना आपण या कचाटींतून कसें सुटूं एवढाच काय तो प्रश्न दिसत होता. पण आपली जन्मभूमि इंग्रजाच्या कचाटींतून आपण एकमेकांच्या एकोप्यानें कशी सोडवूं हा प्रश्न आपल्या डोळ्यापुढें ठेवण्याची आवश्यकता त्या वेळीं तेथील मंडळींपैकीं फारच थोड्यांच्या डोळयांना दिसत होती. सातारच्या महाराजांच्या पदरीं त्यांच्या पिढीजाद नोकरींतील बळवंत मल्हार चिटणीस या नांवाचे एक गृहस्थ होते. यांनीं बाळाजीपंत नातू यांच्या मार्फतीनें संधान बांधून सातारच्या महाराजांची सर्व हकीकत एल्फिन्स्टन साहेबांच्या कानावर घातली होती; व बोलण्यांत अघळपघळ असलेल्या एल्फिन्स्टन साहेबांनींही उलट बळवंत मल्हार चिटणीस यांच्यापाशीं सातारच्या महाराजांकरितां असें आश्वासन दिलें होतें कीं, पेशव्यांच्यापासून आम्ही छत्रपतींचा सगळा प्रांत जिंकून घेतला, म्हणजे तो सगळाच्या सगळा प्रांत आम्ही छत्रपतींना देऊं! आणि हें इंग्रजी आश्वासन बळवंत मल्हार चिटणीस आणि सातारचे महाराज या दोघांनाहि दुर्दैवानें खरें वाटत होतें! पण याचा अनुभव पुढें बुभुक्षित झालेले चिटणीस आणि पदच्युत झालेले महाराज यांना लवकरच आला! सातारच्या महाराजांच्या वतीनें बाळाजीपंत नातूंच्या मार्फत चिटणीस हें एल्फिन्स्टनसाहेबांपाशीं कांहीं तरी खलबतें करीत असतात, ही गोष्ट बाजीरावसाहेबांच्या नजरेस आलेली होती. व त्यासाठीं चिटणीसांच्या घरांत चिटणीस आणि बाळाजीपंत नातू हे या प्रकरणांतील सातारच्या महाराजांच्या हक्कासंबंधानें कांहीं कागदपत्र पहात बसले असतां एकदां त्र्यंबकजी डेंगळे आपल्याबरोबर पंचवीस स्वार घेऊन चिटणीसांच्या घराकडे आला. पण आंतील मंडळी मागच्या भिंतीवरून उड्या टाकून पळून गेली, म्हणून त्या वेळीं त्र्यंबकजीच्या हातून त्यांचा बचाव झाला. पुढें सातारच्या महाराजांना आपल्याबरोबर घेऊन बाजीरावसाहेब निरानिराळ्या ठिकाणांहून फिरतां फिरतां सोलापूरकडे गेले असतां मि. एल्फिन्स्टन आणि बाळाजीपंत नातू हे सातारला आले; त्यांनीं तेथें एक दरबार भरविला; व त्या दरबारांत सातारच्या सरदारमंडळींना बोलावून त्यांना तेथें पोषाख देण्यांत आले; आणि त्या दरबारामध्यें असेंहि जाहीर करण्यांत आले कीं, सातारच्या महाराजांनीं पेशव्यांची छावणी सोडून आमच्या इंग्रजी लष्करामध्यें येऊन मिळावें; आणि अशा रीतीनें महाराज जर आमच्या सैन्याला मिळतील तर पेशव्यांना जिंकून पेशव्यांच्या ताब्यांतील सगळा मुलूख आम्ही सातारच्या महाराजांना देऊं! हें ऐकल्याबरोबर सातारचे सगळे सरदार हुरळून गेले!

आणि पेशव्यांचें सगळें राज्य इंग्लिश लोक आपल्या साताऱ्च्या महाराजांना जिंकून देणार, असें त्यांना खरोखरच वाटूं लागलें! साताऱ्चे फडणीस यांनीं नरसू काकडे या नांवाचा एक हेर ताबडतोब महाराजांकडे सोलापूर मुक्कामीं पाठविला. आणि नरसू काकड्यानें हा फितुरीचा निरोप साताऱ्च्या महाराजांना आणि त्यांच्या जवळ असलेल्या बळवंत मल्हार चिटणीसांना सांगितला. बाळाजीपंत नातूंच्या मार्फत बळवंत मल्हार चिटणीस यांनीं फितुरीची सर्व तयारी आधीं करून ठेवलेलीच होती. व याप्रमाणें साताऱ्याहून नरसू काकडे यानें येऊन फितुरीची बातमी सांगितल्याबरोबर चिटणीस यांनीं ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांचा मुक्काम अकलूज येथें असतांना त्यांच्याकडे असा निरोप पाठविला कीं, ह्याच्यापुढें तुम्ही बाजीरावाच्या सैन्यावर रात्रीचा केव्हांहि छापा घालूं नये. कारण, रात्रीच्या काळोखांत तुम्ही एखादे वेळीं छापा घातला, तर जे साताऱ्चे महाराज लौकरच तुमच्या लष्करांत येऊन स्वाधीन होण्याच्या विचारांत आहेत, ते आणि त्यांचे लोक कोणते आहेत, हें तुम्हांला काळोखांत समजणार नाहीं आणि त्यामुळें कदाचित् त्यांना कांहीं दुखापत वगैरे होण्याचा संभव आहे! म्हणून तुम्ही दिवसास छापा घालावा! अशा प्रकारचे चिटणिसांकडून इंग्लिशांकडे फितुरीचे निरोप राजरोसपणें जाऊं लागले. नंतर पुढें दोन तीन दिवसांनीं पंढरपुरजवळ अष्टे वाळकी येथें बाजीरावसाहेबांचा मुक्काम असतां स्मिथ-साहेबांचेंही सैन्य तेथें चालून आलें. नंतर बापू गोखले आणि इंग्रज यांची लढाई होऊन पेशव्यांचें सैन्य पळत असतां इंग्रजांनीं त्यांचा पाठलाग सुरू केला. या पाठलागामुळें पेशव्यांच्या सैन्यांत फारच गडबड उडून गेली. या गडबडीचा फायदा घेऊन पूर्वीच्या संकेताप्रमाणें बळवंत मल्हार चिटणीस यांच्या सूचनेवरून साताऱ्चे महाराज हे रेंगाळत रेंगाळत मागें राहूं लागले. त्या वेळीं साताऱ्च्या महाराजांच्या मंडळीनें लौकर लौकर आपल्या सैन्याबरोबर कूच करीत चालावें म्हणून घाई करण्याकरितां बाजीरावसाहेबांनीं बळवंतराव रास्ते आणि शामराव रास्ते यांना महाराजांकडे पाठविलें; तेव्हां चिटणीसांनीं उत्तर दिलें कीं, आमचीं घोडीं जितक्या जलदीनें चालूं शकत आहेत, तितक्या जलदीनें आम्ही मागून येतच आहों! रास्ते यांच्याशीं चिटणीसांचें इतकें बोलणें होत आहे, इतक्यांत रास्ते वगैरे मंडळीवर इंग्रजांकडून घाला आला; व मंडळीची पांगापांग झाली. त्या संधींत बळवंत मल्हार चिटणीस यांनीं महाराजांना थोडा वेळ मागेंच थांबण्याविषयीं सुचविलें; त्याप्रमाणें सातारकरांची सर्व मंडळी थांबली. इतक्यांत मेजर डोव्हटन, शेख बहुद्दीन हवालदार, शेख मुइदिन जमादार, वगैरे इंग्रजी घोडेस्वारांचा त्यांच्या भोंवतीं गराडा पडणार असें दिसूं लागलें. त्या वेळीं महाराजांच्या मातोश्री माईसाहेब यांना अशी भीति वाटूं लागली कीं, आतां आपल्या अब्रूचें संरक्षण होणें कठिण आहे, तेव्हां त्यांनीं आपल्या मुलाला असें सांगितलें कीं, माझी अवहेलना होण्याच्या पेक्षां तूं आपल्या तरवारीनें माझा वध कर; आणि तूं असें केलेंस तरी तुला मातृवधाचें पातक लागणार नाहीं! तेव्हां महाराजांनीं आपल्या हातांतील तरवार बाहेर काढली. परंतु भाऊसाहेबांनीं त्यांना कांहीं वेळ थांबण्याविषयीं विनंति केली. इतक्यांत बळवंत मल्हार चिटणीस हे आपल्या घोड्यावरून खालीं उतरले आणि महाराजांची आज्ञा घेऊन ते इंग्लिशांच्या लोकांकडे गेले. आपण पळत गेलों तर आपल्यावर संशयानें काणी गाळी

घालविं, म्हणून ते सावकाश चालले होते. नंतर ते बडे साहेबांच्या हत्तीजवळ गेले; आणि सातारचे महाराज येथें आहेत, तेव्हां तुम्ही ही गडबड थांबवा, असें सांगितलें. साहेबाची खात्री झाल्यावर साहेबानें आपल्या भोंवतीं आपल्या सैन्याच्या खुणेकरितां तरवार फिरविली. त्याचबरोबर गोळीबार थांबला. नंतर सातारचे महाराज जनरल स्मिथ यांच्या स्वाधीन झाले.



## आप्पासाहेब महाराज.

ही हकीकत मूळ बळवंत मल्हार चिटणीस यांनींच लिहिलेली आहे, तेव्हां यांत त्यांनीं आपल्या स्वतःच्या फितुरीबद्दल जो मजकूर स्वतःच लिहिला आहे, तो खोटा असणें शक्य नाहीं. या चिटणीसांच्या हकीकतीचें इंग्रजी भाषांतर करून तें डॉ. मिलने यांनीं हिंदुस्थान सरकारकडे बळवंत मल्हार चिटणीस यांची कांहीं तरी दाद लागावी म्हणून पाठविलें होतें. डॉ. मिलने यांच्या त्या इंग्रजी भाषांतरावरून ही सातारच्या महाराजांच्या बद्दलची वरील हकीकत येथें देण्यांत आलेली आहे. तेव्हां त्यांतील सत्यतेबद्दल संशय घेण्याचें कारण नाहीं. शिवाय, ठाण्याचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. रा. विनायक लक्ष्मण भावे, यांनीं थोडे दिवसांपूर्वी 'मराठी दप्तर' ( रुमाल २ ) या नांवाचें जें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, त्यांत लेखांक २—छत्रपतींची शके १७३९ तील दिनचर्या टिपणी—या नांवाचा एक लेख छापला आहे. त्यामध्येंही बहुतेक अशाच प्रकारची हकीकत दिलेली आहे. यावरून इंग्रजांनीं सुरू केलेला फितुरीचा धंदा त्या वेळीं किती

जोरांत आलेला होता आणि आपल्या लोकांचा स्वार्थसाधुपणा त्याला कसा बळी पडत होता, हें समजण्यासारखें आहे.

आतां अष्टयाच्या लढाईपैकीं शेवटची एकच गोष्ट सांगावयाची राहिली आहे. आणि ती बापू गोखले यांच्या मृत शरीराच्या संबंधाची होय. या बाबतींत दोन निरनिराळीं मतें आहेत. एका हकीकतीप्रमाणें बापू गोखले यांचें प्रेत ओळखण्यांत येऊन त्याला अग्नि देण्यांत आला, असें आहे. परंतु दुसरी एक हकीकत आहे, ती अशी कीं, बापू गोखले यांचें शव कोणालाच सांपडलें नाहीं. यांपैकीं पहिल्या हकीकतीबद्दल श्री. भावे यांच्या २ ऱ्या रुमालातील २ ऱ्या लेखांकांत पुढीलप्रमाणें मजकूर आढळतोः—

" नंतर बापू गोखले यांचा मुरदा डोलींत घालून आणिला. तो ओळखण्यास कोणी पाठवावें म्हणोन जर्नेल यानीं निरोप पाठविला. त्याजवरून बळवंतराव चिटणीस यास पाठविलें. ओळखून आले. फक्त आंगराखा आंगांत मलमलीचा उरला होता. घोड्यानीं तुडविलें. त्याणीं पायाचें कातडें गेले होते. दोन जखमा लागल्या होत्या. पहिले जखमेचा डोळा उघडा होता. त्याप्रमाणें पाहून आल्यावरी गोखले याचे मुरद्याची डोली व आंताजीपंत हुजरनीस नि॥ गोखले जखमी पैशा दोन डोल्या महाराजांपाशीं डेऱ्याजवळ पाठविल्या. महाराजांनीं व सर्वत्रांनीं पाहून ओळखल्यानंतर अग्नि देण्यास हुकूम देविला. शोभनें वगैरे मिळवितां चार घटका रात्रीस वोढ्याचे कडेस नेऊन अग्नि दिल्ही. "

परंतु बापू गोखले यांचें शव कोणालाच सांपडलें नाहीं, हें जें दुसरें मत आहे, तें विशेषतः पाच्छापुरकर यांच्या बखरीमध्यें जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून बनविण्यांत आलेलें असावें असें दिसतें. ती हकीकत आधारभूत धरून रा. गोविंद विनायक आपटे यांनीं गोखले घराण्याच्या इतिहासाच्या पुस्तकामध्यें या बाबतींत पुढीलप्रमाणें विचार प्रगट केले आहेतः—

सेनापति बापूसाहेब गोखले हे गोपाळ अष्टयाच्या लढाईंत कामास आले, ही गोष्ट इंग्रजी ग्रंथकार लिहितात, आणि अमुक अमुक शत्रानें त्यांना आम्हीं ताडन करून ठार केलें वगैरे म्हणून, त्यांना ओळखून दहन करविलें, असेंही इंग्रजी ग्रंथांत असल्याचें समजतें. बापूसाहेब सदरहू लढाईंत कामास आले, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु खऱ्या बापूंचें प्रेत कोणास सांपडलें नाहीं. जर बापूंचें खरें प्रेत सांपडतें, तर तें प्रेत त्या वेळच्या इंग्रजी लष्करी अधिकाऱ्यानें बापूंच्या बायकोच्या स्वाधीन खास केलें असतें, आणि आमच्या धर्माप्रमाणें त्या वेळीं बापूंची बायको यमुनाबाई ह्या सती गेल्या असत्या. बापूसाहेब यांचें कुटुंब यमुनाबाई ह्या त्या वेळीं प्रत्यक्ष असतांना जें बापूचें प्रेत म्हणून इंग्रजी लष्करी लोकांनीं ठरविलें होतें, तें प्रेत सुद्धां खऱ्याखोट्याच्या निर्णयाकरितां यमुनाबाईंना दाखविल्याचा कोठें उल्लेख नाहीं, यावरून बापूसाहेब यांचें प्रेत खास सांपडलें नाहीं, हेंच खरें !

# रायगड किल्ल्याचीं दोन स्थित्यंतरें.

## [ सन १६७४ आणि १८१८ ]

तारीख ६ जून सन १६७४ हा दिवस रायगडच्या किल्ल्यावर किती आनंदाचा होता ! महाराष्ट्रामध्यें स्वराज्यसंस्थापना करून शिवाजी महाराजांनीं या दिवशीं रायगडावर आपल्याला राज्याभिषेक करवून घेतला आणि रायगडच्या किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावर स्वातंत्र्याचें निशाण उभारलें. पण त्यानंतर १४४ वर्षांनीं रायगडावर एके दिवशीं सकाळीं दुसऱ्या एका प्रकारचा दिवस उगवला ! तो दिवस म्हणजे महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या इतिहासांतील एक अतिशय दुःखदायक दिवस होय. पुण्यांतून दुसरे बाजीराव पेशवे सन १८१७ च्या नोव्हेंबर महिन्यामध्यें पुणें शहर सोडून बाहेर निघून गेले. त्यानंतर त्याच्या पाठीमागें त्यांचें राज्य आपल्या हस्तगत करून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्या वेळची राज्याची बळकटी ही किल्ल्यांच्या बळकटीवर अवलंबून असे. पण ते बाजीरावाच्या राज्यांतील किल्ले एका पाठीमागून एक हळूहळू इंग्लिशांच्या हस्तगत होऊं लागले. आणि सन १८१८ च्या एप्रिल महिन्यामध्यें खुद्द रायगड किल्ल्यावरही तोच दुर्धर प्रसंग येऊन गुदरला. इंग्लिशांच्या तोफांच्या माऱ्यापुढें बाकीचे किल्ले पडले तर पडोत; परंतु रायगडचा किल्ला हा अशा रीतीनें हस्तगत होणें हें केव्हांहि शक्य नाहीं, अशीच सर्वांची समजूत होती; आणि त्यामुळेंच पुण्यांत लढाईची गडबड सुरू होण्याच्या सुमारास श्रीमंत बाजीरावसाहेब यांच्या पत्नी वाराणशीबाई सुरक्षित राहाव्या, म्हणून त्यांना मुद्दाम रायगड किल्ल्याच्या हवालीं करण्यांत आलेलें होतें. परंतु सद्दीचा जोर संपला, म्हणजे अभेद्य किल्ल्यांच्या भिंतींतलि अभेद्यपणाहि नाहींसा होतो, असा अनुभव आल्याचें इतिहासामध्यें अनेक ठिकाणीं आढळून येतें; आणि तीच स्थिति रायगडच्या किल्ल्याची सन १८१८ च्या एप्रिल-मे महिन्यामध्यें दुर्दैवानें झाली !

महाराष्ट्रांतील बाकीचे किल्ले एकापाठीमागून एक शरण येत चाललेले पाहून रायगडावरही आपल्या तोफांचा प्रयोग करून पहावा, असें इंग्लिश अधिकाऱ्यांनीं ठरविलें, व लेफ्टेनंट कर्नल प्रॅाथर याची त्या कामावर नेमणूक करण्यांत आली. कर्नल प्रॉथर याच्या हाताखालीं कांहीं पलटणी आणि तोफखाना असें दोन प्रकारचें सैन्य देण्यांत आलेलें होतें. या सैन्याचे प्रवासाच्या सोयीसाठीं दोन विभाग करण्यांत आले. तोफा वगैरे जाण्याला गाडीचा रस्ता पाहिजे, म्हणून बोरघाटाच्या रस्त्यानें खोपवलीवरून तोफखान्याच्या तुकडीची रवानगी करून देण्यांत आली. आणि शिपाई लोकांच्या पलटणी या लोणावळ्याकडील डोंगरांतील पायवाटांनीं जंबुसरच्या घाटानें खालीं उतरल्या. व घाटाच्या पायथ्याशीं सिद्धेश्वरपाली म्हणून जें गणपतीचें एक सुप्रसिद्ध स्थान आहे, त्या ठिकाणीं

ता. १२ एप्रिल रोजीं दोन निरनिराळ्या वाटांनीं आलेल्या पायदळाची आणि तोफखान्याची एकत्र गांठ पडली. त्यानंतर पाली येथें दोन दिवस मुक्काम करून कर्नल प्रॉथर यांच्या हाताखालीं रायगडच्या मोहिमेवर निघालेलें हें सैन्य पालीहून निघाल्यानंतर वाटेंत असलेलें तळें आणि घोसाळें हे दोन किल्ले घेण्याकरितां तिकडे वळलें. या सैन्याला वाटेंत ठिकठिकाणीं पेशव्यांच्या लोकांकडून अडथळा करण्यांत येत होता, व तळ्याच्या किल्ल्याजवळ इंदापूर म्हणून जें एक लहानसें गांव आहे, तेथें या इंग्रजी सैन्याला बरीच आडकाठी करण्यांत आली. कारण, पुण्यांत जरी या वेळीं कित्येक बाळाजीपंत निघालेले होते, तरी महाराष्ट्रांतील बाकीच्या ठिकाणीं सगळीकडे सगळेच बाळाजीपंत अजून झालेले नव्हते. तरी पण दुर्दैवाच्यापुढें पेशव्यांच्या स्वामिनिष्ठ नोकरांचाही पाड लागेनासा झाला; आणि इंदापूर येथें जे पेशव्यांचे शिपाई इंग्लिशांचा रस्ता रोखून धरण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांना माघार घ्यावी लागली. आणि त्यामुळें इंदापुरापासून रायगडच्या बाजूचा पुढील रस्ता इंग्लिशांना मोकळा झाला. त्याचप्रमाणें तळें आणि घोसाळें या किल्ल्यांचाही मार्ग मोकळा होऊन ते दोन्ही किल्ले ता. १८ एप्रिल रोजीं इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतले. व त्यानंतर कर्नल प्रॉथर याच्या हाताखालील या इंग्रजी सैन्याच्या तुकड्या ता. २३ एप्रिल रोजीं इंदापुराहून महाडास येऊन पोंचल्या. आणि त्याच दिवशीं रात्रीं रायगडच्या आसपासची टेहळणी करण्याकरितां २०० युरोपियन शिपाई आणि २०० नेटिव्ह शिपाई हाताखालीं देऊन मेजर हॉल या नांवाच्या एका ऑफिसराला रायगडाकडे पाठविण्यांत आलें. व बाकीचें सैन्य मागाहून महाडाहून निघून ता. २५ एप्रिल रोजीं रायगडच्या पायथ्याशीं येऊन पोंचलें. मेजर हॉल हा जो आपल्या बरोबर ४०० लोक घेऊन आधीं रायगडच्या आसपासची टेहळणी करण्याकरितां एक दिवस पुढें आलेला होता, त्याला रायगडच्या पायथ्याशीं असलेल्या पेठ्याजवळ पेशव्यांच्या ३०० लोकांनीं अडविलें. तेव्हां त्यांच्या दरम्यान बरीच मोठी चकमक उडाली व पेशव्यांच्या लोकांनीं रायगडावरील हा हल्ला परतविण्याच्या कामीं शिकस्तीचे प्रयत्न केले; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. अखेरीस रायगडच्या पायथ्याजवळील पेठा इंग्लिशांनीं काबिज केला. पुढें ता. २५ एप्रिल रोजीं रायगडच्या पायथ्याशीं इंग्लिशांचें सगळें सैन्य एकत्र जमा झाल्यानंतर त्या किल्ल्यावर कोणकोणत्या बाजूंनीं कसकसे हल्ले करावयाचे, याबद्दलचे बेत ठरविण्यांत आले. सगळेंच सैन्य एकाच बाजूनें नेऊन एकाच ठिकाणावर हल्ला करावयाचा, अशी इंग्रजी पद्धत नाहीं. त्यासाठीं सैन्याचे निरनिराळे विभाग करण्यांत आले; आणि निरनिराळ्या बाजूंनीं तोफा डागून किल्ल्यावर सरबत्ती सुरू करण्याचें ठरलें. कोणताही किल्ला जेरीस आणावयाचा म्हणजे त्याच्यावर एकाच वेळीं सर्व बाजूंनीं हल्ले व्हावयास पाहिजेत, हें जरूरच आहे. व त्याप्रमाणें कर्नल प्रॉथर यानें आपल्या सैन्याची निरनिराळ्या ठिकाणीं विभागणी केली होती. पण लष्करी कारणांशिवाय आणखीहि एका कारणासाठीं अशी व्यवस्था करणें जरूर होतें. कारण इतकें सगळें सैन्य त्या उन्हाळ्याच्या दिवसांत रायगडच्या पायथ्याशीं एकाच ठिकाणीं ठेवण्यांत आलें असतें, तर रायगडचा किल्ला हस्तगत करण्याचें बाजूलाच राहून तें सगळें सैन्य पाण्यावांचून तहानेनें तडफडून मेलें असतें. निरनिराळ्या ठिकाणीं सैन्याची वांटणी करण्यांत आल्यानंतर रायगडच्या डोंगरावर तोफा चढविण्याचें

काम सुरू करण्यांत आलें. पण हें कांहीं हलकें काम नव्हतें. इतर किल्ल्यांची गोष्ट वेगळी; परंतु रायगड हा किल्ला उंचीला सगळ्यांत जास्त आणि चढण्याला अतिशय अवघड. तेव्हां अशा डोंगरांतून तोफा वर चढविण्याला इंग्लिशांना त्रास पडणें हें अगदीं साहजिकच होतें. तरी पण जेथून किल्ल्यावर मारा करितां येईल, अशी आजूबाजूच्या डोंगरांचीं कांहीं टोकें पाहून तेथें मोर्चे बांधण्यांत आले व त्यांवर कांहीं तोफा उभारण्यांत आल्या. परंतु रायगडच्या किल्ल्याची रचनाच अशी कांहीं विलक्षण आहे कीं, त्यामुळें जेथें तोफांचे गोळे जाऊन पडायला पाहिजेत, तेथें ते लागू होत नव्हते. शिवाय किल्ल्याला एका पाठीमागें एक आणि एकापेक्षां अधिक उंचीवर दुसरा असे पांचसांत दरवाजे होते. इतके दरवाजे जेव्हां फुटतील, तेव्हां शत्रूचा आंतील किल्ल्यामध्यें प्रवेश व्हावयाचा, अशी स्थिति असल्यामुळें इतर किल्ल्यांचा जसा पटापट पाडाव करितां आला, तसा हा किल्ला आपल्याला स्वाधीन करून घेतां येणें शक्य नाहीं, असें तेथील इंग्रजी अधिकाऱ्यांना वाटूं लागलें होतें. व मुंबई सरकारलाही या गोष्टीची जाणीव होती. म्हणून गुजराथेंतून नुकत्याच परत आलेल्या ६७ व्या पायदळ पलटणीमधील सहा कंपन्या कर्नल प्रॉयर याच्या मदतीला मुंबई सरकारकडून पाठविण्यांत आल्या. आणि मालवणच्या बाजूचे किल्ले सर करून घेण्याकरितां जी ८९ वी पलटण गेली होती, तिच्यापैकींही आणखी एक तुकडी रायगडच्या सैन्याच्या मदतीला येऊन पोंचली. व आणखी कांहीं मोठमोठ्या तोफाही मुंबईहून मदतीस यावयाच्या होत्या. इतक्या गोष्टी होईपर्यंत मे महिन्याची ४ थी तारीख येऊन पोंचली. एप्रिलच्या २५ तारखेपासून मे महिन्याच्या ४ थ्या तारखेपर्यंतचे मध्यंतरींचे इंग्लिशांचे हे आठदहा दिवस निव्वळ तयारी करण्यामध्येंच गेले. व या मुदतीनंतर त्यांची साधारणपणें तयारी झाली. पण इतके दिवस देखील त्यांना तयारी करण्याला आपल्या लोकाकडून स्वस्थपणानें मिळूं द्यावयाला नको होतें. शत्रूची तयारी होऊन ते किल्ल्याच्या दरवाजाजवळ येतील किंवा किल्ल्यांत येतील, तेव्हां आपण त्यांच्यावर हल्ला करूं आणि त्यांचा समाचार घेऊं, अशा समजुतीनें किल्ल्यांतील लोकांनीं आठदहा दिवसांच्या मुदतीमध्यें स्वस्थ बसणें बरोबर नव्हतें. शत्रूचें सैन्य रायगडच्या पायथ्याशीं येऊन तळ देऊन राहिलें आहे, हें समजल्याबरोबर रायगडावरच्या तोफांनीं त्यांना आपल्या दारूगोळ्यानें भाजून काढायला पाहिजे होतें. व शत्रूचे लोक आजूबाजूच्या निरनिराळ्या डोंगरांच्या टोंकांवर चढून तेथें आपल्या तोफा डागण्याकरितां मोर्चे बांधण्याचें काम करीत असतां त्यांना तेथें येऊं द्यावयाचें नाहीं. त्यांनीं तेथें बांधलेले मोर्चे उडवून टाकावयाचे, त्यांनीं तेथें डागलेल्या तोफा जायबंदी करावयाच्या. त्यांचे गोलंदाज मारून टाकावयाचे आणि त्यांचा दारूगोळा पेटवून द्यावयाचा, हीं कामें किल्ल्यावरील तोफांनीं या वेळीं करावयाला पाहिजे होतीं. किल्ल्यांत जो इतका दारूगोळा सांठवून ठेविलेला होता, तो कशासाठीं? किल्ल्यांत ज्या इतक्या मोठमोठ्या तोफा ठेवण्यांत आलेल्या होत्या, त्यांचा दुसरा काय उपयोग? आणि किल्ल्याच्या तटांच्या भिंतींना चौफेर मारा करतां यावा म्हणून जीं मोठमोठालीं भोकें किल्ला बांधणारांनीं मुद्दाम ठेवून दिलेलीं होतीं, त्यांचा तरी दुसरा हेतु काय होता? पण पडत्या काळामध्यें मूळच्या कर्त्या पुरुषांचे हेतु आणि उद्देश सगळे बाजूला राहतात; आणि जे दरवाजे शत्रूला अडविण्याकरितां म्हणून

योजिलेले असतात, त्यांतूनच घरभेदेपणा शत्रूला हळूच आंत घेतो; आणि शेंकडों हत्तींनीं आपल्या गंडस्थळाच्या टकरा मारल्या, तरी ज्या अभेद्य दरवाजावरील लोखंडाच्या सुळक्यांनीं हत्तींचीं गंडस्थळें फुटतील, पण जे दरवाजे फुटावयाचे नाहींत, असले अभेद्य किल्ल्यांचे अभेद्य दरवाजे फितुरीच्या, घरभेदेपणाच्या आणि हरामखोरपणाच्या नुसत्या स्पर्शाबरोबर शत्रूच्या प्रवेशाकरितां एकदम सताड उघडे होतात ! इंग्लिशांचे लोक आजूबाजूच्या डोंगरांवरून मोर्चे बांधीत होते, त्या वेळीं किल्ल्यावरच्या तोफांनीं त्यांच्यावर आपला भडिमार केला नसेल, असें नाहीं. पण नुसत्या वरच्या तोफांनींच एकट्यांनीं भडिमार करून काय व्हावयाचें आहे ! वरच्या तोफांच्या कामगिरीला किल्ल्याच्या खालच्या लोकांनींही मदत करावयाला पाहिजे; तरच कांहीं तरी कार्य होणार. नाहीं तर किल्ल्यावरच्या लोकांनीं तोफा सोडाव्या आणि खालच्या लोकांनीं इमान सोडावें, अशी स्थिति झाली, तर मग काय करावयाचें ! ज्या वेळेला शत्रु आपल्या किल्ल्यावर चाल करून येईल, त्या वेळेला किल्ल्यावरचे लोक आणि किल्ल्याच्या खालचे लोक या दोघांच्या कचाटीमध्यें जर शत्रूचें सैन्य पकडलें गेलें, तरच त्याचा फडशा उडणें शक्य आहे. अशा वेळीं किल्ल्यावरचे शिबंदीचे शिपाई वरून शत्रूवर तोफाचे गोळे सोडीत असतां खालच्या आजूबाजूच्या गांवांतील स्वामिनिष्ठ लोकांनींही करावयाचें असें एक कर्तव्यकर्म असतें. आणि तें असें कीं, आपला किल्ला आपल्यापासून घेण्याकरितां जो शत्रु आपल्यावर चाल करून आलेला असेल, त्याला आपण अन्नपाणी, दाणावैरण वगैरे कांहीं एक मिळूं द्यावयाचें नाहीं; आणि अशा रीतीने त्याची चोहोबाजूंनीं अडवणूक करून त्याला 'मी या अडचणीच्या मुलुखात कोठून आलों !' असें करून सोडावयाचें. किल्ल्यावरच्या गरनाळांनीं, बंदुकांनीं आणि बाणांनीं शत्रूचे जितके लोक मारतां येतील, त्याच्यापेक्षां शत्रूचे जास्त लोक—इतकेंच नव्हे, तर शत्रूचें सगळें सैन्यच्या सैन्य—आजूबाजूच्या गांवच्या रहिवासी लोकांना या अडवणुकीच्या अगदीं साध्या उपायानें सहज मारून टाकतां येण्यासारखें असतें. पण तसें करण्याला लोकांमध्यें स्वदेशनिष्ठा, स्वामिनिष्ठा, ऐक्यनिष्ठा वगैरे सद्गुण जरूर लागत असतात. नेपोलियनचें प्रचंड सैन्य रशियावर स्वारी करण्याकरितां रशियामध्यें शिरलें, तेव्हां तेथील स्वदेशनिष्ठ लोकांनीं काय केलें ? शत्रूला अन्नपाणी आणि दाणावैरण मिळूं नये, म्हणून त्यांनीं आपलीं उभीं शेतें जाळलीं, पण शत्रूला वैरणगोटा त्यांनीं मिळूं दिला नाहीं ! त्याचप्रमाणे औरंगजेबाचे लक्षावधि सैन्य महाराष्ट्राचा उच्छेद करण्याकरितां महाराष्ट्रामध्यें उतरलें असतां आपल्याकडील धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनीं त्या एवढ्या मोठ्या प्रचंड सैन्याला आपल्या हाताखालील थोड्याशा लोकांनिशीं कसें जेरीस आणलें ? त्यांना अडचणींत नेऊन गनिमी काव्यानें त्यांचा उच्छेद करण्यांत आला. तो पूर्वीचा गनिमी कावा आजही आपल्यामध्यें उरलेला नाहीं, असें नाहीं. पण फक्त त्याची दिशा मात्र थोडीशी उलटी झालेली आहे. ज्या गनिमी काव्याच्या प्रयोगानें आपण शत्रूला जिंकावें, त्याच गनिमी काव्याचा प्रयोग हल्लीं आपण एकमेकांवर करीत असून आपल्या फितुरीच्या आणि विश्वासघाताच्या गनिमी काव्यानें आपण आपल्या देशाला गुलामगिरीच्या चिखलामध्यें कायमचें रोवून टाकण्याचें सत्कृत्य करीत आहों ! रायगडचा किल्ला घेण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य रायगडच्या घेऱ्यामध्यें आलें,

त्या वेळेला आसपासच्या लोकांनीं त्यांना जेरीस आणण्याला जे उपाय करावयाला पाहिजे होते, ते कोणी केले नाहींत. सगळे लोक उदास आणि कर्तव्यमूढ झालेले होते. दुसरी एक आपल्या लोकांची चुकीची समजूत झालेली असते, ती अशी कीं, रायगडावर इंग्लिशांचा हल्ला आला, तर अशासारख्या वेळीं आपण काय करावयाचें! आपण सामान्य लोक म्हणजे कांहीं पगार देऊन लढण्याकरितां ठेवलेले शिपाई नव्हे! जे पगारी शिपाई असतील, ते वाटेल तर लढतील आणि त्यांचा वाटेल तर जय होईल किंवा पराजय होईल! आपल्याला त्याच्याशीं काय कर्तव्य आहे! असली उदासीनपणाची जी आत्मघातकी वृत्ति आपल्यामध्यें बऱ्याच ठिकाणीं दिसून येते, ती आपण आपल्या समाजामधून समूळ काढून टाकली पाहिजे. आपल्य देशाच्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याकरितां कोणी शत्रु आला, तर अशा वेळीं आपण सगळेजण हे आपल्या देशाचे शिपाई आहोंत आणि पगारी शिपायांपेक्षां आपण बिनपगारी लोक हे जास्त मोठ्या दर्जाचे शिपाई आहोंत अशी भावना आपल्या सर्वांच्या मनांमध्यें दृढमूल झाली पाहिजे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर संकट आलें, तर आपण सगळ्यांनीं पटापट गोळा व्हावयाचें आणि आपल्यांतीलच कोणी तरी प्रमुख करून त्याच्या हाताखालीं आणि हुकुमाखालीं व्यवस्थित रीतीनें जें जरूर असेल तें कार्य करावयाचें, ही जी ग्रीक, स्पार्टन आणि रोमन लोकांमधील पद्धत त्या पद्धतीनें वागण्याला आपण शिकलें पाहिजे. पण सन १८१८ मध्यें जेव्हां इंग्लिश लोक शिवाजीचा किल्ला घेण्याकरितां आले, तेव्हां शिवाजीचें नाव आणि शिवाजीची स्फूर्ति हीं लोकांच्या अंतःकरणांतून मरण पावलेली होती; आणि जिकडे तिकडे बाळाजीपंती स्फूर्ति उत्पन्न होऊं लागली होती! इंग्लिशांच्या सैन्याला रायगडच्या घेऱ्यात दाणागोटा मिळूं देऊं नये, ही कल्पना कोणाच्या मनांत आली असेल किंवा नसेल, याच्याबद्दल तर शंकाच आहे. पण उलट आपल्या धान्याधुन्याला आणि वैरणकाडीला जास्त भाव येत आहे, तर आपल्या शेजाऱ्याच्या आधीं आपण आपला माल इंग्लिशांच्या कॉमिसरीअॅट डिपार्टमेंटच्या ऑफिसमध्यें नेऊन विकला पाहिजे, अशाही कदाचित् अहमहमिका त्या वेळीं तेथील लोकांच्यामध्यें सुरू झाल्या असतील! पण ते लोक इतक्यावर थांबते तरीही फारसें कांहीं वाईट नव्हतें. पण कित्येकांची फितुरी आणि हरामखोरी इतकी पुढें गेलेली होती कीं, जेथून गोळा टाकला असतां नेमका किल्ल्यावर जाऊन पडेल, अशीही एक जागा रायनाक महार या नांवाच्या एका इसमानें इंग्लिशांना दाखवून दिली! पण या विश्वासघाताच्या कृत्यासाठीं त्या बिचाऱ्या अप्रबुद्ध आणि दरिद्री मनुष्यालाच काय नांवें ठेवावींत! जेथें ब्राह्मणाच्या सारख्या सुप्रबुद्ध आणि धनाढ्य लोकांमध्येंही बाळाजीपंती वळण दररोज अवशीपहाटे गिरविण्यांत येऊं लागलेलें आहे, तेथें त्या गरीब बिचाऱ्या रायनाक महाराला दोष कोणत्या तोंडानें द्यावयाचा! त्या बिचाऱ्याला आपलें राज्य म्हणजे काय, आपला देश म्हणजे काय आणि त्या देशाचें स्वातंत्र्य म्हणजे काय, हें कोठून माहींत असणार! त्याचें टीचभर पोट हेंच त्याचें हिंदुस्थानचें राज्य आणि हाच त्याचा हिंदुस्थान देश! त्या आपल्या टीचभर पोटाची खांच भरली, म्हणजे त्याच्या कल्पनेलाही अज्ञात अशा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची त्यानें काय म्हणून फिकीर बाळगावी! तरी पण आपण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, विश्वासूपणा

आणि स्वामिनिष्ठा हा एक नैसर्गिक धर्म आहे. कुत्र्यासारखा बिनशिकलेला आणि बिनशिकणारा प्राणीदेखील कधीं बेइमान होत नाहीं, हें पाहून तरी बेइमानी लोकांनीं इमान शिकण्याच्या कामांत कुत्र्यांकडून धडे घ्यावे !

पण या वेळीं रायगडच्या किल्ल्यावर हल्ला करणाऱ्या इंग्लिश लोकांना पाठीमागून शह देण्याकरितां कोणीच पुढें सरसावले नाहींत, असें नाहीं. पूर्वी वायरलेस टेलिग्राफीचीं साधनें जरी अस्तित्वांत आलेलीं नव्हतीं, तरी एका किल्ल्यावरची बातमी आसपासच्या किल्ल्यावर कळविण्याचे कांहीं मार्ग त्या वेळच्या लोकांनींही योजिलेले होते. आणि तोफांच्या आवाजांनीं, किंवा मोठाले जाळ पेटवून किंवा इतर कांहीं खुणांनीं ते लोक आपल्या बातम्या दुसऱ्यांना कळविण्याचा कार्यभाग साधून घेत असत. अशा कांहीं उपायांनीं अगर जासुदांच्या निरोपांनीं रायगडापासून कांहीं थोड्या अंतरावर राहणारे रायगडाचे दोन धाकटे भाऊ—कांगोरीचा किल्ला व प्रतापगडचा किल्ला—यांना आपल्या वडील भावावर गुदरलेल्या प्रसंगाची बातमी कळली; व ही बातमी कळतांक्षणींच त्या दोन्ही किल्ल्यांवरचे मिळून कांहीं लोक खालीं उतरले; व रायगडावरचा किल्लेदार इंग्लिशांच्या सैन्यावर किल्ल्यावरून गोळे फेकीत असतां, आपण पाठीमागून जाऊन त्या शत्रूच्या सैन्याला दोहोंकडच्या माऱ्यामध्यें गांठावें, असा त्याचा विचार होता. आणि त्या उद्देशानें प्रतापगडच्या आणि कांगोरीच्या किल्ल्यांच्या पायथ्याशीं सावित्री नदीच्या कांठीं पोलादपूर म्हणून जें एक गांव आहे, तेथें हे लोक जमा झाले. परंतु हे लोक पाठीमागून आपल्या सैन्यावर छापा घालण्याकरितां येत आहेत, असें कळल्याबरोबर लेफ्टनंट कांसबी हा त्या लोकांवर चालून गेला. विजयश्रीच्या लहरी पक्षपातामुळें मराठे शिपायांच्या त्या वेळच्या त्या प्रयत्नाला यश आलें नाहीं.

ही गोष्ट घडून आल्यानंतर आणि रायगडच्या सभोंवतालीं तोफा डागण्याचें काम पुरें झाल्यानंतर रायगडच्या किल्ल्यावर इंग्लिशांनीं विशेष जोरानें तोफांचा भडिमार करण्याला सुरवात केली. मे महिन्याच्या ४।५ तारखेपासून लढाईला विशेष जोर येऊं लागलेला होता. व किल्ल्यावरचे लोक मोठ्या शौर्यानें आपल्या किल्ल्याच्या बचावाचें काम करीत होते. किल्ल्यामध्यें त्या वेळीं श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पत्नी, वाराणशीबाई, या होत्या, हें पूर्वी सांगितलेंच आहे. आणि त्यामुळें किल्ल्याचा बचाव करण्याची आपल्यावर किती मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे, याची तेथील किल्लेदाराला पूर्ण जाणीव उत्पन्न झालेली होती. हा किल्लेदार शेख अबदुल या नांवाचा एक अरबच असून त्याच्या हाताखालीं अरब, सिंधी, मराठे, पठाण, गोसावी, वगैरे निरनिराळ्या जातींचे मिळून सुमारें १००० शिपाई होते. आणि ते सर्वजण रात्रंदिवस एकसारखे लढून किल्ल्याच्या संरक्षणासाठीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करित होते. सर्वांच्या अंगांत वीरश्रीचें वारें शिरलेलें होतें; आणि स्वदेशभक्ति व स्वामिनिष्ठा यांच्या योगानें त्यांच्या शरीरांतील सामर्थ्य द्विगुणितपणानें वृद्धिंगत झालेलें होतें. हें स्वातंत्र्यदेवतेचें माहेरघर आहे, हा सगळ्या किल्ल्यांचा राजा आहे, हा शिवाजीमहाराजांचा किल्ला आहे, हा रामदासांच्या भगव्या झेंड्यांचा आधारस्तंभ आहे, अशा प्रकारच्या उच्च भावनांनीं प्रज्वलित झालेलीं त्या स्वातंत्र्याच्या योद्धयांचीं अंतःकरणें त्यांच्या मनगटांमध्यें दैवी सामर्थ्याची प्रेरणा करीत होतीं. सगळ्या महाराष्ट्रांतील एका अतिशय

उंच अशा रणक्षेत्राच्या रंगभूमीवर आपण हें स्वातंत्र्याचें युद्ध खेळत आहों, या वेळीं महाराष्ट्रांतील सगळया लोकांचे डोळे आपल्याकडे खालून वर लागलेले असतील ! आणि आजपर्यंत आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां लढून आणि धारातीर्थी देह ठेवून जे मुक्त झाले, ते सगळे महाराष्ट्रवीरही क्षणभर या युद्धदर्शनाच्या कुतूहलासाठीं तात्पुरते वायुमय देह धारण करून आकाशांतून खालीं आपल्याकडे पाहात असतील ! तेंव्हां अशासमयीं आपण पूर्ण शौर्यानें लढलें पाहिजे, अशा भावनेनें त्या सर्वांचीं मनें उद्दीपित झालेलीं होतीं. शिपायांची धांवपळ साऱ्या किल्ल्याभर चाललेली होती, आणि तोफेंत भरलेला दारूगोळा पेटून उडला जाण्याला जो अवकाश लागत होता, तोही गोलंदाजांना सहन होत नव्हता, इतकी त्यांची उत्सुकता वाढलेली होती. आणि एक शिपाई जायबंदी झाला, तर त्याची जागा घेण्याला दुसरा शिपाई पुढें आला नाहीं, असा एक क्षणही त्या वेळीं फुकट जात नव्हता. किल्ल्यावरील तोफांनीं किल्ल्याच्या सभोंवतीं इतका धूर पसरवून दिला होता कीं, तें जर चैत्रवैशाखाचे दिवस नसते, तर हें इतकें दाट धुकेंच पडलें आहे कीं काय असा कोणालाही भ्रम झाला असता. किल्ल्यावरचे सर्व शिपाई अशा रीतीनें आपणच होऊन मोठ्या शौर्यानें आणि उत्साहानें लढत होते. पण बाजीरावाच्या पत्नी, श्री० सौ० वाराणशीबाई, याही त्यांना प्रोत्साहन देत होत्या; आणि एखादी आई आपल्या मुलांचें कौतुक करते त्याप्रमाणें शिपायांच्या पराक्रमांना त्या वरचेवर शाबासकी देत होत्या. त्यामुळें वीररस आणि वात्सल्यरस यांच्या संमिश्रणाच्या योगानें त्या सर्व शिपायांचीं अंतःकरणें एकाच वेळीं कठोरही झालीं होतीं आणि कोमलत्वही पावलेलीं होतीं.

इतक्या निस्सीम आणि निर्मळ अशा प्रकारच्या या प्रयत्नांना यश यावयाला पाहिजे होतें ! पण तें येणार कसें ? हिंदुस्थान देशाच्या दुर्धर भवितव्यतेला आतां कोठें सुरवात होऊं लागलेली होती ! आणि त्यामुळें इंग्लिशांच्या बाजूकडील खालच्या खालच्या जागेवरील मोर्च्यांवरून येणारे तोफेचे गोळे, जे अजून किल्ल्यापर्यंत येऊं शकत नव्हते, तेही आतां जास्त उंचावरच्या जागेवरून किल्ल्यांत येऊन पडण्याला सुरवात झाली. किल्ल्यावर इंग्रजी तोफांचा मारा लागूं होण्याच्यापूर्वी ले. कर्नल प्रॉथर यांनीं बाजीरावसाहेबांच्या कुटुंबाकरितां म्हणून एक पासपोर्ट पाठविला. त्या पासपोर्टचा अर्थ असा कीं, तुम्हीं किल्ल्यांतून निघून बाहेर पडून दुसरीकडे जाऊं इच्छित असलां, तर तुम्हांला आम्ही सुरक्षितपणें जाऊं देतों ! असा हा परवाना देण्याबद्दलचा निरोप पाठविणे या एका गोष्टीमध्यें किती तरी अनेक इंग्रजी युक्त्या सांठविलेल्या होत्या ! इंग्लिश लोक हे स्त्रियांच्याबद्दल फार उदार असतात, आणि बाजीरावसाहेबांपाशीं जरी ते दुसरीकडे लढत होते तरी त्यांच्या स्त्रियांच्या केसालाही धक्का न लागूं देण्याची ते दक्षता बाळगीत होते, आणि या बाबतींत कित्येक रानटी मुसलमान सरदारांपेक्षां इंग्लिश अधिकाऱ्यांचें हें वर्तन किती तरी ज्यास्त दाक्षिण्ययुक्त आहे असा फुकटचा लौकिक यांत एक सहजगत्या अडाणी लोकांच्या दृष्टीनें मिळून जातो ! पण असल्या कृत्रिम सौजन्याच्या निरोपाखालीं किती तरी राजकीय डाव दडवून ठेवण्यांत आलेले असतात ! हा इंग्लिशांच्या सौजन्याचा निरोप म्हणजे किल्ल्याच्या आंतील लोकांमध्यें-बाजीरावसाहेबांच्या पत्नी व किल्लेदार यांच्या ऐक्याच्या दृष्टीमध्यें-हळूहळू फूट पाडणारी ही एक लहानशी

पाचरच होती ! असा सुरक्षिततेचा निरोप पोंचल्यानंतर वाराणशीबाईंना वाटावें कीं, आपल्याला आयता पासपोर्ट मिळतो आहे, तर आपण या संकटामध्यें विनाकारण कशाला सांपडावें ! आणि तो पासपोर्ट घेऊन वाराणशीबाई किल्ल्यांतून सुरक्षितपणें निघून गेल्या, तर पाठीमागें किल्लेदार आणि त्याचे शिपाई यांना साहजिकपणेंच असें वाटणार कीं, बाईसाहेब पासपोर्ट घेऊन निघून गेल्या, तर मग आतां आम्हांला तरी पाठीमागें किल्ला लढवून काय करावयाचें आहे ! असे विचार उत्पन्न होऊन किल्ला आयताच आपल्या घशामध्यें उतरावा, अशी या इंग्रजी पासपोर्टमध्यें झांकलेली युक्ति होती. दुसरे कोणीही असते, तर ते या साध्या युक्तीच्या आणि या इंग्रजी संभावितपणाच्या जाळ्यामध्यें सांपडल्यावांचून खात्रीनें राहिले नसते !

पण सुदैवानें वाराणशीबाई या तशा नव्हत्या. त्यांनीं या मायावीपणाच्या पासपोर्टच्या निरोपाला झिडकारून टाकलें आणि त्या किल्लेदाराला म्हणाल्या, “ मी असल्या या फसवेगिरीच्या मोहाला कधींही बळी पडणार नाहीं ! मी तुमच्या संरक्षणाखालीं इतके दिवस येथें येऊन राहिलें; आणि आतां मी तुम्हांला संकटांत टाकून आपल्या देशाच्या शत्रूच्या संरक्षणाखालीं जाईन, असें तुम्हांला वाटतें ? तुम्ही माझ्या संरक्षणासाठीं आपल्या जीवावर उदार झालां आहां ! अशा वेळीं माझ्या जीवाच्या संरक्षणासाठीं तुमचे जीव धोक्यांत घालून मी कशी जाईन ? मनुष्यप्राण्याला इतकें कृतघ्न कसें होतां येईल ! किल्लेदार ! शेख अबदुल ! मीं आपल्या जीवाच्या बचावासाठीं येथून एक पाऊलभर देखील हालणार नाहीं ! तिकडच्या जीवावर दररोज लढाईचीं हजारों संकटें कोसळत असतांना मीं आपल्या या यःकश्चित् जीवाच्या बचावासाठीं त्यांच्या शत्रूच्या संरक्षणाखालीं कशी जाईन ? किल्लेदार ! येथील माझ्या सहवासानें माझ्या पोटच्या मुलांच्याप्रमाणें या तुमच्या सगळ्या शिपायांवर माझें मातृप्रेम जडलेलें आहे. या माझ्या मुलाबाळांना टाकून मी कोठें जाऊं ! किल्लेदार ! तें कांहीं नाहीं ! आपण सगळेजण या किल्ल्याच्या तटावर उभे राहून शत्रूला मारूं किंवा मरूं ! हा त्या शिवाजीमहाराजांचा किल्ला आहे ! या पवित्र किल्ल्याला आपल्या कमकुवतपणानें आपण कोणत्याही प्रकारचा कलंक लावतां कामां नये !

एका अबलेच्या तोंडचे हे शब्द ऐकून कोणत्या शूर शिपायाच्या मनामध्यें रणसंग्रामाचा उत्साह उचंबळून येणार नाहीं ! पण कांहीं वेळानें या सगळ्या उत्साहाचा फारसा कांहीं उपयोग होईनासा झाला. शत्रूचे गोळे एकामागून एक किल्ल्यांत येऊन पडूं लागले व शत्रूचे लोक खालच्या जागेवरील तोफा जास्त उंचावरच्या जागेवर ओढून आणून तेथून गोलंदाजी करूं लागले. आणि रायनाक महारानें दाखवून दिलेल्या जागेवर डागलेल्या तोफेचे गोळे तर अगदीं नेमक्या–नेमक्या ठिकाणींच येऊन पडूं लागले. फितुरीच्या गोळ्याचा नेम सहसा कधीं चुकत नाहींच ! ते नेहमीं अचुकच मारा करतात ! या फितुरीच्या गोळ्यांनीं किल्ल्यावरील एक एक इमारत हळुहळू जमीनदोस्त होऊं लागली. किल्ल्यावरचीं शिपाईलोकांचीं घरें पेटलीं. किल्ल्यावरच्या मशिदी आणि महादेवाचीं देवळें यांतून धूर निघूं लागले. किल्ल्याच्या बुरजांच्या भिंती धडाधड कोसळूं लागल्या. किल्ल्यांतील अनेक तळ्यांमधून आजूबाजूच्या दगडी कोसळून तीं पाण्याच्या तळ्याऐवजीं चिखलाचीं

डबकीं झालीं. शिवाजीमहाराजांच्या वेळच्या ज्या कांहीं जुन्या इमारतींच्या दगडी भिंती उभ्या होत्या, त्यांचेही दगड कोसळून पडूं लागले. फार काय, खुद्द शिवाजीमहाराजांची जी समाधि होती, तीही कोसळून पडणाऱ्या दगडांच्या आणि विटांच्या ढिगाखालीं दिसेनाशी झाली. शिवाजमिहाराजांच्या वेळचा जो एक वाडा होता, त्या वाड्याला आग लागून त्याच्या ज्वाळा आकाशांत जाऊं लागल्या. किल्ल्यावर पिण्याला पाणी नाहीं, खाण्याला अन्न नाहीं, आणि राहण्याला जागा नाहीं, अशी ही दुर्धर स्थिति उत्पन्न होत चालली होती, तरी इमानी मुसलमान किल्लेदार शेख अबदुल आणि त्याच्या हाताखालचे अरब आणि पठाण, मराठे आणि गोसावी, हे लढाईची शिकस्त करीतच होते, व आपल्या चोहों बाजूंनीं कोसळणाऱ्या इमारती, जळणारे राजवाडे, जळून गेलेल्या घरांच्या राखेचे ढीग आणि मेलेल्या शिपायांचीं प्रेतें, यांच्यामध्यें शौर्यानें आणि शांतवृत्तीनें उभ्या राहून वाराणशीबाई ह्या आपल्या पुत्रवत् मानलेल्या त्या शिपायांना न हटतां लढाई चालू ठेवण्याबद्दल एकसारख्या प्रोत्साहन देत होत्या. तरी पण आपल्या देशाचें दुर्दैव असें कीं, इतक्याही मानवी प्रयत्नांनीं अखेरीस यश येण्याचीं कांहीं चिन्हें दिसतना! त्या वेळीं किल्ल्याच्या भिंतींना असें वाटूं लागलें कीं, आपण वर्षानुवर्षे येथें फुकट उभें राहून काय केलें? तेव्हां आतां तरी आपण आपल्या जन्माचें सार्थक करूं या आणि आतां आपल्याला कोसळावयाचेंच असेल, तर आतल्या बाजूला आपल्याच लोकांच्या अंगावर न कोसळतां बाहेरच्या बाजूला तरी आपल्या या देहाचा देशकार्यासाठीं कडेलोट करूं या! आणि असें करतांना त्यात आपल्याखालीं आपण शत्रूच्या पाचपन्नास लोकांना चिरडून टाकलें, तर तेवढें तरी पुण्य आपल्याला लागेल! किल्ल्याच्या पठारावर अनेक लहान मोठे दगड पसरलेले होते. त्यांनाही शिवाजीमहाराजांच्या त्या आवडत्या किल्ल्याची ही दशा झालेली पाहून रडूं येऊं लागलें! आणि ते आपल्या आसपासच्या लोकांना असें म्हणूं लागले कीं, 'अहो! आम्हाला तरी कोणी येथून उचलून खालीं शत्रूच्या अंगावर ढकलून द्या हो! म्हणजे आम्ही तरी त्यांना चिरडून टाकूं आणि त्यांच्या मार्गांत आडवे होऊन त्यांना वर येऊं देणार नाहीं! किल्ल्यांत तेलाच्या कढया किती तरी सांठवून ठेविलेल्या होत्या. त्या सगळ्या विस्तवावांचून क्रोधानेंच संतप्त होऊन असें म्हणूं लागल्या कीं, आम्ही आधींच तापलेल्या आहोंत. आतां आमच्यांत तेल ओतून खालीं थोडा जाळ लावा, आणि आमच्यांतील तापलेलें तेल शत्रूच्या अंगावर ओता, म्हणजे तें तेल तरी त्यांना भाजून काढील हो!'

अशा प्रकारची त्या किल्ल्यावरील सर्व सचेतन आणि अचेतन वस्तूंमध्यें रणसंग्रामाची एक प्रकारची अत्यंत तीव्रता उत्पन्न झालेली होती; आणि अजूनही प्रयत्न केले, तर यश येईल, अशी आशा वाटत होती. यासाठीं एकीकडे परमेश्वराचे धांवे करण्यांत येत होते आणि दुसरीकडे शत्रूवर निरनिराळ्या प्रकारचीं शस्त्रास्त्रें फेंकण्यांत येत होतीं. अजूनही अगदींच निराशा झालेली होती, असें नाहीं. कारण किल्ल्यांतील बाकीच्या ठिकाणांवर जरी इंग्लिशांचे गोळे येऊन पडत होते, तरी किल्ल्यांतील दारूचें कोठार हें अद्यापि सुरक्षित होतें. त्याच्या जोरावर "आम्हांला खावयाला अन्न नसलें, तरी हरकत नाहीं, पण आम-

च्यापाशीं जोंपर्यंत दारूगोळा आहे, तोंपर्यंत आम्ही लढल्यावांचून रहाणार नाहीं, " अशा प्रकारचें निर्वाणीचें आश्वासन किल्लेदार शेख अबदुल हा वाराणशीबाईंना देत होता. पण हें त्याचें बोलणें ता. ६ मे रोजीं तिसऱ्या प्रहरीं चार वाजण्याचे सुमारास चाललेलें असतांना रायनाक महाराच्या फितुरीचा एक गोळा नेमका दारूगोळ्याच्या कोठारावर येऊन पडला ! आणि साऱ्या किल्लाभर एकच भडका उडून गेला !

दारूगोळ्याच्या कोठाराला आग लागल्यामुळे त्याचा धक्का इतका मोठा बसला कीं, तो सगळा रायगडचा डोंगर क्षणभर हदरून गेल्यासारखा वाटला; आणि त्याचा गडगडाट आकाशामध्यें इतक्या मोठ्यानें दुमदुमून गेला कीं, स्वर्गस्थ आत्मेही त्याच्या योगानें दचकून जाऊन इकडे तिकडे पाहूं लागले ! त्या वेळीं एका बाजूला तान्हाजी मालुसरे आणि दुसऱ्या बाजूला बाजी देशपांडे व त्यांच्या मध्यभागीं शिवाजीमहाराज, असे त्रिवर्ग नंदनवनामध्यें अमृतपान करीत बसलेले होते. त्यांनीं खालीं दृष्टि फेंकली, तों आपल्या रायगडावरून आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट रायगडावरची दुःखदायक बातमी आपल्याला सांगण्याकरितां आपल्याकडेच येत आहेत, असें त्यांना आढळून आलें. त्याबरोबर आपल्यापुढलि अमृताचे चषक बाजूला सारून ते तिघेही घाईघाईनें वातावरणांतून अदृश्य रूपानें बरेच खालीं उतरले. आणि त्यांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं रायगडच्या परिस्थितीचें सर्व बाजूंनीं बारकाईनें निरीक्षण केलें. त्या वेळीं एका टेकडीवर आपला एक देशबांधव रायगडावर आणखी गोळे कोठें फेंकावे हें इंग्रजी गोलंदाजांना सांगत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला ! आणि तो देखावा पाहून त्या तिघांचीही अंतःकरणें त्या आगीच्या ज्वाळांपेक्षां त्या दिसलेल्या देखाव्यानेंच जास्त करपून गेलीं ! त्या वेळीं त्या तिघांनींही एकदम दुःखाचे दीर्घ निश्वास टाकले; आणि तान्हाजी शिवाजीमहाराजाच्या मुखाकडे पाहून म्हणाला, " महाराज, घोरपडीच्या शेंपटीला दोर बांधून आणि आपला जीव धोक्यांत घालून आम्ही—नव्हे, नव्हे, आपल्या पायांच्या नोकरांनीं कोंडाण्यासारखे किल्ले फुकट काबीज केले ! " " मलाही, महाराज, असेंच वाटतें कीं, बाजी देशपांडेही त्याच वेळीं डोळ्यांतील अश्रु पुशीत पुशीत म्हणाला, " आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं पावनखिंडींतील रस्ता अडवून आणि आपल्या प्राणांचे बळी देऊन आम्हीं आज अखेरीस काय साधिलें ! " हे अशा प्रकारचे दोघांचे उद्गार ऐकून शिवाजीलाही अतिशय वाईट वाटलें व तो दांतओठ खात म्हणाला, " या फितुरीसारखा देशाचा शत्रु दुसरा कोणी नाहीं ! आपल्या देशांतून या फितुरीचा समूळ उच्छेद व्हावा म्हणून मी चंद्रराव मोऱ्यांना आधीं मारून टाकलें ! तरी पण आज त्यांच्या जागीं दुसरे चंद्रराव मोरे उत्पन्न झाले असून तें फिरून आपला देश गुलामगिरींत घालण्याला मदत करीत आहेतच ! आणि आज हा माझा आवडता किल्ला जो जळत आहे, तो इंग्लिशांच्या तोफांनीं जळत नसून, आपल्याच देशबांधवांच्या फितुरीनें जळला जात आहे ! या किल्ल्यावरील हीं माझीं सगळीं पूर्वपरिचित स्थळें उद्ध्वस्त झालेलीं पाहून माझ्या मनाला किती तरी खेद होत आहे ! पण माझे महाल आणि माझे राजवाडे नष्ट झाले, तर ते खुशाल होवोत; पण ज्या महादेवाची मी नित्य पूजा करीत असे आणि जो महादेव मला स्वातंत्र्याच्या स्फूर्ती देत असे, त्या

महादेवाचें देऊळही हें येथें छिन्नविच्छिन्न झालेलें दिसत आहे ! हे महासाध्वि वाराणशीबाई, जेथें देवांनीं आपल्या देवळांची ही स्थिति करून घेतली, तेथें आपण आपल्या नष्ट होणाऱ्या मानवी वैभवाबद्दल खेद करून काय होणार ! असो ! त्याच देवता जेव्हां आपल्या देशावर तुमच्या-सारख्यांच्या सद्‌गुणांनीं आणि सदाचरणांनीं संतुष्ट होतील, त्या वेळीं फिरून आपल्या देशाला हें सगळें पूर्वीचें वैभव लवकरच परत मिळेल ! असें म्हणून वातावरणांतील त्या त्रिमूर्ति नाहींशा झाल्या. पण वाराणशीबाई यांना मात्र आपलें कोणीं तरी अत्यंत कोमल शब्दांनीं शांतवन करीत आहे, असा एक क्षणभर भास झाला !

असो. दारूच्या कोठारालाच आग लागल्यानंतर किल्लेदाराच्या आशेचा शेवटचा तंतु तुटून गेला; आणि आतां आपला याच्यापुढें निभाव लागणें शक्य नाहीं, अशी सर्वांची खात्री झाली. आणि संध्याकाळच्या काळोखाबरोबर किल्ल्यावर जिकडे तिकडे निराशेचाही काळोख पसरूं लागला. जळणाऱ्या राजवाड्यांच्या आणि इतर इमारतींच्या प्रकाशानें तो दोन्हीही प्रकारचा अंधकार कमी न होतां उलट जास्तच भेसुर भासूं लागला. किल्ल्यावरील लोकांची ती रात्र अशा रीतीनें कशी तरी गेली; आणि दुसऱ्या दिवशींच्या प्रातःकाळानें किल्ल्याच्या पायऱ्यांजवळच्या वाडीमध्यें उभय पक्षांच्या लोकांच्या दरम्यान तड-जोडीचें बोलणें चाललेलें पाहिलें ! ता. ७ रोजीं सकाळीं आठ वाजतां उभय पक्षांकडील लोक तहाच्या अटी ठरविण्याकरितां एकत्र बसले. किल्ल्यावरच्या लोकांना विचार करण्याकरितां पांच तासांची मुदत देण्यांत आली. परंतु किल्ल्यावरील लोकांचा कांहीं विचार ठरेना; व सुचविलेल्या अटी कबूल करण्याचें त्यांनीं नाकारलें; तेव्हां ता. ७ रोजीं तिसरे प्रहरीं फिरून गोळीबाराला सुरवात झाली, व तो गोळीबार ता. ८ च्या सकाळपर्यंत चालू होता. त्यानंतर फिरून उभय पक्षांमध्यें तहाचें बोलणें सुरू झालें. किल्लेदार, शेख अबदुल, यानें आपल्याला योग्य अटी मिळाव्यात, म्हणून पुष्कळ आढेवेढे घेतले; आणि अखेरीस ता. ९ रोजीं तिसरे प्रहरापर्यंत वाटाघाटी होऊन एकदांचा उभय पक्षांमध्यें तह ठरला. किल्ल्यावर असलेल्या सर्व शिपाई लोकांना आपलीं हत्यारें आणि आपली खाजगी मालमिळकत बरोबर घेऊन जाण्याला परवानगी असावी; किल्लेदार शेख अबदुल याला आपल्या नोकरांसह आणि हत्या-रांसह पुण्यांत राहण्याची परवानगी असावी; वगैरे अटी ठरून किल्ला खालीं करून देण्याचें मुक्रर झालें. त्याप्रमाणें ता. १० मे रोजीं तिसरे प्रहरच्या सुमारास ले. कर्नल प्रॉथर हा आपल्या लोकांसह किल्ल्यावर जाऊन त्यानें किल्ला आपल्या ताब्यांत घेतला; आणि बाजी-रावसाहेबांच्या पत्नी, वाराणशीबाई, यांच्याबरोबर हत्ती, उंट व शंभर शिपाई असा लवाजमा देऊन त्यांची पुण्याला रवानगी करून देण्यांत आली. इंग्लिशांनीं किल्ला आपल्या ताब्यांत घेतला, त्या वेळीं त्या किल्ल्यावर एकही इमारत जळल्यावांचून धड राहिलेली नव्हती. फक्त धान्याचें एक कोठार मात्र कांहीं एक खराबी न होतां शिल्लक राहिलें होतें. या किल्ल्यावर इंग्लिशांना पांच लाख रुपये रोकड सांपडले, अशी इंग्लिश इतिहास-कारांनीं कबूली दिलेली आहे.

सन १८१८ तील मे महिन्याच्या १० तारखेला रायगडाच्या किल्ल्याची वर वर्णन केल्याप्रमाणें स्थिति झालेली होती. सन १६७४ च्या जून महिन्याच्या ६ व्या तारखेची

रायगडाची स्थिति कोणीकडे आणि या वेळची ही स्थिति कोणीकडे ! सन १६७४ मध्यें शिवाजीचा-नव्हे, महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचा-राज्याभिषेक रायगडावर झाला आणि सन १८१८ मध्यें महाराष्ट्र स्वातंत्र्याच्या सिंहासनावरून पदच्युत होऊन त्याच्या हातापायांत गुलामगिरीच्या बिड्या ठोकण्यांत आल्या ! सन १६७४ मध्यें रायगडावर स्वातंत्र्याचें निशाण चढविण्यांत आलें ! पण सन १८१८ मध्यें त्याच रायगडावरील स्वातंत्र्याचें निशाण खालीं करण्यांत येऊन इंग्रजांचा बावटा वर चढविण्यांत आला ! १४४ वर्षांच्या एवढ्याशा अवधीमध्यें हे इतके फेरफार झाले ! रायगडच्या किल्ल्याचीं फक्त एका दीड शतकामध्यें अशा प्रकारचीं हीं दोन स्थित्यंतरें झालेलीं पाहून ‘ दैवाची गति विचित्र आहे ! ’ याच्याशिवाय कोणाच्या तोंडून दुसरे काय उद्गार बाहेर पडतील !

# महाराष्ट्रांतील किल्ले.

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून सह्याद्रीच्या निरनिराळ्या रांगा चोहों-कडे पसरलेल्या असल्यामुळें महाराष्ट्राची भूमि ही किल्ल्यांच्या उत्पत्तीला नैसर्गिक रीतीनेंच फार अनुकूल अशी आहे; व या कारणामुळें महाराष्ट्रामध्यें किल्ल्यांची जितकी संख्या आहे, तितकी ती इतर कोठे क्वचितच असेल. ह्या सह्याद्रिपर्वताच्या शिवाय महाराष्ट्राच्या रचनेमध्यें आणखी एक विशेष आहे, तो असा कीं, सह्याद्रिपर्वताची रांग उत्तर-पासून दक्षिणेपर्यंत महाराष्ट्राच्या पश्चिमेच्या अंगाला पसरलेली असून त्या सह्याद्रिपर्वताच्या पश्चिमेला थोडक्याच अंतरावर समुद्राचा किनारा लागून राहिलेला आहे; व सह्याद्रि पर्वता-मधून निघालेल्या अनेक नद्यांच्या प्रमाणें त्याच पर्वताच्या उदरामधून जन्म पावलेले अनेक डोंगरही थेट समुद्रकिनाऱ्याला जाऊन मिळालेले आहेत. हे डोंगर जेथें समुद्राला जाऊन मिळाले आहेत, तेथें बहुतेक ठिकाणीं निरनिराळ्या खाड्यांच्या तोंडाशीं किल्ले बांधलेले असल्याचें आपल्याला आढळून येतें. या दृष्टीनें मुंबईपासून गोव्यापर्यंतच्या समुद्रकिनाऱ्याचें आपण निरीक्षण केलें, तर या किनाऱ्याच्या कांठच्या डोंगरांवरून आणि क्वचित् ठिकाणीं समुद्रामध्येंही अनेक किल्ले असल्याचें आपल्याला दिसून येतें. खांदेरीउंदेरी, अलिबागचा किल्ला, रेवदंड्याच्या खाडीच्या जवळील टेकडीवरील किल्ला, जंजिऱ्याचा किल्ला, बाणकोट, मंडणगड, अंजनवेल, जयगड, रत्नागिरी, देवगड, सुवर्णदुर्ग, इत्यादि समुद्रकांठचे किल्ले सुप्रसिद्ध आहेत. हे किल्ले महाराष्ट्राचें समुद्राच्या बाजूकडून संरक्षण व्हावें म्हणून योजण्यांत आलेले आहेत. व त्यांच्याशिवाय बाकीचे जे शेंकडो किल्ले सह्याद्रीच्या डोक्यावर विराजमान होत असलेले साऱ्या महाराष्ट्रभर दिसून येतात, त्यांच्याकडून महाराष्ट्रांतील अंतःप्रदेशाचें संरक्षण केलें जावें, अशी ते किल्ले बांधणारांची अपेक्षा असली पाहिजे, असें दिसतें.

हे जे अनेक किल्ले महाराष्ट्रभर पसरलेले दिसतात, ते आजकालचे बांधलेले आहेत, असें नाहीं. हे किल्ले शिवाजीमहाराजांनीं बांधले, अशी महाराष्ट्रामध्यें सामान्य समजूत आहे. पण ती बरोबर नाहीं. यांच्यापैकीं बहुतेक किल्ले फार पुरातन काळामध्ये बांधले गेलेले असले पाहिजेत, असें त्यांच्या अंतःप्रमाणावरून दिसून येतें. किल्ल्याला संस्कृतमध्यें ' दुर्ग ' असा प्रतिशब्द आहे, हें सर्वांना माहीतच आहे. त्यावरून असें एक स्वाभाविक अनुमान कोणाच्याही मनामध्यें उत्पन्न होतें कीं, या सह्याद्रिपर्वतावरील हीं अनेक दुर्गम स्थळें सृष्टिदेवतेनें जेव्हां निर्माण केलीं असतील, तेव्हांपासून प्रथमतः दुर्गाची कल्पना आणि मागाहून कांहीं काळानें दुर्गांची प्रत्यक्ष रचना त्या त्या ठिकाणीं अस्तित्वांत आलेली असली पाहिजे. ज्यांचे इतिहास हल्लीं लुप्त झालेले आहेत, अशीं किती तरी राज्यें आपल्या या महाराष्ट्रामध्यें आतांपर्यंत होऊन गेलेलीं असलीं पाहिजेत. आणि राज्यें म्हटलीं

म्हणजे त्यांच्या संरक्षणासाठीं त्यांच्याबरोबर किल्ल्यांची कल्पना आलीच. खुद्द वेदांमध्येंही किल्ल्यांच्या कल्पनांचे उल्लेख आढळतात, परंतु त्याच्या नंतरच्या रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांमधून तर त्यांची अवश्यकता आणि त्यांचीं वर्णनें सविस्तर रीतीनें दिलेलीं आहेत. त्याचप्रमाणें कौटिल्याचें अर्थशास्त्र, कामंदकनीति, शुक्रनीति, वगैरेंसारख्या राजकारणा विषयींच्या प्राचीन ग्रंथांमध्येंही किल्ल्यांच्या महत्त्वाचीं वर्णनें आपल्याला वाचावयाला मिळतात. या सगळ्या पुराव्यावरून पहातां हे किल्ले किती जुने असले पाहिजेत, याची कल्पना येते. कित्येक किल्ल्यांवरून जुन्या छिन्नविच्छिन्न झालेल्या देवतांच्या मूर्ति किंवा पूर्वीच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या नक्षींचे नमुनें अद्यापिही कोठेंकोठें पहावयाला मिळतात. व त्यावरूनही या किल्ल्यांचा प्राचीनपणा प्रस्थापित होतो. बौद्धांच्या वेळच्या मूर्ति किंवा त्यांचे अवशेष कांहीं ठिकाणीं सांपडतात; त्यावरून ते किल्ले बौद्धांच्या वेळचे असले पाहिजेत, हें उघड होतें. व पुष्कळ किल्ले पूर्वी महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या कलचूरि, आंध्रभृत्य, शिलाहार, यादव, वगैरे घराण्यांतील हिंदू राजांनींही बांधलेले असले पाहिजेत. त्यानंतर जेव्हा दक्षिणेंत मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या, तेव्हां यांपैकीं कांहीं किल्ले त्यांच्या ताब्यांत गेल्यामुळे तेथें मुसलमानांच्या मशिदींचे आणि त्यांच्या शिल्पकामाच्या पद्धतीचे कित्येक अवशेष आजही पहावयाला मिळत आहेत. अशा रीतीनें फार प्राचीन काळापासून चालत आलेले हे किल्ले जेव्हां शिवाजी महाराजांच्या हातीं आले, तेव्हां त्यांनीं त्यांची डागडुजी केली, व त्यांनीं आपल्या गरजेप्रमाणें कांहीं नवीनही रचना केल्या. पूर्वीच्या काळीं या किल्ल्यांचा कोणी कसा उपयोग केला आणि त्याच्यापासून कोणी किती फायदा करून घेतला, हें समजण्याला प्राचीन इतिहासाचें आज आपल्यापाशीं कांहीं साधन नाहीं. परंतु शिवाजीमहाराजांनीं मात्र या किल्ल्यापासून पूर्ण फायदा करून घेतला, हें महाराष्ट्राचा इतिहास आज आपल्याला प्रत्यक्ष सांगूं शकत आहे. व त्यामुळें शिवाजीच्या वेळेपासून या किल्ल्यांचें महत्त्व पेशवाईच्या अखेरपर्यंत पूर्णपणे कायमही टिकलें होतें.

लढाई करण्याच्या बाबतींतील शिवाजीमहाराजांची पहिली पद्धत आणि पेशव्यांची अखेरची पद्धत यांच्यामध्ये जरी कांहीं अंतर पडलेलें होतें, तरी त्यामुळें पेशवाईच्या अखेरीसही या किल्ल्याच्या महत्त्वाला कोणत्याही प्रकारचा कमीपणा आलेला नव्हता. बहुतेक नेहमीं डोंगरांच्या दऱ्याखोऱ्यांतलि किल्ल्यांत रहावयाचें आणि शत्रूवर छापा घालून फिरून त्याच किल्ल्यांत येऊन आश्रय घ्यावयाचा, ही पद्धत नवीन स्वराज्यसंस्थापना करणाऱ्या शिवाजीला आणि त्याच्या मावळ्यांना आवश्यकच होती. परंतु शिवाजीमहाराजांच्या पुढील पिढींतील पेशवे हे शिवाजीमहाराजांच्या वेळच्या डोंगरी आणि गानिमी काव्याच्या लढाईच्या फार पुढील परिस्थितीपर्यंत जाऊन पोंचलेले होते. शिवाजीमहाराजांच्या वेळच्या प्रसिद्ध लढाया पाहिल्या, तर तोरणा, राजगड, प्रतापगड, रांगणा, पुरंदर, सिंहगड, वगैरे किल्ल्यांच्या डोंगराळ मुलुखांतच त्या झालेल्या आहेत. पण त्यांच्या पुढलि काळांतलि पेशव्यांच्या लढायांचीं रणक्षेत्रें डोंगराळ मुलुखांतून निघून मोकळ्या मैदानावर आलेलीं होतीं. उदगीरची लढाई, राक्षसभुवनची लढाई, पानिपतची लढाई, खर्ड्यांची लढाई, वडगांवची लढाई, वगैरे पेशव्यांच्या ज्या लढाया त्या या प्रगतीच्या निदर्शक आहेत. शिवाजीच्या वेळच्या सैन्याची

संख्या आणि पेशव्यांच्या वेळच्या सैन्याची संख्या यांच्यामध्येंही महदंतर पडलेलें आपल्याला दिसून येतें. शिवाजीच्या एकंदर सैन्याचा आंकडा दहापांच हजारांच्यावर क्वचितच गेलेला असेल. परंतु पेशव्यांचें पानिपत येथील सैन्य लाखाच्याही वर गेलेलें होतें. अशा अनेक दृष्टींनीं पाहतां सतराव्या शतकाच्या सुरवातीची लढाईची पद्धत आणि अठराव्या शतकाच्या अखेरीची लढाईची पद्धत यांच्यामध्यें जरी हळुहळू अंतर पडत चाललेलें होतें, तरीही पेशव्यांच्या वेळींसुद्धां किल्ल्यांचें महत्त्व कमी झालेलें होतें असें नाहीं. पेशवाईच्या वेळचे राजे कोणीही प्रत्यक्ष किल्ल्यांमध्यें सदोदित रहात नसून सपाट मैदानावर लहान लहान भुईकोट किल्ले बांधून त्यांत ते आपले राजवाडे उभारीत असत, हें जरी खरें असलें, तरी खजिना ठेवणें, धान्य सांठविणें, दारूगोळा तयार करणें, कैद्यांना कोंडून ठेवणें, वगैरे अनेक प्रकारच्या राजकीय कार्यांसाठीं या किल्ल्यांचा पेशवाईमध्येंही उपयोग करण्यांत येत असे. व अशा दृष्टीनें या किल्ल्यांचें त्या वेळींही फार महत्त्व होतें.

दुसऱ्या बाजीरावसाहेबांनीं इ. स. १८१७ मध्यें इंग्लिशांच्या जुलुमाला कंटाळून इंग्लिशांशीं लढण्याचा जेव्हां निश्चय केला, तेव्हांच्या त्या वेळच्या वर्णनांमध्यें आपल्याला असें आढळून येतें कीं, बाजीरावसाहेबांनीं लढाईची जी तयारी केली, त्यांत त्यांनीं महाराष्ट्रांतील या अनेक किल्ल्यांच्या बंदोबस्ताकडेही विशेष लक्ष पोंचविलेलें होतें. सर्व किल्ल्यांवर दारूगोळा, दाणागोटा, शिबंदीचे व इतर शिपाई, वगैरे बाबतींमध्यें त्यांनीं तेथें कडेकोट बंदोबस्त करून ठेविलेला होता. पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्यावरील कुमठा, अचरें, मालवण, सुवर्णदुर्ग, मंडणगड, रामगड, पालगड, ताम्हनगड, रसाळगड, महिपतगड, लिंगाणा, भगवंतगड, देवगड, वगैरे ठिकाणांचा त्यांच्याकडून चांगला बंदोबस्त करण्यांत आलेला होता. त्याचप्रमाणें पुण्यापासून कोंकणच्या आसपासच्या बाजूचे लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना, राजमाची, कुइरी, गंगा, नानोशी, पाली, भोरप, अवचितगड, रायगड, तळें-घोसाळें, कांगोरी, वगैरे ठिकाणचे जे किल्ले, त्यांच्या बंदोबस्ताकडेही त्यांनीं पूर्ण लक्ष पोंचविलेलें होतें. पुणें जिल्ह्याप्रमाणें सातारा जिल्ह्यामध्येंही सह्याद्रीच्या रांगा जिकडेतिकडे पसरलेल्या असल्यामुळें साताऱ्चा प्रांत हेंही किल्ल्यांचें एक मोठें केंद्रस्थान आहे. या प्रांतांत खुद्द साताऱ्चा अजिंक्यतारा हा सर्व किल्ल्यांचा राजा असून त्याच्याशिवाय, प्रतापगड, वासोटा, मसूर, वसंतगड, सदाशिवगड, मच्छिंद्रगड, इसलामपूर, वाळवा, पांडवगड, कमळगड, कालिंजा, चंदनवंदन, विराटगड, कुंडलगड, असे अनेक किल्ले साताऱ्च्या सर्व डोंगराळ मुलखांतून आणि सपाटीवर पसरलेले आहेत. कर्नाटक हा प्रांत हल्लीं भाषाभेदानें महाराष्ट्रापासून थोडासा निराळा पडत चाललेला आहे; परंतु आपण हल्लीं ज्या वेळचें निरीक्षण करीत आहों, त्या वेळीं म्हणजे पेशवाईचे अखेरीस कर्नाटक प्रांत आणि महाराष्ट्र प्रांत या दोघांचा अगदीं एकजीव झालेला होता. विजापुरच्या मुसलमानी बादशाहीविरुद्ध जेव्हां कर्नाटक आणि महाराष्ट्र या दोघांनाही झगडावें लागत होतें, तेव्हांपासूनच या दोन प्रांतांचें विशेष सख्य जमलेलें होतें; व बापू गोखले यांचे पूर्वज हे पूर्वीपासून धारवाडकडे रहात असल्यामुळें कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्यामधील तो स्नेहभाव जास्तच वृद्धिंगत झालेला होता. शिवाय रास्ते, पटवर्धन, वगैरे सरदारांच्या पराक्रमानें आणि सौजन्यानेंही

या दोन प्रांतांच्या एकीकरणामध्यें पुष्कळ भर पडलेली होती. अशा रीतीनें महाराष्ट्राशीं संलग्न झालेल्या कर्नाटकामध्येंही धारवाड, गदग, डुमल, हुबळी, मिसरी कोटा, बदामी, बागलकोट, सोलापूर, बेळगांव, पाच्छापूर, गोकाक वगैरेसारखे अनेक किल्ले पेशव्यांच्या ताब्यांत होते. व मराठ्यांचें राज्य कायम राखण्याला तेही आपापल्या अंतःसामर्थ्यानें साहाय्य करीत होते. यांच्याशिवाय पेशव्यांच्या ताब्यांतील किल्ल्यांच्या खानेसुमारीमध्यें ज्यांचा अवश्य नामनिर्देश केला पाहिजे असे आणखी कांहीं प्रमुख किल्ले म्हटले तर चांद-बिबीच्या शौर्यासाठीं प्रसिद्धीस आलेला अहमदनगर येथील भुईकोट किल्ला हा एक होय. त्याच्याशिवाय नाशिक जिल्ह्यांतील सह्याद्रीच्या शिखरावर विराजमान असलेला जो त्रिंबकेश्वराचा किल्ला त्यालाही गाळून उपयोगी नाहीं. नाशिक जिल्ह्यांतील दुसरा महत्त्वाचा किल्ला म्हटला म्हणजे नारो शंकर यांनीं पूर्वी बांधलेला आणि या वेळीं राजेबहादूर यांच्या ताब्यांत असलेला मालेगांवचा किल्ला होय. हा किल्ला सपाटीवर असल्यामुळें तो आपल्या बुरुजांच्या उंचीनें जरी त्रिंबकेश्वरच्या किल्ल्याच्या इतका उंच होऊं शकला नाहीं, तरी त्या किल्ल्यानें आपल्या पराक्रमानें आपली उच्चता त्रिंबकेश्वराच्या किल्ल्याच्या उंचीपर्यंत नेऊन सोडलेली आहे, यांत शंका नाहीं! यानंतर तालनेर, राजदीर, अंमळनेर, अशीरगड, वगैरे तापीनदीच्या आसपासचे जे किल्ले, तेही त्या वेळीं पेशव्यांच्या ताब्यांत असून त्यांनींही त्या वेळच्या लढ्यांतून आपला पराक्रम गाजविलेला आहे.

हे वर सांगितलेले जे किल्ले ते त्या वेळचे मुख्य मुख्य लढाऊ किल्ले होत. पण त्यांच्या-शिवाय दुसरेही अनेक लहान लहान किल्ले त्यांच्या आसपास होते; व त्या किल्ल्यांवरही त्यांच्या मगदुराप्रमाणें थोडेबहुत लढवय्ये लोक होतेच. असे हे अनेक किल्ले दुसऱ्या बाजीरावसाहेबांनीं लढाईच्या तयारीनें सिद्ध करून ठेविलेले होते. व या सगळ्या किल्ल्यांची तयारी पुरी झाल्यानंतर त्यांनीं पुण्याच्या जवळ खडकी येथें पहिल्याने इंग्रजांशीं लढाईचें तोंड लावलें. या खडकीच्या लढाईनंतर पुढें थोडक्याच दिवसांनीं असें स्पष्ट दिसून येऊं लागलें कीं, बाजीरावसाहेबांनीं इंग्रजांशीं सुरू केलेल्या लढाईमध्यें त्यांना यश येणें शक्य नाहीं. ही गोष्ट निश्चित झाल्यानंतर या वर सांगितलेल्या महाराष्ट्रांतील शेंकडो किल्ल्यांची परिस्थिति फार कठिण झाली. इतक्या सगळ्या शेंपन्नास किल्ल्यांवर कोणी मोठमोठे सेनानायक नेमलेले असणें शक्य नव्हतें. बापू गोखले, रास्ते, निपाणकर, वगैरे जे कांहीं थोडेसे मुत्सद्दी आणि सेनापति बाजीरावसाहेबांच्यापाशीं होते, ते त्यांच्याबरोबर फिरत असून इंग्रजांशीं टक्कर देत होते. परंतु बापू गोखले यांच्या निधनानंतर सगळ्या सैन्याच्या धोरणाला आळा घालणारा असा कोणी सेनापति राहिला नाहीं. त्यामुळें सपाट मैदानावर बाजीरावाच्या पाठीमागून फिरणारें जें थोडेंसें सैन्य राहिलें होतें, त्यालाही कोणी चांगलासा शास्ता उरला नाहीं; तर मग या निरनिराळ्या ठिकाणच्या किल्ल्यांतून साऱ्या महाराष्ट्रभर जें मराठ्यांचें सैन्य पसर-लेलें होतें, त्याचें नियंत्रण करण्याला कोण असणार ?

साऱ्या महाराष्ट्रभर पसरलेले वर जे पन्नासपाऊणशें किल्ले सांगितलेले आहेत, ते सगळे मिळून महाराष्ट्रामध्यें एक मोठें सामर्थ्य होतें. या किल्ल्यांच्या सामर्थ्याची मदत घेऊनच शिवाजीमहाराजांना आपली हिंदुपदपातशाही स्थापन करतां आली होती. व तें सामर्थ्य

अद्यापिही त्यांच्यामध्यें कायम होतें. आणि हें त्यांच्या अंगांतील सामर्थ्य नाहींसें होण्याला कांहीं कारणही झालेलें नव्हतें. माणसें वृद्ध होतात; पण हे शिवाजीमहाराजांच्या वेळचे किल्ले या पेशवाईच्या वेळींही शिवाजीच्या वेळेप्रमाणेंच आपल्या तारुण्याच्या ऐन भरामध्यें होते; व त्या वेळीं ते जसे शत्रूला प्रतिकार करण्याला उभे होते, तसेच ते या वेळींही होते! अशा या किल्ल्यांच्या अंगांतील सामर्थ्य नाहींसें होणार कशानें? मनुष्य हा एक वेळ भिईल; पण दगडांनीं आणि खडकांनीं बनविलेल्या या किल्ल्यांच्या विस्तीर्ण छातीला भीति कशी ती माहीतच नव्हती! ते आपल्या जागेपासून एक पाऊलभरही मागें न हटतां निर्भयपणानें शत्रूला तोंड देण्याकरितां सदैव उभे राहिलेले होते! माणसें लढाई करितां करितां थकून जातील आणि कंटाळा येऊन विश्रांति घेण्याकरितां खालीं बसतील किंवा आपल्या अंथरुणावर निजतील; पण हे किल्ले—हे देशाचे निस्सीम सेवक—हे कधींही न थकणारे आपल्या देशाचे शिपाई—हे शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून आपल्या हिंदी साम्राज्याचें संरक्षण करण्याकरितां दक्षतेनें एकसारखे उभे होते! त्यांना या दीडशें दोनशें वर्षांच्या अवधीमध्यें विश्रांति कशी ती कधीं माहीत नव्हती! रात्र असो किंवा दिवस असो, सदोदित पहाऱ्यावर उभें रहावें, आणि आपल्या चौफेर तटाच्या भिंतीमध्यें बंदुका आणि तोफा मारण्याकरितां ठेवलेलीं जीं असंख्य छिद्रें त्या छिद्रांच्या डोळ्यांमधून चारी दिशांनीं कोणीकडून कोणी शत्रु येत आहे कीं काय, याच्याविषयीं सतत टेहळणी करीत असावें, अशीं कामें या किल्ल्यांनीं अव्याहतपणें सुरू ठेविलेलीं होतीं! थंडी पडली तर पहारेवाला शिपाई पांघरूण घेतो आणि ऊन किंवा पाऊस लागूं लागला असतां तो एकाद्या निवाऱ्याच्या जागेचा आश्रय करतो; पण हे बिचारे पहारेकरी किल्ले शिवाजीच्या वेळेपासून पेशवाईच्या अमदानीपर्यंत थंडी असो, वारा असो, पाऊस असो किंवा ऊन असो, ते सगळे हाल सोसून आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं नेहमीं खडा पहारा करीत होते! कोणी एकादा चोरटा शत्रु पाऊसपाण्याच्या वादळांत किंवा मध्यरात्रीच्या काळोखांत किल्ल्यावर दगाफटका करण्याकरितां आला, तर कदाचित् तेथील माणसांना झोंपा लागल्या असतील; पण या किल्ल्यांचे दगड आणि दरवाजे यांना कधीं झोंपा लागलेल्या नव्हत्या! आणि ते बिनचूकपणानें असल्या चोरट्या शत्रूंना प्रतिबंध करीत असत! शिवाजीपासून बाजीरावापर्यंत आणि इ. स. १६७४ पासून इ. स. १८१८ पर्यंत या किल्ल्यांनीं आपल्या आसमंतात् भागांतील कित्येक पिसाळांना आणि बाळाजीपंतांना फितुरीचा निमकहरामपणा करतांना पाहिलें; पण या किल्ल्यांपैकीं एकही किल्ल्यानें आपल्या धन्यापाशीं कधीं फितुरी किंवा विश्वासघात केलेला नाहीं! अशा प्रकारच्या या प्रामाणिक किल्ल्यांना महाराष्ट्रामध्यें त्यांच्या प्रामाणिकपणाला अनुरूप अशीं उच्च स्थानें ठिकठिकाणीं जीं देण्यांत आलीं होतीं, तीं अगदीं योग्यच होतीं! त्या आपल्या उच्च स्थानांवरून आपल्या पायथ्याच्या प्रदेशामध्यें अत्यंत तुच्छ अशा स्वार्थासाठीं विश्वासघात करणाऱ्या नराधमाकडे हे किल्ले अत्यंत तुच्छतेनें आणि तिरस्कारानें पहात असत! त्यांना असें वाटे कीं, या पिसाळलेल्या लोकांना परमेश्वरानें सदसद्विवेकबुद्धि दिलेली असून तिचा हे लोक काय उपयोग करितात? यांच्यापेक्षां आमचे हे निर्बुद्ध दगडदेखील फार चांगले! या बिचाऱ्या दगडांनीं एकदां देखील कधीं आपल्या

गुप्त बातम्या आपल्या शत्रूला सांगितल्या नाहींत! व त्यांनीं एकदां देखील कधी आपल्या धन्याशीं बेइमान होऊन आपल्या शत्रूला आपल्या घरांत घेण्याची मसलत केली नाहीं! या फितुर होणाऱ्या नराधमांचा देशद्रोह पाहून कधीकधीं त्या किल्ल्यांना इतका संताप येत असे कीं, ज्यांच्या डोक्यांत असले फंदफितुरीचे विचार घोळत असतात, त्यांच्या त्या डोक्यावर आपल्या जवळपासचा एकादा धोंडा फिरकावून त्यांच्या त्या देशद्रोही डोक्यांचे राइ राइ एवढे तुकडे करून टाकावेत! त्या किल्ल्यांनीं असें केलें असतें, तर खरोखर या पिसाळलेल्या जातींतील लोकांच्या हातून आपलीं राज्यें दुसऱ्याच्या घरांत घातलीं गेलेलीं पहाण्याचा प्रसंग आपल्यावर आज खास आला नसता!

हे सगळे किल्ले बाह्य दृष्टीनें पाहिले असतां एकमेकांपासून तुटक आणि अलग होते, असें कोणालाही वाटण्याचा संभव आहे. पण ही चूक आहे. अंतर्मुख दृष्टीनें पहाणाराला यांच्यामध्यें किती निकट संबंध होता, हें तेव्हांच दिसून येतें. या सगळ्या किल्ल्यांचा मिळून एक मोठा थोरला संघ होता. आणि महाराष्ट्रांतील सर्व लहानमोठे किल्ले हे या संघाचे सभासद होते. आपण बाह्यतः दूर दूर असलों, तरी आपल्याला एकमेकांना नित्य पहातां यावें, म्हणून प्रत्येकानें आपापलीं ठिकाणें अतिशय उंचावर ठेविलेलीं होतीं. त्यामुळें त्यांच्या रोज गांठी पडत असत! रामदासांचे भगव्या झेंड्याचें धार्मिक निशाण आणि श्रीमंतांचें जरीपटक्याचें राजकीय निशाण, हीं दोन्हीं स्वातंत्र्याचीं निदर्शक अशीं निशाणें प्रत्येक ठिकाणीं फडकत असलेलीं पाहून सर्व किल्ल्यांच्या पोटांत आनंदाच्या ऊर्मि उसळत असत! प्रत्येक किल्ल्यावर दररोज सकाळसंध्याकाळ स्वातंत्र्याचीं रणवाद्यें वाजूं लागून तेथलि नौबदींच्या आणि सनयांच्या शब्दानें सर्व महाराष्ट्राच्या दशादिशा दुमदुमून गेलेल्या पाहून आपल्या स्वातंत्र्य-सुखापासून होणारा आनंद या किल्ल्यांच्या पोटांत मावत नसे! या सर्व किल्ल्यांचा मिळून जो एक संघ होता, त्या संघाच्या सभा नेहमीं भरत असत! व त्या सभांतून महाराष्ट्रांतील सर्व किल्ले हजर असत. या किल्ल्यांच्या संघाची सभा भरण्याची वेळ मध्यरात्रीची असे आणि त्यांची जागा आकाशमंडळांतील विस्तीर्ण मैदान ही असे! चंद्र आणि तारे यांच्या-कडे त्या संघाच्या सभेतील रोषणाईचे काम देण्यात येत असे! आणि सभेंतील सभासदांना उष्णतेपासून त्रास होऊं नये म्हणून प्रत्यक्ष वायु हा तेथे पंखे ओढण्याचें काम करीत असे. अशा व्यवस्थेमध्यें या महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या संघाची सभा भरली असता त्या सभेमध्ये काय भाषणें होत असत? रायगडचा किल्ला हा त्या किल्ल्यांच्या संघाचा कायमचा अध्यक्ष होता! तो अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर तेथें जीं भाषणें होत, तीं फक्त एक वीररसाचींच असत. प्रत्येक किल्ल्याचा तट हा आपण सहन केलेल्या तोफेच्या गोळ्यांच्या जखमा आपल्या श्रोतृवृंदापुढें दाखवीत असे; आणि कोणत्याही उत्कृष्ट मानवी वक्त्यापेक्षां तो त्या योगानें आपल्या श्रोत्यांच्या मनावर जास्त परिणाम उत्पन्न करीत असे! कोणताही किल्ला बोलावयाला उठला, तरी त्याच्या सगळ्या बोलण्यांतील सार एकच असे; आणि तें हें कीं, आपल्याला कितीही संकटें सोसावीं लागलीं, तरी तीं सगळीं मुकाट्यानें सहन करून आपण अखेरपर्यंत आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां लढत उभे राहिलें पाहिजे! "आतां हा लढण्याचा कार्यक्रम अयशस्वी झालेला आहे; तेव्हां आतां आपण सगळेजण शत्रूला शरण जाण्याचा

कार्यक्रम स्वीकारूं या ! " अशा प्रकारचा अभद्रपणाचा एकही शब्द तेथें कोणाच्या तोंडून कधीं निघत नव्हता. लढण्याला किंवा शत्रूशीं तोंड देण्याला थकला असा एकही किल्ला त्या संघामध्यें नव्हता. ते किल्ले म्हणत असत कीं, मनुष्यानें आमचे दरवाजे उघडून शत्रूला आंत घेतलें, तर तेथें आमचा नाइलाज आहे ! पण आम्ही आपण होऊन आपले दरवाजे कोणत्याही परशत्रूंच्या प्रवेशाकरितां प्राण गेला तरी उघडणार नाहीं व आम्ही कधीं कोणाला शरण जाणार नाहीं ! त्या सर्व किल्ल्यांनीं आपले सर्व प्राचीन इतिहास प्रत्यक्ष पाहिलेले होते ! व परकीय लोकांनीं लिहिलेल्या खोट्या इतिहासाकडे ते कधीं ढुंकूनही पहात नसत. अशी स्थिति असल्यामुळें त्या सर्व किल्ल्यांच्या संघानें बाजीरावसाहेबांच्या वेळीं असा निश्चय ठरविला होता कीं, आपले धनी बाजीरावसाहेब यांनीं इंग्लिशांच्यापाशीं हल्लीं लढाई करण्याला सुरवात केली आहे, अशा वेळीं आपण सर्वांनीं इमानेंइतबारें त्यांच्या बाजूनें लढलें पाहिजे आणि शेवटपर्यंत टिकाव धरून राहिलें पाहिजे !

असा निश्चय करून महाराष्ट्रांतलि सर्व किल्ले इंग्लिशांशीं लढाई करण्याला तयार होऊन उभे राहिलेले होते व या सर्व किल्ल्यांचें मिळून सामर्थ्य इतकें मोठें होतें कीं, त्यांनीं कोणतेंही डळमळणारें राज्य सांवरून धरलें असतें. परंतु महाराष्ट्राचें दैव या वेळीं उलटें फिरलेलें होतें, त्यामुळें सत्याला आणि न्यायालाही अपयशानें तोंड खालीं घालावें लागलें; आणि लबाडी व फितुरी या राजरोसपणानें आणि उजळ माथ्यानें चारचौघांत फिरूं लागल्या ! पिसाळलेले लोक प्रतिष्ठित बनले व सत्यनिष्ठ आणि स्वामिनिष्ठ लोक अन्नाला महाग झाले ! जेथें राज्याचे इमानी नोकर विश्वासघात करण्याला प्रवृत्त होऊं लागले, तेथें दगडांनीं आणि विटांनीं बांधलेल्या बिचाऱ्या किल्ल्यांचा काय पाड लागणार ? बाजीवसाहेबांचे दोन चार लढायांतून पराभव झाले आणि बापू गोखल्यासारखे सेनापति इहलोक सोडून परलोकाला गेले, तेव्हां या महाराष्ट्रांतील किल्ल्यांना फारच दैन्यावस्था प्राप्त झाली. प्रत्येक किल्ल्यावर पूर्वी सांगितल्याप्रमाणें बराच दारूगोळा सांठवून ठेवण्यांत आलेला होता. व अरब, गोसावी, पठाण, वगैरे अनेक जातींचे बरेचसे शिपाई लोक बहुतेक किल्ल्यांवर संरक्षणाकारितां हजर होते. लहान किंवा मध्यम प्रतीचे किल्ले असले, तरी त्या किल्ल्यांवर निदान चारपांचशेंपर्यंत फौज असे. व कित्येक मोठमोठ्या किल्ल्यांवर तर हजाराच्या पेक्षांही ज्यास्त लष्कर ठेविलेलें होतें. अशा रीतीनें या सर्व किल्ल्यांवर मिळून पेशव्याचें जें लष्कर गुंतलेलें होतें, त्या सगळ्याची एकंदर बेरीज केली, तर ती निदान १५-२० हजार तरी होईल, असा ठोकळ मानानें अंदाज दिसतो. इतकी मोठी फौज या किल्ल्यांतून गुंतलेली होती, आणि शिवाय बाजीरावसाहेबांनीं पहिल्यानें लढाई सुरू केली, त्या वेळीं खडकीच्या मैदानावर बापू गोखल्यांच्या निशाणाखालीं २५-३० हजार फौज उभी होती, अशीं इंग्रजी इतिहासकारांचीं वर्णनें आहेत. यावरून बाजीरावसाहेबांनीं इंग्लिशांशीं लढण्याकारितां किती मोठी तयारी केलेली होती, याची कल्पना येण्यासारखी आहे. इतक्या मोठ्या फौजेनें शिवाजीसारख्या सेनापतीला सर्व हिंदुस्थानही परत पादाक्रांत करतां आलें असतें. परंतु दैव अनुकूल नसल्यामुळें बापू गोखल्यांच्या सारख्या सेनापतीचेही पराक्रम फुकट गेले आणि विंचूरकरांच्या सारख्या स्वामिनिष्ठ सरदारांची स्वामिभक्ति फलप्रद झाली नाहीं ! आणि बाळाजीपंती बळणाच्या पिसाळ-

लेल्या लोकांचे झेंडे जिकडेतिकडे फडकूं लागले; आणि देशांत फैलावलेल्या या फितुरी-मुळें रणांगणांतलि सैन्याचें कांहीं एक चालेनासें होऊन तीं सगळीं सैन्यें देशोधडीला लागलीं ! किल्ल्यांतून निरनिराळ्या ठिकाणीं असलेल्या फौजा मात्र आपापल्याला जागीं कायम होत्या; पण त्यांना फारसें कांहीं करतां येत नव्हतें. त्या फौजांना खेळविणारा आणि त्यांच्या हालचाली करून शत्रूला लढाई देणारा असा कोणीहि पुरुष पाठीमागें न उरल्यामुळें ज्या किल्ल्यांतील फौज त्या किल्ल्यांत कुजून पडलेली होती. प्रत्येक किल्ल्यावरील किल्लेदार हा मोठा इमानी नोकर होता. परंतु सगळ्या किल्ल्यांच्या सैन्याला एकत्र करून त्यांच्यापासून कांहीं देशकार्य करावें, इतक्या जोमाचा मनुष्य त्यांच्यामध्यें कोणीहि नव्हता. शिवाय त्यांनीं कसें वागावें किंवा काय हालचाली कराव्या, याचें धोरण दाखविणारा कोणी मुत्सद्दी पुण्याच्या दरबारामध्येंहि राहिलेला नव्हता. कारण, बाजीरावानें पुणें सोडल्या-पासून पुण्याचा दरबारच पुण्यास उरलेला नव्हता. अशा स्थितींत आपण आपल्या किल्ल्याचा बचाव करून रहावयाचें, याच्यापेक्षां या किल्ल्यांच्या पुढें त्या वेळीं दुसरें कांहीं धोरण शक्यच नव्हतें.

परंतु अशा कारणामुळें हे किल्ले जरी कांहीं करूं शकत नव्हते, तरी त्यांच्याबद्दल इंग्लिशांना मात्र फार भीति वाटत होती. सपाट मैदानावरील मुलुखांतून इंग्लिशांनीं पेश-व्यांच्या फौजाचा जरी पराभव केलेला होता, तरी त्यांची विजयश्री अद्यापि निष्कंटक झालेली होती, असें मात्र नाहीं. महाराष्ट्रांतलि इतके सुमारें पन्नास पाउणशें प्रचंड किल्ले दारूगोळयांनीं आणि फौजेच्या शिपायांनीं भरलेले असे सह्याद्रीच्या सर्व दऱ्याखोऱ्यांतून पसरलेले असतांना आणि ते आपल्या त्या उच्च स्थानावरून आपण फितुरीनें मिळविलेल्या विजयाकडे क्रोधानें आणि आवेशानें टवकारून पहात असतांना कोणत्या शत्रूला आपला विजय चिरस्थायी झालेला आहे असें वाटेल ? इंग्लिशांना या दऱ्याखोऱ्यांतून असलेल्या किल्ल्यांची फार भीति वाटत होती. दारूनें भरलेले हे महाराष्ट्रांतील सुरुंग आपण महारा-ष्ट्राच्या भूमीवर विजयश्रीच्या मदानें चालत असतांना आपल्याला मधेंच कोठें तरी धाड-कन् उडवून देतील कीं काय, अशी त्यांना पदोपदीं धास्ती वाटत होती ! स्वातंत्र्याच्या अभिमानाचे पहिले जिवंत झरे या किल्ल्यांच्या डोंगरांतून जे वाहूं लागलेले आहेत, त्यांचे लोंढे या उंच उंच डोंगरांवरून खालीं आपल्या अंगावर कदाचित् कोसळून येतील आणि आपण इंग्रज लोक येथें आलों होतों कां नव्हतों इतक्या रीतीनें आपल्याला ते येथून साफ खणून काढून समुद्रांत नेऊन घालतील, अशी या किल्ल्यांच्याबद्दल इंग्लिशांना पोटांतून दह-शत वाटत होती ! या किल्ल्यांच्या डोंगरांवरून वाढणाऱ्या स्वातंत्र्यप्रेमी शेतकऱ्यांच्या अंतःकरणांतील स्वाभिमानाच्या ज्योतीनें जिकडे तिकडे साऱ्या महाराष्ट्रभर एकदम वणवे पेटून त्या वणव्याच्या आगीमध्यें आपण आणि आपले खोटेनाटे प्रयत्न आणि आपण फंदफितुरीनें आपल्याजवळ जमाविलेले लोक या सगळ्यांचीच एखादे दिवशीं होळी होऊन जाईल कीं काय, अशी या महाराष्ट्रांतील डोंगरी किल्ल्यांच्याबद्दल इंग्लिशांना त्या वेळीं जरब वाटत असली, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे असें नाहीं. आणि म्हणूनच मैदानावरील


पेशव्यांच्या फौजांचे पराभव करून झाल्यानंतर इंग्लिशांनीं आपलें लक्ष हे महाराष्ट्रांतील किल्ले हस्तगत करून घेण्याकडे वळाविलें.

या कामाकरितां इंग्लिशांनीं आपल्या फौजेच्या निरनिराळ्या टोळ्या बनविलेल्या होत्या. त्यांपैकीं ब्रिगेडिअर जनरल सर टॉमस मन्रो, ब्रिगेडिअर जनरल स्मिथ, कॅप्टन प्रिझलर, कॅप्टन प्रॉथर, यांच्या हाताखालील टोळ्या प्रमुख होत्या. व या निरनिराळ्या टोळ्या कोंकण प्रांत, पुणें प्रांत, सातारा प्रांत, कर्नाटक, खानदेश, वगैरे ठिकाणीं पसरून त्यांनीं इ. स. १८१८ च्या जानेवारीपासून तों पावसाळा सुरू होईपर्यंतच्या पहिल्या पांच सहा महिन्यांमध्यें बहुतेक किल्ले हस्तगत केले. तरी पण या किल्ल्यांपैकीं सिंहगड, पुरंदर, वासोटा, बदामी, बेळगांव, सोलापूर, त्रिंबक, मालेगांव, तालनेर, वगैरे ठिकाणीं इंग्लिशांच्या सैन्याला बरेंच कुचमावें लागलें. व बाकीच्या किल्ल्यांनींही लढाई देऊन जास्त वेळ टिकाव धरला असता. परंतु त्याचा पुढें कांहीं उपयोग नव्हता. किल्ल्यांच्या बाहेर पेशव्यांच्या फौजेचा जोर असता, तर किल्ल्यांच्या आंतील फौजांनीं टिकाव धरण्यांत कांहीं तरी मतलब होता; पण बाहेरचें आपलें पेशव्याचें राज्य गेलेलें आहे, ही दुःखकारक बातमी सर्व किल्ल्यांना समजलेली होती. व त्या दुःखामुळें त्या किल्ल्यांच्या डोळ्यांतून निघणारे अश्रु त्या डोंगरावरील झऱ्यांच्या रूपानें खालीं सदोदित वहात राहिलेले होते. अशा स्थितींत स्वाभाविक रीतीनेंच त्यांना असें वाटूं लागलें होतें कीं, आता आपण पुष्कळ टिकाव धरला, तरी त्याचा पुढें काय उपयोग आहे! पण इतकी जरी निराशेची स्थिति प्राप्त झालेली होती, तरी ही गोष्ट महाराष्ट्राला भूषणास्पद आहे कीं, अशाही वेळीं महाराष्ट्रांतील प्रत्येक किल्ला इंग्लिशांच्या फौजेपाशीं आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा होईपर्यंत लढला! व महाराष्ट्रांतील कित्येक सुप्रबुद्ध लोक अधमपणानें जरी फितुरीचीं कामें करीत होते, तरी महाराष्ट्रांतील या शेंकडों किल्ल्यांपैकीं एकही किल्ला इंग्लिशांना फितुर होऊन वश झाला नाहीं! या किल्ल्यांवरील किल्लेदारांपैकीं बरेच किल्लेदार अरब होते. पण ते मुसलमानी धर्माचे असूनही त्यानीं आपल्या हिंदू राजाशीं बेइमानी करून आपल्या हातांतील किल्ले इंग्लिशांच्या हवालीं केले, असें एकही उदाहरण या किल्ल्यांच्या इतिहासांत सांपडत नाहीं. हें या अरब किल्लेदारांच्या प्रामाणिकपणाला किती तरी भूषणास्पद आहे! कित्येक किल्लेदार आणि त्यांच्या हाताखालील शिपाई आपल्या प्राणाला मुकले, पण त्यांनीं आपल्या हातांतील किल्ले–ते जिवंत असेपर्यंत–इंग्लिशांच्या हातांत जाऊं दिले नाहींत! बाहेरून पेशव्यांच्या दुसऱ्या सैन्याचा जोर असता, तर या किल्ल्यांवरील लोकांनीं खात्रीनें आणखी जास्त दिवसही टिकाव धरला असता; व बाहेरचें सैन्य आणि किल्ल्याच्या आंतील सैन्य या दोघांनीं मिळून मध्यंतरीं गांठलेल्या इंग्लिशांच्या सैन्याला खात्रीनें ठेंचून काढलें असतें! पण अशी ही लष्करी लढाईची टाळी दोन हातांनीं मिळूनच जी वाजावयाची असते, ती एका हातानें जर वाजूं शकली नाहीं, तर त्यांत किल्ल्यावरील लोकांचा कांहीं दोष आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. सारांश, महाराष्ट्रांतील सर्व किल्ले या वेळीं आपल्या सामर्थ्याची शिकस्त करून इमानेंइतबारें लढले. या किल्ल्यांच्यापैकीं प्रत्येक किल्ल्याचा वेढा हें एकेका ऐतिहासिक कादंबरीचें एकेक उत्कृष्ट आणि अत्यंत स्फूर्तिदायक

असें कथानक होण्याच्या योग्यतेचें आहे; इतका पराक्रम, इतकी स्वामिनिष्ठा आणि इतकी स्वदेशभक्ति या किल्ल्यांवरील शिपायांनीं आणि सरदारांनीं दाखविली असली पाहिजे. परंतु त्या निरनिराळ्या प्रसंगांच्या भीषण आणि लोमहर्षण अशा वर्णनांच्या बखरी आपल्या जुन्या लोकांपैकीं कोणी लिहून ठेवलेल्या नसल्यामुळें प्रत्यक्षाची उणीव अशा ठिकाणीं कल्पनेनें भरून काढावी लागेल, हें अगदीं निर्विवाद आहे. तरी पण एकंदर परिस्थिति पाहिली, तर प्रत्येक डोंगराच्या शिखरावरील किल्ल्यावर स्वामिनिष्ठेचे आणि स्वदेशभक्तीचे अत्युच्च सद्गुण आपल्या आर्यभूमीच्या स्वातंत्र्याकरितां त्या वेळीं पराकाष्ठेच्या खस्ता खात होते, याबद्दल बिलकुल शंका नाहीं. व याबद्दलचीं कांहीं प्रत्यक्ष प्रत्यंतरें परकीयांनीं लिहिलेल्या इतिहासांमध्येंही आपल्याला पहावयाला सांपडतात.

अशा प्रसंगाच्या पहिल्या उदाहरणाकरितां आपण पुण्याजवळच्या सिंहगड किल्ल्याकडे वळूं. तान्हाजी मालुसरे यांनीं आपल्या पराक्रमानें या किल्ल्याचें नांव महाराष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणामध्यें अविस्मरणीय करून ठेविलेलें आहे. पेशव्यांचें राज्य पुण्यांतून नष्ट झाल्यानंतर इंग्लिशांच्या सैन्याची पहिली धाड या किल्ल्यावर येऊन पडली, आणि इ. स. १८१८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २० व्या तारखेला इंग्लिशांच्या फौजेचा तळ सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशीं येऊन पडला. हें सैन्य शिरवळ, शिवापूरच्या बाजूनें येऊन त्यानें सिंहगडच्या पायथ्याच्या एकेका बाजूनें हळुहळू आक्रमण केलें, व पूर्वेच्या आणि उत्तरेच्या बाजूनें त्या सैन्यानें आपल्या तोफा डागण्याला ता. २१ पासून सुरुवात केली. त्याच दिवशींच्या संध्याकाळपासून किल्ल्यावर हॉविट्झर तोफांचे गोळे फेंकण्याला सुरुवात करण्यांत आली. दोन तीन दिवस दोन्हीं तिन्हीं बाजूंनीं तोफा सुरू होत्या. पण किल्ल्याला वेढा घालणाऱ्या सैन्याच्या हातून फारसा कांहीं परिणाम झाला नाहीं. पुढें ता. २४ रोजीं या वेढा घालणाऱ्या सैन्याच्या मदतीला कॅप्टन डेव्हिस हा आपल्या हाताखालीं निजामाच्या लष्करापैकीं अठराशें घोडेस्वार घेऊन आला. मुंबईच्या नेटिव्ह इन्फंट्रीच्या दुसऱ्या बॅटॅलिअनपैकीं बरेंच मोठें लष्कर पूर्वीं सिंहगडासमोर तळ देऊन राहिलें होतें व त्याला कॅप्टन् डेव्हिस याच्या हाताखालील हे १८०० लोक नवीन येऊन मिळाले. अशा रीतीनें सुमारें तीन साडेतीन हजार सैन्याचा गराडा सिंहगडच्या भोंवतीं येऊन पडला. व पूर्व, उत्तर आणि पश्चिम, अशा तिन्ही बाजूंनीं बांधलेल्या मोर्च्यांवरील बॅटरीजमधून तोफांचा मारा सुरू करण्यांत आला. बाहेरच्या बाजूनें जी ही इतकी कडेकोट तयारी झाली होती, त्या मानानें किल्ल्याच्या आंतमध्यें फारशी मोठी फौज होती असें नाहीं. किल्ल्यांत सरासरीनें १२०० लोक होते. तरी पण त्यांनीं या तीन साडेतीन हजार सैन्याच्या विरुद्ध मोठ्या नेटानें लढाई चालविली होती. ता. २५ फेब्रुवारीं रोजीं आणखी कांहीं नवे मोर्चे बांधण्यांत येऊन तेथून ट्वेल्व्ह पौंडरच्या दोन आणि सिक्स पौंडरच्या दोन अशा चार तोफांची एक नवीन बॅटरी एक हजार यार्डांच्या अंतरावरून सुरू करण्यांत आली. पण तेवढ्यानेंही कांहीं दाद लागेना. तेव्हां एटीन पौंडरच्या दोन दोन तोफांच्या अशा आणखी दोन बॅटरीज ता. २८ फेब्रुवारी रोजीं किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या रोखानें चालू करण्यांत आल्या. इतकी खटपट करण्यांत आली, तरी किल्ला स्वाधीन होण्याचा कांहीं रंग दिसेना. तारीख

२१ फेब्रुवारीपासून त्या महिन्याच्या अखेरीपर्यंत सुमारें एक आठवडाभर किल्ल्यावर रात्रं-दिवस एकसारखा तोफांचा भडिमार चाललेला होता. व इतक्या अवधींत किल्ल्याच्या तटा-वर सुमारें चार हजारपर्यंत निरनिराळ्या प्रकारचे तोफांचे गोळे टाकण्यांत आले असतील. अशा स्थितीत किल्ल्यांतील लोकांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना करणेंहि



**सिंहगड किल्ल्याचा कल्याण दरवाजा.**

कठिण आहे. आंतील लोक फक्त काय ते हजारबाराशें; आणि त्यांना बाहेरून कोणी सोड-विण्याकरितां येईल, अशी मुळींच आशा उरलेली नव्हती ! शिवाय, पुण्यांतील पेशव्यांचें

राज्य लयाला गेलेलेंहि त्यांना माहीत झालें होतें ! त्यामुळें ते कितीहि शौर्यानें लढले, तरी त्या शौर्याचें चीज करणारे आणि त्यांच्या बहादुरीबद्दल त्यांना बक्षिस देणारे पुण्यांत कोणीहि धनी उरलेले नव्हते ! अशा स्थितींत केवळ स्वदेशभक्ति, स्वातंत्र्याचें प्रेम आणि पराक्रमाची नैसर्गिक हौस, एवढ्याच कारणांसाठीं ते किल्ल्यांतील शिपाई आपलीं शिरें आपल्या हातांत घेऊन आपल्या शत्रूपाशीं निकरानें लढत होते. आपल्या पायाखालीं असलेली आपली जन्मभूमि आणि आपल्या मस्तकावर असलेला सत्याचा वाली परमेश्वर या दोघांच्याच फक्त प्रोत्साहनानें ते शिपाई आपल्या क्षात्रवृत्तीला स्मरून लढत होते. पण आपल्या भोंवतीं तीन चार हजार शत्रूंचा गराडा पडलेला आणि त्यांच्या तोफांचा आपल्यावर रात्रंदिवस भडिमार चाललेला, अशा स्थितींत ते बिचारे पेशव्यांचे शिपाई प्रामाणिक असले आणि पराक्रमी असले, तरी किती दिवस कंठणार ? इतक्या विपत्तीमध्येंहि त्यांचा धीर यत्किंचितहि खचला नव्हता. शिवाजीमहाराजांचें पराक्रम त्यांना त्यांच्या डोळ्यापुढें दिसत होते ! आणि तान्हाजी मालुसरे यांचा प्रत्यक्ष आत्मा त्यांच्यामध्यें मिसळून त्यांच्याबरोबर लढत होता ! प्रत्येक हताश होणाऱ्या शिपायाच्या अंतःकरणामध्यें तो आशा उत्पन्न करीत होता आणि प्रत्येक रिकाम्या पडलेल्या तोफेमध्यें तो दारूगोळा भरून तिला सरबती देत होता ! सिंहगडच्या किल्ल्यावरील अरब आणि गोसावी हे शत्रूवर मारा करण्याकरितां कोणती जागा सोइस्कर आहे हें ठरविण्यासाठीं ज्या ज्या कड्यावरून खालीं पहात, त्या त्या प्रत्येक कड्यावरून घोरपडीच्या शेंपटीला दोरी बांधून एक एक तान्हाजी आपल्या मदतीला वर चढून येत आहे, असे त्यांना जेथें तेथें दिसूं लागलें ! ते किल्ल्याच्या तटावर जेथें जेथें उभे राहून वरून खालीं शत्रूवर आपल्या तोफांचा मारा चालवीत होते, तेथें तेथें आपल्या बाजूला प्रत्यक्ष तान्हाजी मालुसरे उभे आहेत, असा त्यांना भास होई ! अशा श्रद्धेनें आणि अशा पराक्रमानें किल्ल्यावरील लोकांनीं सुमारें नऊदहा दिवसपर्यंत तो किल्ला लढविला. पुढें तारीख १ मार्च रोजीं लढाई संपली. आणि इंग्लिशांनीं त्या दिवशीं किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. या वेळीं किल्ल्यामध्यें सुमारें चारशें अरब आणि सातशें गोसावी शिल्लक राहिलेले होते. ते आपआपलीं हत्यारें घेऊन बाहेर पडले आणि सिंहगडचा किल्ला इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतला.


अशा रीतीनें सिंहगडचा किल्ला हस्तगत झाल्यानंतर इंग्लिशांचें सैन्य पुरंदरच्या किल्ल्याकडे वळलें. पुरंदर किल्ल्याच्या उत्तरेच्या आणि दक्षिणेच्या अशा दोन बाजूंनीं सैन्याच्या दोन तुकड्या आधीं पुढें पाठविण्यांत आल्या होत्या; व इंग्लिशांचें मुख्य सैन्य जेजुरीच्या बाजूनें पुरंदर किल्ल्याच्या उत्तरेच्या अंगाला तारीख ११ मार्च सन १८१८ रोजीं येऊन पोहोंचलें. तेथून पुरंदर आणि वजीरगड हे किल्ले अगदीं जवळ होते. परंतु त्या किल्ल्यावर हल्ला करावयाला जाणाऱ्या शिपायांना सासवड येथेंच प्रथम अडथळा करण्यांत आला. सासवड येथील वाड्यामध्यें सिंधी, हिंदुस्थानी, अरब, अशा निरनिराळ्या जातींचे मिळून सुमारें दोनशें लोक होते. त्यांनीं सासवड येथील पेशव्यांच्या मजबूत वाड्याचा आश्रय करून इंग्लिशांच्या सैन्यावर गोळीबार सुरू केला. हा इतिहासप्रसिद्ध वाडा इतका मजबूत आहे कीं, तो एक लहानसा किल्लाच आहे असें म्हटलें, तर त्यांत यत्किंचित्‌हि अतिशयोक्ति

होणार नाहीं. या वाड्यांतलि तोफांचा मारा बंद पाडल्याशिवाय इंग्लिशांना पुढें जाणें शक्य नव्हतें. त्यामुळें इंग्लिशांनीं त्या वाड्याच्या दगडी भिंतींवर पहिल्यानें सिक्सपौंडर तोफा सुरू केल्या. परंतु त्या वाड्याच्या भिंती इतक्या मजबूत आहेत कीं, त्या तोफांचा त्यांच्यावर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. तेव्हां एटीन पौंडर्सच्या तोफा आणवून त्या राजवाड्याच्या भिंतींवर भडिमार सुरू करण्यांत आला. त्या तोफांचाहि वाड्याच्या भिंतींवर फारसा परिणाम झाला असें नाहीं. परंतु एका लहानशा वाड्यांत कोंडल्या गेलेल्या थोड्याशा शिपायांनीं तेथें फार दिवस टिकाव धरून रहाणें शक्य नव्हतें. तरी पण त्या थोड्याशा शिपायांनींहि इंग्लिशांच्या सैन्याला सासवडच्या जवळ एक दोन दिवसपर्यंत रोखून धरलें होतें. पुढें तारीख १४ मार्च रोजीं वजीरगडच्या किल्ल्यावर तोफांची बॅटरी सुरू करून तारीख १५ मार्च रोजीं इंग्लिशांनीं वजीरगडचा किल्ला काबीज केला. आणि वजीरगडचा किल्ला शत्रूच्या हातांत गेल्यावर तेथून पुरंदरच्या किल्ल्यावर नेमका तोफेचा मारा होऊं शकत असल्यामुळें पुरंदरचा किल्ला पेशव्यांच्या शिपायांनीं आपल्या ताब्यामध्यें ठेवणें अगदीं अशक्यच होतें. त्यामुळें तारीख १६ मार्च रोजीं पुरंदरचा किल्लाहि इंग्लिशांच्या ताब्यांत गेला.

सिंहगड आणि पुरंदर यांच्यासारख्या मोठ्या किल्ल्यांची ही अवस्था झालेली कळल्यानंतर आजूबाजूच्या लहान लहान किल्ल्यांनीं टिकाव धरणें शक्य नव्हतें. ता. १६ मार्च रोजीं पुरंदरचा किल्ला हस्तगत झाल्यानंतर मेजर थॅचर हा आपल्या हाताखालीं कांहीं थोडेंसें सैन्य घेऊन खांबटकीच्या घाटानें वांईकडे जाण्याकरितां निघाला असतां त्यानें तारीख २४ मार्च रोजीं पांडवगडचा किल्ला पाडाव करून घेतला. त्याचप्रमाणें तेथून जवळच कमलगड आणि कालिंजा हे जे दोन किल्ले होते, तेहि पुढील एकदोन दिवसांत काबीज करण्यांत आले. व त्याच सुमाराला चंदनवंदन, विराटगड, कुंडलगड, वगैरे किल्लेहि मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतले. एखाद्या इमारतीच्या पायाचा मुख्य दगड ढांसळला, म्हणजे ती सगळी इमारत जशी कोसळते, तशी या किल्ल्यांची स्थिति झाली. आणि त्यामुळेंच फेब्रुवारीचा अर्धा महिना आणि मार्चचा सगळा महिना अशा फक्त दीड महिन्याच्या अवकाशामध्यें हे सुमारें नऊदहा किल्ले इंग्लिशांच्या एकदम हातामध्यें आले.

पण ही वर वर्णन केलेली स्थिति पांडवगड आणि विराटगड यांच्यासारख्या लहान लहान किल्ल्यांचीच त्या वेळीं झालेली होती, असें नाहीं. साताऱ्याच्या किल्ल्यासारखे मोठमोठे किल्लेहि अशाचसारख्या अवस्थेला येऊन पोंचलेले होते. सातारा हें मराठ्यांच्या राजधानीचें शहर, व साताऱ्याचा किल्ला हाहि इतिहासप्रसिद्ध अशा किल्ल्यांपैकीं एक किल्ला होय. पण त्या किल्ल्याची तरी या वेळीं काय दशा झाली ? ब्रिगेडियर जनरल स्मिथ आणि ब्रिगेडियर जनरल प्रिझलर यांच्या हाताखालील सैन्यें तारीख ८ फेब्रुवारी सन १८१८ चे सुमारास साताऱ्याजवळील कोरेगांव मुक्कामीं एकत्र झालीं; व तेथून कूच करून निघाल्यानंतर त्या दोन्ही सैन्यांचा तळ साताऱ्यापासून सुमारें दीड कोसावर तारीख १० फेब्रुवारी रोजीं येऊन पडला. व लगेच साताऱ्याच्या किल्ल्यावर तोफ सुरू करण्यांत आली. या वेळीं साताऱ्याच्या

किल्ल्यांत इंग्लिशांना लढाई देण्यासारखी सामग्रीची तयारी नव्हती, असें नाहीं. किल्ल्यावर चारपांचशें शिपाई होते. व इंग्लिशांच्या तोफांवर उलट मारा करण्याला योग्य अशा किल्ल्यावर सुमारें पंचवीस मोठमोठ्या तोफा होत्या. पण नुसत्या तोफा आणि नुसत्या किल्ल्याच्या बळकट भिंती या शत्रूला आपल्यापासून दूर राखण्याला केव्हांहि समर्थ होऊं



सातारचा किल्ला.


शकत नाहींत. त्यांच्या पाठीमागें प्रामाणिक आणि प्राण गेला तरी आपल्या देशाचें स्वातंत्र्य जाऊं द्यावयाचें नाहीं अशा दृढ निश्चयाच्या माणसांचें पाठबळ लागत असतें. पण त्याची तर या वेळीं सातारच्या मुत्सद्द्यांमध्यें फारच मोठी उणीव होती. सातारचे प्रमुख

राजकारणी लोक या वेळीं बाळाजीपंत नातूंच्या वशिल्यानें एल्फिन्स्टनसाहेबांच्या कानाशीं लागण्यांत आणि त्यांच्या खोट्या भूलथापांवर विश्वास ठेवण्यांत दंग होऊन गेलेले होते ! अशा स्थितींत साताराचा किल्ला कोणाच्या जोरावर लढविला जाणार ! आणि अशा स्थितींत साताराचा " अजिंक्य तारा " जर जिंकला गेला, तर त्यांत आश्चर्य तें काय ? तारीख १० फेब्रुवारी इसवी सन १८१८ रोजीं सकाळीं त्या किल्ल्यावर इंग्लिशांच्या तोफा चालू झाल्या आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं साताराचा किल्ला इंग्लिशांच्या चरणीं शरणागत आला. ज्या किल्ल्यांतील आणि ज्या किल्ल्याच्या छायेखालील राजधानींतिल राजकारण इंग्लिशांना फितूर झालेल्या हेरांनीं आणि निमकहराम लोकांनीं आधींच पोखरून ठेवलेलें होतें, त्या किल्ल्याच्या भिंतींवर इंग्लिशांनीं आपला दारूगोळा तरी विनाकारण कशाला फुकट दवडावयाला पाहिजे होता ? आणि त्या किल्ल्यानें इंग्लिशांच्या स्वाधीन होण्याला आठ चार तासांचा तरी विलंब कशाला करावयाला पाहिजे होता ? इंग्लिशांनीं साताराचा किल्ला तारीख १० फेब्रुवारी रोजीं घेतला आणि तारीख ११ फेब्रुवारी रोजीं त्यांनीं त्या किल्ल्यावर साताऱ्याच्या राजाचें निशाण उभारलें. जे इंग्लिश लोक पेशव्यांच्या शनवारवाड्यावर आपलें स्वतःचें निशाण उभारतात, त्याच इंग्लिशांनीं साताऱ्याच्या किल्ल्यावर त्या वेळेपुरतें साताऱ्याच्या महाराजांचें निशाण कां उभारलें, हें फितुरीबद्दल मागाहून पश्चात्ताप पावलेल्या आपल्या लोकांना आतां सांगण्याची कांहीं गरज आहे, असें नाहीं. इंग्लिशांनीं साताऱ्याच्या किल्ल्यावर तारीख ११ फेब्रुवारी १८१८ रोजीं जें निशाण उभारलें, तें साताऱ्याच्या महाराजांच्या स्वामित्वाचें द्योतक असें निशाण नसून तें दिलेलीं वचनें पुरीं न करणाऱ्या विश्वासघातकी धोरणाचें द्योतक असें निशाण होतें, हें पुढील इतिहासानें हिंदुस्थानांतील लोकांना सिद्ध करून दाखविलें आहे !

साताऱ्याच्या किल्ल्याची जरी तेथील फितुरीमुळें अशी दैन्यावस्था झाली होती, तरी बाकीच्या किल्ल्यांच्या भिंतींतील दगड इंग्लिशांना असे फितूर झालेले नव्हते. आणि त्यामुळें स्वामिनिष्ठेच्या सिमेंटानें एकमेकांपाशीं चिकटून राहिलेल्या बाकीच्या किल्ल्यांतील बारीक बारीक विटाहि इंग्लिशांच्या तोफांना दाद देत नव्हत्या. राजकीय महत्त्वानें साताऱ्याच्या किल्ल्याइतका नव्हे, पण स्वामिनिष्ठेच्या मजबुतीनें साताऱ्याच्या किल्ल्याहूनहि अधिक श्रेष्ठ असा साताऱ्यापासून कांहीं थोड्या अंतरावर कोंकणच्या बाजूला तोंड वळवून समुद्राचें कौतुक पहात रहाणारा वासोटा या नांवाचा एक किल्ला आहे. शिवाजीनें हा किल्ला हस्तगत करून त्याला वज्रगड असें नांव दिलें होतें. शिवाय ताई तेलीण आणि बापू गोखले या दोघांनींहि आपआपल्या परीनें आपल्या पराक्रमानें या किल्ल्याच्या भिंती महाराष्ट्रांतील लोकांच्या अंतःकरणांमध्यें इतक्या बळकट बांधून ठेवलेल्या आहेत कीं, कोणत्याहि इंग्लिशांच्या खोट्या इतिहासाच्या तोफा त्या भिंतींना तेथून पाडवूं शकणार नाहींत. सृष्टिदेवता सह्याद्रीच्या उंच शिखरावर जोंपर्यंत वासोट्याच्या किल्ल्याचे बुरूज धारण करीत राहील, तोंपर्यंत त्याची स्मृति महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांतून केव्हांहि नाहींशी होणार नाहीं ! हा वासोट्याचा किल्ला फार उंच आहे; आणि कांहीं एक दोन वाटांखेरीज त्या किल्ल्यावर चढून जाण्याला दुसरीकडून कोठूनहि वाट नाहीं; इतके या किल्ल्याच्या चारी बाजूंनीं भयंकर कडे तुटलेले आहेत. गरीब

शेतकऱ्यांच्या निरुपद्रवी स्वतंत्रतेला शांततेनें रहातां यावें अशासाठीं प्रत्यक्ष सृष्टिदेवतेनेंच आपल्या स्वतंत्रतारूपी प्रियकन्येकरितां हें एक माहेरघर बांधून दिलेलें असलें पाहिजे. असें हें स्थळ पाहिलें असतां कोणालाहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण अशा ठिकाणावरहि जुलमी राजांच्या धाडी येऊन पडतात, हें पाहून आतां मी आपल्या या प्रिय स्वतंत्रतेला ठेवूं तरी कोणत्या सुरक्षित ठिकाणीं, अशी काळजी त्या सृष्टिदेवतेला खात्रीनें क्षणोक्षणीं उत्पन्न होत असेल! असा हा वासोट्याचा किल्ला घेण्याकरितां इंग्लिशांची एक टोळी साताऱ्याहून तारीख २९ मार्च इसवी सन १८१८ रोजीं निघाली. आणि त्या किल्ल्याच्या पायथ्याशीं किल्ल्यापासून सुमारें तीन चार कोसांच्या अंतरावर असलेल्या तांबे या गांवीं या टोळीनें ता. ३० मार्च रोजीं मुक्काम केला. व तेथून कर्नल स्टूअर्ट् यांच्या हाताखालीं कांहीं लोक तारीख ३१ मार्च रोजीं पुढें पाठविण्यांत आले. कर्नल स्टूअर्ट् हे त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं किल्ल्यापासून एक दोन कोसांच्या अंतरावर असलेल्या इंदोली या गांवीं येऊन पोंचले. व त्यांनीं तेथून कांहीं अंतरावर आपल्या शिपायांचें एक नाकें बसविलें. आणि बाकीचे लोक फिरून तांबे येथील छावणीमध्यें परत आले. नंतर तारीख १ एप्रिल रोजीं किल्ल्याला वेढा घालण्याचें काम सुरू झालें व निरनिराळ्या ठिकाणीं फौजेचीं नाकीं बसविण्यांत आलीं. वेढा घालणाऱ्या फौजेचे तळ एकंदर तीन ठिकाणीं पडले. एक तळ जुना वासोटा येथें होता. दुसरा तळ किल्ल्याच्या दरवाज्यासमोर असून तेथून किल्ल्याचें अंतर सुमारें सहासातशें यार्ड इतकेंच होतें. आणि तिसरा तळ दुसऱ्याच्या उजव्या बाजूला असून तेथून किल्ल्याच्या भिंती फक्त सुमारें चारशें यार्डच दूर होत्या. अशा रीतीनें किल्ल्याच्या तीन बाजूंनीं वेढा घातल्यानंतर त्याच्यापुढें तोफा वगैरे चढविण्याकरितां रस्ता दुरुस्त करण्याचें काम सुरू करण्यांत आलें. व साताऱ्च्या महाराजांच्या हत्तींकडून तोफा ओढवून तळच्या छावणीमध्यें आणल्यानंतर त्या माणसांकडून डोंगरावर चढविण्यांत येऊं लागल्या. व अशा रीतीनें मोर्चे बांधून आणि डोंगरावर तोफा चढवून झाल्यानंतर तारीख ५ एप्रिल रोजीं जुन्या वासोट्याच्या छावणीच्या जवळील बॅटरीमधून किल्ल्यावर इंग्लिशांच्या तोफांचे गोळे जाऊन पडूं लागले. खुद्द सातारचे महाराज यांना पूर्वी कांहीं दिवस याच किल्ल्यावर ठेवण्यांत आलेलें होतें. त्यांना तेथून काढून बाजीरावसाहेबांनीं नंतर आपल्या स्वारीबरोबर घेतलें होतें; परंतु साताऱ्च्या महाराजांची इंग्लिशांच्याबरोबर आंतून गुप्त कारस्थानें चाललेलीं असल्यामुळें अष्ट्याच्या लढाईनंतर बळवंतराव चिटणीस यांच्या फितुरीनें सातारचे महाराज ब्रिगेडियर जनरल स्मिथ यांच्या स्वाधीन झाले. बापू गोखल्यांच्यासारख्या नररत्नाचा प्राण गेल्याबद्दल ज्यांना वाईट वाटलें नाहीं, पण आपला प्राण शरणागतीनें बचावल्याबद्दल ज्यांना आनंद वाटला, आणि अष्ट्याच्या लढाईंत मराठ्यांचा पराभव होऊन त्या जुन्या हिंदुपदपादशाहीची आतां यत्किंचित्‌हि आशा उरली नाहीं याबद्दल ज्यांना वाईट वाटलें नाहीं, पण फितुरीनें संपादन केलेल्या आपल्या स्वतःच्या अल्पकालीन राज्यप्राप्तीची भ्रामक आशा दिसूं लागल्यामुळें ज्यांना क्षणैक आनंद वाटूं लागला होता, त्या साताऱ्च्या महाराजांच्या कुटुंबांतील कांहीं माणसें अद्यापि या वासोट्याच्या किल्ल्यावर अटकेंत होतीं. तीं माणसें आतां वासोट्याचा किल्ला इंग्लिशांनीं हस्तगत केला म्हणजे आपल्याला भेटतील,

म्हणून त्यांचें स्वागत करण्याकरितां खुद्द साताराचे महाराजहि किल्ल्याच्या पायथ्याशीं इंग्रजांच्या छावणींत येऊन दाखल झाले होते. यामुळें या वासोट्याच्या वेढ्याला एक प्रकारचें महत्त्व आलेलें होतें. पण याशिवाय आणखीहि एका कारणासाठीं इंग्लिशांच्या दृष्टीनें या वेढ्याचें महत्त्व फार मोठें गणलें जात होतें. बाजीरावसाहेबांनीं खडकीस इंग्लिशांच्या विरुद्ध




लढाई सुरू केली, त्या वेळीं आपल्या हाताखालीं मद्रास नेटिव्ह घोडेस्वारांच्या पलटणीपैकीं कांहीं लोक घेऊन कॉर्नेट हंटर आणि कॉर्नेट मॉरिसन या नांवांचे दोन इंग्लिश ऑफिसर्स इंग्लिशांना मदत करण्याकरितां खडकीकडे चालले होते. त्यांना पेशव्यांच्या सैन्यानें पुण्यापासून सात आठ कोसांच्या अंतरावर असलेल्या उरळीच्या मुक्कामावर गांठलें व तेथें


त्यांचा पराभव करून त्या दोन इंग्लिश ऑफिसरांना त्यांनीं कैद केलें. हे कैदी प्रथमतः कांगोरीच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आले होते. पण सुमारें दोन महिन्यांनंतर त्यांना तेथून काढून या वासोट्याच्या किल्ल्यांत कोंडून ठेवण्यांत आलेलें होतें. व हे युरोपियन कैदी वासोट्याच्या किल्ल्यांत कोंडलेले असल्यामुळेंही या किल्ल्याच्या वेढ्याला विशेष महत्त्व आलेलें होतें. इतक्या महत्त्वाच्या या किल्ल्याला वेढा घालण्याचें काम ता. ३१ मार्चपासून ता. ६ एप्रिलपर्यंत सुमारें एक आठवडाभर चाललेलें होतें. व वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं मोर्चे बांधून बॅटरीज् चालू करण्यांत आल्या होत्या. ही सगळी तयारी होऊन गडावर हल्ला सुरू होण्यापूर्वी तेथील किल्लेदाराकडे इंग्लिशांकडून किल्ला स्वाधीन करण्याविषयींचा एक निरोप पाठविण्यांत आला होता. पण हा निरोप धुडकावून लावून किल्ला लढविणें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे, असें त्या पाणीदार आणि प्रामाणिक किल्लेदारानें ठरविलें. वास्तविक पाहिलें असतां त्या किल्लेदाराला या वेळीं जयाची काय आशा होती ? पेशव्यांचीं सगळीं सैन्यें उधळून गेलेलीं; खुद्द धनी पेशवे जाग्यावर नाहींत; बापू गोखल्यांच्यासारखे सरदार मरण पावलेले; आसपासचे बहुतेक मोठमोठे लोक फितुर झालेले; कोठें प्रामाणिकपणाची स्वामिनिष्ठा उरलेली असली, तर तिला देशोधडीला लागण्याचें शासन मिळत आहे; आपल्या सभोंवतालचे किल्ले एकामागून एक इंग्लिशांच्या स्वाधीन होत आहेत; अशी चोहोंकडची निराशाजनक परिस्थिति स्पष्ट दिसत असतांना त्या वासोट्याच्या किल्लेदाराला आशा करण्याला कोणती जागा होती ? आणि इंग्लिशांकडून निरोप आल्याबरोबर त्यानें किल्ला इंग्लिशांच्या हवाली केला असता, तर त्यांत त्याचा काय गुन्हा झाला असता ? अशा स्थितीमध्यें कोणीहि पोटभरू आणि स्वार्थसाधु अशा क्षुद्र वृत्तीच्या मनुष्यानें मुकाट्यानें किल्ला स्वाधीन करून इंग्लिशांपासून बक्षिस मिळवून आपल्या बायकामुलांची धन केली असती ! पण संकटमय आणि निराशापूर्ण अशा परिस्थितीमध्येंहि आपल्या स्वामिनिष्ठेला आणि आपल्या क्षात्रवृत्तीला जागावयाचें आणि फळाची आशा नसतांनाहि आपलें कर्तव्यकर्म करावयाचें, अशी उदात्त वृत्ति महाराष्ट्रांमध्यें त्या वेळीं कितीतरी लोकांच्या अंगांमध्यें होती ! आणि म्हणूनच मराठ्यांचें राज्य चाललेलें होतें. अशा प्रकारच्या उत्कृष्ट आणि अद्वितीय गुणांनीं युक्त असा जो तो वासोट्याचा किल्लेदार, त्या बिचाऱ्याचें नांवही आज कोणाला ठाऊक नाहीं. ज्यांनीं विश्वासघात केले, त्यांच्या राजवाड्यांचे कळस आकाशाचें चुंबन घेण्याकरितां एकावर एक मजले चढत आहेत ! आणि वासोट्याच्या किल्लेदारासारख्या ज्या लोकांनीं आपलें सत्त्व सोडिलें नाहीं; त्यांचीं नांवेंही आज कोणाला माहीत नाहींत ! तरी पण त्यांचीं नांवें माहीत नसलीं, तरी त्यांच्या या सद्गुणांचीं नुसतीं वर्णनें वाचलीं असतांही कोणाच्याही डोळ्यांतून पाणी आल्यावांचून राहणार नाहीं ! धन्य ते प्रामाणिक लोक, कीं ज्यांच्या एकनिष्ठतेच्या स्मृतीनें अद्यापिही महाराष्ट्रांतील लोकांचीं अंतःकरणें द्रवून जातात ! जो हा वासोट्याचा किल्लेदार आपल्या बायकामुलांच्या दैन्यावस्थेला न स्मरतां केवळ आपल्या स्वामिभक्तीचेंच स्मरण लक्षांत बाळगून किल्ला लढविण्याला तयार झाला, तो जातीनें मराठा होता, किंवा मुसलमान होता, किंवा कोण होता, हें आज कोणाला कांहीं एक माहीत नाहीं. ( त्याचें नांव भास्करपंत

होतें, असा एके ठिकाणीं एक उल्लेख आढळतो. ) तरी पण त्याच्या त्या स्वामिनिष्ठेच्या सद्गुणाच्या चरणीं सर्व महाराष्ट्राचे सहस्रशः साष्टांग प्रणिपात समर्पणीय आहेत, यांत शंका नाहीं ! त्या किल्लेदारानें किल्ला लढविण्याचा निश्चय केला. व किल्ल्यावरून त्यानें खालील इंग्लिशांच्या सैन्यावर तोफांची आणि जेजालांची सरबत्ती सुरू केली. इंग्लिशांचें सैन्य किल्ल्याच्या पायथ्यासभोंवतीं चार पांच दिवस एकसारखें कुचमत होतें. पण त्याचा अजून जम बसला नव्हता. अखेरीस जुन्या वासोटयाच्या गांवाजवळ त्यांनीं जी बॅटरी चालू केली होती, तिचे गोळे किल्ल्यावर जाऊन पडूं लागले व त्याच्या योगानें किल्ल्यावरील एका मोठ्या इमारतीला ता. ५ एप्रिल रोजीं आग लागली. व ती सगळी इमारत खाक होऊन किल्ल्यावर बरेंच नुकसान झालें. तरी पण किल्लेदार लढाई थांबविणार असल्याचीं कांहीं चिन्हें दिसत ना. म्हणून ता. ६ एप्रिल रोजीं फिरून इंग्लिशांच्या तोफा सुरू झाल्या. किल्ल्याच्या भिंतींत जेथें कांहीं मोडतोड होई, तेथें दुरुस्ती करून किल्ल्यावरचे लोक फिरून उमेदीनें लढतच होते. आणि त्यामुळें किल्ला लवकर स्वाधीन होणें शक्य नाहीं, असें वाटल्यावरून आणखी तोफा आणण्याची इंग्लिशांनीं तयारी चालविली होती. परंतु चालू असलेल्या तोफांच्या गोळ्यांनीं किल्ल्यावर बरीच उद्ध्वस्तता उत्पन्न करण्यांत आली होती; व त्यामुळें त्यानंतर किल्ला लढविणें शक्य नव्हतें. म्हणून ता. ७ एप्रिल रोजीं लढाई थांबविण्यात येऊन इंग्लिशांनीं तो किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला.

वासोट्याचा किल्ला अशा रीतीनें हस्तगत झाल्यानंतर या सैन्यानें सातारा जिल्ह्यांतील मसूर, वसंतगड, सदाशिवगड, मार्च्छिंद्रगड, बत्तीस शिराळें, इसलामपूर, वाळवे, वगैरे ठिकाणचे लहान मोठे किल्ले काबिज करून घेतले. हे किल्ले इकडे काबीज केले जात असतांना पुण्याच्या जवळील लोहगड, विसापुर, तुंग, तिकोना, राजमाची, वगैरे किल्ले घेण्यामध्यें कर्नल प्रॉथर हे गुंतलेले होते. व हे घाटावरील किल्ले काबीज करून झाल्यानंतर कर्नल प्रॉथर हे कोंकणांतलि भोरप, पाली, अवचितगड, सोनगड, वगैरे किल्ले काबीज करून घेण्याकरितां कोंकणांत उतरले व त्यांनीं तिकडील बहुतेक किल्ले हस्तगत केले.

अशा रीतीनें पुणें, सातारा, कोंकण या प्रांतांतून पेशव्यांचे किल्ले पाडाव करून घेण्याचें काम एकीकडे चाललें असतां दुसरीकडे कर्नाटकामध्यें ब्रिगेडिअर जनरल सर टॉमस मन्रो हे तिकडील किल्ले हस्तगत करून घेण्यांत गुंतलेले होते. कर्नाटकांतील किल्ल्यांपैकीं गदग, डुमल, हुबळी, मिसरी कोटा, बागलकोट, पाच्छापूर, गोकाक, या किल्ल्यांनीं इंग्लिशांपाशीं लढाई दिली. परंतु त्यांच्यानें फार दिवस टिकाव धरवला नाहीं. कर्नाटकांतील बदामीचा किल्ला हा एक प्रख्यात किल्ला असून तो फार मजबूतहि आहे. डोंगरावरील अवघड जागेंत मुख्य किल्ल्याची तटबंदी असून त्याच्या पायथ्याशीं बदामी हा गांव वसलेला आहे. व त्या गांवाच्याहि सभोंवतीं फार मजबूत असा त्यावेळीं एक कोट होता. त्यांतील वस्तीला पेटा असें म्हणत असत. हा पेटा हस्तगत झाल्यावांचून त्याच्यावरील डोंगरांतील बदामीचा किल्ला हस्तगत होणें शक्य नव्हतें. म्हणून ब्रिगेडिअर जनरल मन्रो यांनीं या पेट्याच्या भिंतिवर प्रथमतः हल्ला चढविण्याचें ठरविलें. पण ही गोष्टही फारशी सोपी नव्हती. हा पेटा घेण्यालाही सर टॉमस मन्रो यांना दोन तीन दिवस रखडावें लागलें. अखेरीस ता. १८ फेब्रुवारी १८१८ रोजीं इंग्लिशांच्या सैन्याचा बदामच्यिा पेट्यामध्यें प्रवेश झाला. व

त्यामुळें मग त्यांना बदामीचा किल्ला हस्तगत करण्याला फारसे प्रयास पडले नाहींत. अशा रीतीनें कर्नाटकांत प्रत्येक किल्ल्यावर इंग्लिशांना थोडथोडा अडथळा होत होता. परंतु त्यांना सर्वांत मोठा अडथळा बेळगांवच्या किल्ल्यानें केला. या बेळगांवच्या किल्ल्याच्या समोर ब्रिगेडिअर जनरल मन्रो यांच्या सैन्याचा तळ ता. २० मार्च १८१८ रोजीं येऊन पडला. हा किल्ला फार चांगल्या स्थितीमध्यें होता. हा जरी सपाट मैदानावर आहे, तरी याच्या बांधकामाची मजबुती इतकी चांगली होती कीं, हा किल्ला सर करण्याला इंग्लिशांना फारच





**बेळगांवचा किल्ला.**

१ २ ३ ४ ५ जेथें तोफा डागल्या होत्या, त्या निरनिराळ्या जागा. ६ ६ ६ खंदक. ७ नवीन दरवाजा. ८ जुना दरवाजा. ९ निशाणाच्या बुरुजावरील तोफखाना. १० किल्लेदाराचा वाडा. ११ मशिद. १२ देऊळ. १३ जुनी शहराची भिंत.

पंचाईत पडली. किल्ल्याच्या सभोवती चोहों बाजूंनीं पाणी भरलेला खोल खंदक असून तटाच्या भिंती उंच आणि मजबूत होत्या. व किल्ल्यामध्यें दारूगोळा भरपूर असून आंतील शिपायांची संख्या सुमारें सोळाशेंच्या वर होती. या किल्ल्याचा मुख्य दरवाजा उत्तरेच्या बाजूला होता. व दक्षिणच्या बाजूला दुसरा एक जुना दरवाजा होता. त्याचप्रमाणें किल्ल्यांत एक देऊळ व एक मशिद असून किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या आंत कांहीं अंतरावर किल्लेदाराचा राहण्याचा वाडा होता. व किल्ल्याच्या वायव्येच्या कोपऱ्यावर एक मोठा थोरला निशाण उभारण्याचा बुरूज होता. व किल्ल्याच्या पश्चिमच्या बाजूला बेळगांव शहरचा विस्तीर्ण पेटा होता. या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां किल्ल्याच्या उत्तर दरवाज्याच्या समोर असलेल्या एका मशिदीजवळ इंग्लिशांच्या पायोनिअर कंपनीनें तीन ट्वेल्व्ह पौंडरच्या तोफांची एक बॅटरी उभी केली. या बॅटरीपासून किल्ल्याचे अंतर सुमारे ८०० यार्ड होते. व या अंतरावरून ता. २१ मार्च रोजीं किल्ल्यावर गोळे टाकण्याला सुरुवात झाली. त्याचप्रमाणें किल्ल्याच्या वायव्य दिशेकडून बेळगांवच्या पेठ्याच्या बाजूनें दोन तोफांची दुसरी एक बॅटरी ता. २२ मार्च रोजीं रात्रीं सुरू करण्यांत आली. याशिवाय आणखीही कित्येक निरनिराळ्या ठिकाणांहून मोर्चे बांधून किल्ल्याच्या दरवाजावर तोफा सुरू करण्यांत आलेल्या होत्या व या तोफांच्या संरक्षणाखालीं किल्ल्याच्या जवळ जवळ जाण्याकरितां दररोज थोडथोड्या प्रमाणानें एक खंदक खणण्यांत येत होता. दररोज सुमारें शंभरसव्वाशें यार्ड जमीन खोदून त्यातून किल्ल्याच्या जवळ जाण्याकरितां ही वाट तयार करण्यांत येत होती. हें खंदक खोदण्याचें काम ता. २४ मार्चपासून सुमारें ता. १ एप्रिलपर्यंत चाललेलें होतें व या अवधींत हा खंदक सुमारें ८०० शें यार्ड लांबपर्यंत खोदण्यांत आला होता. या खंदकांतून किल्ल्याच्या बऱ्याच जवळच्या अंतरापर्यंत वाट तयार होईनोंपर्यंत आजूबाजूच्या मोर्च्यांवरून इंग्लिशांच्या तोफा किल्ल्यावर चालूच होत्या. पण किल्ल्यानें कांहीं दाद दिली नाहीं. किल्ल्यामध्यें निशाण उभें करण्याचा म्हणून जो एक मोठा बुरूज होता, त्या बुरुजावरून किल्ल्यांतील लोकांनीं एक तोफ चालू करून बाहेरच्या बॅटरीवर मारा चालविला; व तटाच्या भिंतीवर आणखीही कांहीं तोफा डागून जो खंदक खणला जात होता त्याच्यावर किल्ल्यांतून कांहीं गोळे टाकण्यांत आले. तरी पण खंदकाचें काम दिवसास लपून छपून आणि रात्रीं रात्रीच्या काळोखांत हळुहळू चाललें होतें. अशा रीतीनें ता. २१ पासून ता. ३१ मार्च पर्यंत दोन्हीं बाजूंनीं लढाई चाललेली होती. पण इंग्लिशांच्या तोफखान्याचा इतक्या दहा दिवसांत बेळगांवच्या किल्ल्यावर म्हणण्यासारखा कांहींच परिणाम झालेला नव्हता. मराठ्यांचे शिपाई अशा रीतीनें किल्ल्याचें संरक्षण करीत होते, हें त्यांना फार भूषणास्पद आहे. व त्यांच्या श्रमाला दैव अनुकूळ होत आहे, असाही एकदां एक सुप्रसंग घडून आला. किल्ल्याच्या उत्तर दरवाजासमोर असलेल्या मशिदीजवळील बॅटरीमधून इंग्लिश लोक किल्ल्यावर गोळे टाकीत असतां त्या बॅटरीमधील ट्वेल्व्ह पौंडरच्या तोफा बंद पाडण्याकरितां किल्ल्यांतील लोकही त्या बॅटरीवर आणि त्या मशिदीच्या आसपास आपले गोळे फेकीत होते. ते गोळे नेमके जाऊन पडून सुदैवानें इंग्लिशांच्या दारूच्या कोठाराला आग लागली; व त्या मशिदीजवळील बॅटरीमध्यें आगीचा एकच भडका उडून

गेला. तेव्हां ही संधि फार चांगली आहे, असें पाहून किल्ल्यांतील शिपाई एकदम मोठ्या शौर्यानें बाहेर पडले व हल्ला करणाऱ्या इंग्लिशांच्या त्या सैन्यावर चाल करून गेले. इंग्लिशांच्या दारूगोळ्याला आपल्या तोफांच्या माऱ्यानें आग लावून त्या गोंधळांत तें इंग्लिश लोक असतांना त्यांच्यावर अचानक रीतीनें येऊन छापा घालणें हें युद्धकौशल्याच्या दृष्टीनें फारच धाडसाचें आणि पराक्रमाचें कृत्य होतें. दारूगोळ्याला आग लागलेली; सगळे इंग्लिश गोलंदाज गोंधळून गेलेले; व त्यांतच त्यांच्यावर किल्ल्यांतील लोकांकडून गोळीबाराचा भडिमार चाललेला; अशा स्थितिमध्यें किल्ल्यांतील कांहीं लष्कर आपल्यावर छापा घालण्याकरितां येत आहे, हें पाहून इंग्लिशांची बरीच त्रेधा उडाली असली पाहिजे, यांत शंका नाही. या वेळीं या बाहेर गेलेल्या शिपायांनीं काय केलें, याच्याबद्दल आपल्या लोकांनीं लिहिलेलीं वर्णनें उपलब्ध असतीं, तर त्यांत खरोखर पुष्कळ मनोरंजक आणि पुष्कळ उत्साहदायक माहिती आपल्याला वाचावयाला मिळाली असती. पण या शिपायांनीं इंग्लिशांच्या लष्करांत बरीच गडबड उडवून सोडली असली पाहिजे, यांत शंका नाहीं. कारण त्या दिवशीं पुढें इंग्लिशांकडून हल्ल्याचें फारसें कांहीं काम झालें नाहीं! ता. ३१ मार्च व ता. १ एप्रिल हे दोन्ही दिवस त्यांना आपल्या तोफांची दुरुस्ती करण्यांत व इतर व्यवस्था लावण्यांतच घालविणें भाग पडलें. परंतु या अवधींत इंग्लिशांनीं खणलेला खंदक मात्र बराच जवळ येऊन पोंचलेला होता. व तेथून त्यांनीं ता. ३ एप्रिल पासून दुसरी एक बॅटरी किल्ल्यावर सुरू केली. परंतु किल्ल्यांतील लोकांनीं या बॅटरीचेंही फारसें चालूं दिलें नाहीं. तरी पण खंदकांतून इंग्लिशांच्या तोफा हळुहळू पुढें सरकत चाललेल्या होत्या. व ता. ७ एप्रिल रोजीं किल्ल्याच्या भिंतीपासून सुमारें १५० यार्डांच्या अंतरावर इंग्लिशांनीं एक ट्वेल्व्ह पौंडर तोफ आणून चालू केली. पण या तोफेनून १५–२० गोळे उडवून झाले नाहींत. तोंच हीं तोफ फुटून गेली. त्यामुळें इंग्लिशांच्या फौजेंत फिरून गोंधळ उडून गेला. तेव्हां ता. ८ एप्रिल रोजीं ती फुटलेली तोफ टाकून देऊन किल्ल्याच्या दरवाजासमोर दुसऱ्या दोन तोफा आणण्यांत आल्या. व त्या ता. ९ रोजीं सुरू झाल्या. इतक्या तोफांचा भडिमार किल्ल्यावर सारखा सुरू असल्यामुळें किल्ल्यांतील तटाचा एकेक भाग पडत चालला होता. तरीही एप्रिलच्या १० तारखेपर्यंत किल्ल्यांतील लोक लढतच होते आणि किल्ल्याचा बचाव करण्याकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होते. परंतु याच्यापुढे किल्ला ताब्यांत ठेवणें शक्य नव्हतें. त्यामुळे अखेरीस ता. १२ एप्रिल रोजीं बेळगांवचा किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. ता. २१ मार्च १८१८ पासून ता. १२ एप्रिलपर्यंत सुमारें बावीस दिवस हा बेळगांवचा किल्ला लढला. भुईकोट किल्ला असूनही इतके दिवसपर्यंत ज्यानें टिकाव धरला, असें महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या यादीमध्यें मालेगांवच्या किल्ल्याखेरीज दुसरें उदाहरण नाहीं. या चिकाटीबद्दल आणि पराक्रमाबद्दल बेळगांवचा किल्ला, तेथील इमानी किल्लेदार आणि त्याच्या हाताखालील शूर शिपाई, यांची स्मृति महाराष्ट्राच्या अंतःकरणांत सदोदित कायम राहील, यांत शंका नाहीं.

ब्रिगेडिअर जनरल मन्रो यांच्या हाताखालील सैन्य बेळगांव वगैरे ठिकाणचे कर्नाटकांतील किल्ले सर करून मोकळे झाल्यानंतर वासोट्याच्या किल्ल्यावरून परत फिरलेले





## सोलापूरचा किल्ला.

| | |
|---|---|
| १ १ १ १ १ | हल्ला करण्याकरितां येणाऱ्या इंग्लिश पलटणींचा मार्ग. |
| २ २ | रिझर्व्ह फौजेची पहिली जागा. |
| ३ | रिझर्व्ह फौजेची दुसरी जागा. |
| ४ ४ | जेथें तोफखाना उभा केला होता ती जागा. |
| ५ ५ | रिझर्व्हमधील सैन्यानें केलेला हल्ला. |
| ६ ६ ६ ६ | किल्ल्याच्या तटाखालीं उभें असलेलें पेशव्यांचें सैन्य. |
| ७ ७ ७ | इंग्लिशांच्या रिझर्व्ह सैन्यावर हल्ला करण्याकरितां चाललेलें मराठ्यांचें लष्कर. |
| ८ ८ | इंग्लिशांच्या रिझर्व्ह सैन्यावर सरदार गणपतराव पानसे यांनीं जेथून तोफांचा मारा केला, ती जागा. |

ब्रिगेडिअर जनरल प्रिझलर यांच्या हाताखालील सैन्य व मन्रो यांच्या हाताखालील सैन्य हीं दोन्ही सैन्यें एकत्र झालीं. व त्या संयुक्त सैन्यानें आपला मोर्चा सोलापूरकडे वळविला. या वेळीं पेशव्यांच्या सैन्यांतील पायदळ आणि तोफखाना हीं सोलापूरच्या किल्ल्याच्या आश्रयाला येऊन राहिलीं होतीं. सोलापूरचा किल्ला हा बेळगांवच्या किल्ल्याप्रमाणेंच एक भुईकोट किल्ला आहे. याच्या पूर्वेच्या आणि उत्तरच्या बाजूला सोलापूर शहराचा पेटा वसलेला असून दक्षिणच्या बाजूला एक मोठा तलाव आहे. किल्ल्याच्या भोंवतीं पूर्वी मोठा खंदक असून त्यांत पाणीही भरलेलें असे. किल्ल्याच्या भिंती उंच आणि मजबूत असून त्याच्या सभोंवार पेटा आणि तळें यांचें संरक्षण असल्यामुळें त्या किल्ल्याचें सामर्थ्य बरेंच वाढलेलें होतें. या किल्ल्यामध्यें संरक्षणाकरितां ठेवलेले नेहमींचे एक हजार शिपाई होते. परंतु त्यांच्याशिवाय या किल्ल्याच्या आश्रयाला त्या वेळीं पेशव्यांचें दुसरें एक मोठें सैन्य येऊन राहिलें होतें. या सैन्यांत सुमारें ५॥ हजार पायदळ असून त्यांत बाराशें अरब होते. शिवाय ८–९ शें घोडेस्वार असून या सैन्याबरोबर १४ तोफा होत्या. या तोफखान्यावर सरदार गणपतराव पानसे हे मुख्य होते. व डी पिन्टो या नांवाचा एक पोर्च्युगीज ऑफिसर पायदळावरील मुख्य होता. हा डी पिन्टो बहुतकरून खडकीच्या लढाईंत मारला गेला असावा, असा कित्येकांचा तर्क आहे. तेव्हां तो तेथें मारला गेला असल्यास हा डी पिंटो निराळा असला पाहिजे, किंवा तो खडकीच्या लढाईंत मारला तरी गेला नसला पाहिजे. असो. येणेंप्रमाणें पेशव्यांच्याकडील सुमारें पांच सहा हजार सैन्य या वेळीं किल्ल्यांत आणि किल्ल्याच्या बाहेर एकत्र जमा झालेलें होतें. व इंग्लिशांच्या बाजूला दोन ब्रिगेडिअर जनरलांच्या हाताखालील सैन्यें एकत्र झालीं असल्यामुळें त्यांच्याही सैन्याची संख्या कांहीं कमी होती असें नाहीं. अशीं हीं दोन सैन्यें एकत्र सोलापूरच्या जवळ जमा झाल्यानंतर ता. ९ मे रोजीं ब्रिगेडिअर जनरल टॉमस मन्रो यांनीं शत्रूच्या जागेची एकंदर टेहळणी केली. आणि ता. १० मे रोजीं पहाटेस किल्ल्यावर चढाई करून जाण्याला सुरवात केली. लढाईला प्रत्यक्ष सुरवात होण्याच्या पूर्वी चैनसिंग या नांवाचा एक सुभेदार इंग्लिशांकडील तहाच्या अटींचा निरोप घेऊन पेशव्यांच्या सैन्याकडे गेला होता. परंतु त्याच्या तहाच्या अटी ऐकून न घेतां पेशव्यांच्या सैन्यांतील अरबांनीं किल्ल्याच्या भिंतीखालीं त्या सुभेदाराला ठार मारून टाकलें. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर प्राणसंकट प्राप्त झालें असतां त्या स्वातंत्र्याकरितां प्राणावर उदार होऊन लढणें हें ज्यांचें कर्तव्यकर्म, अशा सुभेदारांनीं दुसऱ्यांचे निरोप घेऊन आपल्या देशांतील लोकांना फोडण्याकरितां उद्युक्त व्हावें, अशा प्रकारचीं हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें ठिकठिकाणीं जीं अनेक उदाहरणें आढळतात, तो या देशाच्या इतिहासावर एक मोठा कलंक आहे. व अशा प्रकारची कालिमा आपल्या देशाच्या दिव्य तेजाला आपल्या हातून यापुढें तरी लागूं नये, अशी प्रत्येकानें काळजी घेणें अवश्य आहे. असो. ता. १० मे रोजीं पहाटे ३ वाजतां इंग्लिशांचें सैन्य किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां निघालें. इंग्लिशांची जी मुख्य छावणी होती, तिच्या संरक्षणाकरितां कांहीं लोक मागें राहून बाकी सर्व लढाईला निघाले. या सैन्याचे दोन विभाग करण्यांत आले होते. त्यांपैकीं कर्नल ह्यूएट, ले. न्यूऑल आणि मेजर जाइल्स यांच्या हाताखालील सैन्यानें सोलापूर शहरच्या पेठ्यांच्या भिंतींना

शिड्या लावून वर चढावें व पेटा हस्तगत करावा, असें ठरलें होतें. व ब्रिगेडिअर जनरल प्रिझलर याच्या हाताखालील बाकीचें सैन्य रिझर्व म्हणून ठेवण्यांत आलेलें होतें. या योजनेप्रमाणें शिड्या लावून इंग्रजांचे कांहीं शिपाई शहरच्या तटाच्या भिंतविर चढले व तेथून आंत शिरून त्यांनीं शहराचे दरवाजे उघडले व नंतर बाकीचें सर्व सैन्य त्या दरवाजानें आंत घुसलें. अशा रीतीनें सर्व पेटा काबीज करून इंग्लिशांचे शिपाई खुद्द किल्ल्याच्या जवळ येऊन पोंचले. सोलापूर शहरचा पेटा अशा रीतीनें हस्तगत केला जात असतां किल्ल्याच्या दक्षिणच्या बाजूच्या तोफांच्या संरक्षणाखालीं पेशव्यांचें जें सैन्य गणपतराव पानसे यांच्या हाताखालीं छावणी देऊन राहिलें होतें, तें सैन्य इंग्लिशांवर उलट दिशेनें हल्ला करण्याकरितां बाहेर पडलें. इंग्लिशांचे बहुतेक लोक पेठ्यामध्यें गुंतलेले होते. व पेटयाच्या उत्तरच्या बाजूला टॉमस मन्रो यांच्या हाताखालीं जें रिझर्व सैन्य होतें, त्यांत थोडे लोक होते, हें पाहून सरदार पानसे हे त्या सैन्यावर हल्ला करण्याकरितां आपल्या फौजा आणि तोफा घेऊन निघाले. आपल्यावर हा हल्ला येत आहे व आपल्यापाशीं पुरेसे लोक नाहींत, हें पाहून ब्रिगेडिअर जनरल मन्रो हा फार घाबरून गेला व त्यानें आपलें रिझर्व सैन्य जेथें उभें होतें तेथून हलवून तें पेठ्याच्या भिंतीच्या आश्रयाखालीं आणून उभें केलें. इकडे पेशव्यांचें लष्कर आणि तोफा दौड करीत किल्ल्याच्या बाजूनें निघाल्या त्या इंग्लिशांच्या रिझर्व सैन्याच्या समोर येऊन हल्ला करूं लागल्या. व पानशांच्या तोफांची सरबत्ती इंग्लिशांच्या सैन्यावर सुरूं झाली. तेव्हां मन्रो साहेबांची फारच धांदल उडून गेली व त्यांनीं पेठ्यांतील लोकांना मदतीकरितां बाहेर बोलाविलें. ती मदत येईपर्यंत पेशव्यांच्या फौजांनीं इंग्लिशांच्या सैन्याचा बराच नाश केला; व लढाईचें पारडें पेशव्यांच्या बाजूकडे फिरेल, असा पुष्कळ संभव दिसूं लागला. परंतु दैव अनुकूल नसलें, म्हणजे मनुष्याचें सामर्थ्य कांहींएक चालत नाहीं! पानशांच्या तोफखान्यांतून तोफांचा भडिमार चालला असतांना त्यांतील एक तोफ फुटली आणि त्यामुळें पेशव्यांच्या सैन्यांत थोडा गोंधळ उत्पन्न झाला. पण दुर्दैव संकटें आणूं लागलें, म्हणजे तें तीं एकेकटीं आणीत नाहीं. पानशांच्या तोफखान्यांतील एक तोफ फुटून थोडा गोंधळ उत्पन्न होत आहे न होत आहे, तोंच इंग्लिशांच्याकडील तोफेचा गोळा लागून खुद्द गणपतराव पानसे आणि त्यांच्या हाताखालील दुसरे एक अधिकारी असे दोघे एकदम रणांगणावर पतन पावले. हीं संकटें पेशव्यांच्या सैन्यावर अचानक रीतीनें कोसळलीं, तरीही त्यांनीं कांहीं वेळ लढाई चालूं ठेविली होती. परंतु इंग्लिशांना जास्त कुमक येऊन मिळाल्यानंतर त्यांना मागें हटावें लागलें त्या वेळीं या पेशव्यांच्या सैन्यांतील माघारे फिरलेले लोक शहरामध्यें शिरले व तेथील कांहीं जागा त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतल्या. व किल्ल्यावरून जो तोफांचा मारा शहरांतील इंग्लिशांच्या सैन्यावर होत होता, त्यामुळें इंग्लिशांनीं काबीज केलेल्या जागा आपल्या ताब्यांत ठेवणें त्यांना अशक्य झालें होतें, तरी पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. आणि अखेरीस ता. १० मे रोजीं सोलापूरचा किल्ला इंग्लिशांनीं काबीज करून घेतला.

याप्रमाणें सोलापूर, बेळगांव, वगैरे ठिकाणचे किल्ले पाडाव करून घेण्याचें काम




**राजदीरचा किल्ला.**

१ २ ३ ४ जेथें इंग्लिशांनीं तोफा डागल्या होत्या त्या जागा.


एकीकडे चाललेलें असतांना दुसरीकडे नाशिक, खानदेश, वगैरे प्रांतांतील किल्ल्यांचा ताबा घेण्याकरितां लेफ्टनंट कर्नल मॅकडावेल हे प्रयत्न करीत होते. हे आपल्या हाता-

खालील पलटणें घेऊन औरंगाबाद, जालना, वगैरेच्या मार्गानें इ. स. १८१८ च्या एप्रिल महिन्याच्या सुमाराला नाशिक जिल्ह्यांतील चांदवड मुक्कामाजवळ आले. येथें राजदीर आणि इंदेराय असे दोन मोठे प्रचंड किल्ले आहेत. चांदवडचा किल्ला ता. १० एप्रिल रोजीं स्वाधीन झाला. पण हे किल्ले बळकट असल्यामुळें ते इंग्लिशांच्या स्वाधीन होईनात. म्हणून ले. क. मॅक्डॉवेल यांनीं पहिल्यानें राजदीरच्या किल्ल्यावर चढाई करून जाण्याचें ठरविलें. राजदीरचा किल्ला उंच डोंगरावर असल्यामुळें तो नैसर्गिकरीत्याच अजिंक्य आहे. आणि एका पाऊल वाटेच्या खिंडीशिवाय त्याच्यावर जाण्याला दुसरा कोणताही मार्ग नाहीं. ही जी एकच वाट आहे, ती खडकांतून खोदून तयार केलेली असल्यामुळें व ती वाट लोखंडी मजबूत दरवाजांनीं बंद करतां येण्यासारखी असल्यामुळें परशत्रूला किल्ल्यावर जाणें अगदीं दुरापास्त आहे. या किल्ल्यावर पाण्याचा पुरवठा पुष्कळ असून शिवाय अन्नसामग्रीहि एक वर्षपर्यंत पुरेल इतकी तेथें सांठवून ठेवण्यांत आलेली होती. शिवाय किल्ल्यावर मोकळे दगड इतके पसरलेले आहेत कीं, खालून वर येणाऱ्या शत्रूला दारूगोळ्याशिवाय नुसत्या दगडांनीं चेंचून काढावयाचें म्हटलें, तरीहि तें पुरण्यासारखे आहेत. शिवाय किल्ल्यावर येण्याला आडवे तिडवे रस्ते मुद्दाम केलेले असून त्या प्रत्येक रस्त्यावर वरून बंदुकीचा मारा करतां येईल, अशी ठिकठिकाणीं खडकांत भोंकें खोदून ठेविलीं आहेत. किल्ला अशा प्रकारचा मजबूत आणि किल्ल्यावरील अरब पहारेकरी अत्यंत प्रामाणिक अशी स्थिति असल्यावर राजदीरसारखा किल्ला गोडीगुलाबीनें किंवा भुलथापांनीं इंग्लिशांच्या स्वाधीन होणें शक्यच नव्हतें. किल्लेदारानें मुकाट्यानें स्वाधीन व्हावें, म्हणून इंग्लिशांकडून एक सामोपचाराचा निरोप पाठविण्यांत आला होता. परंतु किल्ल्यावरील अरबांकडून या निरोपाचा अत्यंत तुच्छतेनें तिरस्कार करण्यांत आला. व लगेच किल्ल्यावरून बंदुका आणि जेजाला यांचा शत्रूंवर भडिमार सुरू झाला. तेव्हां युक्तीचा उपयोग न होतां लढाईचाच उपाय योजिला पाहिजे, हें निश्चित झाल्यानंतर इंग्लिशांनीं निरनिराळ्या ठिकाणीं मोर्चे बांधण्याला सुरवात केली. व ता. ११ एप्रिल रोजीं संध्याकाळीं त्यांनीं आपले एक चौकीचें नाकें प्रस्थापित केलें. त्याच्यापुढील डोंगरामध्यें आपलीं नाकीं बसवितां यावीं, म्हणून ता. १२ एप्रिल रोजीं सकाळीं तोफा चालू करून त्यांच्या आश्रयाखालीं बाकीचीं नाकीं बसविण्याला त्यांनीं सुरवात केली. किल्ल्याच्या बाहेरील एका टोंकावर किल्ल्यांतील कांहीं लोक येऊन तेथून ते शत्रूवर मारा करीत होते. पण त्या नाक्यावर हल्ला करून ती जागा काबीज करण्यांत आली. तेव्हां पेशव्यांचे सर्व शिपाई किल्ल्यांत जाऊन तेथून गोळीबार करूं लागले. तरी पण इंग्लिशांची, पुढील टेंकडी चढून जाण्याची तयारी चाललेलीच होती. व त्या ठिकाणीं तोफ चढवून नेणें अशक्य असल्यामुळें तोफेचे भाग निरनिराळे करून ते वर नेऊन तेथें ती तोफ रात्रीं नऊ वाजतां फिरून जोडण्यांत आली. ही तोफ चालू झाल्यानंतर तिचे गोळे किल्ल्यांत जाऊन पडूं लागले व त्यांच्या योगानें किल्ल्यावरील दारूच्या कोठाराला आग लागली. त्या वेळीं तेथें राहणें अशक्य झाल्यामुळें किल्ल्यांतील शिपाई किल्ला सोडून बाहेर पडले व इंग्लिशांचे लोक त्यांना अडवण्याचा प्रयत्न करीत असतां, त्याला न जुमानतां ते रात्रीच्या काळोखांतून इंग्लिशांच्या आटोक्याच्या पलीकडे सुरक्षितपणें निघून गेले.

यानंतर ता. २२ एप्रिल रोजीं इंग्लिशांच्या सैन्यानें त्रिंबकेश्वरच्या किल्ल्याला वढा घातला. या किल्ल्यावर सुमारें साडेपांचशें शिपायी व २५ तोफा होत्या. किल्ल्याच्या सभोंवतालच्या जागांची साऱ्या दिवसभर टेहळणी करून झाल्यानंतर किल्ल्याच्या दक्षिण दरवाजाच्या समोर ता. २२ एप्रिल रोजीं रात्रीं एक नाकें बसविण्यांत आलें. त्याचप्रमाणें वायव्येच्या बाजूचा जो दरवाजा होता, त्यावरही गोळा लागूं होईल अशा कांहीं बॅटरीज् रातोरात तयार करण्यांत आल्या; व ता. २४ एप्रिल रोजीं किल्ल्यावर तोफा सुरू करण्यांत आल्या. त्याचप्रमाणे त्रिंबक या गांवाच्या वर डोंगरांत एक लहानसें खेडें होतें, तेथेंहि आपलें एक नाकें बसविण्याचा इंग्लिशांनीं प्रयत्न केला. परंतु त्या जागेवर किल्ल्यांतून फार जोराचा मारा करण्यांत आल्यामुळें तें नाकें सोडून इंग्लिशांना खालीं परत यावें लागलें. तरी पण ता. २४ रोजीं साऱ्या रात्रभर किल्ल्यावर खालून तोफांचा भडिमार चालू असल्यामुळें ता. २५ एप्रिलच्या पुढें पेशव्यांच्या शिपायांना तो किल्ला आपल्या ताब्यांत ठेवणें शक्य झालें नाहीं.

यानंतर नाशिक जिल्ह्यांतील जो किल्ला इंग्लिशांच्यापाशीं अतिशय नेटानें लढला, तो किल्ला मालेगांवचा होय. या किल्ल्याच्या समोर लेफ्टनंट कर्नल मॅक्डॉवेल यांनीं ता. १६ मे इ.स. १८१८ रोजीं आपला तळ दिला. बेळगांव आणि सोलापूर येथील किल्ल्यांप्रमाणेंच हा किल्लाहि एक भुईकोट किल्ला आहे. परंतु उंच आणि अगम्य अशा डोंगरांच्या शिखरावर असणारे जे राजदीर, वासोटा, वगैरे किल्ले, त्यांच्या सारखीच बळकटी हा भुईकोट किल्ला असून याच्यामध्ये आणण्यांत आलेली होती. या किल्ल्याला एकाच्या आंत एक अशा दोन दोन भिंती असून त्याच्या सभोंवतीं त्या वेळीं पाण्यानें भरलेला असा एक खोल खंदक असे. या खंदकाची खोली पंचवीस तीस फूट असून त्याची रुंदी १६ फूट पर्यंत होती. हा किल्ला मोसम आणि गिरणा या दोन नद्यांच्या कांठीं असून त्याच नद्यांचें पाणी या किल्ल्याच्या खंदकामधून खेळविण्यांत आलेलें होतें. हा किल्ला किती मजबूत असेल याच्या-बद्दल बाहेरून शत्रूला कल्पना येणें शक्य नव्हतें. इंग्लिश सैन्यांतील एका युरोपियन इंजिनिअरची या किल्ल्यानें या वेळ्याचे वेळीं चांगलीच फसगत केली. पुष्कळ दिवस झुंजून अखेरीस एका ठिकाणीं किल्ल्याची भिंत पडलेली पाहून तेथून किल्ल्यांत प्रवेश करण्याकरितां इंजिनिअर ले. नॅटिस हा आपल्याबरोबर कांहीं लोक घेऊन त्या पडलेल्या भिंतीवर चालून गेला. परंतु तो तेथें जाऊन पहातो, तों त्या पडलेल्या भिंतीच्या आंत किल्ल्याची दुसरी एक मोठी प्रचंड भिंत त्याच्या नजरेस पडली. त्या उंच भिंतीवरून त्याच्यावर आणि त्याच्या पाठीमागून येणाऱ्या इंग्लिश शिपायांवर अरबांकडून गोळी-बारांचा वर्षाव चाललेला होता. त्या पडलेल्या भिंतीवरून आंतल्या बाजूला खालीं उतरण्या-करितां शिड्या टाकण्यांत आल्या; परंतु त्या कोठें गडप झाल्या, याचा कोणालाही पत्ता लागला नाहीं. आणि त्यामुळें त्या भिंतीवरून केलेला हल्ला इंग्लिशांना माघारा घेणें भाग पडलें. या बाहेरच्या भिंतीच्या आंतील भिंती साठ साठ फूट उंचीच्या होत्या. व त्यांच्या आंत दारूगोळा, अन्नसामग्री, वगैरे सामानही पुष्कळ भरलेलें होतें. या किल्ल्याचें रक्षण

करण्याला फक्त तीनशेंच अरब लोक काय ते किल्ल्याच्या आंतमध्यें होते. व त्या मानानें पाहिलें असतां वेढा घालणाऱ्या इंग्लिशांचें बाहेरचें सैन्य कितीतरी मोठें होतें. वेढ्याच्या सुरवातीलाच लेफ्टेनंट कर्नल मॅक्डॉवेल यांच्या हाताखालीं सुमारें तेराशे लोक होते. व शिवाय पाठीमागून त्यांना वेळोवेळीं येऊन मिळालेल्या मदतींतील लोकांची संख्या अडीच हजारपासून तीन हजारपर्यंत होईल. इतक्या तीन हजार सैन्याच्याविरुद्ध सुमारें साडे--




## मालेगांवचा किल्ला.

| | | | |
|---|---|---|---|
| १ २ ३ | बटरीच्या जागा. | ८ | मालेगांव शहरांतून किल्ल्यांकडे जाणाऱ्या अडवलेल्या वाटा. |
| ४ ५ | इंग्लिशांनीं नदीला समांतर असे खणलेले खंदक व तेथील बॅटरी. | ९ १० ११ | नवीन तोफांच्या जागा. |
| | | १२ | हत्ती बांधण्याची जागा. |
| | | १३ | नगारखाना. |
| ६ ७ | तोफांच्या जागा. | १४ | बुरुजाखालील दारूचें कोठार. |

तीनशें तीनशें अरब लोक सुमारें एक महिनाभर टिकाव धरून राहिले, ही किती तरी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे ! ले. क. मॅकडॉवेल यांनीं ता. १६ मे १८१८ रोजीं मालेगांवच्या वेढ्याला सुरुवात केली. आणि तेथपासून १३ जून पर्यंत ते तो किल्ला घेण्याला आपल्या जवळच्या ३००० लोकांनिशीं रात्रंदिवस धडपडत होते; तेव्हां तो किल्ला कोठें इंग्लिशांच्या हातीं लागला. पण इतकें करूनही तो किल्ला इंग्लिशांनीं केवळ आपल्या प्रामाणिकपणाच्या पराक्रमानेंच सर केला किंवा काय, याबद्दल शंकाच आहे. हा किल्ला आपल्या ताब्यांत यावा, म्हणून त्या वेळच्या इंग्लिशानीं कोणाकडून काय काय फितुरीचीं आणि विश्वासघाताचीं कामें करविलीं, याबद्दल मालेगांवचे वृद्ध लोक अद्यापिही कित्येक दंतकथा सांगतात. किल्ल्यांतील दारूचीं कोठारें कोठें आहेत, ती नेमकी जागा इंग्लिशांना पाहिजे होती. तेव्हां असें सांगतात. कीं, किल्ल्यांत हजामती करण्याकरितां कोणी एक न्हावी दररोज जात असे, त्याला फितुर करण्यांत आलेलें होतें. त्यानें किल्ल्यांत जाऊन आपलें हजामतीचें फडकें एका विशिष्ट ठिकाणीं झाडलें. ती खूण पूर्वसंकेताप्रमाणें पाहून त्या ठिकाणीं नेमके गोळे टाकण्यांत आले आणि त्यामुळें दारूच्या कोठारांनीं पेट घेतल्याकारणानें पुढें किल्ला लढविणें अशक्य झालें. ही गोष्ट खोटी असली, तरी ज्या साडेतीनशें अरबांनीं तीन हजार सैन्याच्या विरुद्ध हा किल्ला एक महिनाभर लढविला, ते अरब खरोखर स्तुतीला पात्र आहेत. हे अरब कोण होते ? एक शतकाच्या पूर्वींच्या हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें ' अरब शिपायी हे प्रामाणिक आणि पराक्रमी शिपायी ' असाच त्याचा लौकिक होता. व अद्यापिही कित्येक नेटिव्ह संस्थानांतून महत्त्वाच्या जागीं अरबांचे पहारे असल्याचें आपण ऐकतों. या अरब लोकांच्या विश्वासूपणाबद्दल आपण त्यांचें किती तरी उतराई झालें पाहिजे ! त्यांचा देश कोण ? त्यांचा धर्म कोण ? त्यांचा देश अरबस्थान ! त्यांचा देश हिंदुस्थान नव्हे ! तसेंच त्यांचा धर्म म्हटला म्हणजे महंमदी धर्म होय ! ते कांहीं हिंदुधर्माचे नव्हते ! तरीसुद्धां ते हिंदुस्थानांतील आपल्या धन्यांच्या राज्याच्या संरक्षणासाठीं इतक्या एकनिष्ठेनें आणि इतक्या बिनदगलबाजपणानें लढत होते, हें पाहून त्यांच्या कृतज्ञतेबद्दल धन्यता वाटते; आणि त्यांचा प्रामाणिकपणा पाहून त्यांच्या सत्यप्रेमानें आपलें अंतःकरण उचंबळून येतें आणि आपले नेत्र अश्रूंनीं आर्द्र होतात ! हिंदुस्थानांतील लोकांनीं—हिंदुधर्मांतील लोकांनीं—हिंदुधर्मांतील श्रेष्ठ अशा कित्येक ब्राह्मण लोकांनींही—आपलींच राज्यें—आपल्याच हातानें—बुडविण्याला उद्युक्त व्हावें आणि त्या राज्यांचें संरक्षण करण्याकरितां अरबस्थानांतील, मुसलमानी धर्माच्या, आणि दहापांच रुपयांच्या पगारावर आपलें पोट भरण्यांत संतोष मानून राहणाऱ्या, या अरब शिपायांनीं आपले प्राण देण्याला तयार व्हावें, हा विचित्र देखावा पाहून कोणाचें अंतःकरण फाटून जाणार नाहीं ! हे जे प्रामाणिक, परोपकारी आणि पुण्यवान अरब शिपायी आमच्या राज्यांच्या आणि किल्ल्यांच्या संरक्षणासाठीं एकनिष्ठेनें लढले, ते आज कोठें आहेत ? इंग्लिशांच्या निर्दय तोफांनीं आणि निष्ठुर तरवारींनीं त्यांचा त्या वेळीं पूर्णपणें निर्वंश केला नसेल, आणि इंग्लिशांच्या तोफा आणि तरवारी यांच्या पेक्षांही जास्त निष्ठुर अशा इंग्लिशांच्या त्या वेळच्या शांततेच्या तडाक्यामधून जर त्यांचे वंशज कोणी आजपर्यंत

टिकले असतील, तर त्यांच्यामध्येंही त्या पूर्वीच्या इमानीपणाचे कांहीं तरी अंश अद्यापिही खात्रीनें शिल्लक असतील !



एक हत्यारबंद अरब शिपाई.


ता. १६ मे रोजीं लेफ्टेनंट कर्नल मॅक्डॉवेल यांची छावणी मालेगांवच्या किल्ल्याच्या दक्षिणच्या बाजूला पडली. पण तेथून ती छावणी बदलून ता. १७ रोजीं किल्ल्याच्या पायऱ्या जवळून किल्ल्याला वळसा घालून जाणारी जी मोसम नदी, त्या नदीच्या उजव्या बाजूच्या किनाऱ्यावर ती छावणी नेण्यात आली. त्या वेळीं मे महिना असल्यामुळें नदीला पाणी फार नव्हतें. परंतु जून महिन्यांत पावसाळा सुरू झाला तरी वेढा लवकर आटपण्याचें चिन्ह दिसेना. म्हणून नदीला पावसाचें पाणी येईल व कदाचित् वाट बंद होईल, म्हणून ही छावणी नंतर नदीच्या पलीकडे शहराच्या बाजूला नेण्यांत आली होती. परंतु ता. १७ रोजीं नदीच्या उजव्या किनाऱ्यावर छावणी आणल्यानंतर तेथून किल्ल्यावर मारा करण्याकरिता निरनिराळ्या ठिकाणीं मोर्चे बांधण्यांत आले. व तेथें तोफा डागून गोळीबार सुरू करण्यांत आला. किल्ल्याच्या पश्चिमेच्या अंगाला नदीच्या पलीकडे कांहीं झाडी होती, तिच्या आश्रयानें एक बॅटरी चालू करून तेथून हळूहळू अखेरीस नदीच्या पात्राला समांतर असा एक खंदक तयार करण्यांत आला होता. याच वेळीं इंग्लिशांना दररोज निरनिराळ्या ठिकाणांहून नवीन नवीन सैन्याची कुमक येऊन मिळत होती. परंतु किल्ल्याच्या आंत कोंडून पडलेल्या अरबांना मात्र परमेश्वराच्या कृपादृष्टीशिवाय दुसरीकडून दुसऱ्या कोणाचीहि मदत येणें शक्य नव्हतें. तरी पण ते धैर्यानें लढत होते. ता. १६ मेपासून

ता. २९ मेपर्यंत चोहोंकडे मोर्चे बांधणें, खंदक खणणें, भिंतींवर तोफांचा भडिमार करणें, वगैरे पूर्वतयारीचीं कामें तेरा चौदा दिवसपर्यंत चाललेलीं होतीं. इतक्या दिवसांच्या तयारीनंतर आणि दीड हजार नवीन सैन्याच्या कुमकेनंतर इंग्लिशांनीं ता. २९ मे च्या पहाटेस मालेगांवच्या किल्ल्यावर आणि शहरावर हल्ला करण्याचा बेत केला. पण त्यांतही त्यांना यश न येतां अखेरीस पूर्वी सांगितल्याप्रमाणें ले. नॅटिस वगैरे कांहीं ऑफिसर मरण पावून इंग्लिशांना शेवटीं माघारच घ्यावी लागली ! व मालेगांवचा किल्ला आणि त्यांतील ते शूर अरब हे दोन आठवड्यांच्या इंग्रजी तयारीनें केलेल्या हल्ल्यानंतरही पूर्वीच्या इतकेंच आजिंक्यपणामध्यें कायम राहिले ! या हल्ल्याच्या वेळीं किल्ल्याच्या भोंवतालचा खोल खंदक भरून काढण्याकरितां हल्ला करणाऱ्या लोकांनीं आपल्याबरोबर गवताचे मोठमोठे भारेही घेतले होते. पण कोणत्याच युक्तीचा कांहीं एक उपयोग न होऊन अखेरीस इंग्लिशांना त्या दिवशीं माघारच खावी लागली !

नदीच्या उजव्या बाजूकडून कांहीं उपयोग होत नाहीं, असें दिसून आल्यानंतर जून महिन्याच्या पहिल्या तारखेला इंग्लिशांची छावणी फिरून नदीच्या पलीकडे गांवाच्या बाजूला नेण्यांत आली. आणि ता. ५ जून रोजीं मालेगांवच्या पेठ्याच्या बाजूनें दोन हॉवि-ट्झर तोफांचा मारा किल्ल्यावर नवीन सुरू करण्यांत आला. परंतु या तोफांच्या माऱ्याला किल्ल्याच्या भिंती मुळींच दाद देत नव्हत्या. व त्यासाठीं अहमदनगर येथून नवीन तोफा मागविण्यांत आल्या होत्या; त्याप्रमाणें नगरच्या सुमारें बारा तोफा ता. १० जून रोजीं मालेगांवात येऊन पोंचल्या. त्या तोफांचा मारा दुसऱ्या दिवशीं सकाळीं किल्ल्यावर सुरू करण्यांत आला. त्या वेळीं सकाळीं ११ वाजण्याचे सुमारास किल्ल्यांतील दारूच्या दोन कोठारांना आग लागली. व त्या धक्क्यामुळें किल्ल्याची बाहेरची भिंत कांहीं ठिकाणीं कोसळून पडली. व त्यानंतरही ज्या कांहीं भिंती उभ्या होत्या त्या जमीनदोस्त करण्याकरितां त्यांच्यावर दोन निरनिराळ्या ठिकाणांहून दोन दोन एटीन पौंडर तोफा चालू करण्यांत आल्या. व त्यामुळें त्या भिंती पडून अखेरीस ता. १३ जून रोजीं मालेगांवचा किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन झाला.


आतां फक्त एकच किल्ल्याची हकीकत वर्णन करावयाची राहिलेली आहे, आणि ती खानदेशांतील तापी नदीच्या कांठच्या तालनेर येथील किल्ल्याच्या संबंधाची होय. हा किल्ला तापी नदीच्या कांठावर असून याची पश्चिमची बाजू तापीनदीच्या प्रवाहामुळें शत्रूला अगम्य झाली आहे. व बाकीच्या तीन बाजूंनीं डोंगराचे कडे तुटलेले असल्यामुळें तिकडूनही याला वर जाण्याला मार्ग नाहीं. या किल्ल्याच्या ईशान्य बाजूकडे तालनेर हा गांव वसलेला असून तेथून बऱ्याच वांकड्या वांकड्या वळणांनीं किल्ल्यावर जाण्याला फक्त एकच काय ती अरुंद आणि कठिण अशी वाट आहे. ही वाट किल्ल्याच्या पूर्वबाजूकडून वर जाते. व तेथें किल्ल्याच्या आंत प्रवेश करण्याला मुख्य दरवाजा आहे. पण या किल्ल्याची रचना अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, येथें एकाच्या आंत दुसरा असे एकमेकांच्या पाठीमागें नागमोडीच्या वळणांनीं बांधलेले असे पांच दरवाजे आहेत. व पहिल्या दरवाजांतून शत्रु आंत आला, तर त्याच्यावर आंतील दुसऱ्या दरवाजाच्या तटावरून मारा करितां यावा

अशा सोयी केलेल्या आहेत. या किल्ल्याची भिंत सुमारें साठ फूट उंच असून या किल्ल्यांतील सगळ्या तोफांचा मारा बहुतेक पूर्वेच्याच बाजूला आहे. कारण पश्चिमच्या बाजूला तापीनदीचें खोल पात्र व उत्तर आणि दक्षिण या दिशांनीं तुटलेले कडे, या कारणांमुळें या तीन बाजूंचें संरक्षण प्रत्यक्ष सृष्टिदेवताच आपल्या अजिंक्य तोफांनीं करीत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें संरक्षित केल्या गेलेल्या या किल्ल्यावर अरबांचें सैन्य दोनतीनशेंपेक्षां फारसें जास्त नव्हतें. तरी पण या थोड्याशा लोकांनीही आपले प्रत्यक्ष प्राण जाईपर्यंत किल्ला लढविण्यामध्यें जें शौर्य दाखविलें, तें खरोखर फार प्रशंसनीय आहे. माळव्यांतील महिदपूरची लढाई संपल्यानंतर नर्मदा उतरून सर टॉमस हिस्लाप हे सातपुड्यांतून छिंद्व्याच्या घाटानें आपलें सैन्य घेऊन दक्षिणेंत येण्याकारितां खालीं उतरत असतां ता. २७ फेब्रुवारी इ. स. १८१८ रोजीं सकाळीं त्यांच्या सैन्यांतील अघाडीचे लोक तालनेर किल्ल्याचे टापूंत येऊन पोंहोंचले. हा लहानसा किल्ला आहे, तेव्हां येथें कोणी आपल्याला प्रतिबंध करील, हो इंग्लिशांना कल्पनाही नव्हती. परंतु शत्रूचे लोक आपल्या किल्ल्याच्या खालून जात आहेत असें दिसून आल्याबरोबर किल्ल्यावरील लोकांनीं त्यांच्यावर गोळीबार करण्याला सुरुवात केली. सर टॉमस हिस्लाप यांचे जे हेर पुढें बातमी काढण्याकरितां चाललेले होते, त्यांनीं ही बातमी आपल्या जनरलला सांगितली.तेव्हां आपल्यापाशीं फार मोठें सैन्य आहे व तालनेरपेक्षां फार मोठाले किल्लेही पटापट आमच्या स्वाधीन आले आहेत,तेव्हां तुम्हीं आम्हांला शरण यावें, अशा अर्थाचा निरोप तालनेरच्या किल्लेदाराकडे सर टॉमस हिस्लाप यांच्याकडून पाठविण्यांत आला; पण महाराष्ट्रांतील किल्ल्यांच्या कर्तबगारीच्या परंपरेला साजेल असाच शौर्याचा निरोप तालनेरच्या किल्लेदारानें आपल्या तोफखान्यांतील गोळ्यांच्या हातीं इंग्लिशांकडे परत पाठविला! तेव्हां पुढें कूच करीत चाललेलें आपलें सैन्य माघारें बोलावून सर टॉमस हिस्लाप यांनीं किल्ल्याच्या पाठीमागें पश्चिमेच्या अंगाला कांहीं अंतरावर तापी नदीच्या कांठीं आपल्या सैन्याचा तळ दिला; व तेथून किल्ल्याची टेहळणी करण्याकारितां लोक पाठविण्यांत आले. तालनेरचा किल्ला आणि तालनेर गांव यांच्या दरम्यान आणि बाजूनें खोलखोल दऱ्या आहेत व त्यांतूनच वळणावळणांनीं गांवांत आणि किल्ल्यांवर जाण्याची वाट आहे. त्या वाटेनें दोन हाविट्झर तोफा आणि दहा सिक्स पौंडर तोफा आणून त्या गांवांतील घरांच्या आश्रयानें उभ्या करून तेथून प्रथमतः किल्ल्याच्या ईशान्येकडील बुरुजावर सुमारें ३०० यार्ड अंतरावरून मारा करण्याला सुरवात करण्यांत आली. परंतु या तोफांच्या माऱ्यानें किल्ल्यावर फारसा कांहीं परिणाम होईना. उलट किल्ल्यावरून ज्या तोड्याच्या बंदुका झाडण्यांत येत होत्या, त्यांच्या योगानें इंग्लिशांचेच लोक मरत चालले होते. तेव्हां फिरून एकंदर जागेची पहाणी करण्यांत आली. व त्यांत असें दिसून आलें कीं, किल्ल्याचा पहिला दरवाजा नादुरुस्त स्थितींत असून त्याच्या समोर तोफा डागण्यासारखी डोंगरावर जागा आहे. हें समजून आल्यावर तेथें तोफा नेण्यांत आल्या. व या तोफांनीं वाट करून दिल्यानंतर आंत प्रवेश करण्याकरितां सैन्याची एक तुकडीही दरवाजाजवळ नेऊन ठेवण्यांत आली. ही तयारी झाल्यानंतर किल्ल्यांतील लोकांनीं बिनशर्त स्वाधीन व्हावें म्हणून फिरून त्यांच्याकडे निरोप पाठविण्यांत आला. पण हा निरोपही त्या मानी शिपायांना मान्य झाला नाहीं. या



तालनेर किल्ल्याचा समोरच्या बाजूनें दिसणारा देखावा.

वेळीं संध्याकाळ होत चालली होती; आणि काळोख पडला म्हणजे नदीच्या बाजूनें हे किल्ल्यांतील लोक येथून पळ काढून निघून जातील, असा इंग्लिशांचा तर्क होता. म्हणून त्यांना अडविण्यासाठीं तापी नदीच्या कांठावर इंग्लिशांनीं घोडेस्वाराची एक पलटणही उभी करून ठेवली होती ! परंतु ती पलटण वाट पहात तशीच अखेरपर्यंत उभी राहिली ! कारण त्यांच्याकडे किल्ल्यावरील कोणीही लोक गेले नाहींत. किल्ल्यावरील लोक पळून जातील, ही इंग्लिशांची कल्पनाच मुळीं चुकीची होती. तालनेरच्या किल्ल्यावरील शिपायी हे पळून जाणारे लोक नव्हते. आपला प्राण गेला तरी हरकत नाहीं, पण आपल्या धन्याच्या इमानाला जागून




## तालनेरचा किल्ला.

| | | | |
|---|---|---|---|
| १ १ १ १ | किल्ल्यावर हल्ला करणारें सैन्य आणि तोफा ज्या मार्गानें आणल्या गेल्या, तो मार्ग. | ६ ६ | ज्या मार्गानें किल्ल्याच्या दरवाजासमोर तोफा आणि सैन्य आणण्यांत आलें, तो मार्ग. |
| २ ३ ४ ५ | ज्या निरनिराळ्या ठिकाणीं तोफा चढविण्यांत आल्या होत्या, तीं ठिकाणें. | ७ | किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां आलेलें सैन्य जेथें थांबून राहिलें होतें, ती जागा. |

आपण ह्या किल्ल्याचें शेवटपर्यंत संरक्षण करूं, अशा एकनिष्ठेनें आणि दृढ निश्चयानें ते शिपाई लढाईला उद्युक्त झाले होते. इंग्लिशांचे लोक पूर्वेकडील दरवाजासमोर मोर्चे बांधून दरवाजाच्या जवळ आले, तेव्हां हा पहिला बाहेरचा दरवाजा नादुरुस्त असल्यामुळें तो बंद केलेला नसून अर्धवट उघड्या अवस्थेमध्येंच आहे, असें आढळून आलें. तेव्हां ले. क. कॉनवे, ले. क. मॅक्ग्रेगर, मरे, वगैरे कित्येक युरोपिअन ऑफिसर त्या दरवाज्यांतून आंत गेले. त्यानंतर एका पाठीमागून एक आंतील दरवाजे त्यांनीं पाहिले, तेव्हां त्यांपैकींही कांहीं दरवाजे नादुरुस्त स्थितींत असून तेथेंही त्यांना हरकत करण्याला कोणी नाहीं, असें त्यांना आढळून आलें. त्यामुळें पहिल्या दरवाजानंतर ते दुसऱ्या, तिसऱ्या आणि चवथ्याही दरवाजांतून आंत गेले. पण त्याच्या पुढील पांचव्या दरवाज्यामध्यें मात्र तशी स्थिति नव्हती. तो दरवाजा मजबूत आणि चांगल्या दुरुस्त स्थितीमध्यें असून तो बंदही केलेला होता. आणि त्या दरवाजांतील धाकटा दिंडी दरवाजा मात्र काय तो उघडा होता. त्या दिंडी दरवाज्यामधून दोन्ही पक्षांच्या दरम्यान अटींच्या बद्दल वाटाघाट सुरू झाली. पण ही वाटाघाट जोंपर्यंत निश्चित ठरलेली नव्हती, तोंपर्यंत त्या उघड्या दिंडीचा फायदा घेऊन इंग्लिशांच्या कोणत्याही ऑफिसरनें आंत जाणें हें न्यायाचें किंवा विश्वासाचें नव्हतें. पण अशी स्थिति असतांही कर्नल मरे, मेजर गॉर्डन आणि दुसरे तीन चार इंग्लिश लोक विश्वासघातानें त्या दिंडींतून आंत घुसले. व त्यांच्यामागून आणखीही लोक आंत येण्याचा प्रयत्न करूं लागले. एकीकडे तहाचें बोलणें चाललें असतां दुसरीकडे इंग्लिश लोक अशा प्रकारचें विश्वासघाताचें वर्तन करून किल्ल्यांत शिरत आहेत हें पाहून किल्लेदार आणि त्याच्या हाताखालील अरब लोक यांना अतिशय त्वेष आला व त्यांनीं त्या गोऱ्या लोकांवर तेथल्या तेथें हल्ला करून त्यांना कापून काढलें. व जास्त लोक आंत येऊं नयेत, म्हणून दिंडी दरवाजा लावण्याचा ते प्रयत्न करूं लागले. इतक्यांत बाहेरच्या एका गोऱ्या शिपायानें आपली बंदूक त्या दिंडी दरवाजामध्यें आडवी घातल्यामुळें तो दरवाजा लागेना. अशा स्थितींत ले. क. मॅकिन्टॉश् आणि कॅप्टन मॅक्केथ यांनीं तो दिंडी दरवाजा फिरून उघडला. आणि नंतर त्या दरवाजांतून कांहीं वेळ गोळीबार करून मग इंग्लिशांचे शिपायी किल्ल्यांत शिरले; व त्यांनीं तो किल्ला हस्तगत करून घेतला. या वेळच्या लढाईत इंग्लिशांचे एकंदर पंचवीस लोक मारले गेले व त्यात सात इंग्लिश ऑफिसर्स होते. अशा रीतीनें विश्वासघातानें किल्ल्यांत प्रवेश करून घेतल्यानंतर इंग्लिशांना भूतदयेची बिलकूल आठवण झालेली दिसली नाहीं. किल्ल्यांत असलेले दोन अडीचशें लोक इंग्लिशांशीं लढतां लढतां मारले गेले असले पाहिजेत, असें दिसतें. आणि किल्ल्यांतील जो मुख्य किल्लेदार इंग्लिशांच्या हातीं जिवंत सांपडला, त्याला त्यांनीं त्या किल्ल्याच्या बुरुजावर त्याच दिवशीं संध्याकाळीं फांसावर चढवून आपली भूतदया इतिहासांत नमूद करण्याकरितां जाहीर करून दिली. अशा रीतीनें विश्वासघातानें इंग्लिशांनीं या किल्ल्याची मालकी मिळविली. पण या तालनेरच्या किल्ल्यांतील जे इमानी शिपायी आपल्या धन्याच्या विश्वासाला जागले आणि आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण जाईपर्यंत विश्वासानें लढले, त्यांच्या त्या विश्वासाची किंमत इंग्लिशांनीं विश्वासघातानें मिळविलेल्या राज्यांच्यापेक्षां परमेश्वराच्या घरीं किती तरी पटीनें जास्त आहे !

इंग्लिशांनीं या तालनेरच्या बाबतींत विश्वासघात केला आणि तेथील किल्लेदाराला विनाकारण फांसावर चढविलें, या त्यांच्या अन्यायी वर्तनाबद्दल खुद्द कित्येक इंग्लिश ग्रंथकारांनींही त्यांना दूषण दिलें आहे. अशा रीतीनें लढाईच्या नियमांविरुद्ध अधमपणानें फांसावर चढविलेल्या त्या तालनेरच्या किल्लेदाराचा आत्मा अद्यापिही आपल्या सूडासाठीं बिचारा ओरडत राहिला असला पाहिजे !

महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा हा शेवटचा इतिहास अशा प्रकारचा आहे. हल्लीं विमानें निघाल्यापासून आणि जमिनीवरील जागा कितीही उंच असली तरी तिच्यावर आकाशांतून बॉंब फेकण्याची नवीन सोय सुरू झाल्यापासून हिंदुस्थानांतीलच काय, पण सर्व जगांतीलही किल्ले निरुपयोगी झालेले आहेत. तेव्हां अशा स्थितींत महाराष्ट्रांतील हे किल्ले उद्ध्वस्त होऊन गेल्याबद्दल भावी लढायांच्या दृष्टीनें वाईट वाटण्याचें फारसें कांहीं कारण नाहीं, हें खरें आहे. तरी पण या किल्ल्यांवरील मागच्या लढायांची आठवण झाली आणि त्या वेळच्या प्रसंगांचीं वर्णनें आपण वाचूं लागलों, म्हणजे आपलें अंतःकरण गहिंवरून येतें, कंठ दाटतो, अंगावर रोमांच उभे राहतात आणि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतात. हे किल्ले म्हणजे आपल्या देशाच्या स्वातंत्र्यमंदिराची इमारत सावरून धरणारे आधारस्तंभच होत. त्यांची आज अशी दशा झालेली पाहून कोणाला वाईट वाटणार नाहीं ? त्यांचे दरवाजे मोडलेले, त्यांचे बुरुज कोसळलेले, त्यांच्या भिंतींना भगदाडें पडलेलीं, त्यांच्यावरील राजवाडे जळालेले, त्यांच्यावरील मशिदी मोडलेल्या, तेथील देवळांतील देव नाहींसे झालेले, त्यांच्यावरील तोफा फुटून मातींत गाडलेल्या अशी त्या किल्ल्यांची दैन्यावस्था पाहून कोणाचें अंतःकरण फाटून जाणार नाहीं ? जेथें सोन्यांनीं मढवलेले हत्ती झुलत होते, तेथें आज धनगरांचीं गुरें चरत आहेत ! जेथें राजांचीं सिंहासनें होतीं, तेथें हल्लीं सरपटणारे साप आपलीं वारुळें बांधून निर्भयपणानें फिरत आहेत ! ज्या मुख्य दरवाजावरील उंच बुरुजावर स्वातंत्र्याचीं निशाणें उभारलीं जावयाचीं, त्या बुरुजांवर हल्लीं गिधाडें घिरट्या घालीत आहेत ! ज्या नगारखान्यातून स्वातंत्र्याचे डिंडिम सर्व देशभर दुमदुमले जावयाचे, त्या नगारखान्यांच्या खोल्यांतून हल्लीं घुबडें भरदिवसा घुमत बसलेलीं आहेत ! असले हे देखावे पहाण्याचें हल्लींच्या हिंदुस्थानांतील तरुण पिढीच्या कपाळीं यावें, ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे ! आपल्याला जरी आज वाईट दिवस आले असले, तरी आपले पुत्रपौत्र पुढें आपले पांग फेडतील, ही मृत पूर्वजांना जशी आशा असते, तशी आशा धरून हे जुने किल्ले नवीन पिढींतील तरुणांकडे मोठ्या उत्सुकतेनें पहात असतील ! व या तरुणांच्या अंगांत एखादे वेळीं उत्साह उत्पन्न होऊन त्या उत्साहानें ते सैरावैरा धावूं लागले, म्हणजे आपल्याला पारतंत्र्यांतून सोडविण्याकरितां हे आपल्याकडेच धांवून येत असले पाहिजेत, असें त्या किल्ल्यांना वाटत असेल ! पण हे नवीन तरुण वास्तविक आपल्याकडे येत नसून यांची सगळी धांव दुसऱ्यांच्या नोकरींतील बालेकिल्ल्यांकडेच वळविण्यांत येत आहे, हें त्या जुन्या किल्ल्यांनीं पाहिल्यावर त्यांची किती निराशा होत असेल ! अशा भावी काळच्या निराशेमध्यें त्यांना हल्लीं कसलेंच सुख उरलेलें नाहीं ! आपण पारतंत्र्याच्या दुःखामध्यें सगळे सण मोठ्या आनंदानें साजरे करतों व क्षणभर आपलें दुःख विसरतों; पण त्या बिचाऱ्यांना तेंही सौख्य

नाहीं. वर्षप्रतिपदेचा नवीन वर्षारंभ आला, तरी त्या किल्ल्यांवर गुढ्या उभारल्या जात नाहींत ! त्यांचें स्वातंत्र्य गेल्यापासून किती तरी विजयादशम्या आल्या आणि गेल्या ! पण त्यांच्या सदरेमध्यें त्यानिमित्त कधीं दरबार भरले नाहींत किंवा सोनें लुटण्याचे समारंभ झाले नाहींत ! आणि त्यांच्या स्वातंत्र्याची होळी झाल्यापासून त्या किल्ल्यावर शिमग्याचा सणही कधीं साजरा करण्यांत आला नाहीं ! अशी या किल्ल्यांची हल्लीं दुर्दशा होऊन गेलेली आहे. व ही दुर्दशा पाहून त्या त्या किल्ल्यांच्या आसपासचे लोक मोठ्या खिन्नावस्थेमध्यें आपले दिवस कंठीत आहेत ! पूर्वी या किल्ल्यावर आम्हीं जात होतों, या किल्ल्यावरून आम्हीं तोफा उडविलेल्या आहेत, या किल्ल्यावर झालेले दरबार आम्हीं पाहिलेले आहेत, अशा पूर्वीच्या खऱ्या गोष्टी सांगणारे, त्या त्या किल्ल्यांच्या पायथ्याशीं असलेले जुन्या पिढींतील वृद्ध लोकही आज उरलेले नाहींत. व खोट्या इतिहासांतून या किल्ल्यांच्या खऱ्या हकीकती वाचावयाला मिळणें तर दुरापास्तच झालेलें आहे. तरी पण अशा स्थितीमध्येंही या जुन्या किल्ल्यांचीं नवीन पिढींतील लोकांनीं हरहमेश दर्शनें घेणें अत्यंत अवश्यक आहे. हे किल्ले म्हणजे आपलीं अत्यंत पवित्र अशीं तीर्थें आहेत ! ज्या या धारातीर्थांच्या ठिकाणीं हजारो शूर आणि इमानी लोकांनीं आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपले प्राण खर्ची घातले, तेथें आपण गेलों असतां, तेथें आपल्याला ते पूर्वीच्या काळचे सर्व शूर लोक प्रत्यक्ष भेटतात व ते आपलें सगळे हृद्गत आपल्याला सांगतात ! ते तेथें आपल्याला प्रत्यक्ष भेटतात; आणि समरांगणांमध्यें मरण पावल्यामुळें ते जरी मुक्त झालेले असले, तरीही अद्यापि त्यांच्या अंतःकरणांमध्यें त्यांना कशासाठीं वाईट वाटत आहे आणि त्यांच्या डोळ्यांमध्यें अद्यापि कशासाठीं अश्रुबिंदु उत्पन्न होत आहेत, हें तेथें दुसरें कोणी ऐकावयाला नसल्यामुळें आपलें मन मोकळें करून आपल्याला सांगतात ! आपलें अंतःकरण आपल्या देशाच्या पूर्वकालीन स्वातंत्र्यासंबंधानें तल्लीन झालेलें पाहून ज्या जुन्या किल्ल्यांवरील दगडांनाही मोह उत्पन्न होतो आणि त्यांच्यापैकीं प्रत्येक दगड आपल्या जुन्या इतिहासांतलि कांहीं तरी नवनि गोष्ट आपल्याला सांगूं लागतो ! येथें अमका सरदार बसला होता, तेथें तमक्या मुत्सद्द्यानें अशी अशी मसलत केली, या जागेवरून अमक्या किल्लेदारानें तोफ उडाविली आणि त्या ठिकाणीं तमका शिपाई जखमातून वाहणाऱ्या रक्तानें माखला असतांनाही शत्रूवर गोळ्या झाडीतच होता, अशा प्रकारचीं किती तरी रोमहर्षण अशीं कथानकें या किल्ल्यावरील हे प्राचीन रहिवाशी आणि प्रामाणिक रखवालदार आपल्याला सांगत सुटतात ! हे सगळे किल्ले म्हणजे आपल्या पूर्वीच्या स्वातंत्र्याची एक स्मशानभूमिच होय ! या निरनिराळ्या स्मशानभूमींमधून जुन्या स्वतंत्रतेचीं हाडें आणि कपाळाच्या कवट्या जिकडे तिकडे पसरलेल्या आपल्याला दिसतात ! पण या हाडांमध्यें आणि कपाळाच्या कवट्यांमध्यें किती तरी जादू भरलेली आहे ! त्यांत भरलेली जादू जाणणारे जादूगार जेव्हां निघतील, तेव्हां त्या जादूच्या कांडीनें ते हिंदुस्थानांतील किती तरी गोष्टींचें स्वरूप ताबडतोब बदलून टाकूं शकतील !

---

# असईची लढाई.

असईची लढाई ही हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक महत्त्वाची लढाई आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांतलि ही एक महत्त्वाची लढाई आहे, असें असईच्या लढाईबद्दल विधान केलें, म्हणजे त्या लढाईनें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविलें किंवा राखलें, असा याचा अर्थ नव्हे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविणाऱ्या असईच्या लढाया अजून व्हावयाच्या आहेत ! पण इ. स. १८०३ या सालांत जी असईची लढाई झाली, ती ब्रिटिश इंडियाच्या इतिहासामध्यें फार महत्त्वाची आहे. कारण, प्लासीच्या लढाईनें जसा बंगाल प्रांत इंग्लिशांना मिळाला, त्या-प्रमाणें मराठ्यांचें राज्य जें इंग्लिशांनीं आपल्या घशांत घातलें, त्याला या असईच्या लढाईपासून सुरवात झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या बाजूनें पाहिलें असतां अष्टयाच्या लढाईत बापू गोखले यांनीं जसें युद्धकौशल्य दाखविलें, तसें युद्धकौशल्य या लढाई-मध्यें मराठे सरदारांनीं फारसें दाखविलेलें नाहीं. परंतु प्लासीच्या लढाईप्रमाणें या असईच्या लढाईच्या बाबतीमध्यें इंग्लिशांच्याकडून कपटकौशल्य मात्र पूर्णपणें दाखविण्यांत आलें, असें इतिहासावरून दिसून येण्यासारखें आहे. आणि प्लासीच्या लढाईच्या वेळचीं कृष्ण-कारस्थानें जुळवून आणण्यांत जसे क्लाइव्हसाहेब अग्रगण्य होते, त्याप्रमाणें असईची लढाई जेव्हां झाली, त्या वेळच्या सुमाराचीं सर्व कृष्णकारस्थानें जुळवून आणण्याच्या कपटनीतींतील अग्रपूजेचा मान मार्क्विस वेलस्ली यांच्याकडे सर्व इंग्रजी इतिहासकारांनीं एकमतानें दिलेला आहे ! पूर्वीच्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील इंग्लिशांच्या लढायांतील विजय हे लढायांच्या रणक्षेत्रांवर फारच थोडे मिळविले जात असत; तर त्या रणक्षेत्रांच्या पाठीमागें कोठें तरी इंग्रजांच्या कृष्णकारस्थानानें भावी विजयाची अगाऊ तजवीज करून ठेविलेली असे ! आणि तशी व्यवस्था प्लासीच्या लढाईप्रमाणें या असईच्या लढाईमध्यें मार्क्विस वेलस्ली यांनीं करून ठेविली होती. मार्क्विस वेलस्ली हे या वेळीं हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलच्या जागेवर होते; व सर आर्थर वेलस्ली हे त्यांचे एक भाऊ असून त्यांच्याकडे दक्षिणेंतलि सैन्यांचें आधिपत्य होतें. अशा या दोन भावांनीं मिळून असईची लढाई जिंकली. सर आर्थर वेलस्ली हे असईच्या लढाईतील मुख्य सेनानायक होते, म्हणून त्यांनीं असईची लढाई जिंकली, असें एका अर्थीं म्हटलें पाहिजे; पण खरें पाहिलें असतां त्यांचे वडील बंधु, मार्क्विस वेलस्ली, यांनीं आपल्या कारस्थानांनीं असईची लढाई १८०३ सालांतील सप्टेंबर महिन्याच्या आधींच बहुतेक जिंकून ठेविली होती ! या वेळीं इंग्लिशांनीं मराठी राज्याचा

बीमोड करण्याकरितां काय काय गुप्त कारस्थानें चालविली होतीं, हें पहाण्याच्या दृष्टीनें असईच्या लढाईंतील इतिहास फार बोधप्रद आहे; आणि म्हणून आतां आपण तिकडेच वळूं.

## नेपोलियन बोनापार्ट.



अठराव्यां शतकाच्या अखेरीस मार्क्विस वेलस्ली हा जेव्हा गव्हर्नर जनरल होऊन हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आणि हिंदुस्थानचें हरएक राजकीय

धोरण यांची स्थिति फारशी वाईट होती, असें नाहीं; तर उलट, ती बरीच समाधानकारक होती, असें म्हणण्यासही कांहीं हरकत नाहीं. आणि ती स्थिति तशीच कायम टिकली असती, तर ती हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्यविस्ताराला पुष्कळच अपायकारक झाली असती, याबद्दल शंका नाहीं. हल्लीं इंग्लिशांचें हिंदुस्थानांत जसें एकछत्री राज्य झालेलें आहे आणि हिंदुस्थानांतील उर्वीतल हें इंग्लिशांना हल्लीं जसें निर्वैर होऊन गेलेलें आहे, तशी इ. स. १७९८।१७९९ सालांत हिंदुस्थानची स्थिति नव्हती. त्या वेळीं हिंदुस्थानांत फ्रेंचांची सत्ता बरीच मोठी होती व या हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या सत्तेला हिंदुस्थानांतील त्या वेळचे इंग्लिश लोक फार वचकत असत. परंतु इंग्लिशांना हिंदुस्थानांत फ्रेंचांबद्दल जी इतकी भीति वाटत होती, तिचें मुख्य कारण युरोपखंडामध्यें होतें. युरोपखंडांतील फ्रान्स देशामध्यें या वेळीं एक मोठी थोरली राज्यक्रांति होऊन फ्रान्सच्या राजाला फांशी देण्यांत आलेलें होतें. व त्या फ्रान्समधील राज्यक्रांतीच्या ज्वाळा सर्व युरोपखंडभर पसरत चालल्या होत्या; आणि निरनिराळ्या युरोपियन देशांतून अस्तित्वांत असलेलीं जुनीं राजघराणीं उलथून टाकून त्यांच्या जागीं त्या त्या देशांतील क्रांतिकारक लोक लोकसत्ताक राज्यपद्धतीचीं नवीन राज्यें स्थापन करीत होते. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या या ज्वाळा युरोपांतील इतर देशांप्रमाणें आपल्यालाही भाजून काढतात कीं काय, अशी त्या वेळीं इंग्लिशांना फार धास्ती पडलेली होती. व याच फ्रेंच रेव्होल्युशनच्या धामधुमीमधून फ्रान्समध्यें नेपोलियन बोनापार्ट या नांवाचा जो एक नवीन आणि अद्वितीय योद्धा उत्पन्न झालेला होता, त्याच्या पराक्रमाच्या आणि विजयांच्या धास्तीमुळें तर इंग्लिशांच्या तोंडचें पाणीच पळून गेलेलें होतें. खुद्द इंग्लंड-वरही स्वारी करण्याचा त्याचा विचार होता, व त्याशिवाय हिंदुस्थानांत जाऊन तेथेंही इंग्लिशांचा बीमोड करावा आणि इंग्लिशांना तेथून हाकलून देऊन अलेक्झँडरप्रमाणें आपण चोहोंकडे दिग्विजय करावा, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. व त्या उद्देशानें फ्रान्सच्या किनाऱ्यावरील टूलोनच्या बंदरामध्यें इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां त्यानें एक मोठें आरमार जमविलें. त्या वेळीं तर या शूर इंग्लिशांची अगदीं पांचावरच धारण बसून गेली होती! पण त्या वेळीं इंग्लंडवर चाल करून न जातां नेपोलियननें आपल्या आरमाराचा मोर्चा ईजिप्त-कडे वळविला. तेव्हां इंग्लंडमधील लोकांचा जीव थोडासा खालीं पडला. पण नेपोलियन हा ईजिप्तमधून हिंदुस्थानाकडे जाणार, असें जेव्हां इंग्लिशांना दिसूं लागलें, तेव्हां तिकडूनही फिरून त्यांची पांचावर धारण बसली. आणि हिंदुस्थानांत व्यापाऱ्याच्या मिषानें बंगाल, मद्रास, वगैरे ठिकाणीं जे कांहीं थोडेसे मुलूख आपण मिळविले आहेत, ते तरी आतां या नेपोलियनच्या पराक्रमाच्या तुफानापुढें कायम टिकनात किंवा नाहींत, अशी इंग्लिशांना शंका वाटूं लागली.

## मुसलमानांचा संघ.

आणि या वेळीं इंग्लिशांना ही जी भीति वाटूं लागली होती, ती अगदीं सकारण होती. कारण, त्या वेळपर्यंत हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं जे कांहीं मुलूख मिळविले होते, ते फारसे मोठे होते, असें नाहीं. व फार न वाढलेल्या झाडाप्रमाणें त्यांना तेथून उपटून टाकणें

फारसें कठिण होतें, असेंही नाहीं. आणि शिवाय ते थोडेसे मुलूख काबीज करून घेण्यामध्यें देखील आपल्या कर्तबगारीपेक्षां आपल्या कपटकारस्थानांचा त्यांनीं जो जास्त उपयोग ठिकठिकाणीं केलेला होता, त्या योगानें तर हिंदुस्थानांतील लोकांचीं मनें त्या वेळच्या इंग्लिशांच्या विरुद्ध फारच प्रक्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं व त्यामुळें त्यांना हिंदुस्थानांतून हांकलून लावण्याकरितां त्या वेळच्या इंडियन राजांचे आंतून पुष्कळच मोठमोठाले गुप्त कट चाललेले होते. या कटांत म्हैसूरचा टिपू सुलतान हा प्रमुख होता. त्याशिवाय कर्नाटकचा नबाब, हैदराबादचा निजाम, अयोध्येचा नबाब, वगैरे अनेक मुसलमान राजांना इंग्लिशांनीं आपल्या लबाडीनें आणि लोभीपणानें निरनिराळ्या प्रसंगीं दुखविलेलें असल्यामुळें हे सगळे मुसलमान राजे इंग्लिशांच्या विरुद्ध मनांतून जळतच होते. त्या सगळ्या मुसलमान



टिपू सुलतान.

राजांशीं टिपूसुलतानानें संगनमत करून मुसलमान लोकांचा एक मोठा बलाढ्य संघ बनविला व इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हांकलून लावण्याच्या उद्देशानें त्या सगळ्यांनीं आपले गुप्त प्रयत्न चालू केले. या प्रयत्नांत सामील होण्याकरितां अफगाणिस्थानचा अमीर, झमानशहा, यालाही विनंति करण्यांत आली; व त्याप्रमाणें झमानशहानें इंग्लिशांच्या विरुद्ध लढण्याकरितां येण्याचें कबूलही केलें होतें. इतके हे एशियांतील चार पांच बलाढ्य मुसलमान राजे एकत्र झाले असतां, त्यांच्या संयुक्त फौजांकडून इंग्लिश लोक हिंदुस्थानांतून बाहेर हांकलून दिले जाणें अशक्य होतें, असें नाहीं. तरी पण या प्रयत्नांत येणाऱ्या यशाची खात्री जास्त दृढ करण्याकरितां टिपू सुलतान यानें नेपोलियन बोनापार्ट यालाही हिंदुस्थानांत येण्याविषयीं लिहिलें होतें; व ईजिप्तमधून पुढें हिंदुस्थानांत येण्याचा नेपोलियनचाही विचार ठरलेला होता.

## मराठा कॉन्फिडरसी.

इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हांकलून देण्याकरितां मुसलमान राजांनीं नेपोलियन बोनापार्टच्या मदतीनें केलेला हा कट आपला उद्दिष्ट हेतु सफल करण्याला पूर्णपणें समर्थ होता. तरी पण त्या वेळीं एवढे हे मुसलमान लोकच फक्त इंग्लिशांचे शत्रु होते, असें नाहीं. वर सांगितलेल्या मुसलमानांच्या संघाप्रमाणेंच मराठे लोकांचाही एक मोठा संघ अस्तित्वांत

आलेला होता व त्या मराठ्यांच्या संघालाही इंग्लिशांची हिंदुस्थानांतील राजकीय सत्ता कोणेत्याही प्रकारें संमत नसून इंग्लिशांना येथून घालवून लावावें आणि आपलें स्वतंत्रतेचें साम्राज्य सर्व हिंदुस्थानभर पसरवावें, अशी या संघाची महत्त्वाकांक्षा होती! पुण्याचे पेशवे हे या संघातील मुख्य असून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, वगैरे अनेक राजांच्या आणि सरदारांच्या मदतीनें त्यांनीं हा आपला संघ सवाई माधवरावांच्या कारकीर्दीमध्यें नाना फडणविसांच्या नेतृत्वाखालीं यशस्वितेच्या अत्यंत उज्ज्वल शिखराला नेऊन पोंचविलेला होता. याच मराठ्यांच्या संघाला ' मराठा कॉन्फिडरसी ' असें इंग्लिश इतिहासकारांकडून संबोधण्यांत येत असतें.

## इंग्रजी उंटाचें पिल्लूं पहिल्यानें हिंदुस्थानच्या घरांत कोणीं घेतलें ?

एक मुसलमानांचा आणि दुसरा मराठ्यांचा असे हे दोन संघ या वेळीं हिंदुस्थानांत फार प्रबळ होते. व इंग्लिशांचें येथें वर्चस्व राहूं द्यावयाचें नाहीं, हा एकच हेतु या दोघांच्याही मनामध्यें जागृत होता. या वेळीं हिंदु आणि मुसलमान या दोन्हीही जातींचे राजे इंग्लिशांना हिंदुस्थानांतून बाहेर घालविण्याकरितां एकत्र होत होते, असें आपण येथें पहातों; पण इंग्लिशांना हिंदुस्थानांत पहिल्यानें या दोघांपैकीं कोणीं घेतलें या प्रश्नाचा आपण विचार करूं लागलों, तर इतिहासांत त्या प्रश्नाचें आपल्याला काय बरें उत्तर मिळतें ? इंग्लिशांना हिंदुस्थानांत व्यापार करण्याची पहिली सनद मुसलमान बादशहाकडून मिळाली. कर्नाटकच्या आणि हैदराबादच्या गादीच्या भांडणांत ज्या एका बाजूनें इंग्लिशांना आपल्या मदतीला घेतलें, त्या बाजूचे लोक हे मुसलमानच होते. त्याचप्रमाणें बंगाल्यांत ज्यांनीं इंग्लिशांचे पाय आणून रोंविले, तेही मीरजाफर, मीरकासीम, वगैरे लोक मुसलमानच होते. शिवाय उत्तर हिंदुस्थानांतील वॉरन हेस्टिंग्ज याच्या अन्यायांना आणि अत्याचारांना ज्या अयोध्येच्या नबाबांच्या पैशाची भरपूर मदत झाली, ते अयोध्येचे नबाबही मुसलमानच होते. सारांश, पूर्वीच्या इतिहासांतील या कांहीं ठळक ठळक गोष्टी पाहिल्या, तर हें लहानपणीं लहानसें आणि गोजिरवाणें दिसणारें इंग्रजी उंटाचें पिल्लूं हिंदुस्थानच्या घरांत घेण्याला पहिल्यानें मुसलमान लोकच कारणीभूत झाले, असें दिसतें. उलट मराठ्यांच्या हातून या बाबतींत अशी चूक झाल्याचें उदाहरण पूर्वीच्या इतिहासांत कोठेंही दिसून येत नाहीं. शिवाजी हा हिंदुस्थानच्या अलीकडच्या इतिहासांतील स्वतंत्रतेच्या कल्पनेचा आद्यप्रवर्तक होय. त्याच्या हातून आपल्या देशाच्या प्रस्तुतच्या किंवा भावी स्वतंत्रतेला विघातक अशी चूक होण्याचा संभवच नव्हता. त्याच्या हातून चुका झाल्या असतील, तर त्या उलट दिशेच्या चुका झालेल्या आहेत. बंगाल्यांतील मुसलमानी नबाब हुगळी नदीच्या कांठीं इंग्रजांना वखारी बांधण्याकरितां कौलानें जागा देण्यामध्यें गुंतलेले होते, त्या वेळच्या सुमाराला महाराष्ट्रांतील शिवाजी महाराज हे सुरतच्या समुद्रकांठच्या इंग्लिशांच्या वखारी लुटण्यामध्यें गुंतलेले होते ! या तुलनेवरून त्या वेळीं इंग्लिशांच्या बाबतींत मराठे लोकांचें धोरण काय होतें, हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. आणि आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या बाबतींत परकीय लोकांच्या संबंधानें शिवाजीमहाराजांनीं जें हें धोरण घालून

दिलेलें होतें, तें धोरण नाना फडणवीस यांनीं इ. स. १८०० पर्यंत बिनचूक चालविलें होतें. आणि नाना फडणवीस जिवंत होते, तोंपर्यंत मराठे लोकांच्या स्वातंत्र्यामध्यें आणि साम्राज्यामध्यें आपला रतिभरही प्रवेश होऊं शकणार नाहीं, अशी इंग्लिश मुत्सद्दयांचीही पक्की खात्री होऊन चुकलेली होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या किल्ल्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी हल्लींच्याप्रमाणें त्या वेळींही हिंदू राजे आणि मुसलमान राजे या दोघांच्याही दक्षतेवरच अवलंबून होती. त्यांपैकीं शिवाजी महाराजांच्या वेळेपासून तों तहत नाना फडणविसांच्या वेळेपर्यंत या स्वतंत्रतेच्या किल्ल्याचा मराठ्यांच्या बाजूचा कडेकोट बंदोबस्त कसा कायम टिकविण्यांत आलेला होता, हें वर दाखविण्यांत आलेलेंच आहे. परंतु या स्वतंत्रतेच्या किल्ल्याच्या तटाची जी दुसरी बाजू मुसलमानांच्या संरक्षणाखालीं होती, त्या आपल्या बाजूचे एकेक लहान लहान दरवाजे उघडून मुसलमानांनीं इंग्लिशांना आपल्या तटाच्या भिंतीच्या आंत घेतलें होतें. पण जहांगीर बादशहा, सुराजउद्दवला, मीरजाफर, मीरकासीम, सलाबतजंग, चंदासाहेब, आसफउद्दौला, वगैरे पूर्वीच्या मुसलमान लोकांनीं केलेल्या राजकारणांतील या ढोबळ चुका टिपू सुलतान याच्या लक्षांत आल्या. इंग्लिश लोकांना आपल्या पूर्वीच्या कांहीं लोकांनीं आपल्या घरांत घेतलें, ही त्यांची चूक लक्षांत येऊन इंग्लिशांना आतां हिंदुस्थानांतून बाहेर घालवून लावल्याशिवाय आपल्याला तरणोपायाचा दुसरा खरा मार्ग नाहीं, हा टिपू सुलतानाच्या मनाचा दृढनिश्चय झाला, व त्याकरितां त्यानें वर सांगितल्याप्रमाणें त्या वेळच्या विद्यमान मुसलमान राजांचा एक मोठा गुप्त कट बनविला.

## दैवाची अनुकूलता आणि कपटाचीं कारस्थानें.

मार्क्विस वेलस्ली हा हिंदुस्थानांत गव्हर्नर जनरल होऊन आला, त्यावेळीं युरोपखंडांत आणि हिंदुस्थानांत अशी चोहोंकडेही वर वर्णन केल्याप्रमाणें बिकट परिस्थिति होती. परंतु बाकी सगळ्या शत्रूंना गोंजारून एकेका शत्रूला मारावयाचें, ही जी कपटी राजकारणांतील कणिक-नीति, तिचा अवलंब करून इंग्लिशांनीं आपल्या सभोंवतालच्या अडचणींतून आपला मार्ग काढण्याला सुरुवात केली. झमानशहा लाहोरपर्यंत येऊन लाहोरापासूनच तो काबुलाकडे परत वळला. आणि नेपोलियन बोनापार्ट ईजिप्तच्या पुढें हिंदुस्थानाकडे येऊं शकलाच नाहीं! तेव्हां इंग्लिशांनीं मराठ्यांच्या आणि निजामाच्या फौजांची कुमक घेऊन टिपू सुलतानाचें श्रीरंगपट्टणचें राज्य काबीज करून घेतलें. टिपूला मारल्यानंतर प्रामाणिक इंग्लिश लोक निजामावर उठले! व त्याच्याशीं कांहीं तरी कुरापत काढून त्यांनीं निजामाला हतवीर्य केलें. निजामाच्या पदरीं बरेंच फ्रेंच सैन्य होतें. तें सगळें फ्रेंच सैन्य निजामाच्या नोकरींतून घालवून देऊन इंग्लिशांनीं आपल्या तैनाती पद्धतीची फौज निजामाच्या गळ्यांत अडकवून दिली; व त्या फौजेच्या खर्चाकरितां म्हणून निजामाचा बराचसा प्रांत आपल्या तैनातीकडे तोडून घेतला. अशा रीतीनें दक्षिण हिंदुस्थानांतील म्हैसूर आणि निजाम हैद्राबाद हीं दोन मोठीं मुसलमानी राज्यें आपल्या वह्यांत आणल्यानंतर इंग्लंडांतून हिंदुस्थानच्या क्षितिजावर उदय

पावलेल्या मार्क्विस वेलस्ली या शनैश्वरांची दृष्टि मराठी कॉन्फिडरसीचा नायनाट करण्याकडे वळली. मार्क्विस वेलस्ली हा हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं हिंदुस्थानांतून फ्रेंच लोकांची हकालपट्टी करून इंग्लिशांचें राज्य होईल तितकें वाढवावयाचें, हा मुख्य हेतु त्यानें आपल्या डोळ्यांपुढें ठेविला होता. व त्याकरितां मराठ्यांच्या एकजुटीच्या संघामध्यें कसें तरी करून आपलें बोट शिरकवून घेऊन त्यांच्यामध्यें फाटाफूट उत्पन्न करावी, यासाठीं तो टपूनच बसलेला होता. व ज्या संधीची तो अशा हेतूनें वाट पहात होता, ती संधि नाना फडणिसांच्या मृत्यूनंतर त्याला लवकरच मिळाली. विठोजी होळकर हा बाजीरावाच्या विरुद्ध एका दंग्यांत सामील होता, म्हणून बाजीरावानें त्याला बंडखोर म्हणून हत्तीच्या पायांखालीं ठार मारविलें. तेव्हां आपल्या भावाचा अशा रीतीनें वध करण्यांत आला, हें पाहून यशवंतराव होळकर याला अतिशय राग आला; व त्यानें येऊन पुणें लुटलें. तेव्हां बाजीरावसाहेब हे पुणें सोडून सिंहगडास गेले, आणि यशवंतराव होळकर हा पुण्यास शिरजोर होऊन बसला. अशा स्थितींत आपण पुण्यास परत यावें, तर आपल्या भावाचा सूड उगविण्याकरितां यशवंतराव होळकर कदाचित् आपल्यालाही एखाद्या हत्तीच्या पायाखालीं देऊन ठार मारील, अशी बाजीरावसाहेबांना भीति वाटत होती. त्यामुळें ते पुण्यास न येतां सिंहगडाहून महाडास गेले व तेथून बाणकोटच्या रस्त्यानें एका इंग्लिशांच्या गलबतांत बसून ते वसईस गेले. इकडे अशा रीतीनें पुण्याची गादी उघडी पडलेली पाहून यशवंतराव होळकर यानें राघोबादादाचा दत्तक मुलगा अमृतराव यास पेशवाईच्या गादीवर बसविलें. यशवंतराव होळकरानें पेशवाईच्या गादीची जरी अशा रीतीनें विल्हेवाट लावून टाकली, तरी ती गादी आपल्या हक्काची आहे आणि ती आपली आपल्याला मिळाली पाहिजे, ही इच्छा बाजीरावाच्या मनांत होतीच.

## वसईचा तह.

पुण्याच्या दरबारांत चाललेला हा घोंटाळा इंग्लिश लोक लक्षपूर्वक रीतीनें पहात होते. व आपण ज्या संधीची वाट पहात होतों, ती संधि आपल्याला या वेळीं अनायासानें मिळत आहे, असें पाहून त्यांना मनांतल्या मनांत मोठें समाधान वाटत होतें. व त्यासाठीं इंग्लिशांचीं पाताळयंत्रें बाजीरावसाहेबांच्या सभोंवतीं चालूच होतीं. अखेरीस सरदार रास्ते, कर्नल बॅरी क्लोझ, वगैरे मध्यस्थ मंडळींच्या मार्फतीनें बाजीरावसाहेब ता. १६ डिसेंबर १८०२ रोजीं वसई येथें येऊन पोंचल्यानंतर पंधरा दिवसांच्या अवधींतच ता. ३१ डिसेंबर १८०२ रोजीं वसई येथें बाजीरावसाहेब आणि इंग्लिश यांच्या दरम्यान वसईचा तह झाला. या तहानें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यमंदिरावर पहिला जळजळीत निखारा ठेविला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बाजीरावसाहेब वसईस ज्या वाड्यांत जाऊन राहिले होते आणि ज्या वाड्यांतील दिवाणखान्यांत त्यांनीं या तहनाम्यावर सही केली, तो वाडा व त्यांतलि तो दिवाणखाना हल्लींही जिज्ञासु प्रेक्षकांना पहावयाला मिळण्यासारखा आहे. पण तो पाहून स्वातंत्र्यप्रिय आणि स्वदेशनिष्ठ अशा अंतःकरणांना काय वाटेल ? येथें आपल्या स्वातंत्र्याचा गड ढांसळला ! येथें आपलें स्वराज्य समुद्रांत बुडालें ! येथें आपली सत्ता लयाला गेली ! येथें आपलें राजकीय स्वत्व नाहींसें होऊन आपण दुसऱ्यांचे

गुलाम बनलों ! येथें आपल्या पायांत पारतंत्र्याच्या शृंखळा ठोकण्यांत आल्या ! येथें एका कोऱ्या कागदावरील काळ्या शाईनें आपल्या पुढल्या स्वातंत्र्याच्या सगळ्या लढाया आपण आधींच हरवून बसलों ! येथें आपल्या देशांतील भावी शूर योद्धयांचें शौर्य आपण निष्फळ करून टाकलें ! येथें आपण आपल्या हातांतील हत्यारें खालीं ठेवलीं आणि आपल्या हातांत गुलामगिरीच्या बिड्या घालून घेण्याला सुरवात केली ! येथें आपण हिंदुस्थानांतील सर्व राज्यांचीं सिंहासनें दुसऱ्यांनीं त्यांच्यावर बसण्याकरितां खालीं करून दिलीं ! येथें भविष्य काळांत पुढें कैक वर्षेपर्यंत आपल्या पोटीं जन्मास येणाऱ्या पुत्रपौत्रांच्या कपाळीं-ब्रह्मदेवानें त्याचें ब्रह्मलिखित लिहून ठेवण्याच्या आधीं–''तुम्ही गुलाम म्हणून जन्माला येणार आहां !'' असें काळ्याकुट्ट अक्षरांनीं आपण लिहून ठेविलें ! अशा प्रकारचें अदर्शनीय दृश्य त्या ठिकाणीं आपल्या डोळ्यासमोर उभें राहिलें, तर तशा स्थितींत आपली काय बरें अवस्था होईल ?

## होळकरला गोंजारण्याची इंग्रजी युक्ति !

ह्या वसईच्या तहामुळेंच असईच्या लढाईला पहिलें कारण उपस्थित झालें. पुण्याच्या दरबारांत नाना फडणवीस जिवंत असतांनाही महादजी शिंद्याचें प्राबल्य फार वाढलेलें होतें. व नाना आणि महादजी हे दोघे मृत्यु पावल्यानंतरही महादजीचा दत्तकपुत्र, दौलतराव शिंदे, यानें पुण्याच्या दरबारांतील तें आपलें पूर्वीचें वर्चस्व पुढेंही पूर्ववत् कायम टिकविलें होतें, व त्यामुळें पुण्याचा सर्व कारभार दौलतराव शिंदे यांच्याच तंत्रानें चालत होता; व बाजीरावसाहेब हेही दौलतरावाच्याच साहाय्यावर पुष्कळ अंशीं अवलंबून होते. परंतु यशवंतराव होळकर यानें उत्तर हिंदुस्थानांतील शिंद्याच्या मुलखामध्यें कांहीं लुटालूट सुरू केली, तेव्हां त्याच्या बंदोबस्ताकरितां इ. स. १८०२ सालीं दौलतराव शिंदे उत्तर हिंदुस्थानांत गेला. अशा युक्तीनें दौलतराव शिंद्याला पुण्यांतून काढून लाविल्यावर आपला भाऊ विठोजी याच्या वधाचा सूड घेण्याच्या निमित्तानें यशवंतराव होळकर पुण्यावर चाल करून आला. तेव्हां बाजीरावसाहेब घाबरले आणि दौलतराव शिंदे हा उज्जनीस होता, तेथून त्यानें आपल्या मदतीकरितां ताबडतोब यावें, म्हणून त्याला पत्र लिहिलीं. परंतु दौलतराव स्वतः येऊं शकत नसल्यामुळें त्यानें सदाशिवभाऊच्या बरोबर कांहीं सैन्य दक्षिणेंत पाठविलें. त्या सैन्याची आणि होळकराच्या सैन्याची ता. २९ आक्टोबर १८०२ रोजीं पुण्याजवळील हडपसरच्या मैदानांत एक लढाई होऊन त्यांत शिंद्याचा पराजय झाला. या लढाईच्या पूर्वीपासूनच पुण्याच्या दरबारांतील इंग्लिशांचा रेसिडेंट, कर्नल बॅरी क्लोज, यानें पेशव्यांनीं इंग्रजांच्या तैनाती पद्धतीचा निजामाप्रमाणें स्वीकार करावा म्हणून बोलणें लाविलेलें होतें. परंतु बाजीरावसाहेबांना दौलतराव शिंद्याच्या संरक्षणाचा पुष्कळ आधार वाटत असल्यामुळें त्यांनीं इतके दिवसपर्यंत इंग्लिश वकिलाच्या या बोलण्याकडे फारसें लक्ष दिलेलें नसावें; परंतु वर सांगितल्याप्रमाणें इ. स. १८०२ च्या आक्टोबर महिन्यामध्यें शिंद्याच्या सैन्याचा पराभव झालेला पाहून कर्नल बॅरी क्लोज यानें ही संधि बरी आहे, असें जाणून आपलें तैनाती पद्धतीचें म्हणणें पेशव्यांच्या पुढें त्या वेळीं जोरानें मांडलें असावें, आणि शिंद्यांच्या परा-

भवामुळें चोहोंकडून निरुपाय झाल्याकारणानें बाजीरावसाहेबही त्यागोष्टीला रुकार देण्याला तयार झाले असतील. आणि त्यामुळें हा शिंद्याच्या सैन्याचा पराभव झाल्याबरोबर आपण इंग्लिशांची तैनाती फौज आपल्या संरक्षणाकरितां आपल्या मुलुखांत ठेवून घेण्याला तयार आहों, असें बाजीराव साहेबाकडून एक पत्र इंग्लिशांना लिहून मिळालें. आपल्या संरक्षणाकरितां इंग्रजांची



**दौलतराव शिंदे.**

तैनाती फौज आपल्या मुलखांत ठेवण्याची बाजीराव साहेबांची ही संमति जरी आक्टोबरच्या अखेरीस इंग्लिशांनीं मिळवून घेतली होती, तरी त्या वेळीं जेव्हां बाजीरावसाहेबांना होळकराच्या विरुद्ध संरक्षणाची जरूर होती, तेव्हां तें संरक्षण देण्याला इंग्लिश पुढें आले नाहींत. इंग्लिशांचें संरक्षण स्वीकारण्याला बाजीराव तयार झाले असतांही त्या बाजीराव साहेबांचें पुणें यशवंतराव

होळकर, कर्नल बॅरी क्लोज या ब्रिटिश रेसिडेंटच्या डोळ्यांदेखत, खुशाल लुटीत होता; इतकेंच नव्हे, तर त्या वेळच्या त्या भयंकर परिस्थितीमुळें बाजीराव साहेबांना खुद्द पुणे शहर सोडून बाहेर निघून जावें लागलें, तरी इंग्लिशांचें संरक्षण बाजीरावसाहेबांच्या बचावाकरितां पुढें सरसावून आल्याचें कोठेंही दिसलें नाहीं! बाजीराव साहेबांनीं जर इंग्लिशांनें संरक्षण या वेळीं स्वीकारिलेलें होतें, तर या संकटाच्या समयीं इंग्लिशांनीं त्यांचें संरक्षण करावयाला नको होतें काय? पण तें संरक्षण त्यांनीं काय केलें? तर त्याचें उत्तर इंग्लिशांनीं बाजीरावाचें कांहीं एक संरक्षण केलें नाहीं, असेंच त्या वेळच्या इतिहासावरून मिळतें. पण इंग्लिशांना बाजीरावाचें संरक्षण खरोखर करावयाचें होतें कधीं? तो उत्तरोत्तर जास्त जास्त संकटामध्येंच सांपडत जावा, म्हणजे आपलें बोट त्या त्या मानानें जास्त शिरकत जाईल, हीच इंग्लिशांची या वेळीं मनांतील इच्छा असली पाहिजे, असें त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट दिसतें. ज्या कर्नल बॅरी क्लोज यांनीं बाजीरावसाहेबापासून तैनाती फौजेच्या संरक्षणाची संमति मिळवून घेतली, त्या कर्नल बॅरी क्लोज यांनीं बाजीराव साहेबांचें होळकरापासून संरक्षण करावयाला पाहिजे होतें. पण तसें त्यांनीं कांहीं एक केलें नाहीं! मग ते त्या वेळीं काय करीत होते? आणि बाजीरावसाहेब पुण्याहून सिंहगडास आणि सिंहगडाहून महाडास जात असतां कर्नल बॅरी क्लोज हे कोठें राहिले होते? तर ते पुण्यास होळकराच्याच छावणीमध्यें स्वस्थ राहिले होते. वास्तविक पाहिलें असतां ते कांहीं होळकराचे वकील नव्हते. आणि यशवंतराव होळकरानें इंग्रजांचे मित्र पेशवे यांच्या विरुद्ध इतके अन्याय केले असतांही इंग्लिशांचे वकील, क. क्लोज, हे त्याच्या छावणीमध्यें राहिले होते; आणि त्यांची कांहीं एक कानउघाडणी न करितां ते त्यांच्याशीं मित्रत्वानें वागत होते! बरें, या वेळीं इंग्लिशांनीं होळकराचें कांहीं पारिपत्य केलें नाहीं तर नाहीं; पण पुढें इ. स. १८०३ च्या एप्रिल महिन्यांत सर आर्थर वेलस्ली हे आपल्याबरोबर मोठें लष्कर घेऊन पुण्यांत आले आणि ता. ६ मे रोजीं त्यांनीं बाजीराव साहेबांना पुण्याच्या गादीवर बसविलें; तेव्हां त्यानंतर तरी त्यांनीं होळकराच्या पारिपत्याकरितां कांहीं तजवीज करावयाला नको होती काय? पण त्यांनीं तसें कांहीं एक केलें नाहीं. आणि उलट असई, आरगांव, वगैरे ठिकाणच्या लढाया होऊन दौलतराव शिंदे जिंकला जाईपर्यंत इंग्लिशांनीं होळकराशीं आपलें सख्यच कायम ठेविलें होतें. यावरून इंग्लिशांच्या वर्तणुकींतील त्यांचा हेतु स्पष्ट दिसत आहे. हिंदुस्थानांतील सर्व राजे एकत्र झाले असते, तर त्यांच्याशीं लढण्याची इंग्लिशांच्या अंगामध्यें हिंमत नव्हती. तेव्हां त्यांनीं एकाला गोंजारून दुसऱ्याला मारण्याचा कसा उपक्रम सुरू केला होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. निजाम आणि पेशवे यांच्या साहाय्यानें त्यांनीं टिपूला मारलें. पुढें पेशव्यांच्या लढायांमुळें जेरीस आलेल्या त्या निजामाला त्यांनीं आपल्या तैनाती फौजेच्या संरक्षणाखालीं ओढून घेतलें. नंतर म्हैसूरची फौज आणि निजामाची फौज आपल्याबरोबर घेऊन सर आर्थर वेलस्ली यांनीं पुण्यास येऊन वसईच्या तहाप्रमाणें तैनाती फौजेची पद्धत पेशव्यांच्या डोक्यावर लादली. व त्याच सुमाराला बडोद्याचे गायकवाड यांच्याकडूनही त्यांनीं या पद्धतीचा स्वीकार करविला. त्यानंतर आतां शिंदे, होळकर आणि भोंसले, हे तिघेच काय ते मराठा कॉन्फिडरसीपैकीं मुख्य असे राजे इंग्लिशांच्या तैनाती फौजेच्या जाळ्यांत सांपडावयाचे

राहिलेले होते. अशा स्थितींत या तिघांच्याही विरुद्ध एकदम युद्ध पुकारणें इंग्लिशांच्या कारस्थानीपणाला केव्हांही सोईचें झालें नसतें. त्यामुळें होळकराच्या हातून या वेळीं जरी पेशव्यांच्या विरुद्ध कित्येक गुन्हे घडलेले होते, तरी इंग्लिशांनीं तिकडे दुर्लक्ष केलें; आणि होळकराशीं सलोखा कायम ठेवून त्यांनीं शिंदे आणि भोंसले यांचा आधीं पराभव करण्याची योजना चालविली. पण यावरून असें कोणीं समजूं नये कीं, ज्या यशवंतराव होळकरापाशीं इंग्लिशांनीं १८०२ आणि १८०३ या सालांत इतका सलोखा दाखविला होता, त्या यशवंतराव होळकरापाशीं इंग्लिशांनीं तो आपला सलोखा तसाच पुढें कायम ठेविला ! दौलतराव शिंदे आणि रघोजी भोंसले यांचा पाडाव झाल्यानंतर १८०४ सालामध्यें यशवंतराव होळकर यांचीही पाळी इंग्लिशांच्या कारस्थानाच्या क्रमाप्रमाणें येऊन पोंचली ! परंतु तोंपर्यंत इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराची खुशामत करण्याचेंच धोरण कपटानें चालू ठेविलेलें होतें.

## शूर इंग्लिशांच्या मनांत फ्रेंचांची भीति.

शिवाय यशवंतराव होळकर आणि दौलतराव शिंदे या दोघांनाही जरी इंग्लिशांच्या मनांतून केव्हां तरी चिरडूनच टाकावयाचें होतें, तरी त्यांतल्या त्यांत इंग्लिश कारस्थानानें दौलतराव शिंद्यांचाच बळी पहिल्यानें घेण्याचें कां ठरविलें, याला एक विशेष कारण होतें. आणि तें कारण असें कीं, यशवंतराव होळकरापेक्षां दौलतराव शिंदे हा इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील महत्त्वाकांक्षेच्या आड त्या वेळीं जास्त येत होता. कारण, त्याच्या पदरीं फ्रेंच अधिकाऱ्यांचा भरणा जास्त होता. तशी फ्रेंचांच्याबद्दलची भीति यशवंतराव होळकरापासून इंग्लिशांना नव्हती. म्हणून त्याचा नंबर दुसरा लावण्यांत आला; आणि शिंद्याला इंग्रजांच्या भक्ष्यस्थानामध्यें अग्रेसरत्व प्राप्त झालें. महादजी शिंद्यांच्या वेळीं डी बॉयन या नांवाच्या एका फ्रेंच अधिकाऱ्याच्या हाताखालीं शिंद्याच्या फौजा युरोपियन धर्तीवर तयार करण्यांत आल्या होत्या. व त्यामुळेंच त्या वेळच्या राजकारस्थानामध्यें महादजीला इतकें महत्त्व प्राप्त झालेलें होतें. ही गोष्ट लक्षांत येऊन महादजीच्या पाठीमागें दौलतराव शिंद्यानेंही आपल्या सैन्यामध्यें तीच शिक्षणाची पद्धत ठेविली होती. व डी बॉयन याच्या मरणानंतर एम्. पेरन या फ्रेंच लष्करी अधिकाऱ्याच्या हाताखालीं दौलतराव शिंद्यानें आपलें लष्कर दिलेलें होतें. व त्या लष्कराच्या खर्चाकरितां गंगा आणि यमुना याच्या दुआबामधील मोठा प्रांतही शिंद्यानें एम्. पेरन याजकडे तोडून दिला होता. व एम्. पेरन यानेंही आपल्या हाताखालीं दुसरे फ्रेंच अधिकारी ठेवून शिंद्याच्या लष्कराची फार उत्कृष्ट तयारी केली होती. युरोपांतल्याप्रमाणें शिंद्याच्या लष्करांत नवीन तऱ्हेच्या तोफा ओतण्यांत येऊं लागल्या होत्या. युरोपांतल्या सारखा दारूगोळा तयार करण्याचे कारखाने शिंद्याच्या छावणींत एम्. पेरन यानें सुरू केले होते. आणि युरोपियन कवायतीची पद्धतहि शिंद्यांच्या सैन्यांत चालू करण्यांत आलेली होती. त्यामुळें पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना मिळून शिंद्याचें कवायती सैन्य एकंदर सुमारें पन्नास हजाराच्या वर जय्यत तयार झालें होतें. ही फ्रेंचांनीं केलेली बाह्य अंगांची तयारी होती. पण आपल्या हातांतील सैनिकांचें अंतरंगही बदलून टाकण्याचें या फ्रेंच सेना-

पतींचे प्रयत्न हिंदुस्थानांत चालू झालेले होते. व ही त्यांची तयारी टिपू सुलतान, निजाम, शिंदे वगैरे सर्व राजांच्या लष्करांतून चाललेली होती. आणि फ्रान्समध्यें झालेल्या राज्यक्रांतीचें प्रतिबिंब थोड्याबहुत प्रमाणानें या फ्रेंच अधिकाऱ्यांच्या द्वारानें हिंदुस्थानांतही पडूं लागलें होतें. फ्रान्समधल्याप्रमाणें टिपूच्या राज्यामध्यें तेथील फ्रेंच अम्मलदारानें एक जॅकोबिन लोकांचा क्लब स्थापन केला होता. व तेथून फकीर, व्यापारी किंवा शिपाई, यांच्या मिषानें हिंदुस्थानभर निरानिराळे लोक पाठवून या गुप्त हेरांच्या मार्फतीनें सर्व हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या विरुद्ध राज्यक्रांतीचे कट प्रस्थापित करून इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हांकलून द्यावयाचें, अशाबद्दलचे त्यांचे प्रयत्न मोठ्या जारीनें चालले होते. निजामाच्या पदरीं मि. रेमंड या नांवाचा एक फ्रेंच सेनापति होता; व त्याचेही असेच प्रयत्न चालले असले पाहिजेत, अशी इंग्लिशांना शंका होती. म्हणून टिपू आणि निजाम यांच्या राज्यांमधून फ्रेंच लोकांचें उच्चाटन इंग्लिशांनीं आधीं केलें. आणि नंतर मग त्यांच्या संक्रांतीची दृष्टि शिंद्याच्या सैन्यांतील फ्रेंच लोकांकडे वळली.

दिल्लीचा बादशहा, शहाआलम, हा त्या वेळीं आंधळा झाला होता. व तो शिंद्याचे ताब्यांत होता. आणि शिंद्याचे मार्फतीनें त्याच्यावर देखरेख ठेवण्याचें काम शिंद्याचा फ्रेंच सेनापति, एम. पेरेन यांच्याकडे आलेलें होतें. म्हणजे सारांश, हिंदुस्थानचा मुख्य मुसलमान बादशहा शहाआलम, हा एम्. पेरन याच्याच मुठींत होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतकी ही मोठी सत्ता दौलतराव शिंद्याच्या मार्फतीनें फ्रेंचाच्या हातांत होती, ही गोष्ट इंग्लिशांना पहावेना. त्यांना नेपोलियनची शेवटपर्यंत भीति वाटत होती. व हिंदुस्थानाकडे यावयाला निघालेला नेपोलियन एकदां जरी ईजिप्तमधूनच माघारा गेला होता, तरी ऑस्टरलिट्झच्या लढाईनंतर आणि मॉस्कोहून परत आल्यानंतरही आपण फिरून हिंदुस्थानांत जावें, असे विचार त्याच्या डोक्यांत मधून मधून येत असत. त्यामुळें हिंदुस्थानांत फ्रेंचांची सत्ता आपण कांहीं उरूं दिली आणि त्यांतच जर नेपोलियन हिंदुस्थानांत आला, तर मग आपली कांहीं धडगत लागणार नाहीं, अशी इंग्लिशांना नेहमीं धास्ती वाटत होती. आणि त्यामुळें मार्क्विस वेलस्ली यांनीं फ्रेंचांना हिंदुस्थानांतून घालवून टाकण्याकरितां या वेळीं अनेक कारस्थानें रचलीं. व प्रथमतः शिंद्याशीं लढाई सुरू करून त्यांनीं तीं कारस्थानें यशस्वी रीतीनें शेवटास नेलीं.

## हिंदुस्थानांतील त्या वेळचे मुख्य मॅकिआव्हेली.

हीं वर सांगितलेलीं कपटाचीं कारस्थानें या वेळीं असईच्या लढाईच्या पूर्वीपासून मार्क्विस वेलस्ली हे कशा रीतीनें रचीत होते, हें आपण पुढें लवकरच पाहूं. परंतु इंग्लिश लोक अशा रीतीनें आपल्या विरुद्ध गुप्त कारस्थानें रचीत असतांना मराठा कॉन्फिडरसीमधील मुख्य राजे जे शिंदे आणि होळकर यांचें वर्तन या वेळीं कसें असावयाला पाहिजे होतें ? मराठा कॉन्फिडरसीमधील सर्व लहानमोठ्या राजांनीं या वेळीं एकत्र होऊन आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करावयाला पाहिजे होतें. पण दुर्दैवानें तसें कांहींच झालें नाहीं. पेशवे आणि गायकवाड या दोघांना इंग्लिशांनीं आधींच आपल्या ताटाखालचीं मांजरें

करून ठेविलें होतें. आणि आतां होळकर, शिंदे आणि भोंसले, हेच काय ते तिघे शिल्लक राहिले होते. पण हे तिघेहि एकत्र होऊन इंग्लिशांच्या विरुद्ध लढते, तरी त्या वेळीं मराठा कॉन्फिडरसी कांहीं दिवस तरी टिकली असती. परंतु शिंदे आणि भोंसले यांच्या लढाईच्या मसलतीमध्यें होळकर त्या वेळीं सामील होईना. इंग्लिश लोक होळकराशीं या वेळीं बाह्या-त्कारी सख्य दाखवीत होते; आणि त्यामुळें फसून जाऊन तो इंग्लिशांचे हेतु शेवटास नेण्याला नकळत त्यांना मदत करीत होता ! इ. स. १८०३ च्या जुलै महिन्याच्या १६ व्या तारखेला सर आर्थर वेलस्ली यांनीं यशवंतराव होळकर यांना पुढीलप्रमाणें एक पत्र लिहिलें होतें. तें असें कीः–Much time has elapsed since I have had the pleasure of hearing from you, although I am anxious to cultivate the good under-standing which has subsisted between the Honourable Company's Government and you." अशा प्रकारचीं फसवणुकीचीं पत्रें लिहून इंग्लिश मुत्सद्दी होळकराच्या मनांत खोट्या आशा उत्पन्न करीत होते. व त्यामुळें यशवंतराव होळकर हा फसला जात होता. ह्यावेळीं होळकरानें शिंदे आणि भोंसले यांच्या पक्षाला जाऊन मिळणें हें आपल्या देशाच्या स्वातं-त्र्याच्या दृष्टीनें त्याचें कर्तव्यकर्म होतें. पण तें त्यानें केलें नाहीं. इंग्लिश लोक आपल्याला कसें फसवीत असतात आणि आपल्यांतील एका पक्षाला फोडून दुसऱ्या पक्षाला कसें कम-कुवत करीत असतात याचें हें एक चांगलें उदाहरण आहे. हें मागचें उदाहरण पाहून तरी नवीन फसणाऱ्या लोकाचे डोळे उघडणें जरूर आहे. पण अजून तसें होत नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. अजूनही आपल्यांतील होळकर इंग्लिशांच्या युक्त्यांनीं फसत आहेत ! आणि त्यामुळें अजूनहि आपल्या असई आणि आरगांवच्या लढाया आपल्याविरुद्ध इंग्लिशांकडून जिंकल्या जात आहेत !

मराठ्यांच्या संघामध्यें शिंदे, होळकर आणि भोंसले हे जे तीन प्रमुख राजे या वेळीं शिल्लक राहिले होते, त्यांपैकीं फ्रेंचांच्या आश्रयामुळें दौलतराव शिंद्यावर इंग्लिशांचा कसा रोष होता, आणि यशवंतराव होळकर यानें त्याला मिळूं नये म्हणून इंग्लिशांच्या कशा खटपटी चालल्या होत्या, हें येथपर्यंत सांगण्यांत आलें आहे. आतां याच्यापुढें प्रत्यक्ष असईच्या लढा-ईचें वर्णन देण्याच्यापूर्वीं त्या लढाईमध्यें शिंद्याला जय मिळूं नये, म्हणून शिंद्याच्या सभोंवतीं फितुरीचें जाळें इंग्लिशांकडून कसें पसरविलें जात होतें, हें आपण आधीं पाहूं. ही फितुरी करविण्यांतील मुख्य मॅकिआव्हेलीचें काम त्या वेळचे हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल, मार्क्विस वेलस्ली ऊर्फ लॉर्ड वेलस्ली, यांनीं खुद्द आपल्याकडे घेतलेलें होतें. व आपल्या सल्ल्याप्रमाणें आपलीं कृष्णकारस्थानें जुळवून आणण्याकरितां यांनीं आपल्या हाताखालीं दुसरे दोन कपटनिष्णात असे छोटे मॅकिआव्हेली मदतनीस घेतलेले होते. त्यांपैकीं पहिले मदत-नीस म्हटले म्हणजे या गव्हर्नर जनरलांचे खुद्द धाकटे बंधु सर आर्थर वेलस्ली, हे होत. पुढें नेपोलियनच्या विरुद्ध वाटर्लूच्या लढाईमध्यें इ. स. १८१५ सालीं जय मिळविण्याचा ज्यांना दैवानें मान मिळवून दिला आणि जे पुढें इंग्लंडच्या इतिहासांत लॉर्ड वेलिंगटन म्हणून प्रख्यातीस आले, तेच हे मूळचे सर आर्थर वेलस्ली होत. यांनीं युरोपखंडांतील पेनिनशुलर वॉर-

मध्यें आणि वॉटर्लूच्या लढाईमध्यें जे दिग्विजय मिळविले, त्याचीं पूर्व चिन्हें त्यांच्या हिंदुस्थानांतील लष्करी आयुष्यक्रमामध्यें जरी कोठें फारशीं दिसून आलीं नाहींत, तरी फ्रान्समध्यें नेपोलियनच्या विरुद्ध त्यांनीं जीं कित्येक कपटकारस्थानें रचलीं, त्या सद्‌गुणांचे अंकुर मात्र त्यांच्या हिंदुस्थानांतलि कारस्थानांमध्यें पूर्णपणें दिसून येत होते. लॉर्ड वेलस्ली यांचीं दक्षिण महाराष्ट्रांतील बहुतेक कारस्थानें यांच्याच कपटकौशल्यामुळें निर्विघ्नपणें तडीस गेलीं. आणि लॉर्ड वेलस्ली यांनीं उत्तर हिंदुस्थानामध्यें शिंद्याच्या विरुद्ध जे अनेक गुप्त कट उभारले होते, ते व्यवस्थित रीतीनें पार पाडण्याचे कामीं लॉर्ड लेक यांचेकडून त्यांना पूर्ण मदत झाली. लॉर्ड लेक हे त्या वेळीं हिंदुस्थानचे कमांडर-इन्-चीफ होते. वरील दोन्हीही वेलस्ली



रघोजीराव भोंसले

बंधूंच्याप्रमाणें लॉर्ड लेक यांचाही जन्म आयर्लंडमध्येंच झालेला होता. परंतु हे जरी जन्मानें आयरिश होते, तरी आपल्या जन्मभूमीबद्दल यांच्या मनामध्यें फारच थोडें प्रेम वसत होतें. उलट सर वुइल्यम पिट यांच्या प्रधानकीच्या वेळीं आपल्या जन्मभूमीच्या पायांत इंग्लंडच्या गुलामगिरीच्या शृंखलांचे दुवे जास्त घट्ट करून बसविण्याच्या कामींच यांनीं इंग्लंडला मदत केलेली होती! लॉर्ड लेक यांना हिंदुस्थानांतील कमांडर-इन्-चीफची जागा देण्यांत आली होती; पण त्यावरून त्यांनीं आयर्लंडमध्यें कांहीं पराक्रमाचीं कामें केलीं होतीं, किंवा त्यांनीं

तिकडे शौर्यानें कांहीं लढाया जिंकल्या होत्या, म्हणून त्यांना ही जागा मिळाली, असें मुळींच नाहीं. उलट १७९८ सालीं आयर्लंडमध्यें इंग्लंडच्या विरुद्ध जें एक मोठें बंड झालें होतें, त्या बंडांतील कॅसलबारच्या लढाईमध्यें लॉर्ड लेक यांच्या हाताखालीं६००० सहा हजार सैन्य असून त्यांनीं त्या वेळीं कोणता पराक्रम केला, तर या सहा हजार सैन्यानिशीं हे बंडवाल्यांच्या पुढून पळ काढून निघून गेले. व त्यामुळें त्या लढाईला "Race of Castlebar" म्हणजे 'कॅसलबारची पळण्याची शर्यत' असें उपहासात्मक नांव पडलेलें आहे! लॉर्ड लेक यांचे आयर्लंडमधील शौर्याचे नमुनें जरी अशा प्रकारचे होते, तरी सर वुइल्यम पिट आणि लॉर्ड कॅसलरीग यांच्या सांगण्यावरून त्यांनीं आपल्या आयरिश देशबांधवांचा अनन्वित छळ केला, ही यांची कामगिरी कांहीं लहान सहान नव्हती. असल्या प्रकारच्या या कामगिरीबद्दल मि. स्टेड या निःपक्षपाती लेखकांनीं लॉर्ड लेक यांना जरी स्पष्ट शब्दांमध्यें Truculent ruffian असें म्हटलें आहे, तरी पण सर वुइल्यम पिट यांनीं त्यांना हिंदुस्थानांतील मुख्य सेनापतीच्या जागेवर नेमलें! सारांश, लॉर्ड लेक हे स्वतःच कृष्ण-कारस्थानामध्यें अत्यंत। निपुण होते; आणि त्यांत लॉर्ड वेलस्ली यांच्याकडून त्यांना प्रोत्साहन मिळाल्यावर मग तर विचारावयालाच नको होतें! लॉर्ड वेलस्ली यांनीं सर आर्थर वेलस्ली आणि लॉर्ड लेक या दोघांच्या हातून या प्रसंगीं जीं गुप्त कारस्थानें करविलीं तीं इतकीं घाणेरडीं आहेत कीं, तीं वाचून कोणालाही इंग्लिशांच्या या वर्तनाबद्दल किळस आल्यावांचून केव्हांही रहाणार नाहीं. सामान्य आणि भोळसर वाचकांना बाहेरून वाटतें कीं, इंग्लिशांनीं दौलतराव शिंदे आणि रघोजी भोंसले यांच्याविरुद्ध असईच्या लढाईत जय मिळविला; पण त्या जयाच्या खालीं आणि त्या जयाच्या पूर्वी त्या वेळच्या त्या इंग्लिश अधिकाऱ्यांनी कपटाचीं, अन्यायाचीं आणि विश्वासघाताचीं काय काय कृत्यें केलेलीं होतीं, याच्याबद्दल कोणाला कांहीं कल्पना तरी आहे काय! या कपटांचीं कपाटें उघडून त्यांतील एकेक अमूल्य प्रदर्शनीय वस्तु आपण निरखून पाहूं लागलों, म्हणजे या मानवी नरकाच्या पापमय आणि किळसवाण्या वातावरणामधून आपण केव्हां बाहेर पडूं असें मनुष्याला होऊन जातें!

## पेशव्यांच्या दरबारांत इंग्लिशांनीं चालविलेल्या फितुरीचा पुरावा.

( १ ) इंग्लिशांनीं ज्या बाजीरावसाहेबांना वसईच्या तहानें आपल्या संरक्षणाखालीं घेऊन वसईहून आणवून पुण्याच्या गादीवर बसविण्याचा बहाणा केला, त्यांच्याशीं तरी त्यांनीं या वेळीं इमानानें वागावयाला पाहिजे होतें. पण इंग्लिश लोक त्याप्रमाणे वागत होते काय? इ. स. १८०३ सालीं बाजीराव पेशव्यांच्या सभोंवतीं जे कोणी प्रधान म्हणून वावरत होते, त्यांना भरपूर पैसे द्यावे आणि त्यांच्याकडून पेशव्यांच्याकडील बातम्या काढाव्या, अशा प्रकारचा सल्ला पुण्याच्या दरबारांतील इंग्लिशांचा वकील, कर्नल बॅरी क्लोज, याला देण्यांत येत होता, हें सर आर्थर वेलस्ली यांनीं मेजर शॉ यांस ता. २४ ऑगस्ट १८०३ रोजीं लिहिलेल्या पुढील पत्रावरून स्पष्ट होत आहे.

" You will have observed from my letters to Colonel Close, that I have urged him to pay the ministers in order to have accurate information of what passes. "

त्याचप्रमाणें असईच्या लढाईनंतर ता. २८ सप्टेंबर १८०३ रोजीं असईच्या छावणीमधून ज. वेलस्ली यांनीं पुण्याचे रेसिडेंट, क. क्लोज, यांना जें पत्र लिहिलें आहे, त्यांतही पेशव्यांच्या सभोंवतालच्या प्रधानमंडळींना इंग्रजांचा मुबलक पैसा चारण्यांत येत असल्याचा उल्लेख आहे. तो असा:—

" Lord Wellesley has taken up the question of paying the Peshwa's ministers upon a great scale.

The Peshwa has no ministers. He is everything himself and everything is little. In my opinion, therefore, we ought to pay those who are supposed to be and are called his ministers to have intelligence of what passes in the Peshwa's secret councils. "

पेशव्यांच्या दरबारांत हे जे कोणी त्या वेळीं प्रधान म्हणून मोडत होते, त्यांनीं आपल्या राजाच्या विरुद्ध फितुरी करण्याकरितां हे पैसे गुप्तपणानें घेतले असतील; पण तें त्यांचें गुप्त कर्म वर दिलेल्या इंग्लिशांच्या पत्रांनीं चव्हाट्यावर आणलें आहे ! असे निमकहराम प्रधान ज्या देशांत उत्पन्न होऊं लागले, त्या देशांतील राजांना त्यांच्या लढायांतून जय कोठून मिळणार ? असले हे विश्वासघातकी लोक भावी लढायांतील पराभव हिंदुस्थानावर आपल्या पातकांनीं बळेच ओढून आणीत होते, असें मानलें, तर त्यांत कांहीं अन्यथा होणार आहे काय ?

## होळकराशीं फितुरीपुरती गोडीगुलाबी.

( २ ) असईच्या लढाईच्या वेळीं होळकरानें शिंदे व भोसले यांना मिळूं नये आणि वसईच्या तहनाम्याच्या बाबतींत होळकरानें इंग्लिशांच्या विरुद्ध उठूं नये,या हेतूनें यशवंतराव होळकराला फोडण्याचे इंग्लिशांचे सभ्यपणाचे प्रयत्न कसे चाललेले होते, हें ज. वेलस्ली यांनीं इ. स. १८०३ च्या जुलै महिन्यामध्यें होळकराला लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसून येते.

" I now send you a copy of the treaty concluded at Bassein between the Honourable Company and Rao Pundit Pradhan; from the general defensive tenor of which you will observe that the peace and security of India are provided for. "

" That being the case, whatever others may do, I have little doubt but that you will conduct yourself in the manner which your own interests will dictate, and that you will continue in peace with the company.

I send this letter in charge of Nawaz Khan, a respectable officer, who enjoys my confidence and who will explain anything, you desire to know respecting my wishes."

या पत्रांत होळकरानें आपल्या स्वतःच्या हिताकडे लक्ष देऊन कंपनीशीं सलोख्यानें रहावें, असा सर आर्थर वेलस्ली यांनीं यशवंतराव होळकर यांना उपदेश केलेला आहे. पण त्यांनीं तसा उपदेश करणें हे त्यांच्या सोईचें असलें, तरी फक्त आपल्या स्वतःच्या हिताकडे पाहून आपल्या देशाच्या आणि आपल्या देशबांधवांच्या हिताकडे दुर्लक्ष करणें हें या वेळीं यशवंतराव होळकर यांना उचित होतें काय ? दौलतराव शिंदे आणि रघोजी भोंसले यांचीं सैन्यें असईच्या रणांगणावर स्वदेशासाठीं आपले प्राण देत असतां यशवंतराव होळकरानें इंग्लिशांच्या भुलथापांना फसून स्वस्थ बसावें, असल्या आत्मघातकी वर्तनांनींच आजपर्यंत आपण आपला देश बुडविला आणि इंग्लिशांची धन करून दिली. आपल्यांतलि असले हे यशवंतराव होळकर कधीं नाहींसे होतील, तो सुदिन होय ! इंग्लिशांनीं पसरलेल्या या कपटाच्या जाळ्यामध्यें यशवंतराव होळकर हा एकाद्या माशाप्रमाणें सुदैवानें सांपडला, हें इंग्लिशांच्या दृष्टीनें अखेरीस ठीकच झालें. पण यशवंतराव होळकरासारखा शूर आणि धूर्त मनुष्य आपल्याला फितेल आणि मराठासंघांतून फुटेल, अशी इंग्लिशांना खात्री नव्हती. व तो हजार हिश्शांनीं दौलतराव शिंद्यालाच जाऊन मिळेल, अशी इंग्लिशांना भीति वाटत होती. आणि म्हणून तसा प्रसंग आलाच, तर होळकराच्या विरुद्ध त्यांनीं दुसरी एक युक्ति योजून ठेविलेली होती.

### अमरिखानाच्या संबंधींचा इंग्लिशांचा डाव.

( ३ ) होळकराच्या पदरीं अमीरखान या नांवाचा एक पठाण सरदार होता. त्याला होळकराच्या पक्षांतून प्रसंग पडल्यास फोडण्याकरितां इंग्लिशांनीं एक खोटीच हूल उठवून एक बनावट युक्ति योजून ठेविलेली होती. होळकराचा सरदार अमीरखान याला हैद्राबादचा निजाम आपल्या पदरीं राहण्याकरितां बोलावीत आहे व निजाम आणि अमीरखान यांच्या दरम्यान त्याबद्दल वाटाघाट चाललेली आहे, अशी ती हूल होती. वास्तविक निजामाला अमीरखानाच्या मदतीची जरूरही नव्हती व अमीरखानाला त्याबद्दल निजामानें कधीं प्रत्यक्ष विचारलेंही नव्हतें; पण मध्येंच कोणाकडून तरी इंग्लिशांनीं याबद्दलचा एक पत्रव्यवहार सुरू करविलेला होता, व आपण दौलतराव शिंद्याला जाऊन मिळालों, तर अमीरखान हा आपला सरदार आपल्यापासून फुटून निजामाला, म्हणजे अप्रत्यक्षपणें इंग्लिशांनाच, जाऊन मिळेल, अशी भीति होळकराच्या मनावर रहावी, याचसाठीं ही खोटी हूल उठविण्यांत आलेली असावी, असें सर आर्थर वेलस्ली यांनीं ता. २८ एप्रिल १८०३ रोजीं ज. स्टुअर्ट यांना लिहिलेल्या पत्रांतील पुढील मजकुरावरून स्पष्टपणें दिसून येतें.

Mir Khan, Holkar's Sirdar, in command of his largest detachment, still keeps open his negotiation with the Nizam to enter his Highness's service. On the 2nd of May, therefore, we shall be in greater strength than ever at Poona, and

have attained one great object of our expedition; and if Holkar should not be weakened by the defection of Mir Khan, at least his confidence in that chief must be shaken.

अमीरखान हा आंतून इंग्लिशांना फितुर असला पाहिजे, असा संशय घेण्याला त्या वेळींही पुष्कळ जागा होती; व होळकर जर त्या वेळीं शिंद्याला जाऊन मिळाला असता, तर अमीरखानाला होळकराच्या लष्करांतून फोडून निजामच्या लष्कराला मिळण्याच्या मिषानें इंग्लिशांनीं त्याला आपल्या बाजूकडे ओढून घेतलें असतें, यांत बिलकुल शंका नाहीं. अमीरखान हा होळकराला केव्हां दगा देईल, याचा कांहीं एक नेम नव्हता. व अखेरीस हें भविष्य पुढील महिद्पूरच्या लढाईमध्यें खरें ठरलें. होळकरानें महिद्पूरास क्षिप्रा नदीच्या कांठीं इंग्लिशांशीं लढण्याची तयारी केली आणि आयत्या वेळीं अमीरखानानें आपली फौज होळकराच्या पक्षाकडून काढून घेतली ! आणि अशा रीतीनें फितुरीमुळें होळकराचा पराभव होऊन महिद्पूरला विजय मिळविल्याबद्दल इंग्लिशांना फुकटच्या कीर्तीचा लाभ मिळाला !

## शिंद्याच्या युरोपियन नोकरांत इंग्लिशांची फितुरी.

( ४ ) येथपर्यंत पेशवे आणि होळकर यांच्या बाबतींत या असईच्या लढाईच्या वेळीं इंग्लिशांनीं काय काय फितुरीचीं कामें चालविलीं होतीं, हें सांगून झाल्यानंतर आतां प्रत्यक्ष शिंद्याच्या बाबतींत इंग्लिशांनीं काय काय काळोखांतील काळींकुट्ट कृत्यें करविण्याची योजना चालविली होती, हें पाहण्याकडे आपण वळूं. शिंद्याच्या लष्करामध्यें जे युरोपियन आफिसर्स शिंद्याच्या नोकरीला होते, त्यांना फोडण्याचा इंग्लिशांकडून प्रयत्न चाललेला होता; व त्या कामीं लागतील तितके पैसे खर्च करण्याला ते तयार असून गुप्त हेरांच्या मार्फतीनें निरनिराळ्या सरदाराच्या मध्यें कलह लावून द्यावयाचें, असेही त्यांचे त्या वेळीं बेत चाललेले होते, ही गोष्ट ता. २७ जून १८०३ रोजीं गव्हर्नर जनरल, मार्किस वेलस्ली, यांनीं आपले बंधु सर आर्थर वेलस्ली, यांना जें एक अतिशय खाजगी ( most secret ) असें पत्र लिहिलें होतें, त्यांतील पुढील उताऱ्यावरून स्पष्टपणें दिसून येतें.

In the event of hostilities you will take proper measures for withdrawing the European officers from the service of Scindia. Holkar, and of every other chief, opposed to you. You are at liberty to incur any expense requisite for this service and to employ such emissaries as may appear most serviceable......In the event of hostilities, I propose to dispatch proper emissaries to Gohad, and to Rajput chiefs. You will also employ every endeavour to excite those powers against Scindia. You will consider what steps may be taken to excite Cashee Rao Holkar against Jeshwunt Rao.

शिंद्याच्या लष्करांतील फ्रेंच व इतर युरोपिअन अधिकाऱ्यांना फोडण्याची कल्पना लॉर्ड वेलस्ली यांच्या डोक्यांत पुष्कळ दिवसापासून होती. व ती त्यांनीं या वेळीं मोठ्या युक्तीनें अमलांत आणिली. त्यांनीं या वेळीं एक जाहीरनामा प्रसिद्ध करून असं जाहीर केलें कीं, शिंद्याच्या लष्करामधील जे युरोपिअन लोक तेथील नोकरी सोडून आमच्याकडे येतील, त्यांना आम्ही मोठमोठीं बक्षिसे देऊं. ( Then Marquess Wellesley issued a proclamation holding out pecuniary rewards to all European mercenaries to desert the service of Scindia.) व त्याप्रमाणें पुष्कळ फ्रेंच अधिकारी शिंद्याची नोकरी सोडून इंग्लिशांना येऊन मिळाले. इ.स.१८१७मध्ये पुढें जी खडकीची लढाई झाली, त्या लढाईची पूर्व तयारी दुसऱ्या बाजीराव साहेबांनीं चालविली असतां त्या प्रसंगीं बाजीरावसाहेब इंग्रजांच्या हाताखालील पुण्याच्या नेटिव्ह पलटणींमधून फितुर उत्पन्न करीत होते, असा त्याच्यावर इंग्रजी इतिहासकारांनीं एक आरोप केलेला आहे. पण हा आरोप करतांना आपले लोक असईच्या लढाईच्या वेळीं काय काय कुकर्में करीत होते, याची आठवण बहुतकरून ते विसरले असावेत !

पण लॉर्ड वेलस्ली हे शिंद्याच्या लष्करांतील फ्रेंच अधिकाऱ्यांनाच फक्त फितुर करून थांबले, असें नसून शिंद्याच्या राज्यांतील जे मराठे सरदार आणि दरकदार होते, त्यांनाही फितविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला होता, हें मार्क्विस वेलस्ली यांनीं ता. ३० जुलै १८०३ रोजीं ज. लेक यांना लिहिलेल्या एका गुप्त पत्रांतील पुढील उताऱ्यांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

I authorise your Excellency to give to all Tributaries or others, renouncing their allegiance to Scindia and acting sincerely in our favour, the most positive assurances of effectual protection in the name of the Company.

इतकेंच नव्हे, तर दौलतराव शिंद्याच्या मुलुखांतील जे कोणी सरदार आणि जहागिरदार अशा रीतीनें फितुर होऊन इंग्लिशांना मदत करतील आणि आपापल्या गांवांतून शिंद्याचें लष्कर घालवून लावण्याला मदत करतील, त्यांना लागणारे पैसे पुरविण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांतील अलाहाबाद, कानपुर, इटावा, वगैरे ठिकाणच्या कलेक्टरांना पत्रें पाठविण्यांत आलीं होतीं; व अशा लोकांकडून आलेल्या चेकचे पैसे ताबडतोब पटवून घ्यावे, असे त्यांना हुकूम सोडण्यांत आले होते !

या वेळीं इंग्लिशांचा दुसराही एक क्रम असा होता कीं, जो कोणी शिंद्याच्या मुलुखांतील इसम शिंद्याच्या विरुद्ध आहे, अशी त्यांना बातमी लागे, त्याच्याकडे जाऊन हे त्याला फितवीत असत आणि पैशाचा लांच देऊन ते त्याला शिंद्याच्या विरुद्ध उठवीत असत. याचें उदाहरण अंतर्वेदीमध्यें गुजर या जातीचे कोणी लोक रहात होते, त्यांच्या बाबतींत चांगलें दिसून येतें. साहराणपूरच्या जवळ हे लोक रहात असून त्यांचें शिंद्याशीं वैमनस्य आलेलें होतें. ही बातमी कळतांच लॉर्ड वेलस्ली हे त्यांना फोडण्याकरितां आणि

शिंद्याच्या विरुद्ध त्यांना उठविण्याकरितां ता. ३० जुलै १८०३ च्या एका गुप्त पत्रानें पुढीलप्रमाणें त्यांच्या बाबतींत कारस्थान करण्याविषयीं लॉर्ड लेक यांना लिहितात.

Your Excellency's prudence will dictate the expediency of employing the most efficatious measures for the purpose of conciliating the Goojurs and inducing them to unite with the British Government for the overthrow of Scindhia's power in the Dooab.

## शहाआलमच्या गळयाभोंवतीं इंग्लिशांचा विषारी विळखा.

( ५ ) शिंद्याचें सामर्थ्य चोंहोंकडून कमी करण्याकरितां इंग्लिशांनीं कसे प्रयत्न चालविले होते, याची कल्पना वर दिलेल्या त्यांच्या कारस्थानांच्या वर्णनावरून लक्षांत



शहाआलम.

येण्यासारखी आहे. असई, आरगांव, लासवारी, वगैरे ठिकाणच्या लढायांतून शिंद्याची फौज लढण्याकरितां उभी राहण्यापूर्वीच त्या फौजेचे हातपाय इंग्लिशांनीं आपल्या कपटांनीं आणि कारस्थानांनीं कसे तोडून ठेविले होते, हें यावरून दिसून येतें. फितुरीनें आगाऊ इतकी तयारी झालेली असल्यानंतर प्रत्यक्ष रणांगणावर एकाद्या सैन्याच्या विरुद्ध जय मिळविणें फारसें कठिण नाहीं, हें उघड आहे. पण इंग्लिशांनीं या आपल्या फंदफितुरीनें जरी शिंद्याच्या सैन्याचे हातपाय तोडून ठेविले होते, तरी अद्यापि शिंद्याच्या मुख्य मर्म-स्थानीं घाव घालण्याचें काम शिल्लक राहिलेलें होतें. व तेंही इंग्लिशांनीं सुरू केलें. महादजी शिंद्याचे वेळेपासून दिल्लीचा आंधळा झालेला बादशहा, शहाआलम, हा शिंद्याच्या ताब्यांत होता; व त्याची सर्व रीतीनें नीट व्यवस्था लावण्याचें आणि बरदास्त राखण्याचें काम शिंद्यानें आपला फ्रेंच सेनापति, एम्. पेरन, याच्याकडे सोंपविले होतें. आणि तें काम एम्. पेरन हाही मोठ्या दक्षतेनें बजावीत होता. पण जुन्या इतिहासप्रसिद्ध मोगल घराण्यांतील हिंदुस्थानचा बादशहा शहाआलम, हा शिंद्याच्या ताब्यांत आहे, या गोष्टीचें इंग्लिशांना मोठें वैषम्य वाटत होतें; व कसें तरी करून त्याला शिंद्याच्या हातून काढून आपल्या ताब्यामध्यें घ्यावें, अशी इंग्लिशांची इच्छा होती. व त्यासाठीं त्यांनीं आपलीं कारस्थानें सुरू केलीं. लॉर्ड वेलस्ली यांनीं शहाआलम याजकडे पाठविण्याकरितां एक पत्र तयार केलें; त्यांतील गोषवारा पुढीलप्रमाणें होता:—

" बादशहांच्या संबंधानें ब्रिटिश सरकारच्या मनामध्यें किती आदर आणि किती प्रेम वसत आहे, हें बादशहा शहाआलम यांना माहीतच आहे. शिंद्याच्या संरक्षणाखालीं रहाण्याचें आपण कबूल केलें, तेव्हांपासून आपल्याला जीं दुःखे आणि जे अपमान सोसावे लागत आहेत, त्याबद्दल कंपनी सरकारला नेहमीं वाईट वाटत आहे. परंतु शिंदे सरकारचा अन्याय, आधाशीपणा आणि अमानुषपणा, यांच्या जुलमी जाचांतून आपल्याला सोडवि-ण्याकरितां ब्रिटिश सरकारनें मध्यें पडावें, या कार्याला अद्यापपर्यंत सोईची अशी संधिच कधीं सापडली नाहीं, याबद्दल आम्हांला वाईट वाटतें. परंतु आपण ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखालीं येण्याला हल्लींची संधि फार चांगली आलेली आहे. आणि आपल्या राज-घराण्याच्या सेवेच्या कामीं मला जर माझ्या प्रेमाचा आणि आदराचा कांहीं उपयोग करून देतां आला, तर मी त्या योगानें आपल्याला धन्य समजेन! तेव्हां ब्रिटिश सरकार आपल्या संरक्षणाखालीं आपल्याला जो आश्रय देण्याला उत्सुक आहे, त्याचा आपण स्वीकार केला, तर आपला मानमरातब ब्रिटिश सरकारकडून फार उत्तम रीतीनें ठेविला जाईल, आणि आपल्या खर्चाबाबतचीही उत्तम प्रकारची व्यवस्था करण्यांत येईल. "

अशा मजकुराचें हें एक पत्र तयार करून लॉर्ड वेलस्ली यांनीं तें पत्र लगेच दिल्लीच्या बादशहाकडे परभारें न पाठवितां, तें त्यांनीं ज. लेक यांच्याकडे पाठविलें. व त्या पत्रा-संबंधानें त्यांनीं ता. २७ जुलै १८०३ रोजीं ज. लेक यांना असें लिहिलें कीं, " हें माझें पत्र अतिशय गुप्त रीतीनें आणि अतिशय काळजीपूर्वकपणानें तुम्हीं बादशहाकडे पाठवि-ण्याची तजवीज करावी. हें पत्र कोणा तरी खात्रीच्या मनुष्याबरोबरच पाठविले पाहिजे. असा आपल्या विश्वासांतील व ही बातमी बाहेर न फोडणारा असा खात्रीचा मनुष्य तुम्ही

कोण शोधून काढाल ? आपल्या रेसिडेंटचा एजंट म्हणून सय्यद रेझाखान हा इसम दिल्लीस दौलतराव शिंदे यांच्याकडे जाऊन राहिलेला आहे. तो आपल्या बाजूचा असल्यामुळें त्याच्यावर विश्वास ठेवण्याला हरकत नाहीं. तेव्हां तुम्हांला जर त्याची खात्री वाटत असेल, तर त्याच्या द्वारानें हें पत्र गुप्त रीतीनें शहाआलमकडे तुम्हीं पाठवावें, व दिल्लीकडे ज्या ज्या कांहीं गोष्टी घडून येतील, त्या त्या बद्दलची अगदीं बरोबर हकीकत नियमितपणानें लिहून कळविण्याविषयीं तुम्हीं सय्यद रेझाखान यास सांगावें. बादशहा आपल्या संरक्षणाखालीं येण्याला तयार झाला असतां त्याच्याशीं करारमदार काय करावयाचे, याच्याबद्दल आपण मागाहून विचार करूं. कारण हे करारमदार अगोदर पुरे करून घेतल्याशिवायही दिल्लीचा बादशहा आपल्या संरक्षणाखालीं येण्याला कबूल होईल, असा माझा अदमास आहे.

दिल्लीच्या बादशहाच्या दुःस्थितीबद्दल इंग्लिशांच्या पोटांत करुणेच्या आणि कळवळ्याच्या एकावर एक कशा कळा या वेळीं उठूं लागल्या होत्या, हें कपटानें आणि कारस्थानानें भरलेल्या वरील पत्रावरून लक्षांत येण्यासारखे आहे. पुढें दिल्लीच्या लढाईनंतर ता. १६ सप्टेंबर १८०३ रोजीं लॉर्ड लेक यांनी जेव्हां दिल्लीमध्ये प्रवेश केला, तेव्हां स्वाभाविकपणेंच शहाआलम बादशहा शिंद्याच्या ताब्यांतून इंग्लिशांच्या ताब्यांत गेला. तोंपर्यंत इंग्लिशांच्या भुलथापांना फसून शहाआलम बादशहा शिंद्याच्या लष्करांत फोडाफोडी करून इंग्लिशांना दिल्लीच्या लढाईंत जय मिळवून देण्याच्या कामांत गुंतलेला होता! पण या स्वदेशद्रोहाच्या पातकाबद्दलचें प्रायश्चित शहाआलमच्या वंशजांना पुढें भोगावें लागलें! आपण शिंद्याच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत केली, म्हणजे हे प्रामाणिक इंग्लिश लोक आपली हिंदुस्थानची बादशाही फिरून आपल्याला देतील, अशी शहाआलम बादशहाला खोटी आशा वाटत होती. पण इंग्लिशांच्या बाबतींत या खोट्या आशेने कोण कोण फसविले गेलेले नाहींत ? म्हैसूरच्या मूळच्या राजांना असेंच वाटत होतें कीं, आपण टिपूच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत केली, म्हणजे हे इंग्लिश लोक आपल्याला आपले राज्य प्रामाणिकपणानें परत देतील ! पण त्यांना अखेरीस काय मिळालें ? त्याच्या पाठीमागून हा शहाआलम बादशहा तशाच रीतीने फसून आणि इंग्लिशांवर विश्वासून दौलतराव शिंद्याच्या आणि स्वतःच्या राज्यमंदिरावर निखारा ठेवण्याला उद्युक्त झाला ! इतकीं मागची उदाहरणे होतीं, तरी आपल्या हिंदुस्थानांतील पुढील राजे फसावयाचे थांबले नाहींत ! बाजीरावसाहेबांच्या बाबतींत साताऱ्च्या महाराजांचेही या शहाआलमच्या सारखेच वर्तन झालें ! साताऱ्च्या महाराजांच्या जवळ बळवंत मल्हार चिटणीस या नांवाचें त्यांचे जे एक बाळाजीपंती वळणाचें सल्लागार होते, त्यांनीं त्यांना असें भासवून दिलें होतें कीं, तुम्ही पेशव्यांच्या विरुद्ध फितुरी करून इंग्लिशांना मिळालां, म्हणजे इंग्लिश लोक तुमची हिंदुपदपादशाही तुम्हांला परत देतील ! त्याप्रमाणें साताऱ्च्या प्रामाणिक महाराजांनीं प्रामाणिकपणानें अष्ट्याच्या लढाईमध्यें विश्वासघात करून पेशव्यांना सोडून ते इंग्लिशांच्या छावणींत जाऊन इंग्लिशांना मिळाले ! पण त्याचीं कडू फळें भोगावयाला त्यांना एका पिढीपेक्षां जास्त दिवसपर्यंत थांबावें लागलें नाहीं ! आणि शहाआलमच्या वंशजांचीही

तीच अवस्था झाली! इ. स. १८४८ मध्यें राजा राममोहनराय यांना आपल्या तर्फे विलायतेस पाठवून शहाआलमचे वंशज आपल्याजवळचे कररमदाराचे कागदपत्र पुढें करून जेव्हां आपल्या उत्पन्नाच्या पैशाकरितां ईस्ट इंडिया कंपनीपाशीं भांडू लागले, त्या वेळीं त्यांना कंपनीकडून काय उत्तर मिळालें? दिल्लीच्या लढाईनंतर लॉर्ड लेक यांनीं ता. २ डिसेंबर१८०३ रोजीं एक कररनामा लिहून दिलेला असल्याचें बादशहाचे तर्फेनें सांगण्यांत आलें. परंतु त्यावर कंपनीतर्फे असा जबाब देण्यांत आला कीं, हा कररनामा हिंदुस्थानसरकारच्या कागदपत्रांमध्यें कोठेंहि आढळून येत नाहीं! आणि त्याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं, असा कररनामा कधीं पुरा करण्यांत आला असेल, हें शक्यच दिसत नाहीं. कारण, ता. २३ मे १८०५ रोजीं मार्क्विस वेलस्ली यांनीं पाठविलेल्या एका खलित्यामध्यें असें स्पष्टपणें लिहिलेलें आहे कीं, दिल्लीच्या बादशहापाशीं कोणताही लेखी करार करण्यांत येऊं नये! ( That no written agreement should be entered into with the King of Delhi! ) या हकीकतीवरून सय्यद रेझाखान, ज. लेक आणि मार्क्विस वेलस्ली, या सगळ्यांनीं मिळून शहाआलमला शिंद्याच्या विरुद्ध आपल्या गरजेपुरतें कसें उठविलें आणि अखेरीस त्याच्या हातांत दिलेल्या एका पोकळ कररनाम्यानें त्याच्या तोंडाला त्यांनीं अखेरीस कशीं पानें पुसलीं, हें दिसून येण्यासारखें आहे. आजपर्यंत असल्या युक्त्यांनीं शेकडों उमीचंद फसले गेले असतील! तरी पण फिरून नवीन फसवून घेण्याची वेळ आली कीं, इंग्लिशांना फिरून नवीन उमीचंद भेटतातच! हें त्यांचें मोठें भाग्य, पण हिंदुस्थानचें अतिशय मोठें दुर्भाग्य आहे! हे हिंदुस्थान देशा! असे किती उमीचंद फसले, म्हणजे तुझे डोळे उघडणार आहेत? गोपीचंदाचे तीन पुतळे खाक झाल्यानंतर मत्स्येंद्रनाथाचाही राग नाहींसा झाला! पण हिंदुस्थानांतील शेंकडों उमीचंद आजपर्यंत फसले, तरी हिंदुस्थानांतील फितुरी अजून संपत नाहीं, ही किती खेदाची गोष्ट आहे!

## बेगम समरूचीं दोन पलटणें इंग्लिशांनीं फितुरीनें फोडलीं!

( ६ ) शहाआलमच्या नंतर इंग्लिशांनीं आपल्या कपटकारस्थानाच्या जाळ्यामध्यें जें एक नवीन शिकारीचें सावज गांठलें, त्याचें नांव बेगम समरू असें आहे. या बाईचें मूळचें नांव झेबुन्निसा बेगम असें आहे. ही मूळची मुसलमान जातीची असून तिनें पुढें एका युरोपिअन इसमाशीं लग्न लावून ख्रिस्ती धर्म स्वीकारिला होता. हा युरोपिअन इसम वर्णानें थोडा काळसर असल्यामुळें त्याच्याबरोबरीचे दुसरे फ्रेंच लोक त्याला Sombre (काळसर ) अशा नांवानें हाक मारीत असत. त्या ' सॉंबर ' या मूळ शब्दाचा अपभ्रंश होतां होतां तो 'समरू' या नांवापर्यंत येऊन पोहोंचला. तो सरदार मरण पावल्यानंतर त्याची बायको झेबुन्निसा ही आपल्या नवऱ्याचें सरदारकीचें काम पुढें चालवीत होती. व त्यामुळें तिला 'बेगम समरू' असें म्हणण्यांत येत असे. ती शूर होती व सुंदरही होती. ती घोड्यावर बसण्यांत चांगली पटाईत असून तिनें आपल्या हाताखालीं सैन्याच्या कांहीं पलटणीही ठेविल्या होत्या. दिल्लीजवळील सालढाणा या शिंद्याच्या मुलुखांत तिला जहागीर होती. व त्यामुळें तिच्या पलटणीपैकीं कांहीं पलटणी शिंद्याच्या सैन्यामध्यें असत. शिंद्याच्या लष्करांतील बाकीच्या सरदारांना

आणि जहागिरदारांना फोडण्याबद्दल इंग्रजांकडून प्रयत्न करण्यांत येत असल्याविषयींचा उल्लेख पूर्वीं करण्यांत आलेला आहे. त्याच धोरणाला अनुसरून इंग्लिशांनीं या बेगम समरू-



बेगम समरू.

लाही फितुर करण्याचे प्रयत्न चालविले होते. त्या प्रयत्नांत त्यांना यश येत चाललें असल्यामुळें मार्क्विस वेलस्ली यांनीं ता. २८ जुलै १८०३ रोजीं ज. लेक यांना लिहिलेल्या आपल्या गुप्त पत्रामध्यें असें कळविलें कीं, " ब्रिटिश सरकारच्या स्नेह संपादन करण्याविषयीं आणि त्यांच्या संरक्षणाचा फायदा मिळविण्याविषयीं बेगम समरू हिची खरोखरच उत्सुकता आहे, असें सिद्ध करून दाखविण्याकरितां पुरावा म्हणून तिच्याकडून तुम्हीं असें कबूल करवून घ्यावें कीं, दौलतराव शिंदे यांच्या लष्करामध्यें हल्लीं तिच्या ज्या पलटणी आहेत, त्या तिनें माघाऱ्या बोलवाव्या; आणि अंतर्वेदीमधील दुसरे सरदार आणि जमीनदार यांच्यावर तिचें जें वचन असेल, तें सगळें खर्च करून ब्रिटिश सरकारच्या छत्राखालीं त्यांनीं येण्याविषयीं तिनें त्यांचीं मनें वळवावींत !" (She should be required to recall her battalions now serving in the army of Dowlut Rao Scindhia and to employ whatever influence she may possess over the zemindars and chieftains in the Dooab, to induce them to place themselves under the authority of the British Government.) व मार्क्विस वेलस्ली यांच्या या सूचनेप्रमाणें आणि फितुरीप्रमाणें बेगम समरू हिचीं दोन पलटणें असईच्या लढाईंत ऐन वेळीं निघून गेलीं होतीं, असा संशय घेण्याला आधारही आहे. अशीं पलटणेंच्या पलटणें ज्या ठिकाणीं फितुर करण्यांत येत होतीं, आणि ऐन वेळीं रणांगणावरून नाहींशीं होत होतीं, त्या ठिकाणीं असईच्या रणांगणावर शिंद्याचा पराभव झाला आणि इंग्लिशांचा विजय झाला, तर यांत मराठी सैन्याचा बेहिम्मतपणा दिसून येत नसून इंग्लिशांचा कावेबाजपणाच मात्र पूर्णपणें निदर्शनास येतो !

## गोहदच्या राण्याला इंग्लिशांनीं दिलेला लांच.

( ७ ) शिंद्याच्या विरुद्ध फंदफितुरी उत्पन्न करण्याचा इंग्लिशांचा मार्ग अगदीं सोपा आणि सरळ असून तो ठराविक पद्धतीचा होता. शिंद्याच्या विरुद्ध त्याच्या मुलखांतील राजे, सरदार, जहागीरदार कोण कोण आहेत, ही बातमी गुप्त हेरांकडून पहिल्यानें काढवावयाची आणि नंतर मग त्याच्या विरुद्ध असलेल्या त्या त्या लोकांकडे शिंद्याच्या विरुद्ध कारस्थानें सुरू करावयाचीं आणि भरपूर आश्वासनें व मुबलक पैसे यांची लालूच दाखवून त्यांना शिंद्याच्या विरुद्ध उठवावयाचें, हा सगळ्या फितुरींतील इंग्रजांचा ठराविक कार्यक्रम होता. याच कार्यक्रमाच्या अनुरोधानें गोहदच्या राजाला इंग्लिशांनीं शिंद्याच्या विरुद्ध उठविण्याचा प्रयत्न सुरू केला. गोहदच्या राजाच्या अंमलाखालीं पुष्कळ जाट लोक होते; व त्याचा मुलूख यमुना नदीच्या कांठीं होता. या गोहदच्या राजाला दौलतराव शिंद्यानें जिंकून तेथें आपला अंमल बसविलेला होता; व शिंद्याचें कांहीं लष्करही त्याच्या मुलखामध्यें होतें. हें लष्कर गोहदच्या राजानें आपल्या मुलखांतून काढून टाकावें, आपल्या मुलखांतील जाट लोकांना त्यानें शिंद्याच्या विरुद्ध उठवावें, आणि अंतर्वेदीमध्यें इंग्लिशांचे राज्य स्थापित करण्याला मदत करावी, अशा कल्पना गोहदच्या राजापुढें इंग्लिशांकडून मांडण्यांत आल्या. व या कामीं राजाला लागतील ते पैसे देण्याचेंही इंग्लिशांनीं कबूल केलें. या गोष्टी इंडिया गव्हर्मेंटचे सेक्रेटरी, मि. एडमंडस्टन, यांनीं मि. मर्सर यांना तारीख २२ जुलै १८०३ रोजीं लिहिलेल्या अतिशय गुप्त ( Most Secret ) पत्रांतील पुढील मजकुरावरून स्पष्ट होत आहेत:—

If, upon more minute and local information of the state of the Ranah's circumstances and of the influence which he may possess amongst the Jaut tribes, you should be of opinion that he is inclined to co-operate with the British forces in the expulsion of the troops of Dowlut Rao Scindia from the country of Gohad and that an advance of money from the British Government might enable him to give useful support to the military operations of the British forces in that country, His Excellency directs me to authorize you to grant him such advance as you may deem immediately necessary for the purpose of enabling him to collect his adherents, which is not to exceed the amount of Rupees, 100,000 without receiving the further authority of His Excellency in Council."

गोहदच्या राण्याला फोडण्याकरितां त्याच्या खर्चाच्या नांवाखालीं म्हणून इंग्लिश लोक त्याला प्रथमतः एक लाख रुपये लांच देण्याला तयार झाले होते, ही गोष्ट या पत्रा-

वरून स्पष्ट होते. असईच्या लढाईंत इंग्लिशांनीं शिंद्याचा पराजय केला, एवढें मात्र शाळें- तल्या मुलांना हिंदुस्थानचा इतिहास शिकवितेवेळीं शिकविण्यांत येतें. पण त्याच्या आधीं इंग्लिशांनीं त्यासाठीं काय काय नीचपणाचीं कारस्थानें केलीं होतीं, हें कोण सांगतो ? आणि हें कोणाला माहीत आहे ?

## बुंदेलखंडांतील हिंमतबहाद्दर आणि फितुरीच्या कामांत त्यानें दाखविलेली हिंमतबहादुरी !

( ८ ) लॉर्ड वेलस्ली यांनीं या वेळीं बुंदेलखंडचें राज्य आपल्या ताब्यांत आणण्याकरितां आणि बुंदेलखंडचा शिंद्याच्या विरुद्ध उपयोग करण्याकरितां तेथेंही फितुरी करण्याचा प्रयत्न चालविला होता. व हिंदुस्थानच्या दुर्दैवानें तेथेंही हिंमतबहाद्दर ह्या नांवाचा एक अधम आणि विश्वासघातकी सरदार इंग्लिशांना फितुर होणारा असा निघाला! अशासारख्या लोकांची हिंमत आणि बहादुरी ही आपल्या जन्मभूमीच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणाच्या कामीं उपयोगी न पडतां आपला बुंदेलखंडचा मुलूख इंग्लिशांच्या घशांत घालण्याकरितां यांची हिंमत आणि यांची बहादुरी इतकी उतावीळ व्हावी, हें पाहून कोणालाहि खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. मि. एडमंडस्टन यांच्या ज्या अतिशय गुप्त ( most secret ) पत्राचा वर उल्लेख केला आहे, त्याच पत्रामध्यें बुंदेलखंडांतील हिंमतबहाद्दर याच्या विश्वासघाताबद्दल पुढीलप्रमाणें पुरावा आढळतो.

During the progress of the negotiation, you will be enabled to ascertain, more precisely than has hitherto been done, the means which Himmut Bahadur may possess of effectually supporting the interests of the British Government in the province, and will accordingly be enabled to submit to His Excellency the claims which he may possess to a recompense from the Government for his co-operation.

तेव्हां देखील हिंमतबहाद्दरासारख्या फितुरी लोकांचें कोऑपरेशन मिळविण्याकरितां इंग्लिश लोक कसे धडपडत होते आणि त्यांना चोरटेपणानें लांचाचे पैसे कसे चारीत होते हें येथें कोणाच्याही चांगलें लक्ष्यांत येण्यासारखें आहे. आपल्या देशाच्या आणि आपल्या देशबांधवांच्या विरुद्ध फितुरी करणाऱ्या लोकांची ही यादी जरी बरीच लांबत चाललेली आहे, तरी त्यांचीं नांवें अद्यापि संपत आलेलीं नाहींत, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे ! कार्थेजच्या इतिहासामध्यें असें एक उदाहरण आहे कीं, तेथील कांहीं लोकांनीं आपल्या देशाच्या विरुद्ध फितुरी करून आपल्या देशाच्या शत्रूला मदत केली होती. हिंदुस्थानांतल्याप्रमाणें त्या देशांत त्या वेळीं फितुरी करणारे निमकहराम लोक फार निघत नव्हते. त्यांची संख्या फक्त सातच होती. त्यांचीं नांवें बाहेर फुटल्याबरोबर त्यांना पकडून आणण्यांत आलें आणि हे निमकहराम लोक कोण आहेत आणि आपल्या देशाच्या विरुद्ध असा

निमकहरामपणा केला तर त्यांना काय शासन देणें योग्य आहे हें सर्व लोकांना कळविण्याकरितां एका सार्वजनिक ठिकाणीं सात खांबांवर या सात स्वदेशद्रोही लोकांच्या अंगाला खिळे ठोकून उभें करून ठेवण्यांत आलें होतें. त्यांना पाहण्याकरितां देशांतील सर्व आबालवृद्ध लोक येऊं लागले; आणि " या अधमांनीं आपल्या देशाशीं निमकहरामपणा केला! यांनीं आपली जन्मभूमि आपल्या शत्रूला विकण्याचा प्रयत्न केला!" असें म्हणून ते सगळे येणारेजाणारे लोक त्यांच्या तोंडावर थुंकूं लागले; आणि कित्येकांनीं आपल्या भाल्यांचीं टोकें त्यांच्या शरीरांत खुपसलीं आणि कित्येकांनीं दगड मारून त्यांना जर्जर केलें! पूर्वीं जेव्हां अथेन्स, स्पार्टा, कार्थेज, वगैरे सारखीं लहानलहान स्वतंत्र आणि स्वाभिमानी संस्थानें असत, त्या वेळीं आपल्या संस्थानाच्या स्वातंत्र्याच्या बाबतींत जे कोणी फितुरी करतील, त्यांना अशा प्रकारचीं शासनें होत असत. पण ते दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांतून आजकाल पार निघून गेलेले आहेत. उलट येथील परिस्थिति याच्याहून अगदीं विपरीत होऊन गेलेली आहे. सतीच्या घरीं बर्ताहि मिळण्याची मारामार असून शिंदळीच्या घरीं हत्ती झुलत आहेत, अशी अलीकडे येथें स्थिति झालेली आहे! व हरामखोरपणाची किंमत अलीकडच्या बाजारांत इतकी मोठी वाढलेली आहे कीं, जो आपल्या देशाच्या विरुद्ध फितुरी करील, त्याला शासन होण्याची गोष्ट तर लांबच राहिली, पण अलीकडे जे कित्येक थोर, कर्ते, श्रीमंत, शहाणे, मुत्सद्दी आणि लोकहितप्रवर्तक म्हणून पदव्यांनीं आणि मानमरातबांनीं सर्व लोकांच्यापेक्षां जास्त वैभवाला चढविले गेलेले दिसत असतील, त्यांच्या श्रीमंतीच्या आणि मोठेपणाच्या मुळाशीं फितुरीचें, स्वदेशद्रोहाचें आणि विश्वासघाताचें कांहीं तरी घाणेरडें खत घातलेलें असले पाहिजे, असें बिनचूक अनुमान काढण्याला फारशी हरकत पडणार नाहीं! इतकी हल्लीं स्वदेशभक्ति आणि स्वदेशद्रोह यांच्या दरम्यानच्या जागांची अदलाबदल झालेली आहे! तरी पण आपला देश आपल्याला ऊर्जितावस्थेला आणावयाचा असेल, तर आपल्या देशांतील हा फितुरीचा चोरटा व्यापार आपण बंद पाडला पाहिजे. हत्यारांचा चोरटा व्यापार, अफूची चोरटी देवघेव, कोकेनचा चोरीचा माल, हे सगळे चोरीचे धंदे ब्रिटिश सरकारच्या राज्यांत बंद होणें शक्य आहे; पण हा फितुरीचा चोरटा धंदा इंग्लिश सरकारला कधींहि बंद करतां यावयाचा नाहीं. त्यांचीं लढाऊ क्रूझरें हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर टेहळणी करीत रात्रंदिवस फिरत राहतील. आणि त्यांचे क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंटचे सगळे गुप्त हेर डोळ्यांत तेल घालून देशाच्या अंतर्व्यवस्थेंतील बारीकसारीक सर्व गुन्हे पकडीत बसतील; पण हिंदुस्थान देशाच्या विरुद्ध हिंदुस्थानांतील लोकांनीं केलेले फितुरीचे गुन्हे पकडणें हें सगळ्या ब्रिटिश डिटेक्टिव्ह डिपार्टमेंटच्या कौशल्याच्या पलीकडचें काम आहे! तें काम फक्त आपलें आपल्याच करतां येण्यासारखें आहे, आणि तें आपलें आपणच केलें पाहिजे. या धंद्यांतील चोर आपणच हुडकून काढले पाहिजेत. आणि त्यांना पकडून लोकनिंदेच्या न्यायासनासमोर आपणच उभे केले पाहिजे. हे लोक कसे ओळखावे, हे लोक कसला पोशाख करतात, हे लोक कोठें रहातात, हे लोक कसली भाषा बोलतात, हे लोक कसे फितुर होतात, आणि आपल्या देशाच्या विरुद्ध काय काय कामें करून आपल्या देशाचें स्वातंत्र्य सभ्य आणि गोंडस

अशा कांहीं तरी दिखाऊ सद्गुणांच्या नांवाखालीं अशक्य करून सोडतात, याच्याबद्दल प्रत्यक्ष वर्णनें देणें किंवा त्यांच्या साक्षात् खुणा सांगणें हें फार कठिण आहे. तूं फितुर झालेला आहेस, असें म्हणून कोणाचाहि प्रत्यक्ष हात धरणें या काळांत शक्य नाहीं. कारण या फितुरीच्या धंद्यांतील हे चोर प्रत्यक्ष चोरी करीत असतांना सांपडणें फार कठिण आहे. तेव्हां जेथें प्रत्यक्ष प्रमाण काम करूं शकत नाहीं, तेथें आपण अनुमानाच्या दुर्बिणींतूनच हे दुरून चमकणारे देदिप्यमान फितुरी तारे ओळखिले पाहिजेत. आणि अशीं अनुमानें करण्याला अगदीं सोपें साधन म्हटलें, म्हणजे तें हेंच होय कीं, या फितुरी लोकांनीं पूर्वींच्या इतिहासांत जशा फितुऱ्या केल्या असतील, तशाच ते हल्लींच्याही इतिहासांत करीत असले पाहिजेत! आणि म्हणूनच या दृष्टीनें पूर्वींच्या फितुरी लोकांचे इतिहास हल्लींच्या काळीं आपल्याला किती उपयोगाचे आणि महत्त्वाचे आहेत, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. आणि म्हणूनच मार्क्विस वेलस्ली यांनीं दौलतराव शिंदे यांच्या भोंवतालीं कसे फितुरी लोक निर्माण केले होते, याचें आम्ही येथें इतक्या विस्तारानें वर्णन करीत आहों. मार्क्विस वेलस्ली आणि दौलतराव शिंदे हीं प्रस्तुतच्या कथानकांतलीं नांवें काढून त्यांच्या जागीं मागील, चालू, किंवा पुढील राजकारणाच्या नाटकांतील निरनिराळ्या पात्रांचीं नांवें घातलीं, म्हणजे तें गुप्त फितुरीचें नाटक कसें चाललेले असेल, याचें प्रत्यक्ष चित्र कोणालाही आपल्या दृष्टीसमोर उभें करतां येण्यासारखें आहे!


## इंग्लिशांना फितुर होणारे वेडबंबुखान!

(९) अशा या फितुरीच्या नाटकांत मार्क्विस वेलस्ली यांच्या हातीं बुंदेलखंडांतील हिम्मतबहाद्दरांच्या पाठीमागून जें एक नवीन पात्र लागलें, त्यांचें नांव बंबुखान असें होतें! हा बंबुखान दौलतराव शिंदे याचा अतिशय द्वेष करीत असे; त्यामुळें मार्क्विस वेलस्ली आणि बंबुखान यांचें नातें जमलें, हें सहाजिकच झालें. गुलाम महमदखान या नांवाचा एक रोहिला सरदार शिंद्याच्या पदरीं उत्तरहिंदुस्थानांत होता; व त्याला शिंद्यानें यावेळीं कांहीं पत्रे लिहिलीं होतीं. त्या पत्रांच्या या बंबुखानानें चोरून नकला करून घेतल्या; व त्या नकला मुरादाबादचे कलेक्टर, मि. लिस्टर, यांच्याकडे त्यानें पाठविल्या; व अशा रीतीनें पुढें त्या नकला मार्क्विस वेलस्ली यांच्यापर्यंत जाऊन पोंचल्या! हीं मूळ अस्सल पत्रें नसून त्या निव्वळ नकला होत्या, ही गोष्ट तर स्पष्टच आहे. पण त्या नकला खऱ्या होत्या, असें क्षणभर मानलें, तरी दौलतराव शिंद्यानें आपला सरदार गुलाम महमदखान याला त्यांत काय लिहिलें होतें? शिंद्यानें आपलें सैन्य तयारींत ठेवण्याविषयीं त्यांत लिहिलें असलें, तर त्यांत काय गुन्हा झाला? इंग्लिशांनीं तेवढी बऱ्यावाईट आणि खऱ्याखोट्या रीतीनें आपली तयारी करावी आणि दौलतराव शिंद्यानें मात्र स्वस्थ बसावें, हा कोठला न्याय! तरी पण दौलतराव शिंद्याच्या पत्रांच्या नकला मुद्दाम करून त्या इतक्या अगत्यानें लिस्टर साहेबाकडे पाठविणारा एखादा बंबुखान–नव्हे एखादा वेडबंबुखान–भेटला, तर असल्या सत्यनिष्ठ आणि स्वामिनिष्ठ अशा मौल्यवान् सद्गृहस्थाचा अव्हेर इंग्लिशांनीं कसा करावयाचा? लागलीच मार्क्विस वेलस्ली यांनीं २२ आगष्ट १८०३ रोजीं ज. लेक यांना एक गुप्त पत्र लिहून या

बंबुखानाबद्दलची हकीकत कळविली, व आणखी असें लिहिलें कीं, सार्वजनिक हिताकरितां असले लोक आपल्या संग्रहीं असणें जरूर आहे ! ( It will be obvious to your Excellency that the public service may be essentially promoted by securing the attachment and exertions of Bumboo Khan in the present crisis of our affairs. ) शिवाय बंबुखान हा गुलाम महमंदखान याला पकडून आपल्या हातांत देत असेल, किंवा गुलाम महंमद हा आपल्या हाताखालील फौजेनिशीं ज. पेरन याच्या सैन्याला जाऊन मिळण्याच्या विचारांत जो आहे, त्याला कांहीं युक्तीनें बंबुखान हा जर प्रतिबंध करूं शकत असेल, तर तुम्हांला योग्य वाटेल तें बक्षीस तुम्हीं त्याला देऊं करावें ! ( If your Excellency should be of opinion that the offer of a pecuniary reward is calculated to stimulate the exertions of Bumboo Khan for the accomplishment of either of those purposes, your Excellency is at liberty to convey to him the offer of such a reward to any extent which your Excellency may deem proper. ) दुसऱ्यांच्या पत्रांच्या चोरून खऱ्याखोट्या नकला कराव्या, त्या कलेक्टराकडे पाठवाव्या, व आपल्या देशांतील लोकांना पकडून इंग्लिशांचे ताब्यांत द्यावें, असलीं देशद्रोहाचीं कामें करावीं, आणि इंग्लिशांच्यापासून आपलें पोट जाळण्याकरितां बक्षिसें मिळवावीं, अशी त्या वेळची स्थिति होती ! आणि असलीं विश्वासघाताचीं आणि हरामखोरीचीं कामें करण्याकरितां बंबुखानासारखे वेडबंबुखान पुढें येत असत, ही हिंदुस्थान देशाला अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे ! हे आर्यावर्ता, तुझ्यामध्यें जोंपर्यंत असले स्वदेशद्रोही आणि विश्वासघातकी लोक आहेत, तोंपर्यंत तूं स्वातंत्र्याची आशा कशाला धरावीस !

## शीख लोकांना इंग्लिशांनीं दिलेली फितुरीची शिकवण.

( १० ) दौलतराव शिंद्याचें राज्य उत्तरेकडे आणि वायव्येकडे त्या वेळीं इतकें पसरलें होतें कीं, तें जवळ जवळ शीख लोकांचा राजा रणजितसिंग याच्या सरहद्दीपर्यंत जाऊन भिडलेलें होतें. तेव्हां रणजितसिंगाची आणि त्याच्या शीख लोकांची कदाचित् दौलतराव शिंद्याला मदत मिळेल,म्हणून त्याच्याकडेही मार्क्विस वेलस्ली यांनीं संधान बांधण्याला सुरवात केली. दौलतराव शिंद्याचे पदरीं इंग्लिशांचा जो रेसिडेंट होता, त्याच्या मार्फतीनें पूर्वी एक एजन्ट शीख लोकांकडे पाठविण्यांत आलेला होता. त्याच्याच बरोबर फिरून शीख लोकांकडे वेळ प्रसंग पडेल त्याप्रमाणें पाठविण्याकरितां मार्क्विस वेलस्ली यांनीं ज. लेक यांच्याकडे कांहीं पत्रें तयार करून धाडलीं होतीं. शीख लोकांनीं इंग्लिशांना मदत करावी, निदान त्यांनीं मराठ्यांना तरी मदत करूं नये, आणि त्यांनीं इतकें कार्य केलें तर त्यांना ब्रिटिश संरक्षणाखालीं घेण्यांत येईल आणि त्यांच्याकडून खंडणी घेण्यांत येणार नाहीं, अशा अटी त्या पत्रांतून सुचविलेल्या होत्या. व दुसरें कांहीं झालें नाहीं, तर निदान शीख लोकांनीं या वेळीं तटस्थ




असईच्या लढाईच्या वेळची परिस्थिति दाखविणारा हिंदुस्थानचा नकाशा.

रहावें, अशीही त्यांना विनंति करण्यांत आली होती. त्याप्रमाणें शीख लोक तटस्थ राहिले. पण शीख लोक त्या वेळीं तटस्थ राहिले, म्हणून इंग्रजी वाघांच्या जबड्यांतून पुढें त्यांचीं राज्यें बचावलीं, असें मात्र झालें नाहीं! सर्वांना एकच अनुभव! आणि या फितुरीच्या पातकाबद्दल सर्वांना एकच प्रायश्चित! पण ही गोष्ट इतकी ढळढळीत असूनही ती त्या वेळीं कोणाला दिसली नाहीं आणि अजूनही ती कोणाला दिसत नाहीं! हें आश्चर्य नव्हे काय?

## भडोचकडील भिल्ल लोकांतही फितुरीची सांथ.

( ११ ) शिंद्याला चोहोंकडून वेढतां यावें म्हणून इंग्लिशांनीं या वेळीं आपल्या बाजूनें आपल्या कारस्थानाची अगदीं कमाल करून सोडली होती. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याच्या बाजूला गुजराथेमध्यें भडोच वगैरे जे कांहीं प्रांत शिंद्याच्या ताब्यांत होते, तिकडून त्याला मदत मिळूं नये, आणि तेथेंही त्याला स्वस्थता राखतां येऊं नये, यासाठीं गुजराथेमध्यें इंग्लिशांकडून एक सैन्य पाठविण्यांत आलें होतें. त्या सैन्याला मदत करण्याला बडोद्याचे गायकवाड फारसे खुषी नव्हते; तरी पण त्यांच्या इच्छेविरुद्धही इंग्लिशांनीं आपल्या सैन्याचा त्यांच्या राज्यांत तळ देऊन भडोचकडील मुलूख तेथील भिल्ल लोकांना फितुर करून काबीज केला.

त्याचप्रमाणें शिंदे आणि भोसले हे एकत्र होऊन इंग्लिशांच्या विरुद्ध लढणार असा संभव दिसत असल्यामुळें शिंद्याच्याप्रमाणें भोसल्याचेहि हातपाय तोडण्याच्या कामाकडे इंग्लिशांनीं पूर्ण लक्ष दिलें होतें. भोसल्याच्या सरहद्दीवरील पूर्वेकडील बरेच प्रांत इंग्लिशांनीं आपल्याकडे या वेळीं जिंकून घेतले. बलसोर, कटक, ओरिसा, हे प्रांत इंग्लिशांनीं युक्ति-प्रयुक्तीनें आणि कारस्थानानें काबीज करून घेतल्यामुळें भोसल्याच्या सामर्थ्यावर या गोष्टीचा त्या वेळीं पुष्कळ परिणाम झालेला होता.

वर दिलेली हकीकत लक्षांत घेऊन आपण हिंदुस्थानच्या नकाशाकडे पाहिलें, तर इंग्लिशांनीं शिंदे आणि भोसले यांना अंतःस्थ रीतीनेंच फक्त चोहों बाजूंनीं ग्रासलें होतें, असें नसून बाह्य दृष्टीनेंही त्यांनीं शिंदे आणि भोसले यांना चारी दिशांनीं वेढून टाकिलें होतें. दक्षिणच्या बाजूला पुणें, म्हैसूर आणि हैदराबाद हीं संस्थानें इंग्लिशांच्या सत्तेखालीं आलेलीं असल्यामुळें दक्षिणची बाजू पूर्णपणें बंद झालेली होती. त्याचप्रमाणें ओरिसा, कटक, बलसोर, वगैरे ठिकाणें नवीन घेतलेलीं असल्यामुळें आणि बंगालचा मुलूख तर पूर्वीच इंग्लिशांकडे असल्यामुळें पूर्वेच्या भिंतीलाही कोठें फट राहिलेली नव्हती. त्यानंतर उत्तरे-कडे आपण पाहूं लागलों, तर गंगा आणि यमुना यांच्यामधील अंतर्वेदी, बुंदेलखंड, शीख लोकांचीं संस्थानें, होळकरचा मुलूख वगैरेही सगळे उत्तरेकडील प्रांत इंग्लिशांनीं आपल्या कारस्थानाच्या मंत्रानें भारून टाकलेले होते. आणि पश्चिमेकडे गायकवाडचा मुलूख, सुरत, भडोच, वगैरे ठिकाणेंही व्यापलीं गेलेलीं असल्यामुळें तिकडूनही आशेचा किरण येण्याला जागा नव्हती. अशा रीतीनें शिंदे आणि भोसले हे या वेळीं चारी दिशांनीं कोंडले गेलेले होते!

येथपर्यंत वर दिलेल्या इंग्रजी फितुरीच्या अकरा उदाहरणांच्या स्वरूपानें इंग्रज लोकांनीं आपल्या स्वयंभू कपटदेवतेच्या पिंठीवर या अकरा विश्वासघातांची जी एकादष्णी

चालविली होती, तिच्या आवर्तनापासून त्यांना कशी फलप्राप्ति झाली, हें पुढें लवकरच दिसून येईल.

असईच्या लढाईच्या पूर्वी इंग्लिशांनीं करून ठेवलेल्या फितुरीचीं वर्णनें जीं वर सांगितलीं आहेत, तीं तेवढींच आहेत म्हणून तीं तेथें संपविण्यांत आलीं, असें कोणी समजण्याचें कारण नाहीं ! इंग्लिश मुत्सद्दयांचीं डोकीं हिंदुस्थानांत फितुरी उत्पन्न करण्याच्या बाबतींत इतकीं सुपीक आहेत कीं, त्यांच्या फितुरीपैकीं ज्या उघडकीस आलेल्या आहेत, त्यांचेंही वर्णन इतक्या थोडक्यांत संपणें शक्य नाहीं ! येथपर्यंत जीं फितुरीचीं उदाहरणें देण्यांत आलेलीं आहेत, तीं अगदीं ठळक आणि सामान्य स्वरूपाचीं म्हणून निवडून देण्यांत आलीं आहेत. परंतु किरकोळ आणि वैयक्तिक स्वरूपाचीं अशीं या वेळचीं अजूनही कित्येक उदाहरणें शिल्लक आहेत. आणि त्यांचा परिस्फोट या कथानकांत पुढें योग्य त्या ठिकाणीं योग्य अशा निंदाव्यंजक शब्दांनीं यथास्थित रीतीनें करण्यांत येईल. आपल्या देशाचे जुने इतिहास हे सगळयांना माहीतच आहेत. ते जुने इतिहास आज फिरून वाचावयाचे असतील, तर त्यांतून आपल्याला नवीन कांहीं शिकतां आलें, तरच ते वाचण्यापासून कांहीं फायदा; नाहीं तर असईच्या लढाईंत इंग्लिशांचा जय झाला, हें शाळेंतून शिकून बाहेर पडलेल्या प्रत्येक मुलानें घोकलेलेंच आहे ! पण त्या लढाईंत आपल्या लोकांचें काय चुकलें आणि इंग्लिशांनीं काय काय अंतःस्थ कारस्थानें केल्यामुळें त्यांना जय मिळाला, या गोष्टींचें बारकाईनें अध्ययन करून जुन्या इतिहासावरून आपल्या भावी इतिहासावर सुयशस्कर असे परिणाम घडवून आणण्याकरितां आपण हे इतिहास नव्या आणि निराळ्या दृष्टीनें वाचले पाहिजेत.

इंग्लिशांनीं वसईस बाजीरावाच्यापाशीं वसईचा जो तह केला, त्याचा उल्लेख पूर्वी करण्यांत आलेला आहे. तहांनीं वास्तविक पाहिलें असता लढाया मिटविल्या पाहिजेत; पण वसईचा दुर्दैवी तह असा होता कीं, त्यानें लढाया मिटविण्याच्या ऐवजीं उलट जास्तच लढाया पेटविल्या ! त्या तहाच्या योगानें फक्त असईचीच लढाई उत्पन्न केली, असें नसून असई, आरगांव, अलीगड, दिल्ली, लासवारी, दीग, भरतपूर, वगैरे अनेक ठिकाणीं या वसईच्या तहानें लढाईच्या ज्वाळा भडकवून दिल्या ! हा वसईचा तह इ. स. १८०२ च्या अखेरीस झाला खरा; परंतु त्यानें पेटविलेली आग पुढें दोन तीन वर्षेपर्यंत एकसारखी जळत होती ! तसेंच हा वसईचा तह वसईसारख्या समुद्रकांठच्या एका लहानशा गांवात झाला खरा; पण त्याच्यामुळें उत्पन्न झालेल्या धरणीकंपाचे धक्के हिंदुस्तानच्या बहुतेक भागांतून बसल्यावांचून राहिले नाहींत ! या वसईच्या तहाच्या सुरुंगानें मराठा कॉन्फिडरसीची भव्य इमारत कोसळून पडली; आणि त्याच पायावर इंग्लिशांनीं आपल्या राज्याची इमारत उभारण्याला सुरवात केली ! इतक्या या सगळया अनिष्ट गोष्टींचें खापर जरी या वसईच्या तहाच्या डोक्यावर फोडणें जरूर आहे, तरी हा बिचारा वसईचा तह केवळ निमित्ताला कारण झाला, असेंही म्हणण्याला हरकत नाहीं. कारण, वसईच्या तहाच्या पूर्वीपासून इंग्लिशांनीं आपले हे सगळे डाव रचून ठेवलेले होते; व ते केवळ कोणत्या तरी एकाद्या योग्य संधीची वाट पहात बसलेले होते. टिपू आणि निजाम या दोघांची राजसत्ता आपल्या हाताखालीं घालून झाल्यानंतर इंग्लिशांच्या राज्यतृष्णेची

वक्र आणि वखवखलेली दृष्टि मराठ्यांच्या साम्राज्याकडे वळलेली होती. परंतु नानाफडणवसि जिवंत होते, तोंपर्यंत त्यांचें कांहीं चाललें नाहीं. परंतु नानांच्या मृत्यूनंतर एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून इंग्लिशांना पाहिजे होती तशी परिस्थिति पुण्याच्या दरबारामध्यें उत्पन्न होऊं लागली. व त्यामुळें इंग्लिशांना पेशव्यांच्या कारभारांत हात घालण्याला संधि सांपडली. वसईचा तह झाल्यावर बाजीरावसाहेबांना फिरून पुण्याच्या गादीवर आणून बसवावयाचें या निमित्तानें इंग्लिशांनीं आपल्या मोठमोठाल्या फौजा मराठ्यांच्या राज्यांत आणण्याला सुरवात केली. निजामाच्या सरहद्दीवर कर्नल स्टीव्हिनसन याच्या हाताखालीं मार्क्विस वेलस्ली यांच्या हुकमावरून एक मोठें लष्कर जय्यत तयार करून ठेवण्यांत आलेलें होतें; व म्हैसूरच्या सरहद्दीवर हरिहर या ठिकाणीं खुद्द जनरल वेलस्ली यांच्या हाताखालीं जमा झालेलें इंग्लिश सैन्य आपल्याला पुण्याला जाण्याला केव्हां हुकूम मिळतो, याची वाट पहात बसलेलें होतें. त्याप्रमाणें अखेरीस पेशव्याला पुण्याच्या गादीवर बसविण्याचें निमित्त उत्पन्न झाल्याबरोबर या दोन्ही सैन्यांना पुण्याकडे चाल करून येण्याचे हुकूम सुटले. व त्याप्रमाणें हैद्राबादेहून निघालेलें कर्नल स्टीव्हिनसन यांच्या हाताखालील सैन्य आणि हरिहरहून निघालेलें जनरल वेलस्ली यांच्या हाताखालील सैन्य या दोन सैन्यांची गांठ ता. १५ एप्रिल १८०३ रोजीं सोलापूर जिल्ह्यांतील अकलूज ह्या ठिकाणीं पडली. नंतर तीं दोन्हीं सैन्यें कांहीं दिवसांनीं पुण्यांत येऊन पोहोंचलीं; व त्यांनीं मे महिन्यामध्यें बाजीरावाला गादीवर बसविण्याचा देखावा करून दाखविला.

हीं एवढीं मोठीं परकीय सैन्यें पेशव्यांनीं आपल्या राज्यांत येऊं दिलीं, ही मोठी चूक केली. बाजीरावाला गादीवर बसविण्याकरितां एवढ्या मोठ्या प्रचंड सैन्याची मुळींच आवश्यकता नव्हती. बाजीरावसाहेब पुण्यांतील आपल्या स्वतःच्या गादीवर बसण्याकरितां आले, तर त्यांना अडविण्याकरितां कोण पुढें येणार होतें ? दौलतराव शिंदे हा तर पूर्वीच हिंदुस्थानांत निघून गेलेला होता. आणि इंग्लिश लोक बाजीरावाला पुण्याच्या गादीवर बसविण्याकरितां घेऊन येत आहेत, ही बातमी ऐकल्याबरोबर यशवंतराव होळकर हाही पुण्यांतून निघून चांदोरच्या मुक्कामाकडे चालता झाला होता. त्याचप्रमाणें यशवंतराव होळकर यांनीं तात्पुरते पेशव्यांच्या गादीवर बसविलेले अमृतराव यांचाही बाजीरावाला विरोध करण्याचा विचार नसून तेही यशवंतराव होळकराच्या पाठोपाठच जुन्नरला निघून गेले होते. अमृतराव पेशवे हें पुणें शहर जाळून टाकणार आहेत, अशी एक या वेळीं बातमी उठविण्यांत आलेली होती. पण ही बातमी अगदीं खोटी होती. व इंग्लिशांना फितुर झालेल्या कोणा तरी लोकाकडून ही बातमी मुद्दाम उठविण्यांत आलेली असली पाहिजे. कारण, अमृतराव हे काय म्हणून पुणें जाळतील ? ते या पेशवाईच्या पदासाठीं केव्हांच फारसे उत्सुक नव्हते. व त्यांना जर पुणें जाळावयाचेंच होतें, तर मग त्यांनीं तें कां जाळलें नाहीं ? अमृतराव पुणें जाळणार, ही अशा रीतीनें उठविलेली खोटी बातमी पुण्याचे रेसिडेंट, कर्नल क्लोज, यांनीं ज. वेलस्ली यांना कळविली. व त्यानें ताबडतोब पुण्याला यावें यासाठीं त्यांना त्यानें हें एक निमित्त उत्पन्न करून दिलें. याच्याशिवाय या बातमीमध्यें दुसरें कांहीच तथ्य नव्हतें. आणि अखेरीस दरकूच दरमजल करीत ज. वेलस्ली हे ता. २०

एप्रिल रोजीं जेव्हां पुण्यांत येऊन पोहोंचले, तेव्हां पुण्यांत कोठेंही आग लागलेली नव्हती ! किंवा कोणतेही वाडे सत्वर येऊन विझविण्याचें काम ज. वेलस्ली यांना करावें लागलें नाहीं ! पण इंग्लिशांना पुण्यांत येण्याला तडकाफडकीचें कांहीं तरी एक जें निमित्त पाहिजे होतें, तें मात्र या आगीच्या सबबीनें त्यांना मिळालें ! व या निमित्तानें इंग्लिशांचे सैन्य पुण्यांत घुसलें ! पुण्यांत बाजीरावाला गादीवर बसविण्याकरितां किती सैन्याची जरूरी आहे, हें बाजीरावसाहेबांनीं बरोबर अंदाजानें ठरवून तितकेंच सैन्य इंग्लिशांनीं पुण्यांत आणावें, अशी अट त्यांनीं घालावयास पाहिजे होती. परंतु अशोकवनातील एका पडलेल्या फळाची आज्ञा मिळाल्याबरोबर मारुतीनें जशी सगळी लंका हालवून सोडली, त्याप्रमाणें बाजीरावसाहेबांना गादीवर बसविण्याकरितां पुण्यांत जरूरीपुरतें कांही थोडेसें सैन्य आणण्याची संधि मिळाल्याबरोबर त्या निमिताच्या पांघरुणाखालीं इंग्लिशांनीं निजामच्या आणि म्हैसूरच्या मुलखातील आपलें बहुतेक सारें लष्कर पुण्यांत आणून भरले. पण इतक्या मोठ्या सैन्याची बाजीरावाला गादीवर बसविण्यासाठीं पुण्याच्या मुलखांत आवश्यकता होती कोणती ? सारांश, पेशव्यांना गादीवर बसविण्याचे हें बाह्यात्कारी ढोंग दाखवून खरोखर मराठा कॉन्फिडरसीची जूट मोडून टाकावयाची, हाच इतके सैन्य आणण्यांत इंग्लिशांचा हेतु होता, हें उघड होत आहे.

ज. वेलस्ली हे हरिहरहून पुण्यास येण्याकरितां निघाले, त्या वेळीं पेशव्यांच्या मुलखांतून जाताना कदाचित् कोणी आपल्याला अडथळा करतील, अशी त्याना भीति वाटत होती. व त्यासाठीं त्यानी कांहीं युक्त्याही योजिलेल्या होत्या. ज वेलस्ली यांच्या हाताखालील सैन्य जवळजवळ अकरा हजार होतें. व हैद्राबादेहून क. स्टीव्हनसन यांच्या हाताखालीं निघालेले सैन्य सुमारे आठ हजार होते. व त्याशिवाय क. स्टीव्हनसन यांच्या सैन्याबरोबर निजामाचें सहा हजार पायदळ आणि नऊ हजार घोडेस्वार इतकें सैन्य होते. असे मि. थॉर्न याचे आंकडे आहेत. या आंकड्याप्रमाणें हे सगळे मिळून एकंदर सैन्य चवतीस हजार होतें. ज्या पुण्यात शिंदे नव्हते, होळकर नव्हते, अमृतराव नव्हते, किंवा त्यांनी लावलेली आगही नव्हती, त्या पुण्यात स्वतःच्या वंशपरंपरेच्या बाजीरावाच्या मालकीच्या गादीवर त्याला नेऊन बसविण्याकरितां ३४, ००० सैन्य लागतें काय ? तेव्हां त्या इतक्या प्रचंड सैन्याचा हेतु वर सांगितल्याप्रमाणे उघडच होता. आणि हें इतके मोठें सैन्य हैद्राबादेहून आणि हरिहराहून पुण्याला येईपर्यंत त्याला कोणीं अडथळा केला नाहीं, यावरूनही अडथळा करण्याची कोणाला फारशी बुद्धि नव्हती; व इतक्या मोठ्या सैन्याला अडथळा करणें शक्यही नव्हतें. तरी पण इतके मोठे सैन्य बरोबर असताही चोराच्या मनांत चादणे या म्हणीप्रमाणें इंग्लिशाना मात्र थोडीबहुत भीति वाटतच होती. आणि दक्षिण महाराष्ट्रातील कोणी जहागीरदार या इंग्लिश सैन्याच्या विरुद्ध अडथळा करण्याला पुढें आले, तर त्याचें पारिपत्य करण्याविषयीं ज. वेलस्ली याना वरून हुकूम मिळालेले होते. पण महाराष्ट्रामध्यें असा प्रसंग येतो आहे कशाला ? दक्षिण महाराष्ट्रांतील पटवर्धन वगैरे कांहीं सरदार या वेळीं इंग्लिशांना आपल्या घरांत घेण्याला इतके उत्सुक झालेले होते कीं, त्यांच्याकडून इंग्लिशांना विरोध होणें शक्यच नव्हतें. पहिल्याने बाजीरावाने इतकें

मोठें सैन्य पुण्यास येऊं द्यावयाचें नव्हतें. पण बाजीराव चुकला असला, तर त्याच्या सरदारांपैकीं तरी कोणी असा विचार करावयाला पाहिजे होता कीं, हें आपल्या नाकापेक्षां जड होणारें मोतीं--हें इंग्रजांचें चवतीस हजार सैन्य—आपल्या मुलखांत येतें आहे कशाला ? आणि यांचा आपण इतका आदरसत्कार करतों आहों कशासाठीं ! पण हा सुविचार आपत्कालीं कोणाला सुचणार ? जे पुढें आपलें राज्य आपल्यापासून हिरावून घेणार, त्यांना आपल्या पूर्वजांनीं मोठ्या इतमामानें पुण्यामध्यें आणलें ! राजे आणि त्यांचे सरदार अशा रीतीनें मूर्खपणानें आणि फितुरीनें आधीं आपल्या अकला आणि मागाहून आपलें स्वातंत्र्य घालविण्याला उद्युक्त होत असतां महाराष्ट्रांतील निदान सामान्य लोकांनीं तरी या गोष्टीचा कांहीं विचार करावयाला पाहिजे होता; पण तसेंही कांहीं झालें नाहीं.

या प्रसंगासंबंधानें आणि या इंग्रजी लष्करासंबंधानें एका इतिहासकारानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. "At every step they were welcomed as deliverers; and nearly all the chiefs on the line of the route joined their forces to the British army and advanced with it to Poonah." या वाक्यांत असें म्हटलें आहे कीं, इंग्लिशांचें हें सैन्य आपली मुक्तता करण्याकरितां येत आहे असें मानून ठिकठिकाणच्या लोकांनीं त्यांचें स्वागत केलें ! हें इंग्रजी सैन्य महाराष्ट्रांतलि लोकांची मुक्तता करण्याकरितां येत होतें खरेंच ! पण तें सैन्य महाराष्ट्रांतलि लोकांची कशापासून मुक्तता करण्याकरिता येत होतें ? महाराष्ट्रांतील लोक त्या वेळपर्यंत स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या दुःखांत सांपडलेले होते; त्या स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या दुःखापासून त्यांना सोडविण्याकरितां हें इंग्रजी सैन्य येत होतें, असा याचा अर्थ असेल, तर तो मात्र अक्षरशः खरा आहे ! जें सैन्य आपल्या देशाचें स्वातंत्र्य नाहींसें करून टाकण्याकरितां येत होतें, त्या सैन्याचें महाराष्ट्रांतील लोकांनीं आणि महाराष्ट्रांतील सरदारांनीं आगतस्वागत करावें, याच्यापेक्षां महाराष्ट्राचा आणखी राष्ट्रीय अधःपात तो काय व्हावयाचा राहिला होता ?

शिवाय हें सैन्य येऊन काय करणार होतें ? तर बाजीरावाला गादीवर बसविणार होतें ! शिवाजीमहाराजांच्या पराक्रमापासून तों नानाफडणविसांच्या बुद्धिमत्तेपर्यंत ज्या मराठ्यांनीं शेंकडों राजांना पदच्युत केलें आणि शेंकडों राजांना त्यांच्या तक्तांवर फिरून बसविलें--फार काय, ज्यांनीं दिल्लीचेंही तक्त फोडलें आणि ज्यांनीं त्याच दिल्लीच्या तक्तावर मोगल बादशहांना बसविलें,--त्या मराठ्यांच्या राजाला गादीवर बसविण्याकरितां त्या मराठ्यांच्या मुलखांतून या इंग्रजी सैन्यानें लोकांचें आगतस्वागत स्वीकारीत हरिहरपासून पुण्यापर्यंत पटवर्धनांच्यासारख्या मुलखांतून अप्रतिहतपणें यावें, याच्यासारखी मराठे लोकांना दुसरी कालिमा कोणती होती ! बाजीरावसाहेबांनीं जर आपल्या पूर्वजांच्या पूर्वपीठिकेचें आणि पूर्वपराक्रमांचें थोडेंसें तरी स्मरण केलें असतें, तर " मला गादी मिळाली नाहीं तरी हरकत नाहीं, पण या परकीय सैन्याच्या मदतीनें मिळणाऱ्या गादीवर मी बसावें, ही गोष्ट माझ्या हातून कधींही घडणार नाहीं ! " असेच उद्गार त्यांच्या तोंडून निघाले असते ! बाजीरावसाहेबांनीं हें लक्षांत आणावयाला पाहिजे होतें कीं, इंग्रजांना पुण्यांत पाय टाकूं

द्यावयाचा नाहीं, हा तर आपल्या पूर्वीच्या मुत्सद्द्यांचा बाणा ! व त्यासाठीं तर नानाफडणवीस, महादजी शिंदे, हरीपंत तात्या फडके आणि दुसरे शेंकडों मराठे सरदार वडगांवच्या लढाईंत इंग्लिशांना अडकवून धरण्याकरितां पुढें सरसावले ! असें नसतें, तर बोरघाटामध्यें जे शेंकडों शूर मराठे शिपाई ठिकठिकाणीं लढले आणि प्रत्येक डोंगरांतील वाट अडवीत असतांना मरण पावले, त्यांनीं आपले प्राण कशाला खर्ची घातले असते ? त्या वडगांवच्या लढाईच्या वेळीं घाटांतून आणि डोंगरांतून ठिकठिकाणीं मरून पडलेल्या आपल्या जातभाईंच्या आणि आपल्या देशबांधवांच्या छातीवर पाय देऊन आणि त्यांचीं पवित्र हाडें परकीयांच्या घोड्यांच्या टापाखालीं तुडवून बाजीरावसाहेब परदेशी पलटणांच्या संरक्षणाखालीं जेव्हां पुण्यास येत होते, त्या वेळीं तो असह्य देखावा पाहून त्या वडगांवच्या लढाईंत मरून पडलेल्या लोकांना काय वाटलें असेल ! त्या मृत वीरांचे आत्मे रडले असतील, ओरडले असतील, किंचाळले असतील, हळहळले असतील, आणि त्यांचे हात—मरणानंतर गळून पडलेल्या आपल्या त्या तरवारी कोठें आहेत म्हणून शोधूं लागले असतील !

अशा रीतीनें पुण्यांत येऊन पोहोंचलेल्या बाजीरावसाहेबांना ज्या दिवशीं इंग्रजांनीं पुण्याच्या गादीवर बसविलें, त्या दिवशीं पुण्याच्या लोकांना मोठा आनंद झाला, म्हणून इंग्लिश इतिहासकारांनीं वर्णनें केलेलीं आहेत. पण पुण्यांतील लोकांना या देखाव्यानें खरोखरच आनंद झाला असेल काय ? इंग्रजांना फितुर झालेले कांहीं लोक आणि केवळ स्वार्थदृष्टीचे कांहीं तोंडपुजे लोक यांना कदाचित् या गुलामगिरीच्या मंगलाभिषेकाचा देखावा पाहून आनंद वाटला असेल. पण या थोड्याशा लोकांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाला आनंद वाटला असेल, हें शक्य दिसत नाहीं. त्या दिवशीं सलामीच्या ज्या तोफा उडवावयाच्या होत्या, त्यांच्या तोंडांत बळेंच कोणी दारू कोंबल्यामुळें त्यांनीं मोठाल्या, पण फुसक्या, गर्जना केल्यासारखें दिसलें असेल. पण आपल्या देशाच्या शत्रूंची दाणादाण करून देण्याकरितां ज्या तोफाचा जन्म आणि आपल्या देशाच्या शत्रूंची आपण छाती फोडून टाकूं अशी ज्या तोफांची महत्त्वाकांक्षा, त्या मराठ्यांच्या तोफांना इंग्रजांच्या मदतीनें बाजीरावाला मिळालेल्या गादीबद्दल जेव्हां बळजबरीनें आनंद व्यक्त करावयाला लावण्यांत आला असेल, तेव्हां त्यांचें सर्वांग स्वदेशभक्तीच्या संतापानें संतप्त होऊन गेलें असलें पाहिजे ! बाजीरावसाहेबांना गादीवर बसविण्यांत आलें, त्या दिवशीं पुण्यांतील कांहीं देशद्रोही लोकांना आनंद झाला असेल; पण त्या दिवशीं पुण्यांतील बाकीच्या लोकांना दुश्चिन्हें काय काय झालीं असतील, याचें कोणीं वर्णन केलेलें आहे काय ? त्या दिवशीं किती तरी लोकांना अपशकुन झाले असतील ! त्या दिवशीं चंद्राला खळें पडलेलें किती तरी लोकांनीं पाहिलें असेल ! त्या दिवशीं किती तरी भयंकर कुयोग असलेले ज्योतिष्यांना आपापल्या पंचांगांतून दिसले असतील ! आणि त्या दिवशीं किती तरी अशुभ ग्रहांच्या युति आकाशांत झाल्या असतील ! कोणी उल्कापात झालेले पाहिले असतील, कोणी भालूंचे भेसूर शब्द ऐकले असतील, कोणी घोड्यांच्या डोळ्यांतून गळालेले अश्रु पाहिले असतील, आणि कोणी निरनिराळ्या ठिकाणच्या देवळांतील देवतांना घाम सुटलेले पुसले असतील ! कोणाच्या निशाणांच्या काठ्या मोडल्या असतील; आणि कोणाच्या पालखीचे दांडे दुभंग

झाले असतील ! कोणाला दिवसास भयंकर दुश्चिन्हें झालीं असतील, आणि रात्रीं भयंकर स्वप्नें पडलीं असतील. इंग्लिशांनीं बाजीरावाला पुण्याच्या गादीवर आणून बसविलें, म्हणून पुण्यांतील लोकांना आनंद झाला, ही कल्पना आतांच्याही पुण्याच्या लोकांना जर असह्य आहे, तर त्या कल्पनेनें त्या वेळच्या लोकांना आनंद कोठून होणार? फार काय, पण ज्या बाजीरावसाहेबांना इंग्लिशांनीं गादीवर बसविलें, त्या खुद्द बाजीरावसाहेबांना तरी त्या वेळीं आनंद झाला असेल किंवा नसेल, याबद्दलही शंका आहे. आणि पुढील इतिहासावरून व व कृतीवरून बाजीरावसाहेबांनाही फारसा आनंद झालेला नसावा, असेंच दिसतें. कारण, गुलामगिरीच्या सोनेरी बिडीमध्यें आणि पारतंत्र्याच्या अमृतकलशामध्यें कोणाला गोडी वाटणार आहे ! आणि खुद्द बाजीरावसाहेबांच्या मनाचीच जर ही स्थिति असेल, तर बाकीच्या लोकांना इंग्लिशांनीं ता. ६ मे १८०३ रोजीं केलेल्या या शोकपर्यवसायी प्रहसनापासून आनंद होणें कसें शक्य असणार ?

या वेळीं जरी नानाफडणवीस मरून गेलेले होते, तरी ज्यांना भविष्यकाळच्या काळोखांतील गोष्टी अंतर्ज्ञानाच्या दिव्यानें दिसूं शकतात, असे कांहीं लोक त्या वेळीं पुण्यामध्ये होते. ते चिंताग्रस्त होऊन आणि आपल्या कपाळाला हात लावून स्तब्ध बसले असतां त्यांच्या त्या ध्यानस्थ स्थितीमध्यें त्यांच्या डोळ्यापुढें त्यांना पुढें होणारे काय काय अनर्थ दिसले नसतील ! त्यांना असईचें आणि आरगांवचें रणक्षेत्र दिसलें असेल ! आणि त्या रणक्षेत्रावर आपल्या लोकांपैकीं कांहीं मरण पावलेले आणि कांहीं पळत सुटलेले लोक त्यांना दिसले असतील ! आपल्या सैन्याचीं निशाणें इंग्लिश लोक हस्तगत करीत आहेत आणि आपल्या तोंफा इंग्लिशाचे बैल ओढून नेत आहेत, असें त्यांनीं पाहिलें असेल ! अशीरगड आणि गाविलगड हे किल्ले उंच डोंगरांच्या शिखरावरून खालीं कोसळून पडलेले त्यांनीं पाहिले असतील ! दिल्ली, अलीगड, लासवारी, दीग, वगैरे ठिकाणचे पराभव त्यांनीं पाहिले असतील ! इतकेंच नव्हे, तर त्यांनीं आपली ज्ञानदृष्टि थोडी जास्त विस्तृत केल्यावर त्यांना आणखीही कित्येक गोष्टी दिसल्या असतील ! त्यांना खडकीचा पराभव आणि अष्ट्याच्या रणमैदानावरील बापू गोखल्यांचा मृत्यु हेही दिसले असतील ! बाजीरावाच्या शनवारच्या वाड्यावर बाळाजीपंतांनीं चढविलेले इंग्रजांचें निशाण आणि ब्रह्मावर्ताच्या गंगेच्या कांठीं स्नानसंध्या करीत बसलेले बाजीराव, यांचेही काळ्या रंगांतील चित्रपट दुर्दैवानें त्यांना दाखविले असतील ! आणि हे सगळे चित्रपट पाहून ते अगदीं घाबरून गेले असतील ! आणि ते मध्येच ओरडून म्हणाले असतील कीं, " अरे हे दुर्दैवा ! अरे हे भविष्यकाळा ! तुम्ही हें आम्हांला काय दाखवीत आहां ! थांबा ! जर असलींच भविष्यकाळाचीं चित्रें पहावयाचीं असतील, तर त्यापेक्षां ही अंतर्दृष्टि आणि हें दूरदर्शनाचें सामर्थ्य नसलेलें बरें ! " आणि असें म्हणून त्यांनीं आपली समाधीची अवस्था मोठ्या बळजबरीनें मोडून ते फिरून आपल्या सभोंवतालच्या जागृतावस्थेमध्यें लीन झाले असतील !

असो. अशा प्रकारचा हा बाजीरावाला पुण्याच्या गादीवर बसविण्याचा वैधव्यपर्यवसायी लग्नसोहळा समाप्त झाल्यानंतर इंग्लिश लोक पुढल्या तजविजीला लागले. वसईच्या तहामध्यें अशी एक अट होती कीं, बाजीरावाच्या संरक्षणासाठीं इंग्लिशांनीं पुण्या-

मध्यें सहा हजार फोज ठेवावी. या तहाच्या अटीप्रमाणें त्यांनीं पुण्यामध्यें ज. वेलस्ली यांच्या बरोबर तितकी सहा हजार फौज आणली असती, तर त्यांत कांहीं वावगें झालें नसतें. व तेवढी फौज पुरेशीही झाली असती. पण भटाला ओसरी दिल्याबरोबर भटानें सर्व घरभर हातपाय पसरावे, त्याप्रमाणें इंग्लिशांना सहा हजार फौजेची परवानगी तहाच्या अन्वयें मिळालेली असतांना त्यांनीं पुण्यामध्यें एकदम ३०।३५ हजार फौज आणून सोडली. या कृत्यांतील त्यांचा हेतु अगदीं स्पष्ट होता. बाजीरावाचें संरक्षण हा त्यांतील केवळ एक अंगभूत हेतु असून मराठा संघाची जूट फोडून दौलतराव शिंदे याचें जय्यत लष्कर आणि अजिंक्य तोफा यांचा नाश करावयाचा आणि त्याच्या आश्रयाखालीं जी फ्रेंचांची सत्ता बळावत चाललेली होती ती नामशेष करावयाची, असे त्यांचे यांत अनेक अंतःस्थ हेतु होते. म्हणून त्यांनीं ते साधण्याला आतां उघड रीतीनें सुरवात केली. व त्यासाठीं आम्हीं पेशव्यांच्यापाशीं जो वसईचा तह केलेला आहे, त्याला तुमची मान्यता असावी, अशाविषयीं इंग्लिशांनीं दौलतराव शिंदे यांच्यापाशीं बोलणें सुरू केलें. वसईच्या तहाची बातमी दौलतरावाला समजली, तेव्हां त्याला ती गोष्ट फारशी आवडली, असें नाहीं. महादजी शिंद्यांच्या वेळेपासून पुण्याच्या दरबारामध्यें आपलें ज वजन होतें, तें या वसईच्या तहानें इंग्लिश लोक मध्यें घुसल्यामुळें आतां जाणार, ही गोष्ट शिंद्याच्या लक्षांत येऊन चुकली. तरी पण तो इंग्लिशांच्या विरूद्ध होता, असें नाहीं. व ही गोष्ट इंग्लिश इतिहासकारांनींही कबूल केली आहे. तरी पण या वसईच्या तहाच्या बाबतींत काय धोरण ठरवावयाचें, हें रघोजी भोसले यांच्याशीं विचारविनिमय करून ठरवावें, असें त्यानें ठरविलें. व त्या हेतूनें आपल्याबरोबर आपलें कांहीं सैन्य घेऊन दौलतराव शिंदे उज्जनीहून निघाला, तो ता. २३ फेब्रुवारी १८०३ रोजीं बऱ्हाणपूर मुक्कामीं येऊन दाखल झाला. पण वसईच्या तहाच्या बाबतींत दौलतराव काय धोरण स्वीकारणार, हें जाणण्याची इंग्लिशांना उत्कट इच्छा झालेली असणें स्वाभाविक होतें. म्हणून तें जाणण्याकरितां आणि शिवाय शिंद्याच्या काय हालचाली होतात याच्यावर वचक ठेवण्याकरितां शिंद्यांच्या दरबारचा इंग्लिशांचा रेसिडेंट, मि. कॉलिन्स, याला त्यांनीं दौलतरावाच्या पाठोपाठ पिटाळलें. आणि तो ता. २७ फेब्रुवारी १८०३ रोजीं बऱ्हाणपुरास येऊन पोहोंचला. व वसईच्या तहाबद्दल काय तें उत्तर देण्याविषयीं तो शिंद्याला घाई करूं लागला.

पण दौलतरावाला या बाबतींत इतकी घाई नव्हती. शिंदे आणि होळकर यांच्या आपसांत लढाया चाललेल्या होत्या. त्यामुळें या बाबतींत होळकराचा सल्ला घेणें शिंद्याला अशक्य होतें. म्हणून स्वाभाविक रीतीनेंच शिंद्याचें लक्ष रघोजी भोसल्याच्या सल्लामसलतीकडे वळलें. शिंदे व होळकर हे दोघेही तरुण होते! पण रघोजी भोसले हे वयानें पोक्त, पराक्रमानें शूर आणि व्यवहारज्ञानानें चतुर असे होते. शिवाय साताऱ्याच्या महाराजांच्या वंशांतीलच ते असल्यामुळें त्यांचें वजन बाकीच्या सरदारांपेक्षां स्वाभाविकपणेंच जास्त होतें. म्हणून त्यांनीं सगळ्या मराठे सरदारांचा संघ फिरून एकत्र कसा जमवून आणावा याच्याबद्दल विचार चालविला होता; व त्या दृष्टीनें वसईच्या तहाबद्दल काय धोरण ठेवावयाचें, हें ठरविलें

व्हावयाचें होतें. शिवाय या बाबतींत खुद्द बाजीरावसाहेब यांचें काय मत आहे, हेंही आपल्याला समजणें जरूर आहे, असें शिंदे आणि भोंसले यांना वाटत होतें. व तुम्हीं पुण्यास यावें, असा बाजीरावसाहेबांकडून शिंद्याकडे निरोपही गेलेला होता; व त्या कामाकरितां खुद्द बाळोबा कुंजर यांनाही बाजीरावसाहेबांनीं शिंदे आणि भोंसले यांच्याकडे पाठविलें होतें. तेव्हां पेशवे, भोंसले, शिंदे, आणि होळकर, या सगळ्यांच्या खलबतामधून जें धोरण ठरेल, तें आपलें वसईच्या तहाबद्दलचें धोरण होय, असें दौलतराव शिंदे उत्तर देणार, हें अगदीं उघड होतें, व त्यासाठीं त्यांना कांहीं वेळ थांबणें जरूरच होतें. आणि म्हणून दौलतराव शिंदे, इंग्लिश रेसिडेंट, मि. कॉलिन्स, यांना असें सांगत होते कीं, रघोजी भोंसले यांची आणि आपली गांठ पडल्यानंतर मग जें काय ठरेल त्याप्रमाणें तुम्हाला उत्तर सांगण्यात येईल. परंतु इंग्लिशांना अशी परिस्थिति उत्पन्न होऊं देणें इष्ट नव्हतें. पेशवे, भोंसले, शिंदे आणि होळकर, यांना नुसत्या सल्लामसलतीसाठीं एकत्र होऊं दिलें, तरी देखील त्यांत आपल्या कारस्थानला अपायच आहे, हें इंग्लिश लोक जाणून होते. व त्यामुळें या चौघाच्या सल्लामसलतींमध्यें जितके व्यत्यय आणतां येतील, तितके आणण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला होता. होळकराला त्यांनीं आधींच बराचसा आपल्या बाजूला वळवून घेतलेला होता, हें पूर्वी सांगण्यांत आलेलेंच आहे. तरी पण या वसईच्या तहाच्या विरुद्ध आपण सर्व मराठे सरदारांनीं एकत्र झालें पाहिजे, ही कल्पना होळकराच्या डोक्यात नव्हती असे नाहीं. या बाबतींत यशवंतराव होळकरानें रघोजी भोंसल्यांकडे जे एक पत्र पाठविलेलें उपलब्ध आहे, तें पुढे देण्यांत येत आहे. तें असें—

श्रीम्हाळसाकांत चंद्र १० जमादिलावल
सन १२१३ ( इ. स. १८०३ )
नजीक देऊळगांव राजा.

राजश्री रघुजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यांसी सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित यशवंतराव होळकर रामराम विनंति. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असावें. विशेष........इंग्रजांस स्वराज्याचा लोभ उत्पन्न होऊन चाल करावी या इरायांत बहुत दिवस होतेच. प्रस्तुत श्रीमंत रा. बाजीरावसाहेब अनुकूल हे निमित्यास कारण होऊन पुणियास येऊन अलीकडे चाल करून नगरचा किल्ला घेतला. आपल्यापाशीं वकील होता तो न पुसतां उठून गेला. नबाबाकडील फौज व दळ येथें औरंगाबादेनजीक आहेत. त्यांची चाल पाहून आपण व राजश्री दौलतराव शिंदे सडे होऊन भांदोल्याचे घाटावर चढून त्याची आपली छेटी थोडी आहे म्हणून वर्तमान ऐकतों. त्यास आजपर्यंत फूट होती. याजमुळें त्यांचा इतका पसार झाला. प्रस्तुत आपला त्रिवर्गांची एकदिली झाली. तेव्हां स्वराज्यांतील सर्व लहानथोर सरदार मराठे मुसलमान सामने होतील. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे व राजश्री समशेर बहादुर बुंदेले व समशेर बहादुर आदि करून छोटे मोठे अनुकूल होतील. इतका भरणा पाहतां पांच सहा लाख फौजा दहा व कंपू होतील. दोन भाग करून चाल केली असतां कांहीं जड पडावें ऐसें नाहीं. कर्नाटक, बंगाला व अंतर्वेदी आदिकरून

त्यांचा मुलूख कोटयावधीचा आहे. इतका आपल्या पोटांत पडल्यावर आपलें हित किती. त्याजला इकडील मुलखांत येऊन नफा काय होणार. हे विचार लावून पाहिल्यानंतर बळा-बळ पक्ष इकडील पडून कायल होतील. आपण उतावळी करून गांठ घालून तें हावभरी होऊन चाल करतील ऐसें न करावें. धमकावून पोक्त विचारानें पाऊल पडल्यास सहजांत कायल होतील. त्यास त्याच बेतास लागावें. कांहीं अवघड नाहीं............बहुत काय लिहिणें. हीं विनंति.

यशवंतराव होळकर यांचे विचार वरील पत्रावरून स्पष्ट दिसत आहेत. त्याचप्रमाणें बाजीरावाच्याही मनातील मनसुबा अशाच प्रकारचा होता, असें दिसतें, बाजीरावानें बाळोबा कुंजर यास ज्याप्रमाणें दौलतराव शिंद्याकडे पाठविलें होतें, त्याचप्रमाणें नारायणराव वैद्य यांना भोसल्याकडे पाठविलें होतें. व त्यांच्याबरोबर बाजीरावसाहेबांनीं शिंदे आणि भोसले यांना जें लिहून पाठविलें होतें, त्यावरून बाजीरावाचेंही असेंच मनोगत होतें, असें स्पष्ट दिसून येतें. अलिजा बहाद्दर शिंदे यांच्या घराण्याचा रा. सरंजामे यांनीं जो इतिहास प्रसिद्ध केला आहे, त्यांतील हकीकतीवरून असें दिसतें कीं, बाजीरावानें शिंदे आणि भोसले या दोघांनाही पुढीलप्रमाणें मजकूर लिहून कळविला होता. तो असा कीः—"तुम्ही उभयतां होळकराचे प्रसंगास पुण्यास नसल्यामुळें मला वसईस जाणें प्राप्त जाहलें. तेथें कंपनीसरकारचे शहास सांपडून त्यांनीं म्हटला तसा तहनामा मी त्यांस करून दिला आहे. हा तहनामा कायम राहील, तर आपले सर्वांचे नाशास कारण होईल. याजकरितां तुम्ही एकत्र होऊन इंग्रज लोकांस दक्षिणेंतून काढण्याचा इलाज करावा." याप्रमाणें बाजीरावसाहेबाच्याही मनांतील विचार होते, हें सिद्ध होतें. याप्रमाणें होळकर आणि पेशवे यांची इच्छा होती; व होळकर आणि शिंदे यांचा जरी या पूर्वी कित्येक दिवस तंटा चाललेला होता, तरी या प्रसंगीं हे आपसांतील तंटे मिटावेत आणि मराठ्यांच्या संघामध्यें येऊन मिळण्याला होळकराला प्रोत्साहन मिळावें म्हणून खंडेराव होळकर हा जो शिंद्याच्या कैदेंत होता त्याला सोडण्यालाही दौलतराव तयार झाला. व त्याशिवाय दौलतरावानें होळकराचा माळव्यांतील कांहीं मुलूख जिंकून घेतला होता, तोही सोडून दिला. एवंच या सर्वांचा हेतु काय कीं, आपण सगळ्यांनीं आपसांतील आपले तंटे मिटवून इंग्लिशांना दक्षिणेंतून हांकलून देण्याकरितां एकत्र व्हावें. पण हिंदुस्थानच्या दुर्दैवामुळें तसा योग जुळून आला नाहीं. होळकराचें मन आतांच बिघडवूं द्यावयाचें नाहीं व त्याला खुषींत ठेवावयाचें, असे इंग्रजांचे जे प्रयत्न चाललेले होते, त्या प्रयत्नांच्या जाळ्यांतच अखेरीस यशवंतराव होळकर फसून पडला. आणि बाजीरावाची कांहींही इच्छा असली, तरी तो बोलून चालूनच इंग्लिशांच्या हातांतील बाहुलें बनून गेलेला होता. त्यामुळें मराठा संघ कायम टिकवून इंग्लिशांशीं तोंड देण्याची सर्व जबाबदारी शिंदे आणि भोसले यांच्यावरच येऊन पडली. तेव्हां अशा स्थितीमध्यें शिंदे आणि भोसले यांनीं एकत्र जमून कांहीं तरी विचार ठरविणें जरूर होतें. व त्यासाठीं रघोजी भोसले नागपुराहून निघून शिंद्याच्या छावणीकडे येत होता.

परंतु यावेळीं कॉलिन्सचा शिंद्याच्या मागें एकसारखा तगादा लागलेला होता. तेव्हां आमच्या उभयतांच्या गांठी पडून आणि पेशव्यांकडून आलेले बाळोबा कुंजर आणि

नारायणराव वैद्य यांचें म्हणणें ऐकून घेतल्यावांचून आम्हांला कांहीं एक करितां यावयाचें नाहीं, असें दौलतराव शिंदे यानें जेव्हां मि. कॉलिन्स याला निक्षून सांगितलें, तेव्हां मि. कॉलिन्स यांची टुरटूर थांबली. अखेरीस ता. ४ जून १८०३ रोजीं रघोजी भोसले शिंद्याकडे येऊन पोहोंचले व त्यांचें बोलणें सुरू झालें. त्यानंतर कांहीं दिवस गेले, तरी शिंदे व भोसले यांनीं कांहीं जबाब सांगितला नाहीं, म्हणून ता. १२ जून १८०३ रोजीं मि. कॉलिन्स यानें शिंदे व भोसले यांना अशी धमकी दिली कीं, तुम्ही जर आपला निकाल ताबडतोब सांगितला नाहीं, तर मी तुमची छावणी सोडून निघून जाईन. इंग्लिशांचे शिंद्याकडील वकील, मि. कॉलिन्स, यांनीं शिंद्यांची छावणी सोडून जाणें म्हणजे इंग्लिशांनीं शिंद्यांच्या विरुद्ध लढाई पुकारणें असाच त्याचा अर्थ व्हावयाचा होता. पण दक्षिणेंतील इंग्लिशांचे सेनापति जनरल वेलस्ली यांना आपल्या लढाईची तयारी परिपूर्ण करण्याला अद्यापि कांहीं अवकाश पाहिजे होता. आणि म्हणून मि. कॉलिन्स यांनीं इतक्यांतच शिंद्यांची छावणी सोडून निघून येणें हें जनरल वेलस्ली यांना इष्ट नव्हतें. शिवाय मि. कॉलिन्स हे शिंद्यांच्या लष्करांत जे होते, ते तेथें उगीच बसलेले नव्हते. शिंद्यांच्या लष्करांत फितुर करण्याच्या कामीं तेथें त्यांचा फार उपयोग होत असे. व शिवाय मि. कॉलिन्स हे शिंद्यांच्या छावणींत असल्यामुळें शिंद्यांच्या लोकांवर आणि त्यांच्या हालचालींवर मि. कॉलिन्स यांचा एक प्रकारचा वचक असे तो वकच कायम ठेवण्याचा फायदा एव्हांशींच आपण घालवून बसावें, हें जनरल वेलस्ली यांना इष्ट वाटत नव्हतें. व म्हणून आपली लढाईची तयारी पुरी होईपर्यंत मि. कॉलिन्स यानें शिंद्यांच्या लष्करांतून निघून येण्याची घाई करूं नये, असें ज. वेलस्ली यांचें मत होतें. त्यामुळें ता. १२ जून १८०३ रोजीं क. कॉलिन्स यानें जरी शिंद्यांच्या लष्करांतून निघून जाण्याची पहिली धमकी शिंद्याला दिलेली होती, तरी ते ता. १ ऑगष्ट १८०३ पर्यंत शिंद्याच्या छावणींत लोचटपणानें चिकटून बसलेले होते. व या मुदतींत शिंदे, भोसले, जनरल वेलस्ली व मार्किस वेलस्ली, यांच्या दरम्यान वाटाघाटींचीं बोलणीं चाललेलीं होतीं. या वाटाघाटीमध्यें शिंद्यांचे असें म्हणणें होतें कीं, वसईच्या तहाच्या पूर्वीं पेशव्यांच्या सर्व कारभाराची जबाबदारी आपल्याकडे होती; त्याचप्रमाणें पहिल्या मराठा वॉरच्या नंतर जो सालबाईचा तह झाला, त्या तहाला शिंदे हेच जामीन होते; अशा स्थितीमध्यें आपल्या संमतीशिवाय इंग्लिशांनीं पेशव्यापाशीं वसईचा तह केला, हें नीतिच्या दृष्टीनें बरोबर केलें नाहीं. व शिंद्यांचें हें म्हणणें अगदीं बरोबरही होतें. तरी पण शिंद्यांच्या बाजूला जरी हें एक सबळ कारण होतें, तरी तेवढया कारणासाठीं इंग्लिशांशीं लढाई करण्याचा शिंदे किंवा भोसले यांपैकीं कोणाचाच विचार नव्हता, व तसें त्यांनीं इंग्लिशांना कळविलेंही होतें. परंतु शिंदे आणि भोसले यांचा जरी इंग्लिशांशीं लढाई करण्याचा विचार नसला, तरी इंग्लिशांचा त्यांच्याशीं लढाई करण्याचा विचार ठरलेला होता, त्याला ते काय करणार ? नदीच्या प्रवाहांतील खालच्या बाजूला मुकाट्यानें आणि शांतपणानें पाणी पिणाऱ्या बकऱ्यानें जरी त्या नदीच्या प्रवाहांतील वरचें पाणी गढूळ करणें केव्हांही शक्य नव्हतें, तरी त्या प्रवाहांतील वरचें स्वच्छ पाणी पिणाऱ्या सिंहाच्या मनांतून त्या बकऱ्याला कसें तरी करून खावयाचें होतें, याला तें बिचारें बकरें काय करणार ? शिंदे आणि भोसले हे दोघेही आपापलीं सैन्यें

घेऊन आपल्या हद्दीमध्यें अजिंठ्याच्या घाटाच्या पलीकडे होते. ते इंग्लिशांच्या संरक्षणाखालील पेशव्यांच्या किंवा निजामाच्या हद्दींत मुळींच नव्हते; व आम्ही अजिंठ्याचा घाट चढून वर येणार नाहीं आणि इंग्लिशांशीं लढाई करण्याचा आमचा विचार नाहीं, असेंही आश्वासन त्यांनीं दिलें होतें.

असें असतां क. कॉलिन्स यानें त्यांच्यामागें असें एक टुमणें लावलें कीं, शिंदे व भोसले या दोघांनीही आपापलीं सैन्यें घेऊन आपापल्या मुलखांत परत जावें. पण जनरल वेलस्ली व क. स्टीव्हनसन हे दोघे मिळून आपल्या हाताखालीं ३०।३५ हजार सैन्य घेऊन मराठ्यांच्या मुलखांत घुसलेले असतांना त्यांनीं शिंदे आणि भोसले यांना मात्र आपापलीं सैन्यें काढून नेण्याला सांगावें, हा कोठला सभ्यपणाचा न्याय! शिंदे आणि भोसले यांनीं आपापलीं सैन्यें माघारीं न्यावीं, ही अट ज. वेलस्ली यांच्या सूचनेवरून क. कॉलिन्स यानें घातलेली होती. ही अट अन्यायाची कशी होती आणि ती मानण्याला शिंदे व भोसले हे कसे बांधलेले नव्हते, हें वर दाखविलेलेंच आहे. पण ही अट न्यायाची होती आणि ती शिंदे व भोसले यांनीं पाळावयाला पाहिजे होती, असें क्षणभर मानलें, तरी ज. वेलस्ली यांनीं ही अट घालण्यामध्यें जी एक गुप्त वस्तादगिरी करून ठेविलेली होती, तिचा त्यांनीं आपण होऊनच उघड रीतीनें स्फोट करून ठेविलेला नसता, तर ती भोळसर स्वभावाच्या सामान्य इंडियन लोकांच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें! ती जनरल वेलस्ली यांची वस्तादगिरी अशी कीं, शिंदे आणि भोसले यांनीं आपल्या फौजा घेऊन आपल्या मुलखांत परत जावें, अशी अट ज. वेलस्ली यांनीं त्या दोघांना घातली होती; पण ह्या फौजा त्यांनीं किती दिवसांत परत नेल्या पाहिजे होत्या? अट म्हटली म्हणजे तिला कांहीं तरी मुदत पाहिजे कीं नको? पण अशी मुदत ज. वेलस्ली यांनीं आपल्या अटीला कांहीं घातली होती काय? नाहीं! तर मग ही मुदत घालण्याचें त्यांच्या स्मरणांतून चुकीनें राहिलें काय? तर नाहीं! तसेंही नाहीं! ही मुदत घालण्याचें चुकून राहिलें नसून ती मुदत न घालण्यांत ज. वेलस्ली यांच्या मनांत एक कपटाचा डाव होता. आणि तो कपटाचा डाव त्यांनीं आपल्या एका पत्रामध्यें कबूलही केलेला आहे! ता. १७जुलै १८०३ रोजीं पुण्याचे रेसिडेंट, क. क्लोज यांना पाठविलेल्या पत्रांत ज. वेलस्ली पुढीलप्रमाणें लिहितातः—" I have not fixed when he ( Dowlut Rao Scindhia ) should withdraw; because I wish to keep in my own breast the period at which hostilities will be commenced; by which advantage it becomes more probable that I shall strike the first blow." या वाक्यांत ज. वेलस्ली स्पष्टपणानें असें कबूल करतात कीं, " सैन्य माघारें नेण्याविषयीं दौलतराव शिंद्याला जी अट घातली होती, त्यांत त्याने सैन्य किती दिवसांच्या आंत माघारें न्यावें, ही मुदत मीं मुद्दामच घातलेली नव्हती. व तसें करण्यांत माझ्या मनांतील हेतु असा होता कीं, दौलतराव शिंद्यानें ही अट पाळली नाहीं, अशी कुरापत लढाई सुरू करतांना आपल्या सोयीप्रमाणें आपल्याला पाहिजे तेव्हां काढतां यावी! व असें झालें म्हणजे लढाई सुरू झाल्याबरोबर शिंद्यावर पहिला हल्ला करण्याची संधि आपल्याला मिळावी! हा माझा यांतील हेतु होता."

हा इंग्लिशांच्या बाजूचा कबूलीजबाब लुच्चेगिरीचें माप त्यांच्या पदरांत भरपूरपणें घालीत आहे. पण या वाटाघाटीमधील आणखीही एक इंग्रजी बहादुरी लक्षांत घेण्यासारखी आहे. व त्यावरून इंग्लिश लोक हे बाह्यात्कारी जरी न्यायाचे ढोंग करीत असले, तरी आंतून त्यांच्या मनांत कपट असतें, ही गोष्ट चांगली सिद्ध होते. शिंदे आणि भोसले यांनीं आपलीं सैन्यें आपापल्या मुलुखांत परत न्यावीं. म्हणजे इंग्लिशांनीं महाराष्ट्रामध्यें जीं सैन्यें आणिलीं आहेत, तींही ते माघारीं नेतील, असें इंग्लिशांच्या बाजूचें बाहेरून दिसण्यांत सरळपणाचें बोलणें इंग्लिशांच्या वतीनें क. कालिन्स यानें दौलतराव शिंदे यांना कळविलें होतें. पण शिंद्यानें आपली फौज माघारी नेली असती, तर मग तरी इंग्लिशांनीं आपली फौज खरो-खरच महाराष्ट्रांतून काढून नेली असती काय ? परंतु इंग्लिशांचा तसा मुळींच विचार नव्हता. गव्हर्नर जनरलकडून पुण्याचे रेसिडेंट, क. क्लोज, यांच्याकडे आलेल्या एका पत्रामध्यें या बाबतीसंबंधाचा पुढील मजकूर आढळतो:-In the event of Scindhia's return to the northward of the Nerbuddah, it may still be necesssary to retain the army in the field for the purpose of preventing Holkar's troops to Poona. शिंद्याचें लष्कर नर्मदेच्या उत्तरेस निघून गेलें, तरी होळकराच्या बंदोबस्ताकरितां आपलें सैन्य आपल्याला रणांगणावर कायम ठेवणें जरूरच आहे, असें या पत्रामध्यें स्पष्ट म्हणण्यांत आलेलें आहे. आणि असें जर होतें, तर तुम्हीं आपलें सैन्य माघारें नेलें, म्हणजे आम्ही आपलें सैन्यही माघारें नेऊं, ही शिंद्यांच्यापुढें इंग्लिशांनीं मांडलेली अट निव्वळ लबाडीची आणि खोडसाळपणाची नव्हती काय ? सारांश, कांहीं तरी कुरापत काढून इंग्लिशांना शिंद्यापाशीं लढाई सुरू करावयाची होती. तेव्हां त्या धोरणाप्रमाणें इंग्लिशांच्या बाजूची लढाईची तयारी झाल्यानंतर क. कॉलिन्स हे ता. १ आगष्ट १८०३ रोजीं शिंद्याची छावणी सोडून निघून आले. आणि अखेरीस ता. ६ आगष्ट १८०३ रोजीं ज. वेलस्ली यांनीं शिंदे व भोसले यांच्याविरुद्ध लढाई पुकारली.

इंग्लिशांनीं उत्तर हिंदुस्थानांत आणि दक्षिण महाराष्ट्रांत अशी दोहोंकडेही शिंद्यावर एकदम स्वारी करण्याची तयारी करून ठेविलेली होती. उत्तरेकडील सैन्याचें आधिपत्य लॉर्ड लेक यांच्याकडे देण्यांत आलेलें होतें आणि दक्षिणेंतील सैन्यावर जनरल वेलस्ली यांना नेमलेलें होतें. तेव्हां शिंद्याच्या विरुद्ध ता. ६ आगष्ट रोजीं लढाई पुकारण्यांत आल्याबरोबर उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे अशी दोहोंकडेही शिंद्याच्याविरुद्ध एकदम लढाई सुरू करण्यांत आली. यापैकीं उत्तरेकडील अलीगड, दिल्ली, लासवारी, वगैरे ज्या मोठमोठ्या लढाया झाल्या, त्यांचें वर्णन पुढें निराळें देण्यांत येणार असून येथें फक्त दक्षिणेंतील असई, आरगांव वगैरे लढायांचीच हकीकत देण्याचें योजण्यांत आलेलें आहे. इ. स. १८०३ च्या मे महि-न्यात बाजीरावसाहेबांना पुण्याच्या गादीवर बसवून झाल्यानंतर ज. वेलस्ली हे कांहीं दिवस पुण्यास राहिले होते. पण पुढें ता ४ जून १८०३ रोजीं त्यांनीं पुणें सोडलें. आणि आपल्या सैन्यासह ते अहमदनगरकडे जाण्याला निघाले. व अहमदनगरच्या अलीकडे कांहीं थोड्या अंतरावर वाळकी म्हणून एक गांव आहे, तेथें ता. १४ जून रोजीं पोंचून त्या ठिकाणीं ते आपल्या सैन्याचा तळ देऊन राहिले. नंतर ता. ६ आगष्ट १८०३ रोजीं लढाई पुकारली

गेल्याबरोबर ते वाळकीहून अहमदनगरचा किल्ला घेण्याकरितां तावडतोब पुढें निघाले. परंतु त्या दिवशीं पाऊस फार पडलेला असल्यामुळें सर्व रस्ते बिघडून गेलेले होते. म्हणून त्या दिवशीं त्यांना कूच करितां आलें नाहीं. नंतर ता. ७ आगष्ट रोजीं त्यांची छावणी अहमदनगरच्या किल्ल्याजवळ येऊन पडली. व त्यांनीं तावडतोब ता. ८ रोजीं नगरच्या किल्ल्याला वेढा घालण्याचें काम सुरू केलें; आणि ता. ११ आगष्ट रोजीं अहमदनगरचा किल्ला इंग्लिशांच्या ताब्यांत आला. ता. ६ आगष्ट रोजीं लढाई पुकारली गेली आणि ता. ७ आगष्टला ज. वेलस्ली अहमदनगरच्या किल्ल्यापुढें येऊन दाखल झाले; व पुढें दोन चार दिवसांत त्यांनीं शिंद्याच्या ताब्यांत असलेला अहमदनगरचा किल्ला घेतला. यावरून काय व्यक्त होतें ? शिंदे आणि भोसले यांनीं आपलें सैन्य अमुक मुदतींत माघारें न्यावें, अशी मुदत न घालण्यामध्यें ज. वेलस्ली यांना जो फायदा साधून घ्यावयाचा होता, तो हाच होय. लढाईतल्या पहिल्या जयावर पुढील पुष्कळ परिणाम अवलंबून असतात. कुस्ती करण्याकरितां दोन पहिलवान उभे राहिले, तर पहिला पेच आपल्या प्रतिपक्षावर आपला पडावा, यासाठीं प्रत्येक जण आपापल्यापरीनें निरनिराळ्या हिकमती करीत असतो; तशांतलीच ज. वेलस्ली यांची ही हिकमत होती. शिंदे आणि भोसले यांच्या मनांतून इंग्लिशांवर हल्ला करण्याचा इरादा आहे, असे आरोप त्यांच्यावर लढाईच्यापूर्वी लादण्यांत येत होते. परंतु हें जर खरें असतें, तर ६ आगष्टला लढाई पुकारली गेल्यानंतर लगेच एकदोन दिवसांत ज. वेलस्ली यांनी ज्याप्रमाणें अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा घातला, त्याप्रमाणें शिंदे आणि भोसले यांनाही कांहीं करितां आलें असतें. पण तसें त्यांनीं कांहीं एक केलें नाहीं. यावरून लढाई करण्याचें कपट कोणाच्या मनांत वास्तविक होतें, हें दिसून येतें. शिंदे आणि भोसले यांनीं तावडतोब कांहीं केलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर इंग्लिशांनीं ता. ६ आगष्ट रोजीं लढाई पुकारली तेव्हांपासून ता. २३ सप्टेंबर १८०३ रोजीं असईची लढाई झाली, तेथपर्यंत—म्हणजे जवळ जवळ दीड महिना—कांहीं किरकोळ हालचालीशिवाय विशेष कांहीं एक न करितां ते स्वस्थ बसले होते. परंतु इंग्लिशांच्या मनांत पहिल्यापासूनच कपट असल्यामुळें आपणच लढाई पुकारल्याचें निमित्त करून नगरच्या किल्ल्याच्या रूपानें त्याचा पहिला फायदा घेण्याला ज. वेलस्ली हे तयार झाले. अहमदनगरचा किल्ला हा पेशव्यांकडून शिंद्याला मिळालेला असून तो त्या वेळीं शिंद्याच्या ताब्यांत होता, त्या किल्ल्यावर ज. वेलस्ली यांचा डोळा होता; व त्यासाठीं ते नगरच्या जवळच्या वाळकी या नावाच्या एका गांवीं टपून बसलेले होते. आणि लढाई पुकारल्याबरोबर त्या किल्ल्यावर त्यांनीं झडप घातली !

अहमदननगरच्या किल्ल्याला ज. वेलस्ली यांनीं वेढा घालण्याला सुरवात केली, त्या वेळीं त्यांनीं तेथें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहीरनाम्यांतील मुख्य सारांश असा होता कीं, शिंदे आणि भोसले हे आपल्या सरहद्दीच्या जवळ मोठी फौज घेऊन आलेले आहेत; व तेथून ते आपली फौज हालवीत नाहींत. याकरितां केवळ शांतता राखण्याकरितां म्हणून ज वेलस्ली यांना त्यांच्याविरुद्ध लढाई सुरू करणें भाग पडत आहे ! पण याच्याशिवाय त्या जाहीरनाम्यामध्यें आणखीही एक महत्त्वाची वस्तादगिरी होती. त्या जाहीरनाम्यानें आसपासच्या सर्व रयत लोकांना असें फर्माविण्यांत आलेलें होतें कीं, आम्ही तुम्हां रयत

लोकांच्या विरुद्ध ही लढाई सुरू केलेली नाहीं ! आणि म्हणून सर्व रयत लोकांनीं आणि त्यांच्या त्या त्या अंमलदारांनीं आपापल्या जागीं स्वस्थ असावें ! व त्यांना जे हुकूम देण्यांत येतील, ते त्यांनीं पाळावें ! त्याचप्रमाणें त्यांच्या मुलखांतून जाणाऱ्या इंग्लिश सैन्याला जर त्यांनीं कांहीं त्रास दिला नाहीं, तर त्या रयत लोकांनाही कांहीं त्रास न पोंचेल अशी व्यवस्था करण्यांत येईल; पण रयत लोकांपैकीं आपलीं घरें सोडून कोणी बाहेर पडतील, किंवा इंग्रजी सैन्याला कांहीं त्रास देतील, तर त्यांना शत्रूप्रमाणे समजून शासन करण्यांत येईल !

अशा प्रकारचे जाहीनामे इंग्लिशांनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत पुष्कळ वेळां प्रसिद्ध केल्याचें आढळून येतें; व या जाहीरनाम्यांनीं हिंदुस्थानांतील लोक फसलेले असल्याचेंही पुष्कळ वेळां आढळून येतें. तेव्हां असल्या या जाहीरनाम्यांच्या योगानें हिंदुस्थानांतील लोकांनीं फसावें कीं काय, हा त्यांनीं विचार करण्यासारखा एक प्रश्न आहे. आणि म्हणून हल्लींच्या स्थितींतून निघून आपण त्या वेळच्या स्थितीमध्यें थोडा वेळपर्यंत जाऊं या. आपण १९२६ सालचे हिंदुस्थानचे रहिवासी नसून आपण १८०३ सालचे अहमदनगरच्या किल्ल्याच्या आसपासचे रहिवासी असे रयत लोक आहोत, अशी आपण कल्पना केली, तर या वर दिलेल्या जाहीरनाम्याच्यासारख्या फसवणुकीच्या जाहीरनाम्याकडे आपण कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे ? आपला अहमदनगरचा किल्ला आणि त्याच्या खालचा प्रांत हा शिंद्याचा प्रांत आहे. आणि त्या प्रांतांत रहाणारे आपण शिंद्याची प्रजा आहों, आणि दौलतराव शिंदे हा आपला राजा आहे. त्या आपल्या राजाच्या अहमदनगरच्या किल्ल्यावर गनीम चालून येत आहे आणि तो आपल्याला असें सांगत आहे कीं, तुम्ही आमच्या सैन्याला त्रास देऊं नका. तर अशा वेळीं आपण जे शिंद्याची रयत त्या आपलें कर्तव्यकर्म काय असलें पाहिजे ? आपल्या राजावर, आपल्या राज्यावर, आपल्या मुलखावर आणि आपल्या देशावर शत्रु चाल करून येत असतां तो जाहीरनामे काढून आपल्याला असें शिकवीत आहे कीं, तुम्ही आपापल्या घरांत बसून रहा आणि जे हुकूम तुम्हांला पाठविण्यांत येतील, ते तुम्ही पाळा ! अशा वेळीं आपण घरांत बसून रहावें, हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे काय ? आपण आपलीं अशा प्रसंगींचीं कर्तव्यकर्में आपल्या स्वदेशाभिमानापासून शिकावीं किंवा शत्रूंच्या खोडसाळ जाहीरनाम्यापासून तीं आपण घ्यावीं ? वरील जाहीरनाम्यांत असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, ही लढाई रयत लोकांच्या विरुद्ध पुकारण्यांत आलेली नाहीं ! तर मग ही लढाई कोणाच्या विरुद्ध पुकारण्यांत आलेली आहे ? दौलतराव शिंद्याच्या ? मग जी लढाई शिंद्याच्याविरुद्ध पुकारली आहे, ती शिंद्याच्या रयतेच्याही विरुद्ध नाहीं काय ? अर्थात् आहे ! राजा आणि त्याची प्रजा हे दोन्हीं मिळून राज्यरूपी संस्था एकजीव झालेली असते, असें असतां प्रजेला सांगावयाचें कीं, ही लढाई तुमच्या विरुद्ध नाहीं, तर ती केवळ तुमच्या राजाच्या विरुद्ध आहे, ही निवळ लबाडी नव्हे काय ? एखाद्याला सांगावयाचें कीं, तुझ्या हातापायांना धक्का लावण्याचा आमचा बिलकूल विचार नाहीं, तर केवळ तुझा गळा दाबून आम्ही प्राण घेणार आहों, तेव्हां अशा वेळीं तुझे हातपाय कांहीं एक हालचाल न करितां स्तब्ध राहिले, तर

त्यांच्यावर आमची मोठी मेहेरनजर राहील; याचा अर्थ काय ? असें कोणी दुसऱ्याला सांगितलें, तर त्याचा गळा दाबला जात असतां त्याचे हातपाय स्वस्थ रहातील काय ? आणि त्याचप्रमाणें शिंद्याच्या विरुद्ध हा जो हल्ला चाललेला आहे, त्यांत आपला कांहीं संबंध नाहीं, असें म्हणून शिंद्याच्या रयतेनें स्वस्थ बसावें काय ? पण असले हे इंग्लिशांचे फसवणुकीचे जाहीरनामे त्या वेळच्या मूर्ख लोकांना फसवीत होते; आणि राजावर संकट आलें असतां त्याच्या प्रजेला घरांत स्वस्थ बसवावयाला लावून हे जाहीरनामे शिंद्याच्या रयतेंत शिंद्याच्या विरुद्ध जाहीर रीतानें फितुरी उत्पन्न करीत होते ! असले जाहीरनामे इंग्लिशांच्या देशांत येऊन कोणी प्रसिद्ध केले, तर ते इंग्लिशांना पसंत पडतील काय ? गेल्या जर्मन लढाईमध्येंच जर्मन लोक आपल्या ज्या विमानांनीं इंग्लंडवर स्वारी करण्याचा प्रयत्न करीत होते, त्या विमानांतून त्यांनी अशी हस्तपत्रकें खालीं टाकलीं असतीं कीं, हे इंग्लंडमधील लोकांनों, आम्ही फक्त इंग्लंडच्या राजाच्या विरुद्ध ही लढाई सुरू केली आहे, व ही लढाई आम्हीं तुमच्या विरुद्ध मुळींच पुकारलेली नाहीं, तेव्हां आमच्या विमानांवर तोफा न सोडतां तुम्ही आपापल्या घरीं स्वस्थ बसावें, तर इंग्लिश लोकांच्या स्वदेशाभिमानाला ही गोष्ट पटली असती काय ? सारांश, असले हे जाहीरनामे मूर्ख लोकांना फसविण्यासाठीं कसे काढलेले असतात, हें या ठिकाणीं आपण शिकलें पाहिजे. व जे आपल्या राजावर संकट, तें आपल्यावर संकट, अशा स्वदेशाभिमानाच्या भावनेनें अशा प्रसंगीं प्रत्येकानें वागण्याला तयार झालें पाहिजे !

ता. ७ आगष्ट १८०३ रोजीं ज. वेलस्ली यांनी वरील जाहीरनामा काढला आणि त्याच्याच दुसऱ्या दिवशीं त्यांनीं अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा घातला. किल्ल्यामध्यें शिंद्याच्या पायदळाची एक पलटण होती, कांहीं घोडेस्वार होते, आणि किल्ल्याचे नेहमीचे संरक्षक असे कांहीं अरब शिपाई होते. या सैन्याकडून किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन करण्याचे नाकारण्यांत आल्यावरून अहमदनगरच्या शहरासभोंवतीं जो तट होता, त्याच्यावर चढून शहरांत प्रवेश करण्याकरितां ज. वेलस्ली यांनीं आपल्या कांहीं तुकड्या पाठविल्या. शहरासभोंवतालच्या भिंती बऱ्याच उंच होत्या व मधून मधून उभारलेल्या बुरुजांच्या योगानें त्या भिंतींचें संरक्षण करतां येण्यासारखें होतें. शत्रूचे लोक शिड्या लावून या भिंतीवर चढले. परंतु भिंतीच्या माथ्यावर उभें रहाण्याला जागा नसल्यामुळे किल्ल्याच्या आंतून या वर चढून आलेल्या शत्रूच्या लोकांवर जो गोळ्यांचा मारा होत होता व भिंतीच्या बुरुजावरून अरब लोकांनीं जो गोळीबार चालविला होता, त्यामुळें पुष्कळ वेळपर्यंत शत्रूचें कांहीं चालेना; आणि नंतर जेव्हां शत्रूचे लोक तटाच्या भिंतीवरून शहरांत शिरले, तेव्हांही शहरच्या घरांमधून आणि रस्त्यामधूनही शत्रूवर जोराचा गोळीबार करण्यांत येत होता. परंतु ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं; आणि शिंद्याचे लोक शहरांतून निघून किल्ल्यांत गेले. या झटापटीमध्यें इंग्लिशांचे ३० लोक मरण पावले आणि सुमारें शंभर सवाशें लोक जखमी झाले.

ता. ८ आगष्ट रोजीं ही लढाई झाल्यानंतर ता. ९ रोजीं अहमदनगरच्या खास किल्ल्यावर कोठून कसा हल्ला करावा, याच्याबद्दल इंग्लिशांची टेहळणी सुरू झाली. पण शहराच्या सभोंवतालची भिंत जशी काबीज करतां आली, तशी किल्ल्याची भिंत सहज

काबीज करतां येण्यासारखी नव्हती. या किल्ल्याची भिंत फार जाड असून मजबूत होती. पण किल्ल्यांच्या भिंती कितीही मजबूत असल्या, तरी त्यांच्याजवळ येऊन त्या भिंतींच्या खालीं मोठमोठाले सुरुंग खणून त्या भिंती उडवून देतां येतात; किंवा शत्रूला जवळ येतां आलें नाहीं, तरी दुरून मोठमोठ्या तोफांचे गोळे टाकून किल्ल्यांच्या भिंतीत भगदाड पाडतां येतात. व हॉविट्झर या नांवाच्या ज्या मोठमोठे गोळे फेकणाऱ्या तोफा असतात, त्यांच्या गोळ्यापुढे तर किल्ल्यांच्या भिंती टिकणें फारच जड जातें. या तोफा कोठें तरी एखाद्या आसपासच्या टेकडीच्या आड सुरक्षितपणें ठेवतां येतात. व त्यांचा मारा कोणत्या जागेवरून चाललेला आहे, हें किल्ल्यांतील लोकांना दिसणें शक्य नसल्यामुळे किल्ल्यांतून त्या तोफांवर नेमका मारा करणें अशक्य होतें. आणि जमिनीच्या पातळीशीं वाटेल तितका लहान किंवा मोठा कोन करून या हॉविट्झर तोफांना आकाशांतून अर्ध-वर्तुळाकार मार्गानें गोळा फेकण्याची सोय असल्यामुळे तो गोळा मात्र विवक्षित ठिकाणीं नेमका मारतां येण्यासारखा असतो. सारांश, सुरुंग आणि हॉविट्झर तोफा यांच्यामुळें जुन्या किल्ल्यांच्या मजबूत भिंतीही संरक्षणाच्या कामीं कमकुवत होऊं लागल्या. तेव्हां या संकटापासून किल्ल्यांच्या भिंतींचें संरक्षण करण्याकरितां पुढे पुढें एक निराळी युक्ति योजण्यांत येऊं लागली. किल्ल्यांच्या मुख्य भिंतीच्या पुढें कांहीं अंतरावर मातीचे मोठमोठे ढीग रचण्यांत येऊं लागले. व या मातीच्या उच्च उंच भिंती बनूं लागल्या. या भिंतींची रचना अशी असे कीं, त्यांची किल्ल्याच्या अंगाकडील बाजू उंच असून दुसरी बाजू मात्र पुढील मैदानाच्या दिशेनें उतरती उतरती होत गेलेली असे. अशा प्रकारच्या या मातीच्या भिंतीपासून दोन प्रकारचे फायदे होतात. या मातीच्या भिंतीची तळाची रुंदी फार मोठी असल्यामुळें सुरुंगाची भीति रहात नाहीं; व शत्रूकडून तोफांचे गोळे आले, तरी ते या मातींत गडप होऊन जातात; आणि एखाद्या किल्ल्याची दगडी किंवा विटांची भिंत तोफेनें कोसळून पडावी, तसा येथें कांहींच प्रकार होत नाहीं. व याच्याशिवाय आणखी एक मोठा फायदा आहे तो असा कीं, शत्रु या मातीच्या भिंतीच्या दरडीवरून वर चढून येऊं लागला असतां आंतील किल्ल्याच्या भिंतीवरील लोकांना आयताच समोरून मारा करण्याला फार सोईचें पडतें. अशा प्रकारच्या मातीच्या दरडी त्या वेळीं नगरच्या किल्ल्याच्या भोंवतीं चौफेर होत्या. त्यामुळें या किल्ल्यावर यशस्वी रीतीनें हल्ला करण्याचें काम फार अवघड होऊन बसलेलें होतें तरी पण अशा स्थितींतही ज. वेलस्ली यांनीं इंग्रजी शौर्य दाखविण्याची एक युक्ति अखेरीस शोधून काढलीच ! ती युक्ति कोणती ? ती इंग्लिशांची नेहमीचीच युक्ति आहे ! व ती वाचकांनीं न सांगतांही सहज ओळखली पाहिजे ! या वेळीं इंग्लिशांनीं अहमदनगरचा किल्ला कसा शौर्यानें काबीज केला, याच्याबद्दलची अहमदनगर गॅझिटिअरमधील पुढील हकीकत सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती अशीः–

When after capturing the town General Wellesly reconnoitred the fort on the 9th August, the complete protection which the glacis afforded to the wall, made it difficult to fix on a sopt for bombardment. Raghurao Baba, the Desh-

mukh of Bhingar, received a bribe of £ 400 ( Rs. 4000 ) and advised an attack on the east face."

यांतील तात्पर्य असें आहे कीं, अहमदनगर शहर ता. ८ आगष्ट रोजीं ताब्यांत आल्यानंतर ता. ९ आगष्ट रोजीं ज. वेलस्ली यांनीं अहमदनगरच्या किल्लयाची जेव्हां पहाणी केली, तेव्हां त्या किल्लयाच्या संरक्षणाकरितां केलेली मजबुती पाहून त्या किल्लयाच्या भिंतीवर कोठून तोफाचा मारा करावा, हें त्यांना कांहींच समजेना. तेव्हा अहमदगरच्या किल्लयाच्या जवळच भिंगार म्हणून जे एक गांव आहे, तेथील रघुरावबाबा देशमुख यांनीं ४०० पौंडांचा ( म्हणजे ४००० रुपयांचा ) लांच घेतला आणि किल्लयाच्या पूर्व बाजूनें हल्ला करण्याचा मार्ग दाखवून दिला !

हिंदुस्थान देशा ! तुझें स्वातंत्र्य कसें टिकावें ? आपलें स्वातंत्र्य गेलें, म्हणून तूं रडतोस ! पण तुझें स्वातंत्र्य काय म्हणून टिकावें? जेथें तुझ्या पोटचींच पोरें तुझ्या स्वातंत्र्याच्या इमारतीवर निखारे ठेवण्याला तयार होतात, तेथें तुझें स्वातंत्र्य टिकणार कसें ? देशमुख म्हणजे देशाचें मुख ! या देशमुखांनींच जर आपलें मुख अशा प्रकारच्या ह्या ४००० रुपयांच्या लांचाच्या नरकामध्यें खुपसलें, तर, हे हिंदुस्थाना, तुझ्या देशाचें मुख गुलामगिरीच्या दुर्गंधीनें हल्लीं लडबडून गेलेलें असलें, तर त्यांत नवल तें काय ! देशमुख म्हणजे देशाचे मुख्य ! त्या देशांतील मुख्यांनींच जर अशीं हीं हरामखोरपणाचीं कामें करण्याला सुरवात केली तर, हे हिंदुस्थान देशा, तुझें स्वातंत्र्य टिकावयाचें कोणाच्या जोरावर ? देशमुखांना देशमुखीच्या सनदा दिलेल्या असतात, त्या अशा प्रकारचीं देश बुडवण्याचीं कामें करण्याकरितांच दिलेल्या असतात काय ? त्यांनीं देश वसवावा, लोकांना आबाद करावें आणि तेथें आपलें स्वराज्य उभारावें, यासाठीं त्यांना ह्या देशमुख्या मिळालेल्या असतात ना ? पण ज्यांनीं स्वराज्यें उभारावयाचीं, तेच जर आपल्या किल्लयांच्या माऱ्याच्या जागा शत्रूंना दाखवूं लागले, तर, हिंदुस्थाना, हे बिचाऱ्या दुर्दैवी हिंदुस्थाना, तुझ्या पायांमध्यें लोकांनीं लोखंडी गुलामगिरीच्या बिड्या कां ठोकूं नयेत, याबद्दल तूं कांहीं कारण दाखवूं शकशील काय ? हिंदुस्थान देशांतील देशमुखच जर आपल्या फितुरीनें किल्लयांच्या भिंती फोडूं लागतील, तर त्या हिंदुस्थान देशांतील निर्जीव अशा बिचाऱ्या विटा आणि निर्जीव असे बिचारे दगड हे हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याचे किल्ले किती दिवस पडावयाचे थांबवून धरतील ? अरबस्थानांतील अरब शिपायांनीं अहमदनगरच्या किल्लयाच्या बचावासाठीं आपले प्राण द्यावे आणि अहमदनगरच्या जवळील भिंगारच्या एका रघुराव बाबांनीं त्या किल्लयावर कोठून हल्ला करावा ती वाट दाखवून द्यावी, ही किती शरमेची गोष्ट आहे ! या रघुरावबाबांनीं जे ४००० रुपये घेऊन हें अधमपणाचें कृत्य केलें, ते ४००० रुपये केव्हांच नाहींसे झाले असतील ! पण त्या त्यांच्या पातकाचीं फळें अजून-अजून सवाशें वर्षेपर्यंतही—टिकून राहिलेलीं आहेत ! रघुराव बाबांनीं जर हा मार्ग दाखवून दिला नसता, तर कदाचित् अहमदनगरचा किल्ला पुष्कळ दिवस लढला असता. कदाचित् आर्थर वेलस्ली यांचे बरेच दिवस अहमदनरच्या किल्लयासमोरच कुचंबून बसण्यांत फुकट गेले असते, आणि त्यामुळें कदाचित् शिंदे आणि भोसले यांना आपल्या तयारीला

आणि डावपेचाला जास्त अवकाश मिळून असई आणि आरगांव येथील लढायांचे परिणाम कांहीं निराळेच झाले असते ! पण रघुराव बाबांच्या द्रव्यतृष्णेचा खळगा भरण्याला ४००० रुपयांची जर जरूर असली, तर त्याच्यापुढें हिंदुस्थानच्या हिताहिताचा त्या थोर द्रव्यलोभी विभूतींना काय प्रश्न आहे? असल्या लोकांनीं-इंग्लिशांनीं नव्हे-हिंदुस्थानांतील लोकांना गुलाम केले आहे ! असले लोक हिंदुस्थानांत किती तरी पसरलेले आहेत ! कलकत्त्याचे उमीचंद, पुण्याचे बाळाजीपंत, प्रतापसिंग महाराजांच्या पदरचे बळवंत मल्हार चिटणीस, रायगडचा रायनाक महार, मालेगांवचा नांव माहीत नसलेला न्हावी, सातारचा नरसु काकड्या. बुंदेलखंडचा हिंमत बहाद्दर, सहाराणपूरचा वेडबंबूखान आणि भिंगारचा रघुराव बाबा, अशीं कांहीं थोडीशीं नांवें इंग्लिश इतिहासकारांनी आपल्या गुलदस्त्यांतून बाहेर फोडलेलीं आहेत. पण यांच्याशिवाय त्यांच्या गुप्त कागदपत्रांत असल्या स्वदेशद्रोही लोकांचीं किती तरी नांवें झांकून ठेविलेलीं असतील. हिंदुस्थानांत कितीही निरनिराळ्या जाती असल्या, तरी त्या एक वेळ चालतील; पण ही स्वदेशद्रोही लोकांची जात हिंदुस्थानांत निर्माण झाल्यापासून हिनें हिंदुस्थानचे अगणित अकल्याण केलेलें आहे ! महाभारतांतील वनपर्वांत कौरव आपल्याला वनवासाला धाडीत आहेत, याबद्दल भीमाला त्वेष आला नाहीं; तर ज्या द्यूताचा हा परिणाम तें द्यूत धर्म ज्या हातांनीं खेळला, ते हात जाळून टाकण्याकरितां, भीम त्वेषानें आपल्या धाकट्या भावांपाशीं निखारे मागूं लागला ! त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील स्वदेशद्रोही लोकांची ही जात आणि फितुरीचा पैसा घेण्यासाठीं पुढें सरसावणारे त्यांचे ते हात-हे हिंदुस्थानांतून नामशेष झाले पाहिजेत ! हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं ज्यांनीं प्रयत्न केले आणि ज्यांनीं यश संपादिलें, त्या थोर विभूतींचे उत्सव करण्याची आपल्यामध्यें हल्लीं प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. व एकेका शिवाजीचे एकेका वर्षांतून तीन तीन चार चार वेळां महोत्सव साजरे करण्यांत येत आहेत, ही तर त्याच्याहिपेक्षां अभिनंदनीय गोष्ट आहे ! पण नुसते या स्वातंत्र्यप्रिय महात्म्यांचे उत्सव साजरे करून काय होणार आहे ? स्वातंत्र्यप्राप्तीकरितां एक महात्मा प्रयत्न करूं लागला, तर त्याचे पाय खड्यांत आणि खोड्यांत घालण्याकरितां शेंकडों फितुरी महात्मे इंग्रजांच्यापुढें अहमहमिकेनें धावत येतात, अशी हिंदुस्थानची स्थिति आहे ! अशा स्थितींत नुसत्या स्वातंत्र्यप्रिय लोकांचे उत्सव करूनच भागावयाचें नाहीं ! तर त्यांच्याच बरोबर असले जे हे स्वदेशद्रोही आणि फितुरी लोक असतात, त्यांच्या निषेधाचेंही दिवस साजरे करण्याची हिंदुस्थानानें सुरवात केली पाहिजे. आतां यांचे जन्मदिवस साजरे करावे किंवा मृत्यूचे दिवस साजरे करावे, असा साहजिकपणेंच इतिहाससंशोधकांच्यापुढें प्रश्न येईल. हे फितुरी आणि स्वदेशद्रोही लोक ज्या दिवशीं जन्मास येतात, तो दिवस हिंदुस्थानाला अतिशय अनिष्ट होय ! त्या दिवसापासून हिंदुस्थान देश भिऊं लागतो कीं, आतां हा स्वदेशद्रोही मनुष्य मोठा झाला म्हणजे हा काय काय लांच घेईल, काय काय आपलीं खासगीं कामें करून घेईल, काय काय पदव्या मिळवील आणि त्याच्या मोबदल्यामध्यें हा काय काय बातम्या फोडील, कोणकोणाच्या गळ्याला तात लावील आणि कोणकोणत्या रीतीनें आपल्या देशाच्या पारतंत्र्यामध्यें भर घालील कोण जाणे ! पण हा फितुरी महात्मा मरण पावला; म्हणजे हिंदुस्थान देशाचा जीव हायसा होतो !

त्याची धास्ती थांबते ! आणि आतां हा मेल्यामुळें यापुढें तरी हा स्वदेशाची फितुरी करू शकणार नाहीं, असें पाहून त्याची काळजी नाहींशी होते ! तेव्हां अशी परिस्थिति असल्या-मुळे ह्या विश्वासघातकी लोकांचे मृत्यूचे दिवसच तीव्र निषेधाच्या जाहीरसभांनीं साजरे करणें हेंच योग्य होणार आहे. परंतु असल्या या क्षुद्र आणि घाणेरड्या लोकांच्या मृत्युतिथि शोधून काढावयाच्या म्हटलें, तर तें चांगल्या चांगल्या इतिहाससंशोधकांलाही एक मोठें अवघडच काम होणार आहे. तेव्हां ज्यांच्या मरणाचा दिवस ठाऊक नाहीं, त्यांचा पक्ष कर-ण्याकरितां जशी एक सर्वपित्री अमावास्या धर्मशास्त्रानें ठरवून टाकलेली आहे, त्याप्रमाणें वर्षांतील एखादा अतिशय वाईट कुयोगाचा दिवस पाहून तो असल्या या कृतघ्न लोकांच्या जाहीर निषेधासाठीं मुकर करण्यांत यावा ! व कोणी देशद्रोहाचें अधमपणाचें काम केलें असतां त्याचा लोकांना किती तिटकारा आहे हें त्या दिवशीं त्यांच्या फितुरीच्या कृत्यांचे इतिहास सांगून आणि त्यांच्या दुष्परिणामाबद्दल व्याख्यानें देऊन व्यक्त करण्यांत यावें. स्तुति आणि निंदा हीं लोकांच्या हातांत अमोघ अस्त्रें आहेत. त्यांपैकीं सार्वजनिक निंदेचा प्रयोग असल्या देशद्रोही लोकांच्या विरुद्ध जाहीर निषेधाच्या रूपानें केल्याशिवाय हा रोग हिंदुस्थानांतून कधींही नाहींसा होणार नाहीं !

वर सांगितल्याप्रमाणें कपटानें आणि फितुरीनें अहमदनगरचा किल्ला हस्तगत करून घेतल्यानंतर ज. वेलस्ली यांचें सैन्य निजामच्या सरहद्दीच्या रोखानें निघालें. शिंदे आणि भोसले यांचीं सैन्यें हीं आजिंठ्याच्या घाटानें उत्तरेकडून खालीं उतरून औरंगाबाद, जालना, हैद्राबाद, वगैरे शहरांवर हल्ले करावे, अशा हेतूनें निजामच्या सरहद्दीवर येऊन दाखल झालेलीं होतीं, असें इंग्लिशांना वाटत होतें. म्हणून त्यांना अटकाव करण्याकरितां आणि त्यांना लढाई देण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य तिकडे निघालें. ज. वेलस्ली यांच्या हाताखालील सैन्य नगरहून दक्षिणच्या अंगानें गोदावरीच्या डाव्या बाजूच्या कांठानें कूच करीत चाललें होतें. परंतु याचवेळीं क. स्टीव्हनसन यांच्या हाताखालील दुसरें एक सैन्य नगरच्या अलीकडे गारदौंड येथें जमा झालेलें होतें. या सैन्यानें उत्तरच्या बाजूनें कूच करून औरंगाबादेकडे चाल करून यावें असा हुकूम देण्यांत आलेला होता. व अशा दोन निरनिराळ्या मार्गांनीं हीं इंग्लिशांचीं दोन सैन्यें शिंदे आणि भोसले यांच्यावर चाल करून चाललेलीं होतीं.

जेव्हां एकादें मोठें सैन्य अशा रीतीनें कूच करण्याकरितां निघतें, तेव्हां त्या सैन्याचे दोन विभाग करून—त्या दोन विभागांना जरी अखेरीस एकाच उद्दिष्ट ठिकाणावर एकत्र जमावयाचें असतें, तरी तोंपर्यंत मध्यंतरींच्या अवकाशांत—त्यांना दोन निरनिराळ्या रस्त्यांनीं बहुधा पाठविण्यांत येत असतें, हा लष्करी हालचालींचा एक ठराविक प्रघातच पडून गेलेला आहे. व याचें कारणही उघडच आहे. ज्यांत हजारों लोक एकत्र झालेले आहेत, असें एकादें मोठें सैन्य सगळेंच जर एकाच वाटेनें जाऊं लागेल, तर इतक्या लोकांना आणि त्यांच्या जनावरांना अन्नपाणी व दाणावैरण मिळण्याचीही पंचाईत पडते. व हे इतके लोक ज्या प्रांतांतून कूच करीत असतात, त्या प्रांतांत ते असा मोठा दुष्काळ उत्पन्न करतात कीं, त्या आपण उत्पन्न केलेल्या दुष्काळामध्येंच त्यांना मरणाची पाळी येते. शिवाय, एकाच रस्त्यानें इतकें मोठें सैन्य चालून जावयाचें झालें, तर त्या सैन्याची

रांग अनेक कोसच्या कोस लांब वाढते व त्यामुळें सैन्याला जलदीनें कूच करतां येत नाहीं व अशा स्थितींत सैन्याच्या ज्या हालचाली जलदीनें व्हावयाला पाहिजे असतात, त्या होऊं शकत नाहींत. आणि सैन्याची अशी लांबच लांब रांग चाललेली असतां शत्रूनें जर त्या रांगेला मध्येंच गांठलें, तर मात्र मग त्या रांगेंतील सैन्याची दुर्दशा विचारावयालाच नको. त्या रांगेच्या तोंडाशीं पायदळ असलें आणि त्या पायदळाची व शत्रूची लढाई जुंपली, तर त्या पायदळाचे घोडेस्वार आणि तोफखाना हीं मागें राहिल्यामुळें त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. व एक एक विभागावर जय मिळवीत मिळवीत शत्रूला सगळें सैन्य सहज जिंकतां येतें. परंतु हेंच त्या सैन्याचे दोन विभाग करण्यांत येऊन तीं दोन्हीं सैन्यें निरनिराळीं कूच करीत असलीं, तर निरनिराळ्या प्रांतांतून त्यांना अन्नपाण्याचा मुबलक पुरवठा होऊं शकतो, त्यांना कूच करण्याला ऐसपैस अवकाश मिळतो आणि त्यांतील एका विभागावर शत्रूनें हल्ला केला असतां दुसऱ्या विभागांतील सैन्य त्या शत्रूवर दुसरीकडून येऊन हल्ला करूं शकतें, असे या विभागणीच्या तत्त्वामध्यें अनेक फायदे आहेत.


हल्लीं रेल्वे आणि तारायंत्रें हीं नवीन उपयुक्त साधनें उपलब्ध झाल्यामुळें अलीकडच्या सैन्याच्या हालचालींचें शास्त्र फारच प्रगतीला जाऊन पोहोंचलेलें आहे. परंतु शंभर-सव्वाशें वर्षांच्या पूर्वी तशी स्थिति नव्हती आगगाड्यांच्या अभावीं त्या वेळचीं सैन्यें पायांनींच कूच करीत असत. आणि तारायंत्राच्या अभावीं हेर, बातमीदार, हरकारे, वगैरेंच्या साधनांनींच सैन्यांच्या हालचालींच्या बातम्या एकमेकांना कळविण्यांत येत असत. हल्लींचीं सुधारलेलीं साधनें पूर्वी जरी नव्हतीं, तरी त्या वेळच्या मानानें त्या वेळच्या त्या सैन्यांमधून पुष्कळ प्रकारची शिस्त ठेवण्यांत येत असे. एकादें सैन्य कूच करून जावयाचें असलें, म्हणजे त्या वेळची पद्धत अशी होती कीं, सैन्याच्या तळावर पहाटेच्या वेळीं हत्तीवरून किंवा उंटावरून कूच करण्याची नौबद वाजविण्यांत येत असे. ती झाल्याबरोबर बिनीवरचे लोक पुढें जाण्याकरिता निघत असत. त्यांनीं पुढें जाऊन आपल्या लष्कराला पाण्याची आणि सावलीची वगैरे कोठें सोय होईल, हें पाहून त्याप्रमाणें त्यांच्याकडून मुक्कामाची जागा ठरविण्यांत येत असे. नंतर साधारण दिसूं लागलें, म्हणजे सैन्याच्या तळावर दुसरी नौबद वाजून सर्व लष्कर आपापल्या सामानसुमानासुद्धां कूच करण्याला सुरवात करीत असे. हें लष्कर आपल्या नवीन मुक्कामाच्या ठिकाणीं येऊन पोंचलें, म्हणजे कोणत्या पथकानें कोणत्या ठिकाणीं उतरावें, याच्या जागा बिनीवाल्यांनीं आधींच ठरवून ठेविलेल्या असत. व त्याप्रमाणें ज्यांचीं निशाणें जेथें उभारलेलीं असतील, त्या ठिकाणीं तीं पथकें जाऊन मोठ्या व्यवस्थेनें आपल्या डेरेराहुट्या देत असत.

अशा प्रकारच्या या सैन्यांतून खुद्द लढणारे म्हणून जितके शिपाई किंवा घोडेस्वार असत, त्यांच्या मानानें बिनलढवय्ये अशा लोकांचीही संख्या त्यांच्या सभोंवतीं पुष्कळ जमा झालेली असे. घोडे, उंट, हत्ती, या जनावरांचा निगा राखून त्यांना संभाळणारे नोकर, तंबू, डेरे, राहुट्या ठोकणारे लोक, मेणेवाले आणि डोलीवाले भोई, तोफांच्या गाड्या ओढणाऱ्या बैलांची निगा राखणारे नोकर, असे कितीतरी अवांतर लोक सैन्यामध्यें जरूर लागत असत. शिवाय, इतक्या मोठ्या सैन्याला लागणारी अन्नसामग्री वाहून नेणाऱ्या वंजारी

लोकांच्या हजारों बैलांचे तांडेच्या तांडे असत ते निरनिराळेच. आणि याशिवाय या लष्कराच्या बरोबर जो एक फिरता बाजार चालत असे, त्यांतील माणसांची संख्या तर याहून निराळीच असे. हे जे फिरते बाजार या लष्करांच्या बरोबर फिरत असत, त्यांचा तळही सैन्याच्या तळाच्या जवळच कोठें तरी आसपास पडत असे. या बाजारांत सर्व काहीं प्रकारचा माल मिळण्याची व्यवस्था असे. या लष्करी बाजारांतून केवळ जरूरीचे तेवढेच शिधा सामग्रीचे जिन्नस मिळत असत असें नसून मोठमोठ्या स्थायिक शहरांतून मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या चीजवस्तु या बाजारांतूनही विकल्या जात असत. अशी या बाजारांची आणि एकंदर छावणीची व्यवस्था फार उत्तम प्रकारची असे. त्या वेळच्या शिंद्यांच्या अशा प्रकारच्या एका छावणीचें एक उपलब्ध असलेलें चित्र जें पुढें दिलें आहे, त्यावरून वाचकांना त्या वेळच्या लष्करी परिस्थितीची कांहीं अंशीं कल्पना येण्यासारखी आहे, व अशाच प्रकारची बहुतेक व्यवस्था इंग्रजांच्या हाताखालील लष्करामध्यें असे. त्यांचें लष्कर जेव्हां एकाद्या ठिकाणीं छावणी देऊन उतरत असे, तेव्हां एका बाजूला पायदळाचा तळ असे आणि दुसऱ्या बाजूला घोडेस्वारांच्या पागा असत. आणि या दोहोंच्या पोटांत तोफखाना, सामानसुमानाच्या गाड्या वगैरे असत. यांच्या छावणींत जो बाजार असे, त्यामध्येंही सर्व जिनसा मिळत असून सर्व प्रकारचे लोक त्यांत सामील झालेले असत. यांत उपयोगाच्या आणि चैनीच्या अशा सर्व वस्तूंचीं दुकानें असत तेथील सराफांच्या दुकानांतून चांदवडी, बाबाशाही, शिवराई, वगैरे सर्व प्रकारचीं नाणीं वटवली जात असून सर्व ठिकाणच्या हुंड्या देण्यांत आणि घेण्यांत येत असत. सोनें, चांदी, हिरे, मोतीं, वगैरेंचे दुकानदारही या छावण्यांतून असत. आणि सामान्य वस्त्रांची तर गोष्ट राहोच, पण ढाक्याची मलमल आणि काश्मीरच्या शाली, गजनी, मश्रू, मखमल वगैरेसारखें उंची कापडही येथें मिळूं शकत असे. कदाचित् एकाद्या शत्रूचा अकस्मात् छापा येऊन आणि एकादी मोठी लढाई जुंपून ज्या लष्करांतील हजारों लोक दुर्दैवाच्या अवकृपेनें मारले जाण्याचा प्रतिक्षणीं संभव आहे, अशा लष्करांतील या बाजारामध्यें शिंपी उंची कपडे शिवीत आहेत आणि सोनार सोन्यामोत्यांचे दागिने घडवीत आहेत हें पाहून दुःखांत सुख मानून घेण्याची जी ही मानवी प्रवृत्ति, तिच्याबद्दल कोणालाही आश्चर्य वाटल्यावांचून राहाणार नाहीं! उद्यां हे कपडे आणि हे दागिने शत्रूच्या लुटींत लुटले जाणार नाहींत कशावरून आणि ते लुटले गेले नाहींत तरी ते कपडे आणि ते दागिने अंगावर घालण्याला उद्यां कोण जिवंत राहाणार आहे, याबद्दल काडीचीही शाश्वती नसतांना शिंपी कापडाला टांके घालीतच आहे आणि सोनार सोनें ठोकीतच आहे, हें पाहून मनुष्याच्या या अव्याहत व्यवहाराबद्दल आश्चर्यही वाटतें आणि उद्वेगही वाटतो!

पूर्वीच्या काळच्या या लष्करी छावण्यांतून दुसरेही अनेक प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात. हल्लींच्या किंवा त्या वेळच्या दिल्ली, आग्रा, काशी, कलकत्ता, ग्वालेर, इंदूर, हैद्राबाद, वगैरे शहरांच्या मोठमोठाल्या बाजारांतील रस्त्यावरून ज्या गोष्टी दिसत, त्या सगळ्या या लष्करी बाजारांतूनही दृष्टोत्पत्तीस येत असत. त्रागा करून पैसा मिळविणारे फकीर आणि वैरागी हे तेथें असत. दुपारची पोटाची भ्रांत असतांही आपल्या पोतडींतून वाटतील तितके रुपये

काढणारे आणि आपल्या टोपल्यांतून वाटतील तितके साप काढणारे गारोडी आपली पुंगी वाजवीत तेथील रस्त्यांतून फिरत असत. जादुटोणा करणारे मांत्रिक आणि औषधें देणारे वैदु हे




शिंद्यांच्या छावणींतील एक देखावा

तेथें होते, त्याचप्रमाणें उंच काठीच्या टोकावर चढून तेथून कोलांट्या उड्या मारणारे कोल्हाटी दिवसास रस्त्यांतून आपलें ढोलकें बडवीत जात असत; आणि रात्रीं त्यांच्याच पैकीं ज्या

कोल्हाटणी असत, त्यांचे डफतुणतुण्यावरील तमाशेही ठिकठिकाणीं चालत असत. व या व्यसनाला ज्यास्त रंग आणून देण्याकरितां तेथें आसपास कलालांचीं दुकानेंही नसत असें नाहीं. शिवाजीमहाराजांच्या वेळेला सैन्यांच्या छावणींतील शिस्त फार कडक असे अशीं वर्णनें आढळतात. लष्करामध्यें बटीक किंवा कलावंतीण कोणाच्याही बरोबर असूं नये व त्याचप्रमाणें लष्करामध्यें कोणा कलालाचेंही दुकान असतां कामा नये, अशी सक्त ताकीद असे. पण तो धर्मभीरुपणा पुढें इंग्लिशांच्या छावण्यांमधून मुळींच टिकाविण्यांत आला नाहीं. आणि आपल्या शिपायांचें नैतिक वर्तन चांगलें असावें, अशी चाड इंग्लिशानीं बाळगण्याचें तरी काय कारण होतें ? या हिंदी शिपायांनीं आपल्या हिंदी देशबांधवांवर बरोबर गोळीबार केला म्हणजे झालें; मग छावणींत गेल्यावर ते शिपायी वाटेल तें बदमाशपणाचे काम करीनात ! अशी त्या वेळची परिस्थिति होती.

ज. वेलस्ली हे स्वतः नगरहून दक्षिणच्या बाजूकडून औरंगाबादेकडे जाण्याकरितां निघाले. व गारदौंड येथें असलेलें सैन्य आपल्या बरोबर घेऊन क. स्टीव्हन्सन यांनीं उत्तरच्या बाजूनें यावें, अशी व्यवस्था ठरविण्यांत आली होती, हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें हे दोघेहि सेनापति आपापल्या ठिकाणांहून निघाल्यानंतर ज. वेलस्ली यांनीं ता. २४ ऑगस्ट रोजीं गोदावरी नदी ओलांडली, आणि ता. २९ ऑगस्ट रोजीं ते औरंगाबाद येथें येऊन पोहोंचले. इकडे क. स्टीव्हन्सन हे जे गारदौंडहून निघाले ते उत्तरच्या बाजूनें बराच वळसा घेऊन अजिंठ्याच्या जवळच्या डोंगराळ मुलखांतून कूच करून आगस्ट महिन्याच्या अखेरीच्या सुमाराला भाडोलीच्या घाटावर येऊन पोहोंचले. याच्या आधीं थोडे दिवस शिंदे आणि भोसले यांचें लष्कर अजिंठ्याचा घाट उतरून खालीं आलें होतें. व तेथून येऊन त्यांनीं मोंगलाईतील जालना हें शहर हस्तगत केलें होतें; व तेथून पुढें गोदावरी उतरून हैद्राबादेकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. परंतु औरंगाबाद येथें ज. वेलस्ली हे येऊन पोहोंचले आहेत व दुसऱ्या बाजूला भाडोलीच्या घाटावर क. स्टीव्हन्सन यांचें सैन्य येऊन दाखल झालें आहे, असें कळल्यामुळें जालना शहर सोडून ते परत अजिंठ्याच्या घाटाकडे वळले. व त्यांनीं रिकामा केलेला जालना येथील किल्ला क. स्टीव्हन्सन यानें भाडोलीच्या घाटावरून तेथें येऊन ता. २ सप्टेंबर रोजीं आपल्या कबजांत घेतला. अशा रीतीनें औरंगाबाद आणि जालना यांच्या दरम्यानच्या सुमारें ४० मैलांच्या अंतरामध्यें इंग्लिशांच्या फौजा फिरत असल्यामुळें शिंदे व भोसले यांचा गोदावरी उतरून दक्षिणेकडे जाण्याचा मार्ग बहुतेक बंद झाल्यासारखाच झाला होता. आणि म्हणून ते उत्तरेकडे वळले होते. परंतु ज. वेलस्ली हे त्यांच्यावर हल्ला करण्याकरितां न जातां औरंगाबादेसच थांबून राहिले होते. व त्याचें कारण असें होतें कीं, ले. ज. स्टुअर्ट यांनीं दक्षिणेंतून मुद्गल येथून मेजर हिल याच्याबरोबर जें धान्य आणि जो खजिना रवाना केला होता, तो आपल्याला सुरक्षितपणें येऊन पोंचावा, यासाठीं ते वाट बघत बसलेले होते. ती कुमक त्यांना ता. २० सप्टेंबरपर्यंत येऊन मिळाली. व नंतर त्यांनीं आपल्या मुक्कामावरून निघण्याचा विचार ठरविला; पण या मुदतींत जशी इंग्लिशांना कुमक येऊन पोहोंचली, त्याचप्रमाणें शिंद्यांच्या

मदतीलाही हिंदुस्थानांतून बरेंच जास्त सैन्य येऊन पोहोंचलें. पोलमन आणि डयुपॉंट हे दोन फ्रेंच अधिकारी आपल्या बरोबर १६ पलटणी आणि कित्येक चांगल्या तोफा घेऊन शिंद्याला येऊन मिळाले व त्यानंतर ता. २१ आगष्टच्या सुमाराला अजिंठ्याच्या घाटाखालीं जाफराबाद आणि भोकरदन या दोन गांवांच्या दरम्यान मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला. इकडे ता. २० आगष्टपर्यंत सगळी कुमक येऊन पोहोंचल्यानंतर इंग्लिशांच्या फौजाही पुढें चालून जाऊं लागल्या. क. स्टीव्हन्सन यांच्या हाताखालील सैन्य जें जालना येथें होतें, तें तेथून




**अहमदनगरपासून असईपर्यंतचा मार्ग व असईच्या आसपासच्या लष्करी हालचालींचीं ठिकाणें दाखविणारा नकाशा.**

सुमारें ११ मैलांवर असलेल्या बदनापूर या गांवीं ता. २१ सप्टेंबर रोजीं येऊन पोहोंचलें. व तेथें त्या दिवशीं क. स्टीव्हन्सन आणि ज. वेलस्ली यांचीं सैन्यें एकत्र झालीं. त्यानंतर ज. वेलस्ली यांनीं पुढील लढाईची योजना अशी ठरविली कीं, या दोन्ही सैन्यांनीं ता. २२ सप्टेंबर रोजीं सकाळीं बदनापूर येथून निघावें. आणि बदनापूर व जालना यांच्या दरम्यान जे डोंगर आहेत, त्या डोंगराच्या पूर्वेच्या बाजूनें ज. वेलस्ली यांनीं जावें आणि पश्चिमेच्या बाजूनें क. स्टीव्हन्सन यांनीं जावें. आणि ता. २४ सप्टेंबर रोजीं सकाळीं भोकरदन आणि जाफराबाद यांच्या दरम्यान छावणी देऊन राहिलेल्या मराठ्यांच्या सैन्यावर दोघांनीं

मिळून हल्ला करावा. याप्रमाणें बेत ठरवून हे दोघेही सेनापति ता. २२ रोजीं सकाळीं आपापल्या रस्त्यानें कूच करून निघाले.

ज. वेलस्ली हे जे आपल्या ठरलेल्या रस्त्यानें ता. २२ सप्टेंबर रोजीं निघाले, ते ता. २३ रोजीं सकाळीं नालनी या नांवाच्या गांवीं येऊन पोंचले. पण येथें आल्यावर त्यांना असें कळलें कीं, नालनीपासून सुमारें ६ मैलांच्या अंतरावर असलेल्या असई या नांवाच्या गांवाजवळ शिंदे आणि भोसले यांचीं सैन्यें तळ देऊन राहिलेलीं आहेत. ही बातमी कळल्या-बरोबर ज. वेलस्ली यांनीं शत्रूच्या सैन्यावर ताबडतोब हल्ला करण्याचा निश्चय केला; व आपल्या जवळची अन्नसामग्री व इतर सामानसुमान हें नालनी येथेंच कांहीं नेटिव पलटणींच्या संरक्षणा-खालीं ठेवून त्यांनीं आपल्या पलटणींना ताबडतोब निघण्याचा हुकूम केला. ता. २३ सप्टेंबर रोजीं सकाळीं नालनीला येऊन पोंचेपर्यंत ब्रिटिश सैन्यानें आधींच १४ मैलांची मजल मारली होती. व आतां नालनीच्या मुक्कामापासून त्यांना आणखी पुढें ६ मैल चालून जावयाचें होतें. हें अंतर चालून जाऊन ते असईच्या रणक्षेत्रापर्यंत जाऊन पोंचण्याला त्यांना दुपारचा एक वाजला. या वेळीं क. स्टीव्हन्सन यांचें सैन्य आणि ज. वेलस्ली यांचें सैन्य यांच्यामध्यें आठ मैलांचें अंतर होतें. तेव्हां तें दुसरें सैन्य लढाईच्या वेळेवर येऊन पोंचण्याचा मुळींच संभव नव्हता. तें सैन्य आपल्या मदतीला येईपर्यंत थांबावें, तर इकडे शिंदे आणि भोसले यांचें सैन्य जें आपल्या आटोक्यांत आलें आहे, तें दुसरीकडे निघून जाईल, अशी ज. वेलस्ली यांना भीति होती. आणि म्हणून क. स्टीव्हन्सन यांची वाट न पाहतां ज. वेलस्ली यांनीं शिंदे आणि भोसले यांच्या लष्करांशीं लढाई देण्याचें ठरविलें. या वेळीं ज. वेलस्ली यांच्या हाताखालीं सुमारें ४॥ हजार ब्रिटिश फौज होती व म्हैसूरचे आणि पुण्याचे मिळून जे घोडेस्वार त्यांच्या मदतीला देण्यांत आले होते त्यांची संख्या सुमारें ५ हजार होती. इतक्या सैन्यानिशीं ज. वेलस्ली यांनीं ताबडतोब हल्ला करण्याचें ठरविलें.

या असईच्या लढाईच्या जागेचा जो नकाशा दिलेला आहे, त्यावरून असें दिसून येईल कीं, खेळणा आणि जुवा या दोन नद्यांचा येथें पूर्वेच्या बाजूला संगम झाला आहे, आणि या दोन नद्यांच्या मध्यें जें मैदान आहे, त्या मैदानावर मराठ्यांचें लष्कर तळ देऊन राहिलें होतें. या मराठ्यांच्या लष्कराची उजवी बाजू भोकरदन या गांवाच्या नजीकपर्यंत पसरली असून या बाजूला घोडेस्वारांच्या पलटणी उभ्या करण्यांत आलेल्या होत्या; व त्या सैन्याच्या डाव्या बाजूला पायदळ आणि तोफखाना असून त्यांच्या रांगा पूर्वेकडे दूरवर पसरलेल्या होत्या. व या घोडेस्वारांच्या आणि पायदळाच्या पलटणींच्या रांगांच्या समोरून खेळणा नदीचा प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात चाललेला होता. या नदीचें पाणी बरेंच खोल असून हिच्या दरडी पुष्कळ उंच होत्या. त्यामुळें दक्षिणच्या बाजूनें येणाऱ्या शत्रूला या खोल पाण्यांतून उतरून आणि इतक्या उंच दरडी चढून वर येणें शक्य नव्हतें. ही जी मराठ्यांच्या सैन्याची छावणी खेळणा नदीच्या कांठीं अशा रीतीनें पडलेली होती, तिच्या संरक्षणाकरितां तिच्या सभोंवतीं हा पाण्यानें भरलेला आयताच एक खोल खंदक तिला मिळालेला होता. या सैन्याच्या पिछाडीच्या बाजूनें कांहीं अंतरावरून जुवा या नांवाची एक नदी वहात येत होती. व तिचा या खेळणा नदीशीं वरूड नांवाच्या

गांवाजवळ संगम झालेला आहे. या जुवा नदीच्या कांठींच असई या नांवाचें खेडें आहे. व पहिल्यानें जरी मराठ्यांचीं सैन्यें शत्रूला लढाई देण्याकरितां खेळणा नदीच्या कांठींच उभीं राहिलेलीं होतीं, तरी पुढें लढाईचें तोंड बदलतां बदलतां अखेरीस पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना, या सगळ्यांचा मारा असईच्या गांवाच्या बाजूलाच फार होऊं लागला. आणि त्यामुळें या लढाईला असईची लढाई असेंच नांव देण्यांत आलें आहे.

ज. वेलस्ली हे सकाळीं नालनीच्या मुक्कामावरून निघाले ते दुपारीं १ वाजण्याच्या सुमारास खेळणा नदीपासून सुमारें एक मैलाच्या अंतरावर येऊन पोंचले व तेथून त्यांना खेळणा नदीच्या पलीकडच्या कांठावर उभीं असलेलीं मराठयांचीं सैन्यें दिसलीं. ते जे प्रथम आले ते मराठयांच्या उजव्या बाजूच्या घोडेस्वाराच्या रांगांच्या ( १ ) समोर आले. पण तेथून त्यांनीं जेव्हां शत्रूच्या सैन्याची सगळी रचना कशी केली आहे हें पाहिलें, तेव्हां या उजव्या बाजूच्या घोडेस्वारांच्या पलटणीवर हल्ला करण्यापेक्षां डाव्या बाजूकडे जेथें मराठयांचें पायदळ ( २ ) उभें होतें, तिकडून हल्ला करणें जास्त फायदेशीर आहे, असें त्यांनीं ठरविलें. शिवाय, मराठयांच्या उजव्या बाजूवर हल्ला करावयाचा असें त्यांनीं ठरविलें असतें, तरी त्या बाजूनें खेळणा नदी उतरून पलीकडे जाण्याला त्यांना मुळींच मार्ग मिळाला नसता. परंतु डाव्या बाजूची स्थिति याच्यापेक्षां अगदीं निराळी होती. या बाजूला खेळणा आणि जुवा या नद्यांच्या संगमाजवळ अलीकडच्या कांठावर पिंपळगांव आणि पलीकडच्या कांठावर वरूड अशीं दोन गांवें होतीं. ज्या अर्थी येथें या दोन कांठांवर हीं दोन गांवें आहेत, त्या अर्थी येथें नदीला बहुतकरून उतार असला पाहिजे, व या गांवच्या लोकांनीं आपल्या नेहमींच्या सोयीकरतां या नदीच्या उंच दरडीही तोडून काढून तेथून जाण्या-येण्यासारखा चांगला रस्ता केलेला असला पाहिजे, ही गोष्ट ज. वेलस्ली यांनीं अदमासानें जाणली; व या उताराच्या वाटेचें ( ३ ) संरक्षण करण्याकरितां मराठयांनीं तेथें कांहीं सैन्यही ठेविलेलें नव्हतें, ही मराठयांची ढोबळ चूकही त्यांच्या लक्षांत आली; आणि त्यामुळें त्यांनीं आपल्या सैन्याचा मोर्चा एकदम या उताराच्या वाटेकडे वळविला. या वेळीं इंग्लिशांचें पायदळ ( ४ ) या पायउताराच्या वाटेकडे कूच करून चाललें असतां इंग्लिशांचे घोडेस्वार ( ५ ) त्या पायदळाच्या पिछाडीचें संरक्षण करीत होते; आणि पुण्याच्या आणि म्हैसूरच्या घोडेस्वारांच्या पलटणी या सैन्याच्या उजव्या बाजूनें (६,७,८) चालल्या होत्या. खेळणा नदीच्या दक्षिणच्या बाजूच्या मैदानांत मधून मधून ज्या खोल घळी होत्या त्यांतून हें इंग्लिश सैन्य लपतछपत येत होते, व त्यामुळें तें बरेंच जवळ येई-पर्यंत मराठयांच्या नजरेस पडूं शकलें नाहीं.

अशा रीतीनें चाललेलें हें जें इंग्रजी सैन्य, तें पिंपळगांवच्या पायउताऱ्यानें पलीकडे गेल्यानंतर ज. वेलस्ली यांनीं खेळणा आणि जुवा या दोन नद्यांच्या दरम्यान जें सुमारें एक मैल रुंदीचें मैदान होतें, त्या मैदानावरील सुमारें अर्ध्या मैलाच्या जागेंत आपल्या पाय-दळाच्या दोन रांगा ( १४ ) उभ्या केल्या व त्या पायदळाच्या पाठीमागें त्यांनीं आपल्या घोडेस्वारांचीं पलटणें ( १५ ) उभीं केलीं. इंग्लिश सैन्याच्या या हालचालींवरून मराठयांना हें आधींच उघड दिसून येऊं लागलें होतें कीं, आपल्या समोरून खेळणा नदी उतरून

इंग्लिश सैन्य आपल्यावर हल्ला करण्याकरितां येऊं शकत नसून आपल्या पायदळाच्या रांगेच्या ( २ ) डाव्या बगलेवर हल्ला करण्याचा त्यांचा विचार असला पाहिजे. आपल्या पायदळाच्या रांगेच्या डाव्या बगलेवर अशा रीतीनें इंग्लिशांच्या सगळ्या सैन्याचा आपण मारा होऊं दिला, तर आपल्या पायदळाच्या डाव्या बाजूची फार खराबी होईल, ही गोष्ट लक्षांत येऊन मराठे सरदारांनीं आपल्या पायदळाची आणि तोफखान्याची पहिली रांग (२) बदलून त्यांनीं आपलें पायदळ ताबडतोब खेळणा नदीच्या डाव्या किनाऱ्यापासून तों जुवा नदीच्या उजव्या किनाऱ्यापर्यंत ( १२ ) पसरविलें. ही मराठ्यांच्या पायदळाची रांग सुमारें एक मैलपर्यंत पसरली असून, त्याची डावी बाजू जुवा नदीच्या कांठच्या थेट असईच्या गांवापर्यंत जाऊन पोहोंचलेली होती; व या असईच्या गांवाच्या आश्रयानेंच त्यांनीं आपला मुख्य तोफखाना ठेविला होता. त्याशिवाय मराठ्यांनीं आपल्या या पहिल्या रांगेच्या ( १२ ) पिछाडीशीं काटकोन करून असईच्या गांवापासून जुवा नदीच्या उजव्या कांठाच्या बाजूनें पश्चिमेकडे सुमारें एक मैलभर पसरलेली अशी आपल्या सैन्याची दुसरी एक रांग (१३) उभी केली होती. मराठ्यांनीं आपल्या पायदळाच्या या ज्या दोन रांगा उभ्या केल्या होत्या, त्यांमध्यें पोलमन याच्या हाताखालील सहा हजार शिपायांची एक तुकडी होती. त्याचप्रमाणें ड्यूपॉंट याच्या हाताखालील अडीच हजार निवडक सैन्यही येथेंच असून बेगम समरू हिच्याकडून मदतीकरितां आलेल्या चार पलटणी मिळून दोन हजार शिपाईही येथेंच होतें. याप्रमाणें या फ्रेंच अंमलदारांच्या हाताखालील एकंदर सैन्याची संख्या सुमारें साडे-दहा हजार झाली होती. आणि याशिवाय शिंद्याच्या बाजूला तोफांची संख्या सुमारें शंभ-राच्या वर होती. व हा तोफखानाही फार चांगल्या रीतीनें तयार करण्यांत आलेला होता. आणि या सगळ्यांच्या मदतीला सुमारें तीसचाळीस हजार घोडेस्वार असून शिवाय शिंदे आणि भोसले यांचीं पायदळाचीं जीं पलटणें होतीं, तीं निराळींच. मराठ्यांच्या या प्रचंड सैन्याच्या विरुद्ध लढण्याकरितां ज. वेलस्ली यांच्या हाताखालीं जें सैन्य उलट बाजूला उभें राहिलें होतें, त्या इंग्रजी सैन्याची संख्या त्या मानानें पुष्कळच कमी होती, असें इंग्रजी इतिहासकारांचें म्हणणें आहे. त्यापैकीं इंग्लिशांच्या पायदळामध्यें तेराशें युरोपियन शिपायी होते; आणि दोन हजार नेटिव शिपाई होते. व युरोपिअन आणि इंडियन घोडेस्वार मिळून एकंदर घोडेस्वारांची संख्या सुमारें बाराशेंपर्यंत होती. व याशिवाय कांहीं तोफखान्याचे लोक होते. म्हणजे सगळे मिळून एकंदर ज. वेलस्ली यांच्या हाताखालीं साडेचार हजारपासून पांच हजारपर्यंत लोक होते, असें दिसतें. आणि यांच्या-शिवाय पुण्याच्या आणि म्हैसूरच्या घोडेस्वारांच्या ज्या पलटणी इंग्लिशांच्या बरोबर होत्या त्या त्यांनीं खेळणा नदीच्या पलीकडेच (९, १०, ११) ठेविल्या असून इंग्लिश सैन्याच्या डाव्या बगलेचें नदीच्या पलीकडून संरक्षण करण्याचें काम त्यांच्याकडे देण्यांत आलें होतें. ज. वेलस्ली यांनीं आपल्या पायदळाच्या दोन रांगा ( १४ ) केल्या होत्या, हें पूर्वीच सांगितलें आहे. त्यांपैकीं पहिल्या रांगेमध्यें ७८वी इंग्रजी पलटण व दोन नेटिव शिपायांच्या पलटणी असून दुसऱ्या रांगेमध्यें ७४ वी इंग्रजी पलटण असून तिच्या जोडीला दोन नेटिव शिपायांच्या पलटणी होत्या. आणि त्यांच्या पाठीमागें घोडेस्वारांची जी तिसरी रांग (१५)

होती, त्या रांगेमध्यें १९ व्या ड्रगून्सच्या पलटणींतील इंग्लिश घोडेस्वार असून त्यांच्याशिवाय नेटिव घोडेस्वारांच्या आणखी तीन पलटणी होत्या. अशा रीतीनें ज. वेलस्ली यांनीं आपल्या सैन्याच्या ज्या रांगा उभ्या केल्या होत्या त्यांच्या उजव्या बाजूला म्हणजे जुवा नदीच्या बाजूला त्यांनीं क. मॅक्सवेल यांची योजना केली होती; व ज. वेलस्ली हे स्वतः त्या रांगांच्या डाव्या बाजूला म्हणजे खेळणा नदीच्या बाजूला उभे राहिले होते.

अशा रीतीनें हीं दोन्हीं सैन्यें त्या खेळणा आणि जुवा ह्या दोन नद्यांच्या दरम्यानच्या दुर्दैवी मैदानावर एकमेकांच्या समोरासमोर लढाईच्या उद्देशानें आणि तयारीनें ता. २३ सप्टेंबर १८०३, शुक्रवार, रोजीं तिसरे प्रहरीं अदमासें तीन वाजण्याच्या सुमारास जेव्हां उभीं राहिलीं, त्यावेळीं हिंदुस्थानचें स्वराज्य आपल्या अंतःकरणामध्यें थरथर कांपत होतें! स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन आपल्या जिवावर उदार होऊन लढणाऱ्या लोकांचा विजय होतो, किंवा फितुर झालेल्या लोकांच्या स्वदेशद्रोही गळ्यामध्यें व्यभिचारिणी विजयश्री माळ घालते, याच्याबद्दल हिंदुस्थानची स्वातंत्र्यदेवता साशंक होऊन राहिली होती! प्लॅसीच्या लढाईमध्येंही इंग्लिशांच्या बाजूला असेंच असईच्याप्रमाणें अगदी थोडें सैन्य होतें, आणि सुजाउद्दौलाच्या सैन्यांतून तोफांचा भडिमार चालला असतां क्लाइव्ह साहेबांचें सैन्य जवळच्या एका आंबराईमध्यें सचिंत मुद्रेनें उभें राहिलेलें होतें. पूर्वी फितुरीचा बेत ठरल्याप्रमाणें सुजाउद्दौलाचा वजीर, मिरजाफर, हा आपल्या धन्याशीं निमकहरामपणा करून आपली फौज घेऊन इंग्लिशांच्या छावणींत केव्हां येऊन मिळतो, इकडे क्लाइव्हसाहेबांच्या शौर्याचे सगळे डोळे लागून राहिलेले होते! त्याप्रमाणे अखेरीस मिरजाफर आपल्या धन्याला सोडून इंग्लिशांना येऊन मिळाला; आणि इंग्लिशांच्या शौर्यानें प्लॅसीची लढाई जिंकली! असईच्या लढाईमध्यें असे जरी कांहीं प्रत्यक्ष झाले नाहीं, व ज. वेलस्ली यांना येथें जरी शिकस्तीची लढाई करावी लागली, तरी मराठ्यांच्या सैन्यांत किती आणि कसकसा फितुर करण्यांत आला होता, हें जें पूर्वी सांगण्यांत आलें आहे, त्यावरून या लढाईचा असा शेवट कसा झाला, हें कोणाच्याही लक्षात येण्यासारखें आहे.

दोन्हीं सैन्यें समोरासमोर उभीं राहिलीं, तेव्हां त्यांच्यामध्यें सुमारें पाव मैलाचें अंतर होतें. इतक्या अंतरावरून ज. वेलस्ली यांनीं मराठ्यांच्या सैन्यावर आपल्या तोफखान्याचा मारा सुरू करण्याचा हुकूम दिला. त्या हुकुमाप्रमाणें कांहीं वेळपर्यंत इंग्लिशांची तोफ चालू राहिली. पण मराठ्यांचें सैन्य इतक्या शौर्यानें आणि इतक्या स्फूर्तीनें लढत होतें कीं, इंग्लिश तोफांच्या माऱ्याचा त्यांच्या उत्साहावर कांहींच परिणाम झाला नाहीं. फ्रेंच शिक्षणाखालीं तयार झालेल्या शिंद्याच्या तोफखान्यामधून इंग्लिशांच्यावर जे गोळे फेकण्यांत येत होते, त्यांच्या योगानें इंग्लिशांच्या बाजूकडील पुष्कळच नुकसान झालें. मराठ्यांच्या तोफखान्याच्या बिनचूक माऱ्यामुळें इंग्लिशांच्या तोफांचे गोलंदाज आणि त्यांच्या तोफांच्या गाड्या ओढणारे बैल हे पुष्कळच मरून पडले. त्यामुळें शत्रूवर पुढें चाल करून जाण्याकरितां आपल्या तोफा ज्या पुढें पुढें ढकलीत न्यावयाला पाहिजे होत्या, त्या ज. वेलस्ली यांना बैलांच्या अभावामुळें पुढें ओढून नेतां येईनात. त्यामुळें त्यांनीं आपल्या

तोफा मागें टाकून दिल्या आणि आपल्या बाकीच्या सैन्याला मराठ्यांच्या अंगावर चालून जाऊन त्यांच्यावर हल्ला करण्याचा हुकूम केला.

या वेळीं इंग्लिशांनीं मराठ्यांच्या सैन्यावर जो हल्ला केला, तो फार जोराचा होता. पण तो हल्ला परतविण्यासाठीं शिंद्याच्या सैन्याकडून जे प्रयत्न करण्यांत आले, तेही कांहीं कमी चिकाटीचे होते, असें नाहीं. मराठ्यांनीं आपल्या पराक्रमाची शिकस्त केली, व इंग्लिशांच्या सैन्याचें कांहीं वेळपर्यंत त्यांनीं कांहीं चालूं दिलें नाहीं. आणि असईच्या बाजूला शिंद्यांचा जो तोफखाना होता, त्यानें तर इंग्लिशांच्या सैन्याची इतकी खराबी केली कीं, त्यामुळें इंग्लिश सैन्याचे हातपायच गळून गेले. ज. वेलस्ली यांच्या पायदळाच्या ज्या दोन रांगा ( १४ ) उभ्या होत्या, त्यांतील दुसऱ्या रांगेमध्यें उजव्या टोंकाला ७४ वी जी पलटण होती, तिच्यांतील माणसें तर शिंद्यांच्या गोलंदाजीमुळें इतकीं मरून गेलीं होतीं कीं, त्या पलटणीच्या रांगेमध्यें फारच थोडीं माणसें शिल्लक राहिलीं होतीं. आपल्या तोफखान्यानें या ७४ व्या पलटणीची ही अशी स्थिति केलेली पाहून जुवा नदीच्या अलीकडच्या कांठावर जी मराठ्यांच्या घोडेस्वाराची एक रांग (१३ )उभी होती, त्या रांगेंतील कांहीं घोडेस्वारांनीं या पलटणीवर हल्ला केला. परंतु इंग्लिशांचे घोडेस्वार अगदीं आयत्या वेळीं या ७४ व्या पलटणीच्या मदतीला आले; आणि म्हणूनच त्यांतील बाकी उरलेल्या लोकांचा बचाव झाला.

पण शिंद्याच्या लष्करांतील तोफांचा मारा जरी अशा जोरानें चालला होता, तरी इंग्लिशांच्या पायदळांतील शिपाई त्या माऱ्याला न जुमानतां आपल्या हातांत बागनेटें घेऊन मराठ्यांच्या फौजेवर तुटून पडले. तेव्हां अशी ही हातघाईची लढाई कांहीं वेळपर्यंत चालली होती. मराठ्यांच्या तोफा चालू असताही इंग्लिशांचे शिपायी त्यांच्या तोफांवर चालून आले; व तेथील गोलंदाजांना त्यांनीं आपल्या बागनेटांनीं मारून टाकून कांहीं तोफा बंद पाडल्या. अशी निकराची आणि हातघाईची लढाई कांहीं वेळ झाल्यानंतर मराठ्यांचें पायदळ थोडथोडें मागें हटूं लागलें. इंग्लिशांचें सैन्य आपल्यापेक्षा अगदीं थोडें आहे, हें त्यांना माहीत होतें; व अशा थोडक्याशा सैन्याच्या समोरून आपण मागें हटावें हें बरोबर नाहीं, असें वाटून मराठ्यांचे शिपायी फिरून आपल्या रांगा धरून शत्रूला तोंड देण्यासाठीं उभे राहण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. इंग्लिशांच्या पायदळानें त्यांना मागें हटवीत नेलें; आणि इंग्लिशांचे घोडेस्वार त्यांच्या रांगांमधून शिरून त्यांनीं मराठ्यांच्या सैन्याची शिस्त मोडून टाकली; त्यामुळें शिंद्यांच्या सैन्याला मागें हटण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. म्हणून शिंद्याचें सर्व लष्कर मागें हटत हटत मोठ्या व्यवस्थेनें जुवा नदीच्या पलीकडे गेलें व तेथें त्यांनीं आपल्या सैन्याची फिरून एक रांग ( १६ ) बनविली.

मराठ्यांचें सैन्य अशा रीतीनें मागें हटत चाललेलें आहे, असें जेव्हां इंग्लिशांनीं पाहिलें, तेव्हां आतां मराठ्यांचा खास पराजय झाला आणि आपला खात्रीनें जय होणार, असें वाटून इंग्लिशांचे शिपाई हुरळून गेले. व ते मराठ्यांच्या सैन्याचा मोठ्या जोरानें पाठलाग करूं लागले ( १७ ). या विजयाच्या आनंदामध्यें ते मराठ्यांचा पाठलाग करूं लागले

असतां या वेळीं आपण आपल्याला कोणत्या संकटांत घालून घेत आहों, याबद्दलची त्या हुरळून गेलेल्या इंग्लिश शिपायांना क्वचितच कल्पना आली असेल. पण या त्यांच्या कृतीनें त्यांनीं आपल्याला ज्या एका भयंकर अवस्थेमध्यें घालून घेतलें, त्याचा प्रकार असा झाला. मराठ्यांच्या सैन्याची पहिली फळी ( १२ ) जेव्हां फुटली आणि जेव्हां इंग्लिशांचे घोडेस्वार त्या मराठ्यांच्या विस्कळीत झालेल्या पहिल्या रांगेमधून पलीकडे जाऊं लागले, तेव्हां मराठ्यांच्या तोफा चालेनाशा झाल्या. आणि अशा वेळीं आपण उगीच उभे राहिलों, तर शत्रूच्या लोकांकडून आपण विनाकारण मारले जाण्याचा संभव आहे, ही गोष्ट लक्षांत आणून मराठ्यांच्या सैन्यपैकीं पुष्कळ गोलंदाज आपापल्या तोफांच्या खालीं मेल्याचें सोंग घेऊन पडले; व त्यांनीं इंग्लिश सैन्याला आपल्यावरून खुशाल पलीकडे जाऊं दिलें. अशा रीतीनें इंग्लिशांचें जें सैन्य पहिल्यानें ( १४ आणि १५ ) या ठिकाणीं उभें होतें, तें तेथून पुढें चाल करून ( १७ ) या जागेकडे गेल्यानंतर हे जे मेल्याचें सोंग घेऊन पडलेले मराठ्यांच्या सैन्यांतील गोलंदाज होते, ते फिरून जिवंत झाले ! आणि मागें ज्या तोफा शिल्लक राहिल्या होत्या, त्या चालू करून त्यांनीं इंग्लिशांच्या पुढें गेलेल्या त्या सैन्याच्या ( १७ ) पिछाडीवर जोरानें हल्ला करण्याला सुरवात केली ! पण इंग्लिश शिपायांना या गोष्टीची खबरही नव्हती. आतां मागें कोणी शत्रु उरला नाहीं असें समजून ते जुवा नदीच्या पलीकडे गेलेल्या ( १६ ) मराठ्यांच्या फौजेचा पाठलाग करीत पुढें चालले होते. व आतां आपण विजयी होऊन मराठ्यांच्या फौजेचा पाठलाग करीत आहों या कल्पनेमुळें हुरळून गेल्या कारणानें इंग्लिशांचे शिपायी शत्रूचा पाठलाग करण्याकरितां म्हणून चार चोहोंकडे वाटतील तसे पांगत चाललेले होते; व त्यामुळें त्यांच्या लाईनीमध्यें शिस्त कशी ती मुळींच राहिली नव्हती.

अशा स्थितींत या विस्कळीत झालेल्या इंग्रजी सैन्यावर केवळ त्यांच्या पिछाडीकडूनच मराठ्यांच्या तोफांचा मारा होऊं लागला होता, असें नसून जुवा नदीच्या पलीकडे ( १६ ) मराठ्यांच्या ज्या पलटणी मोठ्या शिस्तीनें मागें हटत गेल्या होत्या, त्यांनींही फिरून समोरून या इंग्लिशांच्या पलटणींवर गोळीबार करण्याला सुरवात केली; व त्यामुळें इंग्लिशांचें सैन्य मोठ्या कचाटींत सांपडलें. आणि त्या सैन्यावर दोहोंकडून मारा होऊं लागला. या वेळच्या या युद्धाच्या हालचालीमध्यें मराठ्यांनीं आपल्या शत्रूला दोहोंकडून गांठण्याची ही जी युक्ति काढली, ती खरोखरच फार वर्णनीय आहे. व असईच्या लढाईमध्यें मराठ्यांना विजय मिळाला असता, तर रणमैदानावरील सैन्यांच्या हालचालींच्या बाबतींतील मराठ्यांच्या या कौशल्याची भावी लष्करी इतिहासकारांनीं किती तरी तारीफ केली असती; आणि ज. वेलस्लीसारखा पुढें अतिशय प्रसिद्धीस आलेला सेनापति या असईच्या लढाईमध्यें हजर असतांना त्यानें आपलें सैन्य दोन्हीकडच्या गोळीबारांच्या टप्प्यामध्यें येऊं दिलें, या त्याच्या चुकीबद्दल लष्करी लेखकांनीं त्याला किती तरी दोष दिला असता. परंतु मराठ्यांनीं इंग्लिशांच्या सैन्याला जरी अशा रीतीनें दोहोंकडच्या पेंचामध्यें धरलें होतें, तरी त्यांचा अखेरीस पराभव घडवून आणणारीं अनेक कारणें त्या असईच्या रणक्षेत्रावर इंग्लिशांकडून चोहोंकडे तयार करवून ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांच्यामुळें आपल्या

सैन्याच्या दोन रांगांमध्यें इंग्लिशांच्या पलटणी कोंडून धरण्याची मराठ्यांनीं जरी युक्ति योजिली होती, तरी ती घडी विस्कटली. ज. वेलस्ली यांना जेव्हां असें दिसून आलें कीं, आपलें सैन्य मोठ्या अडचणींत सांपडलें आहे, तेव्हां ७८ वी इंग्रजी पलटण आणि नेटिव घोडेस्वारांची पलटण, या पलटणी आपल्या हाताखालीं घेऊन ज. वेलस्ली हे निघाले; व ज्या मराठयांच्या गोलंदाजांनीं इंग्लिशांच्या पिछाडीवर आपल्या तोफांचा हल्ला चालविला होता, त्यांच्यावर ते चाल करून गेले. आणि त्यांनीं त्या तोफांचा मारा बंद पाडला. या वेळीं ते ज्या घोड्यावर बसलें होते, त्या घोड्याला गोळी लागून तो मरण पावला; व खुद्द तेही या वेळीं मोठ्या संकटांत सांपडले होते. परंतु अखेरीस त्यांनीं पिछाडीकडील मारा बंद पाडला. त्याचप्रमाणें इंग्लिश लाइनच्या उजव्या बाजूला असलेले क. मॅक्स्वेल यांनींहि आपल्या हाताखालील १९ व्या ड्रगून्सच्या पलटणींतील इंग्रजी घोडेस्वार आणि कांहीं इतर नेटिव्ह घोडेस्वार घेऊन मराठ्यांच्या पायदळाच्या ज्या पलटणी जुवा नदीच्या पलीकडून समोरून मारा करीत होत्या, त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्याच्या योगानें जरी मराठ्यांना अखेरीस मागें हटावें लागलें, तरी ते या प्रसंगीं इतक्या निकारानें लढले कीं, या लढाईंत खुद्द कर्नल मॅक्स्वेल हा मारला जाऊन शिवाय दुसरेहि पुष्कळ इंग्लिशांकडचे लोक मरण पावले.

ही लढाई दुपारीं सुमारें तीन वाजतां सुरू होऊन संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत चाललेली होती. या लढाईंत शिंद्यांचा प्रधान यादवराव हा मरण पावला. त्याचप्रमाणें इंग्लिशांकडील क. मॅक्स्वेल, कॅ. मॅके, वगैरे बरेच इंग्लिश ऑफिसर्स या लढाईंत मरण पावले. या लढाईंत आपल्याला मराठ्यांकडील ९० तोफा मिळाल्या व त्यांचीं बरींच निशाणेंही आपल्या हातीं लागलीं अशीं वर्णनें इंग्लिशांनीं दिलीं आहेत. या लढाईंत ज. वेलस्ली यांच्या हाताखालीं सुमारें १० हजार सैन्य होतें व मराठयांच्याकडील सैन्याची संख्या अदमासें ५० हजार होती. यांपैकीं इंग्लिशांकडील मेलेल्या शिपायांचा एकंदर मिळून आंकडा ४०० पर्यंत येतो. व शिंद्यांकडील सुमारें १२०० शें लोक मेले असावेत, असा खुद्द ज. वेलस्ली यांचा अदमास आहे. आतां इंग्लिशांच्या १० हजार सैन्यापैकीं जर ४०० लोक मरण पावले, तर त्या मानानें पाहतां सरासरीच्या प्रमाणानें शिंद्याच्या ५० हजार सैन्यापैकीं फक्त बाराशेंच लोक मरण पावले, यावरून इंग्लिशांची या लढाईमध्यें किती खराबी झाली आणि मराठे लोक किती शौर्यानें लढले, हें दिसून येण्यासारखें आहे.

या असईच्या लढाईंत शिंद्यांचें सैन्य चांगल्या रीतीनें तयार केलें गेलेलें असतां व त्या सैन्याची संख्याहि इंग्लिशांच्या सैन्यापेक्षां पुष्कळ मोठी असतां अशा सैन्याचा पराभव कां व्हावा, हा एक मोठा प्रश्न आहे. पण या प्रश्नाचें उत्तर शोधण्याकरितां कोणालाही फार लांब जावयाला नको. फ्रेंच ऑफिसरांकडून चांगल्या रीतीनें तयार करविलेल्या शिंद्यांच्या पलटणींमध्येंच त्यांच्या पराभवाचें कारण होतें! शिंद्याच्या नोकरींतील बहुतेक फ्रेंच ऑफिसर इंग्लिशांनीं फितुर करून ठेविलेले होते, हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. त्या-शिवाय शिंद्यांशीं लढाई सुरू होण्याच्या पूर्वी इंग्लिशांकडून असा एक जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला होता कीं, कोणत्याही नेटिव संस्थानांतील मराठ्यांच्या फौजेमध्यें जे कोणी

इंग्लिश, फ्रेंच किंवा इतर युरोपिअन ऑफिसर नोकरीवर असतील, ते मराठ्यांच्या लष्करांतील, त्या आपापल्या जागा सोडून जर इंग्लिशांच्या लष्करांत येऊन मिळतील, तर त्यांचा बंदोबस्त चांगल्या रीतीनें ठेवण्यांत येईल. या जाहिरनाम्याचा फायदा घेऊन पुष्कळ युरोपिअन ऑफिसर शिंद्याची नोकरी सोडून इंग्लिशांना जाऊन मिळाले. यांपैकीं कांहीं युरोपिअन ऑफिसर असईच्या लढाईच्या पूर्वी शिंद्याचें सैन्य सोडून गेले व कांहीं असईच्या लढाईनंतर गेले. ता. २४ आक्टोबर १८०३ रोजीं ज. वेलस्ली यांनीं गव्हर्नर जनरलला जें एक पत्र लिहिलें आहे, त्यांत ते स्पष्टपणें असें म्हणतात कीं:—Sixteen officers and sergeants belonging to the Campoos, have joined Colonel Stevenson under your Excellency's proclamation of the 29th August. I will hereafter send a list of their names, and an account of the pay each is to receive." या इंग्रजी उताऱ्यामध्यें ज. वेलस्ली हे असें लिहीत आहेत कीं, शिंद्याच्या लष्करी कंपूमधील एकंदर सोळा ऑफिसर आणि सार्जंट गव्हर्नर जनरलच्या ता. २९ ऑगस्टच्या जाहिरनाम्याप्रमाणें, क. स्टीव्हनसन यांच्या सैन्यांत येऊन दाखल झाले आहेत; त्यांचीं नांवें आणि त्यांच्यापैकीं प्रत्येकाला काय काय पगार दिला पाहिजे, याच्याबद्दलची यादी मी मागाहून पाठवीत आहें. या ज्या सोळा फ्रेंच ऑफिसरांनीं शिंद्याची नोकरी सोडली, त्यांमध्यें डयूपॉंट हा एक होता. व हा शिंद्याची नोकरी सोडून बाकीच्या पंधरा ऑफिसरांबरोबर इंग्लिशांना येऊन मिळाला असतां, त्यांना इंग्लिशांकडून पगार मिळण्याची व्यवस्था होत होती, यावरून हे ऑफिसर पूर्वीपासूनच इंग्लिशांना फितुर झालेले असले पाहिजेत, आणि असईच्या लढाईमध्यें या ऑफिसरांनीं फितुरी केली असली पाहिजे, असें अनुमान करण्याला पुष्कळ जागा आहे. त्याचप्रमाणें बेगम समरू हिच्या पलटणीही असईच्या लढाईमध्यें शिंद्यांशीं फितुरी करून इंग्लिशांना जाऊन मिळाल्या असल्या पाहिजेत, असा संशय येण्यालाही कित्येक कारणें आहेत. बेगम समरू हिला फोडण्याचे इंग्लिशांचे प्रयत्न चाललेले होते व त्याप्रमाणें ती केवळ योग्य संधीचीच वाट पहात होती. तिच्या एकंदर चार पलटणी असईच्या लढाईच्या वेळीं शिंद्यांच्या लष्करांत होत्या. त्या पलटणींच्या संबंधानें ज. लेक हे आपल्या एका पत्रामध्यें गव्हर्नर जनरल यांना असें कळवितात कीं:—"Four of her battalions are now with Scindhia, and.........means might be contrived to enable those battalions to join General Wellesley." यावरून बेगम समरूचीं पलटणें फितुर करून तीं इंग्लिशांनीं आपल्या बाजूला वळवून घेतलीं असलीं पाहिजेत, असें उघड दिसतें.

याच्याशिवाय ग्रँट डफ यानेंही आपल्या इतिहासामध्यें या असईच्या लढाईसंबंधानें लिहितांना पुढीलप्रमाणें उद्गार काढलेले आहेतः—Most of Scindhia's battalions ( at Assaye ) laboured under disadvantages by the cessation of the British part of their European officers, who, in consequence of a proclamation by the British

Government quitted the Maratthas at the breaking out of the war.

या इंग्लिश वाक्यांत ग्रँट डफ असें लिहितो कीं, ब्रिटिश सरकारनें या वेळीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केल्यामुळें शिंद्याच्या नोकरीमध्यें जे युरोपियन ऑफिसर होते, त्यांनीं आपल्या नोकऱ्या सोडल्या आणि ते इंग्लिशांच्या सैन्याला येऊन मिळाले; त्यामुळें असई-च्या लढाईच्या वेळीं शिंद्याच्या लष्करामध्यें बराच घोटाळा उडून गेला.

इंग्लिशांनीं या वेळीं अंतस्थ रीतीनें तर अनेक प्रकारची फितुरी चालविली होतीच. पण ता. २९ ऑगस्ट १८०३ चा हा जो जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यामुळें तर फितुरी लोकांना उजळ माथ्यानें आणि राजरोसपणानें फितुरी करण्याला सबब सांपडली. इंग्लिशांनीं असले फितुरीला उत्तेजन देणारे जाहिरनामे प्रसिद्ध केले म्हणून काय झालें ? ज्यांनीं शिंद्याची नोकरी पत्करली होती, त्यांनीं ती इमानेंइतबारें बजावणें हें त्यांचें कर्तव्यकर्म होतें. परंतु जो फितुर होण्याला उद्युक्त झाला, त्याला आपल्या कर्तव्य-कर्माची ओळख कोठून रहाणार ? असईच्या लढाईच्या वेळीं इंग्लिशांच्या पलटणीमध्येंही हिंदुस्थानांतील एतद्देशीय लोक थोडेथोडके होते, असें नाहीं. त्यांना उद्देशून दौलतराव शिंद्यांनीं जर असाच एकादा जाहिरनामा काढला असता, तर कसें झालें असतें ? दुसरे बाजीरावसाहेब अशा प्रकारचे कांहीं प्रयत्न खडकीच्या लढाईच्या आधीं करीत होते. व जे एतद्देशीय लोक इंग्लिशांच्या नोकरींत असतील, त्यांनीं ती नोकरी सोडून आपल्या पक्षाला येऊन मिळावें, अशी त्यांची खटपट होती. याबद्दल त्यांच्यावर फितुरीचा आरोप जर करण्यांत येतो, तर असईच्या लढाईच्या वेळच्या इंग्लिशांच्या या कृत्याला फितुरीशिवाय दुसरें काय नांव द्यावयाचें ? पण परकीय लोकांची नोकरी धरून आपल्या स्वतःच्या राजाच्या विरुद्ध लढणें हें एक स्वदेशद्रोहाचें अत्यंत घोर पातक आहे, याबद्दलची कल्पनाही जेथें हिंदुस्थानांतील लोकांना नाहीं, तेथें इंग्लिशांनीं अमुक केलें आणि आपल्या लोकांनीं अमुक केलें नाहीं, असें म्हणण्यांत तरी काय अर्थ आहे ? स्वदेशभक्ति हा एक सद्गुण आहे आणि स्वदेशद्रोह, मग तो कोणत्याही सबबीखालीं असो, हा एक भयंकर गुन्हा आहे, या गोष्टी जेव्हां हिंदुस्थानांतील लोकांना समजूं लागतील, तेव्हां तो सुदिन होईल !

या असईच्या लढाईमध्यें आणि त्यानंतरच्या दुसऱ्याही कित्येक लढायांमध्यें मरा-ठ्यांचे जे लागोपाठ पराभव होत गेले, त्यांच्यासंबंधानें सर टॉमस मनरो यांनीं Rati-onals of Mahratta defeats या विषयाला अनुलक्षून आपल्या कांहीं पत्रांमधून विवेचन केलेलें आहे. त्यांत अर्थात् त्यांनीं इंग्लिशांच्या फितुरीचें कोठें नांवही काढलेलें नाहीं. पण हें मुख्य कारण झांकून ठेवून त्यांनीं ज्या अवांतर कारणांची आपल्या पत्रांतून मीमांसा केलेली आहे, त्यांत त्यांनीं मुख्य असें प्रतिपादन केलें आहे कीं, फ्रेंच ऑफिस-रांच्या नादीं लागून शिंद्यानें आपलें पायदळ व तोफखाना ज्यास्त वाढवून घोडेस्वारांची संख्या कमी केली, ही त्याची चूक झाली. त्याचे घोडेस्वार पुष्कळ असते, तर गानिमी काव्यानें लढून इंग्लिशांना जेरीस आणण्याचें काम त्याला यशस्वी रीतीनें पार पाडतां आलें असतें. आतां त्याचें पायदळ व तोफखाना यांची जय्यत तयारी असल्यामुळें असईसारख्या

रणक्षेत्रावर शिंद्याचीं सैन्यें इंग्लिशांच्या समोर उभीं राहून कांहीं वेळ लढूं शकलीं हें खरें; पण त्या पायदळामध्यें जो एक प्रकारचा चिवटपणाचा गुण लागतो, तो त्यांत नव्हता. ते म्हणतातः—

His infantry was regular enough, but it wanted steadiness, in which it must always be greatly inferior to ours, from the wan of a national spirit among its officers......at the battle of Assaye, I do not recollect, among all our killed and wounded officers, one that suffiered from a musket-ball or a bayonet, a convincing proof that the Mahratta infantry made very little serious opposition...........As long as his battalions are not under French influence, by being commanded by officers of that nation, it is more our interest that he should keep them up than that he should disband them and raise horse.

या वर दिलेल्या उताऱ्यामध्यें सांगितल्याप्रमाणें इंग्लिशांना शिंद्याकडील फ्रेंच ऑफिसरांचीच काय ती भीति होती. आणि ते फ्रेंच ऑफिसर फितुर करून शिंद्याच्या लष्करांतून काढून घेतल्यानंतर शिंद्याच्या नुसत्या पायदळामध्यें कांहीं त्राण उरणार नाहीं, हें इंग्लिशांना माहीत होतें. प्राण गेला तरी आपल्या जागेवरून मागें हटावयाचें नाहीं, हा जो एक प्रकारचा सर टॉमस मनरो म्हणतात त्याप्रमाणें शिपायांच्या अंगामध्यें चिवटपणा आणि खंबीरपणा ( steadiness ) लागत असतो, तो गुण आपल्या मराठ्यांच्या पुढील पुढील सैन्यांतील शिपायांच्या अंगामध्यें राहिलेला नव्हता किंवा उत्पन्न झालेला नव्हता, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. त्या वेळचीं मराठ्यांचीं सैन्यें दिसावयाला मात्र अर्धा लाख पाऊण लाख दिसावयाचीं; पण इतकें मोठें सैन्य असूनही प्रत्येक लढाई पहावी, तर दोन तीन तासांत खलास! या सैन्यांची मोठी संख्या लढाईच्या वेळीं जय मिळविण्याला फारशी उपयोगी पडत नसून पराभवाच्या आणि पाठलागाच्या वेळीं घोटाळा उत्पन्न करण्याला मात्र चांगली उपयोगी पडत असे! आपलीं इतकीं मोठालीं सैन्यें असून आणि त्या मानानें इंग्लिशांचीं सैन्यें अगदीं लहान असूनही जेथें तेथें आपला पराभव होतो, ही मागील इतिहासांतील गोष्ट पाहून भावी तरुण पिढीच्या मनावर फार वाईट परिणाम होतो, व असला हा धैर्य खचविणारा परिणाम कोणाही तरुण मनुष्याच्या मनावर होणें हें प्रस्तुतच्या राष्ट्रीय दृष्टीनें केव्हांही इष्ट नाहीं. व त्या दृष्टीनें पाहतां आपल्या देशांतील प्रत्येक भावी शिपायाच्या अंतःकरणामध्यें वर सांगितलेला चिवटपणाचा सद्गुण त्याच्या स्वदेशप्रीतीबरोबर आणि त्याच्या शौर्याबरोबरच वृद्धिंगत होत गेला पाहिजे, हें अत्यंत जरूरीचें आहे.

शिवाय, या असईच्या लढाईमध्यें इंग्लिशांच्या बाजूला फक्त सुमारें दहा हजारच सैन्य असून एवढ्या लहानशा सैन्यानें शिंदे आणि भोंसले यांच्याकडील पन्नास हजार

सैन्याचा पराभव करून विजय मिळविला, अशी स्थूल मानानें इंग्लिश इतिहासकारांकडून जी एक प्रौढी मारण्यांत येत असते, तिच्यामध्येंही कित्येक गोष्टी बाद करण्यासारख्या असतात, हें आपण इंडियन लोकांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. नेटिव्ह राजांच्या सैन्यांतलि बाजार आणि त्यांचे बाजारबुणगे नोकर चाकर लोक, वगैरे सगळे धरून नेटिव्ह सैन्याची संख्या इंग्लिश इतिहासकारांकडून बहुधा फुगवून दाखविण्यांत आलेली असते. पण असईच्या लढाईंत शिंद्याच्या बाजूला पन्नास हजार प्रत्यक्ष लढवय्ये लोक होते, असें जरी क्षणभर गृहीत धरलें, तरी त्या लढाईंत हे इतके सगळे शिपायी प्रत्यक्ष उपयोगांत आणले गेलेले नव्हते, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. दुसऱ्या बाजीरावसाहिबांच्या वेळीं पुढें पुणायस प्रसिद्धीस आलेले पुण्याचे रेसिडेंट, मि. एल्फिन्स्टन, हे या असईच्या लढाईच्या दिवशीं सकाळपासून रात्र पडेपर्यंत ज. वेलस्ली यांच्याबरोबर घोड्यावर बसून फिरत होते. त्यांनीं या असईच्या लढाईचें आपल्या पत्रांतून बरेंच तपशीलवार वर्णन दिलेलें आहे. त्यांचें मि. फॉरेस्ट यांनीं जें एक चरित्र प्रसिद्ध केलें आहे, त्यांत या असईच्या लढाईमध्यें इंग्लिशांच्या विरुद्ध लढणाऱ्या शिंद्याच्या सैन्याविषयीं पुढीलप्रमाणें एक मुद्देसूद उल्लेख आढळतो:—

The narrow delta between the Kailna and its northern affluent, the Juah gave sufficient space for Wellesley to employ his small force, but the space was so confined as to restrict the enemy from bringing his immense superiority of numbers into action, and the decisive struggle was therefore limited to almost equal numbers of the two forces.

G. W. Forrest.

या वर दिलेल्या इंग्रजी उताऱ्यावरून हें कोणाच्याही लक्षांत येईल कीं, एका बाजूला खेळणा नदी आणि दुसऱ्या बाजूला जुवा नदी यांच्या दरम्यानच्या आकुंचित जागेमध्यें शिंद्याकडील सगळें पन्नास हजार सैन्य उभें राहणेंच अशक्य होतें. अशा स्थितींत इंग्लिशांचें जितकें सैन्य तेथें उभें राहू शकलें होतें, तितकेंच जवळ जवळ सैन्य शिंद्याच्या बाजूकडे उभें राहिलेलें होतें. व एल्फिन्स्टनसाहेबांच्या प्रत्यक्ष माहितीप्रमाणें असईची लढाई ही खरें बोलावयाचें असल्यास दहा हजार इंग्लिश आणि पन्नास हजार मराठे यांच्या दरम्यान लढली गेली नसून दोन्ही बाजूंचीं प्रत्यक्ष लढणारीं सैन्यें जवळ जवळ सारखींच होतीं, अशी जुनी माहिती आढळून येते.

नवीन प्रकारची यंत्रसामग्री आणि दारूगोळा आपल्यापाशीं नसतो, म्हणून आपले शिपायी पराभव पावतात, असेंही एक कारण देण्यांत येतें; व त्यामध्येंही सत्याचा अंश नाहीं, असें नाहीं. पण असईच्या लढाईच्या वेळीं हें कारण लागू पडण्यासारखें नव्हतें. त्या वेळची तोफखान्याची, बंदुकांची आणि दारूगोळ्याची फ्रेंच अंमलदारांनीं शिंद्याच्या कंपूमध्यें करून दिलेली तयारी प्रतिपक्षाच्या अगदीं बरोबरीची होती. पण नुसत्या चांगल्या तोफा आणि नुसता चांगला दारूगोळा यांनींच विजय मिळत नसून त्या तोफांच्या आणि दारूगोळ्यांच्या पाठीमागें तितकींच चांगलीं माणसें असावीं लागतात. पण शिंद्यांच्या लष्करांतील फ्रेंच अंमल-

दार आणि त्यांच्या हाताखालील पलटणेंच्या पलटणी फितुर झालेली असल्यानंतर, तेथें त्या बिचाऱ्या चांगल्या तोफा असूनही काय करतील ? शत्रूच्या हातीं लूट म्हणून सांपडण्याच्या कामींच अशा स्थितींत त्या तोफांचा उपयोग व्हावयाचा, हें उघडच आहे. पण ही जर फितुरी नसती, तर शिस्त आणि शस्त्रास्त्रें यांच्या दृष्टीनें असईच्या रणांगणावर शिंद्यांच्या शिपायांना विजयश्री प्राप्त होण्याला कोणती कमतरता होती, असें नाहीं. कारण, इंग्लिशांचे असईच्या रणक्षेत्रावरील सेनापति, ज. वेलस्ली हे पुढें कितीहि नांवालौकिकाला चढले असले, तरी निःपक्षपातबुद्धीनें बोलावयाचें झाल्यास असईच्या लढाईमध्यें त्यांनीं फारसें मोठें लष्करी कौशल्य दाखविलें, असें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं एकट्यांनीं जी असईची लढाई सुरू केली, त्याबद्दल सर टॉमस मनरो यांनीं आपल्या एका पत्रामध्यें ज. वेलस्ली यांच्या त्या वेळच्या लष्करी हालचालींविरुद्ध फार जोराचे आक्षेप उत्थापित केले आहेत.

सर टॉमस मनरो यांचें असें म्हणणें होतें कीं, क. स्टीव्हनसन यांचें सैन्य येऊन पोंचण्याचे पूर्वी ज. वेलस्ली यांनीं आपला एकट्याच्याच सैन्यानिशीं शिंद्याबरोबर लढाई सुरू केली, ही गोष्ट योग्य केली नाहीं. कारण, जर कदाचित् शिंद्याच्या सैन्यानें त्या वेळीं ज. वेलस्ली यांचा आधीं पराभव केला असता आणि मग क. स्टीव्हनसन यांच्या सैन्याकडे वळून त्याचा मागाहून निराळा पराभव केला असता, तर इंग्लिशांचें त्या योगानें किती तरी नुकसान झालें असतें, व शिंद्याचें वजन किती तरी पटीनें वाढलें असतें. दुर्दैवानें शिंद्याच्या सैन्याकडून इंग्लिशांचा असई येथे पराभव झाला नाहीं व दैवगतीनें इंग्लिशांना विजय मिळाला, ही गोष्ट वेगळी; परंतु लष्करी सावधगिरीच्या दृष्टीनें ज. वेलस्ली यांच्या हातून ही चूकच झाली, असें सर टॉमस मनरो यांचें मत आहे. या बाबतीमध्यें सर टॉमस मनरो आणि ज. वेलस्ली यांच्या दरम्यान त्या वेळीं झालेला पत्रव्यवहार लष्करी हालचालींच्या धोरणाच्या दृष्टीनें मोठा महत्त्वाचा आणि मनोरंजक आहे. त्यांत ज. वेलस्ली यांनीं क. स्टीव्हनसन यांच्याकरितां न थांबतां आपण एकट्यानेंच कां लढाई दिली याचीं समर्थनें दिलीं आहेत. पण जर दैव प्रतिकूळ झालें असतें, तर हीं सगळीं समर्थनें निरुपयोगी आहेत, असेंच इतिहासकारांनीं आपलें मत दिलें असतें. परंतु एकदां जय झाला, म्हणजे त्याच्याखालीं सर्व चुका झांकून जातात. व त्याप्रमाणें येथेंही स्थिति होऊन अखेरीस सर टॉमस मनरो यांनींही ज. वेलस्ली यांचें अभिनंदनच केलें आहे. तरी पण त्यामुळें ज. वेलस्ली यांच्या हातून झालेली गैरसावधगिरीची चूक इतिहासामध्यें जी नमूद केली गेली आहे, ती अद्यापि तशीच कायम आहे.

असो; अशा प्रकारच्या या असईच्या लढाईच्या इतिहासापासून हल्लींच्या व भावी पिढींतील लोकांनीं पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. तिकडे त्यांचें लक्ष गेलें, तर त्यांत आपल्या देशाचा पुष्कळ फायदा आहे.

# अरगांवची लढाई.

ता. २३ सप्टेंबर १८०३ रोजीं असईची लढाई झाल्यानंतर शिंदे आणि भोंसले यांचीं सैन्यें अजिंठ्याचा घाट उतरून पलीकडे खानदेशांत गेलीं. त्या सैन्याचा पाठलाग करण्याच्या कामावर क. स्टीव्हनसन यांची नेमणूक करून देऊन ज. वेलस्ली हे कांहीं दिवसपर्यंत असई येथेंच राहिले होते. असईच्या लढाईची हकीकत लिहून तयार करून ती त्यांना गव्हर्नर जनरल वगैरेंच्याकडे पाठवायाची होती. व त्याचप्रमाणे असईच्या लढाईंत जखमी झालेल्या लोकांचीही त्यांना कांहीं तरी तजवीज करावयाची होती. व शिवाय हैदराबादेहून कित्येक वंजारी लोक आपल्याबरोबर धान्यानें भरलेले चौदा हजार बैल घेऊन इंग्लिशांच्या छावणींत येऊन मिळण्याकरितां निघाले होते. तेव्हां ही अन्नसामग्री घेऊन येणारा बैलांचा तांडा आपल्या छावणींत सुरक्षितपणें येऊन पोहोंचेल, अशी तजवीज करणें हेंही ज. वेलस्ली यांना जरूर होतें. या अन्नसामुग्रीच्या तांड्यावर छापा घालण्याचा भोंसल्याच्या घोडेस्वारांनीं बेत केलेला होता. त्यामुळें ज. वेलस्ली यांचें तिकडे लक्ष लागून राहिलेलें होतें. आणि म्हणून आपण स्वतः असई येथें आणि असईच्या आसपास राहून क. स्टीव्हनसन यांच्याकडे त्यांनीं शत्रूचा पाठलाग करण्याची कामगिरी सोपविली होती.

असईच्या लढाईनंतर अजिंठ्याचा घाट उतरून शिंदे आणि भोंसले यांचें सैन्य खानदेशांत खालीं उतरल्यावर तीं दोन्हीं सैन्यें निरनिराळ्या मार्गांनीं आपआपल्या मुलखाकडे वळलीं. त्या दोन्ही सैन्यांच्यामध्यें भांडणें सुरू झालीं होतीं, असें इंग्लिश इतिहासकारांनीं कित्येक ठिकाणीं उद्गार काढले आहेत. परंतु वस्तुस्थिति तशी नसून तीं दोन्हीं सैन्यें स्वाभाविकपणेंच आपापल्या हद्दींकडे वळलीं. त्यांपैकीं शिंद्याच्या सैन्याचा पाठलाग क. स्टीव्हनसन यांनीं सुरू केला व भोंसल्यांच्या सैन्याचा पाठलाग करण्याचें काम पुढें कांहीं दिवसांनीं ज. वेलस्ली यांनीं आपलेकडे घेतलें. क. स्टीव्हनसन हा जरी शिंद्याचा पाठलाग करण्याकरितां ता. २४ सप्टेंबरपासून निघालेला होता, तरी पहिले कित्येक दिवसपर्यंत त्याला शिंद्याचे विरुद्ध कांहीं एक करतां आलें नाहीं. असईच्या लढाईनंतरही शिंद्याचे घोडेस्वार आणि पायदळ हीं दोन्हीं प्रकारचीं सैन्यें इतक्या जय्यत तयारीमध्यें

होतीं कीं, त्यांचा पाठलाग करण्याकरितां त्यांच्यावर चालून जाण्याचें क. स्टीव्हनसन याला धैर्य होईना. शिवाय अजिंठ्याचा घाट उतरल्यानंतर तापी नदीच्या कांठा-कांठानें जरी शिंद्याचें लष्कर चाललें होतें, तरी त्याचा पुढील रोंख कोणीकडे आहे, हें इंग्लिशांना कांहीं एक कळेना. एकदां तें सैन्य नर्मदेकडे जात आहे, असें इंग्लिशांना वाटे; तर फिरून तें सैन्य कासाऱ्याचे घाटानें उतरून दक्षिणेंत अहमदनगर, पुणें, वगैरे प्रांतांकडे वळेल कीं काय, अशी इंग्लिशांना भीति वाटत होती. अशा अनिश्चित स्थितींत हळुहळू पाठलाग करतां करतां क. स्टीव्हनसन हे बऱ्हाणपूर येथें येऊन पोंचले. व ता. १६ आक्टोबर १८०३ रोजीं त्यांनीं तें शहर हस्तगत केले. व तेथून अशीरगडच्या किल्ल्यावर हल्ला करून तो किल्लाही त्यांनीं ता. २१ आक्टोबर रोजीं आपल्या स्वाधीन करून घेतला.

इंग्लिशांच्या या विजयाच्या मुळाशींही विश्वासघाताचें बीज दिसून येतें. असईच्या लढाईमध्यें कित्येक युरोपिअन ऑफिसरांनीं शिंद्याला ज्याप्रमाणें दगा दिला, त्याचप्रमाणें बऱ्हाणपूर आणि अशीरगड येथेंही फितुरी आणि विश्वासघात हीं दोन व्हीणभावंडें इंग्लिशांच्या वतीनें गुप्त रीतीनें काम करीत होतींच. अशीरगडचा किल्ला स्वाधीन होण्याच्या-पूर्वी तीन दिवस शिंद्याच्या लष्करांतील नऊ युरोपियन ऑफिसर ब्रिटिश कमांडरच्या छावणींत येऊन दाखल झाले; व गव्हर्नर जनरलनें काढलेल्या जाहिरनाम्याप्रमाणें आम्हांला इंग्लिशांनीं आपल्या संरक्षणाखालीं घ्यावें, असें त्यांनीं सांगितलें. अशा प्रकारची फंदफितुरी ज्या किल्ल्यांतून चाललेली आहे, ते किल्ले टिकाव धरून कसले राहूं शकणार आहेत !

इकडे शिंद्याच्या लष्कराशीं बऱ्हाणपूर, अशीरगड, वगैरे ठिकाणीं क. स्टीव्हनसन यांच्या लढाया चालल्या असतां दुसरीकडे भोसल्याच्या सैन्याच्या विरुद्ध ज. वेलस्ली यांनींही कांहीं किरकोळ हालचाली चालविल्या होत्या. परंतु त्यांत त्यांना फारसें यश कोठेंही आले नाहीं. पण शिंदे यांचा अशीरगडचा किल्ला सर करून घेतल्यानंतर भोसल्यांचा जो गाविलगडचा एक अवघड किल्ला होता, तो हस्तगत करून घेण्याकडे क. स्टीव्हनसन यांनीं आपला मोर्चा वळविला.

आपल्या सैन्यांतील फितुरीमुळें बऱ्हाणपूर आणि अशीरगड हीं दोन ठिकाणें शत्रूच्या स्वाधीन झालेलीं पाहून अशा वेळीं शत्रूपाशीं आपण तूर्त तह करणें हेंच जास्त श्रेयस्कर आहे, असा विचार दौलतराव शिंदे यांनीं आपल्या मनामध्यें आणिला; व बाळोबा कुंजर यांच्या मार्फतीनें त्यांनीं इंग्लिशांशीं तहाचें बोलणें सुरू केलें. या वेळीं इंग्लिशांच्याकडूनही शिंदे आणि भोसले यांचें फारसें मोठें पारिपत्य होत होतें, असें नाहीं. ज. वेलस्ली हे रघोजी भोसल्यांचे विरुद्ध फारसें कांहींच करूं शकले नाहींत; आणि क. स्टीव्हनसन यांनीं बऱ्हाणपूर आणि अशीरगड हीं जरी शिंद्याचीं दोन ठिकाणें विश्वासघाताच्या बळावर आपल्या स्वाधीन करून घेतलीं होतीं, तरी त्यामुळें शिंद्याचें सामर्थ्य फारसें कमी झालेलें होतें असें नाहीं. तेव्हां अशा स्थितींत दौलतराव शिंद्यांकडून जें हें आयतेंच तहाचें बोलणें सुरू करण्यांत आलेलें आहे, त्याचा आपण फायदा घ्यावा, असें ज. वेलस्ली यांना वाटूं लागलें. व शिंद्यांकडून तहाचें बोलणें सुरू करण्याकरितां जे कोणी वकील येतील, त्यांचें स्वागत करून आम्ही त्यांच्याशीं तहाचें बोलणें करतों, असें ज. वेलस्ली यांनीं अखेरीस

बाळोबा कुंजर यांजला कळविलें. व त्याप्रमाणें ता. ११ नोव्हेंबर १८०३ रोजीं यशवंतराव घोरपडे हे वकील म्हणून येऊन त्यांच्या मार्फतीनें दौलतराव शिंदे आणि ज. वेलस्ली यांच्या दरम्यान ता. २३ नोव्हेंबर १८०३ रोजीं एक तात्पुरता करारनामा ठरविण्यांत आला. या करारनाम्याच्या अन्वयें शिंदे आणि इंग्लिश यांच्या दरम्यानची लढाई तात्पुरती बंद ठेविण्यांत आली. पण ही लढाई बंद ठेवतांना उभय पक्षांमध्यें जो मुख्य करार ठरलेला होता, तो असा कीं, एलिचपूरच्या पूर्वेस वीस कोसांवर शिंद्यानें आपलें लष्कर ठेवावें व इंग्लिशांनीं शिंद्याच्या मुलुखामध्यें आपलें सैन्य न आणतां शिंदे आणि इंग्लिश यांच्या सैन्याच्या दरम्यान वीस कोसांचें अंतर कायमचें ठेवण्यांत आलें पाहिजे.

शिंदे आणि भोसले या दोघांच्या मनांत या वेळीं इंग्लिशांशीं तह करण्याची इच्छा होती. परंतु आपण दोघे जोंपर्यंत एकत्र आहों, तोंपर्यंत धूर्त इंग्लिश आपल्याशीं तह करणार नाहींत, हें इंग्रजी मुत्सद्द्यांचें धोरण कदाचित् त्यांच्या लक्षांत येऊन शिंदे आणि भोसले यांनीं आपलीं सैन्यें एकमेकांपासून या वेळीं विभक्त केलीं होतीं. व इतकेंच नव्हे, तर शिंदे आणि भोसले यांच्या दरम्यान हलीं भांडणें सुरू झालीं आहेत, अशाही बातम्या त्या वेळीं बऱ्याच ठिकाणीं पसरलेल्या होत्या. या बातम्यासंबंधानें ज. वेलस्ली यांनीं ता. २४ आक्टोबर १८०३ रोजीं गव्हर्नर जनरलला जें एक पत्र लिहिलें आहे, त्यांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

" It is reported that Dowlut Rao Scindhia and the Rajah of Berar have quarrelled, that the latter intends to endeavour to obtain a peace through the mediation of Amrut Rao, and the former through that of the Peishwa or by secret negotiation. Excepting that these chiefs have separated their armies, I have no reason to believe that they have quarrelled, and I can give your Excelleney no information to enable you to form judgment of the truth of remainder of the report.

शिंदे आणि भोसले यांनीं आपापलीं सैन्यें एकमेकांपासून विभक्त करण्यांत, व त्यांच्यामध्यें भांडणें चाललीं आहेत अशा बातम्या पसरविल्या जाण्यांत, कोणाचा काय हेतु होता, हें आज सांगणें कठिण आहे. परंतु या दोन राजांचीं सैन्यें आपोआपच विभक्त झालेलीं पाहिल्यानंतर त्यांपैकीं प्रत्येक सैन्याशीं निरनिराळ्या लढाया करून त्यांना जेरीस आणावें, ही कल्पना साहजिकपणेंच इंग्लिशांच्या डोक्यांत शिरली; व ते नागपूरच्या भोसल्यांचा जो गाविलगडचा अवघड किल्ला तो हस्तगत करून घेऊन भोसल्याच्या सैन्याचा पाडाव करण्याच्या प्रयत्नाला लागले. शिंदे आणि भोसले यांच्यामध्यें भांडण सुरू झाल्याच्या बातम्या जरी पसरल्या होत्या, तरी यशवंतराव घोरपडे हे जनरल वेलस्ली यांच्यापाशीं जेव्हां तहाचें बोलणें सुरू करूं लागले, तेव्हां शिंदे आणि भोसले या दोघांशींही इंग्लिशांनीं तह करावा, असेंच त्यांचें म्हणणें होतें. परंतु भोसल्याच्या सैन्याचा नाश केल्याशिवाय

भोंसल्याशीं तह करूं नये, असें इंग्लिशांचें धोरण असल्यामुळें शिंदे आणि भोसले याची जूट मोडून त्यांच्यापैकीं इंग्लिशांनीं भोसल्याशीं गाविलगडच्या बाजूला लढाई सुरू ठेविली आणि शिंद्यांशीं मात्र तह करण्याचा आव आणला.

परंतु शिंद्यांशीं देखील तह करण्याची इंग्लिशांची खरोखरीची इच्छा फारशी नव्हतीच. यशवंतराव घोरपडे यांच्याशीं दहा दिवसपर्यंत तात्पुरती लढाई बंद करण्याचा जो करारनामा करण्यांत आला, त्याबद्दलचा वर उल्लेख आला आहे. पण त्या करारनाम्याच्या मूळाशीं इंग्लिशांचे हेतु अगदीं निराळे होते. शिंद्याच्या हाताखालीं जें सैन्य शिल्लक उरलेलें होतें, त्यांत बहुतेक सर्व घोडेस्वारच होते. या घोडेस्वारांच्या पलटणींशीं इंग्लिशांनीं आणखी पुढें लढाई चालू ठेविली असती, तरी त्या लढाईचा त्यांच्यावर कांहीं एक परिणाम झाला नसता. कारण, त्या घोडेस्वारांनीं गनिमी काव्यानेंच लढाई चालविली असती; आणि त्यांचा पाठलाग करावयाचा म्हटला, म्हणजे तर आपल्या अन्नसामग्रीच्या पुरवठ्याचीं साधनें सोडून इंग्लिशांना त्यांच्या पाठीमागें कोठें तरी भटकत फिरावें लागलें असतें. हे आपले सगळे गुप्त हेतु ज. वेलस्ली यांनीं ता. २४ नोव्हेंबर १८०३ रोजीं क. क्लोज यांना लिहिलेल्या एका पत्रामध्यें पुढीलप्रमाणें नमूद केले आहेतः—

"I have agreed to the cessation of hostilities on the ground of my incapability to do Scindhia further injury, as stated in my dispatch to the Governor General of the 24th October; on that of it being impossible to injure his army of horse; on that of the injury he may do me in the operations against Gawilghur and in Guzerat, to which quarter he has sent Bappoojee Scindhia; and on the political ground of dividing his interests from those of the Raja of Berar, and thereby, in fact, dissolving the confederacy."

ज. वेलस्ली यांच्या पोटांतलि कपट वर दिलेल्या प्रकारचें असल्यामुळें त्यांनीं आपल्याला लढाईची तयारी करण्याला फुरसत मिळावी या मुख्य हेतूनें यशवंतराव घोरपडे यांच्याशीं लढाईच्या तात्पुरत्या तहकुबीचा तह केला होता. पण तो तह देखील त्यांनीं टिकाविला नाहीं; आणि ता. २३ नोव्हेंबर १८०३ रोजीं हा तात्पुरता तहनामा झाल्यापासून फक्त पांच दिवसांमध्येंच इंग्लिशांनीं शिंद्याच्या लष्कराशीं अरगांव येथें लढाई केली !

यशवंतराव घोरपडे यांच्याशीं केलेल्या तहनाम्यामध्यें अशी एक अट होती कीं, या तहनाम्यावर दौलतराव शिंदे यांचा सहीशिक्का वगैरे होऊन त्याची प्रत यशवंतराव घोरपडे यांनीं ज. वेलस्ली यांचेकडे ता. २३ नोव्हेंबरपासून १० दिवसांचे आंत आणून द्यावी. पण अशा रीतीनें शिंद्याला १० दिवसांची मुदत दिली असतां ती मुदत संपण्याच्या आंतच ज. वेलस्ली यांनीं शिंद्याशीं लढाई सुरू केली.

वरील करारनाम्यांत अशी एक शर्त होती कीं, दौलतराव शिंदे यांनीं आपलें सैन्य एलिचपूरच्या पूर्वेकडे न्यावें, व इंग्लिशांच्या सैन्यामध्यें व आपल्या सैन्यामध्यें वीस

कोसांचें अंतर कायम ठेवावें. या कराराप्रमाणें दौलतराव शिंदे आपलें लष्कर दहा दिवसांच्या ठरलेल्या मुदतीच्या आंत एलिचपूरच्या पूर्वेला नेण्याची तजवजि करूं लागले होते. व ही गोष्ट घडवून आणण्याला जर १० दिवसांची मुदत उभयपक्षीं ठरविण्यांत आली होती, तर त्या १० दिवसांच्या आंत तरी निदान इंग्लिशांनीं शिंद्यांच्या लष्करावर हल्ला करणें अन्यायाचें होतें. परंतु इंग्लिशांच्या सैन्याची लढाई देण्याला तयारी झाल्यानंतर मग न्याय-अन्यायाकडे त्यांना पहाण्याची काय जरूरी आहे ?

याशिवाय दुसरीही एक गोष्ट अशी होती कीं, अशीरगडचा किल्ला काबीज करून झाल्यानंतर गाविलगडचा किल्ला हस्तगत करून घेण्यासाठीं क. स्टीव्हनसन हे नोव्हेंबरच्या १५ तारखेच्या सुमाराला आपल्या सैन्यासह गाविलगडकडे जाण्याकरितां बऱ्हाणपुराहून निघालेले होते. व त्या सैन्याला मदत करण्याकरितां ज. वेलस्ली यांच्या हाताखालीलही कांहीं सैन्य त्या दिशेकडे चालून जात होतें. त्यामुळें शिंद्यांचें सैन्य जरी एलिचपूरच्या पूर्वेकडे आपल्या ठरलेल्या कराराप्रमाणें जात चालले होतें, तरी ज. वेलस्ली यांचेंही सैन्य त्याच दिशेनें पुढें चाल करून जात असल्यामुळें त्या दोन्हीं सैन्यांच्या दरम्यान २० वीस कोसांचें अंतर कायम ठेविलें पाहिजे ही अट एकट्या शिंद्यालाच कशी पाळतां येणें शक्य होतें ? शिवाय हें दोन्हीं सैन्यांमधील २० कोसांचें अंतर किती दिवसांनीं कायम झालें पाहिजे, याच्याबद्दलचा उलगडा त्या तहाच्या अटीमध्यें कांहींच केलेला नव्हता. तेव्हां त्या तहावर शिंद्यांचें शिक्कामोर्तब होण्याला जी दहा दिवसांची मुदत ठरविण्यांत आलेली होती, तेथपर्यंत तरी निदान इंग्लिशांनीं वाट पहावयाला पाहिजे होती. परंतु इंग्लिशांच्या प्रामाणिकपणाला तसें कांहीं एक करण्याची जरूरी भासली नाहीं. आणि ठरलेल्या मुदतीच्या आंत-तुम्ही शिंद्याच्या सैन्यावर हल्ला करणें न्याय्य होणार नाहीं, असें शिंद्याचे वकील ज. वेलस्ली यांना बजावून सांगत असतां, तिकडे दुर्लक्ष करून-ता. २३ नोव्हेंबर रोजीं केलेला तह ता. २९ नोव्हेंबर रोजीं अरगांव येथें सत्यवादी इंग्लिशांकडून मोडला गेला !

दौलतराव शिंद्यांच्या वतीनें यशवंतराव घोरपडे यांनीं ज. वेलस्ली यांच्याशीं जो करार केला होता, तो करार शिंद्यांकडून कोठें आणि कसा मोडला गेला हें आपल्यासारख्या सामान्य वाचकांना तर समजत नाहींच; पण हिंदुस्थानचे त्या वेळचे गव्हर्नर-जनरल आणि ज. वेलस्ली यांचे बंधु, खुद्द मार्क्विस वेलस्ली, यांनाही हें समजेना कीं, दौलतराव शिंदे यांच्याकडून त्या तात्पुरत्या तहाच्या अटी पाळण्यामध्यें काय चूक झाली आहे, कीं, ज्याच्यासाठीं त्यांच्याशीं अरगांव येथें लढाई करूनच त्यांचें पारिपत्य करणें जरूर होतें ! कारण याच आपल्या शंका मार्क्विस वेलस्ली यांनीं अरगांवच्या लढाईनंतर ता. २३ डिसेंबर १८०३ रोजीं लिहिलेल्या आपल्या एका पत्रामध्यें ज. वेलस्ली यांना पुढीलप्रमाणें विचारलेल्या आहेत. त्या अशा:—I have not yet discovered whether the battle was occasioned by a rupture of the truce on the part of Scindhia; or by Scindhia's refusal to grant to his vakeels the powers which you most properly have required, for the purpose of founding the basis of the negoti-

ation, on the admission of our retention of a part of our conquests; or by Scindhia's re-disavowal of his avowal of Jeswunt Rao Ghoorpareh; or by an accidental rencontre of the armies before the truce had commenced; or by a treacherous junction between Scindhia and the Rajah of Berar.

अशा रीतीनें अरगांवच्या लढाईला शिंद्यांच्याकडून काय कारण घडून आलें हें खुद्द गव्हर्नर जनरलला देखील जेथें समजलें नाहीं, तेथें तें इतरांना कोठून समजणार? तरी पण तें कारण ज. वेलस्ली यांना मात्र समजलें! आणि शिंद्यानें वीस कोस अंतर ठेवण्याची तहांतील अट मोडली, या सबबीवर अरगांवच्या लढाईला ता. २९ नोव्हेंबर रोजीं तिसरे प्रहरीं त्यांनीं सुरवात केली.


गाविलगडचा किल्ला भोसल्यांच्या ताब्यांत होता. तो किल्ला हस्तगत करून घेण्याच्या इरायानें क. स्टीव्हनसन हा बऱ्हाणपूर येथून नोव्हेंबर महिन्याच्या पंधरा तारखेच्या नंतर निघाल्याचें पूर्वींच सांगितलें आहे. त्यानंतर ता. २४ नोव्हेंबरला बाळापूर अकोला येथें वाटेंत त्याचा तळ येऊन पडला. क. स्टीव्हनसन याच्या सैन्याला मदत करण्यासाठीं ज. वेलस्ली हेहीं आपल्या हाताखालील कांहीं लष्कर घेऊन राजूऱ्याच्या घाटानें खालीं उतरले व अशा रीतीनें एकत्र होऊन हीं दोन्हीं सैन्यें गाविलगडकडे चाल करून निघालीं. या वेळीं रघोजी भोंसले आपल्या मुलखांत परत जाण्याकरितां माघारे वळलेले असल्यामुळें नागपुराकडे परत जाणाऱ्या त्यांच्या सैन्याची छावणी पाथरडी येथें पडलेली होती. या सैन्यावर मन्याबापू हे मुख्य अधिकारी होते. व एलिचपूरपासून २० कोस अंतरावर पूर्वेस दौलतराव शिंदे यांनीं आपलें लष्कर न्यावें असें तहाच्या अटीप्रमाणें ठरलेलें असल्यामुळें शिंद्यांचें लष्करही त्या वेळीं त्याच बाजूनें एलीचपूरकडे चाल करून जात होतें. व या शिंद्यांच्या लष्कराची छावणी मन्याबापूच्या छावणीपासून सुमारें चार मैलांच्या अंतरावर शिरसोली येथें होती. शिंद्याच्या लष्करात बहुतेक सगळा घोडेस्वारांचाच भरणा होता. पण मन्याबापू याच्या हाताखालील भोसल्यांच्या लष्करामध्यें पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना, असें तिन्हीं प्रकारचें लढाऊ सैन्य होतें. अशा रीतीनें शिंदे आणि भोसले यांच्या लष्करांच्या छावण्या पडलेल्या असतांना त्यांच्या जवळपासच्याच वाटेनें क. स्टीव्हनसन आणि ज. वेलस्ली यांचींही संयुक्त सैन्यें गाविलगडकडे कूच करून चाललेलीं होतीं. आतां आपण नकाशाकडे पाहिलें, तर एलिचपूर आणि गाविलगड हीं दोन्हींही ठिकाणें जवळ जवळ एकाच दिशेला आणि एकमेकांच्या जवळजवळ असल्याचें आपल्याला आढळून येईल. अशा स्थितींत तहाच्या अटीप्रमाणें एलिचपूरकडे जावयाला निघालेलें शिंद्यांचें लष्कर आणि गाविलगडचा किल्ला घ्यावयाला निघालेलें इंग्लिशांचें लष्कर, हीं दोन्हीं जवळजवळ एकाच दिशेनें चाललीं असल्यामुळें त्या दोन सैन्यांच्यामध्यें वीस कोसांचें अंतर कायम टिकविणें हें एकट्या शिंद्याच्याच हातांत कसें असूं शकणार? या ठरलेल्या तहाच्या अटींतील नंबर दोनची अट अशी होती कीं, शिंद्यानें एलिचपूरच्या पूर्वेस २१ कोसावर आपलें सैन्य न्यावें, पण तें नेतांनाही

आपलें सैन्य आणि इंग्लिशांचें सैन्य यांच्या दरम्यान वीस कोसांचें अंतर ठेविण्याची खबरदारी शिंद्यानें घेतली पाहिजे. (To prevent accidents, and in order to ensure the execution of the 1st article, it is agreed that there shall be an interval of twenty coss between the different British and allied armies, and that the Maharajah will march with his army, and take up a position twenty coss to the eastward of Ellichpoor, and he will forage still further to the eastward.) पण ही अट एकट्या शिंद्यानेंच कशी पाळावयाची ? ही अट दोघांच्याकडून मिळून पाळली गेली पाहिजे. जी टाळी दोन हातांनीं मिळूनच वाजवावयाची, ती टाळी वाजली गेल्याबद्दलचा अपराध एकाच हातावर लादणें हें योग्य होईल काय ? ज्या दिशेनें शिंद्यांचें लष्कर एलिचपूरकडे जात आहे, त्याच दिशेकडे गाविलगडच्या किल्ल्यावर चाल करून जाणारें इंग्लिशांचें सैन्य मागाहून कूच करून आलें आणि त्या दोन्ही सैन्यांत वीस कोसांपेक्षां कमी अंतर एखादे वेळीं राहिलें तर त्याचा दोष शिंद्यांवर कसा यावा ? पण हा विचार कोण करणार ? ज. वेलस्ली यांनीं जगाला असें जाहीर करून टाकलें कीं, या बाबतींत शिंद्यानें तह मोडला आणि म्हणून मला निरुपायास्तव शिंद्यावर हल्ला करणें भाग पडत आहे ! आणि शिंद्यानें अशा रीतीनें तह मोडल्यानंतर गरीब बिचारे ज. वेलस्लीसाहेब हे लढाईशिवाय दुसरें काय करणार ?

पाथरडी येथें भोसल्यांच्या लष्कराची जी छावणी होती, ती तेथून हलविण्यांत येऊन भोसल्यांचें आणि शिंद्यांचें अशीं दोन्हीही लष्करें शिरसोलीच्या पलीकडे चालून गेलीं होतीं. पाथरडीची छावणी मराठ्यांच्या लष्करानें सोडल्यानंतर त्याच ठिकाणीं ज. वेलस्ली हे आपल्या सैन्यासह येऊन दाखल झाले व क. स्टीव्हनसन हेही त्यांना तेथें येऊन मिळाले. त्या वेळीं पाथरडी येथलि एका उंच जागेवरून जेव्हां ज. वेलस्ली हे पाहूं लागले, तेव्हां शिंदे आणि भोसले यांचीं सैन्यें आपल्यापासून पुढें जवळच ४।५ मैलांवर असल्याचें त्याना दिसून आलें. तरी पण इंग्लिशांचें सैन्य बऱ्याच लांबवरून कूच करून आलेलें असल्यामुळें त्याच वेळीं शत्रूशीं सामना करणें बरोबर नाहीं, असें ज. वेलस्ली यांना वाटत होतें. परंतु इंलिश सैन्याच्या आघाडीवर म्हैसूरच्या घोडेस्वारांच्या ज्या कांहीं पलटणी होत्या, त्यांच्याशीं शिंदे आणि भोसले यांच्याकडील घोडेस्वारांच्या झटापटी सुरू झालेल्या ज. वेलस्ली यांना आढळून आल्या, तेव्हां म्हैसूरच्या त्या घोडेस्वारांच्या मदतीला कांहीं पायदळ पाठविण्यासाठीं आणि आपल्या छावणीची जागा मुक्रर करण्यासाठीं ज. वेलस्ली हे पुढे गेले, त्या वेळीं अरगांवच्या मैदानावर शिंदे आणि भोसले यांचें सैन्य लढाईच्या तयारीनें उभें राहिलेलें त्यांना दिसलें. तेव्हां दिवस जरी बराच खालीं गेलेला होता, तरी त्याच वेळीं ताबडतोब लढाई सुरू करण्याचा ज. वेलस्ली यांनीं निश्चय केला.

अरगांव ( अडगांव ) हें एक लहानसें खेडें असून त्या खेड्यापासून कांहीं अंतरावर मराठ्यांचें सैन्य एका सरळ रेषेमध्यें शत्रूवर हल्ला करण्याकरितां उभें करण्यांत आलेलें होतें. मराठ्यांच्या सैन्याची जी रांग शत्रूवर हल्ला करण्याकरितां उभी राहिली होती,

तिच्या जवळ जवळ मध्यभागांतून एक लहानसा ओढा वहात चाललेला होता, व त्या ओढ्यानें मराठ्यांच्या रांगेचे दोन विभाग केलेले होते. त्यांपैकीं डाव्या बाजूला मराठ्यांचें पायदळ आणि तोफा असून त्या तोफांच्या पुढें डाव्या बाजूला भोंसल्यांचे कांहीं घोडेस्वार उभे होते. आणि त्या ओढ्याच्या उजव्या बाजूला शिंद्यांचें लष्कर उभें असून



अरगांवच्या-लढाईचा नकाशा.

त्याच्या पलीकडे शिंद्यांच्या घोडेस्वारांचीं पलटणें उभीं होतीं. मराठ्यांच्या सैन्याची ही एकंदर रांग सुमारें पांच मैलपर्यंत पसरलेली होती. अशा रीतीनें उभें राहिलेल्या मराठ्यांच्या सैन्याला तोंड देण्याकरितां इंग्लिशांनीं आपलें सैन्य दोन रांगांमध्यें त्यांच्या समोर उभें केलें. त्यांपैकीं पहिल्या रांगेमध्यें पायदळ होतें व दुसऱ्या रांगेत घोडेस्वार होते. इंग्लिशांच्या

उजव्या बाजूला ७४ वी आणि ७८ वी अशा दोन पलटणी मुख्य असून त्यांच्या पाठीमागें घोडेस्वारांच्या पलटणी होत्या. डाव्या हाताच्या बाजूला क. स्टीव्हनसन यांचें सैन्य असून त्यांच्या पिछाडीचें संरक्षण निजामच्या आणि म्हैसूरच्या घोडेस्वारांकडून करण्यांत येत होतें. इंग्लिशांच्या सैन्याच्या या रांगा अशा रीतीनें उभ्या करण्यांत येत असतांनाच त्यांच्यावर मराठ्यांच्याकडून तोफांचा मारा सुरू झाल्यामुळें इंग्लिशांच्या सैन्यांत बरीच गडबड उडाली. परंतु तें सैन्य एकदां व्यवस्थित रीतीनें उभें करण्यांत आल्यावर मग ते मराठ्यांवर चाल करून जाऊं लागलें. त्या वेळीं इंग्लिशांच्या उजव्या बाजूला ७४ वी आणि ७८ वी अशा ज्या दोन पलटणी होत्या त्यांच्यावर मराठ्यांच्या डाव्या बाजूकडील पठाणांच्या पलटणींनीं हल्ला करून त्या दोन्ही पलटणींना बरेंच जेरीस आणिलें. त्याचप्रमाणें इंग्लिशांच्या डाव्या बाजूकडे क. स्टीव्हनसन यांच्या हाताखालीं ६ व्या रेजिमेंटपैकीं जी पहिली बॅटेलियन उभी होती, तिच्यावर समोरून मराठ्यांच्या उजव्या बाजूकडून शिंद्यांच्या घोडेस्वारांनीं मोठ्या जोराचा हल्ला केला. परंतु या हल्ल्यामध्यें इंग्लिशांकडील सैन्य टिकाव धरून राहिलें; व त्यामुळें मराठ्यांच्या सैन्याचें कांहीं चालेनासें झालें. व इंग्लिशांच्या सैन्यानें जेव्हां उलट हल्ला केला, तेव्हां मराठ्यांचें सर्व सैन्य मागें हटून रणांगणावरून निघून गेलें.

यानंतर इंग्लिशांकडील घोडेस्वारांनीं बऱ्याच दूरपर्यंत आणि रात्रीच्या बऱ्याच वेळपर्यंत चांदण्यामधून मराठ्यांचा पाठलाग केला. व त्यामुळें मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें. या लढाईंत मराठ्यांच्याकडील ३८ तोफा आणि पुष्कळ दारूगोळा, याचप्रमाणें हत्ती, उंट, आणि इतर पुष्कळ सामानसुमान इंग्लिशांच्या हातीं लागलें. तरीपण या लढाईंत इंग्लिशांचेंही कमी नुकसान झालें असें नाहीं. कारण अरगांव येथें इंग्लिशांकडील सुमारें नऊ दहा युरोपिअन ऑफिसर जखमी होऊन सुमारें साडेतीनशें शिपायी मारले गेले.


या अरगांवच्या लढाईनंतर इंग्लिशांचें सैन्य पुढें गाविलगडचा किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां लगेच दुसरे दिवशीं निघालें. व तो किल्ला पुढें ता. १४ डिसेंबर रोजीं हस्तगत करून झाल्यानंतर ता. १७ डिसेंबर रोजीं रघोजी भोसले यांच्याबरोबर देवगांव येथें तह करण्यांत आला. आणि त्यानंतर ता. ३० डिसेंबर १८०३ रोजीं सुर्जी अंजनगांव येथें शिंदे आणि इंग्लिश यांच्यामध्यें तह होऊन ही दक्षिणेंतील लढाई इ. स. १८०३ या वर्षाच्या समाप्तीबरोबर समाप्त झाली.

# उत्तर हिंदुस्थानांतील लढाया.

# कोइलची लढाई.

पूर्वीं असईच्या आणि अरगांवच्या लढायांचीं जीं वर्णनें देण्यांत आलीं आहेत, तीं फक्त दौलतराव शिंदे यांच्याशीं झालेल्या दक्षिणेंतील लढायांचीं वर्णनें होत. दक्षिणेकडे या लढाया चालल्या असतां उत्तर हिंदुस्थानामध्येंही शिंदे आणि इंग्लिश यांच्या दरम्यान याच सुमाराला लढाया चाललेल्या होत्या. त्या उत्तर हिंदुस्थानांतील लढायांकडे आतां आपल्याला वळावयाचें आहे. दक्षिणेंतील पेशवे आणि निजाम या दोन बलाढ्य राजांचीं राज्यें इंग्लिशांनीं आपल्या अनेक प्रकारच्या युक्त्यांनीं बहुतेक आपल्या कबजांत आणल्यासारखीं केलीं होतीं, व त्यांच्यापासून आतां त्यांना फारशी भीति उरलेली नव्हती. त्या वेळीं इंग्लिशांना जी भीति होती, ती मध्यहिंदुस्थानांतील शिंदे, होळकर आणि भोंसले, या तीन राजांचीच काय ती होती. त्यांपैकीं होळकर याचें शिंद्यांशीं ठीक नसल्यामुळें तो यावेळीं मराठ्यांच्या बनल्या जाणाऱ्या राष्ट्रसंघामध्यें सामील न होतां अलग राहिला होता. आणि त्यामुळें इंग्लिशांचें एक काम आयतेंच झालें होतें. परंतु यशवंतराव होळकर हा जरी या जुटींत सामील झाला नाहीं, तरी शिंदे आणि भोंसले यांच्या जुटीची इंग्लिशांना कमी भीति होती, असें नाहीं. शिवाय, उत्तर हिंदुस्थानांत इंग्लिशांना आणखीही एक जे मोठे प्रबळ शत्रु होते, ते म्हटले म्हणजे फ्रेंच लोक हे होत. या फ्रेंच लोकांचें आणि इंग्लिशांचें यूरोपखंडामध्यच मूळचें हाडवैर जुंपलेलें होतें, व त्याचे परिणाम हिंदुस्थानामध्येंही उद्भवत होते. महादजी शिंदे यांनीं आपल्या सैन्यांत फ्रेंच लष्करी अंमलदार नेमून त्याच्याकडून युरोपिअन धर्तीवर आपलीं पलटणें तयार केलीं होतीं. व तीचपद्धत महादजीच्या पाठीमागें दौलतराव शिंद्यानेंही चालू ठेविली होती. ज्या वेळची ही हकीकत लिहिण्यांत येत आहे, त्या वेळीं अंबाजी इंगळे या नांवाचा शिंद्यांचा एक मोठा सेनापति होता, व त्याच्या हाताखालीं शिंद्यांची बरीच मोठी फौज होती. पण त्याच्याशिवाय शिंद्यांची बाकीची बहुतेक फौज फिलोज, ड्यूपांट, ब्राऊनरिंग, हेसिंग, बोरक्विन्, ड्यूडरनेग, पेरन, डी बॉयनी, वगैरेंसारख्या मोठमोठ्या फ्रेंच अंमलदारांच्या ताब्यांत देण्यांत आलेली होती. व त्या फौजेच्या बंदोबस्ताकरितां दौलतराव शिंद्यानें गंगा आणि यमुना यांच्यामधील दुआबाचा प्रांत या फ्रेंच अंमलदारांकडे तोडून दिलेला होता त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचें जें वर्चस्व वाढलेलें होतें, तें इंग्लिशांना पहावत नव्हतें. आणि त्यामुळें दौलतराव शिंद्याच्या बरोबरच या फ्रेंच सेनापतींचाही इंग्लिश लोक मोठा द्वेष करीत असत.

पण या द्वेषाला आणखीही एक अंतःस्थ कारण होतें. हिंदुस्थानचे त्या वेळचे गव्हर्नर जनरल, मार्क्विस वेलस्ली, हे मोठे महत्त्वाकांक्षी होते. आणि त्यांची महत्त्वाकांक्षा अशी होती कीं, सगळ्या हिंदुस्थानची बादशाही आपणां इंग्लिश लोकांच्या हातांत यावी. पण पूर्वीची हिंदुस्थानची बादशाही मुसलमान लोकांच्या हातांत होती; आणि त्या बादशाहीचा नामधारी मालक, बादशहा शहाआलम, हा होता. हा शहाआलम बादशहा हल्लीं दौलतराव शिंदे याच्या ताब्यांत होता. व त्याच्या राज्यकारभाराची जी व्यवस्था महादजी शिंद्यापासून दौलतराव शिंद्याकडे आली होती, ती त्यानें एम्. पेरन या फ्रेंच सेनापतीकडे सोंपविलेली होती. सारांश, हिंदुस्थानच्या मुसलमानी बादशाहीची सत्ता या वेळीं दौलतराव




## अंतरवेदीचा मुलुख

शिंदे यांच्या हातांत आणि त्यांच्या मार्फतीनें एम्. पेरन ह्या नांवाच्या एका फ्रेंच मनुष्याच्या हातांत होती. ही गोष्ट मार्क्विस वेलस्ली यांच्या महत्त्वाकांक्षेला सहन होत नव्हती. आणि म्हणून शहाआलम बादशहा आणि त्याच्या त्या नामधारी बादशाहीचा अधिकार हा आपल्या हातांत यावा यासाठीं इंग्लिशांची धडपड चाललेली होती. या बादशाहीपणाच्या महत्त्वाकांक्षेनें इंग्लिशांच्या सामान्यतः दगडी अंतःकरणांत दयेचे झरे उत्पन्न केले ! व शहाआलम बादशहाबद्दल त्यांच्या मनांत एकदम कळकळ उत्पन्न होऊं लागली ! दौलतराव शिंदे आणि एम्. पेरन हे शहाआलम बादशहाला अतिशय निर्दयपणानें वागवीत आहेत, असें

इंग्लिशांना वाटूं लागलें ! आणि त्या शहाआलम बादशहाला त्याच्या त्या संकटावस्थेमधून सोडविल्यावांचून आणि त्याची ती बादशाही हुकमत आपल्या हातांत घेतल्यावांचून परमेश्वरानें आपल्यावर टाकलेल्या जबाबदारींतून आपण मुक्त होणार नाहीं, आणि त्यामुळें देवाच्या घरीं आपण अन्यायी ठरूं, या जबरदस्त धार्मिक भीतीमुळें इंग्लिश मुत्सद्यांना रात्रींची झोंप येईनाशी झाली ! व अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें मराठे आणि फ्रेंच या दोघांच्याही सामर्थ्याचा नायनाट करण्याच्या कार्याला मार्क्विस वेलस्ली हे लागले.

वर सांगितलेल्या अंतःस्थ हेतूसाठीं गव्हर्नर जनरल, मार्क्विस वेलस्ली, यांनीं मराठ्यांशीं जें युद्ध या वेळीं उकरून काढिलें, त्याची पूर्वतयारी त्यांनीं गुप्त रीतीनें कशी केली होती आणि शिंद्याच्याविरुद्ध त्याच्या सभोंवतीं लांचलुचपतीनें त्यांनीं चौफेर फंदफितुरीचें जाळें कसें निर्माण केलें होतें, हें पूर्वीच्या असईच्या लढाईच्या प्रसंगामध्यें सविस्तर रीतीनें विशद करून दाखविण्यांत आलेलें आहे. त्याच्याशिवाय उघड रीतीनें त्यांनीं जी तयारी केली होती, तिचें स्वरूप असें होतें कीं, शिंदे भोंसले आणि शिंद्याच्या हाताखालील फ्रेंच सरदारांचीं पलटणें, यांचीं बहुतेक सर्व ठिकाणें हिंदुस्थानच्या मध्यभागांत असल्यामुळें त्यांच्या सभोंवार चारी बाजूंनीं ठिकठिकाणीं सैन्याच्या चौक्या बसवून मराठ्यांच्या सभोंवतीं इंग्लिशांनीं आपल्या सैन्याचा एक प्रकारें गराडाच घातला होता ! पश्चिमेकडे सुरत, बडोदें, खंबायत वगैरे ठिकाणें रोखून धरण्याकरितां कर्नल मरे यांच्या हाताखालीं सुमारें ८ हजार फौज देऊन त्यांना तिकडच्या बंदोबस्ताकरितां ठेवण्यांत आलेलें होतें. त्यानंतर आपण दक्षिणेकडे वळून पाहिलें, तर पुणें, म्हैसूर आणि हैद्राबाद, या तिन्ही ठिकाणचीं राज्यें इंग्लिशांनीं नुकतींच आपल्या दडपशाहीखालीं आणलेलीं असल्यामुळें त्यांच्याबद्दलही त्यांना भीति होतीच आणि मध्य हिंदुस्थानांत व उत्तर हिंदुस्थानांत शिंद्याच्या विरुद्ध आपण लढाई सुरू केली असतां पुणें, म्हैसूर आणि हैद्राबाद, येथील असंतुष्ट असलेले लोक कदाचित् उठून आपल्या पाठीमागून येऊन आपल्यावर हल्ला करतील, अशी इंग्लिशांच्या मनांत शंका असणें स्वाभाविक होतें. आणि म्हणून त्यांनीं पेशव्याच्या संरक्षणाच्या नांवाखालीं वास्तविक आपल्या स्वतःच्याच संरक्षणासाठीं पुण्यास सुमारें दोन हजार सैन्य ठेविलें होतें. आणि त्यानंतर पुण्याच्या दक्षिणेस कृष्णा नदीच्या कांठच्या मुद्गल येथील छावणीमध्यें मेजर जनरल कँबेल यांच्या हाताखालीं सुमारें ४ हजार लोक ठेवण्यांत आलेले होते. दक्षिण महाराष्ट्रांतील कोणी सरदार किंवा जहागिरदार कदाचित् चुकून स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन शिंद्याच्या मदतीला जाण्याला उद्युक्त होतील, तर त्यांना तसे करितां येऊं नये, यासाठीं कँबेल साहेब ही जागा धरून बसले होते. आणि त्याच्याशिवाय म्हैसूरच्या मुलुखांत कांहीं गडबड होऊं नये, म्हणून मुद्गलच्या खालीं म्हैसूरच्या सरहद्दीवरही कांहीं सैन्य ठेवण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें निजामसरकारची राजधानी, हैद्राबाद, येथेंही दोन हजार सैन्य जय्यत तयार होतें, त्यानंतर पूर्व–किनाऱ्यावरील भागांत कटकच्या बाजूला भोंसल्याचे बरेच मुलूख होते; म्हणून त्या बाजूला कर्नल हारकोर्ट याच्या हाताखालीं सुमारें ५ हजार सैन्य देऊन त्याची तिकडील बंदोबस्ताकरितां नेमणूक करण्यांत आली होती. अशा रीतीनें पश्चिम, दक्षिण आणि पूर्व या बाजूंकडील

बंदोबस्त करण्यांत आल्यानंतर उत्तरच्या बाजूला बंगाल, बहार, बनारस, बुंदेलखंड, वगैरे ठिकाणींही सैन्याचे चौकीपहारे बसविणें जरूर होतें; व म्हणून बंगालच्या संरक्षणाकरितां मिदनापूर येथें कर्नल फेनवुइक याच्या हाताखालीं तेराशें लोक ठेवण्यांत आलेले होते. तसेंच शोणभद्र नदीच्या कांठीं कर्नल ब्राऊटन याच्या हाताखालीं कांहीं सैन्य ठेवण्यांत आलें होतें. आणि चुनार व मिर्झापूर या दोन ठिकाणी मिळून बनारसच्या संरक्षणासाठीं सुमारें दोन हजार सैन्य मेजर जनरल डियर हे आपल्या हाताखालीं घेऊन राहिले होते. त्याचप्रमाणें वायव्य दिशेकडील रजपूत लोकांचीं आणि शीख लोकांचीं संस्थानें आपल्याला वचकून रहावींत आणि त्यांनीं मराठ्यांच्या मदतीला येऊं नये, यासाठीं तिकडेही थोडें थोडें सैन्य ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती. अशा रीतीनें सुमारें २५।३०हजार सैन्याचा चौफेर गराडा इंग्लिशांनीं मराठ्यांच्या सभोंवतीं या वेळीं घातलेला होता. यावरून इंग्लिशांच्या दूरदृष्टीच्या धोरणाची आणि अवाढव्य तयारीची वाचकांना बरीच कल्पना येण्यासारखी आहे. असा हा सैन्याचा चौफेर गराडा मराठ्यांच्या लष्कराला पडलेला असल्यामुळें हा त्यांच्या सभोंवतालचा चक्रव्यूह फोडून त्याना बाहेर जाणें शक्य नव्हतें; किंवा बाहेरून त्यांच्या मदतीला दुसरा कोणी येऊं म्हणेल तर तेंही कोणाला शक्य नव्हते. आपल्या हिंदुस्थान देशाच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणाकरितां जिवावर उदार होऊन लढण्याला तयार झालेले जे शिंदे आणि भोंसले, यांच्या मदतीला स्वदेशभक्तीच्या प्रेरणेनें धांवून जाण्याची इच्छा त्या वेळींही लोकांच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे आणि लांचखाऊ हलकटपणामुळें आधींच उत्तरोत्तर कमी होत चाललेली होती. व त्यांतून कदाचित् कोणा प्रामाणिक सरदाराच्या मनांत अशी बुद्धि उत्पन्न झाली, तरी या ठिकठिकाणीं ठेवलेल्या इंग्लिशांच्या सैन्याच्या भीतीमुळें ती जागच्या जागींच जिरून जात होती; इतकेंच नव्हे, तर एखाद्या जमिनी-खालून वहात असणाऱ्या नदीप्रमाणें गुप्त रीतीनें पाण्यासारख्या वहाणाऱ्या लांचाच्या पैशानें त्या वेळच्या लोकांचीं मनें इतकीं कृतघ्न बनून गेलेलीं होती कीं, आपला देश, आपला धर्म, आपलें राज्य किंवा आपलें स्वातंत्र्य, यांपैकीं त्यांच्या डोळ्यांला कांहीं एक दिसत नसून निमकहरामपणा हा त्यांचा त्या वेळीं एक धंदाच बनून गेलेला होता; व त्यासाठीं ते वाटतील तीं लज्जास्पद कृत्यें करण्याला तयार होत असत. यामुळे उत्तरहिंदुस्थानांत बुंदेल-खंडच्या बाजूला या वेळीं कित्येक स्थळीं असे प्रसंग झालेले आहेत कीं, जीं सैन्यें शिंद्याच्या मदतीकरिता म्हणून तयार होत होतीं, त्याच सैन्यांना शिंद्याच्या विरुद्ध लढण्याला इंग्लि-शांच्या पैशानें उद्युक्त केलें.


बाहेरून अशा या राजरोसपणाच्या चौफेर सैन्याच्या नाकेबंदीनें आणि अंतःस्थ रीतीने लांचलुचपतीच्या नाकेबंदीनें सभोवार कडेकोट बंदोबस्त करून झाल्यानंतर या दुहेरी चक्रव्यूहाच्या आंतमध्यें आपल्या बाकी राहिलेल्या सैन्याचे जनरल वेलस्ली आणि लॉर्ड लेक या दोन सेनापतींच्या हाताखालीं एक दक्षिणेकडे आणि एक उत्तरेकडे असे दोन विभाग करून दोहोंकडेहि मार्क्विस वेलस्ली यांनीं शिंद्यांशीं एकदम लढण्याला सुरवात केली. यांपैकीं दक्षिणेकडील लढायांचा शेवट कसा झाला आणि त्यात सत्याला आणि स्वदेशभक्तीला अपयश येऊन लांचखाऊपणाला आणि पारतंत्र्यप्रीतीलाच अखेरीस विजयश्रीनें कशी माळ

घातली, यांचें वर्णन पूर्वी करण्यांत आलेलें आहे. आतां त्याच दुर्दैवी इतिहासाचा उत्तरकडील प्रसंग कसा घडून आला, इकडे आपल्याला वळावयाचें आहे.

दक्षिणेंत ज. वेलस्ली यांनीं शिंद्याशीं इ. स. १८०३ च्या ऑगस्ट महिन्याच्या ६ तारखेला लढाई पुकारली. ही नक्की बातमी उत्तर हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या फौजेचा सेनापति लॉर्ड लेक यांना गव्हर्नर जनरलकडून कळण्याच्या पूर्वींच ता. ७ ऑगस्ट रोजीं लॉर्ड लेक हे आपली कानपूरची छावणी सोडून शिंद्याच्या सरहद्दीकडे आधींच चाल करून निघाले होते. दक्षिकडे आणि उत्तरेकडे अशा दोन्ही बाजूंकडे एकदम लढाया सुरू करून शिंद्याच्या सैन्याला दोहोंकडून दोघांनीं गुंतवून ठेवावयाचें, हा इंग्लिशांचा बेत पूर्वीच ठरलेला असल्यामुळें लॉर्ड लेक हे आपल्या हाताखालील सर्व सैन्यासह कानपूर येथून निघून ता. २८ ऑगस्ट रोजीं ते शिंद्याच्या सरहद्दीवरील कोइल या गांवाजवळ येऊन दाखल झाले. या वेळीं त्यांच्या हाताखालीं प्रत्यक्ष फौज सुमारें ११ हजारपर्यंत होती. व सुमारें ३॥ हजारपर्यंत फौज त्यांनीं बुंदेलखंडच्या माऱ्यावर ठेविली होती. ज. लेक यांच्या हाताखालील सैन्यामध्यें तीन इंग्रजी घोडेस्वारांच्या पलटणी आणि पांच नेटिव्ह घोडेस्वारांच्या पलटणी असून पायदळ पलटणीमध्यें एक युरोपियन पलटण होती. व बाकीच्या अकरा पलटणी नेटिव्ह पायदळाच्या होत्या. या वेळीं अयोध्येच्या नबाबाचें जें राज्य इंग्लिशांनीं आधींच आपल्या ताब्यांत घेतलेलें होतें, त्या राज्यांतून इंग्लिशांना घोड्यांचा व इतर लढाऊ सामानसुमानाचा पुष्कळ पुरवठा झाला. असलीं हीं नेटिव्ह संस्थानें असल्या वेळीं इंग्लिशांच्या कशीं उपयोगीं पडतात, हें सर्वांना माहीतच आहे. अशा रीतीनें सर्व तयारीनिशीं ता. २८ ऑगस्ट रोजीं आपल्या ब्रिटिश हद्दीच्या अगदीं टोंकापर्यंत येऊन ता. २९ ऑगस्ट रोजीं लॉर्ड लेक यांनीं कोइल येथून लागणाऱ्या मराठ्यांच्या हद्दीमध्यें पहांटे ४ वाजतां प्रवेश केला.

अलीगड या नांवाचा दिल्लीपासून सुमारें १४।१५ कोसांवर जो एक अतिशय मजबूत असा सुप्रसिद्ध किल्ला आहे, त्याच्या समोरच्या मैदानांत किल्ल्याच्या जवळच कोइल हें गांव वसलेलें आहे. अलीगडचा किल्ला या वेळीं एम्. पेरन यांच्या ताब्यांत होता. व सेनापति एम्. पेरन यांनीं आपल्या हाताखालील शिपायांना रहाण्याकरितां कोइलच्या गांवाजवळील उंचवट्याच्या एका मैदानावर बऱ्याच बराकी बांधल्या होत्या. व त्यांच्यावरील ऑफिसर लोकांकरितांही त्यांनीं तेथें बंगले उभारले होते. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या स्वतःला राहाण्याकरितां जी एक जागा अलीगडचा किल्ला आणि कोइल गांव यांच्या दरम्यानच्या वाटेवर मध्यभागाच्या सुमाराला तयार केली होती, तीही फार रमणीय होती. या ठिकाणीं या वेळीं ज. एम्. पेरन याच्या हाताखालीं २००० शिपाई, ८००० घोडेस्वार आणि बराच मोठा तोफखाना इतकें सैन्य होतें. व याशिवाय अलीगडच्या किल्ल्याच्या संरक्षणाकरितां किल्ल्यांत जें कांहीं सैन्य होतें तें निराळेंच. अशा सैन्यासह एम्. पेरन हा कोइल येथें रहात असतां, ता. २९ आगष्ट रोजीं सकाळीं इंग्लिशांचें सैन्य त्याच्यावर हल्ला करण्याकरितां पहांटेस ४ वाजतां निघालें. व मध्यंतरींचें ४।५ मैलांचें अंतर चालून आल्यानंतर या इंग्लिशांच्या सैन्यानें सकाळीं ७ वाजतां फ्रेंचांच्या छावणीवर हल्ला करण्याला सुरुवात केली. अलीगडचा किल्ला आणि कोइल येथील फ्रेंच लोकांची छावणी

यांच्या दक्षिणेला एक मोठी दलदल होती. व त्यामुळे त्या दलदलीपासून अलीगडच्या किल्ल्याला एक प्रकारचा सुरक्षितपणा प्राप्त झालेला होता. तो इतका कीं, पावसाळ्यांत तर त्या बाजूनें कोणी शत्रु चालून येणें अगदीं अशक्यच होतें. तेव्हां या दलदलीच्या जागेला दक्षिणच्या बाजूनें वळसा घालून मगच कोइलच्या छावणीवर हल्ला करण्याकरितां जाणें इंग्लि-



कोइलच्या लढाईचा नकाशा.

शांना जरूर होतें. म्हणून इंग्लिशांचे घोडेस्वार आणि पायदळ असें सैन्य त्या दलदलीच्या बाजूबाजूनें (१, १) कूच करून जाऊं लागलें. तें दुरून दृष्टीस पडतांक्षणींच मराठ्यांचें सैन्य त्या दलदलीच्या पूर्वेच्या बाजूनें शत्रूला तोंड देण्याकरितां आणि अडवून धरण्याकरितां पुढें आलें. या मराठ्यांच्या सैन्याच्या रांगा उत्तरेस अलीगडच्या किल्ल्यापासून तों दक्षिणेस

असलेल्या दलदलीच्या शेवटच्या टोंकापर्यंत ताबडतोब पसरल्या. या सैन्यांत सुमारें २०,००० लोक असावे, असा इंग्लिश इतिहासकारांनीं केलेला अजमास आहे. दलदलीच्या दक्षिणच्या टोंकाला एक खेडेगांव ( २ ) आहे, त्या खेडेगांवापर्यंत मराठ्यांच्या सैन्याची डावी बाजू येऊन पोंचलेली होती. आणि त्या सैन्याच्या उजव्या बाजूचें टोंक थेट अली-डच्या किल्ल्यापर्यंत जाऊन पोंचले होतें. दुसऱ्या बाजूनें दलदलीच्या काठाकांठानें येणारें जें इंग्लिशांचें सैन्य त्याच्या उजव्या बाजूला वर सांगितलेलें खेडेगांव ( २ ) आणि डाव्या बाजूला असलेली चिखलानें भरलेली खोल दलदल यांच्या मधूनच त्या सैन्याला वाट काढून येणें जरूर होतें. तेव्हां त्या इंग्लिश सैन्याला या जागीं अडाविणें आपल्याला सोईस्कर आहे, हें पाहून मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं ती नाक्याची जागा अडवून धरली. व या जागेवर हल्ला करून आपली वाट मोकळी करून घेतल्यावांचून आपल्याला पुढे जातां येणार नाहीं, ही गोष्ट ज. लेक यांच्या जेव्हां लक्षांत आली, तेव्हां याच जागेवर जोराचा हल्ला करण्याला ज. लेक यांनीं आपल्या सैन्याला हुकूम केला. येथें बरीच निकराची लढाई झाली. परंतु त्यांत अखेरीस मराठ्यांच्या सैन्याला मागें हटावें लागलें. तरी पण मागें हटतां हटतांही तें सैन्य इंग्लिशांवर हल्ले करीतच होतें. परंतु एका बाजूला दलदल आणि दुसऱ्या बाजूला असलेल्या खेडेगावाजवळ उभें राहिलेलें मराठ्याचें डाव्या टोंकाकडील सैन्य यांच्यामधून वाट काढून इंग्लिशांचें लष्कर पुढील मोकळ्या मैदानावर गेल्यानंतर इंग्लिश सेनापतींनीं हल्ला करण्याच्या शिस्तीनें आपल्या घोड्यावरील तोफखान्याच्या आणि घोडेस्वारांच्या रांगा ( ३, ३, ३ ) बनविल्या. व त्यांच्या पाठीमागें त्या घोडेस्वारांच्या संरक्षणाकरितां इंग्लिशांचें पायदळ ( ४ आणि ५ अशा ) दोन रांगामध्यें उभें राहिलें. अशा रीतीनें उभें राहिलेलें इंग्रजाकडील सैन्य पुढें कूच करून जाऊं लागलें, त्या वेळीं त्याच्या पाठीमागच्या खेडेगांवा ( २ ) तून त्याच्यावर मराठ्यांच्या काहीं शिपायाकडून बंदुकांची फैर झडूं लागली. व त्या इंग्रजी लष्कराच्या समोर ज्या मराठ्यांच्या फौजा होत्या त्यांच्याही बंदुकीच्या गोळ्या त्याच्यावर येऊन पडूं लागल्या. अशा रीतीनें दोहोंकडच्या माऱ्यांत या वेळीं इंग्लिशांचें सैन्य सांपडलें. परंतु पाठीमागच्या ज्या खेड्यां ( २ ) तून गोळीबार चाललेला होता, त्याच्यावर इंग्लिशांच्या एका पलटणीनें हल्ला करून तो गोळीबार थांबविला. आणि नंतर इंग्लिशांचे घोडेस्वार आणि पायदळ असें सैन्य नेटानें चाल करून पुढें जाऊं लागलें. त्यावेळीं मराठ्यांचें सैन्य जरी थोडेथोडें मागें हटत चाललें होतें, तरी त्यांनीं आपल्या बंदुकीचा मारा इंग्रजांच्या फौजेवर एकसारखा चालू ठेविला होता. अशा रीतीनें आपल्या बंदुकीचा मारा चालू ठेवून मराठ्यांचें सैन्य इंग्लिश शिपायाना पुढें पुढें ओढून आणीत होतें. यांत त्यांचा आणखीही एक डाव उघड उघड असला पाहिजे, असें दिसतें. या वेळपर्यंत इंग्लिशांचे घोडेस्वार ( ६ ) व पायदळ ( ७) यांना मराठ्यांच्या शिपायांनीं किल्ल्याच्या बरेंच जवळ जवळ ओढून आणिलें होतें. आणि इतक्या सुमाराला तें इंग्लिशांचें सैन्य येऊन पोंचल्यानंतर किल्ल्याच्या बुरुजांवरील तोफांना सरबती देण्याची सुरवात करण्यांत आली. यावेळीं मराठ्याच्या घोडेस्वारांच्या पलटणी ( ८ ) किल्ल्याच्या बऱ्याच जवळ जाऊन पोंचलेल्या होत्या. त्यामुळें किल्ल्याच्या बुरुजांवरील तोफांचे गोळे त्यांना लागणें

शक्यच नव्हतें. तेव्हां अशा रीतीनें त्यांचें संरक्षण होऊन किल्ल्याकडे चालून येणाऱ्या इंग्लिशांच्या घोडेस्वारांवर आणि पायदळावर त्या तोफांचे गोळे पडावे आणि त्या शत्रूच्या सैन्याचा नाश व्हावा, असा त्या गोलंदाजीचा इरादा होता. व त्याप्रमाणें या गोलंदाजीनें इंग्लिशांचें कांहीं नुकसान झालेंही. पण या किल्ल्यावरील तोफांच्या गोळ्यांना पहिल्या-पहिल्यानें गनीम आपल्यापासून किती अंतरावर आहे याचा अदमास कळेना. त्यामुळें कांहीं गोळे इंग्रजी सैन्यांतलि शिपायांच्या डोक्यांच्या पलकिडे पडून फुकट जाऊं लागले. परंतु यावेळीं आपण हळु हळु मागें हटत गेल्यासारखें दाखवून शत्रूला आपल्या पाठीमागच्या किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्यांत नेमकें आणून सोडावयाचें, ही जी युक्ति मराठे शिपायांनीं या प्रसंगीं योजिली, ती खरोखर लष्करी कौशल्याच्या दृष्टीनें अतिशय वर्णन करण्यासारखी आहे. परंतु हें असें कौशल्य जरी मराठयांनीं या स्थळीं उपयोगांत आणिलें होतें, तरी दैव अनुकूल नसल्यामुळें तें फुकट गेलें. कांहीं तोफांचे नेम चुकूं लागले आणि कांहीं तोफांचे मारे इंग्लिशांच्या सैन्यानें सहनही केले. आणि त्यांतूनच वाट काढीत काढीत इंग्लिशांचें सैन्य पुढें सरसावलें. व इंग्लिशांचा घोड्यांवरील जो तोफखाना होता, त्यानेही त्यांना कांहीं मदत केली. आणि अशा रीतीनें अखेरीस इंग्लिशांचें सैन्य पुढे सरसावत किल्ल्याच्या समोर ( ९. ) गेलें. येथे खरोखर पाहिलें असतां त्यांच्यावर शिंद्याच्या सैन्यांतील मुख्य सेनापति, एम्. पेरन, यानें हल्लाच करावयाला पाहिजे होता; व त्यानें तसें केलें असतें, तर तें मराठ्यांच्या इभ्रतीला श्रेयस्कर असेंच झालें असतें. व बहुधा या हल्ल्यांत त्याला जयही मिळाला असता; परंतु यावेळीं फ्रेंच सेनापति, एम्. पेरन, याला भलताच मार्ग अवलंबिण्याची दुर्बुद्धि उत्पन्न झाली. आपल्या हाताखालील कर्नल पेड्रन याच्याकडे अलिगडच्या किल्ल्याच्या संरक्षणाचें काम सोंपवून देऊन ज. पेरन हा आपल्या हाताखालील इतर कांहीं सैन्यानिशीं त्या रणां-गणावरून निघून मुकाट्यानें हथरसकडे निघून गेला. त्यामुळें कोईलच्या लढाईंत अखेरीस जय मिळविल्याचें श्रेय इंग्लिशांना आयतेंच मिळालें.

त्यानंतर अनायासानें आपल्या हातीं लागलेलें जें कोइलचें लष्करी ठाणें तेथेंच इंग्लि-शांच्या सैन्यानें आपला तळ देऊन मुक्काम केला. ही कोइलची एक लहानशी लढाई होती व ज. पेरन हा या लढाईंत मनापासून लढला असता, तर त्यांत खात्रीनें त्याचा जय झाला असता. पण तो या लढाईंत मुळीं लढलाच नाहीं. व त्यानें आपल्या सैन्यालाही लढण्याचा हुकूम दिला नाहीं. त्याची फौज ज. पेरन आपल्याला लढाईचा कांहीं तरी हुकूम देईल म्हणून वाट बघत बसली होती. परंतु कोइल येथील त्या त्याच्या फौजेवर इंग्लिशांचे गोळे येऊन पडूं लागले, तरी त्यांच्या सेनापतीकडून त्यांना कांहीं हुकूम मिळेना. तेव्हां अखेरीस इंग्लिशांच्या गोळ्यांखालीं मरून जाण्याच्या ऐवजीं त्यांनीं मागें हटण्याचा मार्ग पतकरला. व अखेरीस ज. पेरन हाही स्वतः निघून हथरसला गेला. प्रत्यक्ष लढाईच्या रणांगणावर जेथें सेनापतींची अशी वर्तणूक, तेथें मराठ्यांच्या पक्षाला यश कसें मिळणार ? या युद्धांत इंग्लिशांचा जय झाला, असें इंग्रजी फौजेचे गोडवे इंग्रजी इतिहासांतून गायिले जातात; आणि आपल्याकडून ते वाचविले जातात. पण या लढायांतून आपले पराभव कसे करविण्यांत आले, याच्याबद्दलचा विचार आपल्यापैकीं कोण करतो ? बिचारा दौलतराव शिंदे आपली

उत्तरेकडील बाजू फ्रेंच सेनापति, ज. पेरन, आणि त्याचे बाकीचे युरोपियन साथीदार सुरक्षित रीतीनें संभाळतील अशा भरंवशावर दक्षिणेकडे युद्ध करण्याकरितां गेला. पण ज्या इंग्लिशांना दक्षिणेंत फितुरी उत्पन्न करितां येते, त्यांना ती काय उत्तरेस करितां येणार नाहीं? हिंदुस्थानांतल्यासारखे स्वार्थासाठीं हपापलेले आणि स्वदेशाच्या कल्याणाबद्दल सदोदित बेपर्वा असलेले लोक जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत फितुरी करणारांना हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि भागामध्यें वाटेल तितका अवसर आहे! दक्षिणेंतल्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतही इंग्लिशांनीं या फितुरीचें बीज पूर्णपणें पेरून ठेविलें होतें. ता. २९ ऑगस्ट रोजीं इंग्रजी सैन्यानें कोइलचें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें, त्याच दिवशीं ज. लेक यांनीं मार्किस वेलस्ली यांना जें एक पत्र लिहिलें आहे, त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे.

I am convinced the day has had a most wonderful effect upon the minds of the natives who always thought M. Perron invincible; indeed I have every reason to believe that some of his confederates left him the moment they heard of our approach, particulary the Jauts, and few Sikhs who were reported to have been with him; and I think most of the others have gone to their homes, and never will encounter us again......Six officers of Perron's second brigade are just come in, having resigned the Service.

वरील उताऱ्यांतील तात्पर्य असें आहे कीं, इंग्लिशांचें सैन्य चाल करून येत आहे, असें कळल्याबरोबर एम्. पेरन याच्याजवळ जे कांहीं जाट आणि शीख लोक होते, ते त्याला सोडून गेले. त्याचप्रमाणें पेरनच्या हाताखालील एका पलटणींतील सहा अंमलदार आपल्या जागेचे राजीनामे देऊन कोइलच्या लढाईनंतर लगेच ज. लेक याच्या स्वाधीन झाले. अशी जेथें सैन्यात फाटाफूट आणि फंदफितुरी आहे, तेथें त्या सैन्याला जय कोठून मिळणार? ज्या जाट आणि शीख लोकांनीं शिंद्याच्या लष्करामध्यें नेहमीं नोकरी धरून रहावें, त्यांनीं फितुर होऊन गनीम आपल्यावर चालून येत आहे अशी बातमी ऐकल्याबरोबर शिंद्याचें लष्कर सोडावें, आणि आपल्या घरीं जाऊन बसावें, ही शिपाईगिरीची, स्वदेशभक्तीची आणि स्वामिनिष्ठेची शिस्त झाली काय? पण या अडाणी आणि अशिक्षित शिपायांची गोष्ट एक वेळ राहो. पण जे इंग्लिशांना आपले हाडवैरी म्हणून समजत होते आणि इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हाकलून लावण्याच्या इराद्यानें ज्यांनीं अखेरीस शिंद्याचा आश्रय घेतला होता, त्या फ्रेंच अंमलदारांनीं तरी निदान आपल्या पलटणी सोडून लॉर्ड लेक यांना शरण जावयाला नको होतें. परंतु त्यांनाही तशीच दुर्बुद्धि हिंदुस्थानच्या कमनशिबामुळें आठवली! पण याहीपेक्षां जी जास्त आश्चर्यकारक गोष्ट आहे, ती खुद्द एम्. पेरन याच्याच बाबतींतील होय. हा सेनापति ता. २९ ऑगस्ट रोजीं कोइलचें रणांगण आणि त्यावरील लढाई सोडून निघून गेला; व पुढें सहा सात दिवसांनीं ता. ४ सप्टेंबर १८०३ रोजीं अलीगडचा किल्ला इंग्लिशांच्या हस्तगत झाल्यानंतर हाही स्वतः इंग्लिशांच्या स्वाधीन झाला! लॉर्ड लेक हा शिंद्याच्या मुलखावर स्वारी करून येणार

असें समजल्यापासून एम्. पेरन यानें त्याला तोंड देण्याकरितां आपल्या सैन्याची चांगली तयारी केली होती. तसेंच त्यानें क. पेड्रन याला अलीगडच्या किल्ल्याच्या संरक्षणाच्या बाबतींत जें एक अत्यंत प्रोत्साहनपर असें पत्र ( हें पत्र पुढें देण्यांत येत आहे. ) लिहिलें, त्यावरूनही त्याचा उत्साह कमी झालेला असल्याचें यत्किंचितही दिसून येत नाहीं. तरी पण काय असेल तें असो, कोइलच्या लढाईंतील व त्यानंतरचें त्याचें वर्तन योग्य प्रकारचें झालें नाहीं, यांत संशय नाहीं. आपल्या सभोंवतीं सर्वत्र फितुरी पसरलेली आहे आणि आपल्या हाताखालचे युरोपियन अंमलदार हे देखील कृतघ्न बनून आपला पक्ष सोडून जात आहेत, हें पाहून त्याच्या मनावर निराशेचा असह्य परिणाम झाला असला पाहिजे, असें दिसतें. ( M. Perron also observed, that the treachery and ingratitude of his European officers convinced him that further resistance to the British arms was useless. ) एम्. पेरन यांच्या जागीं अंबाजी इंगळे या सेनापतीची नेमणूक या वेळीं करण्यांत आली होती. आणि म्हणूनही पेरनचें डोकें बिघडून गेलें होतें, असे म्हणतात. व ईस्ट इंडिया कंपनिच्या बँकांमधून त्याचे जे बरेच पैसे ठेविलेले होते, ते बुडतील, या भीतीचाही त्याच्या मनावर परिणाम झाला असावा, असा कित्येकांचा तर्क आहे. परंतु यांपैकीं कोणतींही निमित्तें कारणीभूत झालीं असलीं, तरी त्यामुळें एकंदरींत अखेरीस शिंद्याच्या पक्षाला पराभव प्राप्त झाला, ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि त्यामुळें पेरन गेले आणि त्याचे युरोपियन अंमलदारही गेले. पण या सगळ्या निरनिराळ्या कारणपरंपरेमुळें हिंदुस्थानच्या मानेवर जें पारतंत्र्याचें जोखड येऊन बसलें आहे, तें मात्र अजून गेलेलें नाहीं !

हे फ्रेंच अंमलदार आयत्या वेळीं असा दगा देतील असें दौलतराव शिंद्याला आधीं कळतें, तर त्याने या लोकांना इतक्या मोठ्या अधिकाराच्या जागेवर कधीं नेमलेंही नसतें. दौलतराव शिंद्याच्या पदरीं दुसरे कोणी यांच्याबरोबरीचे शूर मराठे सरदार नव्हते, म्हणून त्यानें यांना आपल्या फौजेवर नेमिले होतें, अशी वस्तुस्थिति नव्हती. परंतु आपल्याला इंग्लिशांशीं लढावयाचे आहे, तेव्हां त्यांच्या बरोबरीचे आणि त्याच्याइकडील परिस्थितीच्या माहितीचे असे आपल्या पक्षाकडे कोणी फ्रेंच अंमलदार असले तर ते बरे, अशा धोरणानेंच या लोकांना ठेवण्यांत आलेलें असलें पाहिजे. या फ्रेंच लोकाचें मूळचेंच इंग्लिशांशीं युरोपखंडांतील वैर होतें. या वेळीं, म्हणजे इ. स. १८०३-४ च्या सुमारास युरोपखंडांत नेपोलियनच्या अद्वितीय पराक्रमामुळें फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामध्यें किती मोठा द्वेषाग्नि भडकलेला होता, हे इतिहासाच्या सर्व वाचकांना माहीतच आहे. व त्याच द्वेषाग्नीच्या ज्वाला फ्रेंच लोक हिंदुस्थानांतही इंग्लिशांच्या विरुद्ध प्रज्वलित करीत होते. हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांचीं मनें इंग्लिशांच्या विरुद्ध चेतविण्याकरितां फ्रेंच लोकांकडून जे अनेक उपाय योजण्यांत येत होते, त्यांत त्यांनीं प्रसिद्ध केलेला एक जाहीरनामा या बाबतींत येथें उदाहरणादाखल घेतां येण्यासारखा आहे. हा जाहीरनामा मॉरिशस बेटाच्या गव्हर्नरकडून हिंदुस्थानांतील राजांच्याकरितां प्रसिद्ध करण्यांत आलेला असून त्यांत त्यांना उद्देशून असें सांगण्यांत आलेलें होतें कीं:—

हिंदुस्थानांत इंग्लिशांनीं आपलें वर्तन कसें चालविलें आहे, हें, हे हिंदुस्थानांतलि राजेरजवाड्यांनों, तुम्ही पहातच आहां. बंगाल आणि बहार हे प्रांत त्यांनीं विश्वासघातानें कसे काबीज केले, हें तुम्हांला माहीत आहे. तुमच्या बनारस शहरामधून तुमचा राजा चेतसिंग याला घालवून लावण्याच्या कामीं त्यांनीं किती जुलूम आणि किती क्रूरपणा केला, हें तुम्हांला सांगितलें पाहिजे असेंही नाहीं. त्याचप्रमाणें फैजाबाद येथें अयोध्येच्या बेगमांच्या बाबतींत त्यांच्या हातून घडलेलें नामर्दपणाचें आणि रानटीपणाचे वर्तन तुमच्या नजरेस आणून दिलें पाहिजे, असेंही नाहीं. अयोध्या, अर्काट आणि सुरत, येथील खऱ्या वारसदार नबाबांचे वारसाचे हक्क त्यांच्याकडून कसे बळकावून घेण्यांत आले, हें तुम्हांला निवेदन केलें पाहिजे काय? टिपू सुलतानाचा मुलूख त्यांनीं आपल्या घशांत कसा टाकला, हें आज प्रत्यक्ष तुमच्या डोळ्यांसमोर आहे. त्याचप्रमाणें हल्लीं त्यांनीं मराठ्यांच्याविरुद्ध जी चढाईची आणि अन्यायाची लढाई चालविलेली आहे, तिचेही परिणाम तुम्हांला भासूं लागलेले आहेत. या सगळ्या प्रकारांच्या विरुद्ध आमच्याप्रमाणेंच तुम्हीं पहिल्यापासून खबरदारी घेतली असती, तर त्यांचा आज जो तुमच्यावर अंमल बसला आहे, तसा तो त्यांना बसवितां आला नसता. पण याला उपाय नाहीं, असें नाहीं. तुमचे शत्रु संख्येनें फार आहेत, असें नाहीं. सगळ्या हिंदुस्थानांत पाहिलें, तरी कांहीं थोड्याशा हजारांपेक्षां त्यांची संख्या जास्त भरणार नाहीं. बाकी त्यांच्या लष्करांत जे शिपाई आहेत, ते सगळे हिंदुस्थानचेच रहिवासी असून ते तुमचेच प्रजाजन आहेत. हे हिंदुस्थानचेच प्रजाजन त्यांच्या नोकरीला राहून तुम्हा हिंदुस्थानच्या राजांच्याविरुद्ध आपल्या तरवारी म्यानांतून बाहेर काढीत आहेत, याबद्दल परलोकीं परमेश्वरासमोर त्यांना शासन भोगावें लागेल, हें तुम्हीं त्यांना समजून सांगितलें पाहिजे. हिंदुस्थानच्या थोर थोर प्राचीन राजघराण्यांमध्यें उत्पन्न झालेल्या हे हिंदुस्थानच्या राजांनों, तुम्हांला हें समजलें पाहिजे कीं, तुमच्या हातांत सत्ता आहे, तुमच्यापाशीं खजिने आहेत, तुमच्यापाशीं शिपाई आहेत, आणि तुमच्या अंतःकरणामध्यें शौर्य आहे! तुमच्या जवळच्या सिलोनच्या लहानशा बेटानें कसें वर्तन केलें आहे, ते पहा. आणि त्याप्रमाणें तुम्हीं वर्तन केलें, तर तुमचा हिंदुस्थान देश तुम्हांलाही स्वतंत्र करितां येईल!

असल्या जाहीरनाम्यांच्या सारखे अनेक उपाय योजून ज्या फ्रेंच लोकांनीं हिंदुस्थानमधील राजेरजवाड्यांमध्यें प्रेरणा उत्पन्न केली, त्यांच्यापैकींच एम्. पेरन वगैरेसारख्या लोकांनीं ऐन आणीबाणीच्या वेळीं शिंद्यांचा पक्ष सोडून इंग्लिशांच्या स्वाधीन व्हावें, ही मोठ्या आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट आहे. तरी पण एम्. पेरन हा धैर्याच्या अभावामुळें इंग्लिशांच्या स्वाधीन झाला असें नसून, इंग्लिशांनीं आपल्या पैशाच्या बळावर चौफेर पसरलेल्या फितुरीमुळें तो हताश झाला असावा, असें जें एक मत आहे, त्यांत बरेंच तथ्य असलें पाहिजे. कारण, गुप्त रीतीनें फितुरी उत्पन्न करण्याचें शास्त्र इंग्लिशांना फार चांगल्या रीतीनें साधतें, हे त्या वेळच्या युरोपच्या इतिहासावरूनही दिसून येतें. फ्रान्सचा बादशहा नेपोलियन हा पराक्रमानें कोणालाही हार जाण्यासारखा नव्हता. परंतु इंग्लंडमधील पैशानें खुद्द त्याच्या स्वतःच्या फ्रान्स देशामध्येंही त्याच्या सभोंवतीं फंदफितुरीचें इतकें भयंकर जाळें इंग्लिशांकडून पसरवून ठेवण्यांत आलें होतें कीं, त्यांतून आपली सुटका करून घेणें अखेरीस नेपोलियनलाही अशक्य झालें!

# अलीगडची लढाई.

असो. तारीख २९ ऑगस्ट रोजीं कोईलच्या लढाईंत जय मिळवून लॅार्ड लेक यांच्या सैन्यानें त्या ठिकाणीं मुक्काम केला, ही गोष्ट पूर्वी सांगण्यांत आलेलीच आहे. व त्यानंतर ता. ४ सप्टेंबर रोजीं पहाटेस ज. लेक यांच्या सैन्यानें अलीगडच्या किल्ल्यावर हल्ला करण्याला सुरवात केली. कोईलच्या लढाईंत इंग्लिशांच्या विरुद्ध लढलेलें शिंद्यांचें सैन्य अलीगडच्या किल्ल्यांत आश्रय धरून राहिलें आहे, हें लॉर्ड लेक यांना माहीत होतें. व कोईलच्या त्यांच्या छावणीपासून अलीगडचा किल्ला एकदोन मैलांपेक्षां लांब होता, असेंही नाहीं. असे असतां ता. २९ ऑगस्टपासून ता. ४ सप्टेंबरपर्यंत मध्यंतरींचे सहा सात दिवस लॉर्ड लेक यांनीं अलीगडच्या किल्ल्यावर ताबडतोब हल्ला कां केला नाहीं? विजयी झालेला कोणीतरी सेनापति आपल्या नजरेसमोरच्या किल्ल्यांत आपले गनीम दबा धरून राहिलेले दिसत असतां, त्यांच्यावर ताबडतोब हल्ला केल्यावांचून आणि त्यांना तेथून हुसकून लाविल्यावांचून कधीं तरी थांबेल काय? मग लॉर्ड लेक यांनीं तसें कां केलें नाहीं? याचें उत्तर इंग्रजी इतिहासकारांच्या मताप्रमाणें असें आहे कीं, लॉर्ड लेक हे पडले कृपाळु! आपण किल्ल्यावर एकदम हल्ला केला, तर कदाचित् विनाकारण जी प्राणहानि होईल ती न व्हावी, हा त्या सदय सेनापतींचा उदात्त हेतु होता! लढाईंत माणसें मारण्याचा धंदा करीत असतांही पायाखालीं मुंगी न चिरडण्याबद्दलची केवढी ही कळकळ! परंतु इंग्लिश इतिहासकारांनीं जरी ही सबब पुढें केलेली असली, तरी तिच्या आंतील वर्म अगदीं निराळें होतें. व तें वर्म ता. १ सप्टेंबर १८०३ रोजीं कोईलच्या छावणीमधून ज. लेक यांनीं मार्क्विस वेलस्ली यांना लिहिलेल्या एका खासगी पत्रामध्यें पुढीलप्रमाणें परिस्फुट झालेलें आहेः—

I have not yet moved from hence, nor am I in possession of the fort of Allyghur; my object is to get the troops out of the fort by bribery, which I flatter myself will be done.

या इंग्रजी मजकुरांत ज. लेक यांनीं स्वच्छपणें असें लिहिलें आहे कीं, अलीगडच्या किल्ल्यांतील लोकांना लांचलुचपतीनें फितुर करून किल्ला हस्तगत करून घेण्याचा

माझा उद्देश आहे; आणि त्यांत यश येईल, अशी मला आशाही वाटत आहे. शिवाय अलीगडचा किल्ला अतिशय मजबूत होता. त्याच्यावर शहाजोगपणें आणि सरळ सरळ रीतीनें हल्ला करून केवळ आपल्या पराक्रमाच्या जोरावर तो आपल्याला जिंकून घेतां येईल, असें इंग्लिशांना वाटत नव्हतें, आणि किल्ल्याला नुसता वेढा घालून बसावें, तर त्यांत पुष्कळ दिवस फुकट जाणार, आणि तडकाफडकीनें एकामागून एक जय मिळवीत जाऊन इंडियन लोकावर ब्रिटिश पराक्रमाची छाप बसवावयाची, हाही हेतु साधत नाहीं; आणि दिल्लीचा बादशहा शहाआलम याला लवकर आपल्या ताब्यांत घेऊन शिंद्याच्यार विरुद्ध पुढील नवीन शह द्यावयाचे, ही मसलतही जमणार नाहीं, असे अनेक विचार मनात आणून लॉर्ड लेक यांनीं अलीगडच्या किल्ल्याच्या खालीं द्रव्याच्या दारूगोळ्यानें भरलेले हे लांचलुचपतीचे सुरुंग खोदण्याला सुरवात केली होती. बिचाऱ्या इंग्लिशांनीं जीवापाड मेहनत करून ईश्वराच्या इच्छेनुसार हिंदुस्थानाच्या हितासाठीं स्वतःच्या प्रामाणिकपणानें आणि पराक्रमानेंच हिंदुस्थानाचें राज्य कमाविलें असून कित्येक दुष्ट लोक त्यांच्या सदाचरणाला विनाकारण दूषण देत असतात, असें मानणारे आपल्यामध्यें कित्येक बावळट लोक अद्यापिही आहेत. त्यांनीं लॉर्ड लेक यांच्या पत्रांतील लांचलुचपतीसंबंधींचा वरील उतारा अवश्य सदोदित लक्षांत ठेवावा. कारण, असल्या गोष्टी जरी चोरून पुष्कळ करण्यांत येत असतात, तरी याच्यासारखे त्यांच्याबद्दलचे प्रत्यक्ष पुरावे पुष्कळ प्रमाणांत आढळून येत असतात, असें नाहीं. आणि लॉर्ड लेक हे स्वतःच नुसते लांचलुचपतीनें फितुरी उत्पन्न करीत होते असें नसून, या आपल्या प्रामाणिकपणाच्या व्यवसायामध्यें आपले प्रामाणिक गव्हर्नर जनरलही आपल्या प्रामाणिकपणाच्या निःसीम बुद्धीनें आपल्या या प्रामाणिकपणाच्या कृत्याकडे पूर्णपणें कानाडोळा करतील, अशी त्यांना खात्री होती व ती त्यांची खात्री खोटी ठरली नाहीं. कारण, वर उल्लेखित केलेल्या ता. १ सप्टेंबरच्या पत्रामध्यें लॉर्ड लेक हे आपल्या ख्रिस्ती धर्मानुयायी गव्हर्नर जनरलला लिहितात कीं, जर थोड्याशा पैशानें या मौल्यवान लोकांचे प्राण मला वांचवितां आले, तर त्यांत मी कांहीं एखादा गुन्हा करीत आहे किंवा पैशाची उधळपट्टी माडली आहे, असें आपल्याला वाटणार नाहीं. ( If by a little money, I can save the lives of these valuable men, your Lordship will not think I have acted wrong, or been too lavish of cash. )

हे चोरून लांचलुचपतीचे पैसे देऊन हिंदुस्थानांतील लष्करी ठाणीं विकत घेण्याचे सौदे या इंग्रजी सौदागारांनीं अनेक ठिकाणीं चालविले होते, याचें आणखी एक प्रत्यंतर लॉर्ड लेक यांच्याच पुराव्यानिशीं पकडतां येण्यासारखें आहे. अलीगड येथून ता. ७ सप्टेंबर १८०३ रोजीं लॉर्ड लेक हे दिल्लीकडे जाण्याकरितां निघाले असतां सुमारें ३० मैलांची मजल मारून गेल्यानंतर वाटेंत ता. ८ सप्टेंबर रोजीं कुर्जार या नांवाच्या एका गांवीं त्यांचा मुक्काम पडला. या ठिकाणींही एक मजबूत किल्ला असून त्यांत पुष्कळ अन्नसामग्री सांठविलेली होती. या किल्ल्याची मजबुती इतकी चांगली होती कीं, तो सहसा शत्रूला जिंकतां येणें शक्य नव्हतें. अशी जरी वस्तुस्थिति होती, तरी तो किल्ला ता. ६ सप्टेंबर

रोजींच मराठयांच्या सैन्यानें खाली करून टाकला होता. या गोष्टीसंबंधानें इतिहासाचें भपकेदार आणि डोळे दिपवून टाकणारें वर्णन असें आहे कीं, " अलीगडच्या किल्ल्याचा पाडाव झाल्यामुळें चोहोंकडे इतकी भीति उत्पन्न झाली होती कीं, आमचें इंग्लिश सैन्य या कुर्जाच्या किल्ल्याजवळ येण्याच्या आधींच दोन दिवस तो किल्ला घाईघाईनें सोडून देण्यांत आलेला होता ! " ( Such was the terror, produced by the fate of Allyghur, that the fort here was precipitately abandoned two days before our arrival.) हा इंग्रजी पराक्रमाचा बाह्यात्कारी आणि ऐतिहासिक भपका झाला ! पण आतां याच्या आंतील खरी हकीकत काय आहे ती पहा ! या ठिकाणाहून ता. ८ सप्टेंबर १८०३ रोजीं लॉर्ड लेक यांनीं गव्हर्नर जनरलला जें एक खासगी पत्र लिहिलें आहे, त्यांत पुढील मजकूर आढळतो.

We arrived here this morning, and found a very strong little fort, which would have caused delay and trouble, had not the troops evacuated it the day after the fall of Allighur. I think when you hear the secret manner, in which things have been conducted, you will be much pleased; it is quite a new work in the army, and has succeeded hitherto wonderfully well.

या पत्रांतील या उताऱ्यामध्यें वरील किल्ला हस्तगत केल्याचें सांगून नंतर तो किल्ला खरोखर कोणत्या उपायानें हस्तगत झाला, याच्याबद्दल लॉर्ड लेक असें लिहितात कीं, " येथें ज्या गुप्त कारस्थानांनीं असल्या गोष्टी घडवून आणण्यांत येत आहेत, त्यांच्याबद्दलची हकीकत तुम्हीं समक्ष ऐकली, म्हणजे तुम्हांला खरोखरच समाधान वाटेल, अशी मला खात्री आहे. आमच्या लष्करामध्यें स्वकार्यसिद्धीचा हा अगदीं एक नवीनच उपाय निघालेला आहे, व या उपायाला आतांपर्यंत फार आश्चर्यकारक प्रकारानें यश येत चाललेलें आहे. " हा यशस्वी होत चाललेला उपाय कोणता आणि हीं गुप्त कारस्थानें कोणतीं, हें याच्यापेक्षां जास्त स्पष्ट शब्दांनीं कोणाला सांगितलें पाहिजे, असें नाहीं. आपल्या सैन्यांतील शिपायांना लढण्याच्या कामावरून काढून मराठ्यांच्याकडील सैन्यामध्यें फितुरी माजविण्याच्या कामावरच लॉर्ड लेक यांनीं या वेळीं लाविलें होतें कीं काय, असा भास होतो. पण यांत इंग्लिश लोकांना तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे ? जेथें आपल्या देशांतलि लोक लांच घेऊन आपल्याच देशाच्या विरुद्ध फितुरी करण्याला तयार होतात, तेथें फितूर करविणारापेक्षां स्वदेशाच्या विरुद्ध फितूर होणारेच ज्यास्त गुन्हेगार होत, या गोष्टी हिंदुस्थानांतील लोकांना समजतील तो सुदिन !

वर दिलेल्या एकंदर इंग्रजी धोरणाच्या आणि पद्धतीच्या विस्तृत वर्णनावरून लॉर्ड लेक हे ता. २९ आगस्ट पासून ता. ४ सप्टेंबर पर्यंत कोइलच्या छावणीमधून अलीगडच्या किल्ल्याच्या बुरुजांकडे पहात स्वस्थ कां बसले होते, या प्रश्नाचा उलगडा होण्यासारखा आहे. परंतु आपल्या फितुरीचा प्रयोग अलीगडच्या किल्ल्यांतील लोकांवर लागू होत नाहीं, असें

तेव्हां त्यांना आढळून आलें, तेव्हां निरुपायानें अखेरीस त्यांनीं अलीगडच्या किल्ल्यावर चालून जाण्याचें ठरविलें. पण हें ठरवितांना देखील त्यांची भिस्त, या नाहीं तर त्या, पण अखेरीस कोणत्या तरी, फितुरीवरच होती, हें आपण विसरतां कामा नये. ती फितुरी अशी कीं, लढाईच्या आयत्या वेळीं शिंद्याची नोकरी सोडून जे युरोपियन लोक निघाले, त्यांत मि. ल्यूकन या नांवाचा एक इंग्लिश लष्करी अंमलदार होता. हा शिंद्याची नोकरी सोडून लॉर्ड लेक यांच्या नोकरांमध्यें राहिला होता. पण हा पूर्वी शिंद्याच्या नोकरींत असल्यामुळें अलीगडच्या किल्ल्यांतील चोरवाटा आणि माऱ्याच्या वगैरे सर्व जागा त्याला माहीत होत्या. व त्या त्यानें किल्ल्यावर हल्ला करणाऱ्या लोकांना दाखवून दिल्या, म्हणूनच अखेरीस इंग्लिशांना तो किल्ला काबीज करून घेतां आला. याप्रमाणें मि. ल्यूकन याच्या फितुरीच्या जोरावर अलीगडच्या किल्ल्यावर हल्ला चढविण्याला लॉर्ड लेक हे अखेरीस तयार झाले.


किल्ल्यावर हल्ला करण्याच्या पूर्वीं किल्ल्यांतील फ्रेंच सरदार, क. पेड्रन, यांच्याकडे किल्ला गोडीगुलाबीनें आपल्या स्वाधीन करण्याविषयीं लॉर्ड लेक यांनीं आपल्या इंग्रजी भूतदयेच्या पद्धतीप्रमाणें निरोप पाठविला होता. परंतु किल्लेदार, क. पेड्रन, यानें निक्षून नकाराचा जबाब पाठविला. किल्लेदार, क. पेड्रन, याची तर हा किल्ला लढविण्याची तयारी होतीच; पण त्याचा वरिष्ठ अधिकारी, एम्. पेरन, यानें त्याला या वेळीं जें एक अतिशय उदात्त आणि उत्साहजनक पत्र लिहिलें, त्याचा त्याच्या व इतरांच्याही मनावर फारच चांगला परिणाम झाला असला पाहिजे. एम्. पेरन याच्या स्वतःच्या या वेळच्या वर्तनाबद्दल जरी योग्य मीमांसा करितां येत नाहीं, तरी त्यानें क. पेड्रन याला या प्रसंगीं जें पत्र लिहिलें आहे, त्यांत त्याचें खळवळून गेलेलें सर्व महत्त्वाकांक्षी अंतःकरण ओतप्रोत ओतलें गेलेलें आहे, यांत संशय नाहीं. हें पत्र लहानसेंच आहे, पण त्यांत समाविष्ट केलेलीं तत्त्वें इतकीं मोठीं आहेत कीं, प्रत्येक मनुष्यानें आपल्या स्वदेशाभिमानासाठीं तीं आपल्या अंतःकरणामध्यें कोरून ठेविलीं पाहिजेत. तें पत्र येणेंप्रमाणें:—

ज. लेक यांना काय उत्तर द्यावयाचें तें तुम्हांला कळविण्यांत आलेलेंच आहे. आपण शरण जावें, अशी कल्पना तुमच्या मनाला एक क्षणभरही शिवणार नाहीं, हें मला माहीत आहे. तुम्ही हें लक्षांत ठेवा कीं, तुम्ही फ्रान्सचे एक नागरिक आहां, आणि म्हणून आपल्या राष्ट्राच्या उज्वल कीर्तीला कलंक लागेल असें कोणतेंही कृत्य तुमच्या हातून होतां कामा नये. हा इंग्लिश सेनापति, लार्ड लेक, जो आपल्या मुलुखांत चालून आला आहे, त्याला मी थोडक्याच दिवसांत येथून घालवून लावीन, अशी मला उमेद आहे. व याच्याबद्दल तुम्हांलाही पक्की खात्री असूं द्या. या अलीगडच्या किल्ल्याच्या समोर एक बादशहाच्या सैन्याचा, नाहीं तर लॉर्ड लेक याच्या सैन्याचा तरी, पुरा फन्ना उडाला पाहिजे; त्याच्याशिवाय हा किल्ला सुटणार नाहीं. तेव्हां तुम्ही आपलें कर्तव्यकर्म करा आणि या किल्ल्याच्या भिंतीमधील एक दगड दुसऱ्या दगडावर उभा आहे, तोंपर्यंत या किल्ल्याचें संरक्षण केल्यावांचून तुम्ही राहूं नका. मला तुम्हांला शेवटीं आणखी एकदां हेंच सांगावयाचें आहे कीं, तुम्ही आपल्या राष्ट्राचा नांवलौकिक लक्षांत ठेवा. लाखों लोकांचे डोळे तुमच्या कर्तबगारीकडे लागून राहिलेले आहेत !

अलीगडच्या किल्ल्यांतील किल्लेदाराला पाठविलेल्या या पत्रांतील विचार जसे भव्य आणि अभेद्य आहेत, त्याचप्रमाणें तो अलीगडचा किल्लाही भव्य आणि अभेद्य होता. वरील पत्रांत प्रकट केली गेलेली जी अलोट वीरवृत्ति तिच्याप्रमाणेंच अलीगडच्या किल्ल्याची तटबंदीही हजारों हातांनीं तिच्यावर घाव घातले तरी कधींही भंगून जाणार नाहीं, इतकी बळकट होती. या किल्ल्याच्या आंतील क्षेत्रफळ फार मोठें असून याच्या भोंवतालच्या भिंती फार उंच व मजबूत होत्या व त्याच्या सर्व बाजूंनीं मोठमोठाले बुरुज असून त्यांच्यावरून चौफेर मारा करणाऱ्या तोफांच्या आणि बंदुकाच्या करितां बंदोबस्ताच्या जागा केलेल्या होत्या. किल्ल्याच्या या बाकीच्या मजबुतीप्रमाणेंच किल्ल्याच्या सभोंवतालचा खंदकही फार मोठा होता. याची रुंदी सुमारें २०० फूट असून तो बहुतेक ठिकाणीं पांच पुरुषांच्या वर खोल होता. व याच्या शिवाय त्या किल्ल्याच्या आंत प्रवेश करावयाचा म्हणजे चांगल्या बंदोबस्ताचे आणि मजबूत असे चार मोठमोठाले दरवाजे फोडावे, तेव्हां शत्रूला आंत प्रवेश करितां येईल, अशी व्यवस्था केलेली होती. त्याचप्रमाणें एका दरवाजांतून कदाचित् शत्रूचा प्रवेश झाला, तर त्याच्या पुढच्या दरवाज्याशीं जाण्याला असलेली वाट अगदीं अरुंद असून त्यांतून शत्रूचे थोडे थोडे लोक जाऊं लागले, तर त्यांच्यावर आजूबाजूच्या बुरुजांवरून आणि भिंतीमधील भोकांमधून गोळ्यांचा वर्षाव करितां यावा, अशी तजवीज करून ठेविलेली होती. शिवाय, या किल्ल्याच्या आजूबाजूच्या दलदलीच्या प्रदेशानें या किल्ल्याला जी नैसर्गिक दुर्गमता आलेली होती, तिच्यामध्यें फ्रेंच इंजिनिअरांनीं आपल्या कृत्रिम कौशल्यानेंही अनेक प्रकारची भर घातली होती. असा हा किल्ला मजबूत असल्यामुळें तो इंग्लिशांना घेतां येणार नाहीं, अशी क. पेड्रन याची कल्पना होती. पण ही त्याची कल्पना चुकीची होती. कारण, फितुरीला आणि विश्वासघाताला जो किल्ला काबीज करून घेतां यावयाचा नाहीं, असा किल्ला अद्यापि जगामध्यें कोठें कोणाकडून बांधलाच गेलेला नाहीं! मि. ल्यूकन हा पूर्वी शिंद्याच्या नोकरींत असतांना त्याला या किल्ल्यांतील सर्व बारीक सारीक गोष्टींची पूर्ण माहिती झालेली होती. त्यानें वाट दाखविण्याचें आपल्या अंगावर घेतल्यामुळेंच या हल्ल्याचें काम फार सोपें झालें, हें लॉर्ड लेक यांच्या पत्रांतील (He gallantly undertook to lead Colonel Monson to the gate, and point out the road through the fort, which he effectd in a most gallant manner, and Colonel Monson has reported having received infinite benefit from his services.) उल्लेखावरून स्पष्ट होत आहे. किल्ल्याच्या उंच भिंती आणि किल्ल्याच्या सभोंवतालचे खोल खंदक, किल्ल्याची नैसर्गिक बळकटी आणि फ्रेंच इंजिनीअरांचें कृत्रिम कौशल्य, किल्ल्यावरील तोफा आणि किल्ल्यांतलि शूर शिपाई, या सगळ्या गोष्टी इंग्रजांच्या फितुरीपुढें कमकुवत झाल्या!

या अलीगडच्या किल्ल्यावर हल्ला करण्याचें काम ता. ४ सप्टेंबर १८०३ रोजीं पहांटेस ३ वाजतां सुरू करण्यांत आलें. या कामावर ज्या सैन्याची नेमणूक करण्यांत आली होती, त्या सैन्याचें आधिपत्य ले. कर्नल मॉनसन् यांच्याकडे देण्यांत आलेलें होतें. या सैन्यांतील लोकांच्या हल्ल्याच्या आदल्या दिवशीं रात्रींच दोन मोर्चे बांधून तयार केले

होते व त्यांच्यावर तोफा डागण्यांत आलेल्या होत्या. यांपैकीं पहिला मोर्चा ( १ ) एम्. पेरन यांच्या बंगल्याच्या जागेवर उभारला असून त्याच्या उजव्या हाताकडे कांहीं अंतरावर जें एक लहानसें खेडें आहे, तेथें दुसरा मोर्चा ( २ ) उभारला होता; किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां पहाटेस जें सैन्य जावयाचें त्याच्या संरक्षणाकरितां येथील तोफा रोखून ठेविल्या होत्या. अवशीस ही तयारी झाल्यानंतर पहाटेस तीन वाजतां किल्ल्यावर छापा घालणाऱ्या



पलटणी आपल्या छावणीतून निघून वळणावळणाच्या रस्त्यानें ( ३ ) किल्ल्याकडे चालूं लागल्या. सबंध किल्ल्याच्या सभोंवतीं जो एक मोठा खोल खंदक होता, त्याच्यावरून किल्ल्यांत जाण्याला फक्त एकच काय तो रस्ता ( ४ ) होता, व हाहि रस्ता अडविण्यासाठीं त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं दोन नवीन भिंती ( ५, ६ ) एकापुढें एक आडव्या अशा

मजबूत रीतानें नुकत्याच उभारण्यांत आलेल्या होत्या, व त्या दोन भिंतींच्या नागमोडी वळणांच्या मधून एक फक्त अगदीं चिंचोळी अशी वाट ठेवण्यांत आलेली होती व या दोन्हीहि भिंतींवर तोफा डागण्यांत आल्या असून त्यांच्या पाठीमागें कांहीं अंतरावर मुख्य बुरजाच्या वळणांत किल्ल्याचा पहिला दरवाजा ( ७ ) होता. किल्ल्याच्या या पहिल्या मुख्य दरवाज्यावर इतकी जरी दुहेरीतिहेरी मजबुती करण्यांत आलेली होती, तरी याच्याहि पेक्षां किल्ल्याच्या दुर्गमतेसाठीं आणखीहि एक उपाय योजिण्याच्या उद्योगांत मराठ्यांची फौज होती. खंदकावरून किल्ल्यांत जाण्याला जो फक्त एकच रस्ता ( ४ ) होता म्हणून पूर्वी सांगितलें आहे, तो रस्ता सुरुंग लावून अजिबात उडवून टाकावा आणि त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे खंदकाचें पाणी एक करून टाकावें व अशा रीतीनें शत्रूची वाट अजिबातच बंद करून टाकावी. असा प्रयत्न किल्ल्यांतलि लोकांकडून चाललेला होता. परंतु तो सुरुंग पुरा होण्याला पुरेसा अवकाश मिळाला नाहीं; आणि त्याच्या आधींच शत्रूचे सैन्य किल्ल्याच्या या रस्त्यापासून सुमारें ३०० कदमांच्या अंतरावर ( ४ ) ता. ४ सप्टेंबर रोजीं पहाटेच्या काळोखांत येऊन बसलें होतें. पुढें सकाळी दिसू लागल्यानंतर हल्ल्याला सुरवात करण्याची इशारतीची तोफ कोइलच्या छावणीमधून झाली आणि त्याबरोबरच पूर्वी सांगितलेल्या १ आणि २ या मोर्च्यांवरील तोफांमधून गोळीबार चालू झाला; आणि इकडे क. मॉन्सन यांच्या हाताखालील जे सैन्य किल्ल्याच्या जवळ दबा धरून बसलें होतें, त्यानेंहि पुढें चाल करून जाण्याला सुरवात केली. या इंग्लिश सैन्याच्या माऱ्यामुळें रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या दोन आडव्या भिंतींवर ( ५, ६ ) ज्या दोन सिक्स पाउंडरच्या तोफा ठेवण्यांत आलेल्या होत्या, त्या कांहीं वेळानें बंद पडल्या व त्या तोफांवरील गोलंदाज आणि इतर माणसें त्या तोफा टाकून किल्ल्याच्या पहिल्या ( ७ ) दरवाजाच्या आंत निघून गेलीं. या माणसांच्या पाठोपाठ आपण जावें आणि तीं ( ७ ) दरवाजाच्या आंत शिरत आहेत, तोंच त्यांच्या बरोबर आपणहि आंत शिरावें. असा विचार मनांत आणून क. मॉन्सन हे आपल्या हाताखालील लोकांसह पहिल्या ( ७ ) दरवाज्यापाशीं आले. पण ते तेथें येऊन पाहतात, तों तेथें कोणीहि मनुष्य नसून किल्ल्याचा दरवाजा बंद आहे, असें त्याना आढळून आलें. इतकेंच नव्हे, तर किल्ल्याच्या रस्त्याच्या या अरुंद भागामध्यें सांपडलेल्या या इंग्रजांच्या शिपायांवर किल्ल्याच्या आजूबाजूच्या बुरुजांवरून ( ११, १२ ) आणि त्यांच्या खालच्या भिंतींवरून ( १३ ) तोफांचा आणि बंदुकांचा अतिशय जोराचा गोळीबार होऊं लागला. अशा अडचणींत सांपडलेल्या इंग्लिश शिपायांकडून दरवाज्याजवळ दोन शिड्या लावून किल्ल्याच्या भिंतीवर चढण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु अशा रीतीनें शिड्यांवरून वर चढून येणाऱ्या लोकांना किल्ल्याच्या भिंतीवरील शिपायांनीं आपल्या लांब भाल्यांनीं भोसकून खालीं पाडण्याला सुरवात केल्यामुळें इंग्लिशांच्या फौजेंतील लोकांनीं तो प्रयत्न सोडून दिला. व त्या दरवाज्यापुढें एक सिक्स पाउंडरची तोफ लावून तो दरवाजा तोफेच्या गोळ्यांनीं उडवून टाकण्याच्या उद्योगास ते लागले. परंतु तो दरवाजा इतका भक्कम होता कीं, त्याच्यावर त्या तोफेचाहि कांहीं परिणाम होईना. तेव्हां इंग्लिशांकडून पहिल्यापेक्षां दुप्पट मोठी अशी एक ट्वेल्व्ह पाउंडरची तोफ तेथें आणून डागण्यांत आली.

या ठिकाणावर शेजारच्या बुरुजांवरून आणि भिंतींवरून एकसारखा गोळीबाराचा भडिमार चाललेला असल्यामुळें ही तोफ डागण्यालाहि बराच वेळ लागला. व ती डागून झाल्यानंतरहि तिच्या मधून सुटणारे गोळे ताबडतोब तो दरवाजा फोडूं शकले, असेंहि नाहीं. ती तोफ लागू होऊन दरवाजांतून वाट पडेपर्यंत सुमारें अर्धा तास लागला. या अवधींत मराठ्यांचे शिपाई इंग्लिशांवर फारच निकराचे हल्ले करीत होते. आणि मराठ्यांचा तोफखाना फारच जोरानें इंग्लिशांवर गोळ्यांचा वर्षाव करीत होता. इंग्लिश शिपायांनीं वर चढण्याकरितां ज्या शिड्या लाविल्या होत्या, त्यांच्यावरून मराठ्यांचे शिपाई खालीं उतरून इंग्लिशांचे लोक दरवाज्यांतून आंत शिरत असतां त्यांना कापून काढूं लागले. व त्यावेळीं मराठ्यांच्या शिपायांनीं जें शौर्य दाखविलें, त्यामुळें इंग्लिशांचे पुष्कळ लोक या ठिकाणीं मृत्यूच्या मुखीं पडले आणि लढाईला फारच भयंकर स्वरूप प्राप्त झालें. खुद्द क. मॉन्सन यांना या ठिकाणीं भाल्याची एक जखम झाली, आणि याच ठिकाणीं इंग्लिशांकडील दुसरे पांचसहा अंमलदार ठार मारले गेले. व शिवाय इंग्लिशांकडील दुसरेहि पुष्कळ शिपाई लोक या ठिकाणीं मरून पडले. इतक्या लोकांचा आणि इतक्या अंमलदारांचा बळी द्यावा लागला, तेव्हांच इंग्लिशांना या अलीगडच्या किल्ल्याच्या पहिल्या दरवाजांतून आंत मोठ्या मुष्किलीनें प्रवेश करणें शक्य झालें. या दरवाजांतून आंत प्रवेश झाल्यानंतर इंग्लिशांचें सैन्य त्याच दरवाजाला लागून असलेल्या थोरल्या वर्तुळाकृति ( ११ ) बुरुजाच्या बाजूखालून असलेल्या अरुंद रस्त्यानें किल्ल्याच्या आंतील दुसऱ्या ( ८ ) दरवाजाकडे ( ११ ) बुरुजाच्या भिंतीला वळसा घालून जाऊं लागले. त्या वेळीं त्या बुरुजाच्या भिंतीमध्यें असलेल्या असंख्य भोंकांमधून आणि त्या बुरुजाच्या समोर असलेल्या दुसऱ्या एका ( १४ ) बुरुजावरून या लोकांवर फिरून जोराचा गोळीबार होऊं लागला. तरी पण त्यांतून जाऊन इंग्लिश शिपायांनीं दुसरा दरवाजा ( ८ ) काबीज केला. या दुसऱ्या दरवाज्यामधून तिसऱ्या ( ९ ) दरवाज्याकडे जातांना मध्यंतरीं फिरून एकदां किल्ल्याचा खंदक ओलांडावा लागतो; व त्याकरितां येथें या दोन दरवाज्याच्या दरम्यान एक लहानसा अरुंद रस्ता ( १५ ) होता. त्या रस्त्यावरून दुसरा दरवाजा शत्रूनें काबीज केलेला पाहिल्यानंतर मराठ्यांचे लोक तिसऱ्या दरवाजांतून आत जाऊं लागले असतां इंग्लिशांचेहि कांहीं शिपाई त्यांच्या बरोबर आंत घुसले आणि त्यामुळें तो तिसरा दरवाजा बंद करितां येईना. आणि मग त्या कारणानें इंग्लिशांचे सर्वच शिपाई तिसऱ्या दरवाज्यांतून आंत शिरून ते ( १० ) चवथ्या दरवाज्यावर हल्ला करण्याकरितां धांवत चालले. परंतु दुसऱ्या आणि तिसऱ्या दरवाज्याइतक्या सुलभतेनें हा चवथा दरवाजा मराठ्यांनीं इंग्लिशांच्या स्वाधीन होऊं दिला नाहीं. हाहि दरवाजा फार मजबूत होता. व तोफ लावून तो फोडल्यावांचून इंग्लिशांचा किल्ल्यांत प्रवेश होणें शक्य नव्हतें. म्हणून पहिल्या दरवाज्याच्या समोर जी ट्रॅव्हल पाउंडर तोफ लाविली होती तीच याहि दरवाज्यावर आणून लावणें जरूर झालें. परंतु ती तोफ या चवथ्या दरवाज्यासमोर आणण्याला बराच उशीर लागला. कारण, त्या तोफेवरील मुख्य अधिकारी, कॅप्टन शिप्टन, याला आधींच या वेळीं एक जखम झालेली होती. आणि शिवाय ती तोफ त्या अरुंद रस्त्यांतून आणतांना वाटेंत अनेक अडचणी उत्पन्न होत होत्या. आणि इतकेंहि करून ही

तोफ इंग्लिशांनीं या चवथ्या दरवाज्यासमोर आणून जेव्हां ती त्याच्यावर चालवून पाहिली, तेव्हां या दरवाज्याची मजबुती फारच बळकट रीतीनें केलेली असल्यामुळें या दरवाज्यावर या तोफेचा कांहीं एक परिणाम होणें शक्य नाहीं असें त्यांना आढळून आलें. परंतु कांहीं वेळानें या चवथ्या दरवाज्याच्या दिंडीदरवाजांतून मेजर मॅक्लिअड यांनीं कसाबसा प्रवेश करून घेतला. व तेथून ते तेथील भिंतीच्या तटावर ( १६ ) चढले. व त्यामुळें इंग्लिशांचा हळुहळू किल्ल्याच्या मुख्य भागांत प्रवेश होऊं लागला. व अखेरीस किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन झाला.

किल्ल्यांतील दुय्यम किल्लेदार एक मराठा सरदार होता, तो या वेळीं मरण पावला; व किल्ल्याचा मुख्य किल्लेदार, क. पेड्रन, याला कैद करण्यांत आलें. किल्ला हस्तगत झाल्यावर दोनतीनशें तोफा, पुष्कळ दारूगोळा आणि बरेच सैन्याचें नाणें इंग्लिशांच्या हातीं लागलें. या लढाईंत मेलेल्या इंग्लिश अंमलदारांना त्याच दिवशीं संध्याकाळीं त्याच किल्ल्याच्या समोर मोठ्या सन्मानानें बँड लावून मूठमाती देण्यांत आली. पण इंग्लिशांच्या बाजूच्या सन्मान्य नेटिव्ह शिपायांचीं प्रेतें मात्र तशींच जागच्या जागीं पडून राहिलीं असतील. त्या बिचाऱ्यांना कोण मूठमाती देणार ? आणि त्यांच्या सन्मानार्थ कोण बँड वाजविणार ? पण ज्यांनीं आपल्या देशांतील किल्ले दुसऱ्यांना मिळवून देण्याचा अक्षम्य आणि भयंकर देशद्रोह केला, त्यांचा सन्मान तरी कशाबद्दल व्हावयाचा ? आणि त्यांच्याकरितां बँडमधील कोणती तुतारी आपल्या तोंडांतून कोणता स्तुतीचा स्वर बाहेर काढूं शकणार आहे ? त्यांच्या हातून स्वदेशद्रोहाच्या पातकाचें कृत्य पुरें करून घेण्यांत येईपर्यंत त्यांच्या पोटापुरता त्यांना पगार देण्यांत येत होता, ही काय त्यांच्यावर थोडी मेहेरबानी झाली ? असल्या देशद्रोही लोकांना कोणी आणखी मूठमाती ती काय द्यावयाची ? हिंदुस्थानांत जिवंत असतांना हिंदुस्थानच्या मूठभर मातीवरही ज्यांची सत्ता नाहीं, त्यांना मेल्यावर मूठभरच माती कशाला द्यावयाला पाहिजे ! मूठभर काय, पण ते मेल्यावर सगळी हिंदुस्थानची माती त्यांचीच आहे ! असल्या राजनिष्ठ लोकांनीं आपल्या मरणानंतर हिंदुस्थानच्या सगळ्या मातीवरही आपला हक्क सांगितला, तरी तसें करण्याला त्यांना पूर्ण मुभा आहे ! हे बिचारे नेटिव्ह शिपाई त्या अलीगडच्या किल्ल्यासमोर तसेच पडून राहिले असतील ! आणि त्या पतितांच्याबद्दल कोणाही मानवी प्राण्याला दया येत नाहीं असें पाहिल्यावर अखेरीस त्या अलीगडच्या आसपासच्या जंगलांतील निर्दय स्वभावाच्या अशा कुत्रे, कोल्हे, लांडगे, गिधाडे, वगैरे हिंस्र पशुपक्ष्यांना त्यांची दया येऊन रात्रीचा काळोख पडल्यानंतर त्यांनीं आपल्या पोटाच्या कबरस्थानामध्यें त्यांना पुरून टाकण्याची बहुतकरून व्यवस्था केली असेल ! कोणी खंदकाच्या पाण्यांत बुडून मेले असतील, तर कोणी तोफगोळ्यांच्या आगीनें जळून खाक झाले असतील ! आणि ज्या कोणाला इतकाही लाभ मिळाला नसेल, त्यांच्याकरिता लष्करातल्या भंग्यांनीं अखेरीस जिवंत माणसांच्या आरोग्यासाठीं या मेलेल्या माणसांचे उरलेले हातपाय ओढून एखाद्या चरांत पुरून टाकले असतील !

या लढाईंत इंग्लिशांच्या पक्षाला विजय मिळाला म्हणून त्याचा जिकडे तिकडे बोलबाला झाला. जे मेले त्यांच्याबद्दल सरकारी रीतीनें दुःख प्रदर्शित करण्यांत आलें; आणि

जे जिवंत राहिले, त्यांचे इंग्रजसरकाराकडून आभार मानण्यांत आले ! पण ज्या बाजूचा पराभव झाला, त्यांची काय वाट झाली असेल ? त्यांपैकीं कांहीं जागच्या जागीं लढाईत मेले असतील आणि कांहीं तुरुंगांत खितपत पडून मरण पावले असतील ! त्यांच्या तुरुंगांत समाधानाच्या दोन गोष्टी सांगण्याला किंवा प्रोत्साहनपर असे दोन शब्द त्यांच्यापाशीं बोलण्याला कोण आहे ? स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां लढणें आणि मरणें हें आपलें कर्तव्य-कर्म आहे, अशा उदात्त हेतूनें ज्यांनीं आपल्या किल्ल्यांचीं संरक्षणें करितां करितां देह ठेविले, त्यांच्याबद्दल " जरी या लढाईत आपला पराभव झाला, तरी तुम्ही फार पराक्रम केला आणि तुम्ही आपला प्रामाणिकपणा शेवटपर्यंत कायम राखिला ! " असे उत्तेजनाचे उद्गारही कोणाच्या तोंडून निघाले नसतील ! ते ज्या आपल्या शिंदे सरकाराकरितां लढत होते, त्या शिंदेसरकारांनीं यांचा परामर्श घेतला नसता, असें नाहीं. पण जेथें खुद्द दौलतराव शिंद्याचेच आसन कित्येक लोकांच्या कृतघ्नपणामुळें डळमळूं लागलेलें होतें, तेथें त्या बिचाऱ्याच्याकडून असली हीं अशक्य कृत्यें कशीं होऊं शकणार ? आपल्याला कोणी बरें म्हणणार नाहीं, आपलेच लोक आपल्या देशाच्या विरुद्ध उठलेले, जो तो निमकहरामपणा-मध्येंच निमग्न झालेला, पारतंत्र्याचें संपादन हाच खरा पुरुषार्थ असें ज्याला त्याला वाटूं लागलेलें, स्वामिनिष्ठा आणि स्वदेशभक्ति यांना कोणाच्याही दृष्टीनें किंमत उरलेली नाहीं, अशी आपल्या सभोंवतालची बदलत चाललेली परिस्थिति आपल्या डोळ्यांपुढें दिसत असतांही जे आपले मराठे सरदार आणि शिपाई त्या अलीगडच्या तटावरून स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढले आणि मेले, त्या सगळ्याचे देह जरी आज त्या अलीगडच्या किल्ल्याच्या आसपास कोठेंही आतां दिसणे शक्य नसले, तरी त्यांचे स्वातंत्र्यासाठीं आणि स्वामि-निष्ठेसाठीं तळमळणारे आत्मे अजून खात्रीनें तेथून हालले नसतील. स्वर्गांतील देवदूत रोजच्या रोज स्वर्गाचीं दारें उघडून त्यांना स्वर्गांत येण्याविषयीं मोठ्या प्रेमानें बोलावीत असतील ! पण स्वदेशाच्या स्वातंत्र्याच्या पुढें ते स्वर्गांतील सुख तुच्छ मानून ते त्या अलीग-डच्या किल्ल्यांत मेलेल्या त्या हुतात्म्यांचे आणि महात्म्यांचे आत्मे अजूनही कोणाची वाट पहात न कळे !—तेथें बसलेले असले पाहिजेत ! एका इंग्लिश लेखकानें या लढाईच्या स्मरणाच्या संबंधानें असें एक वर्णन लिहिलें आहे कीं:—

"Local tradition says—and solemnly the chowkidar, the solitary householder there, will assert it—that the boom of guns is often heard at night."


यांतील सारांश असा कीं, जो हा अलीगडचा किल्ला पूर्वी एके वेळीं इतका गजबजून गेला होता, तेथें आतां कोणीही माणूस उरलेले नाहीं. जिकडे तिकडे सर्व भयाण आणि भणभणीत झालेलें आहे. त्या शून्य आणि निर्जन प्रदेशामध्यें त्या किल्ल्याच्या दाराशीं रखवालीकरितां एक चौकीदार मात्र असतो, आणि त्याच्या शिवाय दुसरें कोणीही मनुष्य बहुधा तेथें नसतें. तो चौकीदार कोणी एखादा प्रवासी तो किल्ला पहाण्याकरितां गेला असतां त्याला त्या किल्ल्याची जी माहिती सांगतो, त्यांत तो अशीही एक गोष्ट सांगतो कीं, या किल्ल्याच्या आंतून कधीं कधीं रात्रीच्या वेळीं तोफांचे आवाज ऐकूं येतात !

काय ! तोफांचे आवाज ! आणि हे आवाज आतां कोठून उत्पन्न होतात ! या तोफा कोणाकडून उडविल्या जातात ! त्या किल्ल्याचा सगळा पूर्व इतिहास माहीत असलेल्या त्या अलीगडच्या चौकीदाराला रात्रीच्या काळोखांत भेदरून गेल्यामुळें आपण तोफांचे आवाज ऐकत आहों, असा हा भ्रम होतो किंवा, हे अलीगडच्या किल्ल्यावरील हुतात्म्यांनों, तुम्हीच खरोखर या तोफा अजून उडवीत असतां कीं काय ? पण असें असेल, तर तुम्ही मेल्यानंतरही तुमच्यामधील स्वाभिमान अजून जिवंत रहावा, आणि तुमच्या हल्लीं जिवंत असलेल्या वंशजांमध्यें त्यांच्या जिवंतपणींही तो पूर्णपणें मरून गेलेला असावा, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ! आणि ही स्थिति पाहून तुम्हांला काय वाटत असेल ! आपल्या अतृप्त राहिलेल्या आशा केव्हां आणि कोणत्या रीतीनें तृप्त होतील, याच्याबद्दल या निराशेच्या परिस्थितीमध्यें तुमच्या मनांत सदैव विवंचना चाललेल्या असतील ! या अलीगडच्या किल्ल्याच्या लढाईंत तुम्ही मरण पावल्याचा वृत्तांत तुमच्या मुलाबाळांना कळल्यानंतर तुमच्या दहाव्या दिवशीं स्मशानांत तुमच्याकरितां ठेविलेल्या पिंडाला बहुधा दर्भाचा कावळा करूनच त्यांना स्पर्श करवावा लागला असेल ! आणि तुमच्या मृत्यु-तिथीच्या दिवशीं प्रत्येक वर्षी सांवत्सरिक श्राद्धाच्या प्रसंगीं जेव्हां जेव्हां तुमचे नातू आणि पणतू तुमचें आवाहन करीत असतील, तेव्हा तेव्हां त्या प्रत्येक वेळीं पिंडाकरितां केलेले ते केवळ भाताचे गोळे पाहून तुम्ही हिरमुसलेले होऊन परत निघून येत असाल ! त्याचप्रमाणें हल्लींच्या हिंदुस्थानांतील कोणी प्रवासी चुकून कधीं तुमच्या त्या अलीगडच्या किल्ल्यांत आला, तर बहुतकरून तुम्ही सगळे मृतात्मे त्याच्या भोंवतीं गोळा होत असाल आणि मोठ्या उत्सुकतेनें ' तुम्ही आपल्या या हिंदुस्थानांतील किल्ल्यांच्या स्वातंत्र्याकरितां काय करीत आहा ?' असें त्याला विचारूं लागत असाल ! पण, हे हिंदुस्थानांतील हल्लींच्या प्रवाश्यांनों, तुमच्यापैकीं कोणी कदाचित् अशा प्रसंगामध्यें कधीं सांपडला, तर त्यांनीं विचारलेल्या प्रश्नाकरितां, आपण हल्लीं काय करीत आहों, याच्याबद्दल त्यांना कांहीं एक उत्तर देऊं नका ! कारण, तें ऐकून त्यांची किती निराशा होईल आणि त्यांना किती दुःख वाटेल याची तुम्हांला कल्पनाही असणें शक्य नाहीं !

# दिल्लीची लढाई.

पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें ता. ४ सप्टेंबर १८०३ रोजीं अलीगडचा किल्ला हस्तगत झाल्यानंतर सदर किल्ल्याच्या संरक्षणाची वगैरे व्यवस्था लावून ज. लेक हे ता. ७ सप्टेंबर रोजीं आपल्या सैन्यासह दिल्लीकडे जाण्याकरितां निघाले. लॉर्ड लेक यांनीं दिल्लीकडे न जातां ग्वालेरकडे जावें आणि दौलतराव शिंद्याची जी मुख्य राजधानी तिच्यावर हल्ला करून तीच त्यांनीं प्रथम काबीज करून घ्यावी, म्हणजे दौलतराव शिंद्याचा जोर कमी पडेल, अशी मार्क्विस वेलस्ली यांची इच्छा होती. परंतु शिंद्याच्या राजधानीवर आपण चाल करून गेलों, तर तेथें आपल्याला जय मिळेलच, अशी लॉर्ड लेक यांना खात्री नव्हती. आणि दिल्लीला जाऊन शहाआलम बादशहाला आपण आपल्या हस्तगत करून घेतलें, तर त्याच्यापासून आपला जास्त फायदा होईल, असें त्यांना वाटत होतें. मार्क्विस वेलस्ली यांनीं दिल्लीचा बादशहा शहाआलम याच्याकडे आधींपासूनच फितुरीचीं संधानें बांधून ठेविलेलीं होतीं. व ज. लेक याचा मुक्काम कोइल येथें असतांना ता. २९ आगष्ट रोजींच शहाआलम बादशहाकडून ज. लेक यांच्याकडे एक गुप्त पत्र आलेलें होतें. अशा रीतीनें या उभय पक्षांच्या दरम्यान फितुरीचीं खलबतें चालूं झालेलीं असून खुद्द दिल्लीच्या लढाईच्या आधीं एक दोन दिवसांच्यापूर्वी बादशहाकडील जासूद इंग्लिशांच्या छावणीकडे आलेले होते. या सगळ्या प्रकारावरून दिल्लीची परिस्थिति शहाआलम बादशहानें आपल्याकरितां बरीच पोखरून ठेविलेली असली पाहिजे, अशी लॉर्ड लेक यांची खात्री झालेली होती. व त्यामुळें ते कूच दरकूच मजल करीत दिल्लीकडे चालले होते. याप्रमाणें कूच करतां करतां ता. २१ सप्टेंबर १८०३ रोजीं मुराजपूर येथून पहांटे तीन वाजतां निघून आणि सुमारें ९ कोसांची मजल मारून इंग्लिशांचें सैन्य दुपारीं ११ वाजण्याच्या सुमारास दिल्लीपासून ३ कोसांच्या अंतरावर असलेल्या जेहना नांवाच्या एका लहानशा नदीच्या कांठीं आपल्या मुक्कामाच्या ठरलेल्या जागीं ( १-१ ) येऊन पोहोंचलें. तेथें येऊन शिपाई लोक आपआपले तंबू वगैरे ठोकीत आहेत, तोंच त्यांना अशी बातमी लागली कीं, आपल्यापुढें अगदीं थोडक्याच अंतरावर मराठ्यांचें सैन्य लढाईच्या तयारीनें सज्ज होऊन उभें राहिलेलें आहे. व ज. पेरन यानें दिल्लीची व्यवस्था आपल्या हाताखालील फ्रेंच अंमलदार, मि. लुई बोरकिन, याच्याकडे सोंपविली होती. व त्याप्रमाणें लुईनें दिल्लीमध्यें आपल्या सैन्याची चांगली तयारी करून ठेविली होती. दिल्लीचा बादशहा शहाआलम हा जरी आंतून इंग्लिशांना फितूर झालेला होता तरी बाहेरून तो मराठ्यांशीं सलोख्यानेंच वागत होता. व लुई बोरकिन हाही त्याचा फायदा

घेऊन लोकांना असें सांगत होता कीं, तुम्ही बादशहाच्या संरक्षणाच्या कामीं मदत करणें हं तुमचें कर्तव्यकर्म आहे. आणि अशा रीतीनें त्यानें लोकांकडून पुष्कळ मदत मिळविली होती. शिवाय दिल्लीच्या पलीकडील पंजाबांतील शीख लोकांशींहि त्याचे बरेच संबंध असल्यामुळें शीख लोकांकडूनहि त्याला कांहीं मदत मिळाली होती. आणि रोहिलखंडांतील




सहाराणपूरचा प्रांत त्याच्या ताब्यांत असल्यामुळें रोहिले लोकांचीहि त्याला मदत होती. अशा अनेक साधनांनीं मि. लुई बोरकिन यानें आपल्याजवळ बरीच फौज जमा केली होती. त्याच्या सैन्यांत या वेळीं ५ हजार घोडेस्वार असून त्याच्या तोफखान्यांत सुमारें ७०

तोफा होत्या. आणि त्याच्या पायदळामध्यें सुमारें १२।१३ हजार शिपाई होते. अशा सैन्यानिशीं तो इंग्लिशांशीं टक्कर देण्याच्या तयारींत होता. व दिल्लीवर चालून येणाऱ्या लॉर्ड लेकचे मुक्काम कसकसे पडत आहेत, याची बातमी काढून इंग्लिश सैन्य दिल्लीजवळ केव्हां येईल, याची त्यानें अटकळ बांधून ठेविली होती. व त्या अटकळीप्रमाणें त्यानें आपलें सैन्य ता. ११ सप्टेंबर रोजीं सकाळीं आपल्या छावणींतून काढून दिल्ली शहराबाहेर यमुना नदीच्या पलीकडील एका उंचवट्याच्या आणि सुरक्षित अशा जागीं ( २-२ ) नेऊन लढाईच्या शिस्तीनें उभें करून ठेविलें होतें. त्याशिवाय या रांगेच्या डाव्या बाजूच्या पिछाडीला एक लहानसें खेडें ( ३ ) होतें, तेथेंहि लुई बोरकिन यानें आपलें कांहीं रिझर्व्ह सैन्य ठेविलें होतें. व त्याच्या डाव्या बाजूला कांहीं अंतरावर शीख लोकांच्या घोडेस्वारांच्या पलटणी ( ४ ) उभ्या करण्यांत आल्या होत्या; व त्याच्या पलीकडे दलदल होती. अशा रीतीनें त्यानें आपल्या डाव्या बाजूचा बंदोबस्त केला होता. आणि त्याच्या उजव्या बाजूकडील बंदोबस्त करण्याचें काम खुद्द यमुना नदीकडेच सोंपविण्यांत आलेलें होतें. कारण या बाजूला यमुना नदीचें खोल पाण्याचें विस्तृत पात्र असून त्या नदीच्या कांठच्या उंच दरडी आणि उंच टेकाडें हीं बोरकिनच्या उजव्या बाजूच्या टोंकाला अगदीं येऊन लागलीं होतीं. त्यामुळें तिकडून शत्रूचा शिरकाव होणें शक्यच नव्हतें. यमुना नदी ओलांडून शहरांत जाण्याला बोरकिनच्या पिछाडीला फक्त एकच वाट होती. आणि त्या वाटेचें संरक्षण करण्याकरितां आणि येथेंहि शत्रूला अडवून धरण्याकरितां बोरकिननें आपलें कांहीं लष्कर व तोफा ( ५, ५, ५ ) नदीच्या दोन्ही बाजूला ठेवून दिलेल्या होत्या. असा सर्व बाजूंनीं बंदोबस्त करून लुई बोरकिन यानें आपल्या मुख्य सैन्याच्या रांगेसमोर आपल्या तोफा लावून ठेविल्या होत्या. आणि या सगळ्या सैन्याचें संरक्षण करण्याकरितां या रांगेच्यापुढें एक मोठा लांबच लांब खंदक खोदून ठेवण्यांत आलेला होता. आणि या शिवाय या सगळ्या सैन्याच्या रांगेच्यापुढें उंच उंच गवत वाढलेलें असल्यामुळें त्या गवताच्या आडोशामुळें हें सैन्य किती आहे व त्यानें कसकशा माऱ्याच्या जागा रोखून ठेविल्या आहेत, हेंहि शत्रूला समजणें शक्य नव्हतें. अशा कुशलतेनें आपल्या सैन्याची मांडणी करून इंग्लिशांचें सैन्य थकून आपल्या छावणीवर मुक्कामाला आलें म्हणजे त्याच्यावर आपण हल्ला करावयाचा, अशी योजना लुई बोरकिन यानें योजून ठेविलेली होती.

त्या योजनेप्रमाणें इंग्लिशांचें सैन्य ता. ११ सप्टेंबर रोजीं दुपारीं आपल्या ठरलेल्या मुक्कामाच्या जागेवर ( १ ) येऊन ठेपलें. व त्याच्या अघाडीवर पहाऱ्याची चौकी ( ६ ) बसविण्यांत आली. परंतु या चौकीच्या सभोंवतीं मराठ्यांचे घोडेस्वार घिरट्या घालूं लागल्यामुळें तेथील शिपायांना आपल्या मुख्य सैन्याकडे माघारें परतावें लागलें. ही बातमी लॉर्ड लेक यांना कळली, तेव्हां एकंदर परिस्थिति काय आहे, याची टेहळणी करण्याकरितां आपल्या बरोबरचे सर्व घोडेस्वार घेऊन ते पुढें ( ७ ) चालून गेले. त्या वेळीं त्यांना असें आढळून आलें कीं, आपल्या समोरील उंचवट्याच्या जागेवर मराठ्यांच्या फौजा व त्यांच्या पाठीमागें त्यांच्या घोडेस्वारांच्या पलटणी लढाईच्या तयारीनें उभ्या असून त्यांच्या रांगेच्या पुढें त्यांच्या तोफा डागलेल्या आहेत; व या सगळ्या समोरच्या रांगेचें एका

खंदकानें संरक्षण करण्यांत आलेलें असून डाव्या बाजूकडे दलदल आणि उजव्या बाजूकडे यमुना नदी असल्यामुळें या दोहोंपैकीं कोणत्याहि बाजूनें मराठ्यांच्या पिछाडीकडे जाण्याला मार्ग नसल्याकारणानें त्यांच्यावर समोरून हल्ला करण्याशिवाय गत्यंतर नाहीं, हीहि गोष्ट त्याच वेळीं लॉर्ड लेक यांच्या लक्षांत आली. तेव्हां आपल्या छावणीच्या आणि सामानसुमानाच्या संरक्षणाकरितां कांहीं लोक ( ८ ) मागें ठेवून बाकी सर्व पायदळ आणि तोफखाना यांनीं पुढें चाल करून येण्याविषयीं लॉर्ड लेक यांचेकडून ताबडतोब हुकूम पाठविण्यांत आले. तरी पण हें मागील लष्कर येऊन पोंचण्याला सुमारें एक तासभर अवकाश लागला. आणि तेवढ्या अवधींत लॉर्ड लेक आणि त्यांच्याबरोबर पुढें गेलेल्या घोडेस्वारांच्या पलटणी ( ७ ) यांची फारच तारंबळ उडाली. हे लोक आपली छावणी सोडून एकटेच पुढें एक कोसभर चालून गेलेले होते. तेव्हां या नुसत्याच घोडेस्वारांच्या पलटणी आहेत आणि यांच्याबरोबर तोफांचें किंवा पायदळाचें कांहीं संरक्षण नाहीं, ही गोष्ट समोरील मराठ्यांच्या ध्यानांत येऊन त्यांनीं आपल्या तोफांचा भडिमार या घोडेस्वारांच्या पलटणीवर सुरू केला. त्यामुळें इंग्लिशांचें फार नुकसान झालें. व त्यांचे पुष्कळ घोडे आणि त्या घोड्यांवरील घोडेस्वार या प्रसंगीं मृत्युमुखीं पडले. खुद्द लॉर्ड लेक हे ज्या घोड्यावर बसले होते, त्याला गोळी लागून तोही मरण पावला. त्या वेळीं त्यांचा मुलगा, मेजर लेक, हा त्यांच्याजवळ होता; त्यानें आपला घोडा लॉर्ड लेक यांना दिला व आपल्याकरितां त्यानें दुसरा घोडा आणविला. यावरून या वेळीं इंग्लिशांचे घोडेस्वार मराठ्यांच्या तोफखान्याच्या कसे कचाटींत सांपडले होते, याची कोणालाही कल्पना करितां येण्यासारखी आहे. मागून इंग्रजी पायदळ आणि तोफखाना लॉर्ड लेक यांच्या मदतीला लौकर येईना आणि समोरून चालू असलेल्या मराठ्यांच्या तोफखान्याच्या माऱ्यापुढें लॉर्ड लेक यांना टिकाव धरून उभें रहातां येईना. अशा दुहेरी पेंचांत सांपडल्यामुळें लॉर्ड लेक हे निरुपाय होऊन आणि पराभव पावून बहुतकरून माघारे वळले असले पाहिजेत. त्यांनीं आपल्या हाताखालच्या सर्व घोडेस्वारांच्या पलटणींना परत फिरण्याविषयीं हुकुम दिला. व त्याप्रमाणें हे इंग्लिशांचे घोडेस्वार पराभव पावून माघारे वळले. शत्रूचे घोडेस्वार पराभव पावून आणि माघार खाऊन परत चालले आहेत, ही गोष्ट जेव्हां मराठ्यांच्या फौजेंतील शिपायांनीं पाहिली, तेव्हां त्यांना मोठा आनंद झाला. व विजयाच्या आरोळ्या मारीत ते या परत चाललेल्या घोडेस्वारांच्या पलटणींचा पाठलाग करण्याकरितां आपल्या जागेपासून पुढें सरसावले.

वर वर्णन केल्याप्रमाणेंच बहुतकरून त्या वेळीं खरी स्थिति झालेली असली पाहिजे, हेंच एकंदर आजुबाजूच्या लढाईच्या परिस्थितीवरून कोणालाही संभवनीय आणि सत्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु अशा रीतीनें इंग्लिशांचा या वेळीं तात्पुरता कां होईना पण पराभव झाला, ही गोष्ट जरी उघड उघड सिद्ध होत असली, तरी इंग्लिश इतिहासकार त्याला आपली संमति कशी देणार ? त्यांनीं या हकीकतीवर आपल्या पक्षाला अनुकूल अशी दुसरीच एक कल्पना बसविलेली आहे. या बाबतींत ते असें प्रतिपादन करितात कीं, या वेळीं आमचा पराभव झाला, असें मुळींच नाहीं. तर मराठ्यांच्या फौजेची जागा फार मज-

बूत असल्यामूळें व त्या जागेवर ते असतांना त्यांच्यावर समोरून हल्ला करतां येणें अशक्य असल्यामुळें त्यांना त्या जागेवरून हलवण्याकरितां आपला पराभव झाला आहे आणि आपण पळून चाललों आहों, अशी लॉर्ड लेक यांनीं मराठ्यांना नुसती हुलकावणी दाखविली ! ( The British General resolved upon a feint to draw them from their intrenchments. ) त्रैलोक्यविजयी ब्रिटिश सेनापति पराभव कसे पावणार ! त्यांचा पराभव ही अशक्य गोष्ट असल्यामुळें त्यांनीं मराठ्यांना फसवण्याकरितां आपण पराभव पावण्याचें फक्त सोंग केलें, असें इंग्लिश इतिहासकारांनीं लिहावें आणि इंडियन वाचकांनीं तें सत्य मानावें, हें उचितच आहे. पण इंग्लिशांनी पराभव पावल्याचें निवळ ढोंग केलें होतें, ही गोष्ट खोटी असण्याला आणखीही एक प्रमाण असें दिसतें कीं, ही दिल्लीची लढाई झाल्यानंतर ता. ११, १२ आणि १३ सप्टेंबर या दिवशीं खुद्द लॉर्ड लेक यांनीं मार्किस वेलस्ली यांना लागोपाठ जीं तीन पत्रें लिहिलीं आहेत, त्यांमध्यें या हुलकावणीचा त्यांनीं कोठेंही उल्लेख केलेला नाहीं.

असो. याप्रमाणें मराठ्यांच्या तोफखान्यापुढें पराभव पावून इंग्लिशांचे घोडेस्वार माघारे पळून येत असतां अखेरीस छावणींतून येणाऱ्या पायदळाची आणि त्यांची कांहीं अंतरावर गांठ पडली. त्या वेळीं मराठ्यांच्या तोफखान्याचा मार खाऊन जेरीस आलेल्या त्या घोडेस्वारांच्या रांगा दोन बाजूला निरनिराळ्या होऊन त्यांनीं आपल्यामधून त्या पायदळाला पुढें जाण्याला वाट करून दिली. नंतर या पुढें घातलेल्या पायदळाची रांग ( ९–९ ) लढाईच्या शिस्तीनें बनविण्यांत आली. व त्यांच्या उजव्या बाजूच्या पिछाडीला सुमारें शंभर कदमांच्या अंतरावर घोडेस्वारांच्या पलटणी ( १०–१० ) उभ्या राहिल्या. यांपैकींच कांहीं घोडेस्वार मराठ्यांच्या डाव्या बाजूकडून हल्ला करणाऱ्या शीख लोकांच्या घोडेस्वारांच्या पलटणींना रोखून धरण्याकरितां त्या बाजूला (११) पाठविण्यांत आले होते, व त्यांच्याबरोबर कांहीं घोड्यांवरील तोफाही देण्यांत आल्या होत्या. इंग्लिश सैन्याच्या पायदळाची ही जी रांग उभी करण्यांत आली होती, तिच्या डाव्या हातच्या बाजूला एक लहानसें खेडें ( १२ ) होतें. तेथून आपल्या रांगेच्या डाव्या बाजूचा बचाव व्हावा म्हणून एक नेटिवांची पायदळ पलटण ( १३ ) व चार तोफा ( १४ ) तेथें ठेवण्यांत आल्या होत्या. अशा रीतीनें इंग्लिशांकडची तयारी झाल्यानंतर तें सैन्य मराठ्यांच्या रांगेवर हल्ला करण्याकरितां पुढें चाल करून निघालें, त्या वेळीं लॉर्ड लेक हेही त्या सैन्याबरोबर पुढें चालले होते. इंग्लिशांचें हें सैन्य आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहून मराठ्यांच्या ( २–२ ) रांगेमधून फिरून तोफांची सरबती इंग्लिश सैन्याच्या विरुद्ध अतिशय जोरानें सुरू झाली.

या वेळीं मराठी शिपायांचीं अंतःकरणें किती तरी उदात्त विचारांनीं उंचबळून आलीं असतील ! त्यांना आपल्या पूर्व इतिहासाचें स्मरण झालें असेल ! आणि आपल्या पूज्य पूर्वजांच्या मूर्ति प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागल्या असतील. आपल्या सदाशिवराव भाऊंनीं ज्या दिल्लीचें तक्त फोडून तेथें आपला अंमल बसविला, ती दिल्ली आपण या इंग्लिशांच्या ताब्यांत केव्हांही जाऊं देणार नाहीं, असें त्यांना वाटलें असेल ! ज्या महादजी

शिंद्यांनीं या दिल्लीची मसनद आपल्या मराठ्यांच्या ताब्यांत आणिली, त्या महादजी शिंद्यांच्या-त्या पाटीलबुवांच्या-दिल्लीमध्यें आम्हीं जर आज या इंग्लिशांना येऊं दिलें, तर ते पाटीलबुवा आम्हांला काय म्हणतील, अशी त्यांच्या मनामध्यें जाणीव उत्पन्न झाली असेल ! आम्ही दौलतराव शिंद्यांचे स्वामिनिष्ठ शिपाई आहों, आम्ही येथें मरूं पण मागें हटणार नाहीं, अशी त्यांच्या मनामध्यें त्या वेळीं महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली असेल. त्यांनीं शिवाजीचें स्मरण केलें असेल ! त्यांनीं आपली जन्मभूमि आठविली असेल ! आणि त्या योगानें उत्पन्न होणाऱ्या आवेशाच्या भरांत त्यांच्या पुढील तोफांच्या आवाजापेक्षांही जास्त मोठ्यानें त्यांनीं आपल्या "हरहर महादेव !" च्या गर्जना आकाशामध्यें उसळवून दिल्या असतील !

अशा प्रकारच्या उज्वल भावनांनीं प्रज्वलित झालेल्या त्या वेळच्या त्या मराठ्यांच्या शिपायांनीं आपलें गोलंदाजीचें काम फारच उत्कृष्ट रीतीनें केलें व त्यामुळें इंग्लिशांकडील लोकांचें नुकसानही फार झालें. तरी पण तें सगळें नुकसान सोशीत आणि आपल्या डोक्यावर पडणाऱ्या गोळ्यांचा मारा सहन करीत इंग्लिशांचें सैन्य तसेंच पुढें चाललें होतें. तोंपर्यंत इंग्लिश शिपायांनीं आपल्या खांद्यावरील बंदूक आपल्या खांद्यावरून हालविली नाहीं, किंवा त्यांतून त्यांनीं मराठ्यांवर एकही गोळी झाडली नाहीं. अशा रीतीनें चाल करून जातां जातां जेव्हां त्या दोन सैन्यांच्या दरम्यान सुमारें शंभर कदमांचें अंतर राहिलें, तेव्हां बंदुकांना बागनेटें लावून हल्ला करण्याविषयीं त्यांना हुकूम सुटला. तेव्हां इंग्लिश सैन्यानें ( १५-१५ ) मराठ्यांच्या रांगा फोडून त्यांच्यावर मोठ्या जोरानें हल्ला केला. आणि त्यापुढें मराठ्यांच्या रांगा टिकाव धरूं शकल्या नाहींत. आणि एकदां रांग फुटल्यानंतर मराठ्यांच्या सैन्यांतील लोक चार चोहोंकडे निघून जाऊं लागले. अशा रीतीनें मराठ्यांची रांग मोडल्यानंतर ज. लेक यांनीं आपल्या घोडेस्वारांना मराठ्यांचा पाठलाग करण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें त्या घोडेस्वारांच्या निरनिराळ्या टोळ्या ( १६-१६-१६ ) मराठ्यांच्या पाठीस लागून त्यांनीं त्यांना थेट यमुनेच्या कांठापर्यंत पिटाळीत नेलें. त्यामुळें मराठ्यांचे बरेच लोक यमुनेच्या पाण्यांत बुडून मरण पावले. या लढाईंत सुमारें ६८ तोफा व इतर सामान इंग्लिशांच्या हातीं लागलें. या लढाईला दुपारीं १२ वाजण्याच्या सुमारास तोंड लागून ती लढाई संपेपर्यंत बहुतेक संध्याकाळ होऊन गेलेली होती. या लढाईंत मराठ्यांच्या बाजूच्या लोकांनीं फारच चांगली कामगिरी बजाविली, हें लॉर्ड लेक यांच्याच एका पत्रांतील The enemy opposed to us a tremendous fire from a numerous artillery, which was uncommonly well served, and caused us considerable loss in officers and men, या उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे. यामुळें इंग्लिशांकडील ६ अंमलदार ठार होऊन ७८ जण जखमी झाले. शिवाय सामान्य शिपायांची संख्याही जवळ जवळ हजारपर्यंत गेली. ता ११ सप्टेंबर १८०३ रोजीं संध्याकाळीं ही लढाई संपल्यावर इंग्लिशांच्या फौजेनें त्या दिवशीं रात्रीं त्याच मैदानावर आपला तळ दिला.

# लासवारीची लढाई.

दिल्लीच्या लढाईत इंग्लिशांनीं फितुरीच्या जोरावर आपल्याला विजय मिळवून घेतल्यानंतर इंग्लिशांचे मुख्य सेनापति लार्ड लेक यांनीं दिल्लीमध्यें दिल्लीच्या रस्त्यांतून आपली एक जंगी मिरवणूक काढून घेण्याचा समारंभ जुळवून आणिला. शहाआलम बादशहापाशीं इंग्लिशांचीं आंतून चोरून कारस्थानें चाललेलींच होतीं. दिल्ली येथील रेसिडेंटच्या खास विश्वासांतील एक इसम, सय्यद रेझाखान, हे इंग्लिशांचे निरोप शहाआलम बादशहाकडे पोंचविण्यांत गर्क झालेले होते; व त्यांच्या मध्यस्थीनें बादशहाकडील फितुरीचें भांडें शिजून तयार झालेलें होतें. व त्या जोरावर अखेरीस इंग्लिशांना जयही मिळाला. मग काय विचारावयाला पाहिजे ! गुप्त फितुरीच्या जोरावर इतका मोठा दिग्विजय मिळाल्यानंतर दिल्लीच्या रस्त्यांतून मिरवणूकही निघालीच पाहिजे ! दिल्ली हें हिंदुस्थानच्या बादशाही वैभवाचें अगदीं आगर ! तेथें कसें तरी करून आपले पाय लागले पाहिजेत, ही इंग्लिशांची मनापासूनची किती तरी दिवसांची महत्त्वाकांक्षा ! ती महत्त्वाकांक्षा पुरी होण्याची संधि दिल्लीच्या जयानें प्राप्त झाली असतां त्या संधीचा फायदा न घेण्याइतके त्या वेळचे राज्यलोभी इंग्लिश उदासीन कसे असूं शकतील ! शहाआलमला संकटांतून सोडविण्याकरितां तर दिल्लीच्या लढाईची येवढी खटपट ! मग त्या लढाईंत फितुरीच्या ईश्वर-कृपेनें जय मिळाल्यानंतर शहाआलम बादशहाला भेटल्यावांचून इंग्लिशांच्या सेनापतीनें कसें रहावयाचें ? ता. ११ सप्टेंबर रोजीं लढाई झाल्यानंतर ता. १६ सप्टेंबर हा बादशहाच्या भेटीचा दिवस ठरला. व त्या दिवशीं दुपारीं तीन वाजतां शहाआलम बादशहाचा मुलगा मिर्झा अकबरशहा, हा लॉर्ड लेक यांच्या छावणीमध्यें त्यांना बादशहाच्या भेटीसाठीं दिल्लीस नेण्याकरितां हत्तीवर बसून दाखल झाला. व नंतर लॉर्ड लेक यांची स्वारी मोठ्या थाटानें निघून दिल्लीच्या राजवाड्यांत अस्तमानीं येऊन पोंचली. या स्वारीचा आणि मिरवणुकीचा समारंभ पाहण्याकरितां दिल्लीच्या रस्त्यामध्यें आणि दिल्लीच्या राजवाड्यामध्येंहि आनंदित झालेल्या लोकांची अतिशय गर्दी जमली होती, अशीं वर्णनें आढळतात. हिंदुस्थानांतील लोक खरे वेदान्ती आहेत. त्यांना आपपर भाव मुळींच नाहीं. कोणाचाही जय झाला, तरी त्या बिचाऱ्यांना आनंद होतो; आणि आपला स्वतःचा पराजय झालेला असला, तरी त्या पराजयाचें दुःख दुसऱ्याच्या विजयाच्या आनंदामध्यें ते विसरून जातात; इतकी समता आणि इतकी विश्वबंधुता दुसऱ्या लोकांमध्यें क्वचितच सांपडेल. ज. वेलस्ली हे कांहीं महिन्यांपूर्वीं दुसऱ्या बाजीराव साहेबांना पुण्याच्या गादीवर बसविण्याकरितां पुण्याच्या रस्त्यांतून मिरवत गेले, तेव्हां पुण्याच्या लोकांनीं असाच आनंद व्यक्त केला, आणि इ. स. १८०३ च्या सप्टेंबर महिन्याच्या १६ व्या तारखेला लॉर्ड लेक हे शहाआलम बादशहाच्या

भेटीला दिल्लीच्या रस्त्यांतून गेले, तेव्हां दिल्लींतील लोकांनाही तसाच आनंद झाला. पण यांत दिल्लीच्या लोकांनीं आनंद व्यक्त करण्यासारखें काय होतें ? दिल्लीच्या लढाईत परकीय लोकांनीं येऊन आपल्या लोकांचा पराभव केला, याबद्दल दिल्लीच्या लोकांना आनंद होत होता ? आणि फितुरीच्या कामांतील ज्या महापराक्रमी पुरुषानें आपल्या देशबांधवांचा पराभव केला, त्याचें दर्शन घेण्याकरितां त्या दिल्लीच्या लोकांचे डोळे उत्कंठित झालेले होते ? या वेळीं ज्या शहाआलम बादशहाचे डोळे गेलेले होते, तोच धन्य होय, असें म्हटलें पाहिजे. ज्या गुलाम कादरनें शहाआलमचे डोळे काढिले, तसले आणखी कांहीं गुलाम कादर आपल्या पराजयाचे आणि आपल्या गुलामगिरीचे सोहाळे पहाण्याकरितां उत्सुक झालेल्या लोकांची दृष्टि बंद करण्याला पुढें आले असते, तर त्यांचे हिंदुस्थानच्या नैतिक इतिहासावर खात्रीनें उपकारच झाले असते !


शहाआलमचे डोळे आपली गुलामगिरी पाहूं शकत नव्हते, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे खरी. पण त्याचें मन गुलामगिरीच्या शृंखलांनीं पूर्णपणें निगडित झालेलें होतें. लॉर्ड लेक यांना आणण्याकरितां त्यानें आपल्या मुलाला पाठविलें; आणि आपल्या राजवाड्यांतील किल्ल्यांत आणून लॉर्ड लेक यांना त्यानें "खान, दौरनखान, फत्ते जंग," इत्यादि पदव्या दिल्या. पूर्वी गुलाम कादरच्या जुलुमांतून महादजी शिंदे यांनीं शहाआलमला सोडविलें, त्या वेळीं शहाआलम महादजी शिंद्यांची स्तुति करावयाला तयार; आणि आतां लॉर्ड लेक यांना दिल्लीच्या लढाईत जय मिळाल्याबरोबर शिंद्यांच्या विरुद्ध इंग्लिशांची स्तुति करण्यालाहि शहाआलम तयार ! असले शहाआलम काय कामाचे ? प्रत्येक वाऱ्याच्या लहरीबरोबर आपली गति बदलणारे एखाद्या गवताच्या काडीसारखे हे बलाढ्य बादशहा आपल्या असल्या कमकुवतपणाच्या बलाढ्यतेनें आपल्या देशाचें आणि आपल्या लोकांचें काय कल्याण करूं शकणार आहेत ? बाबर, हुमायून, अकबर, अवरंगजेब, वगैरेंसारख्या अभिमानी बादशहांच्या वंशमालिकेमधून उत्पन्न झालेल्या बादशहांनीं जो प्रत्येक नवीन जिंकणारा येईल, त्याच्यापुढें आपली मान वांकवावी आणि त्याच्या स्तुतिपाठाला आपलें मन उद्युक्त करावें, ही गोष्ट केव्हांही योग्य नव्हे. डोळ्यांतील पहाण्याची शक्ति एखादा गुलाम कादर काढून घेऊं शकेल; पण मनुष्याच्या मनाच्या डोळ्यांतील जी विचार करण्याची शक्ति आहे, ती परमेश्वरानें इतकी खोल आणि इतकी सुरक्षित ठेविली आहे कीं, तेथें कोणत्याहि गुलाम कादरचे हात पोहोचूं शकत नाहींत ! पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, तेथें गुलाम कादरांचेही हात पोंचूं शकूं नयेत, अशी परमेश्वरानें योजना केलेली आहे, त्या मनाच्या डोळ्यावर गुलामगिरीचीं वैभवें आपलें भुरळ पाडूं शकतात !

गुलामगिरीच्या वैभवामध्येंहि वैभव आहे, असें हिंदुस्थानांतील राजांना आणि लोकांना वाटावें, हें मोठें आश्चर्य आहे !—नव्हे, हें आपल्या देशाचें दुर्भाग्य आहे ! आपल्या देशांतील लोक या बाबतींत वेडसर आणि धर्मभोळेच आहेत ! त्यांच्या या आत्मघातकी सद्गुणांना पारावारच नाहीं ! दिल्लीच्या लढाईत इंग्लिशांना जय मिळाला आणि लॉर्ड लेक व शहाआलम बादशहा यांच्या गांठी पडल्या, त्या वेळीं शहाआलम बादशहाला इतका आनंद झाला कीं, त्यामुळें त्याच्या फुटलेल्या डोळ्यांना फिरून दिसूं लागलें, अशी एक त्या

वेळीं अफवा उठली होती ! व ती पुष्कळ भोळसर लोकांकडून कांहीं दिवस खरीहि मानण्यांत येत होती ! अरेरे ! गेलेले डोळे फिरून यावेत, इतकें गुलामगिरीमध्यें सामर्थ्य आहे, असें हिंदुस्थानांतील लोकांना वाटावें ना ! असें असतें, तर मग जगांतलि बाकीच्या लोकांनीं स्वतंत्रतेचे एवढे पोवाडे कशाला गाइले असते ? आणि गुलामगिरीमध्यें फुटलेले डोळे धड करण्याचें तेज असतें, तर इंग्लिशांच्या गुलामगिरीच्या प्रत्येक अंमलाखालील सर्व दवाखाने बंदच करण्याची पाळी आली नसती काय !—शहाआलमला फिरून डोळे आले ! आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे महोत्सव पहाण्याकरितां मला फिरून दृष्टि दे, अशी आंधळ्या माणसांनीं देवापाशीं प्रार्थना करणें हें अगदीं साहजिक आहे. आणि शिवाजीमहाराज रायगडावर आपल्या स्वातंत्र्याचा भगवा झेंडा उभारीत होते व रघुनाथराव पेशवे अटक नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर आपलें जरीपटक्याचें निशाण घेऊन रोवीत होते, त्या वेळीं तीं निशाणें पहाण्याकरितां आपल्याला डोळे नाहींत म्हणून त्या वेळचे हिंदुस्थानांतील सर्व स्वातंत्र्याभिमानी आंधळे लोक ढळढळां रडले असतील ! आणि इ. स. १८१८ मध्यें बाळाजीपंत नातूंनीं पेशव्यांच्या शनवारच्या वाड्यावर जें निशाण नेऊन उभारलें, तें न पहाण्याकरितां परमेश्वरानें आपल्याला आंधळे केलें नाहीं, याबद्दल इंग्लिशांना फितूर न झालेल्या पुण्यांतील सर्व स्वराज्यप्रेमी लोकांनीं ईश्वराला दोष दिला असेल ! आणि असें असतां गुलामगिरीच्या आनंदानें शहाआलमला डोळे आले ? त्या आलेल्या डोळ्यांनीं काय पहावयाचें ? आपल्या स्वतःच्या पायांतील बदललेल्याच बिड्या पहावयाच्या कीं नाहींत ? त्याच्यापेक्षां डोळे नसलेलेच काय वाईट ? त्या गुलामगिरीच्या शृंखळांतील आवाज बहिऱ्या न झालेल्या आपल्या हतभाग्य कानांना ऐकावे लागत आहेत, हें काय थोडें झालें ? त्यांच्याबरोबर त्या शृंखलांचें तें हिडिस स्वरूप प्रत्यक्ष पाहण्याकरितां आपल्या आगत्या आंधळ्या झालेल्या डोळ्यांमध्यें डोळसपणा उत्पन्न करून घेण्याची कोणता सुज्ञ मनुष्य इच्छा धारण करील ?

असो. दिल्लीच्या लढाईनंतर दिल्लीमधील व्यवस्था करण्याकरितां ले. कर्नल आक्टरलोनी यांची नेमणूक करून ज. लेक हे आपल्या सैन्यासह आग्र्याकडे जाण्याकरितां ता. २४ सप्टेंबर १८०३ रोजीं दिल्लीहून निघाले; व आक्टोबर महिन्यांत त्यांनीं आग्र्याचा किल्ला सर करून घेतला. त्यानंतर ज. लेक यांची छावणी आग्र्यामध्यें असतांना त्यांना मराठ्यांच्या आणखी एका फौजेच्या हालचालीची बातमी येऊन पोंचली. दौलतराव शिंदे यांच्याबरोबर असईच्या लढाईच्या वेळीं ज्या पलटणी दक्षिणेमध्यें गेलेल्या होत्या, त्यांपैकीं सुमारें १५।१७ पलटणी दक्षिणेंतून वर उत्तर हिंदुस्थानांत येण्याकरितां निघालेल्या होत्या. हें दक्षिणेंतून येणारें सैन्य आणि उत्तर हिंदुस्थानांत दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणीं ज. पेरन यांच्या हाताखालीं असलेलें सैन्य, अशा या दोन्ही सैन्यांनीं एकत्र व्हावें आणि उत्तर हिंदुस्थानांतलि ज. लेक यांच्या हाताखालील इंग्लिश सैन्याच्या हालचालींना शह द्यावा, असा मराठ्यांचा हेतु होता. व त्यासाठीं या दक्षिणेंतील फौजा नर्मदा ओलांडून वर येत होत्या. परंतु शिंद्याच्या या दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील सैन्याचा मिलाफ होण्याच्या आधींच दुर्दैवानें दिल्ली आणि आग्रा येथील लढाया होऊन हीं दोन्हींहि शहरें इंग्लिशांच्या ताब्यांत

गेलीं. आणि ज्या उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील शिंद्यांच्या सैन्यानें मिळून इंग्लिशांचा धुव्वा उडवून दिला असता, त्यांपैकीं प्रत्येक सैन्याबरोबर वेगवेगळी लढाई करण्याची संधि इंग्लिशांना मिळून त्यांचा फायदा झाला. उत्तरेकडील सैन्याला आधींच उद्ध्वस्त करून टाकून दिलेलें असल्यामुळें दक्षिणेकडून येणाऱ्या शिंद्याच्या या १५।१७ पलटणींना एकटें गांठून आणि त्यांच्याशीं वेगळी लढाई देऊन त्यांचा लासवारीच्या लढाईमध्यें पराभव करण्याला इंग्लिशांना फार सोपें गेलें. लढाईंत पुष्कळ गोष्टी नशिबावर अवलंबून असतात, त्या ह्या अशा ! हीं दोन सैन्यें एकत्र झालीं असतीं, तर कदाचित् इंग्लिशांचा नाश झाला असता. परंतु दुर्दैवानें तीं इंग्लिशांकडून निरनिराळीं गांठलीं गेल्यामुळें अपयशानें शिंद्यांच्या या दोन्हीहि लष्करांना घेरलें. उत्तरेकडलि सैन्याशीं आपला मिलाफ होऊं शकत नसून त्या उत्तरेकडील सैन्याचा पराजय झाला आहे व दिल्ली शहर शत्रूच्या हातांत गेलें आहे, ही बातमी जेव्हां या दक्षिणेकडील सैन्याला समजली, तेव्हां त्या सैन्याची अर्थातच मोठी निराशा झाली. परंतु इंग्लिशांचें सैन्य दिल्लीपासून दूर गेलें असतां आपण अचानक रीतीनें जाऊन दिल्लीवर छापा घालावा आणि तें बादशहाच्या राजधानीचें मुख्य शहर फिरून आपल्या हस्तगत करून घ्यावें, असा ह्या दक्षिणच्या सैन्याच्या सेनापतीनें विचार चालविला होता. व त्यासाठीं तें सैन्य दिल्लीच्या आसपासच्या प्रांतांत घिरट्या घालीत होतें. दिल्ली शहर फिरून आपल्या ताब्यांत आल्यावांचून उत्तर हिंदुस्थानांतील आपलें वजन कायम राहणार नाहीं, ही गोष्ट मराठ्यांना कळून चुकलेली होती; व दिल्ली आपल्या हातांतून जातां कामा नये, असें इंग्लिशांनाहि वाटत होतें. त्यामुळें मराठ्यांच्या या अवशिष्ट राहिलेल्या सैन्याचा पराभव करणें इंग्लिशांना जरूर झालें. व त्या उद्देशानें ज. लेक हे ता. २७ आक्टोबर रोजीं आग्र्याहून या मराठी सैन्यापाशीं लढाई देण्याला निघाले. परंतु वाटेंत फार पाऊस लागल्यामुळें करोली या गांवींच त्यांना एक दिवस मुक्काम करावा लागला. त्यानंतर दुसरे दिवशीं इंग्लिश सैन्य फत्तेपूरशिक्री येथें येऊन पोहोंचलें. आणि त्यानंतर फिरून दुसरे दिवशीं फत्तेपूरशिक्री येथें आपलें सामानसुमान आणि मोठमोठाल्या तोफा ठेवून बाकीचें लष्कर १० कोसांची मजल मारून पुढें कूच करून गेलें. तेव्हां ता. ३१ आक्टोबर रोजीं हें इंग्लिशांचें सैन्य मराठ्यांच्या लष्करापासून थोड्या अंतरावर येऊन पोहोंचलें. तरी या दोन सैन्यांच्यामध्यें अद्यापि सुमारें २५ मैलांचें अंतर असून मराठ्यांचें सैन्य लासवारी या गांवाजवळ एका नदीच्या कांठीं आपला तळ देऊन राहिलें होतें. या सैन्यावर ताबडतोब हल्ला करावा असा निश्चय करून लॉर्ड लेक हे ता. ३१ आक्टोबर रोजीं रात्रीं आपल्याबरोबर आपले घोडेस्वार घेऊन निघाले. व ता. १ नोव्हेंबर रोजीं सकाळीं ते मराठ्यांच्या सैन्याजवळ येऊन पोहोंचले. या वेळीं त्यांचा तोफखाना व पायदळ मागेंच राहिलेलें होतें. परंतु आपण शत्रूशीं लढाई सुरू करावी तों इतक्यांत दोन प्रहरपर्यंत आपला तोफखाना व आपलें पायदळ मागाहून येऊन पोहोंचेल, असा त्यांचा अजमास होता. व म्हणून त्यांनीं सूर्योदयाच्याबरोबर लढाईला सुरवात केली. या वेळीं मराठ्यांचें सैन्य लासवारी आणि मोहोळपूर या दोन गांवांच्या दरम्यान उभें राहिलें होतें. या सैन्याची उजवी बाजू ( १ ) लासवारीच्या गांवापासून सुरू होऊन तिच्या डाव्या बाजूचें टोंक ( २ ) थेट मोहोळपूरच्या


लासवारीच्या
लढाईचा नकाशा.
ता१ नोव्हेंबर १८०३.
मोहोलपूर
साजेपुरा
नदीचाबधारा

गांवाजवळ जाऊन पोहोंचलें होतें. या लष्करामध्यें एकंदर १७ कवायती कंपू असून त्यांतील शिपायांची संख्या सुमारें ९ हजार होती. घोडेस्वारांची संख्या सुमारें ५ हजार होती. आणि या लष्कराजवळ एकंदर ७२ तोफा होत्या. या सैन्यावर कित्यक फ्रेंच अंमलदार मुख्य होते. परंतु ते आयत्या वेळीं फितूर होऊन निघून गेल्यामुळें या सगळ्या सैन्याची हुकमत सरदार अंबाजी इंगळे यांच्याकडेच आलेली होती. व तें स्वतः या लढाईमध्यें मोठ्या शौर्यानें लढत होते. या वेळीं दौलतराव शिंदे हे दक्षिणेंतच होते. परंतु ते नसतांना त्यांच्या पाठीमागें अंबाजी इंगळे हे आपल्या धन्याची कामगिरी मोठ्या इमानेंइतबारें बजावीत होते. लासवारी या गांवाच्या पाठमिागून एक नदी वहात होती. व त्या नदीच्या पलीकडे इंग्लिशांचे घोडेस्वार येऊन पोहोंचले होते. ते आतां आपल्यावर हल्ला करण्याकरितां येणार, असें पाहून त्यांच्या येण्याला कांहीं तरी अडथळा करण्याकरितां मराठ्यांनीं या वेळीं एक युक्ति योजिली. लासवारीच्या नदीच्या जवळच एक मोठा बंधारा घालून तेथें पुष्कळ पाणी अडविलेलें होतें. तो बंधारा मराठ्यांनीं फोडला. तेव्हां त्याचें पाणी चोहोंकडे पसरून इंग्लिश लष्कराच्या वाटेंत जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें. त्यामुळें त्या पाण्यांतून आणि चिखलांतून येण्याला इंग्लिशांच्या घोडेस्वारांना साहजिकच पुष्कळ वेळ लागला. व तेवढ्या अवधींत मराठ्यांना आपल्या जागेचा जास्त बचाव करण्याला संधि मिळाली. मराठ्यांचें पायदळ एका खंदकाच्या मागें उभें राहिलेलें होतें, आणि त्याच्यापुढें उंच गवत उगवलेलें असल्यामुळें त्यांचें सैन्य किती आहे याची शत्रूला कल्पना येणें अशक्य होतें. शिवाय त्या गवतामधूनच मराठ्यांनीं आपल्या तोफा दडवून ठेवलेल्या असल्यामुळें त्याबद्दलही शत्रूला माहिती कळणें कठीण झालेलें होतें. इंग्लिशांच्या घोडेस्वारांच्या पलटणी ज्या नदीच्या पलीकडे होत्या, त्या तिकडून लासवारीच्या गांवासमोर येऊन जेव्हां आपल्या रांगा बनवूं लागल्या, तेव्हां त्यामुळें धुळीचे लोट आकाशांत उंच उडूं लागले. आणि त्या कारणानेंहि मराठ्यांची फौज कोठें आणि कशी उभी राहिली आहे, हें लॉर्ड लेक यांना नक्की कांहींच कळेना. इतक्यांत मोहळपूरच्या डाव्या टोंकाच्या बाजूला जें कांहीं मराठ्यांचें सैन्य आपल्या लढाईच्या रांगेमध्यें उभें राहण्याकरितां चाललें होते, त्या सैन्याच्या हालचाली लॉर्ड लेके यांच्या दृष्टोत्पत्तीस आल्या. तेव्हां मराठ्यांची फौज पळ काढून मेवाडच्या डोंगरांतून जयपूरकडे निघून चालली असली पाहिजे, असा त्यांच्या मनाचा ग्रह झाला; व त्यामुळें त्यांनीं आपल्या घोडेस्वारांच्या पहिल्या ब्रिगेडला मोहोळपूरच्या बाजूनें हल्ला करण्याचा हुकूम दिला. व बाकीच्या घोडेस्वारांच्या पलटणी जसजशा नदी ओलांडून येतील, त्या त्या मानानें त्या सैन्यालाही पहिल्या सैन्याच्या मदतीला पाठविण्याची त्यांनीं योजना केली. या वेळीं इंग्लिशांच्या ज्या घोडेस्वारांनीं पहिल्यानें हल्ला केला, त्यांत ड्रगून्सची २९ वी आणि ८ वी अशा दोन पलटणी मुख्य होत्या. त्यांनीं मराठ्यांवर हल्ला करून त्यांची रांग तोडली व दोन तोफा हस्तगत करून घेऊन लासवारीच्या गांवांत प्रवेश केला. परंतु या झटापटीमध्यें पहिल्या ब्रिगेडमधील क. व्हँडेलूर यांना जखम लागून ते मरण पावले. त्यानंतर इंग्लिशांच्या घोडेस्वारांच्या दुसऱ्याहि पलटणीनें जोराचे हल्ले केले. परंतु त्यांचा मराठ्यांच्या लाइनीवर फारसा कांहीं उपयोग झाला नाहीं. शत्रूला आपली लाईन

मोडून पलीकडे जातां येऊं नये, म्हणून मराठ्यांनीं आपल्या सर्व तोफांच्या मधून एकमेकांना साखळदंड बांधून ठेविले होते. शिवाय हा सगळा तोफखाना उंच गवतामध्यें झांकून ठेविलेला असल्यामुळें मराठ्यांच्या तोफा कोठें आहेत, हेंहि इंग्लिशांच्या घोडेस्वारांना कळत नव्हतें. त्यामुळें इंग्लिशांचे घोडेस्वार दौड करीत करीत आपल्या गोळ्यांच्या माऱ्यांत ४०-५० कदमांच्या अंतरावर आल्यानंतर त्यांच्यावर मराठ्यांचे गोलंदाज आपल्या तोफांचा मारा सुरू करीत. त्यामुळें इंग्लिशांच्या घोडेस्वारांच्या पलटणींचें फार नुकसान झालें. तरी पण हा तोफांचा भयंकर मारा सोसूनहि इंग्लिशांचे घोडेस्वार त्यांतून मराठ्यांची लाईन तोडून पलीकडे गेले. पण ते पलीकडे गेल्यावर मराठ्यांचे गोलंदाज आपल्या तोफा फिरवून त्यांच्या पिछाडीवर हल्ला करूं लागले. असा प्रकार तीन चार वेळां झाला. इंग्लिशांचे घोडेस्वार मराठ्यांच्या रांगेंतून तीनचार वेळां पलीकडे गेले आणि तितके वेळां मराठ्यांच्या गोलंदाजांनीं त्यांना माघारें फिरविलें. असा हा प्रकार आणखी वरचेवर चालविला, तर कांहीं वेळानें आपल्या घोडेस्वारांपैकीं कोणीच जाग्यावर शिल्लक राहणार नाहींत, हें लक्षांत आणून ज. लेक यांनीं आपल्या सर्व घोडेस्वारांच्या पलटणींना मराठ्यांच्या तोफांच्या टापूच्या बाहेर मागें निघून येण्याचा हुकूम केला. व मागें राहिलेलें आपलें पायदळ आपल्या मदतीला येईपर्यंत आपण मराठ्यांवर हल्ला करण्यापासून आपल्याला जय मिळण्याची कांहीं एक आशा नाहीं, असा त्यांच्या मनाचा ग्रह कायम झाला.

अशा रीतीनें ता. १ नोव्हेंबर रोजीं सकाळपासून दुपारपर्यंत मराठे आणि इंग्रज यांच्या दरम्यान जी लढाई झाली, त्या लढाईमध्यें मराठ्याच्या तोफखान्याचाच विजय होऊन इंग्लिशांच्या घोडेस्वारांना अखेरीस माघार घ्यावी लागली, हें वरील हकीकतीवरून स्पष्ट होत आहे. त्यानंतर इंग्लिशांचें जें पायदळ मागें राहिलें होतें, तें अखेरीस एकदाचें दोन प्रहरच्या सुमाराला लासवारीच्या पिछाडीकडील नदीच्या पलीकडे येऊन ठेपलें. हें सैन्य भर उन्हांतून सुमारें २५ मैलांची मजल मारून आलेलें असल्यामुळें त्या सैन्याला थोड्या तरी विश्रांतिची फार जरूर होती. त्यामुळें त्या सैन्याला थोडा वेळ विश्रांति घेण्याचा हुकूम देण्यांत आला. हें पायदळ लढाईच्या जागेवर पोहोंचून थोडा वेळ विश्रांति घेत असता, येथें इंग्लिश इतिहासकार असें लिहितात कीं, कांहीं अटीवर आम्ही तुम्हांला शरण येण्याला तयार आहों, असा एक निरोप मराठ्याच्या सैन्यांतून इंग्लिशांच्या सेनापतीकडे आला. पण इंग्रजी इतिहासकारांचें हें लिहिणें मोठें आश्चर्यकारक आणि अगदीं विसंगत दिसतें. मराठ्यांच्या सैन्यांतून असा निरोप काय म्हणून यावा? सकाळच्या लढाईंत मराठ्यांच्या तोफखान्यानें आपल्या शौर्याची शिकस्त करून इंग्लिशांच्या घोडेस्वारांना पिछेहाट करावयाला लाविलें असतां मराठ्यांकडून आम्ही तुम्हांला शरण येतों असा इंग्लिशांकडे निरोप यावा, ही गोष्ट फक्त एका इंग्लिश इतिहासकाराशिवाय दुसऱ्या कोणाला कशी संभवनीय वाटावी? तरी पण अशी असंभवनीय गोष्टही इंग्लिश इतिहासकारांनीं आपल्या इतिहासामध्यें सत्य म्हणून लिहून ठेविली आहे, हें खरें. आमच्या घोडेस्वारांना माघार घ्यावी लागली, हें तेच लिहितात; आणि आम्ही तुम्हांला कांहीं अटीवर शरण येऊन आमच्या तोफा आम्ही तुमच्या हवालीं करितों, असा मराठ्यांकडून इंग्लिशांकडे निरोप

आला, असेंहि तेच लिहितात ! तेव्हां या लिहिण्याला काय म्हणावें ! असो. असा शत्रूकडून शरणागतीचा निरोप आल्यावर मग कोणता सकाळीं नामोहरम झालेला सेनापति पुढें लढाई चालविण्याला उद्युक्त होणार आहे ? आणि त्यांतून इंग्लिश सेनापति तर केव्हांच उद्युक्त होणार नाहींत ! कारण, ते पडले दयाळू ! लॉर्ड लेक यांनीं एकदम मराठ्यांकडील या निरोपाला आपली संमति प्रदर्शित केली. कारण, फिरून लढाई जुंपून त्यामध्यें मराठ्यांच्याकडील हजारों लोकांच्या प्राणांची आहुति पडावी, ही गोष्ट त्यांना केव्हांहि संमत नव्हती ! म्हणून त्यांनीं एकदम रुकार दिला. आणि एक तासपर्यंत लढाई तहकूब ठेवण्यांत आली. मराठ्यांच्या बाजूचे कांहीं कागदपत्र उपलब्ध होण्याची आशा नसल्यामुळें मराठे आम्हांला या वेळीं शरण आले अशी धडधडीत असंभाव्य गोष्ट इंग्लिश इतिहासकारांनीं लिहिली, तरी ती निमूटपणें सहन करणें आज जरूर आहे. कारण, आपल्या बाजूचीं लढायांचीं वर्णनें, त्यांत आपलीं सैन्यें कशीं उभीं होतीं, शत्रूनें कसे हल्ले केले, आपण ते कसे परतविले आणि आपण शत्रूचा कसा पराभव केला, वगैरेबद्दलच्या हकीकती जोंपर्यंत आपल्यापाशीं नाहींत, तोंपर्यंत इंग्लिशांचें म्हणणें इंग्लिशांच्याच लिहिण्यावरून जेथें खोटें पडत असेल तेथें तें खोटें आहे म्हणून अनुमानानें उघडकीस आणून देणें याच्याशिवाय आपल्या हातांत आज या बाबतींत दुसरें कांहीं साधन नाहीं.

ज्या मराठ्यांनीं आपण शरण येत असल्याबद्दल इंग्लिश इतिहासकारांच्या म्हणण्याप्रमाणें इंग्लिशांकडे निरोप पाठविले होते, ते मराठे लासवारी येथील सकाळच्या लढाईनंतर दुपारच्या वेळीं कोणत्या कामांत गुंतले होते ? इंग्लिशांना शरण जाण्याकरितां आपण काय काय तयारी केली पाहिजे, या कामांत ते गुंतले होते ? मुळींच नाहीं ! पण उलट ते इंग्लिशांशीं लढाई देण्याची तयारी करण्याच्या कामांत गुंतलेले होते ! इंग्लिशांनीं सकाळीं जरी आपले जिवंत उरलेले घोडेस्वार आपल्या तोफखान्याच्या माऱ्यांतून बाहेर काढून माघारे नेले, तरी त्यांना त्यांच्या पायदळाची कुमक येऊन पोंहोंचल्यानंतर फिरून ते आपल्यावर कदाचित् चाल करून येतील, असा सरदार अंबाजी इंगळे यांना संशय वाटत होता. व म्हणून तसा प्रसंग आला, तर शत्रूला तोंड देण्याकरितां सकाळची जागा बदलून त्यांनीं आपल्या सैन्याची नवीन ठिकाणीं नवीन रचना करण्याला सुरवात केली. या वेळीं मोहोळपूर हें गांव आपल्यामध्यें घेऊन त्याच्या पुढील बाजूला आपली पहिली रांग (३–४) आणि त्याच्या पिछाडीला आपली दुसरी रांग (५–६), अशा रीतीनें त्यांनीं आपलें सैन्य उभें केलें. या दोन्ही रांगांचें डावें टोंक ( ४ व ६ ) मोहोळपूरच्या बाजूला असून त्यांचें उजवें टोंक ( ३ व ५ ) ओढ्याच्या बाजूला होतें; व पहिल्या ( ३–४ ) रांगेच्या पुढें मराठ्यांनीं आपल्या तोफा डागून ठेविलेल्या होत्या. अशा रीतीनें मराठ्यांचें सैन्य इंग्लिशांशीं तोंड देण्याकरितां लढाईच्या तयारीनें मोहोळपूरच्या पुढें मागें उभें राहिलेलें होतें. अशी ही मराठ्यांची इंग्लिशांना शरण जाण्याची तयारी होती !

परंतु मराठे आपल्याला शरण येणें अशक्य आहे, ही गोष्ट इंग्लिशहि बहुतकरून आपल्या मनांत जाणून असले पाहिजेत. कारण, आपल्या सैन्याला विश्रांति देण्याकरितां म्हणून दुपा-

रचा एक तासपर्यंत जी लढाई थांबविण्यांत आली होती, त्या एक तासाच्या अवधीमध्यें आपण मराठ्यांवर कसा हल्ला करावयाचा याबद्दलची इंग्लिशांकडून ही योजना मुक्रर करण्यांत आली होती. या योजनेप्रमाणें इंग्लिशांच्या पायदळाच्या पलटणीनें ( ७–७ ) लासवारीच्या खेड्यावरून त्या खेड्याला लागून असलेल्या नदीच्या कांठाकांठानें वर जाऊन मोहोळपूरच्या पुढें उभ्या असलेल्या मराठ्यांच्या पहिल्या रांगेच्या उजव्या बाजूवर ( ३ ) हल्ला करावा, असें ठरलें होतें. ही पहिली पार्टी मेजर जनरल वेअर यांच्या हाताखालीं असून त्यांच्या पाठीमागून मेजर जनरल सेंट जॉन यांच्या हाताखालील दुसऱ्या पायदळाच्या पलटणीनें त्यांना मदत करावी, असें ठरलें होतें. व त्याशिवाय २७ वी ड्रगून्सची पलटण ( ८ ) ८ वी ड्रगून्सची पलटण ( ९ ), आणि इतर कांहीं ड्रगून्सच्या पलटणी ( १० ), या व दुसऱ्या कांहीं घोडेस्वारांच्या पलटणी आणि घोड्यावरील तोफखाना ( ११,१२,-१३ ) यांनीं समोरून मराठ्यांच्या फौजेवर हल्ला करण्याचा प्रयत्न करावा व मराठयांचें लक्ष आपल्याकडे गुंतवून घ्यावें, म्हणजे त्या संधींत तिकडे नदीच्या बाजूनें मराठयांच्या उजव्या बगलेवर [ ३ ] हल्ला करण्याकरितां गेलेल्या इंग्लिशांच्या पायदळ पलटणीला [ ७–७ ] आपलें काम फत्ते करण्याला अवसर सांपडेल; आणि तिकडे इंग्लिशांच्या पायदळ पलटणी [ ७-७ ] मराठयांना मागें हटवूं लागल्या, म्हणजे इकडे मराठयांच्या डाव्या बगलेवर [ ४ ] मोहोळपूरच्या बाजूनें या घोडेस्वारांच्या सगळ्या पलटणींनीं हल्ला करून मराठयांचें सैन्य उधळून लावावें, असें त्यांना हुकूम देण्यांत आलेले होते.

याप्रमाणें हल्ला कसा करावयाचा याबद्दलचे सर्व बेत निश्चित झाल्यानंतर व मराठयांकडून कोणी अजून शरण येत नाहींत असें पाहून पूर्ण निराशा झाल्यानंतर इंग्लिशांनीं मराठयांच्या जागेवर चाल करून जाण्याला सुरवात केली. हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या आणि इंडियन लोकांच्या ज्या ज्या लढाया झालेल्या आपण पहातों, त्या त्या बहुतेक लढायांतून आपल्याला असेंच आढळून येतें कीं, पहिल्यानें आपण होऊन शत्रूवर चाल करून जाण्याचा प्रयोग मराठयांनीं क्वचितच अंमलात आणलेला आहे. आपण होऊन शत्रूवर चाल करून जाण्यांत एक प्रकारचा उत्साह असतो. आणि तो उत्साह आपल्या शिपायांच्या नसांनसांमधून नाचूं लागला, म्हणजे त्याच्या योगानेंच आपल्या पक्षाला जय मिळण्याचें निम्में कार्य घडून येतें आणि एकाद्या जागेभोंवतीं खंदक खणून त्या खंदकाच्या आंतमध्यें आपल्याला कोंडून घेऊन बसणें या स्थानदोषाच्या दुर्गुणामुळें शिपायांच्या अंगांतील मर्दुमकी निम्मी कमी होते. स्वसंरक्षण ही बोलून चालून कमकुवतपणाची आणि कमी दर्जाची परिस्थिति होय. त्याच्यापेक्षां आपण होऊन दुसऱ्यावर हल्ला करून जाणें यामध्यें पराक्रमाला किती तरी धडाडी येते. परंतु दुर्दैवानें मागील लढायांतून आपल्या लोकांनीं केवळ स्वसंरक्षणाचीच बाजू उचललेली होती; त्यामुळें आपल्या शिपायांच्या पराक्रमाला तेज चढेना. आणि जेथे तेथें आपल्याला अपयश यावयाचें, हें अगदीं ठरूनच गेल्यासारखें झालें होतें.

दुपारीं सुमारें १ वाजतां लासवारी येथील मुख्य लढाईला सुरवात झाली. पूर्वी ठरल्याप्रमाणें नदीच्या कांठाकांठानें इंग्लिशांच्या पायदळ पलटणी [ ७–७ ] मराठयांच्या

ठिकाणावर चाल करून जाण्याकरितां निघाल्या. त्यांच्या वाटेसभोंवतीं उंच गवत उगवलेलें असल्यामुळें कांहीं वेळपर्यंत या इंग्रजी पलटणी मराठ्यांच्या दृष्टोत्पत्तीस आल्या नाहींत. पण त्या जवळ येऊन मराठ्यांच्या फौजेला हळूहळू दिसूं लागल्या, तेव्हां त्यांच्यावर मराठ्यांच्याकडून तोफांचा भडिमार सुरू करण्यांत आला. व आपल्या रांगेच्या उजव्या बाजूवर इंग्लिशांचा हल्ला करण्याचा विचार आहे असें दिसून आल्याबरोबर मराठ्यांनीं आपल्या फौजेच्या उजव्या बाजूच्या दोन्ही रांगा [ ३ व ५ ] मागें हटवून निराळ्या जागीं [ १४ व १५ ] उभ्या केल्या. मराठ्याच्या तोफांमुळें पुढें चालून येणाऱ्या इंग्लिशांच्या पायदळ पलटणींमध्यें पुष्कळच नुकसान होत होतें. या हल्ला करणाऱ्या पलटणींमध्यें ७६ वी पायदळ पलटण मुख्य होती. व ती सर्वांच्या पुढें होती. त्यामुळें त्या पलटणींतील लोक मराठ्यांच्या तोफांच्या माऱ्यानें पुष्कळच मारले गेले. इंग्लिशांचें पायदळ नदीच्या कांठाकांठानें ज्या वाटेनें येत होतें, ती वाट लहान आणि अडचणीची होती. त्यामुळें एका पाठीमागून एक अशा रीतीनें चालत येणाऱ्या या पलटणींना एकदम मराठ्यांच्या पुढें आपल्या रांगा बनवून त्यांच्यावर हल्ला करणें शक्य होत नव्हतें. त्यामुळें जी ७६ वी पलटण सगळ्यांच्या पुढें आलेली होती, तिलाच मराठ्यांच्या तोफखान्याचा सगळा मारा सहन करावा लागत होता. अशा स्थितींत इंग्लिश सैन्याचे कमांडर-इन्-चीफ, ज. लेक, यांना मोठी पंचाईत येऊन पडली. मागच्या सगळ्या पलटणी येईपर्यंत थांबावें, तर तोंडाशीं एकट्याच सांपडलेल्या ७६ व्या पलटणीचे लोक मरण पावणार; आणि मागच्या पलटणी येईपर्यंत न थांबावें आणि एकट्या ७६ व्या पलटणीकडूनच मराठ्यांवर हल्ला करण्याला सुरवात करावी, तर त्यांनाहि त्या एकाच पलटणींतील लोकांवर सगळा भार पडून ते मारले जाणार; अशी दोहोंकडून अडचण उत्पन्न झालेली होती. व अशा अडचणींत कोणता मार्ग स्वीकारावा, हें थोडा वेळपर्यंत ज. लेक यांना सुचेनासें झालें होतें; परंतु अखेरीस त्यांनीं त्या ७६ व्या पलटणींतील लोकांकडूनच हल्ला करविण्याला सुरवात केली. तेव्हां या लोकांवर मराठ्यांकडून तोफांची भयंकर फैर सुरू झाली. शेकडों लोक मरून पडले. आणि मराठ्यांवर पुढे चाल करून जाणें बहुतेक अशक्य होऊन गेलें. याच सुमाराला मराठ्यांच्या उजव्या बाजूच्या ( १४ ) टोंकापासून जवळच मराठ्याच्या घोडेस्वारांचें एक पथक ( १६ ) उभें होतें. त्या पथकांतील घोडेस्वारांनीं इंग्लिशांच्या या पायदळ पलटणीमध्यें प्रवेश केला; व मराठ्यांचा तोफखाना आणि मराठ्याचे घोडेस्वार या दोघांनीं मिळून या ७६ व्या पलटणीची फारच खराबी केली. तेव्हां या पलटणीच्या मदतीकरितां इंग्लिश घोडेस्वारांच्या २९ व्या ड्रगून्सच्या पलटणीला पुढे चाल करून येण्याविषयीं हुकूम सोडणें भाग पडलें. ही ड्रगून्सची पलटण ७६ व्या पायदळ पलटणीच्या मदतीकरितां म्हणून त्या पलटणीच्या पाठीमागें नदीकांठच्या एका अडचणीच्या जागेंत ( १७ ) उभी करून ठेवण्यांत आली होती. व या ड्रगून्सच्या पलटणीच्या पुढेंच इंग्लिशांनीं आपला तोफखाना ( १८ ) उभा केला होता. त्यामुळें येथील इंग्लिशांच्या तोफांवर मराठ्यांच्या तोफखान्याकडून जे गोळे फेकले जात, त्यापैकीं कांहीं गोळे स्वाभाविकपणेंच या ड्रगून्सच्या पलटणीवर येऊन पडत असत. व अशा एका गोळयानें मेजर ग्रिफिथ्स या नांवाचा एक इंग्रजी ऑफिसर

मरणहि पावला. या घोडेस्वारांच्या पलटणीचें अशा रीतीनें इतकें नुकसान होत होतें, तरी हुकूम नसल्यामुळें त्यांना आपली ही अडचणीची जागा सोडतां येत नव्हती. परंतु आतां ज. लेक यांच्याकडून हुकूम मिळाल्यामुळें या पलटणींतील लोक आपली अडचणीची जागा सोडून ७६ व्या पायदळ पलटणीला मदत करण्याकरितां पुढें गेले. व ७६ व्या पलटणीच्या डाव्या बाजूच्या टोंकापलीकडे जाऊन त्यांनीं आपली रांग मराठ्यांच्या घोडेस्वारांच्या ( १६ ) समोर उभी करण्याला सुरवात केली ( १९ ). मराठ्यांचे घोडेस्वार इंग्लिशांच्या ७६ व्या पायदळ पलटणीवर भयंकर हल्ले करीत होते; व मराठ्यांच्या तोफखान्यापुढें इंग्लिशांचा अगदीं निरुपाय होऊन गेला होता. या प्रसंगीं इंग्लिशांच्या फौजेवर मराठ्यांकडून गोळ्यांचा इतका वर्षाव होत होता कीं, त्यांना पुढें पाऊल टाकणें अगदीं अशक्यच होऊन गेलेलें होतें. याच गर्दीमध्यें आणखी एक भयंकर गोष्ट अशी घडून आली कीं, इंग्लिश सेनापति, ज. लेक, हे खुद्द ज्या घोड्यावर बसले होते, त्या घोड्याला गोळी लागून तो मरण पावला. त्या वेळीं ज. लेक यांचा मुलगा, मेजर जॉर्ज लेक, हा त्यांचे जवळ होता. तो आपला घोडा ज. लेक यांना देण्याच्या तजविजींत असतां त्यालाहि एक गोळी लागून तो खालीं पडला. या वेळीं इंग्लिशांच्या सैन्याची फारच भयंकर आणि निराशाजनक स्थिति झाली होती. परंतु इतक्यांत २९ व्या ड्रगून्सच्या स्वारांची जी पलटण आपल्या नवीन जागेवर ( १९ ) येऊन आपली रांग उभी करीत होती, तिची हल्ल्याची तयारी होऊन तिचें बिगूल वाजूं लागलें. व या घोडेस्वारांनीं मोठ्या जोरानें हल्ला करण्याला सुरवात केली. त्या वेळीं मराठ्यांचे घोडेस्वार मागें हटले. व ते तेथून आपल्या सैन्याच्या पिछाडीकडे ( २० ) वळून जाऊं लागले. मराठ्यांचे घोडेस्वार अशा रीतीनें बाजूला निघून गेल्यानंतरहि मराठ्यांच्या तोफखान्याकडून जरी जोराचा भडिमार एकसारखा चालला होता, तरी त्याला न जुमानतां या २९ व्या पलटणींतील घोडेस्वार मराठ्यांच्या उजव्या बाजूच्या दोन्हीं टोंकांवर ( १४ व १५ ) हल्ला करून पुढें गेले. व त्या दोन्ही रांगा उद्ध्वस्त करून ते पलीकडे गेले. इकडे ही घोडेस्वारांची पलटण अशा रीतीनें आपली कामगिरी बजावीत असतांना दुसरीकडे पाठोमागून आणखी कांहीं पायदळ पलटणी ७६ व्या पायदळ पलटणींच्या मदतीला आल्या. तेव्हां त्यांना घेऊन ज. लेक यांनींही त्याच सुमाराला मराठ्यांच्या रांगेवर हल्ला केला. व त्या रांगेच्या पुढें ज्या तोफा ( २१ ) होत्या, त्या त्यांनीं हस्तगत करून घेतल्या. या कारणामुळें मराठ्यांच्या पायदळाचा जोर कमी पडत चालला. तरी पण मराठ्यांचे जे घोडेस्वार पिछाडीकडे (२०) निघून गेल्याचें पूर्वीं सांगितलें, ते घोडेस्वार फिरून या वेळीं आपल्या पायदळाच्या मदतीला येण्याच्या तयारींत होते. परंतु इतक्यांत २९ व्या ड्रगून्सच्या घोडेस्वारांनीं त्यांच्यावर हल्ला करून त्यांना पुढें येऊं दिलें नाहीं व त्यांना मेवाडच्या डोंगराच्या बाजूला पळवून लाविलें. व तेथून त्या इंग्लिशांच्या घोडेस्वारांनीं मराठ्यांच्या पिछाडीकडे वळून पिछाडीकडून त्यांच्यावर हल्ला केला. हे घोडेस्वार पिछाडीकडून हल्ला करण्याकरितां येत आहेत, इतक्यांत समोरून ७६ व्या पायदळ पलटणीनें जोर करून मराठ्यांच्या पायदळाला मागें हटवीत हटवीत आणिलें. अशा रीतीनें पुढून इंग्लिशांचें पायदळ आणि मागून इंग्लिशांचे घोडेस्वार अशा दोघांच्या दरम्यान मराठ्यांचें

सैन्य सांपडून त्याची अगदीं वाताहत उडून गेली. तरी देखील मराठयांचे शिपाई अखेरपर्यंत शौर्यानें लढत होते. व त्यांनीं आपल्या तोफेच्या एका गोळ्यानें इंग्लिशांकडील एक ऑफिसर मेजर, ज. वेअर याचा बळी घेतला; व त्याचें डोकें आपल्या तोफेच्या गोळ्यानें त्याच्या धडापासून दूर उडवून दिलें. या लढाईंत मराठ्यांचें सैन्य अगदीं अखेरपर्यंत अत्यंत निकरानें लढत होतें. व प्रत्येक पावला पावलाच्या जागेकरितां मराठ्यांचे शिपाई आपल्या जिवावर उदार होऊन लढत होते. त्यांनीं या वेळेस फारच चिकाटी दाखविली. परंतु त्यांच्या हातांतून जेव्हां सगळ्या तोफा नाहींशा झाल्या, तेव्हां त्यांचा निरुपाय झाला. पण मराठ्यांच्या रांगेच्या उजव्या बाजूची जरी अशा रीतीनें वाताहत झाली, तरी त्यांच्या रांगेच्या डाव्या बाजूची स्थिति अजून फारशी अस्ताव्यस्त झालेली नव्हती. त्या बाजूवर समोरून २७ व्या ड्रगून्सची घोडेस्वारांची पलटण व इतरहि कित्येक पलटणी हल्ला करीत होत्या. परंतु त्यांतूनही या डाव्या बाजूकडील मराठ्यांचे शिपाई आपली रांग न मोडूं देतां व्यवस्थेनें मागें हटत होते. परंतु ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. व अखेरीस इंग्लिश घोडेस्वार याही रांगेमध्यें घुसले आणि त्यांनीं पुष्कळ शिपायांना कैद करून मराठयांचें बरेंच सामानसुमान आपल्या ताब्यांत घेतलें.

या लढाईमध्यें मराठयांचे पुष्कळ लोक मारले गेले. दक्षिणेंतून ज्या १७ पलटणी आल्या होत्या, त्या फार नामांकित होत्या. परंतु त्यांच्यापैकीं सुमारें २ हजार लोक कैद करण्यांत आले; आणि बाकीचे बहुतेक लोक लासवारीच्या रणांगणावर मरून पडले. व त्यांच्यावरील मुख्य सरदार, अंबाजी इंगळे, हा एका हत्तीवर बसून रणांगणांतून निघून गेला. ही लढाई सकाळपासून संध्याकाळपर्यंत चाललेली होती. लासवारीची लढाई ही दौलतराव शिंद्याची इंग्लिशांशी शेवटची लढाई होय. फ्रेंच लोकांच्यापासून जें लष्करी शिक्षण मिळविण्यांत आलेले होतें, त्याच्या योगानें शिंद्याच्या लष्करांतील शिपाई फार चांगले तयार झाले होते. व शिस्त, सुव्यवस्था, धडाडी, पराक्रम, इत्यादि बाबतींमध्यें शिंद्याचें सैन्य हें एखाद्या युरोपिअन सैन्याच्या बरोबरीचें म्हणून गणलें जात होतें. तरी पण इंडियन सैन्या-मध्यें आणखी जे कित्येक गुण असावयाला पाहिजे होते, ते स्वदेशभक्तीचे, प्रामाणिकपणाचे आणि करारीपणाचे गुण त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेले नसल्यामुळें त्यांनीं फ्रेंचांपासून मिळ-विलेलें सगळें लष्करी शिक्षण त्यांच्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याला समर्थ झालें नाहीं!

# होळकराशीं युद्ध.

लासवारीच्या लढाईबरोबर इंग्लिशांच्या शिंद्याशीं चाललेल्या लढाया संपल्या. परंतु लासवारीच्या लढाईबरोबर इंग्लिशांना ज्या दुसऱ्या कित्येक लढाया लढावयाच्या होत्या, त्या मात्र संपल्या नाहींत. कारण, हिंदुस्थानांतील सगळे राजे नाहींसे होईपर्यंत आणि त्यांचीं सगळीं राज्यें इंग्लिशांच्या ताब्यांत येईपर्यंत इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील लढाया संपणार कशा ? बिचारे शिंदे आणि भोसले हे आपल्या ताब्यांतील मुलखाच्या आणि रयतेच्या संरक्षणासाठीं असई, अलिगड, दिल्ली, लासवारी, वगैरे ठिकाणीं लढाया लढले. परंतु अंतःस्थ फितुरीपुढें त्यांना जय मिळवितां न आल्यामुळें अखेरीस मुर्जी अंजनगांव आणि देवगांव येथें तह करून त्यांना स्वस्थ बसावें लागलें. पण हे स्वस्थ बसले म्हणून इंग्रजांच्यानें कसें स्वस्थ बसवणार ? शिंदे आणि भोसले यांच्याशीं जेव्हां लढाई सुरू झाली, तेव्हांच त्यांनीं बनविलेल्या ‘ मराठा कॉन्फिडरसीमध्यें ’ यशवंतराव होळकर हा देखील सामील व्हावयाचा; परंतु इंग्लिशांनीं आपल्या कपटनीतीनें यशवंतराव होळकराला त्या मराठे राजांच्या राष्ट्रसंघामधून मुद्दाम फोडून अलग ठेविलें होतें. यशवंतराव होळकर आणि दौलतराव शिंदे या दोघांचें वैमनस्य होतें, व हे दोघे आपसांत एकमेकांपाशीं इ. स. १८०२ सालच्या अखेरीपर्यंत लढत होते. या दोन सरदारांच्या दरम्यान असलेल्या वैमनस्याचा फायदा घेऊन इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराला आपल्या भुलथापांनीं कसें भारून टाकलें, आणि स्वदेशसंरक्षणासाठीं संस्थापित झालेल्या आपल्या मराठ्यांच्या राष्ट्रसंघामध्यें सामील होण्याच्या आपल्या पवित्र कर्तव्यकर्मापासून इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराला भुरळ घालून कसें परावृत्त केलें, याबद्दलची हकीकत पूर्वी असईच्या लढाईच्या प्रकरणामध्यें सविस्तर रीतीनें देण्यांत आलेलीच आहे. इंग्लिशांच्या त्या वेळेच्या त्या भुलथापांना फसून यशवंतराव होळकर शिंदे आणि भोसले यांच्या सैन्यांचा इंग्लिशांकडून होत असलेला नाश पहात तटस्थपणें स्वस्थ बसला. आणि आरगांवच्या आणि लासवारीच्या लढायांमधून आपल्या स्वदेशबांधवांचा पूर्णपणें फन्ना उडवून झाल्यानंतर आपल्या या तटस्थपणानें आपल्या परदेशी इंग्रज मित्रांना आपण जी ही बिनमोल मदत केली, तिच्याबद्दल आतां आपले दोस्त—ते प्रामाणिक इंग्लिश लोक—

आपल्याला योग्य बक्षीस देतील, अशी वाट बघत यशवंतराव होळकर बसला होता. परंतु जो कोणी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं निमकहराम झाला, त्याला परिणामीं कधीं तरी चांगलें फळ प्राप्त होणें शक्य आहे काय ? यशवंतराव होळकरांनीं शिंदे आणि भोसले यांच्या संघामध्यें सामील होऊं नये, म्हणून इंग्लिशांनीं त्याला खोटी लालूच दाखविली होती. पण असली खोटी दाखविलेली लालूच खरी करण्याचा इंग्लिशांचा केव्हांच रिवाज नसतो ! निदान हिंदुस्थानच्या इतिहासांत तरी अशीं उदाहरणें क्वचितच सांपडतील. इंग्लिशांचें काम झाल्याबरोबर ते होळकरावरही उलटले आणि शिंदे व भोसले यांच्या बरोबरची लढाई संपल्यानंतर लगेच त्यांनीं होळकराबरोबर लढाई सुरू केली. होळकरानें आपल्या तटस्थपणानें आपल्याला मदत केली आहे, शिंदे आणि भोसले यांच्या कटामध्यें जर यशवंतराव होळकर सामील झाला असता तर असईचा जय आपल्याला मिळाला नसता, आणि दिल्लीची राजधानी तिच्यांतील शहाआलम बादशहासह आपल्या हातांत आली नसती, तेव्हां होळकराचा हा उपकार आपण स्मरला पाहिजे, आणि त्याचें आपण कांहीं तरी कल्याण करून दिलें पाहिजे, असें वास्तविक इंग्लिशांना वाटावयाला पाहिजे होतें. पण असल्या ह्या कृतज्ञपणाच्या व्यसनाच्या नादीं जर इंग्लिश लोक त्या वेळीं लागले असते, तर त्यांना हिंदुस्थानांतील इतकीं राज्यें गिळंकृत कशीं बरें करितां आलीं असतीं ? दौलतराव शिंदे आणि रघोजीराव भोसले हे इ. स. १८०३ मध्यें आपल्या स्वातंत्र्याच्या आणि स्वराज्याच्या संरक्षणासाठीं मराठ्यांचा जो एक जंगी राष्ट्रसंघ इंग्लिशांच्या विरुद्ध प्रस्थापित करीत होते, त्यांत यशवंतराव होळकरानें सामील होऊं नये, म्हणून त्यापासून त्याला परावृत्त करण्याचें काम कुटिल नीतींतील कुशल असे जे मार्क्विस वेलस्ली त्यानीं आपले बंधु, ज. वेलस्ली, यांच्याकडे सोपविलें होतें. व त्यांनीं इ. स. १८०३ मध्यें यशवंतराव होळकराकडे त्यासाठीं कांहीं पत्रें पाठविलीं असलीं पाहिजेत. त्यांपैकीं ता. १६ जुलै १८०३ च्या एका पत्रामध्यें ज. वेलस्ली यांनीं यशवंतराव होळकराला पुढील मजकूर लिहिलेला आढळतो.

Whatever others may do, I have little doubt but that you will conduct yourself in the manner which your own interests will dictate, and that you will continue in peace with the Company.

I send this letter in charge of Kawder Nawaz Khan, a respectable officer, who enjoys my confidence, and who will explain anything you desire to know respecting my wishes.

या पत्राच्या द्वारानें यशवंतराव होळकराच्या मनांत ज. वेलस्ली हे असें फितुरीचें विष ओतीत होतें कीं, दौलतराव शिंदे, रघोजीराव भोसले व तुमचे दुसरे हजारों वेडगळ स्वदेशबांधव आपल्या स्वदेशाच्या आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणाकरितां मराठा कॉन्फिडरसीसारखे कोणतेही वेडगळ राष्ट्रीय संघ निर्माण करण्यांत गुंतलेले असले, तरी या देशकल्याणाच्या वगैरे वेडगळ कल्पनांकडे न पाहातां तुमचें स्वतःचे पूर्ण कल्याण कशानें होईल इक-

हेंच फक्त लक्ष देऊन इंग्रज लोकांच्या कंपनी सरकारपाशीं होणाऱ्या लढाईमध्यें सामील न होतां तुम्ही आपली दोस्ती कायम टिकवावी. स्वदेशकल्याणापेक्षां स्वतःचें कल्याणच जास्त फलदायक आहे, हें हिंदुस्थानांतील लोकांकरितां इंग्लिशांनीं बनविलेलें नवीन नीतिरसायण येणेंप्रमाणें पत्रामध्यें नमूद करून बाकीच्या ज्या गोष्टी पत्रामध्यें लिहिण्यासारख्या नव्हत्या, अशा गोष्टी तोंडीं सांगण्याकरितां कादर नवाजखान या एका ऑफिसरला ज. वेलस्ली यांनीं यशवंतराव होळकराकडे पाठविलें होतें.

या तोंडीं सांगावयाच्या निरोपामध्यें काय काय गोष्टी यशवंतराव होळकराला सांगण्यांत आल्या, हें जरी प्रत्यक्ष लेखी पुराव्यानें बाहेर येणें शक्य नाहीं, तरी अशा प्रकारच्या पत्रांमुळें आणि निरोपामुळें यशवंतराव होळकर आपले देशबांधव आपल्या देशासाठीं असईच्या, आरगांवच्या, अलीगडच्या, दिल्लीच्या आणि लासवारीच्या लढायांमधून मरण पावत असतां एकही शस्त्र उचलल्यावांचून स्वस्थ बसला, यावरून काय अनुमान निघतें ? यावरून हेंच अनुमान निघतें कीं, इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराला कांहीं तरी लालूच दाखवून त्या वेळीं गप्प बसविलें होतें. आणि याच अनुमानाला जास्त बळकटी येते ती अशी कीं, शिंदे आणि भोसले यांच्याशीं चालू असलेल्या इंग्लिशाच्या लढाया १८०३ च्या अखेरीस संपल्यानंतर इ. स. १८०४ च्या प्रारंभीं यशवंतराव होळकर यानें पुढें दिलेल्या आपल्या मागण्या आपल्या वकिलांच्या मार्फत इंग्लिशांच्यापुढें सादर केल्या. त्या मागण्या येणेंप्रमाणें:—

( १ ) आपल्या वाडवडिलांपासून चौथ गोळा करण्याचा आपला जो हक्क आहे, तो आपला आपल्याकडे कायम करण्यांत यावा.

( २ ) गंगा आणि यमुना यांच्या दुआबामधील बारा परगण्यांचा मुलूख, इटावा वगैरे इतर ठाणीं आणि बुंदेलखंडांतील कांहीं भाग, इतका प्रांत आपल्याला मिळावा.

( ३ ) हरियानाचा प्रांत जो आपल्या पूर्वजांकडे पूर्वीपासून चालत आलेला आहे, तो आपल्याला मिळावा.

( ४ ) त्याचप्रमाणें हल्लीं जितका मुलूख आपल्या अमलाखालीं आहे, तितक्या सगळ्या मुलखावरील आपली हुकमत मान्य करण्यांत यावी.

अशा ह्या चार गोष्टींची मागणी ता. १८ मार्च १८०४ रोजीं होळकराकडून इंग्लिशांकडे करण्यांत आली. यावरून काय बरें दिसून येतें ? दुआबमधील बारा परगणे, बुंदेलखंडांतील एक जिल्हा, हरियाना प्रांत, चौथ गोळा करण्याचा होळकराचा हक्क, वगैरे बाबतींत यशवंतराव होळकर आणि इंग्लिश यांच्या दरम्यान पूर्वीं इ.स.१८०३ मध्यें कधीं कांहीं लढा चाललेला होता काय ? इ.स. १८०३ सालच्या किंवा त्याच्या पूर्वीच्या इतिहासामध्यें असा लढा तर कोठें आढळून येत नाहीं. मग शिंदे आणि भोसले यांच्या लढाया संपल्याबरोबर यशवंतराव होळकर एकदम अशा प्रकारची विशिष्ट मागणी करतो, याचा अर्थ काय ? आणि तो जरी अरेरावीनें, गैरहक्कानें आणि निराधार रीतीनें कांहीं तरी मागतो असें मानावयाचें झालें, तरी तो दुसऱ्या कोठील प्रांत न मागतां दुआबमधील आणि बुंदेलखंडांतीलच प्रांत इंग्लिशांपाशीं मागतो, याचा अर्थ काय ? याचा अर्थ उघडउघडपणें असा होतो कीं, यशवंतराव होळकराच्या फितुरीबद्दलचें बक्षीस म्हणून इंग्लिशांनीं त्याच्याशीं कबूल केलेल्या या अटी असल्या पाहि-

जेत. होळकरानें वरील चार अटींमध्यें जी मागणी केली आहे, तिच्यामध्यें दोन विभाग सहजासहजीं दिसण्यासारखे आहेत. एका मागणीनें तो आपल्या वाडिलार्जित मुलखावरील आपला हक्क प्रस्थापित करून घेत आहे; आणि दुसऱ्या मागणीनें तो दुआब आणि बुंदेलखंड यांच्यामधील कांहीं नवीन प्रांत मागत आहे. आतां येथें हें लक्षांत आणिलें पाहिजे कीं, दुआब आणि बुंदेलखंड हे दोन प्रांत पूर्वी शिंद्याच्या ताब्यांत होते. आणि इंग्लिशांनीं आपल्या फितुरीनें आणि लढाईनें ते दोन्ही प्रांत आपल्या ताब्यांत आणून घेतले होते. तेव्हां नेमक्या त्याच दोन प्रांतांपैकीं कांहीं भाग यशवंतराव होळकर मागत आहे, यावरून शिंद्यापासून दुआब आणि बुंदेलखंड हे प्रांत आम्हीं जिंकून घेतले, म्हणजे त्यांतील कांहीं भाग आम्ही तुम्हांला देऊं, असें इंग्लिशांनीं होळकरापाशीं पूर्वी कबूल केलेलें असलें पाहिजे, असें उघड रीतीनें निष्पन्न होतें व अशी कांहीं तरी लालूच दाखवून ठेवावयाची, ही इंग्लिशांची त्या वेळची नेहमींचीच पद्धत दिसते. टिपूवर स्वारी करावयाची होती, तेव्हां परस्पर त्याच्या मुलखांतील कांहीं भाग आम्ही तुम्हांला देऊं, अशी लालूच पेशवे आणि निजाम यांना इंग्लिशांनीं दाखविली होती, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तशीच कांहीं तरी लालूच दाखवून इंग्लिशांनीं या वेळीं होळकराला फितूर करून ठेवलेलें असलें पाहिजे. प्लासीच्या लढाईंत आम्हांला जय मिळाला म्हणजे आम्ही तुला अमुक अमुक बक्षीस देऊं, असें क्लाइव्ह साहेबांनीं कलकत्त्याच्या उमीचंदालाहि अभिवचन दिलेलें नव्हतें काय ? पण प्रस्तुतच्या बाबतींत इंग्लिशांनीं होळकराला त्याच्या फितुरीच्या बक्षिसादाखल काय काय अभिवचनें दिलीं होतीं, याबद्दलचा कागदोपत्रीं पुरावा हल्लीं उपलब्ध नाहीं. परंतु यशवंतराव होळकरापाशीं या बक्षिसाबद्दलचीं त्या वेळीं कांहीं तरी पत्रें असावींत, असें दिसतें. त्या पत्रांच्या नकला यशवंतराव होळकरानें लॉर्ड लेक यांच्याकडे पाठविल्यावरून त्यासंबंधानें लॉर्ड लेक यांनीं मार्क्विस वेलस्ली यांच्याकडे ता. १९, २८ व २९ डिसेंबर १८०३ या तीन दिवशीं तीन पत्रें पाठविलीं असलीं पाहिजेत. परंतु हीं पत्रें फार मोठीं आहेत अशा सबबीवर तीं मार्क्विस वेलस्लीच्या डिस्पॅचेसमध्यें छापिलेलीं नाहींत. तरी पण त्या तीन पत्रांच्या संबंधानें आपल्या ता. १७ जानेवारी १८०४च्या उलट जबाबामध्यें मार्क्विस वेलस्ली पुढीलप्रमाणे उल्लेख करितात.

The letters, of which Jeswunt Rao Holkar has transmitted copies to your Excellency, must have been forwarded to Holkar by Major-General Wellesley in his own name. I have not addressed any letter to Jeswunt Rao Holker, but Major General Wellesley was authorized by my instructions of the 26th June 1803 to open an amicable negotiation with that chieftain.

या इंग्रजी उताऱ्यावरून असें दिसतें कीं, मार्क्विस वेलस्ली यांनीं आपला स्वतःचा हात गुंतवून न घेण्यासाठीं परस्पर ज. वेलस्ली यांच्याकडून यशवंतराव होळकराला पत्रें लिहविलीं असलीं पाहिजेत. व त्या पत्रांतून ज. वेलस्ली यांनीं यशवंतराव होळकर याच्याशीं

सलोख्याचीं बोलणीं लावून कांहीं तरी अभिवचनें दिलेलीं असलीं पाहिजेत. आणि त्या अभिवचनांप्रमाणें यशवंतराव होळकरानें वर दिलेल्या चार गोष्टींची मागणी केली असली पाहिजे.

पण शिंदे आणि भोंसले यांच्या कटामध्यें यशवंतरावानें सामील होऊं नये, म्हणून त्याला इंग्लिशांनीं कांहींही अभिवचनें दिलेलीं असलीं, तरी शिंदे आणि भोंसले यांचा पराजय झाल्यानंतर मग तीं पूर्वींचीं अभिवचनें पाळण्याचें इंग्लिशांना कांहीं एक कारण उरलेलें नव्हतें. त्यामुळें अर्थातच त्यांनीं पगडी फिरविली. इंदूरच्या गादीसंबंधानें यशवंतराव होळकराची अशी स्थिति होती कीं, तो दासीपुत्र असल्यामुळें गादीचा खरा वारस नसून तुकोजीराव होळकराचा औरस पुत्र काशीराव होळकर हा गादीचा खरा मालक होता. ही गोष्ट इंग्लिशांना आतां आठवली ! आणि आपल्या पिढीजात मालकीच्या मुलखावरील हक्कांची मागणी वरील अटींच्या द्वारानें यशवंतराव होळकर जेव्हां करूं लागला, तेव्हां इंग्लिश मुत्सद्दी त्याला असें म्हणूं लागले कीं, पिढीजाद वारसाचा हक्क तुमचा नसून काशीराव होळकराचा आहे. तेव्हां न्यायाच्या दृष्टीनें तुमची त्या प्रांतावरील मालकी आम्हांला कशी कबूल करतां येईल ? जे मार्क्विस वेलस्ली एक वर्षाच्या पूर्वीं ज. वेलस्लीकडून सलोख्याचीं आणि लालूच दाखविण्याचीं पत्रें लिहवून यशवंतराव होळकराची मनधरणी करण्याचा आणि त्याला फितूर करण्याचा प्रयत्न करीत होते, तेच मार्क्विस वेलस्ली त्याच यशवंतराव होळकराच्या संबंधानें शिंद्याच्या मराठा कॉन्फिडरसीचा बीमोड झाल्याबरोबर पुढीलप्रमाणें लिहिण्याला उद्युक्त झाले ! ते लॉर्ड लेक यांना असें लिहितात कीं:—

The authority, exercised by Jeswunt Rao Holkar over the possessions of Holkar family, is manifestly an usurpation of the rights of Kashi Rao Holkar, the legitimate heir and successor of Tuckojee Holkar. Consistently, therefore, with the principles of justice, no arrangement can be proposed between the British Government and Jeswunt Rao Holkar, involving a sanction of the exclusion of Kashi Rao Holkar from his hereditary dominions.

या उताऱ्यावरून न्यायाच्या नांवाखालीं इंग्लिशांनीं जो खोडसाळपणा सुरू केला, तो कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहे. काशीराव हा तुकोजीराव होळकराचा औरसपुत्र असला आणि त्यामुळें त्याचा जरी पिढीजाद मुलखावर न्यायानें हक्क असला, तरी तुम्ही इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराला जीं अभिवचनें दिलेलीं होतीं, तीं परिपूर्ण करणें हीही गोष्ट तितकीच न्यायाची आणि जरूरीची नव्हती काय ? व एका न्यायाची काळजी करण्याच्या नांवाखालीं दुसरा अन्याय करणें हें केव्हां तरी वाजवी होईल काय ? जेव्हां यशवंतराव होळकराला फितूर करण्यासाठीं वाटतील तीं अभिवचनें गुप्त रीतीनें इंग्लिशांकडून देण्यांत आलीं, तेव्हां काशीराव होळकर हा इंदूरच्या गादीचा खरा वारस आहे, हें इंग्लिशांना माहीत नव्हतें काय ? बरें, ज्या काशीरावाबद्दल इंग्लिशांना या वेळीं अकस्मात् इतकी कळकळ वाटूं लागली, त्या काशीरावाला तरी त्यांनीं पुढें गादी-

वर बसवून त्याचे मुलूख त्याला परत दिले काय? तसें कांहींच नाहीं! काशीरावाची सबब ही केवळ यशवंतरावाच्या तोंडाला पानें पुसण्यापुरतीच होती. इंग्लिशांच्या पोटांतील या वेळचा खरा उद्देश हा कीं, यशवंतराव होळकराला कांहीं एक न देतां त्याचा पाडाव करून टाकावयाचा; कारण, मार्किस वेलस्ली हे आपल्या एका पत्रामध्यें स्पष्टपणें असें लिहितात कीं:—

The enterprising spirit, military character and ambitious views of Jeswunt Rao Holkar render the reduction of his power a desirable object with reference to the complete establishment of tranquility in India.

यशवंतराव होळकर हा मोठा धाडसी, रणशूर आणि महत्त्वाकांक्षी असल्यामुळें त्याचें सामर्थ्य नष्ट करून टाकणें हें आपल्याला अत्यंत आवश्य आहे, हा इंग्लिशांच्या पोटांतील हेतु या पत्रांतील उल्लेखावरून स्पष्ट होत आहे. आणि म्हणून तदनुसार इंग्लिशांनीं शिंद्याची लढाई संपल्यानंतर होळकराशीं लढाई सुरू करण्याचा निश्चय केला.

इंग्लिशांनीं एकाद्याशीं लढाई सुरू करण्याचा निश्चय केला कीं, लगेच त्याचीं गुप्त पत्रें यांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागतात! त्याप्रमाणें यशवंतराव होळकराचींही कांहीं पत्रें इंग्लिशांच्या हातीं लागलीं. व त्यावरून यशवंतराव होळकर हा हिंदुस्थानांतील बाकीच्या कांहीं राजांना आपल्या विरुद्ध उठवीत आहे, असें लॉर्ड लेक यांना आढळून आलें. हा पत्रव्यवहार खराच असेल किंवा बनावट असेल, याच्याबद्दल कित्येकांनीं जबरदस्त शंका व्यक्त केलेली आहे. व ज. लेक यांच्या आयर्लंडमधील पूर्वीच्या वर्तणुकीवरून पाहिलें असतां हा पत्रव्यवहार बनावटच असला पाहिजे. हा संशय दृढ होण्याला पुष्कळ जागा आहे. परंतु तो खरा असेल, तर त्यावरून असें दिसतें कीं, मीरसिंग, रावसिंग, गुरुपालसिंग, बंदगासिंग, वगैरे शीख सरदार आणि गुलाम महंमद वगैरे कांहीं रोहिले सरदार, यांच्या आणि यशवंतराव होळकराच्या दरम्यान असें ठरलें होतें कीं, होळकराकडील सरदार पंडितराव याच्या हाताखालील दहा हजार घोडेस्वार आणि वरील शीख व रोहिले सरदार यांच्या हाताखालील सहा हजार घोडेस्वार यांनीं मिळून हरिद्वारापासून तों थेट प्रयागपर्यंत गंगा आणि यमुना यांच्यामधील दुआबाच्या प्रांतांतून इंग्लिशांना घालवून लावून तो सगळा मुलूख काबीज करून घ्यावयाचा. या शीख आणि रोहिले लोकांच्या पत्रव्यवहाराशिवाय बेगम समरू हिच्या नांवाचाहि एक पत्रव्यवहार आपल्या हातीं लागला असल्याचें इंग्लिशांनीं जाहीर केले होतें. या पत्रव्यवहारामध्यें बेगम समरू हिनें यशवंतराव होळकरासंबंधानें आपला स्नेहभाव व्यक्त केला होता, व त्याला यश मिळावें अशी इच्छा तिनें प्रकट केली होती. त्याचप्रमाणें तुम्हीं इंग्लिशांच्या विरुद्ध जे प्रयत्न चालविले आहेत, त्या बाबतींत तुम्हीं फार दक्षतेनें वागावें, असा बेगम समरू हिनें यशवंतराव होळकराला इशारा दिलेला असून या कामांत मी स्वतः तुम्हांला मदत करीन व माझ्या राज्यामध्यें जे शीख आणि जाट लोक आहेत, त्यांचीही तुम्हांला मदत होईल, असें तिनें विश्वासपूर्वक आश्वासन दिलें होतें.

अशा रीतीनें एक शीख आणि रोहिल्यांचा आणि दुसरा बेगम समरूचा, असे दोन पत्रव्यवहार इंग्लिशांनीं यशवंतराव होळकराच्याविरुद्ध पुरावे म्हणून पुढें आणिले होते. हे

पत्रव्यवहार बनावट तयार केलेले असले पाहिजेत, असा कित्येक लेखकांच्या मनांत उत्पन्न झालेला संशय पूर्वी नमूद करण्यांत आलेलाच आहे. आणि हा संशय या दोन पत्रव्यवहारांपैकीं निदान दुसऱ्या पत्रव्यवहाराच्या बाबतींत तरी खरा असल्याचें उघडकीस आलेलें आहे. कारण आपण यशवंतराव होळकराला सामील झाल्याबद्दलचा कांहीं तरी पत्रव्यवहार लॉर्ड लेक यांनी पुढे आणिलेला आहे, असें जेव्हां बेगम समरू हिला कळलें, तेव्हां तिनें ताबडतोब हा सगळा पत्रव्यवहार बनावट असल्याबद्दलची तक्रार केली. व हा बनावट पत्रव्यवहार कोणी तयार केला आहे, हें तुम्ही शोधून काढावें, अशी तिनें दिल्लीचे रेसिडेंट, कर्नल ऑक्टरलोनी, यांना विनंति केली. बेगम समरू ही मूळची शिंद्याच्या अंमलाखालील एक मांडलिक असून नुकतीच तिला इंग्लिशांनीं आपल्या बाजूला फितूर करून घेतली होती. व त्यामुळें तिचीं जीं पलटणें दक्षिणेंत शिंद्याच्या मदतीला गेलीं होतीं, तीं असईच्या लढाईमधून शिंद्याचा पक्ष सोडून निघून गेलीं होतीं. ही असईच्या लढाईतील हकीकत वाचकांना स्मरतच असेल. अशी जिची पूर्वपीठिका आहे, ती बेगम समरू इंग्लिशांच्याविरुद्ध खटपटी सुरू करून यशवंतराव होळकराशीं पत्रव्यवहार करील, हें मुळींच संभवनीय नाहीं. व हा पत्रव्यवहार कोणीं तरी बनावट तयार केलेला असला पाहिजे, अशी ती खुद्द इंग्लिशांकडेच उघडपणें तक्रार करिते. यावरून हे दोन्हीहि पत्रव्यवहार बनावट तयार करून यशवंतराव होळकराच्या विरुद्ध कांहीं तरी पुरावा पुढे आणावा या उद्देशानें ही कृति इंग्लिशांकडीलच कोणी तरी बुद्धिमान मनुष्यानें काढलेली असली पाहिजे,हें उघडपणें सिद्ध होतें.

पण जरी हे विवक्षित पत्रव्यवहार इंग्लिशांकडील कोणी तरी कुशल कारागिरानें बनावट बनविलेले असले, तरी इंग्लिशांनीं आपल्याला दिलेल्या अभिवचनाप्रमाणें आपण त्यांच्यापाशीं मागितलेल्या वरील चार कलमी मागण्या इंग्लिश लोक देत नाहींत, आणि उलट तीं अभिवचनें टाळण्याकरितां ते आपल्याशीं लढाई केल्याशिवाय रहात नाहींत, असें जेव्हां यशवंतराव होळकराला स्पष्टपणे दिसून आलें, तेव्हां त्यानें आपल्या मदतीला येण्यासाठीं दुसऱ्या कोणा राजांना पत्रें पाठविलीं नाहींत, असें मात्र मुळींच नाहीं. आणि त्यानें अशीं पत्रें कां पाठवूं नयेत ? इंग्लिशांनीं हिंदुस्थानांतील राजांचीं राज्यें एका पाठीमागून एक आपल्या घशाखालीं उतरवावीं आणि हिंदुस्थानांतील राजांनीं मात्र हे दुःखाचे देखावे पहात हात जोडून स्वस्थ बसावें, अशी इंग्लिशांनीं तरी त्यांच्याबद्दल काय म्हणून अपेक्षा करावी ? या राजांच्या जवळ हृदय म्हणून कांहीं पदार्थच नाहीं कीं काय ? प्रसंग येऊन ठेपला, तेव्हां यशवंतराव होळकरानें आपल्या मदतीला येण्यासाठीं हिंदुस्थानांतील अनेक राजांना जरूर पत्रें लिहिलीं. अशा प्रसंगीं हिंदुस्थानांतील राजांनीं एकमेकांना लिहिलेलीं सगळीं पत्रे जर उपलब्ध असतीं, तर स्वदेशभक्तीचें आणि स्वातंत्र्यप्रेमाचें तें एक अर्वाचीन महाभारतच झालें असतें. त्यांपैकीं परशुरामपंत प्रतिनिधि यांना होळकरानें लिहिलेलें एकच पत्र पुढें देण्यांत येत आहे. त्यावरून असल्या पत्रांतील विचारांचा जाज्वल्यपणा कोणाच्याहि लक्षांत येईल. यशवंतराव होळकर परशुरामभाऊंना लिहितात कीं:—

“ आजपर्यंत हिंदु राज्य सर्वत्रांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे

दौलतींत गृहकलह होऊन राज्यास विपर्यास पडून हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ झालें. याचें छेदन करण्यास सर्वत्र एकदिल झालें पाहिजे. तरच मूळाचें छेदन होऊन स्वधर्माचार पूर्ववत्प्रमाणें चालून हिंदूंची कायमी राहील. इकडील क्रम जो आरंभिला आहे, हाच यावद्देह चालवावा, असें मनांत आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन जें घडवील तें खरें. परंतु एकानेंच असा प्रकार करून सर्वत्रांनीं तमासे पाहून आपापली दौलत संभाळून असावें, यांतील परिणाम कसा, हें मनीं विचारून ज्यांत हिंदुधर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुम्हांसारख्यांनीं न केला, तरी दुसरे कोण करतील ? ''

पण यशवंतराव होळकर याना हे विचार फार उशिरानें सुचले; या विचारांची योग्य वेळ आधींच निघून गेलेली होती. नदींतील पाणी निघून गेल्यानंतर मग पूल बांधून त्याचा काय उपयोग ? आणि रोग्याचा प्राण निघून गेल्यानंतर कोणतींहि औषधें केलीं, तरी त्यांनीं काय व्हावयाचें आहे ? यशवंतराव होळकर परशुरामभाऊंना लिहितात कीं, एकानें लढाई सुरू करावी आणि बाकीच्यांनीं तमाशा पहात बसावें, हें बरें नाहीं. पण खुद्द यशवंतराव होळकरानें काय केलें ? शिंदे आणि भोसले इंग्लिशांच्या विरुद्ध आपल्या मराठ्यांचा संघ तयार करून त्याच्याशीं लढत होते. त्या वेळीं यशवंतराव होळकर त्यांचा तमाशाच पहात बसला नव्हता, तर दुसरें काय करीत होता ? या वेळीं जर यशवंतराव होळकर असईच्या आणि लासवारीच्या लढाईचा तमाशा पहात तटस्थ बसला नसता, तर या वेळीं त्याच्यावर परशुरामभाऊंच्या पुढें असें तोंड वेंगाडण्याची पाळी खात्रीनें आली नसती ! आणि ज्यांच्यापाशीं यशवंतराव होळकर तोंड वेंगाडूं लागला, त्या दक्षिणेंतील सरदाराची तरी स्थिति काय होती ? सगळे सारखेच. उदाहरणार्थ,बाजीरावाला पुण्याच्या गादीवर बसविण्याच्या मिषानें ज. वेलस्ली १८०३ च्या सुरवातीला जेव्हां आपल्याबरोबर मोठें सैन्य घेऊन पुण्यामध्यें शिरला, तेव्हां दक्षिणेमध्यें परशुरामभाऊ पटवर्धन इंग्लिशांकडे वळून तटस्थ राहिले; आणि १८०३ च्या उत्तर भागांत ज. वेलस्ली आणि लॉर्ड लेक हे जेव्हां शिंद्यांच्या कवायती लष्कराचा निःपात करीत होते, तेव्हां यशवंतराव होळकर हे इंग्लिशांच्या फितुरीच्या बोलण्यांनीं फसून उत्तर हिंदुस्थानांत तमाशा पहात स्वस्थ बसले! अशानें आपल्या देशाचीं स्वातंत्र्यें आणि स्वराज्यें टिकत असतात काय ? परंतु आपल्या आर्य लोकांना हें पिढीजातच वळण लागून राहिलें आहे. फार काय, आपल्या वाङ्मयांतील अत्यंत श्रेष्ठ असा जो महाभारताचा ग्रंथ त्याच्याकडे आपण पाहिलें, तर त्यातहि आपल्याला हेच दुःखदायक धडे दिसून येतात. आधीं भावाभावांमधील लढाई ही तर महाभारतांतील मुख्य गोष्ट अतिशय वाईट आहेच. पण त्यांतहि आणखी खेददायक गोष्ट अशी कीं, भीष्म दहा दिवस लढाई करीत जिवंत होता, तोंपर्यंत मी हातांत शस्त्र धरणार नाहीं, अशी कर्णानें प्रतिज्ञा केली होती. आणि कर्णप्रभृति बहुतेक कौरव मरून गेल्यानंतर मग अश्वत्थाम्याला त्यांचा सूड घेण्याची स्फूर्ति उत्पन्न झाली ! असल्या मार्गांनीं शत्रूवर जय कसा मिळणार ? इ. स. १८०३ सालामध्यें आपल्या आर्यावर्तांतील सगळे भीष्म, कर्ण आणि अश्वत्थामे एकत्र झाले असते, आणि एकाच वेळीं आपल्या देशाच्या शत्रूविरुद्ध लढण्याला सज्ज झाले असते, तर त्यांच्या अविभक्त पराक्रमानें काय काय चमत्कार घडून

आणले नसते ! परंतु तें सर्व जाऊन त्यांच्या पराभवांचे इतिहास लिहिण्याचें आणि त्यांच्यावर अश्रु ढाळण्याचें दुःसह कार्य आज त्यांच्या वंशजांवर येऊन पडलें आहे !

असो. यशवंतराव होळकराच्या हातून या वेळीं अशा प्रकारची ही चूक झाली खरी. परंतु आपल्या हातून ही चूक झाली आहे, असें त्याच्या लक्षांत आल्याबरोबर त्याचे डोळे उघडले, व इंग्लिशांच्या लढाईला तोंड देणें हे जर अपरिहार्यच आहे, तर आतां त्या लढाई-मध्यें आपल्याला यश कसें मिळेल, या गोष्टीच्या विचाराकडे त्याचें लक्ष लागलें. त्या कामीं इतर राजांकडून मदत मिळण्याकरितां त्यानें कसे प्रयत्न सुरू केले, हें वर सांगितलेंच आहे; पण त्याशिवाय त्यानें आणखीहि एका दृष्टीनें विचार केला. दौलतराव शिंदे यांच्या सैन्याच्या असई, आरगांव, अलिगड, दिल्ली, लासवारी, वगैरे लढायांतून नुकत्याच झालेल्या पराभवांचीं चित्रें यशवंतराव होळकराच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष दिसत होतीं. आणि दौलत-राव शिंद्याचे कवायती कंपू फ्रेंच अंमलदारांच्या हाताखालीं कवाईत शिकून उत्तम तयार झालेले असतांनाहि त्यांचा पराभव कां झाला, याचीं कारणें जेव्हां यशवंतराव होळकर आपल्या मनाशीं शोधूं लागला, तेव्हां युरोपियन अंमलदारांनीं आयत्या वेळीं दौलतराव शिंद्याशीं केलेला विश्वासघात हें ह्या सगळ्या पराभवाचें कारण आहे, ही गोष्ट यशवंतराव होळकराच्या ध्यानांत येऊन चुकली. आणि आपण इंग्लिशांशीं लढाई सुरू केली, तर आपल्या लष्करामध्येंहि जे युरोपियन अंमलदार आपल्या नोकरीला येऊन राहिलेले आहेत, तेहि ऐन प्रसंगीं आपल्याला असाच दगा देतील, असा संशय त्याच्या मनामध्यें उत्पन्न झाला; व हा संशय अस्थानीं होता असेंहि नाहीं. मार्क्विस वेलस्ली आणि लॉर्ड लेक हे दोघेहि मुत्सद्दी आपल्या शत्रूच्या पक्षामध्यें फितुरी उत्पन्न करण्याच्या कामांत फार वाकबगार होते; व त्यांनीं त्याप्रमाणें होळकराच्या सैन्यांतील युरोपियन अंमलदारांना फोडण्याचे प्रयत्न चालूहि केलेले होते. या वेळीं होळकराच्या नोकरीमध्यें व्हिकर्स, टॉड आणि रायन, असे तीन ब्रिटिश अंमलदार होते. व गव्हर्नर जनरल, मार्क्विस वेलस्ली, यानीं जाहीर रीतीनें प्रसिद्ध केलेल्या एका जाहीरनाम्याप्रमाणें हे ऐन वेळीं आपली नोकरी सोडून इंग्लिशांकडे जाण्याच्या विचारांत होते. व त्यांपैकीं कॅप्टन टॉड याचा ज. लेक यांच्याशीं कांहीं गुप्त पत्रव्यवहारहि सुरू झालेला होता. हे लष्करी अंमलदार आयत्या वेळीं होळकराला सोडून इंग्लिशांकडे गेले असते, तर दौलतराव शिंद्यावर जो प्रसंग आला, तोच प्रसंग यशवंतराव होळकरावरहि आल्यावांचून राहिला नसता. म्हणून त्यांच्याबद्दल संशय आल्याबरोबर यशवंतराव होळ-करानें त्यांना कैद केलें. आणि नंतर त्यांचा शिरच्छेद करून फितुरी लोकांना फितुरीच्या पातकाबद्दल काय शासन योग्य आहे हें सर्व लोकांना समजण्याकरितां त्यांचीं डोकीं भाल्याच्या टोकावर खोंचून ठेवण्यांत आलीं. आणि कॅप्टन टॉड यानें लिहिलेलें जें फितु-रीचें पत्र पकडण्यांत आलें होतें, तें त्याच्या डोक्याच्या खालीं लावून ठेवण्यांत आलें होतें. या कृत्याबद्दल इंग्लिश इतिहासकारांनीं होळकराला नांवें ठेविलीं, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे, असें नाहीं. पण या कडक शासनानें होळकराच्या छावणींत जे कोणी भावी फितुरी होते, त्यांना चांगलीच दहशत बसली. व त्यामुळें यशवंतराव होळकराला दौलतराव शिंद्यासारखें अपयश न येतां कर्नल मॉन्सनबरोबरच्या लढाईंत यश आलें. आणि यशवंत-

राव होळकराला हें यश आलेलें पाहून आपणाहि जर वेळींच अशी सावधगिरी घेतली असती, तर आपल्यालाहि असई वगैरे ठिकाणच्या लढायांतून अपयश आलें नसतें, असें दौलतराव शिंद्याला वाटलें असेल! पण मागाहून सुचलेल्या शहाणपणाचा कांहीं एक उपयोग नसतो!

होळकरानें लॉर्ड लेककडे जे वकील पाठविले होते, त्यांनीं जयपूरच्या वाटेवरील रामगड या ठिकाणीं ता. १८ मार्च १८०४ रोजीं लॉर्ड लेक यांची गांठ घेतली. व त्यांच्यापुढें आपल्या धन्याची पूर्वीं सांगितलेली चार कलमी मागणी सादर केली. व त्याच्याचबरोबर होळकराचा तोंडी निरोप म्हणून त्यांनीं लॉर्ड लेक यांना असें बजाविलें कीं, "तुम्हीं होळकराशीं सल्ला करणें हेंच श्रेयस्कर आहे. कारण, होळकरानें रोहिले लोकांपाशीं व या प्रांतांतील इतर राजे लोकांपाशीं करारमदार केले असून फक्त एका जयपूरच्या राजाशिवाय बाकीचे सर्व राजे त्याच्या बाजूनें लढण्याला तयार झाले आहेत. त्याचप्रमाणें खुद्द शिंदेहि आमच्या बाजूनें लढण्याला तयार होईल, असा संभव आहे. तसेंच होळकराच्या हाताखालीं ४० हजार रोहिले तयार असून होळकराचे दीड लाख घोडेस्वार आज वाटेल त्या ठिकाणीं हल्ला करून जाण्याला सिद्ध आहेत. शिवाय यशवंतराव होळकर याला कशाचीही पर्वा नाहीं. आपला देश आणि आपली दौलत या सगळ्याबद्दलची भिस्त त्यानें आपल्या घोड्याच्या एका खोगिरावर ठेविली आहे. तो आपल्या घोडयाचा लगाम ज्या दिशेकडे खेचील, तिकडे त्याच्या सगळ्या दीड लाख घोडेस्वारांची धाड जाऊन पडेल, आणि त्या योगानें तो सर्व मुलूख पादाक्रांत करून टाकील." होळकराच्या वकिलांनीं अशा अर्थाचा हा जो निरोप लॉर्ड लेक यांना कळविला, त्यांत यशवंतराव होळकराचा बाणेदारपणा स्पष्ट दिसून येत आहे. व या निरोपामध्ये त्याच्या वकिलांनीं जीं विधानें केलीं होतीं, तीं यशवंतराव होळकरानें कर्नल मॉन्सनच्या बाबतींत लवकरच खरीहि करून दाखविलीं. होळकरापाशीं लाख दीड लाख घोडा या वेळीं खरोखरच जय्यत तयार होता. व मराठ्यांची गनिमी काव्यानें लढण्याची इतिहासप्रसिद्ध पद्धतीहि यशवंतराव होळकरानें अद्यापि सोडलेली नव्हती. नुसत्या घोडेस्वारांचें गनिमी पेशानें लुटालूट करणारें सैन्य असलें, म्हणजे तें शत्रूचें नुकसान वाटेल तेव्हां करूं शकतें. परंतु त्याच्यावर हल्ला करण्याकरितां कोणी शत्रु येतो असें दिसल्याबरोबर हे घोडेस्वार चार चोहोंकडे पसार होऊन शत्रूचा हल्ला निष्फळ करितात, आणि फिरून शत्रूवर हल्ला चढविण्याकरितां दुसरीकडेच कोठें तरी एकत्र होऊन तयारी करितात. घोडेस्वारांच्या सैन्याच्या या सुटसुटीतपणापासून आणि चपळपणापासून मराठ्यांना जो फायदा झाला, तो त्याच्या पायदळ पलटणी आणि त्याचे तोफखाने यांच्यापासून त्यांना कधींही झाला नाहीं. महादजी शिंदे आणि दौलतराव शिंदे यांनीं पुष्कळ युरोपियन ऑफिसर नेमून त्यांच्या हाताखालीं आपल्या पायदळ पलटणी आणि आपले तोफखाने तयार करविले होते. व या युरोपियन पद्धतीच्या नादीं लागल्यामुळेंच शिंद्याला अखेरीस फसावें लागलें. परंतु यशवंतराव होळकर याची सारी भिस्त आपल्या गनिमी काव्याच्या दीड लाख घोडेस्वारांवरच होती. आणि त्यानें कवायती कंपू आणि तोफखाने यांच्यावर कधींच फारशी भिस्त ठेविली नव्हती. शिंद्यांच्यासारखे नेटिव्ह राजे युरोपियन धर्तीवर

आपली पायदळ पलटणें तयार करूं लागले आहेत, हें पाहून ज. वेलस्ली यांच्यासारख्या इंग्लिश सेनापतींना एक प्रकारानें बरें वाटत असे. कारण, पायदळ आणि तोफखाना यांच्या योगानें मराठ्यांच्या फौजेमध्यें एक प्रकारचा अवजडपणा येऊं लागला होता. व त्यामुळें आज येथें तर उद्यां तेथें ही जी मराठयांची धावत्या लढाईची पद्धत ती नामशेष होऊं लागली होती. या बदलत चाललेल्या लष्करी परिस्थितीसंबंधानें ज. वेलस्ली यांनीं व्यक्त केलेले पुढील उद्गार विचार करण्यासारखे आहेत. ते म्हणतात कीं :—

"The military spirit of the Marathas has been destroyed by their establishment of infantry and artillery; at all events it is certain that those establishments, however formidable, afford us a good object of attack in a war with the Marathas and that the destruction of them contributes to the success of the contest."

"If there were no infantry in a Maratha army, their cavalry would commence those predatory operations for which they were formerly so famous."

"On this ground, therefore, I think that they should be encouraged to have infantry rather than otherwise."

वरील उताऱ्यांत ज. वेलस्ली हे स्पष्टपणें असें म्हणत आहेत कीं, मराठ्यांच्या सैन्यांत जर पायदळ नसेल आणि नुसते घोडेस्वारच असतील, तर आम्ही त्यांचा केव्हांच पराभव करूं शकणार नाहीं. कारण, आम्ही त्या घोडेस्वारांचा पराभव करावयाला एके ठिकाणीं जावें, तों ते तेथून निघून दुसरीकडेच लुटालुट करण्यासाठीं निघून चालते होतात. तेव्हां अशा सैन्याचा पराभव करावयाचा तरी कसा ? म्हणून असल्या लुटारू आणि गनिमी काव्यानें लढणाऱ्या घोडेस्वारांच्या ऐवजीं मराठयांनीं पायदळ पलटणी उभाराव्या आणि त्या कामीं आपण त्यांना प्रोत्साहन द्यावें, यांतच आपलें हित आहे.

परंतु ज. वेलस्ली यांच्या मताच्या अगदीं विरुद्ध यशवंतराव होळकरांचें वर्तन होतें. त्यांच्या लष्करांत पायदळ कमी असून बहुतेक सगळा भरणा घोडेस्वारांचाच होता. आणि त्यामुळें त्याच्या बहुतेक लढायांतून त्याला यश आलें.

यशवंतराव होळकर याच्याशीं लढाई सुरू करावी, किंवा न करावी, याच्याबद्दल लॉर्ड लेक आणि मॉर्क्विस वेलस्ली यांच्या दरम्यान बरेच दिवसपर्यंत पत्रव्यवहार चालला होता. परंतु अखेरीस होळकराच्या विरुद्ध लढाई पुकारण्याचा बेत मुक्रर झाला. व त्याप्रमाणें मार्क्विस वेलस्ली यांच्याकडून निरनिराळ्या ठिकाणच्या सैन्यांना हुकूम सुटले. नर्मदेच्या दक्षिणेला ज. वेलस्ली यांचें सैन्य होतें. त्या सैन्यानें होळकराचा दक्षिणेकडील चांदोरचा किल्ला व इतर मुलूख हस्तगत करून घ्यावा, असें फर्माविण्यांत आलें. त्याचप्रमाणें शिंद्याच्या विरुद्ध जेव्हां पूर्वी लढाई सुरू करण्यांत आली, त्यावेळीं त्याला चोहोंकडून शह देण्याकरितां कर्नल मरे यांचें सैन्य गुजराथेमध्यें पाठविण्यांत आलें होतें; तेथून त्या सैन्यानें पश्चिमे-

कडून होळकराच्या ताब्यांतील माळव्याच्या मुलखावर चाल करून इंदूर वगैरे होळकराचीं मुख्य मुख्य शहरें काबीज करावीं, असें ठरलें. आणि उत्तरेकडून होळकराच्या सैन्यावर हल्ला करण्याचें काम खुद्द लॉर्ड लेक यांनीं आपल्या अंगावर घेतलें. दक्षिण, पश्चिम आणि उत्तर, अशा या तीन दिशांची अशा रीतीनें व्यवस्था लावण्यांत आली. परंतु पूर्वेकडची चौथी बाजू मोकळी राहिली होती. व त्या बाजूकडून होळकराला कोंडण्याकरितां इंग्लिशांना आणखी कोणी तरी एखादें सैन्य पाहिजे होतें. तें सैन्य त्यांनीं कोणतें गांठलें? या प्रसंगीं आपल्या सैन्यानें इंग्लिशांना मदत करणारा कोण दोस्त त्यांना मिळाला? या दोस्त राजाचें नांव वाचकांना कळलें, तर ते चकित होऊन जातील! आणि हिंदुस्थानच्या राजकारणामध्यें नरडीचा घोट घेणाऱ्या शत्रुत्वाचें, गळ्यांत मिठ्या मारणाऱ्या मित्रत्वामध्यें, एकाएकीं रूपांतर होतें तरी कसें, याच्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं! हा इंग्लिशांचा दोस्त दुसरा तिसरा कोणी नसून जो थोडे दिवसापूर्वी इंग्लिशांशीं लढत होता, तो दौलतराव शिंदेच हा दोस्त होता! दौलतराव शिंद्यांनीं इंग्लिशांना मदत करण्याच्या कामावर आपले सरदार बापूसाहेब शिंदे आणि जॉन बॅप्टिस्ट फिलोज यांची नेमणूक केली होती. व त्यांपैकीं बॅप्टिस्ट फिलोज यांनीं अष्टे, सिहोर, भिलसा, वगैरे माळव्यांतील होळकराच्या ताब्यांतील कांहीं मुलूख जिंकून घेतले.

हे जे दोन सरदार शिंद्यानें इंग्लिशांच्या मदतीला दिले होते, त्या दोघांच्या दोन हकीकती होत्या. जॉन बॅप्टिस्ट फिलोज याला जरी होळकराच्या विरुद्ध म्हणून पाठविण्यांत आलेलें होतें, तरी त्याच्यावर दौलतराव शिंद्याचा फारच थोडा विश्वास होता. आपल्या हाताखालील बाकीचे युरोपियन लष्करी ऑफिसर इंग्लिशांना फितूर होऊन ज्याप्रमाणें आयत्या वेळीं आपल्याला सोडून गेले, त्याचप्रमाणें हाहि आपल्याशीं विश्वासघात करील, अशी शिंद्याला भीति होती. आणि असल्या विश्वासघाताबद्दल यशवंतराव होळकरानें आपल्या हाताखालील फितुरी लोकांना जसें शासन केलें, तसें परिणामकारक शासन करण्याचें कार्य जरी दौलतराव शिंद्याच्या हातून घडूं शकलें नाहीं, तरी त्यानें फिलोजला कांहीं दिवसपर्यंत तुरुंगामध्यें कोंडून ठेविलें होतें. आतां आपण बापूजी शिंदे यांच्याकडे वळून त्यांची हकीकत पाहूं लागलों तर बापूजी शिंदे हे मात्र मनापासून इंग्लिशांच्या बाजूनें कितपत लढत होते, याच्याबद्दल शंकाच आहे. इतकेंच नव्हे, तर पुढें क. मॉन्सन याचा एके ठिकाणीं जेव्हां होळकराकडून सपशेल पराभव करण्यांत आला, त्या वेळीं बापूजी शिंदे यांनीं दिलेला सल्ला कांहीं अंशीं त्या पराभवाला कारणीभूत झाला, असा इंग्लिश इतिहासकारांचा एक आक्षेप आहे. व त्यावरून बापूजी शिंदे हे जरी इंग्लिशांच्या बाजूला साहाय्य करण्याकरितां आलेले होते, तरी त्यांच्या मनाचा खरा ओढा होळकराकडेच होता, असा त्यांच्याबद्दल इंग्लिशांचा संशय होता. आणि बापूजी शिंद्यांचा ओढा होळकराकडे असणें हेंच साहाजिक होतें. त्यांचा ओढा होळकराकडे नसेल, तर तो काय इंग्लिशांकडे असेल?

पण मुख्य प्रश्न बापूजी शिंद्याबद्दल नसून दौलतराव शिंद्याबद्दलचा आहे. १८०३ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत जे दौलतराव शिंदे इंग्लिशांशीं लढत होते, त्यांनीं १८०४ च्या फेब्रु-

वारी महिन्यामध्यें आपलीं सैन्यें होळकराच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्याकरितां पाठवावीं, हें संभवलें तरी कसें ? आणि ही गोष्ट अशक्यतेच्या कोटींतून शक्यतेच्या कोटीमध्यें आली तरी कशी ? शत्रुत्वाच्या तरवारीमध्यें तिखटपणा म्हणून कांहीं पदार्थ नसतोच कीं काय ? आणि वैरभाव म्हणजे जर इतकी मिळमिळीत आणि गुळचट गोष्ट असेल, तर त्यासाठीं इतक्या लढाया तरी कशाला लढविल्या गेल्या ? इतक्या रक्ताच्या नद्या तरी कशाला वाहविल्या ? आणि इतक्या गरीब शिपायांच्या प्राणांच्या आहुति तरी कशाला दिल्या ? मानवी स्वभावाच्या आणि कल्पनेच्या पलीकडची ही गोष्ट आहे. परंतु या दुर्दैवी जगामध्यें असे कांहीं दुर्घट योगायोग येतात कीं, त्यांच्या पुढें मनुष्यांच्या स्वभावांनाहि बदलावें लागतें; आणि मनुष्यांच्या कल्पनांनाहि थक्क होऊन बसावें लागतें ! दौलतराव शिंदे इंग्लिशांच्या लढाईच्या पेचांतून सुटले नाहींत, तोंच त्यांना इंग्लिशांनी आपल्या तहाच्या पेचामध्यें अडकवून धरिलें. त्या तहांतील सगळेंच कलमें दौलतराव शिंद्याला मनापासून मान्य झालेलीं होतीं, असे मुळींच नव्हतें. गोहद व ग्वालेरचा किल्ला आपल्याला मिळावा, असें शिंद्याचें म्हणणें होतें. पण मार्क्विस वेलस्ली ती गोष्ट मान्य करीनात. बरें, त्याकरितां तह मोडून फिरून इंग्लिशांशीं लढाई करावी, तर तितकी ताकद दौलतराव शिंद्याच्या सैन्यामध्यें इतक्या पराभवांनंतर आतां उरलेली नव्हती. आणि शिवाय फिरून लढाई सुरू करावी, तर त्यांत देखील शिंद्यांना फितुरीची भीति होतीच. आतांपर्यंत झालेल्या लढायांतून शिंद्यांचे इमानी नोकर तेवढे मरून गेलेले होते. पण शिंद्यांच्या भोंवतीं गराडा घालून बसलेले फितुरी लोक बहुतेक सगळे अजून जिवंतच होते. कारण, त्यांना जर फितुरीपासूनच मुबलक पैसा मिळतो, तर ते लढाईंत मरावयाला जाणार कशाला ? शिंद्यांच्या सभोंवतालच्या फितुरी लोकांपैकीं जीन बॅप्टिस्ट फिलोज यांची हकीकत वर सांगितलीच आहे. पण त्याच्याशिवायहि शिंद्यांच्या दरबारांत बाकीच्या फितुरी लोकांचा किती बुजबुजाट झालेला होता, याची कांहींशी कल्पना ता. २६ फेब्रुवारी १८०४ रोजीं ज. वेलस्ली यांनीं मेजर शॉ. यांना लिहिलेल्या एका पत्रांतील पुढील वाक्यावरून येण्यासारखी आहे:—

Even if Scindha should not come into the defensive alliance, we have got such a hold in his Durbar, that if ever he goes to war with Company, one half of his chiefs and of his army will be on our side.

या वाक्यामध्यें ज. वेलस्ली हे असें म्हणतात कीं, शिंद्यानें आमच्याशीं तह न करतां तो कंपनी सरकारापाशीं लढाई पुकारण्याला तयार झाला, तरी त्याची आम्हाला पर्वा नाहीं. कारण, त्यानें लढाई पुकारली, तर त्याच्या दरबारावर आतां आमचा इतका शह बसलेला आहे कीं, त्याच्या सरदारांपैकीं निम्मे सरदार आणि त्याच्या सैन्यापैकीं निम्में सैन्य आमच्या बाजूनें लढेल ! इतके फितुरी लोक ज्याच्या दरबारामध्यें भरलेले होते, तो बिचारा दौलतराव शिंदे इंग्लिशांच्या विरुद्ध फिरून लढाई कोणाच्या जोरावर करणार ? तेव्हां अशा स्थितींत तहाशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आणि त्या तहाच्या अटींमध्यें एकमेकांना मदत करण्याची अट असल्यामुळें शिंद्यानें इंग्लिशांना मदत करण्याचें नाकारणें शक्य नव्हतें.

शिवाय मार्किस वेलस्ली यांनीं या प्रसंगीं आणखीहि एक नवीन युक्ति भोळ्या लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां काढली होती. ती अशी:—यशवंतराव होळकर हा होळकराच्या गादीचा खरा मालक नव्हता, या गोष्टीचा उल्लेख पूर्वी करण्यांत आलेलाच आहे. इंदूरच्या गादीचा खरा मालक तुकोजीराव होळकर हा मरण पावल्यानंतर त्याचा औरस पुत्र जो काशीराव होळकर त्याच्या मालकीचा होळकराचा मुलूख दासीपुत्र यशवंतराव होळकर याला कसा घेऊं द्यावयाचा ? असें करणें हा अन्याय आहे ! तेव्हां निःस्पृह, निर्लोभी आणि निराकांक्ष, असे जे महान् विरक्त मार्किस वेलस्ली त्यांनीं पहिल्यानें अशी तोड काढिली कीं, हा मुलूख यशवंतराव होळकराला पचूं द्यावयाचा नाहीं; आणि म्हणून तो त्याच्यापासून लढाई करून जिंकून घेतला पाहिजे. पण तो लढाईत जिंकून घेतला, तरी आपण इंग्लिशांनीं त्या दुसऱ्याच्या मुलखाला स्पर्श करावयाचा नाहीं ! तर तो परस्पर पेशवे, निजाम, शिंदे इत्यादि अधार्मिक आणि अपापभीरू अशा लोकांना वांटून द्यावयाचा ! हें मार्किस वेलस्ली यांनीं या वेळीं केलेले ढोंग पुढील इंग्रजी मजकुरावरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. तो मजकूर येणेप्रमाणें:—

It was not the Governor-General's intention, in the event of the reduction of Holkar's power, to take any share of the possessions of the Holkar family for the Company. Chandore and its dependencies will probably be given to the Peishawa; and the other possessions of Holkar, situated to the south of the Godavary, to the Subedar of the Deccan; all the remainder of the possessions of Holkar will accrue to Scindhia, provided he shall exert himself in the reduction of Jeswunt Rao Holkar.

होळकराचा मुलूख स्वतः न घेतां पेशवे, निजाम, शिंदे, वगैरे लोकांना वांटून टाकावयाचा, हा इंग्रजी उद्देश शेवटास गेला असता तर तो स्तुत्य होता, यांत शंका नाहीं. पण अशा रीतीनें होळकराचा हा मुलूख कोणाला तरी वांटून टाकून परस्पर हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून आपलें स्वतःचें औदार्य दाखविण्याची ही जी मार्किस वेलस्ली यांनीं अजब इंग्रजी युक्ति काढली होती, त्यामध्यें काशीराव होळकराची वाट काय ? ज्या काशीराव होळकराच्या हक्काबद्दल आणि न्यायाबद्दल इंग्लिशांना इतके दिवस इतकी तळमळ लागून राहिलेली होती, त्याच्या त्या हक्कांचा आणि न्यायांचा पुढें इंग्लिशांना एकाएकीं विसरच पडला कीं काय, आणि अखेरीस नागव्याला नागवून तुक्याला उजविणें हाच इंग्लिशांच्या दृष्टीनें न्याय ठरला कीं काय ? पण ज्यांना हा होळकराचा मुलूख वांटून द्यावयाचा म्हणून इंग्लिश मुत्सद्दी या वेळीं बोलत होते, त्यांना तरी तो इंग्लिशांनीं फार दिवस पचूं दिला असता, असें मुळींच नाहीं. दुसऱ्याचें एक तोंड मध्यें घालून त्याच्या पोटांतून अखेरीस तो मुलूख आपल्याच घशांत आणण्याची ही एक इंग्रजी निःस्पृहपणाची युक्ति होती. अशीच युक्ति इंग्लिशांनीं टिपू सुलतानाचें राज्य खाण्याचे वेळींही उपयोगामध्यें

आणिलेली होती. टिपूच्या राज्यांतला कांहीं भाग प्रथमतः निजामाला देण्यांत आला होता; आणि नंतर आपल्या सरंजामी फौजेच्या खर्चाकरितां म्हणून तोच प्रांत इंग्लिशांनीं निजामापासून उपटला !

शिवाय, या बाबतींत शिंद्याला होळकराचा कांहीं मुलूख देण्याची लालूच दाखविण्यामध्यें आणखीहि एक अंतःस्थ इंग्रजी हेतु होताच. All the remainder of the possessions of Holkar will accrue to Scindhia, provided he shall exert himself in the reduction of Jeswunt Rao Holkar. या वर दिलेल्या उताऱ्यांतील वाक्यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, यशवंतराव होळकराला जमीनदोस्त करण्याचे कामीं शिंदे झटून मेहनत करतील, तरच त्यांना हा होळकराच्या मुलुखांतील लांचाचा तुकडा प्राप्त व्हावयाचा होता. इंग्लिशांचा जरी असा हेतु असला, तरी दौलतराव शिंदे हे या लांचाच्या तुकड्याच्या लालसेनें होळकरावर हल्ला करण्याला उद्युक्त झाले, असें नसून वर सांगितलेल्या कारणांमुळें तसें करण्यावांचून त्यांना गत्यंतरच नव्हतें. परंतु कांहीं असलें, तरी एका इंडियन राजानें दुसऱ्या इंडियन राजावर उठावयाचें आणि त्यांत इंग्रजासारख्या तिसऱ्या लोकांचा फायदा करून द्यावयाचा, ही एक मोठी वाईट पद्धत पूर्वीपासून आपल्या इतिहासामध्यें पडून गेली आहे. टिपू सुलतानाच्या वेळींहि असेंच झालें. पेशव्यांनीं पाहिजे तर टिपू सुलतानाच्या विरुद्ध लढावयाचें होतें. परंतु टिपू सुलतानाच्या विरुद्ध त्यांनीं इंग्लिशांना काय म्हणून मदत करावी? परंतु या सगळ्या पूर्वीच्या राजकीय पातकांचे परिणाम अजूनपर्यंतहि भोगावयाचे सरत नाहींत.

असो. येथपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें यशवंतराव होळकराला दक्षिण, पश्चिम, उत्तर आणि पूर्व, अशा चाऱ्ही दिशांनीं कोंडण्याचा इंग्रजांकडून कसा प्रयत्न करण्यांत आला होता, हें वर्णन करण्यांत आलें. इंग्रजी फौजेची हल्ला करण्याची पद्धत कशी असते, हें पहाण्याच्या दृष्टीनें आपण जर इंग्रजांच्या निरनिराळ्या मोहिमांचें परीक्षण करूं लागलों, तर आपल्याला असें दिसून येतें कीं, ते आपली सगळी फौज एका ठिकाणीं कधीं जमा करीत नाहींत; तर निरनिराळ्या ठिकाणीं माऱ्याच्या जागा पाहून आपलीं निरनिराळीं सैन्यें ते ठेवितात; आणि चोहोंकडून शत्रूवर मारा सुरू करितात; आणि त्यामुळें शत्रु स्वाभाविकपणेंच गोंधळून जातो व शत्रूचें कोठें किती सैन्य आहे, व त्या मानानें आपल्या सैन्याचे आपण कसे विभाग केले पाहिजेत, हें समजणें शक्य न झाल्यानें त्याची फारच त्रेधा होते. असईच्या लढाईच्या वेळीं शिंदे आणि भोसले या दोघांच्या हाताखालीं मिळून अर्धा पाऊण लाख सैन्य होतें. पण तें सगळें एका ठिकाणीं जमा झालेलें असल्यामुळें त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. याच सैन्याचे त्यांनीं दोन चार विभाग करून निरनिराळ्या बाजूंनीं निरनिराळ्या ठिकाणीं इंग्रजांवर हल्ले केले असते, तर त्याचा खात्रीनें जास्त चांगला परिणाम झाला असता. परंतु हें शक्य होण्याला निरनिराळ्या सैन्यांच्या विभागांवर ज्यांची स्वतंत्रपणें नेमणूक करितां येईल असे बुद्धिमान् सेनापति पाहिजेत. परंतु आपल्या जुन्या लष्करी पद्धतीमध्यें जेथें एक मुख्य सेनापतिहि चांगला मिळण्याची मारामार, तेथें अनेक कुशल सेनापति कोठून मिळणार? बुद्धिबळाच्या डावामध्यें दोन्ही बाजूला ज्याचीं त्याचीं प्यादीं सरळ रेषेमध्यें

मांडून झाल्यानंतर ज्याप्रमाणें चारपांच मोहरीं निरनिराळ्या बाजूनें पुढें टाकण्यांत येतात, त्याप्रमाणें लढाईच्या सुरवातीला सैन्याचे चार पांच निरनिराळे विभाग करून निरनिराळ्या बाजूंनीं शत्रूवर चालून जाणें जरूरीचें असतें. सगळ्यांनीं एका ठिकाणीं कोंडून घेण्यांत आणि एकत्र पराभव पावण्यात कांहीं हांशील नसतें. निरनिराळे विभाग केल्यानें सैन्याला कूच करून जाण्याला वाटेंत गर्दी होत नाहीं; निरनिराळ्या ठिकाणांहून गेल्यामुळें घास, दाणा, वैरण, पाणी, यांचा पुरवठा होऊं शकतो; आणि यदाकदाचित् एखाद्या तुकडीचा पराभव झाला, तरी दुसऱ्या तुकड्यांना फिरून दुसरा प्रयत्न करण्याला अवकाश शिल्लक राहतो.

हें धोरण इतर कोणी मराठे सरदारांनीं फारसें उपयोगांत आणिलें नव्हतें. तरी पण यशवंतराव होळकर हा युद्धकलेंतील एक कुशल सेनापति असल्यामुळे त्याने या पद्धतीचा या वेळीं फायदा करून घेतला. अमीरखान या नांवाचा त्याच्याजवळ एक शूर आणि धाडसी असा पठाण सरदार होता. या सरदारानें आपल्या हाताखालीं कांहीं फौज घेऊन इंग्रजांच्या ताब्यांतील बुंदेलखंडामध्यें प्रवेश केला व तिकडे त्यानें पुष्कळ ठिकाणीं लूटफाट आणि जाळपोळ करून इंग्लिशांना बराच त्रास दिला. अशा रीतीने एका बाजूनें बुंदेलखंडामध्यें अमीरखान इंग्लिशांना सतावून सोडीत असतां खुद्द यशवंतराव होळकर हा जयपूरच्या रोखानें चाल करून निघाला होता. यशवंतराव होळकरानें लढाईपूर्वीच्या वाटाघाटीमध्यें लॉर्ड लेक यांना एका पत्राच्या द्वारें असें बजाविलें होतें कीं, " माझें म्हणणे तुम्हीं मान्य केलें नाहीं, तर शेंकडों कोसांचे मुलूख मी लुटून उद्ध्वस्त करून टाकीन. आणि मी लढाई सुरू केली असतां, ज. लेकसाहेब, तुम्हांला श्वासोच्छ्वास करण्यालाहि मी सवड सापडूं देणार नाहीं. माझ्या सैन्यांत लाखों लोक भरलेले आहेत. ते तुमच्या मुलुखावर एखाद्या समुद्राप्रमाणें चोहोंकडे पसरतील. आणि त्याच्या योगानें तुमच्या लोकांना मी ' त्राहि भगवान् ' असें करून सोडीन ! याचा तुम्ही लढाई सुरू करण्याच्या पूर्वी नीट विचार करा. " यशवंतराव होळकरानें या पत्राच्या द्वारानें लॉर्ड लेक यांना जी धमकी दिली होती, ती त्यानें आपल्या पुढील युद्धचातुर्यानें खरोखरच खरी करून दाखविली. जयपूरकडील रजपुतांचा मुलूख हा पूर्वी शिंद्याच्या ताब्यांत होता. त्यामुळें शिंदे आणि इंग्लिश यांच्या दरम्यान लढाई चालू असतांना जेव्हां होळकर शिंद्याच्या ताब्यांतील या रजपूत लोकाच्या संस्थानावर हल्ले करीत होता, तेव्हां होळकर अप्रत्यक्ष रीतीनें शिंद्याच्या मुलखावर हल्ले करून पर्यायानें आपल्यालाच मदत करीत आहे, असें इंग्लिशांना वाटत होते. व म्हणून ते त्या गोष्टीकडे कानाडोळा करीत होते. परंतु पुढें शिंदे आणि इंग्लिश यांच्यामध्यें तह होऊन त्या तहानें तो जयपूरच्या आसपासचा रजपुतांचा मुलूख जेव्हां इंग्लिशांच्या ताब्यांत आला, तेव्हां इतउत्तर तेथील होळकराच्या हल्ल्यांकडे इंग्लिशांनीं कानाडोळा करणें अशक्य झालें, व होळकराच्याविरुद्ध इंग्लिशांना कांहीं तरी तजवीज करणें भाग झालें व त्यासाठीं आपल्या हाताखालीं कांहीं सैन्य घेऊन लॉर्ड लेक जयपूरकडे दरकूच दरमजल येत चाललें होते. सिकंदरा, बियाना, हिंदोन, रामगड, बालाहिरा, करोली, वगैरे जयपूरच्या वाटेकडील निरनिराळ्या ठिकाणीं मुक्काम करीत करीत ज. लेक यांचें लष्कर ता-

१७ एप्रिल १८०४ रोजीं देवसरच्या मुक्कामावर येऊन पोहोंचलें. येथून पुढें ज. लेक यांनीं आपल्या सैन्यांतून दोन तुकड्या निराळ्या काढून होळकराच्या विरुद्ध पाठविल्या. त्यांपैकीं पहिली तुकडी लेफ्टेनंट कर्नल मॉन्सन यांच्या हाताखालीं होती. व दुसरी लेफ्टेनंट कर्नल डॉन यांच्या हुकमतीखालीं होती. पहिली तुकडी ता. १८ एप्रील १८०४ रोजीं देवसर येथून जयपूरकडे जाण्याकारितां निघाली. व दुसरी तुकडी ता.१० मे १८०४रोजीं नरगडच्या मुक्कामाहून टोंकरामपुरा या शहराकडे पाठविण्यांत आली. टोंकरामपुरा हें शहर मूळचें जयपूरच्या राजांच्या मालकीचेंच होतें. परंतु १७९१ पासून तें तुकोजीराव होळकराच्या ताब्यांत आलेलें होतें. तें शहर या वेळीं यशवंतराव होळकराच्या हातांत असल्यामुळे तेथून आसपासच्या रजपुतांच्या मुलुखांत आणि खुद्द जयपुरावरहि स्वाऱ्या करण्याला यशवंतराव होळकराला फार सोईचें पडत होतें. म्हणून हें ठिकाण होळकराच्या ताब्यांतून घ्यावें या हेतूनें क. डॉन याची तिकडे रवानगी करण्यांत आलेली होती. त्याप्रमाणें क. डॉन यानें ता. १५ मे १८०४ रोजीं टोंकरामपुऱ्याच्या किल्ल्यावर हल्ला करून तो किल्ला व शहर हस्तगत केलें. अशा रीतीनें त्या मुलुखांत टोंकरामपुरा हे जे होळकराचें एकच मालकीचें ठिकाण होतें, तें त्याच्या ताब्यांतून गेलें. व उत्तरेकडे जयपूरच्या बाजूला क. मॉन्सन याच्या हाताखालचें सैन्य असल्यामुळें तिकडेही होळकराला हल्ले करितां येईनात. त्यामुळें तो टोंकरामपुरा शहराच्या दक्षिणेकडे वळून तेथून चंबळा नदी उतरून तेथून खालीं दक्षिणेकडे वळला. तरी पण त्यामुळे तो इंग्लिश सैन्याच्या कचाटींतून सुटला असें झालें नाहीं. कारण, उत्तरेकडून क. मॉन्सन याचें सैन्य त्याच्या पाठीमागून येत होतें. व दक्षिणेकडून गुजराथेमधून क. मरे याचें सैन्य इंदुरावर चाल करून येत होतें. आणि या दोन सैन्यांच्या कोंडमाऱ्यामध्यें होळकराचें सैन्य सांपडलेलें होतें. तरी पण होळकराच्या अलोट धैर्याला आपल्या कोंडमाऱ्यामध्ये कोंडून ठेवण्याला कोणीहि शत्रु समर्थ नव्हता. तें त्याचें धैर्य पूर्णपणें मोकळें होतें. आणि त्यामुळेंच तें क. मॉन्सनच्या हाताखालील सैन्याचा अतिशय विलक्षण रीतीनें धुव्वा उडवून देण्याला समर्थ झालें.

आपल्या सैन्यापैकीं ज्या दोन तुकड्या क. मॉन्सन आणि क. डॉन यांच्या हाताखालीं देऊन होळकराच्या विरुद्ध पाठविण्यांत आलेल्या होत्या, तेवढ्या उत्तरच्या बाजूनें होळकराला ताब्यांत ठेवण्याला आणि रोखून धरण्याला पुरेशा आहेत, असें वाटून पावसाळा जवळ आलेला असल्यामुळे ज. लेक हे आपल्या हाताखालचें बाकीचें सैन्य घेऊन आग्र्याच्या छावणीवर मुक्कामाला गेले. याप्रमाणें हें ज. लेक यांच्या हाताखालचें एक मोठें सैन्य दूर निघून गेल्यामुळें व तें पावसाळ्याचे चार महिने तरी निदान परत येणें शक्य नसल्यामुळें त्या बाजूची यशवंतराव होळकराची एक मोठी भीति नाहींशी झाली. त्याचप्रमाणें गुजराथेंतून जरी क. मरे याचें सैन्य इंदुरावर चाल करून यावयाचें होतें, तरी तें अद्यापि बरेंच दूर होतें, त्यामुळें पिछाडीकडून त्या सैन्याचीही त्याला फारशी मोठी भीति होती, असें नाहीं. अशा स्थितींत क. मॉन्सन याच्या हाताखालीं जें सैन्य होतें, त्याचा आतां आपण चांगला समाचार घेऊं आणि मराठ्यांचा गनिमी कावा कसा असतो, याचा हात आपण इंग्लिशांना आतां बिनधोकपणानें दाखवूं, अशी महत्त्वाकांक्षा होळकराच्या मनांत या परिस्थितीमुळें या

वेळीं साहजिकपणेंच उत्पन्न झाली. या वेळीं क. मॉन्सन याच्या हाताखालीं १२ व्या रेजिमेंटपैकीं दोन पलटणी आणि दुसऱ्या रेजिमेंटपैकीं दुसरी पलटण इतकें पायदळ असून शिवाय तोफखाना आणि घोडेस्वार यांच्याहि कांहीं पलटणी होत्या. तसेंच दौलतराव शिंद्यानें होळकराच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्यासाठीं म्हणून आपले सरदार बापूजी शिंदे यांच्या हाताखालीं जे घोडेस्वार पाठविले होते, त्या घोडेस्वारांचाहि एक रिसाला क. मॉन्सन याच्या सैन्याबरोबर होता. त्याचप्रमाणें क. डॉन याच्या हाताखालीं ७ पायदळ-कंपन्या व एक घोडेस्वारांची पलटण आणि तोफखाना इतकें सैन्य होतें. यापैकीं क. डॉन यानें क. मॉन्सन यांच्या सैन्याला जाऊन मिळावें आणि हें सगळें संयुक्त सैन्य घेऊन क. मॉन्सन यानें कोटा येथें राहून तेथून जयपूरच्या आसपासच्या सर्व मुलुखाचें संरक्षण करावें, असा ज. लेक यांचा क. मॉन्सन याला हुकूम होता. परंतु त्याप्रमाणें तो वागला नाहीं. त्याला असें वाटलें कीं, होळकराचा पाठलाग करीत आपण माळव्यांत खालीं उतरलों, तर होळकरावर आपल्याला जास्त चांगली जरब बसवितां येईल. आणि त्यामुळें तो अखेरीस आपल्या सगळ्या सैन्यासह गोत्यात पडला. यशवंतराव होळकरापाशीं पैसा नाहीं व त्याच्या-जवळ शिपाई लोकही पुरेसे नाहींत, अशा बातम्या इंग्लिश सेनापतींच्या कानावर आलेल्या होत्या. त्याच्या सैन्यांत फार दुर्दशा झालेली आहे आणि तेथें सगळी अव्यवस्था आहे, शिपाई लोकांना देण्याला होळकराजवळ पुरेसे पैसे नाहींत, तेव्हां तो सैन्याची जमवाजमव करून आपल्यावर उलट हल्ला करण्याला कोठून समर्थ होणार, अशाही भ्रमामध्यें इंग्लिश सेनापति होते. शिवाय यशवंतराव होळकराच्या सैन्यांतील शिपायांना लांच देऊन त्यांना फोडण्याचें कामहि इंग्लिशांकडून चाललेलेंच होतें. विलायतेंतील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या सीक्रेट कमिटीला गव्हर्नर जनरलनें ता. २४ मार्च १८०५ रोजीं जो एक खलिता पाठविला, त्यामध्यें शिंदे आणि होळकर यांच्या लष्करांतील लोकांना फोडण्याविषयीं गुजराथच्या सैन्या-वरील मुख्य क. मरे आणि गव्हर्नरजनरल मार्किस वेलस्ली यांच्या दरम्यान जीं कांहीं प्रश्नोत्तरें चाललेलीं होतीं, त्यांच्याबद्दलचा ढळढळीत उल्लेख पुढील उताऱ्यामध्यें आढळून येतो. तो उतारा असा:—

Colonel Murray having submitted to the Governor-General several questions relative to the extent to which he might be permitted to encourage desertion among the adherents of Jeswant Rao Holkar, and to offer to them employment in the service of the Allies, and to whant extent he might make pecuniary advances to the servants of Doulat Rao Scindhiah for the purpose ot enabling them to act with vigour and exertion, the Governor-General in Council deemed it to be advisable to furnish Colonel Murray with instructions on those several questions.


परंतु इंग्लिशांची आंतून होळकराचे लोक फोडण्याविषयीं जरी अशी कारवाई चाललेली होती तरी ईश्वराच्या कृपेनें या वेळीं होळकराला कांहीं कमी पडलें नाहीं. त्यानें पैसा कोठून जमविला, हें त्यानें क. मॉन्सन, लॉर्ड लेक किंवा मार्क्विस वेलस्ली, यांना सांगितलें नाहीं, हे खरें; पण इंग्लिशांशीं लढण्याकरितां आणि आपलें स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याकरितां त्यानें कोठून तरी, पण पुष्कळ पैसा जमा केला. आणि त्यानें लागतील तितके लोक आपल्याभोंवतीं जमा केले. लढवय्ये लोकांना त्या वेळीं कांहीं तोटा नव्हता. जो कोणी पगार देऊन शिपाईगिरीच्या कामावर बोलवील त्याच्याकडे जाण्याकरितां त्या वेळीं देशामध्ये लाखों लोक तयार होते. व शिवाय शिंद्याच्या लढाया संपून त्याच्याशीं तह झालेला असल्यामुळें दौलतराव शिंद्यानें आपल्या पलटणींतून जे शिपाई कमी केले, तेच बहुतेक शिपाई होळकराच्या पलटणींतून येऊन दाखल झाले; आणि अशा रीतीनें होळकराच्या लष्कराची तयारी झाली. व शिवाय आधींच त्याचें लष्कर फार मोठें होतें. पण त्याचें मन त्याच्या लष्कराहूनहि मोठें होतें. आणि युद्धामध्यें जे विजय मिळत असतात, ते लष्कराच्या मोठेपणावर अवलंबून नसून मनाच्या मोठेपणावर नेहमीं अवलंबून असतात. मी शत्रूशीं लढाई करून शत्रूला जिंकीन, ही महत्त्वाकांक्षा ज्याच्या मनामध्यें असते, तोच शत्रूशीं लढाई करण्याला उद्युक्त होतो. आणि त्यालाच परमेश्वर लढाईंत विजय देतो. आणि हें जे सर्व बळांपेक्षां जास्त मोठें असें मानसिक बळ, तें यशवंतराव होळकराच्यापाशीं फार मोठ्या प्रमाणात असल्याकारणानें त्याच्या हातून या वेळीं हिंदुस्थानच्या सर्व इतिहासामधील अत्यंत अद्वितीय अशीं धाडसाचीं कृत्यें घडून आलीं.

अजमीर, जयपूर, वगैरे ठिकाणावर यशवंतराव होळकर स्वाऱ्या करीत असतां तिकडून त्याला माळव्यामध्यें हुसकून लावून मॉन्सन यानें उत्तरेकडून आणि क. मरे यानें दक्षिणेकडून मध्यें त्याला कोंडण्याचा विचार केला होता. परंतु त्याची ती मसलत यशवंतराव होळकरानें चालूं दिली नाहीं. या दोन सैन्यांच्या मध्यें सापडल्यानंतर त्या सैन्यांपैकीं कोणत्या तरी एका सैन्याची फळी फोडून बाहेर पडण्याशिवाय यशवंतराव होळकराला दुसरा मार्गच नव्हता. व उत्तरेकडे त्याचें खरें रणक्षेत्र असल्यामुळें तिकडेच जाण्याचा त्याचा खरा इरादा होता. परंतु जिकडे खरोखर जावयाचें असेल तिकडची बातमी मुळींच बाहेर फुटूं न देतां जिकडे जावयाचें नाहीं तिकडची खोटीच हूल उठवून शत्रूला फसवावयाचें आणि आपला कार्यभाग सहजासहजीं साधून घ्यावयाचा, ही जी राजकारणांतील गनिमी काव्याची एक नेहमींची साधी युक्ति, ती यशवंतराव होळकर यानें या वेळीं मोठ्या शिताफीनें उपयोगामध्यें आणिली. त्याला जरी वास्तविक उत्तरेकडे मथुरा, आग्रा, दिल्ली, या शहरांवरच चाल करून जावयाचें होतें, तरी त्यानें अशी हूल उठविली कीं, गुजराथेंतून क. मरे हा जो उज्जनीवर चाल करून येत आहे, त्याच्यावर आपल्या सगळ्या सैन्यानिशीं जाऊन हल्ला करावयाचा! ही बातमी क. मरे याला समजली, तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. त्याच्यापाशीं नुसतें पायदळच होतें; व गायकवाडकडून जे घोडेस्वार त्याच्या मदतीला येणार होते, ते अद्यापि त्याला येऊन मिळाले नव्हते. त्यामुळें होळकराच्या सगळ्या सैन्यासमोर आपल्या या थोडक्याशा पायदळ पलटणींचा निभाव लागणें शक्य नाहीं, असें जाणून क. मरे हा अगदीं गांगरून गेला. गोद्रा,

दोहद, वगैरेंच्या वाटेनें वडनगरपर्यंत या वेळीं क. मरे हा येऊन पोहोंचला होता; परंतु तेथें त्याला ही यशवंतराव होळकराच्या हल्ल्याची बातमी कळल्यावरून तो तेथून माघारा वळला आणि महीनदीच्या पाठीमागें जाऊन तेथें एक सुरक्षित जागा धरून तो राहिला.अशा रीतीनें आपल्या बंदुकीचा एकहि बार फुकट न जाऊं देतां यशवंतराव होळकरानें केवळ आपल्या बुद्धिकौशल्यानें इंग्लिशाच्या एका सरदाराला मागें वळविलें. क. मरे हा आपल्या हल्ल्याच्या भीतीनें मही नदीच्या पाठीमागें माघारा वळून गेला, ही बातमी ऐकून दक्षिण बाजूच्या बाबतींत यशवंतराव होळकर निर्धास्त झाला. व अशा युक्तीनें आपली पिछाडी सुरक्षित करून घेऊन मग यशवंतराव होळकर उत्तरेकडील आपला शत्रु क. मॉन्सन याचा समाचार घेण्याला सिद्ध झाला.

क. डॉन यानें टोंकरामपुरा हें होळकराचें ठिकाण हस्तगत करून घेतल्यानंतर होळकर उत्तरेकडून दक्षिणेकडे आला, हे पूर्वी सांगितलेंच आहे. तो वरून खालीं येतां येतां बहुतेक अगदीं उज्जनीच्या जवळ जवळ आला. तेव्हां क. मॉन्सन याला असें वाटलें की, यशवंतराव होळकर आपल्या सैन्याच्या पराक्रमामुळें पुढें पळत सुटला आहे, आणि आपण त्याच्या पाठोपाठ जितके जाऊं, तितका त्याचा सगळा मुलूख सहजगत्या आपल्या ताब्यात येईल. असें त्याला वाटलें; पण यांत तो फसला. कोट्यास रहाण्याविषयीं त्याला हुकूम होता. पण कोट्याच्या दक्षिणेस सुमारें ३० मैलावर मोकंदऱ्याची खिंड या नांवाचें एक ठिकाण होतें. त्या खिंडीच्या आजूबाजूला उंच डोंगर असून उज्जनीकडून उत्तर हिंदुस्थानांत मथुरा, आग्रा, दिल्ली, वगैरे ठिकाणाकडे येण्याला या खिंडींतूनच काय ती एक वाट होती. तेव्हा ही खिंड आपण आपल्या ताब्यांत घेतली, तर यशवंतराव होळकराचें अगदीं नाकच आपल्या मुठींत आल्यासारखें होईल असें वाटून तो १८०४ च्या जून महिन्यांत कोट्याहून निघून मोकंदऱ्याच्या खिंडींत आला. त्या खिंडींत आल्यावर तेथें तरी त्यानें थांबावें, पण तसें न करितां तो अधिक अधिकच मोहाला बळी पडत चालला. मोकंदऱ्याच्या खिंडीपासून २० मैलांवर सोनारा म्हणून एक गाव आहे, तेथें जाण्याकारितां त्याने ता.२८जून रोजीं मुकुंदऱ्याचा घाट सोडला; आणि तो सोनारा या गावीं येऊन पोहोंचला. या सोनारा गावापासून जवळच हिंगलजगड या नांवाचा होळकराचा एक मजबूत किल्ला आहे. मोकंदरा घाटापासून हा किल्ला सुमारें ५० मैल अंतरावर आहे. या किल्ल्याच्या डोंगरावर हिंगलास या नांवाच्या देवीचें एक स्थान आहे. व त्यावरूनच या जिल्ह्याला हिंगलजगड असें नांव पडलेलें आहे. हें ठिकाण इंदूरच्या उत्तरेस १४० मैलांवर आहे. हा किल्ला मजबूत असून यशवंतराव होळकराकडील ८०० शिपाई आणि ३०० घोडेस्वार त्या किल्ल्यावर संरक्षणाकरितां होते. परंतु यशवंतराव होळकर हा स्वतः तेथें नव्हता. तो तेथून ४४ मैल अंतरावर दूर होता. ही संधि साधून तो किल्ला आपल्या ताब्यांत घ्यावा या हेतूनें क. मॉन्सन यानें आपल्या सैन्यापैकीं कांहीं पलटणी मेजर सिंक्लेअर याच्या हाताखालीं देऊन पाठविल्या. व त्या लोकांनीं तो किल्ला ता. २ जुलै १८०४ रोजीं संध्याकाळीं हस्तगत केला. हा किल्ला हस्तगत झाल्यानंतर क. मॉन्सन हा पुढें पिंपळा या नांवाच्या घाटांतील एका गांवापर्यंत चाल करून गेला. हें गांवही मोकंदऱ्याच्या खिंडीपासून सुमारें ५० मैल

अंतरावर आहे. म्हणजे ज्या क. मॉन्सनला लॉर्ड लेक यांनीं कोटयास राहण्याला सांगितलें होतें, तो कोट्यापासून ३० मैल मोकंदरा घाट आणि मोकंद-यापासून ५० मैल पिंपळ्याचा घाट, असे मिळून एकंदर ८० मैल आपण होऊन यशवंतराव होळकराच्या घशामध्यें उतरला. या त्याच्या सर्व हालचाली होईपर्यंत यशवंतराव होळकर अगदीं स्वस्थ होता. व क. मॉन्सन काय काय करीत आहे, हें तो मुकाट्यानें पहात होता. एका लहानशा युक्तीनें त्यानें क. मरे याला तर मागें महीनदीच्या पलीकडे पळवून लाविलेंच होतें. व आतां या इंग्रजाच्या दुसऱ्या कर्नलला आपल्या राज्यांतून कसें हांकलून लावावयाचें याच्याबद्दलच्या योग्य संधीची तो कर्तृत्ववान् यशवंतराव होळकर वाट पहात बसला होता. व या दृष्टीनें पहातां अतिशय अडचणीच्या घाटांतून आणि डोंगरांतून पावसाळ्यांतील पाण्यानें भरलेले लहानमोठे नदीनाले ओलांडून—क. मॉन्सन हा जितका जितका आंत आंत आणि खोल खोल खड्ड्यांत येईल, तितकें तितकें तें यशवंतराव होळकराला पाहिजेच होतें. त्याप्रमाणें त्यानें त्याला भरपूर आंत येऊं दिलें. आणि मग यशवंतराव होळकर त्याच्यावर सापासारखा उलटला! आता हा चांगलाच अडचणींत सांपडला आहे आणि आतां याची लांडगेतोड करण्याला आपल्याला आयतीच चांगली संधि सांपडली आहे, असें पाहून यशवंतराव होळकर आपल्या प्रचंड सैन्यानिशीं त्याच्यावर तुटून पडण्याकरितां निघाला. या वेळीं यशवंतराव होळकर हा चंबळा नदीच्या पश्चिमेकडील बाजूला रामपुऱ्यापासून सुमारें २५ मैलांच्या अंतरावर होता. तेथून निघून रामपुऱ्याच्या जवळ चंबळा नदी उतरून तो आपल्या सर्व सैन्यासह आणि तोफखान्यासह अलीकडच्या बाजूला आला. हें जें रामपुऱ्याचें शहर आहे, तें इंदूरच्या राज्यांतील एक जिल्ह्याचें मोठें ठिकाण असून पूर्वीं रामपुरा म्हणून जें एक नांव वर आलेलें आहे, त्याच्यापासून हें निराळें आहे. त्याला टोंकरामपुरा असें म्हणतात. जयपूरच्या दक्षिणेस जें टोंक संस्थान आहे, त्या संस्थानांतील टोंकरामपुरा हें एक शहर असून तें बनास नांवाच्या एका नदीच्या जवळ आहे. व इंदूर संस्थानांत चंबळा नदीच्या जवळ असलेला रामपुरा आणि टोंक संस्थानांत बनास नदीच्या जवळ असलेला रामपुरा याच्यामध्यें सुमारें १२५ मैलांचें अंतर आहे. हीं दोन्हींहि गांवें या प्रकरणामध्यें आलेलीं आहेत. त्यांमध्ये घोटाळा होऊं नये म्हणून त्यांच्यांतील हा फरक लक्षांत ठेवणे जरूर आहे. पूर्वीं क. डॉन यानें टोंकरामपुरा येथील होळकराचा किल्ला ता. १५ मे रोजीं सर करून घेतला. व तेथून होळकराचा पाठलाग करीत निघालेलें इंग्लिशांचें सैन्य सुमारें पावणेदोन महिन्यांच्या अवधीमध्यें ता. ७ जुलै १८०४ पर्यंत होळकराच्या राज्यांतील चंबळा नदीच्या कांठचें जें रामपुऱ्याचें दुसरें शहर त्याच्या जवळ येऊन ठेपलें होतें. या सैन्याचा समाचार घेण्याकरितां होळकरहि आपलें सैन्य घेऊन चंबळा नदीच्या पूर्वेच्या बाजूला आला. इतके दिवस आणि इतक्या लांबपर्यंत आपण होळकराच्या राज्यांत चाल करून येत असतां त्यानें आपल्याला कोठेंच अडथळा केला नाहीं, तेव्हां आपल्या प्रचंड आणि अजिंक्य अशा इंग्रजी सामर्थ्यापुढें होळकर दबून गेला, असें ज्या क० मॉन्सन याला इतका वेळपर्यंत वाटत होतें, त्यानें होळकराच्या हालचालींची ही बातमी जेव्हां ऐकली, तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. त्याच्या जवळची अन्नसामग्री संपून गेलेली होती. व त्याच्या सैन्याला फक्त दोन किंवा


क. मान्सनची
पिछेहाट कसकशी झाली
हें दाखविणारा
नकाशा.
उ
दिल्ली
यमुनानदी
लासबरी
मथुरा
दिग
भरतपूर
आग्रा
जयपूर
फत्तेपूरशिकी
हिंडोन
बियाना
अजमीर
केरवली
खुशालगड
चंबळा नदी
टोंकरामपुरा
ग्वाल्हेर
बनास नदी
चंबळी
बुंदी
गनियार
कोटा
मोकांदरा
सोनारा
हिंग्लजगड
पिपळा
रामपुरा
गुरी
मही नदी
उज्जयनी
इंदोर
नेमाड

तीन दिवस पुरेल इतकेंच धान्य काय तें शिल्लक होतें. तेव्हां आपण रामपुऱ्यास जाऊन पोहोंचलो, तर तेथें आपल्याला धान्याचा पुरवठा करून घेतां येईल, असें त्याला वाटलें; आणि म्हणून ता. ७ जुलै रोजीं सकाळीं पिंपळ्याच्या घाटांतून निघून रामपुऱ्यापासून ७ मैलांवर असलेल्या गुरी या नांवाच्या एका खेडेगांवामध्यें त्यानें त्या रात्रीं मुक्काम केला.

रामपुऱ्याजवळील गुरी हें क. मॉन्सन याच्या प्रगतीचें शेवटचें ठिकाण होय. याच्या पुढें तो जाऊं शकला नाहीं. येथून यशवंतराव होळकर यानें केलेल्या पाठलागापुढें त्याला पिछेहाट करावी लागली. ही त्याची पिछेहाट गुरीपासून तों मोकंदरा, कोटा, टोंकरामपुरा, खुशालगड, या मार्गानें थेट आग्र्यापर्यंत सुमारें दोन सव्वादोनशें मैलांपर्यंत ता. ८ जुलै १८०४ पासून तों ता. ३१ आगस्टपर्यंत सुमारें पावणेदोन महिने एकसारखी चाललेली होती. या अवधीमध्यें यशवंतराव होळकरानें जो पराक्रम गाजविला, तो हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें अवर्णनीय होऊन राहिलेला आहे. असई, आरगाव, अलीगड, दिल्ली, लासवारी, वगैरे ठिकाणच्या विजयांनीं इंग्लिश लोक या वेळीं चढून गेलेले होते. परंतु यशवंतराव होळकरानें आपल्या अतुल पराक्रमानें त्यांचा चांगलाच नक्षा उतरला. आणि दौलतराव शिंद्याच्या पराभवांनीं हिंदुस्थानी लोकांच्या पराक्रमाला जो एक प्रकारचा कलंक लागला होता, तो यशवंतराव होळकरानें आपल्या या गनिमी काव्याच्या कर्तबगारीनें पूर्णपणें धुवून काढिला. क. मॉन्सन याच्या हाताखालच्या इंग्रजी सैन्याची आणि सामानसुमानाची पूर्णपणें नासाडी करून यशवंतराव होळकरानें इंग्लिशांना वर तोंड काढण्याला कोठें जागाच ठेविली नाहीं. त्यानें इंग्लिशांची घमेंड उतरून टाकली. आणि या त्याच्या कृत्यामुळें हिंदुस्थानांत चोहोंकडे त्याचा बोलबाला सुरू झाला. हिंदुस्थानच्या इतिहासांतील प्रत्येक लढाईमध्यें पहावें तर, जेथें तेथें इंग्लिशांचा जय आणि इंडियन लोकांचा पराजय, हा निकाल ठरलेला; पण हे ठराविक निकाल यशवंतराव होळकरानें आपल्या शौर्यानें या वेळीं मोडून टाकिले. यशवंतरावानें सर्व इंडियन लोकांच्या आणि राजांच्या मनांत नवीन स्फूर्ति उत्पन्न केली. आणि अजूनहि आपण इंडियन लोक आपलीं राज्यें परत जिंकून घेऊं शकूं, असें प्रत्येकाला वाटूं लागलें. यशवंतराव होळकरानें क. मॉन्सन याच्या सैन्याचे हालहाल करून आणि त्याच्या शिपायांचे बळी घेऊन त्याला आपल्या मुलखांतून बाहेर घालविलें, या गोष्टींशीं तुलना करण्याला यूरोपच्या अर्वाचीन इतिहासामध्यें इतक्याच पराक्रमाचें असें फक्त रशियाचें एकच उदाहरण आहे. इकडे हिंदुस्थानांत इ. स. १८०४ मध्यें क. मॉन्सन हा जसा होळकराच्या मुलखामध्यें जबरदस्तीनें शिरला होता, त्याचप्रमाणें पुढें आणखी सुमारें ९।१० वर्षांनीं नेपोलियन आपल्या हाताखालीं एक प्रचंड सैन्य घेऊन रशियामध्यें शिरला होता. त्याला रशियन लोकांनीं ज्याप्रमाणें आपल्या मुलखांतून घालवून लाविलें, त्याचप्रमाणें यशवंतराव होळकरानें क. मॉन्सन याची वाट लाविली. नेपोलियनला रशियांतून घालवून लावण्याच्या कामीं रशियन लोकांना ज्याप्रमाणें रशियांतील हिंवाळ्यानें मदत केली, त्याप्रमाणेंच क. मॉन्सन याला माळव्यामधून हांकलून लावण्याच्या कामीं हिंदुस्थानांतील पावसाळ्यानें आपल्या हिंदुस्थानांतील लोकांना मदत केली. हिंदुस्थानांतील पावसाळा मोठा जबर असतो व त्या ऋतूमध्यें सर्व सैन्यांच्या हालचाली बहुधा बंद ठेवण्यांत येतात.

व त्या कारणामुळेंच तुम्ही चार महिने कोट्याला मुक्काम करून तेथून होळकराचा वर येण्याचा मार्ग अडवून ठेवावा, अशी ज. लेक याने क. मॉन्सन याला ताकीद दिली होती. परंतु ती न जुमानतां जुलैच्या, म्हणजे भर आषाढश्रावणाच्या, महिन्यांत क. मॉन्सन हा माळव्यांतील मोठमोठे डोंगर, घाट, नद्या आणि नाले उतरून होळकरावर हल्ला करण्याकरितां गेला. परंतु भर पावसाळ्यामध्येंही आपलें जें हें उल्लंघन आणि अतिक्रमण झालें, त्याचा अपमान माळव्यांतील लहान लहान नद्यांनाही सहन झाला नाहीं. आणि त्यांनीं ठिकठिकाणीं क. मॉन्सनच्या सैन्याला वाट न देण्याच्या आणि अडचणींत अडवून धरण्याच्या कामीं यशवंतराव होळकराला मदत केली. या मोहिमेंत चंबळा, चंबली आणि बनास, या तीन नद्यांनीं तर इंग्लिशाचें जितकें नुकसान केलें, तितकें त्यांचें नुकसान मोठमोठ्या सेनापतींनाही करतां आलें नसतें. या नद्यांनीं एकहि तोफ इंग्लिशांच्या सैन्यावर न उडवितां इंग्लिशाच्या किती तरी तोफा आपल्या चिखलांत आणि पाण्यांत बुडवून निरुपयोगी करून टाकल्या. आणि या नद्यांनीं इंग्लिशांच्या एकाहि शिपायावर बंदूक न झाडतां त्यांच्या कित्येक शिपायांना आपल्या प्रवाहामधून वाहवून थेट यमुना नदीच्या पाण्यामध्यें नेऊन सोडिलें. क. मॉन्सन याच्या सैन्याची या वेळीं जी पिछेहाट चालली होती, त्यात त्या सैन्यातील शिपायांना यशवंतराव होळकराच्या लष्करांतील बंदुकांच्या गोळ्या आणि पावसाच्या धारा या दोन्हीहि सारखाच मार देत होत्या. अशा प्रकारच्या या पावसाळी हवेचा फायदा घेऊन तर यशवंतराव होळकरानें इंग्लिशांच्या फौजेला जेरीस आणलेंच होतें. पण त्याशिवाय त्यानें आणखींहि कारणें उपस्थित केलीं होतीं. नेपोलियनच्या सैन्याला कोठेंहि दाणावैरण मिळूं नये, म्हणून रशियन लोकांनीं ज्याप्रमाणें आपले गांवचे गांव जाळून टाकिले होते, त्याप्रमाणे इंग्लिशांचें सैन्य ज्या मुलखांतून जावयाचें त्याच्या आसपासचीं गावें होळकरानें आपल्या लूटफाटीनें उजाड करून टाकिलेलीं होतीं. त्यामुळें इंग्लिशांना अन्नसामग्री मिळण्याचीही अतिशय पंचाईत पडूं लागली. आणि त्यामुळें पावसांत भिजून थंडीनें कुडकुडावें आणि अन्नावांचून भुकेनें तडफडावें, असा इंग्लिश सैन्यांतील शिपायांवर यशवंतरावानें प्रसंग आणून सोडिला होता. इंग्रजांचा दारूगोळा पावसांत भिजून गेला. तोफा चिखलांत रुतून राहिल्या त्या बाहेर निघेनात. आणि त्यांचें सामानसुमान नद्यांच्या पुरांनीं किती तरी ठिकाणीं वाहून गेलें. अशा स्थितींत होळकराच्या सैन्यांतील शिपाई तर इंग्लिशांना सडकून चोप देतच होते, पण त्याशिवाय होळकराच्या सैन्यातील नव्हेत असे आजूबाजूच्या डोंगराळ प्रदेशांतील भिल्ल वगैरे रानटी लोकहि इंग्लिशांच्या सैन्यावर हल्ले करूं लागले व त्यांचें सामानसुमान पळवून नेऊं लागले. अशी इंग्लिशांची या वेळीं फारच दुर्दशा झालेली होती. अशा स्थितींत त्यांच्या मदतीला दुसरा कोणी येईल, तर तीहि आशा उरलेली नव्हती. पूर्वी जेव्हां इंग्लिशांची चलती होती, तेव्हां आजूबाजूचा जो तो नेटिव्ह राजा इंग्लिशांना मदत करण्याकरितां पुढें येत होता. कोट्याच्या राजानें पूर्वी क. मॉन्सन याच्या मदतीला आपलें कांहीं सैन्य दिलें होतें, व मी कांहीं सैन्य पाठवितों असें जयपूरच्या राजाचेंहि आश्वासन होतें. पण क. मॉन्सन चंबळा नदीपासून माघारा वळून मागें पळत सुटला, त्या वेळीं त्याचा पाठलाग करतांना यशवंतराव होळकरानें आजूबाजूच्या

राजांवर आपली इतकी जरब बसविली कीं, त्यांपैकीं एकहि राजा इंग्लिशांना मदत करण्याकरितां पुढें आला नाहीं. ज्या कोट्याच्या राजानें क. मॉन्सनला पूर्वी सैन्याचा पुरवठा केला होता, त्याच कोट्याला ता. १२ जुलै १८०४ रोजीं क. मॉन्सन हा ज्या वेळीं पळतां पळतां मुक्कामाला आला, त्या वेळीं कोट्याच्या राजानें यशवंतराव होळकराच्या भीतीनें इंग्लिशांना आपल्या शहरामध्यें आश्रयाला येऊं दिलें नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यानें त्यांना अन्नसामग्रीचा पुरवठा करण्याचेंहि साफ नाकारलें. त्याचप्रमाणें जयपूरच्या राजाचीहि तीच वाट लागली. आमच्या जयपूरच्या राज्यांतील खुशालगड या ठिकाणीं तुम्ही येऊन पोहोंचलां असतां, आमच्या ५ पलटणी आणि २० तोफा तुम्हांला तेथें येऊन मिळतील, असा जयपूरच्या राजाचा क. मॉन्सन याला निरोप आलेला होता; परंतु क. मॉन्सन हा पळ काढतां काढतां जेव्हां खुशालगड येथें अत्यंत हालअपेष्टांच्या स्थितीमध्यें प्रत्यक्ष येऊन पोहोंचला, तेव्हां तेथें त्याला काय दिसलें ? तेथें त्या पलटणीहि नव्हत्या आणि त्या तोफाहि नव्हत्या. त्या तेथें येऊन आधींच निघून गेल्या होत्या, असें मॉन्सनला कळलें. असो. खुशालगड येथें जयपूरच्या राजाची मदत तर मॉन्सनला मिळाली नाहींच, पण दुसऱ्या एका नेटिव्ह संस्थानिकाच्या लष्कराकडून त्याच्यावर एक जबरदस्त संकट मात्र खुशालगड येथें ओढवलें. दौलतराव शिंदे हा जो इंग्लिशांचा कालचा शत्रु होता. तो सुर्जीअंजनगांवच्या तहानें आज इंग्लिशांचा मित्र झालेला होता; व ज्या दौलतराव शिंद्याचें सैन्य काल इंग्लिशांच्या विरुद्ध लढत होतें, ते त्यानें आज इंग्लिशांच्या बाजूनें होळकराच्या विरुद्ध लढण्याकरितां पाठविलें होतें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. परंतु हृदयाला भिनलेलीं शत्रुत्वें हीं तहांच्या तकलादी अटींनीं खऱ्या मित्रत्वामध्यें केव्हांहि परिणत होत नसतात. दौलतराव शिंद्याकडून क. मॉन्सनच्या सैन्याबरोबर आलेले बापूजी शिंदे हे आधींच इंग्लिशांची बाजू सोडून होळकराला जाऊन मिळाले होते. परंतु खुशालगड येथें दौलतराव शिंद्याचे दुसरे सरदार, सदाशिव भाऊ बक्षी, यांच्या हाताखालीं शिंद्याचें एक बरेंच मोठें लष्कर येऊन उतरलें होतें. व तें आपल्या मदतीकरितांच शिंद्यानें पाठविलें असलें पाहिजे, अशी क. मॉन्सन याची समजूत होती. पण तीहि चुकीची ठरली. आणि तेंही सैन्य इंग्लिशांवरच उलटलें. या अनेक उदाहरणांवरून यशवंतराव होळकरानें त्या वेळीं सगळीकडे आपली किती जरब बसविली होती, याची चांगलीच कल्पना येण्यासारखी आहे. नेटिव्ह राजे हे आपले दोस्त आहेत आणि ते आपल्याशीं नेहमीं इमानानें वागतील, अशी इंग्लिश राज्यकर्ते पुष्कळ वेळां फुशारकी मारीत असतात. परंतु हें म्हणणें व्यर्थ आहे. नेटिव्ह राजे झाले काय किंवा दुसरे कोणी झाले काय, या सगळ्या ताज्या घोड्याच्या गोमाशा आहेत. यांत इमानदारीचा अगदीं थोडा अंश असून हे सगळे राजे सत्तेचे आणि जबरदस्तीचे गुलाम आहेत. क. मॉन्सन जोरांत होता, तेव्हां हे त्याला मदत करण्याला धांवत होते, आणि आतां यशवंतराव होळकरानें आपली मर्दुमकी गाजविली, त्या वेळीं तेच सगळे नेटिव्ह राजे यशवंतरावाला वचकूं लागले. व त्याला मदत करण्याकरितां पुढें सरसावूं लागले. सारांश, हा सगळा कर्तबगारीचा आणि मर्दुमकीचा खेळ आहे.

या वेळीं यशवंतराव होळकरानें आपल्या बहादरीनें इंग्लिशांच्या बाजूच्या नेटिव्ह

राजांनाच फक्त आपल्याकडे ओढून घेतलें होते असें नसून, इंग्लिशांच्या हाताखालील नेटिव्ह पलटणींतील शिपायांचींहि अंतःकरणें त्यानें आपल्या पराक्रमानें आपल्याकडे आकर्षण करून घेतलीं होतीं. ता. १४ आगष्ट १८०४ रोजीं टोंकरामपुऱ्याहून आम्याकडे पिछेहाट करण्याला क. मॉन्सन यानें सुरवात केली, त्याच्या आधींच बापूजी शिंदे वगैरे सरदार आपल्या हाताखालील शिपायांसह होळकराला जाऊन मिळाले होते. पण टोंकरामपुऱ्याच्या मुक्कामानंतर इंग्लिशांच्या पलटणींतील शिपाई लोकहि इंग्लिशांचा पक्ष सोडून होळकराला येऊन मिळूं लागले. मेजर फ्रिथ याच्या हाताखालील पुष्कळ घोडेस्वार मुक्कामामुक्कामाला होळकराच्या छावणींत येऊन दाखल होऊं लागले होते. आणि खुशालगड येथें तर जे शिंद्याचे सदाशिवराव भाऊ बक्षीच्या हाताखालील लोक मॉन्सनला मिळावयाचे होते, ते तर त्याला मिळाले नाहींतच; पण खुद्द मॉन्सनच्या हाताखालील चौदाव्या पलटणींतील शिपाई मात्र त्याची नोकरी सोडून यशवंतरावाच्या पक्षाला येऊन मिळाले. असई, अलीगड, वगैरे ठिकाणच्या लढायांतून आपण असें पाहिलें कीं, शिंद्याच्या पलटणींना इंग्लिशांनीं लांच दिले आणि त्यामुळे शिंद्याच्या पलटणी इंग्लिशांना जाऊन मिळाल्या. पण येथें आपण त्याच्या अगदीं उलट देखावा पहात आहों. येथें होळकरानें इंग्लिशांच्या पलटणी फितविण्याकरितां एक कवडीहि खर्च केली नाहीं; आणि तरीहि इंग्लिशांच्या पलटणींतील शिपाई लोक आपण होऊन होळकराच्या सैन्यांत सामिल होऊं लागले, हा कशाचा परिणाम आहे ? हा सगळा केवळ यशवंतराव होळकराच्या एका पराक्रमाचा परिणाम आहे.हा राजा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां मोठ्या हिंमतीनें लढत आहे, असें पाहिल्यानंतर कोणाचीं अंतःकरणें त्याच्या पक्षाकडे धांव घेतल्यावांचून राहाणार आहेत ? देशांतील सर्व लोक आणि सर्व पैसा आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याकरितां जो जीवावर उदार होऊन उभा रहातो, त्याचाच आहे. त्याला कशाचीही उणीव नाहीं. सर्व लोक आपली भक्ति आणि आपली शक्ति त्याच्या चरणीं वाहून त्याच्या जीवाला जीव देण्याकरितां तयार होतात. यशवंतराव होळकर हा त्या वेळीं अशा प्रकारचा एक पराक्रमी पुरुष निघाला. आणि त्यामुळें सर्व शिपाई त्याच्या पक्षाकडे वळूं लागले. नेपोलियन बोनापार्ट हा आपल्या शिपायांना जो इतका प्राणप्रिय झाला होता, तो देखिल त्याच्या अंगच्या याच गुणामुळें होय. चंबळानदीपासून बनासनदीपर्यंत आणि मोकंदऱ्याच्या खिंडीपासून तों बियानाच्या खिंडीपर्यंत ता. ८ जुलैपासून ता. २८ आगष्टपर्यंत एकसारखा सुमारें पावणेदोन महिने मॉन्सनचा यशवंतराव होळकरानें जो पाठलाग केला, त्या सगळ्या पाठलागामध्यें यशवंतराव हा आपल्या सैन्याबरोबर हजर होता; आणि प्रत्येक लढाईंत आपल्या सैन्याबरोबर तो लढत होता. आपण खुशाल मखमालीच्या गाद्यांवर लोळत राहून आणि सेनापतीच्या कामावर दुसरें सरदार नेमून वाऱ्यावर वरात आणि भुसावर चिठी अशा रीतीनें त्यानें हा पाठलाग केला नाहीं. जेथून तोफेंतून गोळे फेकले जात होते, तेथें यशवंतराव हजर होता आणि जेथें इंग्लिशांच्या तोफांचे गोळे येऊन पडत होते तेथेंही यशवंतराव हजर होता. तो घोड्यावर बसून आपल्या घोडेस्वारांबरोबर दौड करीत होता; आणि आपल्या पायदळाबरोबर पायानें शत्रूच्या गोटांत घुसून त्यांच्या पलटणी कापून काढीत होता. तो पावसांत भिजत होता, चिखलांत

रुतत होता आणि थंडीनें कुडकुडत होता; पण इतक्याहि संकटांतून तो शत्रूला जेरीस आणीत होता. क. मॉन्सन पुढें आणि यशवंतराव होळकर त्याच्या पाठीमागें, अशी ही लांडगेतोड यशवंतरावानें एकसारखी सुमारें २०० मैलपर्यंत चालविली होती. इंग्लिशांचें सैन्य दमून-भागून विश्रांतीसाठीं कोठें तळ देऊं लागलें, कीं तेथून त्यांना हुसकून लावण्याकरितां होळकराचे घोडेस्वार तेथें आलेच. इंग्लिशांचे शिपाई एखादी पाण्यानें दुथडी भरून चाललेली नदी उतरून जाण्याचा प्रयत्न करूं लागले, कीं त्यांना त्या नदीमध्यें जलसमाधि देण्याकरितां होळकर आपल्या शिपायांसह त्या नदीच्या कांठीं नेमका हजर. इंग्रजांना मागें पळतांना आधीं कोठें रसद मिळतच नव्हती, पण यदाकदाचित् कोठें मिळालीच, तर ती त्यांच्यापासून लुटून घेण्याला यशवंतरावाच्या घोडेस्वारांनीं त्यांना गराडा दिलाच. अशा दक्षतेनें यशवंतराव होळकर या वेळीं लढत होता. बुंदेलखंडांत याच सुमाराला यशवंतरावानें आपला सरदार अमीरखान याला पाठविलें होतें, हे पूर्वीं सांगितलेंच आहे. तो अमीरखान बुंदेलखंडांत आणि यशवंतराव होळकर माळव्यात, अशा दोघांनी दोहोंकडून मिळून या वेळी इंग्लिशांच्या तोंडचें पाणी पळविलें होतें. व हिंदुस्थानांतील सर्व मुत्सद्दी आणि राजकारणी लोक यशवंतरावाकडे मोठ्या कौतुकानें आणि मोठ्या आशेनें पाहूं लागले होते. दक्षिणेकडून येणारा क. मरे याला त्यानें एका साध्या युक्तीनेंच भेवडावून माघारें लाविलें होते. आणि क. मॉन्सन याच्याशीं तर प्रत्यक्ष लढाया करूनच त्यानें त्याला इतकी दशहत बसविली होती कीं, त्यामुळें क. मॉन्सन हा एकदां जो पळूं लागला, तो होळकराशीं तोंडाला तोंड देऊन लढण्याकरितां फारच थोडा उभा राहिला. पाठीवर होळकर आला कीं, मॉन्सनसाहेब पुढें निघालाच. असें शौर्य क. मॉन्सन यानें या लढाईंत ठिकठिकाणीं दाखविलें ! यशवंतराव होळकरानें या वेळीं इंग्लिशांच्या विरुद्ध जो पराक्रम गाजविला, तशा प्रकारच्या पराक्रमाचे वर्णन करण्याचे प्रसंग इंडियन इतिहासकारांना फारच थोडे सांपडतात, व त्यामुळे अशा वीर पुरुषांचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच होईल, असें कोणालाहि वाटणें अगदीं सहाजिक आहे. आपल्या पूर्वीच्या इतिहासांत यशवंतराव होळकराच्या तोडीचें फक्त एकच उदाहरण आहे; आणि तें धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांचें होय. अवरंगजेब बादशाहा आपलें मोठें थोरलें सैन्य घेऊन महाराष्ट्रामध्यें आला व त्यानें संभाजीचा खून केला, या शोकजनक गोष्टीनंतर धनाजी आणि संताजी या दोघां वीर पुरुषांनीं मिळून अवरंगजेबाच्या अवाढव्य सैन्याची मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या लढाईनें जी दुर्दशा उडविली ती आणि क. मॉन्सन यांच्या सैन्याची यशवंतराव होळकरानें जी दुर्दशा उडविली ती, अशीं हीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील दोन उदाहरणें अत्यंत स्फूर्तिदायक आणि वीर्योत्पादक आहेत, यांत संशय नाहीं.

यशवंतरावानें या वेळीं अलोट धैर्याचीं जीं अनेक कृत्यें केलीं, त्यांचें हें सामान्य वर्णन याप्रमाणें येथपर्यंत देण्यांत आलें आहे. आतां त्या गोष्टींच्या विशेष वर्णनाकडे आपण वळूं. क. मॉन्सन हा कोट्याहून निघून चंबळा नदीच्या कांठच्या रामपुऱ्याच्या जवळ येऊन पोंचेपर्यंत त्याच्या ज्या हालचाली झाल्या, त्या पुढील कोष्टकावरून थोडक्यांत चांगल्या लक्षांत येण्यासारख्या आहेत.

| सेनापतीचें नांव | ठिकाणाचें नांव | दोन ठिकाणां-मधील अंतराचे मैल | तारीख | वर्णन |
|---|---|---|---|---|
| क. मॉन्सन | कोटा | | जून | |
| व क. डॉन | मोकंदरा | कोटा ते मोकं-दरा ३० मैल | २८ जून | मोकंदरा सोडतो |
| | सोनारा | मोकंदरा ते सोनारा २० मैल | | |
| सिंक्रेअर | हिंग्लजगड | मोकंदरा ते हिंग्लजगड ५० मैल | २ जुलै | हस्तगत करतो |
| क. मॉन्सन | पिंपळा | | | |
| | गुरी | पिंपळ ते गुरी १८ मैल | ७ जुलै | येथून क. मॉन्सन ता. ८ जुलै रोजीं परत फिरतो |
| | रामपुरा | गुरी ते राम-पुरा ७ मैल | | |

या वरील कोष्टकांत दाखविल्याप्रमाणें क. मान्सन हा ता. ७ जुलै रोजीं गुरी येथें येऊन पोंचल्यानंतर होळकर चंबळा नदी उतरून अलीकडच्या कांठावर आल्याची बातमी त्याला रात्रीं ९ वाजतां कळली. याच ठिकाणीं त्याला दुसरीहि अशी बातमी कळली कीं, क. मरे हा जो आपल्या मदतीला दक्षिणेकडून येणार होता, तो पुढें येऊं शकत नसून त्यानें आपला मोर्चा मही नदीच्या पाठीमागें वळविला आहे. याशिवाय आणखी एक अशी स्थिति होती कीं, क. मॉन्सन याच्या जवळची अन्नसामग्री फक्त दोन दिवसांपुरतीच उरलेली होती. रामपुराला आपण गेलों म्हणजे आपल्याला तेथें अन्नसामग्री पुष्कळ मिळवितां येईल, असा त्याचा अंदाज होता. परंतु रामपुरा मागें टाकून आणि चंबळा नदी उतरून होळकर आपल्यावर स्वारी करण्याकरितां येत आहे, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्याचा धीर खचून गेला. क. मरे मदतीला येत नाहीं; हिंग्लजगड घेण्याकरितां गेलेलें सैन्य येऊन मिळणार होतें तें मिळालें नाहीं; अन्नसामग्री जवळ नाहीं; आणि होळकराचे सैन्य फार मोठें असल्यामुळें त्याच्याशीं तोंड देण्याची ताकद आपल्यामध्यें नाहीं;

या भयंकर स्थितीचें चित्र क. मॉन्सन याच्या डोळ्यांपुढें उभें राहून त्यानें परत फिरण्याचा निश्चय केला. त्याच्या सैन्याबरोबर शिंद्यांचे सरदार बापूजी शिंदे हे होते. त्यांनीं परत फिरण्याचा सल्ला दिला, म्हणून क. मॉन्सन हा माघारा फिरला, असें कित्येक इंग्रजी ग्रंथकारांचें म्हणणें आहे. बापूजी शिंदे हा आंतून यशवंतराव होळकराला फितुर होता आणि म्हणून त्यानें मॉन्सनला मुद्दाम असा सल्ला दिला, असा इंग्लिशांचा आक्षेप आहे. दौलतराव शिंदे हा होळकराच्या विरुद्ध इंग्लिशांना मदत करण्याला तहाच्या अटीपलीकडे मनापासून फारसा उत्सुक होता असें नाहीं, व ही गोष्ट त्याच्या सरदारांच्या वर्तनावरूनहि दिसून येते. शिंद्यांचे एक सरदार सदाशिवराव भाऊ बक्षी हे खुशालगड येथें असूनहि त्यांनीं ता. २५ आगष्ट १८०४ रोजीं क. मॉन्सन याला बिलकूल मदत केली नाहीं. त्याचप्रमाणें ता. १२ जुलै १८०४ रोजीं खुद्द बापूजी शिंदे हेहि क. मॉन्सनचा पक्ष सोडून कोट्याच्या मुक्कामीं होळकराला जाऊन मिळाले. या सगळ्या पुढें झालेल्या हकीकतीवरून ता. ७ जुलै रोजीं तुम्हीं मागें फिरावें असा सल्ला बापूजी शिंद्यांनीं क. मॉन्सन याला दिला नसेलच, असें नाहीं. पण त्या वेळची तशी परिस्थिति पाहून बापूजी शिंद्यांनीं परत फिरण्याबद्दल आपला सल्ला दिला असला, तर त्यांत गैर तें काय केलें ! खुद्द क. मॉन्सनला जें वाटत होतें, तेंच बापूजी शिंद्यांना वाटलें, तर त्यांत बापूजी शिंद्यांचा गुन्हा तो काय झाला ? बरें, बापूजी शिंदे होळकराला फितूर होऊन त्यांनीं असा सल्ला दिला अशी क्षणभर कल्पना केली, तरी असईच्या लढाईच्या वेळीं शिंद्यांचीं सबंध पलटणेंच्या पलटणें फितूर करणाऱ्या इंग्लिशांनीं याबद्दल आतां कोणत्या तोंडानें तक्रार करावी बरें ? शिवाय बापूजी शिंद्यांनीं लाख सल्ले दिले, तरी क. मॉन्सननें तें ऐकले काय म्हणून, हा प्रश्न शिल्लक रहातोच. सारांश, या पिछेहाटीचें खापर इंग्लिश इतिहासकार दुसऱ्या कोणाच्या तरी डोक्यावर फोडण्याचा कितीहि प्रयत्न करीत असले, तरी क. मॉन्सन हा या वेळीं होळकराच्या पुढें गर्भगळीत होऊन गेला, या खऱ्या गोष्टीवर त्यांना पांघरूण घालतां येणें शक्य नाहीं.

येथपर्यंत इंग्रजी इतिहासकारांनीं बापूजी शिंदे यांच्या या वेळच्या वर्तनाच्या संबंधानें जी हकीकत लिहिली आहे, ती क्षणभर खरी धरून तिच्या संबंधाचा ऊहापोह करण्यांत आलेला आहे. परंतु ही इंग्रजी इतिहासकारांची हकीकतच मुळांत खरी नाहीं. वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. ता. १८ आक्टोबर १८०४ रोजीं दौलतराव शिंदे यांनीं मार्क्विस वेलस्ली यांना जें एक पत्र लिहिलें आहे, त्या पत्रांत इतर अनेक गोष्टींच्या उल्लेखाबरोबर या बापूजी शिंद्यांच्या फितूरीचाहि उल्लेख आलेला आहे. त्यासंबंधानें दौलतराव शिंदे पुढीलप्रमाणें लिहितात:—

" मी बापूजी शिंदे आणि सदाशिवराव भाऊ बक्षी यांना असे हुकूम पाठविले कीं, तुम्ही आपल्याबरोबर १० हजार घोडेस्वार आणि ६।७ पायदळाच्या पलटणी घेऊन ज. लेक यांना जाऊन मिळावें. त्या वेळीं त्यांच्या हाताखालील लष्कराला पगार पोंचलेला नसल्यामुळें त्यांतील शिपायांची पैशावांचून जरी फार ओढाताण झाली होती, तरी ज. लेक यांच्या इंग्रजी सैन्याला आपण जाऊन मिळालों, म्हणजे इंग्लिश सेनापती पैशाची कांहीं तरी तजवीज करतील, अशा अदमासानें एक क्षणाचाहि विलंब न लावितां ते कोट्यास

जाण्याकरितां निघाले. परंतु पुढें बापूजी शिंदे यांना असें आढळून आलें कीं, इंग्लिशांकडून पैशाची मदत होत नसल्यामुळें पैशावांचून इतकें लष्कर आपल्याजवळ ठेवणें शक्य नाहीं. तेव्हां सगळे घोडेस्वार आणि बरेंचसें पायदळ आपल्याबरोबर घेऊन तुम्हीं दुसरीकडे कोठें तरी जावें आणि या लोकांच्या पोटापाण्याची सोय पहावी, असा सदाशिवराव भाऊ बक्षी यांना बापूजी शिंदे यांनीं हुकूम केला. त्याप्रमाणें ते दुसरीकडे कोठें तरी आपलें सैन्य घेऊन निघून गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं एकदां ( ता. ८ जुलै १८०४ ) यशवंतराव होळकराशीं लढाई देण्याचा प्रसंग येऊन ठेपला. त्या वेळीं क. मॉन्सन हा आपल्या जवळच्या पायदळासह मागें राहिला; आणि बापूजी शिंदे व मि. ल्यूकन यांना होळकराशीं तोंड देणें भाग पडले. या लढाईंत बापूजी शिंदे यांच्याकडील ७०० लोक मरण पावले व त्याचें पुष्कळ सामानसुमान लुटले गेले. या लढाईंत क. मॉन्सन यानें मुळींच भाग घेतला नाहीं आणि उलट आपल्या जवळच्या पायदळानिशीं धांदलीधांदलीनें तो कोट्याला पळून गेला. पुढें कोट्यास आल्यावर तेथेंहि त्याच्यानें दम धरवेना. तेव्हां कांहीं नावा गोळा करून तो चंबळा नदी उतरून पलीकडे गेला. त्या वेळीं बापूजी शिंदे यांनीं असें सांगितलें कीं, तुमचें सैन्य उतरून पलीकडे गेलें म्हणजे त्या नावा आम्हाला द्या, म्हणजे आमचेंही सैन्य त्यांतून उतरून पलीकडे येईल. परंतु क. मॉन्सन यानें त्या नावा परत पाठविल्या नाहींत. त्यामुळें बापूजी शिंदे यांना कोटा येथेंच राहणें भाग पडलें. इतक्यांत होळकराचें सैन्य पाठीमागून आलेंच; व बापूजी शिंद्याच्या लष्कराला वेढून टाकण्याचा त्यांचा विचार चालला होता. त्या वेळीं कोट्याचा राजा जालिमसिंग यानें बापूजी शिंद्यांना असा निरोप पाठविला कीं, तुम्ही यशवंतराव होळकराकडे जाऊन त्याची मुलाखत घेतली नाहीं, तर तुमच्या प्राणावर प्रसंग बेतण्याची पाळी आहे. त्यामुळें बापूजी शिंदे मोठ्या चिंतेत पडले; ज्या इंग्रजांच्या मदतीला आपण आलों, त्यांच्याकडून आपल्याला कांहीं एक मदत मिळत नाहीं; आणि उलट होळकर तर आपल्या सैन्याचा नाश करण्याकरितां आपल्याजवळ येऊन ठेपला आहे. अशा अडचणींत सांपडल्यामुळें निरुपाय होऊन अखेरीस बापूजी शिंदे यांना होळकराच्या स्वाधीन होणें भाग पडलें."

अशी खुद्द दौलतराव शिंदे यांनीं या प्रकरणाची दिलेली खरी हकीकत आहे. इंग्लिशांनीं बापूजी शिंद्यांना पैशाची मदत केली नाहीं ती नाहींच, पण नुसत्या नावा पाठवून त्यांचें सैन्य चंबळेच्या अलीकडे उतरवून आणावयाचें एवढेंहि सत्कृत्य त्यांच्या हातून झालें नाहीं. आणि फिरून बापूजी शिंदे हे होळकराला फितूर झालेले होते, असा त्यांच्यावर आरोप करावयाचा, या विचारसरणीला काय म्हणावयाचें! बापूजी शिंदे हे जर पहिल्यापासूनच होळकराला फितूर होते आणि म्हणूनच त्यांनीं क. मॉन्सनला गुरीच्या मुक्कामावरून परत फिरण्याचा सल्ला दिला होता, असें असतें, तर गुरीच्या लढाईंत बापूजी शिंदे यांनीं आपलें इतकें नुकसान कां करून घेतलें असतें? सारांश, दौलतराव शिंदे यांच्या या पत्रावरून हें उघड दिसून येतें कीं, बापूजी शिंदे यांच्याकडे या प्रकरणांत कांहीं एक दोष येत नसून क. मॉन्सन यानें आपल्याच भित्रेपणामुळें आणि घाबरटपणामुळें हा प्रसंग आपणावर ओढवून घेतला. पण ही गोष्ट आपल्याला जी स्पष्टपणें सिद्ध करतां येत आहे,

ती दौलतराव शिंदे यांच्या पत्रामुळेंच होय. यावरून या सगळ्या लढायांच्या बाबतींत आपल्या बाजूच्या खऱ्या हकिकतींची किती आवश्यकता आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येण्याजोगें आहे. परंतु त्याच्या अभावीं, आज इंग्लिश ग्रंथकार लिहितील तेंच खरें, अशी दुर्दैवानें स्थिति झालेली आहे.

असो. अशा रीतीनें परत फिरण्याचा निश्चय कायम झाला. व ता. ८ जुलैच्या पहांटेस ४ वाजतांच सर्व सामानसुमान सोनारा या गांवीं माघारें रवाना करण्यांत आलें. व सकाळीं ९ वाजल्यानंतर खुद्द क. मॉन्सन हाहि आपल्या मुख्य सैन्यासह परत जाण्याकरितां निघाला. परंतु होळकर पाठीमागून केव्हां येईल आणि आपल्या मुख्य सैन्याच्या पिछाडीवर केव्हां घाला घालील, याचा कांहीं नेम नव्हता. म्हणून बापूजी शिंदे आणि ले. ल्यूकन यांच्या हाताखालीं कांहीं घोडेस्वार मात्र आपल्या पिछाडीच्या संरक्षणासाठीं क. मॉन्सनकडून मागें ठेवण्यांत आले होते; व आपलें मुख्य सैन्य पुढें निघून गेल्यानंतर अर्ध्या तासानें या मागें ठेविलेल्या सैन्यानें त्या छावणीवरून निघावें, असा त्यांना हुकूम देण्यांत आलेला होता. अशी व्यवस्था करून क. मॉन्सन पुढें निघून गेला नाहीं, तोंच होळकराचे २० हजार घोडेस्वार येऊन त्यांनीं ले. ल्यूकनच्या तुकडीवर हल्ला केला, व त्या तुकडींतील सगळ्या घोडेस्वारांना यशवंतरावानें कापून काढिलें. या लढाईंत खुद्द ले. ल्यूकन यालाहि जखमा लागून त्याला होळकरानें कैदी म्हणून पकडलें. या ले. ल्यूकनचा पूर्व इतिहास असा आहे कीं, हा पूर्वीं दौलतराव शिंद्याच्या नोकरीला होता. पुढें तो फितूर होऊन त्यानें शिंद्याची नोकरी सोडली आणि तो इंग्लिशांच्या पक्षाला येऊन मिळाला. हा शिंद्याच्या नोकरींत असतांना त्याला अलीगडच्या किल्ल्याच्या आतील वाटांची वगैरे सर्व बारीकसारीक माहिती झालेली होती. तिचा सर्व फायदा त्यानें विश्वासघातानें इंग्लिशांना दिल्यामुळेंच त्यांना अलीगडचा किल्ला हस्तगत करून घेतां आला. ले. ल्यूकन यानें हें जे विश्वासघाताचें पातक केलें होतें, त्याचे प्रायश्चित्त त्याला या ठिकाणीं मिळालें. ल्यूकननें शिंद्याशीं केलेल्या फितुरीचें शासन परमेश्वरानें त्याला होळकाराच्या हातून ताबडतोब देवविलें. ल्यूकन हा ता. ८ रोजीं गुरी येथे कैद झाल्यानंतर कोट्याच्या मुक्कामावर आपल्या जखमांच्या वेदनांनीं मरण पावला. परंतु त्याला विषप्रयोग करून कदाचित् मारण्यांत आलें असावें, असा एक अपवाद इंग्लिश ग्रंथकारांकडून उल्लेखिला जातो. यशवंतरावानें इंग्लिशांना या वेळीं इतकें नामोहरम केल्यामुळें संतापून जाऊन ज्या लेखकांनीं त्याला Plunderer, Murderer, Monster, अशीं विशेषणें लावण्याला कमी केलें नाहीं, त्यांच्या दृष्टीनें विषप्रयोगाचा आरोप करणें यांत कांहीं मोठेंसें आहे असें नाहीं. शिवाजीला खुनी, डाकू, दरवडेखोर, हीं विशेषणें जशीं लावण्यांत येतात, तशींच तीं यशवंतरावालाहि लावण्यांत येऊं लागलीं होतीं, यावरून यशवंतराव होळकर हा इंग्लिशांना किती जाचक झाला होता, याची कोणालाहि योग्य कल्पना करतां येण्यासारखी आहे. जो ले. ल्यूकन आपल्या स्वतःच्या जखमांनींच मरणोन्मुख झालेला होता, त्याला मारण्यासाठीं दुसऱ्यानें विष देण्याची अवश्यकता असेल, असें दिसत नाहीं. तरी पण इंग्लिश ग्रंथकारांनीं या गोष्टीचा जो उल्लेख केलेला आहे, त्यावरून त्यांच्या मनाचा अनुदारपणा मात्र चांगला दिसून येतो.

क. मॉन्सन हा गुरी येथून सुमारें १२ मैल माघारा गेला असेल नसेल, तोंच त्याला ले. ल्यूकनच्या पराभवाची बातमी समजली, व या बातमीच्या पाठीमागून थोड्याच वेळामध्यें खुद्द बापूजी शिंदे हेहि येऊन दाखल झाले, व गुरीच्या लढाईंत आपल्या मागें ठेविलेल्या लष्कराचा कसा पराभव झाला, याची इत्थंभूत हकीकत क. मॉन्सन याला त्यांचेकडून समजली. ही बातमी जेथें समजली, तेथें त्यानंतर पुढें जास्त वेळ थांबण्यांत कांहीं फायदा नव्हता. उलट होळकर मागून येऊन ले० ल्यूकनप्रमाणें आपल्यावरहि धाड घालील कीं काय, अशी भीति होती. त्यामुळें क. मॉन्सननें सोनारा येथें पळून जाण्याचा निश्चय केला. तेथें पुढें पाठविलेलें सामानसुमान आधींच सुरक्षित जाऊन पोहोंचलें होतें. आणि मागून थोड्या वेळानें क. मॉन्सन हाहि सोनारा येथें ता. ८ जुलै रोजीं संध्याकाळीं जाऊन पोहोचला व दुसऱ्या दिवशीं पहांटेस ४ वाजतां तेथून निघून ता. ९ जुलै रोजीं दुपारीं त्यानें मोकंदऱ्याची खिंड गांठली. येथें आपल्याला अन्नसामग्री मिळेपर्यंत ही खिंड अडवून ठेवण्याचा त्याचा विचार होता. पण तेथें तो असतांना त्याच्या मागोमाग ता. १० जुलैच्या सकाळीं होळकराची कांहीं फौज तेथें येऊन पोचली. व ती दुसऱ्या दिवसाच्या म्हणजे ता. ११ जुलैच्या दुपारपर्यंत एकसारखी वाढतच चालली होती. अशा रीतीनें सगळी फौज येऊन पोहोंचल्यानंतर होळकरानें मॉन्सनला असें एक पत्र लिहिलें कीं, तुम्ही आपल्या हातांतील शस्त्रें खालीं ठेवून सगळ्या सैन्यानिशीं शरण या ! परंतु ही गोष्ट क. मॉन्सन याला मान्य न होऊन लगेच लढाईला सुरवात झाली. होळकरानें आपल्या सैन्याचे तीन विभाग केले व इंग्रजाच्या सैन्यावर डावीकडून, उजवीकडून आणि पुढून असे तीन बाजूंनीं हल्ले सुरू केले. या वेळीं क. मॉन्सनचें सैन्य मोकंदऱ्याच्या खिंडीमध्यें सापडलेलें होतें. अशा कचाटींत सापडलेल्या सैन्याच्या पिछाडीकडे कांहीं सैन्य पाठविण्यांत आलें असतें आणि खिंडींतून पलीकडे जाण्याचा क. मॉन्सनचा रस्ता अडवून टाकण्यांत आला असता, तर त्या हालचालीचा जास्त परिणाम झाला असता; व असें कदाचित् करण्यांत येईल, अशी क. मॉन्सनलाहि भीति वाटत होती आणि यशवंतराव होळकरानें कदाचित् तसें केलेंहि असतें. परंतु त्याच्या तोफा आणि पायदळ हीं अद्यापि येऊन पोंचावयाचीं होतीं. तीं येईपर्यंत थांबावें, तर कदाचित् क. मॉन्सन हा आपल्या हातून निसटून पळून जाईल, म्हणून आपल्या जवळच्या घोडेस्वारांनिशींच लढाई सुरू करणें यशवंतरावाला भाग पडलें. ही लढाई त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत चालली होती. पण पुढें काळोख पडल्यानंतर लढाईचें काम चालूं शकेना. म्हणून त्यानें आपली फौज रणांगणावरून काढून पाठीमागें छावणीवर नेली. तेथें त्याचा मागें राहिलेला तोफखाना आणि पायदळ हीं रात्रीं येऊन पोंचलीं. त्यांच्या साह्यानें यशवंतराव दुसऱ्या दिवशीं फिरून इंग्लिशांच्या सैन्यावर हल्ला करणार, तों रात्रींच इंग्लिशांच्या सैन्यानें तेथून पोबारा केलेला होता. हें मोकंदऱ्याच्या घाटांतून निघालेलें सैन्य दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. १२ जुलै रोजीं कसेंबसें कोटयाला जाऊन पोहोंचलें. या वेळीं पाऊस अतिशय पडत होता. आणि वाटेनें जिकडेतिकडे चिखल झालेला होता आणि पाणी तुंबलेलें होतें. त्यामुळें कोटयाला पोंचेपर्यंत या सैन्याला वाटेनें त्रास तर झालाच, पण कोटयाला पोंचल्यावरहि त्यांचा त्रास कमी झाला असें नाहीं. आपण कोटयाला पोंचलों, म्हणजे तेथें

कोटयाचा राजा आपल्याला आश्रय देईल व आपल्याला अन्नसामग्रीचाहि पुरवठा लागेल तितका करून देईल, अशी इंग्लिशांना आशा वाटत होती. पण ती सगळी निष्फळ झाली. कोटयाचा राजा होळकराच्या भीतीनें इतका भेदरून गेला होता कीं, त्यानें इंग्लिशांना आश्रय किंवा अन्नसामग्री देण्याचें बिलकुल नाकारलें. कोटयास जेव्हां रसद मिळेनाशी झाली तेव्हां सगळयाचीच पंचाईत पडली; व सैन्यांत पांगापांग सुरू झाली. सरदार बापूजी शिंदे हा कोटयापर्यंत क. मॉन्सनच्या सैन्याबरोबर सर्व हालअपेष्टा सोशीत इमानेंइतबारें चालला होता. पण त्याच्या सैन्यांतील लेकांना इंग्रजांकडून पगारहि मिळेना व अन्नसामग्रीचीहि तजवीज होईना, तेव्हां आपल्या सैन्यांतील लोक उपाशीं मरूं नयेत म्हणून त्यांच्यासह बापूजी शिंदे याला होळकराच्या सैन्याला जाऊन मिळणें भाग पडलें. इंग्लिश ग्रंथकार बापूजी शिंदे फितूर होऊन यशवंतरावाला मिळाला असें लिहितात; आणि इंग्लिशांपाशीं त्याच्या शिपायाना देण्याला अन्नसामग्री नव्हती, हें खरें कारण ते दडवून ठेवितात; या प्रामाणिकपणाला काय म्हणावें ? कोटयास रहावयास जागा नाहीं आणि खावयाला अन्न नाहीं, अशी स्वतः ज्या इंग्लिशांचीच स्थिति, ते बापूजी शिंद्याच्या शिपायांना खावयाला काय देणार हें दिसतेंच आहे.

कोटयास अशी स्थिति झाल्यामुळें क. मॉन्सन ताबडतोब तेथून ता. १२ रोजीं सकाळीं कोटयाच्या पुढील चंबळी नदीच्या कांठीं असलेल्या गनियान या नांवाच्या गांवीं जाण्याकरितां निघाला. कोटयाहून हें गांव जरी फक्त सुमारें ६।७ मैलच दूर होतें, तरी पावसामुळें आणि वादळामुळें मोठ्या प्रयासानें तो तेथें ता. १३ जुलै रोजीं जाऊन पोहोंचला. या ठिकाणीं हें सैन्य येऊन पोंचतें, तों नदी तुडुंब भरून चाललेली होती. म्हणून तें पाणी ओसरेपर्यंत आणि आजूबाजूच्या खेड्यांतून कांहीं रसद गोळा करीपर्यंत त्या सैन्यानें तेथें मुक्काम केला. व ता. १४ रोजीं ती नदी उतरून सैन्य पलीकडे गेलें. परंतु रस्त्यांत चिखल फार झाल्यामुळें तोफा चिखलांत रुतून गेल्या. व कितीहि प्रयत्न केले तरी त्या बाहेर निघेनात. त्या वेळीं त्या तोफांच्या कान्यांत खिळे मारून त्या तोफा वाटेंतच टाकून देणें भाग पडलें. अशा रीतीनें पाण्यानें आणि चिखलानें भरलेल्या प्रदेशांतून प्रवास करितां करितां ता. १७ जुलै रोजीं हें लष्कर चंबळी नांवाच्या एका नदीच्या कांठीं येऊन पोहोंचलें.

पाऊस, वादळ, पाणी, चिखल, नद्या आणि नाले, हीं सगळीं प्रक्षुब्ध झालेल्या सृष्टिदेवतेचीं सैन्यें या वेळीं होळकराच्या बाजूनें आणि इंग्लिशांच्या विरुद्ध लढण्याकरितां उभीं राहिलेलीं होतीं. तदनुरोधानें या चंबळीच्या लहानशा ओढ्यानेंहि मागून होळकरांचें सैन्य येऊन पोंचेपर्यंत इंग्लिशांना अडवून धरलें. या चंबळी नदींतून पलीकडे जाण्याला उतार मिळेना, म्हणून अलीकडच्या कांठावरच क. मॉन्सन याच्या सैन्यानें ता. १५ रोजीं तळ दिला. पुढें दुसरे दिवशींहि नदीचें पाणी कमी होईना. तेव्हां कांहीं युरोपियन गोलंदाज हत्तीवर बसून नदीच्या पलीकडे गेले. तेथून टोंकरामपुरा हें शहर जवळच असल्यामुळें ते ता. १८ जुलै रोजीं तेथें जाऊन पोंचले. परंतु बाकीचें सैन्य मात्र अलीकडच्या कांठावरच अडकून राहिलें. तों इतक्यांत पाठीमागून होळकराची फौज येऊन दाखल झालीच. इंग्र-

जांच्या फौजेपाशीं खावयाला अन्न नव्हतें; आणि त्यांतच होळकराच्या घोडेस्वारांनीं त्यांच्या भोंवतीं घिरट्या घालून त्यांच्यावर हल्ले करण्याला सुरवात केली. त्यामुळें इंग्रजी फौजेचें फारच नुकसान होऊं लागलें. रोज थोडे थोडे लोक लांकडांचे तराफे बांधून त्यावरून पलीकडे उतरत होते; परंतु अशा अडचणींत त्यांच्यावर हल्ले करून होळकरानें त्यांचें सामान लुटलें, सैन्य मारलें, आणि हत्ती, उंट, बैल वगैरे नदींत बुडविले. अशा संकटांतून शिल्लक राहिलेले लोक ता. २७ जुलैपर्यंत कसेबसे टोंकरामपुऱ्याला जाऊन पोंचले. कोट्यापासून टोंकरामपुऱ्यापर्यंतचें अंतर सुमारें ५० मैल आहे. पण हें इतकें थोडें अंतर चालून जाण्याला ता. १२ जुलैपासून ता. २७ जुलैपर्यंत इंग्लिशांना १५ दिवस लागले. यावरून या अवकाशांत भयंकर पावसाळा आणि त्याच्याहि पेक्षां जास्त भयंकर असा यशवंतराव होळकर या हिंदुस्थानांतील दोन सेनापतींनीं मिळून इंग्लिशांची किती हलाखी करून सोडली होती, याची कोणालाहि कल्पना करतां येण्यासारखी आहे.

ता. २७ जुलै रोजीं टोंकरामपुऱ्याला येऊन पोंचल्यानंतर मॉन्सननें तेथें बरेच दिवस मुक्काम केला. मॉन्सनच्या या पळापळीची आणि पिछेहाटीची बातमी आग्र्यास ज. लेक यांना आधींच कळली होती. त्यामुळें मे. फ्रिथ आणि क. मॅक्‌क्यूलक यांच्या हाताखालीं बरेंच सैन्य आणि दाणावैरण देऊन त्यांना क. मॉन्सनच्या मदतीला पाठविण्यांत आलें होतें. ही मदत त्याला ता. १४ ऑगष्ट रोजीं येऊन पोंचली. परंतु इतकी मदत पोंचली, तरी होळकराशीं तोंड देण्याचें त्याला धैर्य होईना. यशवंतराव होळकर आणि बापूजी शिंदे यांच्या फौजा त्याच्या मागोमाग येऊन दाखल झाल्या होत्या. व त्या इंग्लिशांना सर्व बाजूंनीं हैराण करून सोडीत होत्या. त्यांचा या नवीन आलेल्या मदतीनें प्रतिकार करण्याचें टाकून फिरून क. मॉन्सननें भीतीनें गांगरून जाऊन टोंकरामपुऱ्याहून निघून जयपूरच्या राज्यांतील खुशालगडपर्यंत आणखी मागें हटण्याचें ठरविलें. खुशालगड येथें सदाशिवरावभाऊ बक्षी यांच्या सैन्याचा तळ पडलेला होता. तें सैन्य आपल्याला मिळेल व जयपूरच्या राजाचें सैन्यहि आपल्या मदतीला धांवून येईल आणि अन्नसामग्री मिळण्याची तर मुळींच पंचाईत पडणार नाहीं, असें वाटून त्यानें ता. २१ आगष्ट रोजीं रामपुऱ्याचें शहर सोडलें. रामपुऱ्याहून खुशालगडला जाऊन तेथून पुढें आग्र्याला जावें, असा त्याचा विचार होता. टोंकरामपुऱ्यापासून आग्रा एकंदर सुमारें १०० मैल लांब आहे. हें अंतर चालून जाण्याला त्याला १० दिवस लागले. रामपुऱ्याहून तो निघाला, तों दुसऱ्या दिवशींच त्याला वाटेंत बनास नदी आडवी आली. या नदीला ता. २२ आगष्ट रोजीं इतका मोठा पूर आला होता कीं, पूर्वींच्या चंबळी नदींतून हत्तीवर बसून तरी कांहीं युरोपियन शिपायांना पलीकडे जातां आलें. पण या वेळीं या नदींत हत्तीहि जाण्याची सोय नव्हती. परंतु तेथें मोठ्या संकटानें तीन होड्या मिळाल्या. त्या होड्यांतून कॅ. निकोल्स याच्या हाताखालीं लष्कराचा खजिना आणि कांहीं शिपाई देऊन त्यांना पलीकडे पोंचतें करण्यांत आलें, व तेथून त्यांनीं पुढें एकदम खुशालगडला कूच करून जावें, असा त्यांना हुकूम देण्यांत आला. परंतु नदीचें पाणी उतरेपर्यंत बाकीचें सैन्य बनास नदीच्या अलीकडच्या किनाऱ्यावरच अड-

कूच पडलें. हें सैन्य येथें अडकून पडलें आहे, असें पहातांच होळकराचे घोडेस्वार त्यांच्या भोंवतीं घिरट्या घालूं लागले, व हल्ले करूं लागले. पुढें ता. २४ आगष्ट रोजीं नदीचें पाणी ओसरून नदींतून उतार मिळूं लागल्यानंतर इंग्लिशांचें सैन्य जेव्हां नदींतून पलीकडे जाऊं लागलें, तेव्हां तर होळकराच्या सैन्यानें शिकस्त करून सोडली. होळकराचे कांहीं घोडेस्वार इंग्लिश सैन्याच्या दोन्ही बाजूंनीं नदी उतरून पलीकडे गेले व त्यांनीं इंग्लिश सैन्यावर समोरून हल्ला करण्याला सुरवात केली. या वेळीं इंग्रजी फौजेंत फारच गोंधळ उडून गेला, पुष्कळ अंमलदार मारले गेले. आणि एक सबंध पलटणच्या पलटण येथें कापून टाकण्यांत आली. होळकराचे घोडेस्वार इंग्लिशांच्या फौजेंत त्या बनास नदीमध्यें असा कहर उडवून देत आहेत, इतक्यांत होळकराचा तोफखाना मागाहून येऊन पोहोंचला. आणि जेव्हां होळकराची तोफ सुरू झाली, तेव्हां तर फारच भयंकर प्रकार घडून आले. व या ठिकाणीं एकंदर इंग्लिशांचे पुष्कळच लोक मारले गेले. तेव्हां त्यांतून जे बाकी शिल्लक राहिले, त्यांना घेऊन क. मॉन्सन ता. २४ रोजीं रात्रीं कसाबसा खुशालगड येथें आपला जीव घेऊन आला. परंतु त्याला आपल्या बरोबरचें सगळें सामानसुमान बनास नदीच्या कांठींच टाकून द्यावें लागलें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खुशालगड येथें सदाशिवराव भाऊ बक्षी यांच्या हाताखालील शिंद्याची फौज होती. पण ही फौज मॉन्सनला न मिळतां ती त्याच्या विरुद्धच लढूं लागली. त्यामुळें खुशालगडबद्दल त्याला जी आशा वाटत होती, तिचीहि निराशा झाली. जयपूरच्या राजांकडील मदत तेथें मिळण्याची होती, ती आशाहि निष्फळ ठरली. शिवाय खुशालगड येथें दुसऱ्यांची फौज येऊन मिळणें तर लांबच राहिलें, पण खुद्द मॉन्सनच्या हाताखालीं जें हिंदुस्थानी सैन्य होतें, त्याच्यांतच फाटाफूट आणि फंदफितुरी जोरानें चालू असल्याचें उघडकीस आलें. क. मॉन्सनच्या सैन्यांतलि नेटिव अंमलदार आणि यशवंतराव होळकर यांच्या दरम्यान सुरू असलेला कांहीं पत्रव्यवहार पकडला जाऊन तो क. मॉन्सनच्या पुढें मांडण्यांत आला. तेव्हां त्या बाबतींत जरी कडक उपाय योजण्यांत आले, तरीदेखील हिंदुस्थानी घोडेस्वारांपैकीं आणि पायदळापैकीं पुष्कळ शिपाई इंग्रजांची नोकरी सोडून होळकराला येऊन मिळाले. अशा रीतीनें ही संकटपरंपरा वाढत जाऊं लागल्यामुळें मॉन्सनचा धीर अगदींच सुटला. व ता. २६ आगष्ट रोजीं संध्याकाळीं ७ वाजण्याच्या सारख्या आडवेळेलाच त्याला खुशालगड सोडून निघणें भाग पडलें. जवळचें सामानसुमान आधींच बनास नदींत टाकून देण्यांत आलें होतें, आणि आतां ज्या कांहीं जड जड तोफा बरोबर होत्या त्यांच्याहि कान्यांत खिळे मारून त्या येथें टाकून देण्यांत आल्या. व आपल्या फौजेचा एक लांबट चौकोन करून तो बंदोबस्तानें कूच करूं लागला. ही बातमी मराठ्यांना कळतांच होळकराचे वीस हजार घोडेस्वार त्याच्या पिछाडीवर येऊन पडले व त्यांनीं कापाकापी सुरू केली; आणि इंग्रजांच्या सैन्याला फारच हैराण करून सोडलें. मराठ्यांनीं हा पाठलाग दुसऱ्या दिवशींहि तितक्याच जोरानें चालविला होता. तशाच स्थितींत कूच करतां करतां क. मॉन्सन ता. २७ आगष्ट रोजीं संध्याकाळीं हिंदौन शहराला येऊन पोहोंचला.

परंतु तें शहर मराठ्यांनीं आधींच आपल्या ताब्यांत घेऊन ठेविलेलें होतें. त्यामुळें क. मॉन्सन याला कोठें राहाण्यालाहि जागा मिळेना. तो एका जुन्या गढींत थोडा वेळ राहिला. व तो रातोरात तेथून निघाला. मराठे त्याच्या पाठीमागें होतेच. रात्रीच्या काळोखांतहि जरी ते इंग्रजांवर हल्ले करीत होते, तरी दिसूं लागल्यानंतर त्यांचा जोर जास्त वाढला. ता. २८ रोजीं सकाळीं इंग्लिशांचें सैन्य एका ओढयांतून पलीकडे जात असतां होळकराच्या फौजेनें त्यांना चारहि बाजूंनीं गांठलें. आणि उंटांवरील तोफा, बंदुका व जेजाला यांचा मारा होळकरानें सुरू केला. त्यामुळें इंग्लिशांचें सैन्य अगदीं जेरीस आलें. व या हल्ल्यांतून आपले प्राण वांचणें कठिण आहे, असें त्यांना वाटूं लागलें. तरी पण त्यांतूनच ते वाट काढीत चालले होते; व होळकराचे लोक त्यांच्यावर हल्ले करीत पाठीमागून चालले होते. अशा रीतीनें जातां जातां क. मॉन्सन बियानाच्या खिंडीमध्यें ता. २८ आगष्ट रोजीं संध्याकाळीं येऊन पोहोंचला. येथें आपल्या सैन्याला विसांवा द्यावा, अशी मॉन्सनची इच्छा होती. पण तशी व्यवस्था तो करणार, इतक्यांत होळकराचे घोडेस्वार कांहीं तोफा घेऊन बियानाच्या खिंडींत येऊन दाखल झाले. तेव्हां विश्रांति बाजूलाच राहून इंग्रजी सैन्याला तेथूनहि पळ काढावा लागला. तें सैन्य पळतां पळतां रात्रीं ९ वाजता बियानाच्या शहरांत येऊन पोहोंचलें. पण तेथें रात्रीच्या काळोखामुळें इंग्रजी सैन्यांत इतका घोटाळा माजला कीं, पलटणींतील शिपाई आणि बाजारबुणगे हे एकमेकांत मिसळून गेले, व त्यांच्यांत कांहीं लष्करी शिस्त म्हणून उरलीच नाहीं. खायला नाहीं, विश्रांति नाहीं, झोंप नाहीं, आणि क्षणोक्षणीं मरणाची भीति; अशा स्थितींत जे कांहीं थोडेसे शिपाई शिल्लक राहिले होते, ते सगळी शिस्त सोडून ज्याला जिकडे वाट सापडेल तिकडे पळूं लागले. या लोकांची मुख्य छावणी आग्र्याला होती. तेव्हां तेथें पोंचल्याशिवाय आपले हे हाल संपणार नाहींत, हें लक्षांत आणून सगळे शिपाई आग्र्याकडे पळत सुटले. वाटेंत फतेपूर शिक्री लागली. पण तेथेंहि कोणी त्यांना आश्रय दिला नाहीं. यशवंतराव होळकराच्याबद्दल त्या वेळीं सगळीकडे इतकी सहानुभूति उत्पन्न झालेली होती कीं, फतेपुर शिक्री येथील सामान्य जनतेनेंच परस्पर त्यांना दगडांचा मार देऊन आपल्या गांवांतून ता. २९ आगष्ट रोजीं पिटाळून लाविलें. अशा रीतीनें वाटेनें सर्व प्रकारच्या हालअपेष्टा आणि अपमान सोशीत हे शिल्लक उरलेले बाकीचे शिपाई कसेंबसें ता. ३१ आगष्ट रोजीं एकदांचे आग्र्यास येऊन पोहोंचले.

ता. ८ जुलै १८०४ रोजीं गुरी येथून क. मॉन्सन हा जो निघाला, तो अशा रीतीनें ता. ३१ आगष्ट रोजीं आग्र्यास येऊन पोहोंचला. या दरम्यानच्या मुदतींत त्यानें जी सुमारें २२५ मैलांची पिछेहाट केली, त्याबद्दलची माहिती पुढील कोष्टकावरून थोडक्यांत चांगल्या रीतीनें लक्षांत येण्यासारखी आहे.

| सेनापतीचें नांव. | ठिकाणाचें नांव. | दोन ठिकाणांमधील अंतराचे मैल. | तारीख. | वर्णन. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ले. ल्यूकन. | गुरी. | | ८ जुलै सकाळीं. | हॉळकर हल्ला करतो. |
| क. मॉन्सन. | सोनारा. | गुरी ते सोनारा २० मैल. | ८ जुलै संध्याकाळीं. | मॉन्सन पोंचतो. |
| | मोकंदरा. | सोनारा ते मोकंदरा २० मैल. | ९ जुलै दुपारीं. | मॉन्सन पोंचतो. |
| | मोकंदऱ्याची लढाई. | | ११ जुलै. | |
| | कोटा. | मोकंदरा ते कोटा ३० मैल. | १२ जुलै. | कोट्याला पोंचतो. |
| | गनियास. | कोटा ते गनियास ७ मैल. | १३ जुलै. | |
| | गनियास जवळील नदी. | | १४ जुलै. | |
| | चंबळी नदी. | | १७ जुलै. | |
| | टोंकरामपुरा. | कोटा ते टोंकरामपुरा ५० मैल. | २७ जुलै. | |
| मे. फ्रिथ व क. मॅक्क्यूलॉक. | टोंकरामपुरा | टोंकरामपुरा ते आग्रा सुमारें १०० मैल. | १४ आगष्ट | कुमक व रसद आणतात. |
| | रामपुरा. | | २७ जुलै ते २१ आगष्ट. | रामपुरा येथें मुक्काम. |
| क. मॉन्सन. | रामपुरा. | | २१ आगष्ट. | रामपुरा सोडतो. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बनास नदी. | | २२ आगष्ट. | येऊन पोंचतो. |
| | ,, | | २४ आगष्ट. | नदी उतरतो. |
| | खुशालगड. | | २४ आगष्ट रात्रीं. | येऊन पोंचतो. |
| | खुशालगड. | | २४ आगष्ट रात्रीं. | सोडतो. |
| | हिंदौन | | २७ आगष्ट रात्रीं. | पोंचतो. |
| | बियानाची खिंड. | | २८ आगष्ट संध्याकाळीं. | |
| | फत्तेपूर शिक्री. | | २९ आगष्ट. | |
| | आग्रा. | | ३१ आगष्ट. | |

# दीगची लढाई.

ता. ३१ आगष्ट इ. स. १८०४ पर्यंत क. मॉन्सनच्या सैन्याचा पाठलाग करीत करीत त्या सैन्याला यशवंतराव होळकरानें आग्र्यापर्यंत झोडीत आणल्यानंतर आणि त्या अवधींत त्या सैन्याला बहुतेक नामशेष करून टाकल्यानंतर यशवंतराव होळकराचा उत्तर हिंदुस्थानांतील दिल्लीकडचा मार्ग मोकळा झाला. त्याची वाट अडवून धरण्याला आतां कोणतेंहि इंग्रजी सैन्य त्याच्या समोर नसल्यामुळें यशवंतराव होळकराचे घोडेस्वार पुढें चाल करून निघाले आणि सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीच्या सुमाराला त्यांनीं मथुरा शहर इंग्रजांपासून आपल्या ताब्यांत घेतलें. मथुरा येथें इंग्लिशांचें कांहीं सैन्य होतें. परंतु यशवंतराव होळकराच्या लष्करापुढें क. मॉन्सनच्या सैन्यानें जो मार्ग स्वीकारला, त्याच मार्गाचें अवलंबन करणें मथुरा येथील इंग्रजी सैन्याला भाग पडलें. पांयदळ शिपायांच्या चार पलटणी, नेटिव्ह घोडेस्वारांच्या दोन पलटणी आणि कांहीं तोफा, इतकें सैन्य बरोबर घेऊन आणि बाकीचें सर्व धान्य आणि सामानसुमान तेथेंच टाकून देऊन इंग्लिश अधिकारी मथुरेहून आग्र्याला पळून गेले. इंग्लिश लोक मथुरेमधून पळून गेले आणि यशवंतराव होळकराच्या हातांत मथुरा शहर लागलें, याबद्दल मथुरेंतील लोकांना अतिशय आनंद झाला. यशवंतराव होळकरानें गेल्या दोन महिनेपर्यंत इंग्लिशांच्या सैन्याविरुद्ध जे पराक्रम गाजविले होते, त्यांची कीर्ति हिंदुस्थानांतील इतर ठिकाणच्या प्रमाणें मथुरेंतील लोकांच्याहि कानांवर आलेली होती व त्यामुळें त्यांना आपला राजा यशवंतराव होळकर याच्याबद्दल मोठा अभिमान वाटत होता. हा आपला राजा आतां आपल्याला इंग्लिशांच्या जुलमांतून सोडवील आणि आपल्या धर्माची सर्व हिंदुस्थानभर पुनरपि संस्थापना करील, अशीहि मथुरेच्या लोकांना फार आशा वाटत होती. पूर्वी गंगा आणि यमुना यांच्या आसपासचा हा बहुतेक मुलूख शिंद्याच्या ताब्यात होता. पण शिंद्याच्या पराभवानंतर तो मुलूख इंग्लिशांच्या ताब्यांत गेल्यापासून तेथील रयतेला परकीय अमलाचीं दुःखें काय असतात, याची हळूहळू कल्पना येऊं लागली होती. जिकडे तिकडे जमीनमहसूल जास्त वाढूं लागला होता; आणि मीठ वगैरेसारखे जे पदार्थ हिंदुस्थानांतील लोकांना बिनकरावांचून अगदीं अल्पस्वल्प किंमतीमध्यें खावयाला मिळत होते, त्यांच्यावरहि नवीन इंग्रजी अमदानींमध्यें आतां कर बसूं लागले होते. पण याच्याहिपेक्षां हिंदु लोकांना जास्त चीड आणणारे असे कांहीं कांहीं प्रकार इंग्लिशांकडून निरनिराळ्या ठिकाणीं होऊं लागले होते. जेथें जेथें इंग्रजी सोजिरांच्या छावण्या या नवीन संपादन केलेल्या मुलखांत बसविण्यांत आल्या, त्या त्या ठिकाणीं या गोऱ्या सोजिरांच्या खाण्यासाठीं गोवध सुरू होऊं लागले. अकबराच्या वेळेपासून सर्वत्र गोवधाला बंदी करण्यांत आली असतां इंग्लिशांनीं फिरून गोहत्येला अशा रीतीनें सुरवात केलेली पाहून हिंदूंचीं मनें इंग्लिशांच्या

विरुद्ध फार बिथरलीं होतीं. आणि त्यांतल्या त्यांत मथुरेंतील लोकांच्या मनावर या गोवधाचा विशेषच परिणाम झालेला होता. गाय ही भगवान् श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय, आणि त्याच गाईचा त्याच भगवान् श्रीकृष्णाच्या मथुरा नगरीमध्यें राजरोस वध केला जावा, ही गोष्ट मथुरेंतलि धार्मिक लोकांना सहन होईनाशी झाली होती. अशा वेळीं इंग्रजी शिपायांना तेथून पिटाळून लावून यशवंतराव होळकरानें आपली छावणी तेथें दिली, हें पाहून कोणत्या हिंदूच्या मनांत आनंद उत्पन्न न होणें शक्य होते ? सर्वांना आनंद झाला व आतां हा पराक्रमी आणि वैभवशाली यशवंतराव होळकर इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हांकलून देऊन फिरून आपलें राज्य प्रस्थापित करील, असा सर्वांना संभव दिसूं लागला.

परंतु यशवंतरावाच्या पराक्रमाच्या आणि क. मॉन्सनच्या पराभवाच्या बातम्या लॉर्ड लेक आणि मार्क्विस वेलस्ली यांच्या कानांवर येऊं लागल्यापासून आतां पुढें होळकराचा आपण कसा बंदोबस्त केला पाहिजे, या विचाराला ते लागले होते. त्या दोघांच्या दरम्यान खलिते सुरू झाले होते व होळकराला कोंडण्याकरितां चोहोंबाजूंनीं सैन्य कसकसें उभें करावयाचें आणि होळकराच्या विरुद्ध काय काय गुप्त कपटाच्या युक्त्या करावयाच्या, याबद्दल खलबतांचा खल चालला होता. दुसरा कोणी एखादा प्रामाणिक मनुष्य असता, आणि त्याला जर यशवंतराव होळकराचा पराजय करावयाचा असता, तर त्यानें प्रामाणिकपणानें १० हजार शिपायांच्या जागीं २० हजार शिपाई जमवून होळकरावर विजय मिळविला असता. पण मार्क्विस वेलस्ली हा अशा जातीचा मनुष्य नव्हता. व इंग्लिशांचे विजय हेहि बहुधा अशा प्रामाणिकपणानें मिळविलेले विजय नसतात. मार्क्विस वेलस्ली आणि लॉर्ड लेक यांच्या गुप्त खलबतांतील विचारसरणी होळकराच्या सैन्यांत फितुरी कशी उत्पन्न करितां येईल, इकडे मुख्यत्वेंकरून वळली. क. मॉन्सन याच्या पळापळीची पहिली बातमी कळल्यानंतर ता. १७ आगष्ट १८०४ च्या पत्रांत मार्क्विस वेलस्ली हे ज. लेक यांच्याशीं होळकराच्या सैन्याच्या संबंधानें पुढीलप्रमाणें मीमांसा करितातः—

"Holkar's army is not paid; it depends for its subsistence entirely upon plunder, and its means must be very precarious. No principle of union can exist in such a body as that commanded by Holkar. The Pathans and Mussalmans can have no attachment to Holkar and must probably have no knowledge of each other, and the whole force must have collected about Holkar as a chief of note, and with the sole object of gaining a subsistence."

होळकराच्या सैन्यांत पठाण आणि मुसलमान यांचीच बहुतेक भरती असून त्यांची एकमेकांना ओळख देखील नसली पाहिजे, आणि हे सगळे लोक केवळ आपल्या उदरनिर्वाहाच्या आशेनें होळकराच्या सभोंवतीं जमलेले असले पाहिजेत, वगैरे गोष्टींचा उल्लेख वरील इंग्रजी मजकुरांत करण्यांत आलेला आहे. यावरून अशा प्रकारानें एकत्र जमलेल्या शिपायांना

फोडण्याचा प्रयत्न केल्यास तो सफळ होण्याचा पुष्कळ संभव आहे, हा मार्किस वेलस्ली यांचा हेतु या लिहिण्यावरून स्पष्ट होत आहे. पण अशी सैन्याची भरती कोणाची नसते ? खुद्द इंग्लिशांच्या नेटिव्ह पलटणींतून जे पठाण, मुसलमान, इतकेंच नव्हे, तर बाकीच्याहि सगळ्या अठरापगड जातींतील लोक, भरलेले असतात, ते काय इंग्लिशांनीं इंग्लंडांतून आणिलेले असतात, किंवा ते त्यांनीं येथें उत्पन्न केलें असतात ? आणि ते तरी जे इंग्लिशांच्या सभोंवतीं गोळा झालेले असतात ते आपल्या पोटासाठीं नाहींत, तर काय त्यांच्या पोटचे असतात म्हणून ते त्यांच्या सभोंवतीं जमा होतात ? जेथें हजारों आणि लाखों लोकांना एखाद्या विशिष्ट हेतूसाठीं एकत्र जमवावयाचें असतें, तेथें होळकराच्या काय किंवा इंग्लिशांच्या काय, सगळ्यांच्या सैन्याची अशीच घटना झालेली असावयाची. आणि एवढयाच कारणासाठीं होळकराच्या सैन्यांत जर फितुरी करणें शक्य असेल, तर तितकीच शक्यता आपल्याहि सैन्याच्या संबंधानें आहे, हें इंग्लिशांनीं केव्हांहि विसरतां कामा नये. जे स्वतः कांचेच्या घरांत रहातात, त्यांनीं दुसऱ्यांच्या घरावर धोंडे मारण्याच्या भरीस पडूं नये, या इंग्रजी म्हणीमध्यें पुष्कळ शहाणपणा भरलेला आहे. व इ. स. १८५७ सालामध्यें तो इंग्लिशांच्या प्रत्ययालाहि आलेला आहे.

होळकराच्या सैन्यांत फितुरी उत्पन्न करण्यासंबंधाचा उल्लेख वरील इंग्रजी उताऱ्यामध्यें थोडा पडद्याआडून केलेला असला, तर तो पडदा पुढील उताऱ्यामध्यें अजिबात झुगारून देण्यांत आला आहे. व लज्जा, संकोच, किंवा प्रामाणिकपणाची चाड, यांपैकीं कोणताहि मनोविकार आड येऊं न देतां मार्किस वेलस्ली हे ता. ११ सप्टेंबर १८०४ च्या आपल्या पत्रांत ज. लेक यांना उघडपणें असें लिहितात कीं:—

"You will also take every step for confirming our allies and for encouraging desertion from Holkar by renewing the proclamations of last year or by other encouragements."

आपल्या बाजूचे जे लोक आहेत, त्यांची भक्ति आपल्या पक्षावर दृढ करण्याकरितां तुम्हीं प्रयत्न करावे; त्याचप्रमाणें गुदस्त सालीं तुम्हीं जसे जाहीरनामे काढले होते, तसले जाहीरनामें प्रसिद्ध करून किंवा दुसऱ्या कांहीं प्रकारचीं उत्तेजनें दाखवून होळकराच्या शिपायांना फितूर करण्याचा तुम्हीं प्रयत्न करावा.

या पत्राला ता. २२ सप्टेंबर १८०४ रोजीं उत्तर लिहून ज. लेक यांनीं मार्किस वेलस्ली यांना जें कळविलें आहे, त्यांतील सारांश असा आहे कीं, आपण या गोष्टी माझ्या सारख्याला सांगावयाला कशाला पाहिजे आहेत ? त्या मीं आधींच केल्या आहेत, व आणखी पुढेंहि करीतच आहें. या उत्तरांतील इंग्रजी मजकूर पुढीलप्रमाणें आहे:—

"His (Holkar's) troops are in a strange state; some of them are again making proposals to come over; they shall be received if they come; but I have little faith in anything they say; however, anything like disaffection among them has its weight and may be of use; therefore, it shall be encouraged."

होळकराच्या सैन्यांत आंतून फितुरी उत्पन्न करण्याचे हे जसे प्रयत्न चाललेले होते, त्याचप्रमाणें होळकराच्या सैन्याचा बाहेरून पाडाव करण्याचेंहि व्यूह इंग्लिशांनीं रचले. एखाद्या शत्रूवर हल्ला करावयाचा म्हणजे त्याच्यावर फक्त एकाच सेनापतीनें आणि फक्त एकाच बाजूनें हल्ला करावयाचा, असला व्यूह पाश्चिमात्य युद्धकलेच्या नियमाप्रमाणें केव्हांहि रचण्यांत येत नाहीं. इंडियन राजांच्या लढायांमध्यें मात्र सुशिक्षित सैन्य थोडें आणि सुशिक्षित सेनानायक तर त्याहूनहि थोडे, अशी स्थिति असल्यामुळें त्यांच्या लढाया किंवा त्यांचे हल्ले हे मात्र असे एकांगी होत असल्याचें दिसून येतें व यामुळेच बहुतेक प्रसंगीं त्यांचें पराजय झालेले आहेत. परंतु इंग्लिशांच्या हातून ही चूक सहसा केव्हांहि झालेली नाहीं. या वेळीं क. मॉन्सनच्या पराभवानंतर त्यांनीं होळकराच्याविरुद्ध जी मोहीम सुरू केली, तिच्यामध्येंसुद्धां त्यांनीं चार पांच ठिकाणांहून होळकराच्याविरुद्ध हालचाली एकदम सुरू केल्या. क. मरे हा गुजराथेंतून होळकरावर चालून येत असतां पूर्वी महीनदीच्यापर्यंत मागें हटून गेला होता; परंतु तो फिरून उलटून उज्जनीवर चाल करून आला. दौलतराव शिंद्याचें कांहीं सैन्य इंग्लिशांनीं माळव्यावर हल्ला करण्याकरितां नेवविलें. दक्षिणेंत क. वॅलेस यांच्या हाताखालील सैन्यानें होळकराच्या ताब्यांतील चादोरच्या किल्ल्याला शह देण्याला सुरुवात केली. बुंदेलखंडामध्यें इंग्लिशांनीं आपलें एक सैन्य होळकराच्या हालचाली बंद करण्याकरितां पाठविलें. आणि या सगळ्या व्यवस्थेशिवाय खुद्द ज. लेक हे आपल्या हाताखालीं मुख्य सैन्य घेऊन होळकराचें पारिपत्य करण्याकरितां आग्र्याजवळच्या शिकंदऱ्यापासून ता. १ आक्टोबर १८०४ रोजीं निघाले. अशा रीतीनें इंग्लिशांनीं होळकराच्या विरुद्ध एकदम चोहोंकडून धामधूम सुरू केली.

होळकराचा मुक्काम कांहीं दिवस मथुरेस होता. परंतु त्याची मुख्य महत्त्वाकांक्षा दिल्लीस जाऊन तें राजधानीचें शहर हस्तगत करावें व तेथील शहाआलम बादशहाला आपल्या ताब्यामध्यें घ्यावें, अशी होती. दिल्लीची बादशाही आणि दिल्लीचे बादशहा यांच्या वैभवानें पेशवे, महादजी शिंदे, दौलतराव शिंदे, यांना जसें भाळून टाकलें होतें, त्याचप्रमाणें यशवंतराव होळकराच्या मनावरहि दिल्लीनें आपलें भुरळ घातलें होतें, त्यामुळें मथुरेच्या आसपास इंग्लिशांचें सैन्य येऊं लागल्याचें पाहून यशवंतरावानें मथुरा एकदम सोडली आणि अतिशय त्वरेनें चाल करून त्यानें दिल्लीजवळ मुक्काम केला. दिल्लीवर यशवंतराव होळकराची धाड येऊन पडणार असें दिल्ली येथील इंग्लिशांचे रेसिडेंट क. अक्टरलोनी, यांना आधींच वाटलें होतें; व त्यामुळें आसपासचे शिपाई गोळा करून त्यांनीं दिल्लीच्या संरक्षणाची आधींपासूनच थोडीबहुत तजवीज करून ठेविली होती. तरी पण दिल्लीच्या सभोंवतालची बहुतेक तटबंदी अहंमदशहा अबदाली याच्या वेळेपासून जी उद्ध्वस्त करून टाकण्यांत आली होती, ती पुढें कोणींहि दुरुस्त केलेली नसल्यामुळें अशा स्थितींत दिल्लीचें संरक्षण करणें कठिण होतें. तरी पण अजमीर दरवाजा, लाहोर दरवाजा, काश्मीर दरवाजा, वगैरे ठिकाणच्या कांहीं कांहीं तटबंदीच्या भिंतीवरून तोफा डागून इंग्लिशांनीं दिल्लीच्या संरक्षणाची साधारणपणें तजवीज केली होती. दिल्ली शहराला यशवंतराव होळकरानें येऊन वेढा दिला, त्या वेळीं दिल्लींतीलहि परिस्थिति मथुरेप्रमाणेंच होळकराला धार्मिक दृष्ट्या अनुकूल होती.


व होळकराला आतांपर्यंत जय मिळाले, तसाच त्याला दिल्लीलाही जय मिळावा, अशी तेथील लोकांची इच्छा होती. इतकेंच नव्हे, तर इंग्लिशांच्या सैन्यांतलि कित्येक लोक दिल्ली येथें आपल्या ऑफिसरांचे हुकूम ऐकेनासे झाले होते; व ते कदाचित् होळकराला जाऊन मिळतील, अशीहि कित्येक इंग्लिश अधिकाऱ्यांना भीति पडली होती. त्यामुळें क. अक्टरलोनी यानें त्यांना निरनिराळ्या प्रकारचीं प्रोत्साहनें देण्याला सुरवात केली होती. इंडियन शिपायांना खाण्याकरितां दररोज मेवामिठाई वांटण्यांत येत होती. व तुम्हीं होळकराचा पराभव केला असतां तुम्हांला एक एक महिन्याचा जास्त पगार देण्यांत येईल, असेंहि सांगण्यांत येत होतें. याशिवाय क. अक्टरलोनी यांच्या हातांत दिल्ली शहरांत आणखी एक मोठें शस्त्र होतें, असें म्हणतात, तें शस्त्र म्हणजे त्यांनीं आपल्याजवळ बाळगलेला त्यांचा जनानखाना हें होय. जनानखाने बाळगण्याबद्दल इंग्लिश लोक मुसलमान बादशहांना नांवें ठेवीत असतात. परंतु इंग्लिशांच्यापाशीं तसले जनानखाने नसतात, असें नाहीं; कदाचित् तसले नसले, तर कदाचित् दुसऱ्या कांहीं प्रकारचे असतील. निदान दिल्लीमध्यें क. अक्टरलोनी याच्यापाशीं तरी असला एक जनानखाना होता. ह्या जनानखान्यांत स्वाभाविकपणेंच दिल्लींतलि हलकट जातींच्या अनेक स्त्रिया गोळा झालेल्या होत्या. यांच्यापासून सुखोत्पत्ति काय होत असेल, तो प्रश्न निराळा; परंतु त्या वेळच्या इंग्लिश लोकांना या साधनापासून जो मुख्य फायदा होत असे, तो राजकीय स्वरूपाचा होता. कारण, या द्वारानें शहरांतील कोण लोक काय बोलतात वगैरे सर्व प्रकारच्या गुप्त बातम्या त्यांना कळत असत. या जनानखान्यांतील नायकांचा अर्थातच शहाआलम बादशहाच्या जनानखान्यामध्येंहि प्रवेश होत असे. व त्यामुळें तेथीलहि गुप्त बातम्या क. अक्टरलोनीला समजण्याची या योगानें चांगली सोय झाली होती. या व अशाच दुसऱ्याहि कित्येक युक्त्यांनीं क. अक्टरलोनी यानें दिल्लीच्या बादशहाचें मन इंग्लिशांकडे ओढून घेतलें होतें. आणि बादशहाला दौलतराव शिंद्याच्या हातून इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यानंतर त्याच्या व्यवस्थेमध्यें इंग्लिशांनीं जरी फारशी कोणतीच सुधारणा केलेली नव्हती, तरी यशवंतराव होळकराचा हा हल्ला दिल्लीवर आला, त्या वेळीं वरील अनेक कारणांच्या योगानें शहाआलम बादशहाचा कल होळकराच्यापेक्षां अक्टरलोनीकडे दुर्दैवानें जास्त होता. होळकरानें दिल्ली सर करण्याकरितां जें सैन्य पाठविलें होतें, त्याच्यावर जे मुख्य सरदार होते, त्यांनीं नऊ दिवसपर्यंत दिल्लीच्या वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें. परंतु मथुरेच्या बाजूनें आपल्याबरोबर मोठी फौज घेऊन लॉर्ड लेक हा दिल्लीचा वेढा उठविण्याकरितां येत आहे, अशी बातमी समजल्यानंतर यशवंतराव होळकर हा आपल्या सैन्यासह दिल्लीहून निघाला; व पानिपतच्या जवळ यमुना नदी उतरून तो अंतर्वेदींतील इंग्लिशांच्या मुलखाचा विध्वंस करण्याच्या उद्देशानें उत्तरेस सहारणपुराकडे वळला. या वेळीं आपल्या गनिमी काव्यानें फक्त धावती लढाई करून इंग्लिशांच्या मुलखांत जाळपोळ करावी व उत्तर हिंदुस्थानांत कोठें आपल्याला मदत मिळते किंवा नाहीं हें पहावें, हाच होळकराचा मुख्य हेतु असल्यामुळें त्यानें आपल्याबरोबर आपले फक्त घोडेस्वारच घेतले; आणि आपलें पायदळ व आपला तोफखाना हा त्यानें भरतपूरच्या राजाच्या मुलखांत पाठवून दिला.

आपल्या घोडेस्वारांनिशीं होळकर पानिपताहून निघाला, तो थेट सहाराणपुराकडे वळला. तिकडच्या शीख लोकांकडून वगैरे आपल्याला कांहीं मदत मिळेल, अशी त्याला आशा होती. परंतु डोलचासिंग या नांवाचा एक शीख लोकांचा सरदार इंग्लिशांनीं आपल्या पैशानें आपल्या बाजूला फितूर करून घेतलेला होता. त्यामुळें व इतरहि कित्येक कारणांमुळें अंतर्वेदींत होळकराचा जम बसला नाहीं. होळकर अंतर्वेदींत शिरला आहे, असें पाहून खुद्द ज. लेक यानें त्याचा पाठलाग करण्याचें काम आपल्याकडे घेतलें. व आपल्या हाताखालील मे. ज. फ्रेजर याच्याकडे त्यानें दुसरें एक काम सोंपविलें. पायदळ तोफखाना आणि नेटिव्ह घोडेस्वारांच्या दोन पलटणी, इतकें सैन्य मे. ज. फ्रेजर याच्या हाताखालीं देण्यांत आलें; व होळकरानें आपलें पायदळ व तोफखाना दिल्लीहून मागें कोठें तरी परत पाठविला आहे, ही बातमी ज. लेक याला कळलेली असल्यामुळें तें होळकराचें सैन्य कोठें गेलें आहे तें शोधून काढावें; व त्या सैन्याचा होळकराच्या गैरहजेरींत नाश करावा, ही कामगिरी मे. ज. फ्रेजर याजकडे सोंपविण्यांत आली होती. या कामगिरीवर मे. ज. फ्रेजर हा ता. ५ नोव्हेंबर रोजीं दिल्लीहून निघाला आणि ता. १२ नोव्हेंबर रोजीं दीगच्याजवळ तो येऊन पोहोंचला. होळकराचें सैन्य भरतपूरच्या राजाच्या मुलखामध्यें कोठेंतरी असलें पाहिजे, असा इंग्लिशांना संशय होता. व त्याप्रमाणें तें सैन्य भरतपूरच्या राज्यांतील दीगच्या किल्ल्याजवळ छावणी देऊन राहिलेलें असल्याचें इंग्लिशांना आढळून आलें. दीगच्या किल्ल्यापासून सुमारें १४ मैलांच्या अंतरावर गोवर्धन या नांवाची एक टेंकडी ( १ ) आहे; तेथें इंग्लिशांनीं ता. १२ रोजीं संध्याकाळीं आपले तंबू ठोकून छावणी ( २ ) दिली. या गोवर्धनच्या डोंगरावरून इंग्लिशांना मराठ्यांची छावणी दिसत होती. या छावणीच्या एका बाजूला पाण्याचा एक मोठा तलाव होता. आणि दुसऱ्या बाजूला एक मोठी दलदल होती. आणि या दोहोंच्यामध्यें मराठ्यांचें लष्कर पसरलेलें होतें. या लष्कराची उजवी बाजू एका तटबंदीच्या खेड्याला ( ३ ) लागलेली असून डावी बाजू ( ४ ) थेट दीगच्या किल्ल्याच्या तटापर्यंत जाऊन पोंचलेली होती. या मराठी सैन्याच्या जागेची टेहळणी करून झाल्यानंतर ता. १३ नोव्हेंबर इ. स. १८०४ रोजीं पहांटे तीन वाजतां मे. ज. फ्रेजर हा आपल्या हाताखालीं ७६ वी पलटण आणि कंपनीच्या युरोपियन रेजिमेंट्स व ४ नेटिव्ह शिपायांच्या पलटणी इतकें सैन्य घेऊन गेला; व २ नेटिव्ह पलटणी आणि कांहीं घोडेस्वार एवढेंच काय तें सैन्य ले. क. बॉल याच्या हाताखालीं पाठीमागें सामानसुमानाचें संरक्षण करण्याकरितां ठेवण्यांत आलें. त्या वेळीं मे. ज. फ्रेजरचें सैन्य दलदलीच्या बाजूबाजूनें ( ५–५ ) चालूं लागलें. व त्या दलदलीच्या टोकाशीं जें एक लहानसें खेडें ( ६ ) होतें, याला वळसा घालून तें सैन्य मराठ्यांच्या रांगेच्या उजव्या टोकांजवळ जें एक तटबंदीचें खेडें ( ३ ) होतें, त्याच्याजवळ ( ७ ) म्हणजे दीगच्या किल्ल्यापासून सुमारें ६ मैलांवर येऊन पोहोंचलें. या ठिकाणीं ( ७ ) इंग्लिशांनीं आपल्या सैन्याच्या दोन रांगा लढाईच्या तयारीनें उभ्या केल्या. पहिल्या रांगेमध्यें ७६ वी रेजिमेंट आणि दुसऱ्या दोन पलटणी होत्या, आणि बाकीचें सैन्य दुसऱ्या रांगेंत उभें राहिलें होतें.

या इंग्रजी पलटणींना तोंड देण्याकरितां उलट बाजूनें मराठ्यांचें जें सैन्य तयार झालें होतें, त्यांत पायदळाच्या सुमारें २४ पलटणी होत्या; आणि त्याशिवाय बरेच घोडेस्वार असून तोफांची संख्या सुमारें १६० पर्यंत होती. व त्याशिवाय भरतपूरच्या राजाच्या ३ पायदळ पलटणी व कांहीं घोडेस्वार हेहि होळकराच्या बाजूनें येथें लढत होते. या सगळ्या सैन्याचें आधिपत्य हरनाथ दादा या नांवाच्या होळकराच्या एका मुख्य सेनापतीकडे होतें. व त्याशिवाय महंमदशहाखान व अबदुल्लाखान असे दोन मुसलमान सरदार त्याच्य हाताखालीं होते. ह्या सगळ्या सरदारांनीं मिळून आपल्या मराठ्यांच्या सैन्याची शत्रूला अटकवून धरण्याकारितां पुढीलप्रमाणें योजना केली होती. अंक ३ यानें नकाशांत दाखविलें जाणारें एका लहानशा टेकडीवर जें एक लहानसें तटबंदीचें खेडेगांव होतें, तेथें मराठ्यांनीं आपल्या पिकेटचे कांहीं लोक ठेविले होते.व त्या टेकडीवरून किल्ल्याच्या बाजूला खालीं उतरून गेल्यानंतर कांहीं अंतरावर त्यानीं आपल्या तोफखान्याची पहिली रांग ( ८·८ ) उभी केली होती. व त्याच्या पाठीमागे किल्ल्याच्या बाजूला कांहीं अंतरावर मराठ्यांच्या तोफखान्याच्या दुसऱ्या रांगा ( ९, १०, ११, १२, १३ ) निरनिराळ्या ठिकाणीं उभ्या करण्यांत आल्या होत्या. क. मॉन्सनच्या पिछेहाटीच्या वेळीं त्याच्यापासून होळकरानें ज्या तोफा हिरावून घेतल्या होत्या, त्या इंग्लिशांच्या तोफाहि इंग्लिशांच्याच विरुद्ध मारा करण्याकारितां येथें कांहीं ठिकाणीं डागून ठेवण्यांत आलेल्या होत्या. मराठ्यांच्या या एकंदर तोफखान्यांच्या रांगा एकापाठीमागें एक अशा सुमारें २ मैलपर्यंत पसरलेल्या होत्या. त्याशिवाय दलदलीच्या दक्षिणच्या अंगालाहि मराठ्यांनीं आपला तोफखाना आणि इतर सैन्य उभें केलें होतें.

ही जी जागा मराठ्यांनीं पसंत केली होती, ती छावणी देऊन उतरण्याला सोईची होती, पण लढाईच्या कामाला तिच्यासारखी अत्यंत गैरसोईची जागा दुसरी कोणतीहि असूं शकणार नाहीं. उजव्या हातला दलदल, डाव्या हाताला तलाव आणि पाठीमागें किल्ला अशा रीतीनें मराठ्यांचें सैन्य या जागेंत तिन्ही बाजूंनीं कोंडलें गेलेलें होतें. व चौथ्या बाजूचें तोंड हें इंग्लिशांच्या पलटणींनीं रोखून धरलें होतें आणि त्यामुळें इंग्लिशांचें काम फार सोपें झालें होतें. अशा अडचणीच्या जागेंत मराठ्यांनीं आपल्याला चाऱ्ही बाजूंनीं कोंडून घेतलें, हें ठीक झालें नाहीं. याच्यापेक्षां दलदल, किल्ला आणि तलाव या तीन बाजूंच्या कोंडमाऱ्यामधून निघून आणि बाहेरच्या मोकळ्या मैदानावर येऊन मराठ्यांनीं आपण होऊन इंग्लिशांवर हल्ला केला असता तर फार चांगलें झालें असतें. आपण पहिल्यानें हल्ला करण्याची संधि केव्हांहि घालवितां कामा नयें. या गोष्टीवर लढाईंतील जय नेहमींच पुष्कळ अंशीं अवलंबून असतो. पण अशा अडचणीच्या जागीं सांपडल्यानंतर त्यांतून बाहेर पडण्याची संधि साधणें यांत तर अतिशय फायदा आहे. या प्रसंगीं मराठ्यांनीं मोकळ्या मैदानावर येऊन इंग्लिशांच्या पलटणींवर त्यांच्या पिछाडीकडून हल्ला केला असता, तर त्यांत मराठ्यांचा खात्रीनें पुष्कळ फायदा झाला असता. किंवा इंग्लिशांना फसविण्याकरितां आणि मराठ्यांचें सगळें सैन्य दलदल, किल्ला आणि तलाव यांच्या कोंडीमध्येंच कोंडून राहिलेलें

आहे असें भासविण्याकरितां या तिन्ही बाजूंच्या कोंडीच्या तोंडाशीं थोडेसें सैन्य ठेवून बाकीचें आपलें सगळें सैन्य तलाव आणि किल्ला यांच्यामधील, वाटेनें गोपाळगडच्या बाजूनें बाहेर काढून त्या सैन्याकडून मराठ्यांनीं इंग्लिशांच्या पिछाडीवर हल्ला केला असता, तर त्यांना




ढकलीत ढकलीत किल्ल्याकडे पुढे नेऊन किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्याखालीं त्यांना दलदलीच्या चिखलांत किंवा तलावाच्या पाण्यांत बुडविण्याचा प्रयत्न केला असता, तर याहि लष्करी डावानें वाईट जागेपासून मराठ्यांना आपलें चांगलें हित सहज साधतां आलें असतें. परंतु

तसें कांहीं एक न करितां आणि चढाईचें धोरण न स्वीकारतां आहे त्या जागेंत आपला बचाव कसा करतां येईल, एवढीच कोती दृष्टि मराठ्यांनीं या वेळीं ठेविली आणि त्यामुळें किल्ल्यावरील तोफांखालीं आणि दलदलीच्या चिखलांत इंग्लिशांना मारण्याच्या ऐवजीं त्यांच्या स्वतःवरच मरणाची पाळी आली. आपल्या युद्धाकरितां आपण कोणतें युद्धक्षेत्र स्वीकारावें आणि शत्रूला कोणत्या ठिकाणीं आणून खड्ड्यांत घालावें, हें आगाऊ ठरवून त्याप्रमाणें आपल्या सैन्याच्या हालचाली करणें आणि आपल्याला पाहिजे तशा हालचाली करण्याला शत्रूला भाग पाडणें, यालाच युद्धशास्त्रांतलि फार नैपुण्य लागतें. नेपोलियन वगैरेसारखे शास्त्रीय पद्धतीनें आपल्या लढाया लढणारे पाश्चिमात्य सेनापति हे अशा धोरणावरच आपलीं लढाईचीं रणांगणें आगाऊ ठरवून ठेवीत असत. आणि शत्रूनें योजिलेल्या रणांगणावर आपण जाऊन तेथें त्याच्याशीं कधीं लढाई द्यावयाचीच नाहीं, असा तर नेपोलियनचा मुख्य बाणाच होता. आणि अशा अनेक कारणांमुळेंच त्याला इतके विजय संपादन करितां आले.

सकाळीं उजाडल्याबरोबर इंग्लिशांनीं लढाईला सुरुवात केली. इंग्लिशांकडील ७६ व्या पलटणींतलि लोकांनीं प्रथमतः आपल्या समोरच्या टेकडीवरील तटबंदीचें तें लहानसें खेडेगांव ( ३ ) हस्तगत केलें.व तेथून खालीं उतरून त्यांनीं आपल्या समोरील मराठ्यांच्या तोफखान्याच्या पहिल्या ( ८-८ ) रांगेवर हल्ला केला; व मराठ्यांकडून गोळ्यांचा वर्षाव चालला असतांहि त्यांनीं त्या पहिल्या रांगेंतील तोफा पाडाव करून घेतल्या. ही पहिली रांग जरी इंग्लिशांच्या हातांत गेली, तरी त्याच्या पाठीमागें ( ९, १०, ११, १२, १३. ) मराठ्यांच्या तोफांच्या आणि सैन्याच्या दुसऱ्या रांगा तयार होत्याच. त्या रांगांमधून या पुढें येणाऱ्या ७६ व्या पलटणींतील इंग्लिश शिपायावर मराठ्यांनीं गोळीबार सुरू केला. त्याचप्रमाणें दलदलीच्या दक्षिणच्या बाजूला जो मराठ्यांचा तोफखाना आणि जें मराठ्यांचें सैन्य उभें होतें, त्याच्यामधूनहि पुढें जाणाऱ्या या ७६ व्या पलटणींतील शिपायांवर त्यांच्या उजव्या बगलेकडून मारा सुरू झाला. अशा रीतीनें हें इंग्लिशाचें पुढें चाल करून जाणारे शिपाई समोरच्या आणि बाजूच्या अशा दोन गोळीबाराच्या मध्यें येऊं लागले. ही परिस्थिति पाहिल्यानंतर त्यांना प्रतिबंध करण्याकरितां मे. हॅमंड हा आपल्या हाताखालील दुसऱ्या रेजिमेंटची पहिली पलटण ( १५ ) आणि १५ व्या रेजिमेंटची दुसरी पलटण ( १६ ) अशा दोन पलटणी घेऊन एका लहानशा टेकडीच्या आश्रयानें पुढें चाल करून गेला. व त्यानें आपल्या समोरील मराठ्यांच्या सैन्याच्या तुकडीच्या हालचाली रोखून धरल्या.

या एका संकटाचें निवारण झालें नाहीं, तोंच इंग्लिशांवर आणखी एक संकट आलें. मराठ्यांच्या तोफखान्याच्या पहिल्या रांगेचा पाडाव करून दुसऱ्या रांगेंतील तोफखान्यावर हल्ला करण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य पुढें चालून गेलें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तें इंग्लिशांचें सैन्य पुढें चालून गेल्यानंतर फिरून मराठ्यांनीं मध्येंच एका युक्तीचा फार चांगल्या रीतीनें उपयोग केला. मराठ्यांचे कांहीं घोडेस्वार त्या पहिल्या रांगेंतील तोफखान्याजवळ आले आणि त्यांनीं त्या तोफा फिरून आपल्या हस्तगत करून

घेतल्या व त्यांत तोफा फिरवून पुढें दुसऱ्या रांगेवर चालून गेलेल्या इंग्लिश शिपायांच्या पिछाडीवर त्यांनीं त्या तोफांचा मारा सुरू केला व अशा रीतीनें पहिल्या रांगेतील तोफा आणि दुसऱ्या रांगेतील तोफा यांच्या दुहेरी माऱ्यामध्यें त्यांनीं इंग्लिश शिपायांना घेरून धरलें. मराठ्यांची ही युक्ति फार प्रशंसनीय आहे. याच युक्तीचा उपयोग असईच्या लढाई-मध्यें शिंद्यांच्या शिपायांकडूनहि करण्यांत आलेला होता. परंतु प्रस्तुत प्रसंगीं मराठे लोकांनीं उपयोगांत आणिलेली ही युक्ति पाहून ७६ व्या पलटणींतील कॅ. नॉर्फर्ड यानें आपल्या हाताखालीं कांहीं थोडेसे लोक घेऊन फिरून या पहिल्या रांगेतील तोफांवर हल्ला केला व त्या तोफा उडविणाऱ्या गोलंदाजांना त्यानें तेथून हुसकून लाविलें. हें कार्य करीत असतांना जरी तो स्वतः मारला गेला, तरी त्यानें आपल्या मरणानें इंग्रजी पलटणींतील दुसऱ्या शिपायांचे जीव मराठ्यांच्या मागील तोफखान्याच्या माऱ्यापासून वांचविले, यांत संशय नाहीं.

मराठ्यांच्या दुसऱ्या रांगेतील तोफांवर जेव्हां इंग्लिशांनीं हल्ला केला, तेव्हां तेथें इंग्लिशांना फारच जोराचा मारा खावा लागला. इंग्लिशांच्या बाजूचा हा हल्ला खुद्द मे. ज. फ्रेजरच्या देखरेखीखालीं चाललेला होता. परंतु त्याच्या पायाला तोफेचा एक गोळा लागून त्याचा पाय तुटून पडला. तो अशा रीतीनें जखमी झाला, तरी कांहीं वेळपर्यंत तो आपल्या शब्दांनीं आणि हातांनीं आपल्या सैन्याला उत्तेजन देतच होता. परंतु कांहीं वेळानें हेंहि अशक्य झालें. इतक्यांत त्याची जागा क. मॉन्सन यानें घेतली. व मे. ज. फ्रेजरनें या लढाईचे पूर्वीं जें धोरण ठरविलें होतें, त्या धोरणाप्रमाणें क. मॉन्सननें हल्ल्याचें काम पुढें चालविलें. मे. ज. फ्रेजर याला पुढे तेथून मथुरा येथे पाठविण्यांत आलें आणि त्या ठिकाणीं तो ता. २४ नोव्हेंबर रोजीं मरण पावला. इंग्लिशांच्या लष्करी खात्यामध्यें सैन्याची अशी रचना केलेली असते कीं, एकाखालीं एक अधिकारी ठरलेले असतात. त्यामुळें लढाईंत वरचा अधिकारी मरण पावला, तर त्याचा खालचा अधिकारी लगेच त्याची जागा घेतो आणि त्याचें लढाईचें धोरण पुढें चालवूं लागतो. त्यामुळें सैन्यांतील शिस्त मोडत नाहीं. लढाईंत कोणी ना कोणी तरी अधिकारी जखमी होऊन किंवा मरून पडावयाचेच. पण असें कांहीं झालें, तरी तेवढ्यासाठीं सगळ्या लढाईची शिस्त बिघडता कामा नये, आणि ज्याला जें काम नेमून देण्यांत आलें असेल, तें काम आपलें कर्तव्यकर्म म्हणून प्रत्येकानें करीत राहिलें पाहिजे, ही गोष्ट लष्करी व्यवस्थेमध्यें अत्यंत आवश्यक आहे. या गोष्टीकडे आपल्या मराठी फौजांमधून फार दुर्लक्ष केलें जातें. आधीं एकाखालीं एक अशी शेवटपर्यंत अंमलदारांची योजना पूर्वींच्या आपल्या लष्करांतून फारच क्वचित् असे. आणि एक मुख्य अधिकारी पडला म्हणजे सगळ्या सैन्यांत गोंधळ उडून जावयाचा आणि सगळें सैन्य पळूं लागावयाचें, ही दुसरी गोष्ट होय. पानिपतच्या लढाईंतील सदाशिवराव भाऊंचा मृत्यु आणि त्यामुळें मराठी सैन्यांत झालेला गोंधळ या गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत. हे आपल्या स्वभावांतील दुर्गुण नाहींसे होण्याकरितां इंग्लिश लोकांच्या शिस्तवार पद्धतीचा अभ्यास आपण काळजीपूर्वक रीतीनें करणें अवश्यक आहे.

मे. ज. फ्रेजर जखमी होऊन पडल्यानंतर त्याची जागा क. मॉन्सन यानें घेतली; आणि जणूं काय कांहीं एक झालें नाहीं इतक्या व्यवस्थेनें हल्लयाचें काम पुढें चालूं करून इंग्लिशांनीं मराठ्यांच्या तोफखान्याच्या मागील सर्व रांगा ( १७-१७-१७ ) एका पाठीमागून एक याप्रमाणें काबीज केल्या. या तोफांच्या रांगा एकामागें एक अशा एकंदर दोन मैलपर्यंत पसरल्या होत्या, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. इतक्या दोन मैलपर्यंत मागें हटत असतांनाहि मराठ्यांचे शिपाई प्रत्येक बॅटरीजवळ अतिशय निकरानें लढत होते; आणि जेव्हां अगदीं निरुपाय होई, तेव्हांच ते मागें हटत असत. पण अशा रीतीनें मागें हटत असतांना सुद्धां त्यांनीं इंग्लिशांवर आपल्या तोफांचा मारा एकसारखा चालूं ठेविला होता. आणि त्यांतच इंग्लिशांचें सैन्य जेव्हां किल्ल्याच्या टापूमध्यें आलें, तेव्हां तर दीगच्या किल्ल्यावरूनहि त्यांच्यावर तोफांचा मारा सुरू करण्यांत आला. पण असा दुहेरी तोफांचा मारा सुरू असतांना त्यांतूनहि इंग्लिशाचें सैन्य मराठ्यांना मागें रेटीत चाललें होतें. असा क्रम चालला असतां मराठ्यांच्या पैकीं कित्येक शिपाई इंग्लिशांच्या गोळीबाराला बळी पडले, कित्येक दलदलीच्या चिखलांत सांपडले, कित्येक किल्ल्यासमोरच्या खंदकाच्या पाण्यामध्यें पडून मेले आणि बाकी राहिलेल्या बहुतेक सैन्यानें किल्ल्यामध्यें शिरून आपला बचाव करून घेतला.

अशा रीतीनें तोफखान्यावरील लोकांना किल्ल्यांत घालवून इंग्लिशांनीं मराठ्यांचा तोफखाना जरी काबीज केला, तरी अद्यापि दलदलीच्या दक्षिणेस मे. हॅमंड यानें रोखून धरलेलें मराठ्यांचें कांहीं सैन्य ( १४ ) शिल्लक होतेंच, व या सैन्यामधूनही क. हॅमंडच्या पलटणींवर तोफांचा मारा चाललेलाच होता. परंतु किल्ल्यासमोरील तोफखान्याच्या सर्व रांगा काबीज करून झाल्यानंतर क. मॉन्सन हा आपलें शिल्लक उरलेलें सैन्य घेऊन क. हॅमंडच्या मदतीला आला; व त्या दोघांनीं मिळून या मराठ्यांच्या अडचणींत सांपडलेल्या सैन्यावर दोन बाजूंनीं हल्ला सुरू केला, या वेळींही मराठ्यांच्या सैन्याची ही तुकडी एका कोपऱ्यांत अगदीं वाईट जागेंत सांपडली होती, त्यामुळें इंग्लिशांच्या पेक्षां या दलदलीच्या वाईट जागेनेंच या तुकडीचा नाश केला, असें म्हटलें असतां तें अन्यथा होणार नाहीं. क. हॅमंड यानें समोरून आणि क. मॉन्सन यानें बाजूनें हल्ला केल्यानंतर येथील मराठे शिपायांना आपल्या पाठीमागच्या दलदलीशिवाय दुसरी जागाच नव्हती. त्यामुळें तें सगळें सैन्य दलदलींत सांपडून नाश पावलें. या ठिकाणींच पूर्वीं सांगितलेले महंमदशहाखान आणि अबदुलखान हे जे दोन होळकराच्या पायदळावरील मुसलमान सरदार होते, तेही आपल्या सैन्याबरोबर या दलदलींत सांपडून नाश पावले.

ता० १३ नोव्हेंबर १८०४ रोजीं याप्रमाणें या दीगच्या लढाईंत होळकराच्या सैन्याचा जो पराभव झाला, त्याची बातमी होळकराला तो अंतर्वेदीमध्यें फरुकाबादच्या मुक्कामावर असतांना तारीख १६ नोव्हेंबर रोजीं रात्रीं समजली. दिल्लीचा वेढा उठवून नोव्हेंबरच्या सुरवातीच्या सुमारापासून होळकरानें अंतर्वेदींत शिरून ठिकठिकाणीं जाळपोळ करण्याला सुरवात केली होती. क. बर्न या एका इंग्लिश अधिकाऱ्याला त्यानें शामलीच्या

एका जुन्या गढीमध्यें तीन दिवस वेढा देऊन कोंडून ठेविलें होतें. परंतु त्याच्या मदतीला लॉर्ड लेक याचें सैन्य येत आहे असें समजल्याबरोबर तो तेथून निघाला; व महमदाबाद, सालढाणा, वगैरे मुक्कामांवरून पुढें तो मेरट येथें गेला. या वर दिलेल्या मुक्कामांपैकीं सालढाणा हें बेगम समरू हिच्या राजधानीचें शहर होय. ही बेगम समरू होळकराला फितूर झालेली आहे, आणि तिच्याशीं चाललेला होळकराचा कांहीं पत्रव्यवहार आपल्या हातीं लागला आहे, अशी एक खोटीच कंडी इंग्लिशांनीं होळकराच्या विरुद्ध जी उठविलेली होती, तिच्याबद्दलचा उल्लेख या होळकरांच्या प्रकरणांत पूर्वीं येऊन गेलेला आहे. व इंग्लिशांनीं या बाबतींत पुढें आणलेलीं पत्रें बनावटच कां व कशीं असलीं पाहिजेत, हेंहि त्या ठिकाणीं दाखविलें आहे. व त्याच गोष्टीला आणखी येथेंही एक जास्त प्रत्यंतर मिळतें, तें असें कीं, बेगम समरू ही जर होळकराला फितूर झालेली असती, तर तिच्या राजधानीच्या शहरामध्यें होळकरानें मुक्काम केला असता, व तिनेंहि त्याला या वेळीं कांहीं मदत केली असती.परंतु तसें कांहीं एक झालें नाहीं. यावरून लॉर्ड लेक यांनीं यशवंतराव होळकराच्या विरुद्ध पुरावा म्हणून जीं बेगम समरूचीं पत्रें पुढें आणलीं होतीं,तीं निव्वळ बनावटच असलीं पाहिजेत, हें उघड होतें. मेरटहून यशवंतराव होळकर निघाला, तो मल्हारगड, कोरिया, गंज, खासगंज, अलिगंज, वगैरे इंग्लिशांच्या ताब्यातील ठिकाणें उद्ध्वस्त करीत ता. १५ नोव्हेंबर १८०४ चे सुमारास फरुकाबाद येथें येऊन पोहोंचला. या ठिकाणीं ता. १६ नोव्हेंबर रोजीं रात्रीं यशवंतराव होळकर आपल्या छावणीमध्यें नाच पहात आणि गाणें ऐकत बसला असतांना तेथें त्याला त्याच्या जासुदांकडून दीगच्या लढाईंत आपला पराभव झाल्याची बातमी समजली. तेव्हां त्याबद्दल आपल्या सरदारांपैकीं दुसऱ्या कोणापाशीं न बोलतां तो एकटाच त्या बैठकींतून उठून आपल्या तंबूकडे गेला; व पुढें कसें करावयाचें आणि इंग्लिशांवर जय कसा मिळवावयाचा, या गोष्टीच्या विवंचनेमध्यें तो असतांना त्याच रोजीं पहाटेस त्याला इंग्लिशांच्या तोफांचे आवाज ऐकूं आले. ज. लेक हा यशवंतराव होळकराचा पाठलाग करीत पाठीमागून येतच होता. त्याच्या आणि होळकराच्या सैन्यामध्यें बहुतेककरून २५।३० मैलांचें अंतर असे. परंतु अलिगंजच्या मुक्कामावरून रात्रीचा कूच करून ज. लेकनें हें अंतर तोडलें व ता. १७ नोव्हेंबर रोजीं उजाडतांना त्याचें सैन्य फरुकाबादच्या जवळ येऊन पोहोंचलें. त्या वेळीं आपापले घोडे मेखांना बांधून त्यांच्या जवळ घोंगड्या पांघरून होळकराचे सुमारें साठ हजार घोडेस्वार झोंपी गेलेले होते. त्यांच्यावर इंग्लिशांच्या तोफांचे आणि बंदुकांचे गोळे येऊन पडूं लागले, तेव्हां ते जागे झाले. यशवंतरावाच्या गुप्त हेरांकडून त्याला जी बातमी मिळालेली होती, त्या बातमीप्रमाणें इंग्लिशांची फौज आपल्यापासून २५।३० मैलांच्या पाठीमागें असल्याचें त्याला कळलें होतें व त्यामुळें ते इतक्या लवकर येऊन आपल्याला गांठतील अशी यशवंतरावाला कल्पनाही नव्हती. परंतु जेव्हां प्रत्यक्ष तोफांचे आवाज ऐकूं येऊं लागले आणि गोळे पडूं लागले, तेव्हां आपल्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या घोडेस्वारांसह तो कालिंदी नदी उतरून मैनपुरीला निघून गेला व तेथून पुढें त्यानें आपला मोर्चा दीगच्या किल्ल्याकडे वळविला.

त्यानंतर ज. लेक हाही दीगकडेच वळून ता. २८ नोव्हेंबर रोजीं दीगच्या किल्ल्या-जवळ छावणी देऊन राहिलेल्या क. मॉन्सनच्या फौजेला येऊन मिळाला. परंतु ता. १३ नोव्हेंबरच्या दीगच्या लढाईतून शिल्लक राहिलेले होळकराचे शिपाई दीगच्या किल्ल्यामध्यें आश्रय घेऊन राहिले आहेत, हें जरी इंग्लिशांना माहीत होतें, तरी ता. १३ डिसेंबर १८०४ पर्यंत ते त्या किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां जाऊं शकले नाहींत. कारण, मोठमोठाल्या तोफा आणि मदतीला येणारें सैन्य यांची वाट बघत त्यांना इतके दिवस थांबावें लागलें. दगिचा किल्ला हा त्या वेळीं एक फार मजबूत किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. त्या किल्ल्याच्या सभोंवतीं मोठमोठाल्या दलदली पसरलेल्या असत. त्याशिवाय त्या किल्ल्याच्या सभोंवतीं मातीच्या उंच आणि मजबूत भिंती असून त्या भिंतींच्या बाहेरून चौफेर एक मोठा खोल खंदक सदोदित पाण्यानें भरलेला असे. फक्त नैर्ऋत्य दिशेच्या कोपऱ्याच्या बाजूलाच काय तो या खंदकाचा वेढा नव्हता. पण तेथे खंदकाची जरूरीही नव्हती. कारण या दिशेचें किल्ल्याचें टोंक एका उंच टेकडीवर चढलेलें होतें. ही टेकडी अवघड असून त्या टेकडीवरच या किल्ल्याचा एक मजबूत बुरूज बांधण्यांत आलेला होता. यालाच शहाबुरुज ( १८ ) असें म्हणत असत. या बुरुजामध्यें सुमारें ७५ हात औरस चौरस लांबीरुंदीचा एक चौक असून त्याच्या कोपऱ्यांवरील चारी दिशांना चार माऱ्याच्या जागा होत्या; व त्यांपैकीं एका कोपऱ्यांत एका मोठ्या गाड्यावर चढविलेली अशी ७४ पौंडाचा गोळा फेकणारी अशी एक मोठी थोरली तोफ ठेवण्यांत आली होती. याशिवाय या बाहेरच्या किल्ल्याच्या आंत दुसरा एक लहानसा बालेकिल्ला असून तोहि मजबूत होता. अशा किल्ल्यावर चांगली तयारी असल्या-वांचून हल्ला करणें शक्य नव्हतें. म्हणून सैन्याची आणि सामानाची जमवाजमव होईपर्यंत किल्ल्या-वर हल्ला करणें शक्य नव्हतें. किल्ल्यावर प्रत्यक्ष हल्ला करण्याच्या पूर्वी ८।१० दिवस ज० लेक हा किल्ल्याच्या सभोंवतीं चारी बाजूंनीं स्वतः फिरून माऱ्याच्या जागा कोठें कशा काय आहेत, वगैरेबद्दल बारकाईनें पहाणी करीत होता. अशा प्रसंगीं एकदा खुद्द यशवंतराव होळकरानें आपल्या कांहीं घोडेस्वारांसह ज० लेकच्या सैन्याच्या टोळीला गांठलें. त्या वेळीं दोघांची थोडीशी चकमक झाली. परंतु याच्यापेक्षां त्यांत जास्त कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

इंग्लिशांच्या बाजूची तयारी झाल्यानंतर ता. १३ रोजीं इंग्लिशांच्या सैन्यानें किल्ल्याच्या समोर पश्चिमेच्या बाजूला आपल्या सैन्याचा तळ दिला. त्या ठिकाणीं पूर्वी मराठयांचे कांहीं लोक होते. परंतु ही इंग्लिशांची छावणी तेथें पडल्यामुळें ते तेथून निघून किल्ल्यांत गेले. त्याच दिवशीं रात्रीं इंग्लिशांची छावणी आणि किल्ला यांच्या दरम्यान एका आबराईमध्यें एक खेडें ( १९ ) होतें, ती जागा क० डॉन यानें आपल्या ताब्यांत घेतली, आणि तेथून किल्ल्याच्या जवळजवळ जाण्याकरितां सुमारें ६०० हात लांबीचा एक चर खणण्यांत आला, व तोफा ठेवण्याकरितां एक मोर्चा बांधण्यांत आला. हीं इतकीं कामें इंग्रजांच्या शिपायांनीं उजाडण्याच्या पूर्वी उरकून घेतलीं. आणि त्यानंतर ता. १४ रोजीं संध्याकाळीं काळोख पडल्यानंतर शहाबुरुजापासून सुमारें १५०० कदमांच्या अंतरावर तोफा डागण्याकरितां आणखी एक मोर्चा ( २० ) बांधण्याला सुरवात करण्यांत आली. परंतु शहाबुरुजाच्या

पासून जवळच दक्षिणेच्या अंगाला जी एक गोपाळगड नांवाची लहानशी मातीच्या भिंतीची गढी होती, तिच्यामध्यें मराठ्यांचे बरेच शिपाई होते, त्यांच्याकडून या तोफांचे मोर्चे बांधण्यांत इंग्लिशांच्या शिपायांवर एकसारखा बंदुकीचा मारा चालू असल्यामुळें इंग्लिशांचें फार नुकसान झालें. व त्यामुळें त्यांना त्या मोर्चाचें काम ता० १६ पर्यंत पुरें करतां आलें नाहीं. अखेरीस तें काम कसेंबसें पुरें करून त्यांनीं १७ तारखेला त्या दुसऱ्या ( २० ) बॅटरी-मधून शहाबुरुजावर गोळे टाकण्याला सुरवात केली. या बॅटरींतून दोन तीन दिवस गोळे फेकण्यांत येत होते. पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां ता. २० रोजीं रात्रीं इंग्लिश सैन्याच्या डाव्या बाजूला किल्ल्याच्या जवळ आणखी एक तिसरी बॅटरी (२१) उभी करण्यांत आली. परंतु इंग्लिशांच्या तोफखान्याच्या या हालचाली चालू असतांना मराठे शिपाई स्वस्थ बसले होते, असें नाहीं. त्यांनींही किल्ल्यांतून आपल्या तोफा बाहेर आणल्या व इंग्लिशांच्या तिन्ही बॅटरींवर जेथून मारा करितां येईल, अशा निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं त्या डागल्या. या तोफांच्या पुढें स्वसंरक्षणाकरिता त्यांनीं मोठमोठाले धक्के उभारलेले असल्यामुळें समोरून मारल्या जाणाऱ्या इंग्लिशाच्या तोफांचा त्यांच्यावर कांहीं एक परिणाम होऊं शकत नव्हता. परंतु मराठ्यांच्या तोफाचे गोळे मात्र बाजूबाजूनें मारले जात असल्यामुळें त्यांच्या योगानें इंग्लिशांचे पुष्कळच नुकसान होत होतें. तेव्हां मराठ्यांच्या या तोफा बंद पाडण्याकरितां इंग्लिशांनीं आपल्या दुसऱ्या कांहीं तोफा (२२-२३) मागच्य मोकळ्या मैदानावरून सुरू केल्या. अशी ही एकीकडे तोफांची झटपट एकमेकांच्या विरुद्ध चाललेली असतांना दुसऱ्या बाजूला खुद्द शहाबुरुजाच्या भिंतीवर इंग्लिशाच्या तोफांच मारा चाललेलाच होता. त्यामुळें ता. २३ डिसेंबर रोजीं शहाबुरुजाच्या भिंतीस खिंडार पडलें. तेव्हां त्या खिंडारांतून किल्ल्यांत प्रवेश करण्याचा इंग्लिशांनीं निश्चय केला. व त्याप्रमाणें त्या दिवशीं रात्रीं ११॥ वाजतां इंग्लिशांचें सैन्य लपतछपत आपआपल्या खंदकांतून जाऊन बसलें. व १२ वाजतां तें सैन्य किल्ल्यावर चाल करून गेलें. या सैन्याचे ३ विभाग करण्यांत आले होते. इंग्लिशांच्या सैन्यापैकीं उजव्या बाजूच्या तुकडीनें शहाबुरुजाच्या डाव्या बाजूकडील उंच खडकावर असलेल्या तोफावर हल्ला करून त्या काबीज कराव्या; व डाव्या बाजूकडील तुकडीनें मराठ्यांच्या उजव्या बाजूकडील तोफा हस्तगत करून बंद पाडाव्या; आणि या दोहोंच्या मधल्या तुकडीनें किल्ल्यांत जेथें खिंडार पडलें होतें, तेथून किल्ल्यांत शिरण्याचा प्रयत्न करावा; असें ठरलें होतें. या ठरलेल्या बेताप्रमाणें इंग्लिशांचें सैन्य ता. २३ डिसेंबर रोजीं मध्यरात्रीं जेव्हा दोंगच्या किल्ल्यावर चालून येऊं लागलें, त्या वेळीं मराठ्यांच्या तोफखान्यानें आणि बंदुकांनीं त्यांच्यावर निरनिराळ्या बाजूंनीं गोळी-बाराचा भयंकर वर्षाव सुरू केला. त्यामुळें इंग्लिशाचे पुष्कळ लोक मरण पावले. तरी पण त्यांतूनहि कांहीं इंग्लिश शिपाई मराठ्यांच्या तोफांजवळ जाऊन पोहोंचले आणि त्यांनीं त्या हस्तगत केल्या. मराठ्यांच्या तोफखान्यावरील गोलंदाज अगदीं शेवटपर्यंत आपलें काम इमानेंइतबारें करीत होते. आणि जेव्हां त्यांच्या तोफा चालेनाशा झाल्या, तेव्हां त्यांनीं आपल्या म्यानांतील तरवारी उपसून बाहेर काढल्या. व त्या तरवारींनीं त्यांनीं इंग्लिश शिपायांना कापून काढिलें. व आपल्या हातून गेलेल्या तोफाहि परत आपल्या हस्तगत कर-

ण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. अशा प्रकारच्या निकरानें मराठ्यांचे शिपाई या लढाईमध्यें लढत होते. अखेरीस रात्रीं २ वाजतां लढाई संपली. आणि दीगच्या किल्ल्यावरील शहाबुरुज हा इंग्लिशांच्या हातीं गेला. त्यानंतर मराठ्यांचें शिल्लक उरलेलें सैन्य दीगच्या किल्ल्याच्या आंत जो बालेकिल्ला होता, त्यांत शिरलें. परंतु तेथेंहि तें फार वेळ न राहतां ता. २४ डिसेंबर १८०४ रोजीं रात्रीं तें सर्व सैन्य तेथून भरतपूरकडे निघून गेलें. व ता. २५ डिसेंबर रोजीं सकाळीं इंग्लिशांनीं दीगचें शहर व किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. या ठिकाणीं होळकरानें टाकून दिलेल्या पुष्कळ तोफा, पुष्कळ धान्य आणि दोन लाख रोकड रुपये इंग्लिशांच्या हातीं लागले.

# भरतपूरचा किल्ला

## आणि

### इंग्लिशांचे तेथील चार पराभव.

दीगच्या लढाईनंतर यशवंतराव होळकर व त्याचें सैन्य भरतपूरच्या आश्रयाला येऊन राहिलें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. भरतपूरवर हल्ला करण्याला इंग्लिशांना यावेळीं हें एक मुख्य आणि तावडतोबीचें कारण झालें, हें तर उघडच आहे. पण याच्याशिवाय आणखीं दुसरींहि कारणें याच्या पाठीमागें होतीं. व त्याकरितां भरतपूरच्या पूर्व इतिहासाकडे वळणें जरूर आहे.

हल्लीं भरतपूरचें संस्थान राजपुताना एजन्सीमध्यें मोडतें. याचें क्षेत्रफळ सुमारें २ हजार चौरस मैल असून येथील हल्लींची लोकसंख्या सहा सात लक्षांच्या वर आहे. व या संस्थानचें हल्लींचें उत्पन्न सुमारें ३० लक्षांपर्यंत आहे. हें संस्थान दिल्लीच्या दक्षिणेस आणि मथुरेच्या पश्चिमेस वसलेलें आहे. श्रीरामचंद्राचा अत्यंत एकनिष्ठ बंधु जो भरत, त्यानें हें वसविलेलें असल्यामुळें याला भरतपूर असें म्हणतात, अशी याच्या नांवाबद्दलची एक जुनी उपपत्ति सांगण्यांत येते. हा प्रांत पूर्वी दिल्लीच्या मोगलांच्या ताब्यांत होता. परंतु या प्रांतांतील डोंगरी मुलुखांत राहणारे जे जाट लोक ते अवरंगजेबाच्या मरणानंतर हळुहळु मुसलमानांच्या लष्करावर हल्ले करूं लागले व त्यांच्यावर विजयही मिळवूं लागले. पुढें त्यांच्यामध्यें सुरजमल जाट हा आपल्या पराक्रमानें प्रसिद्धीला आला व तो आपल्याला राजा असें म्हणवूं लागला. या सुरजमल जाटाचें नांव पानिपतच्या लढाइमध्येंही पुष्कळ प्रामुख्यानें प्रसिद्धीला आलेलें आहे. त्याचा नातु राजा रणजितसिंग हा इ० स० १८०४ मध्यें भरतपूरच्या गादीवर होता. इ०स० १८०३ मध्यें जेव्हां इंग्लिशांच्या दौलतराव शिंद्यांशीं लढाया चालल्या होत्या, तेव्हां हा रणजितसिंग इंग्लिशांच्या बाजूला होता. परंतु त्यावेळीं देखील जरी असले कित्येक राजे इंग्लिशानीं आपल्या तहांनीं आपल्या जाळ्यामध्यें गुंतवून ठेविले होते, तरी त्यांचीं अंतःकरणें खरोखर केव्हांहि आपल्या राजांच्या विरुद्ध आणि इंग्लिशांच्या बाजूचीं असणें शक्य नव्हतें. निरुपाय म्हणून भरतपुरचा रणजितसिंग हा जरी बाह्यात्कारी इंग्लिशांच्या बाजूचा त्या वेळीं झालेला असला, तरी आंतून दौलतराव शिंद्याच्या पराभवा-

बद्दल त्याला हळहळ वाटल्यावांचून राहिली नसावी, असें दिसतें. परंतु शिंद्याचा पराभव होऊन गेल्यानंतर पाठीमागून ही हळहळ वाटण्यापासून कांहीं उपयोग नव्हता. पण दौलतराव शिंद्यांचा जरी १८०३ मध्यें पराभव झाला, तरी १८०४ मध्यें यशवंतराव होळकर क० मॉन्सनविरुद्ध एका पाठीमागून एक विजय मिळवीत चालला आहे, हें पाहून भरतपूरच्या राजाच्या मनामध्यें स्वदेशाभिमानाची ऊर्मि उत्पन्न होणें अशक्य होतें, असें नाहीं. हिंदुस्थानांतील सगळेच लोक असे आहेत कीं, निरुपायामुळें जरी ते गुलामगिरीलाहि खुष झाल्यासारखे दिसत असले, तरी आशेचा संभव दिसूं लागला असतां पूर्वीची त्यांची मनोवृत्ति पालटून त्यांच्यापैकीं प्रत्येक जणाच्या मनामध्यें स्वातंत्र्याचा अभिमान उत्पन्न होतो. तशी कदाचित् भरतपूरच्या राजाची स्थिति झाली असेल. यशवंतराव होळकराचे विजय पाहून हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांना असें वाटूं लागलें होतें कीं, हा शूर पुरुष इंग्लिशांना हिंदुस्थानांतून बाहेर हांकलून लावील; आणि म्हणून ते त्याला स्वाभाविकपणेंच प्रोत्साहनपर पत्रें पाठवीत असले पाहिजेत, व आपल्याला अशा लोकांचें साह्य मिळावें, अशी यशवंतराव होळकराचीही इच्छा असल्यामुळें तोहि हिंदुस्थानांतील राजांना आणि इतर लोकांना आपल्या मदतीसाठीं पत्रें लिहीत असे. अशा विचारसरणीच्या ओघामध्यें कदाचित् यशवंतराव होळकर आणि भरतपूरचा राजा रणजितसिंग, यांच्या दरम्यान कांहीं पत्रव्यवहार सुरू झालेला असणें अगदींच अशक्य होतें, असें नाहीं. किंवा या दोघांच्या दरम्यान अशा स्वरूपाचा प्रत्यक्ष पत्रव्यवहार सुरू झालेला नसला, तरी एखादा बनावट पत्रव्यवहार तयार करण्याचें कौशल्य त्या वेळीं कोणामध्यें नव्हतें, असेंही नाहीं. कारण अशीं बनावट कागदांचीं कित्येक उदाहरणें पूर्वीपासून हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें प्रसिद्ध आहेत. पण तें कसेंही असलें, तरी ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे कीं, या वेळीं भरतपूरच्या राजानें यशवंतराव होळकराला लिहिलेलीं कांहीं पत्रें इंग्लिशांकडून भरतपूरच्या राजाच्या विरुद्ध पुरावा म्हणून पुढें काढण्यांत आलेलीं होतीं. व त्या कारणासाठीं भरतपूरच्या राजाच्या विरुद्ध लढाई पुकारणें जरूर आहे, असें या वेळीं प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें होतें. या वेळीं इंग्लिशांचे होळकराकडून अनेक पराभव झालेले होते; व त्यामुळें त्यांची हिंदुस्थानमध्यें अगदीं नापत होऊन गेली होती आणि होळकराच्या विरुद्ध तर क. मॉन्सन याचें माळव्यामध्यें कांहीं चालूं शकेनासें झालेलें असल्यामुळें वड्याचें तेल वांग्यावर काढण्याच्या न्यायानें दुसऱ्या कोणा तरी इंडियन राजावर आपला पराक्रम गाजवून दाखविणें इंग्लिशांना जरूर झालेलें होतें. व त्या हेतूनें कदाचित् या कार्याकरितां भरतपूरच्या राजाची निवड करण्यांत आलेली असणें शक्य आहे. ज्याचा नाश करावयाचा असतो, त्याच्या डोक्यांतून परमेश्वर आधीं त्याची बुद्धि काढून घेत असतो, हें जसें एक धार्मिक व्यवहारांतील वचन आहे, त्याप्रमाणें इंग्लिशांच्या राजकीय व्यवहारासंबंधानेंहि असें एक वचन तयार करतां येण्यासारखें आहे कीं, इंग्लिशांना ज्याच्या विरुद्ध पुढें लढाई सुरू करावयाची असते, त्याच्या हातचे कांहीं तरी पत्रव्यवहार इंग्लिशांना आधीं सांपडतात ! यशवंतराव होळकर आणि भरतपूरचा राजा यांच्या दरम्यान चाललेला हा पत्रव्यवहार पहिल्यानें कोणाला सांपडला ? तर यशवंतरावाच्या हातून पराभव


धावून मागें मागें हटत चाललेल्या क. मॉन्सनच्या हातीं हा पत्रव्यवहार प्रथम रामपुऱ्याच्या मुक्कामावर लागला ! त्यानें तो लॉर्ड लेक यांच्याकडे पाठविला. त्यानंतर लॉर्ड लेक यांनीं त्याच्याबद्दल विशेष बारकाईनें पुढें आणखी शोध चालविला. टॉमस मर्सर या नांवाचा एक पोलिस ऑफिसर मथुरा येथें होता. त्याला भरतपूरचा राजा आणि होळकर यांच्या दरम्यानच्या पत्रव्यवहारावर नजर ठेवण्याची कामगिरी सांगण्यांत आली. त्यावरून त्यानें आपल्या इंडियन लोकांपैकींच कांहीं लोकांना गुप्त हेराच्या कामावर नेमलें. आणि त्यांनीं अशी गुप्त बातमी काढून टॉमस मर्सर याला कळविली कीं, निरंजन लाल या नांवाचा एक यशवंतराव होळकराच्या तर्फेचा वकील मथुरेमध्यें रहात असतो; आणि त्याच्या मार्फत भरतपूरचा राजा आणि यशवंतराव होळकर यांच्यामधील पत्रव्यवहार चालत असतो. ही बातमी मिळाल्यानंतर निरंजनलाल याला पकडण्यांत आलें. तेव्हां त्याच्या जबानीवरून असा निष्कर्ष काढण्यांत आला कीं, इंग्लिशांना हिंदुस्थानच्या बाहेर घालवून देण्याच्या उद्देशानें भरतपूरच्या राजाचाच नव्हे, तर अंतर्वेदींतील दुसऱ्याहि अनेक राजांचा निरंजनलालच्या मार्फत होळकरांशीं पत्रव्यवहार चाललेला होता.

ही माहिती सांगणारा मथुरेचा निरंजनलाल हा खोटी जबानी देत होता किंवा भरतपूरच्या राजाचीं खरोखरच अशीं कांहीं पत्रें यशवंतराव होळकराला गेलेलीं होतीं, याच्याबद्दलचा निर्णय करण्याला आज निश्चयात्मक असें कांहीं साधन आपल्यापाशीं नाहीं. पण रणजितसिंग आणि यशवंतराव यांच्या दरम्यान असा कांहीं गुप्त मनसुबा चाललेला असला, तरी त्यांत गैर तें काय आहे ? भरतपूरच्या राजानें आपल्या स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां कांहीं प्रयत्न करूं नये कीं काय ? इंग्लिश ग्रंथकार म्हणतात कीं, त्यानें नुकताच आमच्याशीं जो तह केला होता, तो त्यानें मोडावा काय ? त्यानें इंग्लिशांशीं नुकताच १८०३ मध्यें तह केला असेल; पण त्याच्या पूर्वीं कित्येक वर्षें जेव्हां तो जन्माला आला, तेव्हां त्यानें आपल्या जन्मभूमीपाशीं असा एक तह केलेला होता कीं, " हे माते, मी तुझ्याशीं सदोदित इमानानें रहाण्याचा प्रयत्न करीन ! प्रत्येक मनुष्य जन्माला येतो तेव्हां तो आपल्या देशाशीं असा करार करतो, हें इंग्लिशांना माहीत नाहीं काय ? तो आपला पहिला जन्मकालीन करार भरतपूरच्या राजानें काय म्हणून मोडावा ? इंग्लिश ग्रंथकार म्हणतात कीं, आम्ही भरतपूरच्या राजाला या तहामध्यें कित्येक नवीन मुलूख दिला होता; व मराठ्यांना तो जी खंडणी देत असे, तीहि आम्हीं त्याला माफ केली होती ! पण ही मुलखाची देणगी आणि ही खंडणीची माफी यांचा काय अर्थ होतो ? भरतपूरच्या राजानें आपल्या देशाशीं आणि देशबांधवांशीं बेइमानी करून दुसऱ्यांना फितूर व्हावें, यासाठीं त्याला हा एक प्रकारचा लांचच देण्यांत आलेला नव्हता काय ? आणि हें या देणगीचें खरें स्वरूप त्याच्या लक्षांत आल्यानंतर असल्या लांचाचा धिक्कार करून तो जर फिरून आपल्या देशाच्या इमानाला जागूं लागला, तर एखाद्याच्या लांचापेक्षां त्याच्या जन्मभूमीचाच त्याच्या इमानावर परमेश्वराच्या घरीं रुजू होणारा असा जास्त हक्क नाहीं काय ?

पण भरतपूरच्या रणजितसिंगाच्या या पत्रव्यवहाराच्या प्रकरणामध्यें खरेखोटे-पणाचा अंश काय असेल तो असो; परंतु ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, होळकर अंतर्वेदी-मध्यें आपल्या घोडेस्वारांनिशीं इंग्लिशांच्या मुलखांत लुटालूट करीत असतां त्याचें पायदळ आणि त्याचा तोफखाना भरतपूरच्या राजाच्या मुलखांत दीगच्या किल्ल्याच्या जवळ आश्र-याला येऊन राहिला होता. आणि दीगच्या लढाईंत होळकराच्या या सैन्याचा पराभव झाल्यानंतर तें सगळें सैन्य दीगच्या किल्ल्यांतून निघून खुद्द भरतपूरच्या किल्ल्यामध्यें जाऊन राहिलें व दीग आणि भरतपूर या दोन्हीही ठिकाणीं होळकराच्या सैन्याबरोबर भरतपूरच्या राजाचें लष्करहि इंग्लिशांच्या विरुद्ध लढत होतें. या सगळ्या गोष्टींवरून भरतपूरच्या राजाहि हा यशवंतराव होळकराच्या बाजूला त्या वेळीं पूर्णपणें वळलेला असला पाहिजे, असें म्हणावें लागतें. व या कारणामुळें इंग्लिशांनीं भरतपूरच्या राजाशीं लढाई सुरू करण्याचें ठरविलें व त्याकरितां दीगच्या किल्ल्याच्या संरक्षणाची तजवीज करून ता. २८ डिसेंबर १८०४ रोजीं ज लेक हा तेथून निघाला. वाटेंत त्याला दुसऱ्या कित्येक इंग्रजी पलटणींची मदत येऊन मिळाली. व अखेरीस ता. २ जानेवारी १८०५ रोजीं त्यानें भरत-पूरच्या किल्ल्यासमोर येऊन तळ दिला.

हिंदुस्थानामध्यें अनेक किल्ले आहेत. परंतु त्यांपैकीं भरतपूरच्या किल्ल्याचें नांव हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासामध्यें जितकें सुप्रसिद्ध आणि संस्मरणीय झालेलें आहे, तितका मान दुसऱ्या कोणत्याहि किल्ल्याला मिळालेला नाहीं. आणि याचें कारणहि तसेंच महत्त्वाचें आहे. हा किल्ला सर करून घेण्याकरितां इंग्लिश लोक प्रयत्न करीत असतां मरा-ठ्यांच्या शिपायांनीं चार वेळां इंग्लिशांचे हल्ले माघारे परतविले. इंग्लिशांची इतकी नामुष्की आणि इतकी फजिती हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि किल्ल्यानें पाहिलेली नाहीं. हा किल्ला मागाहून कोणाच्याहि ताब्यांत जावो; परंतु जोंपर्यंत हिंदुस्थानचा इतिहास वाचला जात आहे, तोंपर्यंत या किल्ल्यावरील मराठ्यांच्या मर्दुमकीचें निशाण प्रत्येक इंडियन मनुष्याच्या अंतःकरणामध्यें सदोदित फडकत रहाण्याचें केव्हांहि थांबणार नाहीं! आणि कोणीहि इंग्लिश लोक आपल्या पराक्रमाची कितीहि बढाई मारीत असले आणि त्यांना हल्लीं भरत-पूरच्या संस्थानांत कितीहि सन्मान मिळत असले, तरी त्यांनीं तो भरतपूरचा किल्ला पाहिला म्हणजे "अरेरे! याच किल्ल्यानें चार वेळां आमची नामुष्की केली!" अशी आठवण होऊन त्यांना लज्जेनें खालींच मान घालावी लागत असली पाहिजे. या किल्ल्याच्या प्रत्येक भिंतीवर मराठ्यांचे पराक्रम अजूनहि लिहिलेले आहेत आणि या किल्ल्याच्या खंदकाच्या पाण्यामध्यें अजूनहि मराठ्यांच्या मर्दुमकीचीं प्रतिबिंबें दिसत आहेत. बाकीच्या कोणत्याहि किल्ल्यांचे बुरुज आपआपल्या पायांवर अजूनहि उभे असोत; परंतु ज्यानें चार वेळां इंग्लि-शांचे हल्ले माघारे परतविले, तो फक्त भरतपूरचा एकच काय तो किल्ला आपली मान वर करून आपल्या पायावर उभा राहण्याला योग्य आहे!

भरतपूर हें शहर त्यावेळीं फार भरभराटीस आलेलें होतें. तेथील लोक शूर आणि श्रीमंत असल्याबद्दल त्यांचा लौकिक होता. येथें चवऱ्यांचीं कामें अद्यापिहि अप्रतिम रीतीनें


४ पहिलें खिंडार
१३ दुसरें खिंडार
१० तिसरें खिंडार
इंग्लिशांच्या छावणीची पहिली जागा
२ जानेवारी ते ६ फेब्रुवारी १८०५
घोडेस्वार
जानेवारी
यशवंतराव होळकर व अमीरखान यांचे घोडेस्वार ता. २९

करण्यांत येतात. या शहराचा विस्तार सुमारें ८ मैलांचा असून त्याच्या भोंवतीं एक मातीची जाड भिंत आहे, आणि त्याच्या सभोंवतीं पाण्यानें भरलेला एक मोठा खंदक आहे. आणि या शहराच्या पूर्व बाजूच्या टोंकाला भरतपूरचा तो सुप्रसिद्ध किल्ला बांधण्यांत आलेला आहे. हा किल्ला एका उंच डोंगरावर असून त्याच्या भोंवतालचा खंदक १५० फूट रुंद आणि ६० फूट खोल होता. या खंदकाच्या पाठीमागें सुमारें ८० फूट उंचीची दगडाची तटबंदी असून त्याच्यावर आणखी सुमारें तितक्याच उंचीची दुसरी एक दगडी भिंत चौफेर बांधलेली आहे. या किल्ल्याला एकंदर नऊ दरवाजे आहेत. व किल्ल्याच्या आंतमध्यें एक मोठा तलाव आहे. त्याचें पाणी बाहेर सोडलें, म्हणजे किल्ल्याच्या सभोंवतालचा खंदक त्या पाण्यानें भरून जातो. अशी व्यवस्था असल्यामुळें हा किल्ला दुर्भेद्य झालेला आहे. अशा मजबूत किल्ल्यावर त्याचें संरक्षण करण्याकरितां जाट आणि मराठे यांच्यासारखे शूर लोक हातांत शस्त्रें घेऊन उभे राहिले असतां, इंग्लिशांना चार वेळां मागें परतावें लागलें आणि या किल्ल्यानें आपला अजिंक्यपणाचा अलौकिक मान कायम राखला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. खुद्द इंग्लिशांनीं आपल्या मोडलेल्या बागनेटांच्या टोकांनीं या किल्ल्याच्या भिंतीवर " अजिंक्य " अशीं ठळक सुवर्णाक्षरें लिहून ठेवलेलीं इतिहास अद्यापिहि प्रत्येकाला दाखवीत आहे !

अशा या किल्ल्याच्या समोर ता. २ जानेवारी १८०५ रोजीं जेव्हां ज. लेक यांचें सैन्य येऊन पोहोंचलें, तेव्हां या ठिकाणीं पुढल्या दोन महिन्यांत आपले चार वेळां पराभव होणार आहेत, याची त्या इंग्लिश सैन्याला क्वचितच कल्पना आली असेल. क. मॉन्सनच्या पराजयाचा सूड उगविण्याकरितां इतक्या प्रयासानें धडपडणारा ज. लेक याला येथें होळकरावर सूड तर उगवितां आला नाहींच, पण उलट चार वेळां ज. लेक याच्या सैन्याचा पराभव झाला. इंग्लिशांच्या अभिमानाची येथें जमिनीला पाठ लागली; इंग्लिशांचीं सर्व कपटकारस्थानें येथें चिखलांत लोळविलीं गेलीं; आणि इंग्लिशांच्या गर्वाचा शिरपेंच येथें मराठ्यांच्याकडून खालीं उतरविला गेला ! या ठिकाणीं एकामागून एक इंग्लिशांचे जसजसे पराभव होऊं लागले, तसतसें इंग्लिशांनीं आतांपर्यंत जिंकलेल्या हिंदुस्थानांतील सर्व राजांचें लक्ष या भरतपूरच्या वेढ्याकडे जास्तच वेधलें जाऊं लागलें. आणि आमच्या जिंकलेल्या किल्ल्यांचे फुटलेले बुरुज हा भरतपूरचा किल्ला फिरून बांधणार आणि आमच्या परतन्त्र किल्ल्यांवर हा भरतपूरचा किल्ला फिरून स्वातंत्र्याचीं निशाणें आणून रोंवणार, असें गुलामगिरीनें गिळलेल्या सर्व लोकांना वाटूं लागलें ! कारण, भरतपूरच्या किल्ल्यावरील जाट आणि मराठे शिपाई अशींच अद्भुत पराक्रमाचीं कामें त्यावेळीं करीत होते !

## इंग्लिशांचा पहिला पराभव.

ता. २ जानेवारी १८०५ रोजीं इंग्लिशांची फौज भरतपूरच्या किल्ल्यासमोर येऊन दाखल झाल्यानंतर लगेच ता. ३ रोजीं हल्ल्याच्या तयारीला सुरुवात झाली. किल्ल्याच्या समोरच इंग्लिशांची छावणी होती व ती छावणी आणि किल्ला यांच्या दरम्यान, पण किल्ल्याच्या बरीच जवळ, एक मोठी आंबराई (१) होती. या आंबराईच्या आश्रयानें किल्ल्या-

च्या जवळ जवळ खंदक खणीत खणीत जाण्याची सोय होती; म्हणून ता. ४ जानेवारी रोजीं ले. क. मैटलंड यानें आपल्या हाताखालील एका टोळीच्या साहाय्यानें ती आंबराई आपल्या हस्तगत करून घेतली. नंतर ता. ५ रोजीं रात्रीं या आंबराईच्या पुढें १८ पाउंडरच्या सहा तोफांकरितां पहिली बॅटरी ( २ ) उभारण्यांत आली. आणि तिची बाकीची सर्व तयारी झाल्यानंतर ता. ७ च्या सकाळपासून त्या तोफांमधून शहरच्या भिंतीवर गोळे फेकण्याचें काम सुरू झालें, व त्याच दिवशीं दुपारीं पहिल्या बॅटरीच्या शेजारींच उजव्या हाताला दुसरी एक बॅटरी ( ३ ) तयार करण्यांत आली व तेथून एकंदर आठ तोफांचा मारा किल्ल्यावर आणि शहरावर सुरू करण्यांत आला. इंग्लिशांच्या या तोफांवर किल्ल्यांतून तितक्याच जोराचा उलट मारा सुरू करण्यांत आला होता. व अशी ही दुतर्फा तोफांची लढाई ता.७ पासून ता. ९ जानेवारीपर्यंत एकसारखी चालली होती. या लढाईत इंग्लिशांच्या एखाद्या गोळ्यानें भिंतीला कोठें भोंक पाडलें, तर तें ताबडतोब बुजवून टाकण्यांत येत असे. त्यामुळें किल्ल्याला किंवा किल्ल्यांतील लोकांना फारसें नुकसान न पोंचतां खालच्या उघड्या मैदानावरील इंग्रजी शिपायांचा मात्र किल्ल्यावरील गोळीबारानें पुष्कळ संहार होत होता. अशी लढाई दोन दिवस एकसारखी चालली असतांना ता. ९ रोजीं तिसरे प्रहरीं शहराच्या भिंतीच्या एका भागाला गोळा लागून तेथील कांहीं थोडासा भाग ( ४ ) ढासळला. तोफांचे गोळे लागून रोज जसे भिंतीचे कांहीं भाग ढासळत होते,तसांतलाच हाही एक होता. पण इंग्लिशांच्या गोलंदाजांना असें वाटलें कीं, भरतपूरच्या भिंतीला आपण हें खरोखरच एक मोठें भगदाड पाडलेलें आहे ! इंग्लिश अधिकारी दीगच्या लढाईंतील विजयामुळें गर्वानें फुगून गेलेले होते;मराठे आणि जाट यांच्या पराक्रमाची आणि भरतपूरच्या भिंतीच्या मजबुतीची त्यांना योग्य कल्पना नव्हती, व त्यामुळें ही जी थोडीशी भिंत ढासळली आहे, तेवढयामधूनही आपण भरतपूरच्या शहरांत सहज प्रवेश करूं शकूं, असें त्यांना वाटलें. त्याप्रमाणें त्यांनीं हें खिंडार पाडल्याची बातमी मोठ्या हर्षानें ज. लेक यांना ताबडतोब कळविली, व हें खिंडार किती मोठें आहे वगैरेबद्दल नीटसा तपास न करितां तितक्याच हर्षानें त्याच म्हणजे ता. ९ च्या रात्रीं त्यांनींहि हल्ला करण्याचा हुकूम दिला. परंतु हें भिंतीला पडलेलें खिंडार फारसें मोठें मुळींच नव्हतें, व तें लहान असल्यामुळेंच इंग्लिशांच्या सैन्याला त्यांतून प्रवेश करितां येईना, व अखेरीस यांना तेथून पराभव पावून माघारें यावें लागलें. हें खिंडार इतकें लहान होतें कीं, ते मराठयांनीं रातोरात बुजवून दुसऱ्या दिवसाला त्यांनीं तेथील भिंत जशीच्या तशी तयार केली असती. परंतु त्यांना तसें करण्याला अवकाश सांपडूं देऊं नये या हेतूनें त्याच रात्रीं इंग्लिशांनीं तेथून आंत शिरण्याची घाई केली. या चुकीचें प्रायश्चित्त त्यांना त्याच रात्रीं ताबडतोब मिळालें !

शहराच्या तटावर हल्ला करण्यरकरितां ले. क. रायन, मे. हॉक्स आणि ले. क. मैटलंड अशा तीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली. यांपैकीं ले. क. रायन यानें इंग्लिश तोफखान्याच्या समोर डाव्या बाजूला मराठ्यांनीं तटाच्या बाहेर मोर्चा बांधून ज्या तोफा ( ५ ) सुरू केल्या होत्या, त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा पाडाव करावा आणि

नंतर तिकडून निमडा नांवाच्या दरवाजानें तटाच्या आंत शिरावें, असा त्याला हुकूम होता. त्याचप्रमाणें मे. हॉक्स यानें उजव्या बाजूवर हल्ला करून तिकडील तोफा हस्तगत कराव्या आणि तटाबाहेर आलेले मराठे लोक तटाच्या दरवाजांतून आंत पळून जातील त्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांच्यामध्यें मिसळून इंग्लिशांच्या शिपायांनीं आंतमध्यें आपला प्रवेश करून घ्यावा, अशी कामगिरी या दुसऱ्या तुकडीकडे सोंपविण्यांत आली होती. अशा दोन बाजूच्या या दोन तुकड्यांनीं तटावरील मराठ्यांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें असतां, मध्यभागीं पडलेल्या खिंडाराच्या वाटेनें ले. क. मैटलंड यानें आपल्या हाताखालील शिपायांसह शहरांत शिरण्याचा प्रयत्न करावा, असें ठरलें होतें. त्याप्रमाणें ता. ९ रोजीं रात्रीं ७ वाजतां किल्ल्याजवळ जाण्याकरितां खणलेल्या खंदकामध्यें या तिन्हीही तुकड्यांतील लोक मुकाट्यानें जाऊन बसले. व बरोबर आठ वाजतां ते आपल्या खंदकांतून बाहेर पडून तटावर चाल करण्याकरितां निघाले. हे इंग्रजांचे शिपाई पहिल्या हल्ल्याकरितां ता. ९ रोजीं रात्रीं ज्या रस्त्यानें तटाच्या खंदकाजवळ गेले, तो रस्ता नकाशामध्यें ( ६-६-६ ) या आंकड्यांनीं दाखविलेला आहे. हा रस्ता कित्येक ठिकाणीं फार अवघड होता व बहुतेक ठिकाणीं या वाटेंत दलदली होत्या. त्यामुळें काळोखांतून या रस्त्यानें जातांना इंग्लिशांच्या शिपायांना फार त्रास पडला. शिवाय वाटेंतील दलदलींच्या वगैरे अडचणींमुळें त्या तिन्ही तुकड्यांतील लोकांना निरनिराळ्या आणि व्यवस्थित रीतीनें चालतां येईना. त्यामुळें सहजच त्यांच्या रांगा मोडल्या, आणि अखेरीस उजव्या बाजूकडे जावयाचे त्यांच्यांतील कांहीं डाव्या बाजूकडे गेले आणि जे डाव्या बाजूकडे जावयाचे ते उजव्या बाजूकडे गेले. आणि अशा रीतीनें शिस्त मोडून त्यांच्यांत सगळा गोंधळ उत्पन्न झाला. तरी पण त्या गोंधळांतूनही आणि मराठ्यांच्या तोफांच्या माऱ्यांतूनही उजव्या आणि डाव्या बाजूच्या तुकड्यांनीं तटाबाहेरच्या तोफा हस्तगत करून घेण्याचीं आपलीं कामें कशींबशीं पार पाडलीं. परंतु त्यांना तटाच्या आंतमध्यें कांहीं केल्यानें जातां आलें नाहीं तें नाहींच. पण तटाच्या आंत प्रवेश करण्याचें मुख्य काम ले. क. मैटलंड यांच्या हाताखालील मधल्या तुकडीकडे मुख्यत्वें करून सोंपविण्यांत आलें होतें; परंतु या रात्रींच्या हल्ल्यांत सर्वांपेक्षां या मुख्य तुकडीचीच जास्त गाळण उडून गेलेली होती. या तुकडींतील लोक तटाच्या खिंडारांतून आंत प्रवेश करणार होते. पण आधीं ते त्या तटाच्या भिंतीजवळ जाणार कसे ? हे इंग्रजी शिपाई आणि तटाची भिंत यांच्यामध्यें एक मोठा खंदक होता. व त्या खंदकांतून पलीकडे गेल्याशिवाय त्यांना तटाच्या खिंडारावर चढून जाणें शक्य नव्हतें. या पहिल्या खिंडाराच्या ( ४ ) समोरच्या बाजूनें जेव्हां क. मैटलंडचे लोक खंदकामध्यें उतरूं लागले, तेव्हां त्यांच्यावर दोन्ही बाजूंच्या बुरुजांवरून तोफांचा भयंकर मारा होऊं लागला. तरी पण अशा खंदकांतूनही त्या संकटांतून गळाभर पाण्यांतून कांहीं लोक पलीकडे गेले, व जेथें खिंडार पडलें होतें, तेथपर्यंत वर चढले. पण या शिपायांची संख्या फक्त काय ती २०।२२च होती. आपल्याप्रमाणेंच आपल्या मागून आणखी पुष्कळ शिपाई वर चढून येतील, असें त्यांना वाटत होतें. परंतु दुसरे कोणीही येऊं शकले नाहींत; आणि जे लोक वर खिंडारांत

येऊन बसले होते, त्यांच्यावर उजव्या बाजूच्या बुरुजामधून एकसारखा गोळीबार चालला होता. अशा स्थितींत लें. स्वीटनहॅम आणि क्रेसवेल यांना जखमा लागून ते पडले; व ले. क. मैटलंड यांच्याही डोक्याला गोळी लागून ते मरण पावले. त्यामुळें सगळयाच इंग्रजी सैन्यामध्यें गोंधळ उत्पन्न होऊन मध्यरात्रीनंतर तें सैन्य माघारें वळलें. त्या वेळीं इंग्लिशांच्याकडील पुष्कळ शिपाई व त्याचे अधिकारी किल्ल्यावरील तोफांच्या माऱ्याखालीं मरण पावले. इंग्लिशांचें सैन्य याप्रमाणें पराभव पावून आपल्या छावणीकडे परत पळत चालले असतां कशाचा तरी आश्रय घेत घेत परत जावे ही शिस्त त्याच्यामध्यें न राहिल्यामुळें त्या उघड्या मैदानावर उघड्या सांपडलेल्या शिपायांवर किल्ल्यातील लोकांनीं नेमक्या तोफा मारून त्यांना तेथल्यातेथें पाडलें. त्यांपैकीं जे जखमी होऊन अर्धवट स्थितीमध्यें कण्हत पडलेलें होते, त्यांना उचलून नेण्याचीही कोणी काळजी घेतली नाहीं. जो तो आपापला जीव घेऊन छावणीकडे परत आला. या हल्ल्यामध्यें एका रात्रींत इंग्लिशांच्या बाजूकडील जखमी आणि मेलेल्या लोकांची मिळून संख्या साडेचारशेंच्यावर गेली होती, व यामध्यें जखमी व मेलेल्या युरोपियन लोकांची संख्या अडीचशें होती. या एकंदर वर्णनावरून भरतपूरच्या या पहिल्या हल्ल्याचें स्वरूप किती भयंकर आणि किती नाशकारक होतें, हें लक्षांत येण्यासारखें आहे.


## इंग्लिशांचा दुसरा पराभव.

याप्रमाणें ता. ९ जानेवारी रोजीं इंग्लिशांचा पहिला प्रयत्न निष्फळ झाला; पण त्यामुळें त्यांचा पुढील प्रयत्न थांबला, असें मात्र झालें नाहीं. त्यांनीं फिरून दुसऱ्या खेपेला तटावर हल्ला करण्याची तयारी सुरू केली. व पहिल्या पराभवानंतर ता. १० जानेवारी १८०५ रोजीं भरतपूरच्या किल्ल्यासमोरील छावणीमधून लॉर्ड लेक यांनीं मार्क्किस वेलस्लीला जें पत्र लिहिलें, त्यांत आपले अधिकारी थोडक्याच दिवसांत तो किल्ला हस्तगत करून घेतील, अशी आशा ( I hope in a very few days their excellent conduct will be rewarded by the possession of the place ) व्यक्त करण्यांत आली होती. परंतु लॉर्ड लेक हे जरी मार्क्किस वेलस्ली यांच्या संतोषासाठीं आपल्या पत्रांतून अशा आशा व्यक्त करीत होते, तरी त्या आशा परिपूर्ण व्हावयाच्या नव्हत्या! कारण, भरतपूरचा वेढा यशस्वी होऊन व्हावयाचाच नाहीं, असा इंग्लिशांचें दुर्दैव आणि मराठ्यांचा पराक्रम या दोघांनीं मिळून निश्चयात्मक रीतीनें निश्चय करून ठेविलेला होता! परंतु पुढें काय होणार, हें मनुष्याला आधीं समजत नसल्यामुळें इंग्लिशांनीं दुसऱ्या हल्ल्याची तयारी फिरून पहिल्या इतक्या जोरानें सुरू केली. पहिल्या हल्ल्याचे वेळीं भिंतीला जें भगदाड पडलें होतें, तें मराठ्यांनीं रात्रीच्या युद्धानंतर दुसऱ्या दिवसाला ताबडतोब बंद करून टाकलें तेव्हां इंग्लिशांनीं ती अपेशी झालेली जागा सोडून दिली. आणि त्याच्या उजव्या हाताला कांहीं अंतरावर भिंतीला भोंक पाडण्याला त्यांनीं दुसरी एक जागा पसंत केली. व त्या जागेच्या समोर त्यांनीं पहिल्या दोन बॅटरींच्या शेजारींच थोडी उजव्या हाताला अशी तिसरी एक बॅटरीची जागा ( ७ ) तयार केली व

तेथून त्यांनीं ६ तोफा चालू केल्या. व त्याशिवाय त्याच्या आसपास कांहीं निरनिराळ्या ठिकाणीं ( ८-९-१०-११ ) त्यांनीं आणखी २१ तोफांकरितां मोर्चे बांधले व हें सगळें काम पुरें झाल्यानंतर तटाच्या भिंतीला जेथें भोंक पाडावयाचें होतें, त्या ठिकाणीं ता. १६ जानेवारी रोजीं या एकंदर २६ नवीन तोफांचा भडिमार त्यांनीं सुरू केला. इतक्या तोफांच्या गोळीबारापुढें बिचाऱ्या मातीनें बांधलेल्या भिंतीचें काय चालणार आहे? त्यामुळें त्या दिवशीं संध्याकाळीं भिंतीला थोडें भोंक पडलें. परंतु रातोरात मराठ्यांनीं तेथें मेढेकोट बांधून त्या पडलेल्या भिंतीची वाट बुजवून टाकली. हें जेव्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं इंग्लिशांनीं पाहिलें. तेव्हां त्यांनीं फिरून त्याच मेढेकोटावर आपल्या गोळ्यांचा वर्षाव सुरू केला व तेथील खिंडार आणखी थोडें मोठें केलें व नंतर ता. २१ जानेवारी १८०५ रोजीं इंग्लिशांनीं भरतपूरच्या तटावर दुसरा हल्ला करण्याचें ठरविलें.

जानेवारीच्या ९ तारखेला इंग्लिशांचा पहिला हल्ला अयशस्वी झाला आणि २१ तारखेला त्यांनीं दुसरा हल्ला करण्याचें ठरविलें. या १०।११ दिवसांच्या अवकाशामध्यें इंग्लिशांच्या तोफांचा जसा शहराच्या तटावर मारा चाललेला होता, तसाच उलट मारा तटाच्या भिंतीवरून जाट आणि मराठे यांच्याकडूनही इंग्लिशांच्या सैन्यावर तितक्याच जोरानें करण्यांत येत होता. शत्रूच्या खालच्या सैन्यावर मारा करावयाचा आणि तटाच्या भिंतीवर जेथें कांहीं मोडतोड होईल तेथील डागडुजी करावयाची, अशीं दुहेरीं कामें तटावरील शिपायांना करावीं लागत होतीं. आणि हीं कामें भरतपूरच्या तटावर भरतपूरचे शिपाई करीत असतांना भरतपूरच्या राजघराण्यांतील योद्धेही त्यांना धीर आणि प्रोत्साहन देण्याला त्यांच्या जवळ उभे असत. अशा एका प्रसंगीं भरतपूरचा राजा रणजितसिंग याचा थोरला मुलगा रणधीरसिंग, हा तटावरील आपल्या शिपायांच्या बरोबर काम करीत असतांना त्याच्या हाताला गोळा लागून त्याचा हात तुटून पडला. त्याचप्रमाणें त्याच्या चुलत्याला लागून तोही तटाच्या भिंतीवर मरण पावला. हा चुलता ता. ९ च्या रात्रीच्या हल्ल्यामध्यें तटाच्या खालीं जे इंग्लिश शिपाई मरून पडले होते, त्यांना पहाण्याकरितां तटावर आला होता आणि त्यावेळीं इंग्रजी तोफखान्यावरील एक गोलंदाज, कॅ. नेली, यानें त्याच्यावर नेम धरून आपला गोळा टाकला आणि त्यानें तो नेमका मारला गेला, असें हरकाऱ्यांच्या सांगण्यावरून इंग्रजी इतिहासामध्यें लिहिण्यांत आलें आहे. परंतु हा हेतु संभवनीय दिसत नाहीं. भरतपूरच्या राजघराण्यांतील लोक हे जातीनें जाट असून पराक्रमानें मोठे शूर होते. आपल्या शहराच्या तटावर शत्रूचे हल्ले होत असतांना त्या तटावर जाऊन आपल्या शिपायांच्या कामावर देखरेख करणें, त्यांना योग्य हुकूम देणें, त्यांना मदत करणें, इत्यादि महत्त्वाचीं कामें पार पाडण्यासाठींच हे भरतपूरच्या राजघराण्यांतील पुरुष तटावर गेलेले असले पाहिजेत, हें अगदीं उघड आहे. त्यांच्या या कृत्यांना हलके हेतु लावणें हें हलकेपणाचें कृत्य आहे. ज्या वीर पुरुषांचे देह आपल्या शहराच्या तटबंदीचें संरक्षण करण्याच्या पवित्र कार्यामध्यें पतन पावले, त्यांची स्मृति सदोदित पवित्र राखली जावी असें त्यांच्या देशबांधवांना वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे.

भरतपूरच्या तटाला इंग्लिश लोक वेढा देऊन बसले होते आणि त्यांच्या वेढ्याच्या आंत भरतपूरच्या राजाचें सैन्य सांपडलेलें होतें. अशा स्थितींत भरतपूरचे शिपाई भरतपूरचें



भरतपूरचा किल्ला.

संरक्षण शक्य तितक्या शौर्यानें आंतून करीतच होते; परंतु जेव्हां असे वेढे पडतात, तेव्हां वेढा घालणाऱ्या लोकांचा जोर कमी पाडण्याकरितां त्यांच्यावर कोणी तरी बाहेरूनही हल्ले करावे लागतात. म्हणजे बाहेरच्या शिपायांचा हल्ला आणि तटाच्या आंतील शिपायांचा हल्ला अशा दोन हल्ल्यांच्यामध्यें वेढा घालणारे लोक सांपडले असतां, साहजिकपणेंच ते जेरीस येतात. तेव्हां अशा प्रकारची कांहीं तरी युक्ति आपणही या ठिकाणीं योजिली पाहिजे, अशा कल्पना भरतपूरच्या राजाच्या मनामध्यें येऊं लागल्या. भरतपूरचें सैन्य वेढलेलें होतें; पण इंग्लिशांचें जे सैन्य भरतपूरला वेढा घालून बसलें होतें, त्यांना बाहेरच्या चारी बाजू मोकळ्या होत्या व त्यामुळें ते बाहेरून वाटेल तिकडून सैन्याची मदत आणि अन्नाची सामग्री वाटेल तितकी आणूं शकत असत. ता. १८ जानेवारी रोजीं ज. स्मिथ हा आग्र्याहून सुमारें १६०० लोकांची मदत घेऊन वेढा घालणाऱ्या इंग्लिशाच्या छावणींत येऊन दाखल झाला. त्याचप्रमाणे कॅ. वॉल्श हा एक अन्नसामग्रीचा पुरवठा १० हजार बैलांवर घालून मथुरेहून भरतपूरला आणीत होता त्याशिवाय आग्र्याहून धान्यानें भरलेले ५० हजार बैल, दारूनें भरलेल्या ८०० गाड्या, मोठमोठ्या तोफांचे ८ हजार गोळे आणि ६ लाख रुपयांच्या थैल्या, असें सामान भरतपूर येथील इंग्रजी सैन्याच्या मदतीला पाठविण्यांत येत होतें. तेव्हां वेढा घालणाऱ्या सैन्याला बाहेरून अशी वाटेल तितकी मदत मिळत गेली आणि त्याचा बाहेरून कांहीं प्रतिकार झाला नाहीं, तर तटबंदीच्या आंत सांपडलेलें सैन्य कितीही शौर्यानें लढत असलें, तरी त्याचा कितीसा निभाव लागणार आहे ? ही गोष्ट लक्षांत आणून वेढा घालणाऱ्या इंग्लिशांवर बाहेरून हल्ले करविण्याची भरतपूरच्या राजाने अशी योजना केली कीं, त्या वेळीं होळकराचा बाजूचा प्रसिद्ध पठाण सेनापति, मीरखान, हा जो बुंदेलखंडामध्यें आपल्या हाताखालील हजारों पेंढाऱ्यांसह इंग्लिशांच्या मुलखांत लुटालूट करीत होता, त्याच्याकडे राजानें सहा लाख रुपये पाठवून भरतपूरला वेढा घालणाऱ्या इंग्लिशांची रसद तोडण्याकरितां आणि त्याच्यावर बाहेरून हल्ले करण्याकरितां त्याला अतिशय त्वरेनें बोलाविलें व त्याप्रमाणें मीरखानाचे घोडेस्वार लौकरच दाखल होऊन भरतपूरला वेढा देणाऱ्या इंग्लिश सैन्याच्या सभोंवतीं घिरट्या घालूं लागलें, व त्यांच्याकरितां मथुरेहून आणि आग्र्याहून जी मदत येणार होती, म्हणून वर सांगितलें आहे, त्यांच्यावरही त्यानें हल्ले करून त्यांना जेरीस आणलें आणि बाहेरच्या सैन्याला यशवंतराव होळकर, बापूजी शिंदे, मीरखान, वगैरे लोकांकडून अशी दहशत पोंचूं लागल्यामुळें तटाच्या आंतील लोकांचें काम थोडें हलकें झालें आणि त्यांना यशाची जास्त उमेद वाटूं लागली. व त्यामुळें ते आपल्या तोफांचा मारा बाहेरच्या इंग्रज शिपायांवर जास्त जोराने चालवूं लागले.

अशा रीतीनें मराठ्यांच्या सैन्याचा मारा इंग्लिशांवर चालला असतां आणि इंग्लिशांच्या तोफांचे गोळे उलट तटावर येऊन पडत असतां ता. २१ जानेवारी रोजीं तटाच्या भिंतीला दुसरें खिंडार ( १२ ) पडलें. परंतु तटाच्या भिंतीला जरी हें खिंडार पडलें, तरी इंग्लिशांनीं एकदम त्या खिंडारावर चालून जाण्याची घाई केली नाहीं. कारण, मागच्या

अनुभवानें त्यांना पुष्कळ दहशत बसली होती. ता. ९ जानेवारीच्या पहिल्या हल्ल्याच्या रात्रीं इंग्लिश शिपाई खंदकाजवळ गेले, परंतु त्यांना खंदकांतून पलीकडे जातां येईना. तसा प्रसंग फिरून दुसऱ्या खेपेला येऊं नये, म्हणून ज्या ठिकाणीं हें दुसरें खिंडार ( १२ ) पडलें होतें, त्याच्या खालच्या खंदकाची स्थिति कशी काय आहे हें आधीं पाहून येण्याचें त्यांनीं योजिलें. व त्याकरितां इंग्लिशांनीं एक नवीनच क्लृप्ति काढली. नेटिव्ह घोडेस्वारांच्या तिसऱ्या पलटणींतील एक हवालदार आणि दोन शिपाई अशा तिघांना त्यांनीं तेथील खंदकाची लांबीरुंदी आणि पाण्याची खोली पाहून येण्यासाठीं धाडण्याला तयार केलें. पण ते तिघे जण राजरोसपणें ही माहिती काढण्यासाठीं खंदकाच्या जवळ गेले असते, तर तटाच्या भिंतीवरील शिपायांनीं त्यांना ताबडतोब गोळ्या घालून मारून टाकलें असतें व आपल्या खंदकाची लांबीरुंदी सांगण्याकरितां त्यांना त्यांनीं परत जाऊंच दिलें नसतें ! तेव्हां तटावरच्या शिपायांना फसविण्याकरितां इंग्लिशांनीं आपल्या कल्पक डोक्यांतून एक कपटाची युक्ति काढली. व त्या युक्तीप्रमाणें या तीन शिपायांनीं आपल्या अंगावरचे इंग्रजी पलटणीचे पोशाख काढून टाकले, साधे कपडे घातले आणि घोड्यावर बसून ते खंदकाकडे दौडत चालले ! व हे आपली पलटण सोडून आणि फितुरी करून मराठ्यांना मिळण्याला जात आहेत असें भासविण्याकरितां दुसरे कांहीं शिपाई त्यांचा पाठलाग करीत बऱ्याच अंतरावरून पाठीमागून जाऊं लागले ! व या लबाडीची पुरी बतावणी करण्याकरितां ते त्यांच्यावर आपल्या बंदुकाही झाडूं लागले ! मात्र त्या बंदुकांमध्यें गोळी घातलेली नसून ते सगळे वायबार होते ! असा खोटा पाठलाग मागून कांहीं अंतरावरून चालला असतां पुढले ते तीन नेटिव्ह शिपाई तटाच्या खंदकाजवळ येऊन पोहोंचले. व त्या तटावरील शिपायांना हाक मारून त्या तिघांपैकीं जो हवालदार होता तो म्हणूं लागला कीं ". आम्हांला या बहांचोद फिरंग्यांचा ( मि. थॉर्न यानें असेच शब्द आपल्या हकीकतीमध्यें घातले आहेत. ) अगदीं वीट आला आहे ! त्यांची चाकरी सोडून आम्हांला तुमच्यांत येऊन मिळावयाचें आहे ! तेव्हां आंत येण्याला वाट कोठून आहे ती आम्हांला चटकन् दाखवा ! " तटावरच्या शिपायांना हें खरेंच वाटलें. या बतावणींत इंग्लिशांचें कांहीं तरी कपट असावें, असा संशय त्या शूर आणि निष्कपटी शिपायांना मुळींच आला नाहीं. त्या वेळीं स्वदेशभक्ति जागृत झाल्यामुळें पश्चात्ताप पावलेले पुष्कळ शिपाई जसे नेहमीं इंग्रजांची नोकरी सोडून मराठ्यांना येऊन मिळत असत, त्यांच्यासारखेच हेहि कोणी तरी असले पाहिजेत, असें समजून तटावरच्या शिपायांनीं त्यांना एक दरवाजा दाखविला. तेव्हां ते तिघे शिपाई त्या खंदकाच्या कांठाकांठानें जेथें तें दुसरें खिंडार ( १२ ) पडलें होतें, त्याच्याजवळून त्या दरवाज्याकडे जाऊं लागले. व जातां जातां त्यांनीं त्या खंदकाची सर्व परिस्थिति बारकाईनें पाहून घेतली. हें त्यांचें काम झाल्याबरोबर त्यांनीं आपले घोडे वळविले आणि ते भरधांव पळत इंग्रजी छावणीकडे निघून गेले ! हें पाहिल्यानंतर त्यांची लुच्चेगिरी तटावरील लोकांच्या लक्षांत आली व त्यांनीं लगेच त्यांच्या घोड्यांच्या

पाठोपाठ आपल्या बंदुकीच्या गोळ्या पाठविल्या. परंतु ते गोळीच्या टप्प्याच्या पलीकडे गेलेले असल्यामुळें गोळीचा परिणाम त्यांच्यावर होऊं शकला नाहीं. आणि ते सुरक्षितपणें आपल्या छावणींत जाऊन पोहोंचले. व तेथें गेल्यावर त्यांनीं आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अशी माहिती सांगितली कीं, खंदक फारसा रुंद नाहीं व फारसा खोलही दिसत नाहीं; व भिंतीला जें खिंडार पडलें आहे, तेंही बरेंच खालीं असून तेथपर्यंत वर चढून जाणें फारसें कठिण होणार नाहीं. ही माहिती त्यांनीं कळविल्यानंतर त्यांच्या या विश्वासघाताच्या कामगिरीबद्दल त्यांना ताबडतोब ५०० रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें. व त्यांना नोकरीमध्यें कायमची बढतीहि मिळाली.

आधीं आपल्या देशाचें स्वातंत्र्य नष्ट करण्याकरितां दुसऱ्याची नोकरी पतकरणें हें अधमपणाचें ! आणि त्यांतून आपले स्वदेशबांधव आपल्या स्वराज्याच्या वैभवासाठीं आपापल्या किल्ल्यांचें आणि इतर ठिकाणचें संरक्षण करीत असतां त्यांना अशा विश्वासघातानें फसविणें हें तर त्याहूनही अधमपणाचें काम होय ! हा विश्वासघात करून त्या तिघां नराधमांनीं आपल्या नोकरीमध्यें कायमची बढती करवून घेतली असेल; पण असल्या या विश्वासघातकी नराधमांच्या विश्वासघातानें त्यांच्या देशाच्या स्वातंत्र्याची कायमची हानि होते, हे कोणाच्या लक्षांत येऊं नये काय ? हे तिघे इसम कोणत्या देशांत जन्मलेले होते ? तर हिंदुस्थानांत ! आणि भरतपूरचा किल्ला हा कोणत्या देशांतील होता ? तर हिंदुस्थानांतीलच ! आणि मग हिंदुस्थानांतील लोकांनीं हिंदुस्थानांतील किल्ले दुसऱ्यांच्या हातीं देण्याकरितां असलीं विश्वासघाताचीं कामें करावींत काय ? हे हिंदुस्थानांतील मुक्या किल्ल्यांनों, जर तुमच्या देशांतील लोकच तुमच्या स्वातंत्र्यावर तिलांजली देण्याकरितां उठले, तर मग दुसरे कोण तुमचें संरक्षण करूं शकणार आहेत ! आपल्या जन्मभूमीवरील किल्ले दुसऱ्यांच्या हातीं देण्याकरितां कपटाचरण करावें आणि त्याबद्दल बक्षीस मिळवावें, हा जो मातृविक्रयाचा धंदा हिंदुस्थानांतील कांहीं लोकांनीं पुष्कळ दिवसांपासून शोधून काढिला आहे, त्याच्या पारिपत्याकरितां देवालाही कांहीं तरी नवीनच शासनाची जागा निर्माण करावी लागणार आहे ! कारण, असल्या या मात्रागमनीपणाला सीमाच उरलेली नाहीं ! पांचपांचशें रुपयांच्या लिलावानें आपले किल्ले विकले जावेत, इतकीच आपल्या देशांतील किल्ल्यांची, त्यांच्या मजबूत तटांची, त्यांच्या वरील स्वातंत्र्याच्या निशाणांची आणि त्यांच्यावरील स्वराज्याचीं किंमत आहे काय ? ता. २१ जानेवारी १८०५ रोजीं ज्या वेळीं ही या विश्वासघाताच्या युक्तीची कल्पना कोणा इंग्लिश अंमलदाराच्या डोक्यांत आली असेल, त्या वेळीं तेथें कशी वस्तुस्थिति घडून आली असेल, याचें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहिलें, तर त्या चित्रानेंहि आपलीं अंतःकरणें फाटून जातील, इतका तो देखावा भयंकर असला पाहिजे ! त्यावेळीं कसें झालें असेल ? तर कोणी तरी एका कपटी इंग्लिश अधिकाऱ्यानें कांहीं निवडक नेटिव्ह शिपायांना आपल्यासमोर बोलाविलें असेल ! आणि त्यानें त्यांना चढवून देऊन असें सांगितलें असेल कीं, जो कोणी तुमच्या या तटाच्या खंदकाची माहिती काढून आणील, त्याला त्याच्या या शूर-

पणाच्या कृत्याबद्दल आम्ही ५०० रुपये बक्षीस देऊं ! इंग्लिशांनीं जरी याला शूर कृत्य असें म्हटलें असलें, तरी वास्तविक तें शूरपणाचें कृत्य नव्हतें, तर तें अत्यंत नीचपणाचें आणि नामर्दपणाचें कृत्य होतें. आपल्या जन्मभूमीरूपी पवित्र मातेच्या पातिव्रत्याच्या किंमतीबद्दलचा हा लिलाव जेव्हां तेथें ता. ९ रोजीं भर दिवसां पुकारला गेला, तेव्हां तेथील कित्येक इंडियन शिपायांच्या अंगावर शहारे उभे राहिले असतील. आणि त्यांच्या डोळ्यांतून खळखळा अश्रु वाहिले असतील ! आणि आम्हीं पोटांत काटे भरूं, पण आपल्याच जन्मभूमी-संबंधानें आणि आपल्याच देशबांधवासंबंधानें असलें फसवणुकीचें कृत्य आम्ही कधींहि करणार नाहीं, असे उद्गार त्यांच्या तोंडांतून बाहेर पडलेले जरी कोणी ऐकिले नसतील, तरी त्यांच्या मनांतून ते बाहेर निघाले असले पाहिजेत हें खास ! पण बाकीच्यांनीं जरी माघार घेतली असली, तरी हे हिंदुस्थानचे तीन सुपुत्र—हे इंग्रजांच्या नोकरींतील तीन इमानी नोकर आणि इंग्रजांनीं लिहिलेल्या इतिहासांतील हे तीन सुप्रसिद्ध वीर पुरुष आणि हे तीन हिंदुस्थानचे खरे हितचिंतक !—मोठ्या शौर्यानें मुजरा करीत आपल्या साहेबाच्यापुढें आले असतील आणि म्हणाले असतील कीं, " साहेब, हें मात्रागमनीपणाचें काम करण्याला आम्ही तयार आहों; आम्हांला हुकूम मिळावा ! " हे त्यांचे शब्द त्यांच्या तोंडून निघाले असतील, तेव्हां आसपासच्या किती तरी लोकांनीं आपल्या कानांत बोटें घातलीं असतील ! त्यांच्या स्वर्गांतील मेलेल्या बापांनीं आपल्या माना लाजेनें खालीं घातल्या असतील ! आणि त्यांच्या आयांनीं आपण वांझ कां राहिलों नाहीं असें म्हणून डोळ्यांतून टिपें टाकलीं असतील !

परंतु या तीन अधमांनीं जरी असलें अधमपणाचें आणि विश्वासघाताचें कृत्य केलेलें असलें, तरी जोंपर्यंत परमेश्वर भरतपूरच्या बाजूला होता, तोंपर्यंत असल्या इंग्रजी अधमपणाचें तेथें कांहीं एक चाललें नाहीं ! अयोध्येचें सगळें राज्य आपल्याला मिळालें असूनहि तें श्रीरामचंद्राला देण्याकरितां जो अयोध्यानगराला सोडून चित्रकूट पर्वताजवळच्या अरण्यांत रामाला शोधीत गेला, त्या भरतानें आपल्या बंधुप्रीतीनें आणि आपल्या अलौकिक भरतभावानें रामावतारीं जें पुण्य संपादन केलें, तें सगळें त्यानें या आपल्या भरतपूरच्या नगरामध्यें सांठवून ठेविलें होतें. आणि तें यावेळीं भरतपूरच्या बचावाच्या उपयोगाला येत होतें ! मथुरेच्या आसपासचीं भरतपूर, दीगच्या किल्ल्याजवळचा गोवर्धनपर्वत, वगैरे सर्व ठिकाणें हीं भगवान् श्रीकृष्णाच्या बालपणींच्या बालक्रीडेनें आणि पदसंचारानें पवित्र झालेलीं पवित्र तीर्थें होतीं. व त्यांच्यावर भगवंताच्या कृपादृष्टीचा वरदहस्त होता. अशा मालिकेंतील जें भरतपूर, त्याच्यावर त्यावेळीं जर कोणाच्याहि विश्वासघाताचे प्रयोग लागू पडले नाहींत, तर त्यांत कांहीं आश्चर्य आहे असें नाहीं. भरतपूरच्या तटावरून लढणाऱ्या प्रत्येक जाट आणि मराठा शिपायाची अशी समजूत झालेली होती कीं, भरतपूर हें भगवान् श्रीकृष्णाच्या कृपेंतील एक शहर असल्यामुळें त्या शहराच्या संरक्षणाकरितां तो आपल्याबरोबर या ठिकाणीं अदृश्य रीतीनें लढत आहे ! आणि भगवान् आपला पाठीराखा आहे, अशी जेथें दृढ भावना आहे, तेथें " यत्र योगेश्वरः कृष्णः " इत्यादि भगवंताच्या उक्तींत सांगितल्या-

प्रमाणें आपल्या विजयाची खात्री कोणाला वाटणार नाहीं ! याशिवाय या भरतपूरच्या किल्ल्याच्या संबंधानें कोणीं असें एक भविष्य करून ठेविलेलें होतें कीं, जोंपर्यंत कुंभीर जातीचा एक नक्र येऊन या भरतपूरच्या खंदकांतील पाणी त्यानें शोषण केलें नाहीं, तोंपर्यंत हा किल्ला शत्रूला केंव्हांहि घेतां येणार नाहीं ! या ईश्वरी भवितव्यतेवरहि तटांतील शिपायांचा पूर्ण विश्वास होता. आणि त्यामुळें त्यांच्या अंगांतील शौर्य दुप्पट वाढलें होतें.

तरी पण इंग्रजांना असें वाटलें कीं,आतां आपण या खंदकाच्या लांबीरुंदीचा मोठ्या शिताफीनें शोध काढून आणिला आहे, तेव्हां आतां पूर्वीच्यासारखी आपल्याला पराभवाची भीति नाहीं. आणि अशा कल्पनेवर भिस्त ठेवून यांनीं ता. २१ जानेवारी १८०५ रोजीं भरतपूरच्या तटावरील दुसऱ्या हल्ल्याची तयारी केली. खंदकाच्या रुंदीचीं मापें त्यांना आधींच मिळालीं होतीं. त्या मापांप्रमाणें खंदकाच्या अलीकडच्या कांठावरून पलीकडच्या कांठापर्यंत टाकतां येतील अशा पुलासारख्या लांबलांब लांकडी शिड्या तयार करून त्यांच्यावर लाकडाच्या आडव्या फळ्या ठोकण्यांत आल्या होत्या. व त्यावरून शिपायांना पलीकडे चालत जातां यावें अशी योजना करण्यांत आली होती. या शिड्या खंदकापर्यंत कशा उचलून न्यावयाच्या व तेथें गेल्यानंतर त्या खंदकावर कशा बसवावयाच्या, हें एका तुकडींतील शिपायांना आधीं शिकवून ठेविलें होतें, व या शिड्या खंदकावरून टाकण्यांत येत असतां आणि त्या शिड्यावरून सैन्य पलीकडे चालून जात असतां त्यांच्यावर तटाच्या भिंतीवरून कोणाला गोळीबार करितां येऊं नये म्हणून तटाच्या त्या भागावर खालून एकसारखा गोळ्यांचा वर्षाव चालू ठेवण्याचें काम कोणत्या तुकडीनें करीत रहावयाचें, याही सर्व गोष्टी आगाऊ ठरवून ठेवण्यांत आल्या होत्या. व अशी सर्व कडेकोट तयारी झाल्यानंतर ता. २१ रोजीं तिसरे प्रहरीं तीन वाजण्याचे सुमाराला ले. क. मॅक्राय, कॅ. लिंडसे, वगैरे अनेक इंग्रजी अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं इंग्लिशांचें सैन्य आपल्या खंदकांतून बाहेर पडून तटावर चाल करून जाण्याकरितां निघालें.

इंग्लिशांच्या बाजूला चाललेल्या या हालचाली तटावरच्या भोकांतून तटावरचे मराठ्यांचे शिपाई लक्षपूर्वक पहातच होते. त्यांनीं हा हल्ला करण्याकरितां येणाऱ्या इंग्लिशांचा समाचार घेण्याची तटाच्या आंतून तर सर्व सिद्धता ताबडतोब केलीच, पण त्याशिवाय तटाच्या बाहेर जे मराठ्यांचे घोडेस्वार होते, त्यांनींहि त्याच वेळीं आपल्या घोड्यांवर खोगीर कसलें. यशवंतराव होळकराचें पायदळ भरतपूरच्या तटाच्या आंत गेलें होतें. पण होळकराचे बहुतेक घोडेस्वार तटाच्या बाहेरच मोकळे होते. व होळकराचें सगळें मुख्य काय तें सामर्थ्य त्याच्या घोडदळामध्येंच होतें. व एखाद्या किल्ल्याच्या आंतमध्यें अडकून पडण्यापेक्षां बाहेर वाटेल तिकडे लूटफाट करण्याकरितां मोकळें असण्यामध्येंच त्या स्वैरसंचारी यशवंतरावाला समाधान वाटत असे. त्याला किल्ल्यांत येण्याविषयीं भरतपूरच्या राजाकडून आग्रह करण्यांत येत असतां त्यानें असें सांगितलें कीं," माझी गादी माझ्या घोड्याच्या पाठीवर आहे, ती मी सहसा सोडणार नाहीं ! ' अशा बाणेदारपणामुळें आणि अशा नैसर्गिक प्रवृत्तीमुळें यशवंतराव होळकराचें आणि भरतपूरच्या राजाचें मिळून सुमारें

आठ हजार सैन्य किल्ल्याच्या आंतून लढत असतां यशवंतराव होळकर हा आपल्या सर्व घोडेस्वारांनिशीं तटाच्या बाहेरून त्यांना मदत करीत होता. त्यांतच पूर्वी सांगितल्याप्रमाणें मरिखानहि आपल्या हजारों घोडेस्वारांसह त्याच दिवशीं अंतर्वेदींतून येऊन यशवंतरावाला मिळाला होता. तेव्हां ले. क. मॅक्राय यांचें सैन्य ता. २१ जानेवारी रोजीं तिसरे प्रहरीं तटावर चाल करून निघालें त्याच वेळीं यशवंतराव होळकर आणि मीरखान पठाण यांनीं बाहेरून इंग्लिशांच्या छावणीवर हल्ले करून त्यांना अगदीं सळो कीं पळो करून सोडलें. या मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं इंग्लिश कॅव्हलरीला या वेळीं कसें वेढून आणि रोखून ठेविलें होतें, हें नकाशांत दाखविलेल्या परिस्थितीवरून चांगलें लक्षांत येण्याजोगें आहे. अशा रीतीनें तटाच्या भिंतीवरील शिपायांच्या आणि घोड्यांच्या पाठीवरील घोडेस्वारांच्या अशा दुहेरी माऱ्यामध्यें सांपडलेल्या इंग्रजी फौजेची त्या दिवशीं अखेरीस दुर्दशा उडून गेली, हें सांगावयाला पाहिजे असें नाहीं.

ले. क. मॅक्राय यांनीं ता. २१ जानेवारी रोजीं आपल्या सैन्याचे उजवीकडची तुकडी आणि डावीकडची तुकडी असे दोन विभाग केले. व या दोन तुकड्या ज्या दोन निरनिराळ्या वाटांनीं दुसऱ्या खिंडाराच्या ( १२ ) जवळ गेल्या, ती वाट नकाशामध्यें ( १२-१४ ) या आंकड्यांनीं दाखविली आहे. या वाटेनें जातांना इंग्लिशांचें सैन्य विजयाच्या पूर्ण खात्रीनें आपली वाट चालत होतें; परंतु ती वाट संपून ते त्या खंदका-जवळ जाऊन पोहोंचले. तेव्हां त्यांची विजयाची आशा बरीच नष्ट झाली. नवीन पडलेल्या दुसऱ्या खिंडाराजवळ खंदक फारसा रुंदही नाहीं व फारसा खोलहि दिसत नाहीं अशी जरी इंग्लिशांनीं विश्वासघातानें मिळविलेली बातमी होती, तरी ते जेव्हां प्रत्यक्ष त्या खंदकाच्या कांठावर जाऊन उभे राहिले, तेव्हां तेथें त्यांना निराळाच प्रकार आढळून आला. खंदकाची जितकी रुंदी त्यांना सांगण्यांत आलेली होती, त्याच्यापेक्षां खंदकांतलि पाणी या वेळीं कितीतरी रुंद झालेलें होतें. पाहिल्या मापाप्रमाणें केलेले लांकडी शिड्यांचे फिरते पूल त्या रुंदावलेल्या पाण्यावर अरुंद पडूं लागले. सगळ्या आगाऊ तयाऱ्या फुकट गेल्या. दूरदर्शी इंग्रजी तजविजी अदूरदर्शी ठरल्या. विश्वासघाताचाहि कोणीं तरी विश्वासघात केला. फसवणुकीलाहि कोणी तरी फसवलें. चोरावर मोर झाला. आणि एवढ्या धूर्तपणाच्या लबाडीच्याहि कोणी तरी तोंडांत मारल्यासारखें झालें. हें कसें झालें ? हें कोणीं केलें ? हें जाट आणि मराठे शिपायांच्या कल्पकतेनें केलें ! इंग्लिशांच्या नोकरीला राहिलेले आप-ल्याच देशांतील कांहीं निमकहराम लोक तटाजवळ येऊन विश्वासघातानें खंदकाची लांबी-रुंदी पाहून गेले, ही बातमी जेव्हां मराठ्यांच्या सैन्यामध्यें पसरली, तेव्हां तटावरील लोकांनीं या फसवणाऱ्या लोकांचे दांत त्यांच्याच घशांत घालविण्याकरितां एक उलट युक्ति योजिली. युक्त्या इंग्रजांनाच सुचतात असें नसून कांहीं शहाणपण परमेश्वरानें इंडियन लोकांच्या वांट्यालाहि दिलेलें आहे ! मराठ्यांनीं या वेळीं अशी युक्ति केली कीं, जेथें खिंडार पडलें होतें, आणि जेथें खंदकांतून उतरून त्या खिंडारावर हल्ला करण्याकरितां इंग्लिश शिपाई येण्याचा संभव होता, तेथून कांहीं अंतरावर खालीं त्या खंदकामध्यें

मराठ्यांनीं एक मातीचा उंच आणि मजबूत असा बांध घातला; व वरून सडकून पाणी सोडून तें त्या बांधानें अडविलें. त्यामुळें त्या खंदकाच्या बाहेर जिकडेतिकडे पाणीचपाणी होऊन खंदकाची रुंदी वाढली, इंग्रजांच्या शिड्या आंखूड झाल्या, आणि त्यांचे सगळे बेत या एका लहानशा युक्तीनें फिसकटून गेले !

तेव्हां तें पाणी किती खोल आहे, हें पहाण्याकरितां एक शिपाई पाण्यांत उतरला. त्या वेळीं तेथें आठ फुटाच्या वर पाणी झालें आहे, असें आढळून आलें. तरी पण त्या पाण्यांतूनहि कांहीं शिपाई पोहून पलीकडे गेले. पण बाकीच्यांना तसें करितां येईना. शिवाय जे पोहून तटाजवळ येत होते, त्यांच्यावर तटावरून गोळ्यांचा भडिमार चाललेलाच होता. आणि त्यांतून जे कोणी बचावून तटाच्या भिंतींत पडलेल्या खिंडारावर चढून येतील, त्यांचा संहार करण्याकरितां त्या खिंडाराच्या आंतल्या बाजूलाच शत्रूला न दिसतील अशा रीतीनें दोन तोफा डागून ठेविल्या होत्या. इतक्या अडचणींतून जाऊन तटाच्या आंत प्रवेश करणें शक्य नाहीं, असें पाहून ले. क. मॅक्राय यानें आपल्या हाताखालील जिवंत राहिलेल्या सैन्याला मोठ्या दूरदर्शीपणानें माघारें फिरण्याचा हुकूम केला. पण इंग्लिश सैन्य तटावर चालून येत असतां आणि तटापासून माघारें फिरून परत जात असतां तटाच्या भिंतीवरून जाट आणि मराठे शिपायांनीं त्यांच्यावर तोफांचा आणि बंदुकांचा जो एकसारखा भडिमार चालविला होता, त्यामुळें इंग्लिशांच्या बाजूचे किती तरी लोक मरण पावले. ले. क. मॅक्राय, कॅ. लिंडसे, वगैरे नुसत्या मेलेल्या युरोपियन अधिकाऱ्यांची संख्या घेतली, तरी ती १८ च्या वर गेली होती. व मेलेल्या शिपायांची संख्या ५०० च्या वर होती.

भरतपूरच्या पहिल्या हल्ल्याच्या वेळीं पराभव झाल्यानंतर लॉर्ड लेक यांनीं गव्हर्नर जनरलला जें पत्र लिहिलें होतें, त्यांतील एक महत्त्वाचें वाक्य पूर्वी दिलें आहे. त्यांत पहिल्या खेपेला जरी पराभव झाला असला तरी दुसऱ्या खेपेला आपलें इंग्रजी सैन्य खात्रीनें जय मिळवील, अशी बढाई मारण्यांत आली होती. पण आतां दुसऱ्याहि खेपेला पराभव झाला; आणि पहिली बढाई सफळ झाली नाहीं. तेव्हां आतां प्रत्यक्ष विजय मिळेपर्यंत समंजसपणानें फिरून बढाई न मारणें हें शहाणपणाचें झालें असतें. पण कित्येकांना बढाया मारण्यांतच भूषण वाटत असतें ! भरतपूरच्या तटासमोर हा दुसरा पराभव झाल्यानंतरही त्या पराभवाच्या दुसऱ्या दिवशीं लॉर्ड लेक यांनीं जो एक जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यामध्यें फिरून पूर्वीच्या सारख्याच बढायांची रेलचेल कशी करून सोडली होती, हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

The Commander-in-Chief trusts that in a very few days those obstacles, which have hitherto rendered all attempts fruitless, will be completely surmounted; and that the good conduct and bravery of this army will be rewarded by the possession of the place and by the opportunity of proving to

the enemy and the country, that although hitherto from unforeseen difficulties success has not crowned their attempts, their spirit is undaunted, and that their gallantry and discipline must ultimately triumph.

यांत अशी बढाई मारण्यांत आली आहे कीं, आतांपर्यंत ज्या अडथळ्यांच्या कारणांमुळें आमच्या प्रयत्नांना यश आलें नाहीं, ते सर्व अडथळे थोडक्याच दिवसांत दूर करण्यांत येतील. आणि मग लगेंच हें भरतपूरचें ठाणें आमचे शूर शिपाई आपल्या ताब्यांत घेतल्यावांचून केव्हांहि रहाणार नाहींत. आतांपर्यंत आमच्या वाटेमध्यें पूर्वी लक्षांत न आलेल्या अशा कांहीं आकस्मिक अडचणी एकाएकीं आल्यामुळें जरी आम्हांला विजय मिळाला नाहीं, तरी अखेरीस आमच्या शिस्तीनें आणि पराक्रमानें आम्हाला विजय मिळालाच पाहिजे, हें आम्ही लवकरच आमच्या शत्रूंच्या आणि सर्व हिंदुस्थान देशाच्या दृष्टोत्पत्तीस आणून देऊं!

ज्यांनीं मराठ्यांच्या कडून लागोपाठ दोनदां मार खाल्ला, त्यानीं फिरून विजय मिळविण्याचा आधींच असल्या बढाया मारण्याला उद्युक्त व्हावें, हें एक बढाईखोर इंग्लिशांच्याच ठिकाणीं संभवतें. हे म्हणतात. कीं, कांहीं अडचणी पूर्वी लक्षांत आल्या नव्हत्या. पण अशा कोणत्या अडचणी होत्या, कीं ज्या आधीं यांच्या लक्षांत आल्या नाहींत? तटाच्या उंचीचे अजमास यांना होते; तटाच्या भिंतीला पडलेल्या खिंडाराचा चढ यांना माहीत होता; तटाच्या भोंवतालच्या खंदकाची लांबीरुंदी आणि खोली यांच्यापासून मराठ्यांनीं झांकून ठेविली होती, असेंहि नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्या खंदकाची अगदीं बिंतबातमी काढून आणण्याकरितां यांनीं पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें आपले हेरही पाठविले नव्हते काय? या सगळ्या अडचणी तर यांनीं पूर्वी पाहून आणि अजमावून ठेविलेल्या होत्या. आणि त्यांतूनहि आयत्या वेळीं कांहीं थोड्या कमीजास्त अडचणी उत्पन्न झाल्या, तर त्यांतूनहि या शूर म्हणविल्या जाणाऱ्या इंग्रजी शिपायांनीं वाट करून जावयाला नको होतें काय? पण तसें घडून न येतां या इंग्लिश शिपायांना अखेर माघारेच फिरून यावें लागलें. आणि तरी पण शिवाय वरती या रिकाम्या बढाया आहेत त्या आहेतच.

पण या पराभवानंतर नुसत्या बढायाच मारून थांबण्यांत आलें असें नाहीं, तर जणूं काय हा पराभव झाल्याबद्दल बक्षीस म्हणूनच त्या पराभवाच्या दुसऱ्या दिवशीं युरोपियन शिपायांना एक्स्ट्रा भत्ता देण्यांत आला; आणि घोडेस्वार, पायदळ, तोफखाना, आणि पायोनियर्स यांच्यापैकीं प्रत्येक नेटिव्ह पलटणीला दोन दोनशें रुपये द्यावे, असें जाहीर करण्यांत आलें! (Extra batta is to be served out to the Europeans to-day and two hundred rupees are to be given to each native corps of cavalry, infantry, gun lascars and Pioneers. नेहमींची अशी साधारण वहिवाट आहे कीं, ज्या सैनिकांनीं विजय मिळविला असेल, त्यांना बक्षिसें देण्यांत येतात. मग ज्यांच्यापैकीं १८ अधिकारी आणि ५०० शिपाई मेले

आणि जे खंदकापासून पराभव पावून माघारे आले, त्यांना हीं बक्षिसें कशाबद्दल ? पण अशीं बक्षिसें वांटलीं, म्हणून पराजयाचा विजय होतो असें नाहीं; परंतु आपल्या सैन्यामध्यें तात्पुरती उमेद उत्पन्न करण्याच्या या केवळ इंग्रजी युक्त्या आहेत !

## इंग्लिशांचा तिसरा पराभव.

ता. २१ जानेवारी १८०५ रोजीं इंग्लिशांचा भरतपूरच्या भिंतीपुढें दुसरा पराभव झाल्यानंतर आम्ही लवकरच थोडक्याच दिवसांत विजय संपादन करून दाखवूं अशी ज. लेक यांनीं जरी वर सांगितल्याप्रमाणें बढाई मारली होती, तरी भरतपूरच्या तटावर विजय मिळविण्याचें तर लांबच राहिलें, परंतु नुसता हल्ला करण्याला ही त्यांना मध्यें एक महिना घालवावा लागला. ता २१ जानेवारी रोजीं जो दुसरा पराभव झाला, त्यानंतर पुढच्या फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेपर्यंत मधला सगळा एक महिना त्यांना भरतपूरच्या किल्ल्यापुढें बसून फुकट घालवावा लागला. व त्याला तशीं कारणेंही होतीं. मीरखान हा आपल्या हजारों घोडेस्वारांनिशीं भरतपूरला येऊन तटाबाहेरच्या इंग्रजी सैन्याला त्रास देऊं लागला होता व त्या इंग्रजी सैन्याच्या मदतीसाठीं बाहेरून येणारें दुसरें सैन्य आणि अन्नसामग्री यांच्यावरही तो छापे घालूं लागला होता, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. मीरखानाचे बाहेरून पडणारे हे छापे आणि मराठ्यांचें तटाच्या भिंतीवरून होणारे गोळीबार या दोघांना एकदम तोंड देणें इंग्लिशांना अशक्य होतें व त्यासाठीं मीरखानाला भरतपूरपासून दूर घालवून लावण्याचें काम इंग्लिशांना पहिल्यानें करावें लागलें. म्हणून भरतपूरच्या भिंतीसभोंवतीं जमलेल्या इंग्लिश सैन्यापैकीं मे. ज. स्मिथ याची त्या कामावर ता. ८ फेब्रुवारी रोजीं योजना करण्यांत आली. ता. २१ जानेवारीपासून ता. ७ फेब्रुवारीपर्यंत मीरखानाच्या घोडेस्वारांनीं आसपास बाहेर जी लुटालूट चालविली होती तिचा प्रतिकार करण्यांतच इंग्लिशांचे हे दिवस गेले. त्यामुळें या मुदतींत त्यांना भरतपूरच्या भिंतीवर हल्ला करण्याच्या कामाकडे लक्ष देणें अशक्यच झालें होतें. व अशाच रीतीनें इंग्लिशांचें लक्ष आपल्याकडे जास्त वेधून घेतलें, तर साहजिकपणेंच त्यांचा भरतपूरवरील जोर कमी पडेल, या हेतूनें इंग्लिशांचें सैन्य आपल्या पाठीमागून ओढीत आणण्याकरितां मीरखानानें ता. ७ फेब्रुवारी रोजीं यमुना नदी उतरून अंतर्वेदीमध्यें फिरून प्रवेश केला. व तेथील इंग्लिशांच्या मुलखांत फिरून त्यानें जाळपोळ आणि लुटालूट करण्याला सुरवात केली. आपल्या लुटालुटीनें अंतर्वेदींत इंग्लिशांचें नुकसान व्हावें आणि आपल्या पारिपत्यासाठीं म्हणून आपल्या पाठीवर येणारें इंग्लिश सैन्य भरतपूरपासून हलविलें गेल्यानें भरतपूर येथेंही इंग्लिशांचें नुकसान व्हावें असा दुहेरी हेतु मनांत धरून मीरखान हा अंतर्वेदीमध्यें शिरला होता व तो त्याचा हेतु सफळही झाला. कारण, भरतपूरच्या वेढ्यासाठीं तेथें जमा झालेल्या सैन्यापैकीं बरेंचसें सैन्य मे. ज. स्मिथ याला मीरखानाचा पाठलाग करण्यासाठीं तेथून हलवावें लागलें. आणि त्यामुळें भरतपूरच्या वेढ्याचें काम थंड पडलें. सारांश, मीरखानाचे घोडेस्वार भरतपूरच्या

जवळ होते म्हणून आणि ते तेथून निघून गेले म्हणून, अशा या दोन्ही कारणांचा भरत-पूरच्या वेढ्याचें तांतडीचें काम दिरंगाईवर पडण्याच्या कामीं परिणाम झाला.

हें सैन्य कमी झालें असतां बाकी उरलेल्या थोड्याशा सैन्याच्या जोरावर भरत-पूरच्या तटावर इंग्लिशांनीं हल्ला करणें शक्य नव्हते. म्हणून लवकरच विजय मिळवून दाखविणाऱ्या ज. लेकला आणखीही कांहीं दिवस थांबावें लागलें. याच्या पूर्वी म्हणजे ता. ६ फेब्रुवारीच्या सुमाराला आपली छावणीची पहिली जागा सोडून सैन्याच्या सुरक्षित-तेसाठीं भरतपूरच्या दक्षिणच्या बाजूला इंग्लिशांना आपली छावणी हलवावी लागली होती. त्या छावणीवर. ता. १० फेब्रुवारी रोजीं मे. ज. जोन्स याच्या हाताखालीं मुंबईचें एक बरेंच मोठें सैन्य ज. लेक यांना येऊन मिळालें; आणि त्यानंतर मग फिरून तटावर हल्ला करण्याचा विचार सुरू झाला. पण तो विचार ता. २० फेब्रुवारीपर्यंत अंमलांत आणतां आला नाहीं. तोंपर्यंत हल्ल्याची पूर्वतयारी चाललेली होती. या तयारीपैकीं मुख्य भाग म्हटला म्हणजे तटाच्या नजीकपर्यंत जाऊन पोंचणारे खंदक खणणें आणि सोईस्कर ठिकाणीं तोफांचे मोर्चे बांधणें हा होय. पूर्वीच्या हल्ल्याच्या वेळचे इंग्लिशांच्या बाजूचे खंदक तटापासून फार दूर अंतरावर होते. व त्या खंदकातून तटाच्या भिंतीपर्यंत बरेंच अंतर उघड्यावरून इंग्लिश शिपायांना चालून जावें लागत असल्यामुळें त्या अवधींत तटा-वरील गोळीबारानें इंग्लिश सैन्याचें फार नुकसान होत होतें. म्हणून तटाच्या जवळ जाऊन पोंचणारा असा एक खंदक ( १५–१६ ) इंग्लिशांनीं खणला व तटापासून सुमारें ४०० यार्डांच्या अंतरावर त्यांनीं आपल्या तोफांकरितां निरनिराळ्या ठिकाणीं ( १७–१८–१९ ) मोर्चे उभे केले. व या मोर्च्यांवरून त्यांनीं ता. ११ फेब्रुवारी रोजीं एकंदर १६ तोफा सुरू केल्या. यांपैकीं सतराव्या बॅटरीनें सुमारें ४०० यार्डांच्या अंतरावरून तटावर समोरून मारा करून कांहीं दिवसांनीं तटाला तिसरें खिंडार (२०) पाडलें. व या खिंडारांतून तटावर हल्ला करण्याचें घाटूं लागलें. परंतु या खिंडाराच्या शेजारींच जो एक मोठा बुरूज ( २१ ) होता, त्याच्यावरील माऱ्याच्या टापूमध्ये हें खिंडार असल्यामुळें त्या खिंडारांतून हल्ला करून जाणें अशक्य झालें असतें. म्हणून त्या बुरुजावरील तोफा बंद पाडण्यासाठीं १९ या आंकड्याच्या ठिकाणीं जो तोफांचा मोर्चा बांधलेला होता, तेथून या ( २१ ) बुरुजावर तोफांचा भडिमार सुरू ठेवण्यांत आला. आणि त्यामुळें नवीन पडलेलें जें तिसरें खिंडार ( २० ) तिकडे जाणें कांहीं तरी शक्य झालें. या ( २१ ) बुरुजा-वरील तोफा बंद पाडण्याची इंग्लिशांनीं ही जी तजवीज केली होती, त्याच्याशिवाय त्यांनीं आणखी अशीही एक युक्ति केली होती कीं, त्यांनीं तटाच्या खंदकाजवळ जाऊन पोंचेल असा जो ( १५–१६ ) एक खंदक खणून ठेविलेला असल्याबद्दल पूर्वी सांगितले आहे, त्या खंदकाच्या किल्ल्याजवळील टोंकाच्यापुढें ता. १९ फेब्रुवारी रोजीं त्यांनीं एक सुरुंग (२२) खणून ठेविला होता. तटाच्या सभोंवतालच्या पाण्यानें भरलेल्या खंदकाच्या दोन्ही बाजू लंबरेषेमध्यें तोडलेल्या असल्यामुळें त्यांच्यावरून चढून तटाजवळ जाणें अगदीं अशक्य होतें. त्यामुळें त्या पाण्यानें भरलेल्या खंदकाच्या जवळ हा सुरुंग नेऊन उडविल्याच्या

योगानें त्याच्या दरडी ढांसळतील आणि मग तेथून वर चढून जाण्याला सोईचें होईल, अशा हेतूनें हा सुरुंग खणून ठेविला होता, व तो ता. २० रोजीं हल्ला करावयाच्या अगदीं आयत्या वेळीं उडवून द्यावयाचा होता.

परंतु दुसऱ्या हल्ल्याच्या प्रसंगीं आयत्या वेळीं खंदकामध्यें बांध घालून आणि खंदकाचें पाणी अफाट वाढवून मराठ्यांनीं इंग्लिशांना जसें तोंडघशीं पाडलें, त्याचप्रमाणें त्यांनीं या तिसऱ्या हल्ल्याच्या वेळींही इंग्लिशांचे सगळे बेत बिघडवून टाकले. ता.२० फेब्रुवारी १८०५ रोजीं भरतपूरच्या तटावर तिसरा हल्ला करण्याचें ठरलें होतें. त्याच्या आदल्या दिवशीं म्हणजे ता. १९ फेब्रुवारी रोजीं संध्याकाळीं आपल्या खंदकांतील सुरुंग खणण्याचें वगैरे सर्व काम संपवून इंग्लिशांचे शिपाई रात्रीं आपल्या छावणींत परत आले होते. व ता २० रोजीं सकाळीं ते आपल्या त्या खंदकांतील उरलेंसुरलेलें कांहीं काम पुरें करण्याकरितां तेथें गेले. पण ते तेथें जाऊन पाहतात, तों इंग्लिशांचा तो सगळा खंदक मराठ्यांच्या शिपायांनीं गजबजून गेलेला त्यांना दिसला; व त्यामुळें आपले सगळे बेत फसलेले पाहून इंग्लिशांची फारच नाउमेद झाली. पहांटेच्या काळोखामध्येंच मराठ्यांचे लोक किल्ल्यांतून हळूच बाहेर पडून कोणाला न दिसतां त्या इंग्लिशांच्या खंदकामध्यें शिरले व त्यांनीं जो सुरुंग खणून तयार करून ठेविला होता, तो त्यांच्याच हत्यारांनीं त्यांनीं सबंध उद्‌ध्वस्त करून टाकला. हे त्यांचें काम संपतें आहे न संपतें आहे, तोंच इंग्लिशांचे शिपाई त्या खंदकांत आपआपल्या जागा धरून बसण्यासाठीं तेथें येऊन ठेपले. परंतु मराठ्यांच्या शिपायांनीं त्यांच्यापैकीं पुष्कळांना त्या खंदकांत दडून बसूं न देतां आपल्या भाल्यानें आणि तरवारीनें भोसकून खंदकाच्या बाहेर फेकून दिलें. आणि इंग्लिशांची जास्त मदत आली, तेव्हां हे मराठ्यांचे शिपाई परत निघून आपल्या तटाच्या आंत गेले !

तटाच्या भिंतीला जरी हें एक तिसरें खिंडार ( २० )पडलें होतें, तरी तें मराठ्यांनीं तात्पुरतें बुजवून टाकलें होतें. ती नवीन केलेली दुरुस्ती उडवून टाकण्याकरितां इंग्लिशांनीं ता. २० रोजीं सकाळपासून आपल्या तोफांचा त्या जागेवर एकसारखा भडिमार सुरू केला होता. व तें खिंडार जेव्हां फिरून पहिल्याइतकें मोठें झालें, तेव्हां त्या दिवशीं दुपारीं सुमारें ३ वाजतां इंग्लिशांचें सैन्य तटावर हल्ला करण्याकरितां निघालें. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें इंग्लिश सैन्याच्या ३ तुकड्या करण्यांत आल्या. त्यापैकीं मुख्य तुकडी ले. क. डॉन यांच्या हाताखालीं देण्यांत आली होती. व ले. क. डॉन यानें तटाला नवीन पडलेलें जें ( २० ) खिंडार त्याच्यावर हल्ला करून तेथून आंत प्रवेश करावा, असा हुकूम होता. ले. क. डॉन याच्या उजव्या बाजूनें शत्रूवर हल्ला करण्याकरितां कॅ. ग्रँट यांची नेमणूक करण्यांत आली होती. मराठ्यांच्या शिपायांनींही आपल्या तटाच्या खंदकाच्या पुढें येऊन शत्रूला जास्त जवळून अडथळा करण्याकरितां आपल्या बाजूनेंही कांहीं खंदक ( २३ ) खणले होते. व त्याच्या आंतून त्यांनीं किल्ल्याच्या बाहेरूनही आपल्या कांहीं तोफा ( २४ ) इंग्लिशांच्या (१७–१८) बॅटरीवर सुरू केल्या होत्या. त्यामुळें तटाच्या

खिंडारावर चालून जाणाऱ्या ले. क. डॉनच्या सैन्यालाही त्यापासून अपाय होण्याचा संभव होता, म्हणून कॅ. ग्रँट यानें उजवीकडच्या बाजूनें जाऊन मराठ्यांचे खंदक ( २३ ) आणि त्यांमधील त्यांच्या तोफा ( २४ ) हस्तगत कराव्या, अशी कामगिरी त्याच्याकडे सोपविण्यांत आली होती. व ले. क. डॉनच्या डाव्या बाजूला तटाच्या भिंतीमध्यें भीमनारायण या नांवाचा जो एक दरवाजा होता, तो फारसा मजबूत नसून तेथून तटाच्या आंत सहज प्रवेश करितां येईल, अशी बातमी इंग्लिशांना समजलेली होती, म्हणून कॅ. टेलर याच्या हाताखालीं तिसरी तुकडी देऊन त्या तुकडीनें डाव्या बाजूनें प्रवेश करण्याचा प्रयत्न करावा, अशी तजवीज करण्यांत आलेली होती.

याप्रमाणें सगळी तयारी झाल्यावर संध्याकाळीं ४ वाजण्याच्या सुमारास इंग्लिशांचे सैन्य हल्ला करण्याकरितां निघालें. ले. क. डॉन याच्या हाताखालील लोकांनीं या वेळीं खंदकाच्या पाण्यांतील खड्डा भरून काढण्याकरितां आपल्याबरोबर पुष्कळ लांकडाच्या मोळ्या वगैरे सामान घेतलें होतें; परंतु लढाईच्या वेळीं शिपायांनीं आपल्याबरोबर धैर्य हें जें मुख्य सामान घ्यावयाचें, तें या वेळीं ले. क. डॉन याच्या हाताखालील शिपायांनीं आपल्याबरोबर मुळींच घेतलें नव्हतें! तटावर हल्ला करण्याकरितां जाण्याची वाट अर्थातच इंग्लिशांच्या त्या अरुंद खंदकांतून होती. त्या खंदकामध्यें आज सकाळीं मराठ्यांचे शिपाई शिरले होते, ही बातमी या वेळीं या सैन्यांतील सर्व शिपायांना समजलेली होती. तेव्हा त्या खंदकांतून चालून पुढें जाण्याचा त्यांना धीर होईना. आपण जसा मराठ्यांचा खंदक कोसळविण्याकरितां सुरुंग तयार करणार होतों, त्याचप्रमाणें मराठ्यांनीं आपल्या खंदकामध्येंही कोठें तरी सुरुंग पुरून ठेविले असतील, व आपण तेथें गेलों म्हणजे आपण त्या जागेवरून न चालतां कदाचित् आकाशांतून चालूं लागूं, अशा भीतीनें ते शिपाई घेरून गेले होते. शिवाय त्याच खंदकांत सकाळीं झालेल्या लढाईंत जे लोक मरून किंवा जखमी होऊन पडले होते, त्यांचीं शरीरें अद्यापि त्या खंदकांत तशींच पडलेलीं होतीं. त्या बिचाऱ्यांना तेथून उचलून नेण्याकडे कोणाचेंच लक्ष गेलें नव्हतें. तेव्हां हे नवीन शिपाई हल्ला करण्याकरितां ज्या वेळीं त्या खंदकांतून जाऊं लागले, तेव्हां मराठ्यांनीं पुरलेल्या सुरुंगांच्या भीतीनें आधींच भेदरून गेलेल्या या शिपायांना ती त्यांच्या मेलेल्या सोबत्यांचीं प्रेतें आणि जखमी झालेल्या सोबत्यांची करुणाजनक विवळणी अधिकच गर्भगळीत करून टाकूं लागली. अशा स्थितींत कोणत्या शिपायाचें पाऊल पुढें पडणार आहे? त्यामुळें पुढचे शिपाई पुढें पाऊल टाकीनात. आणि खंदक अरुंद असल्यामुळें पुढचे शिपाई पुढें गेल्यावांचून मागच्या शिपायांना पुढें चालण्याला वाव मिळेना. आणि त्यामुळें येथून तेथून सगळा खंदक शिपायांनीं भरून राहिला. क. डॉन. यानें त्यांची पुष्कळ समजूत घातली व पुष्कळ विनवण्या केल्या. परंतु मराठ्यांच्या विरुद्ध गुप्त रीतीनें सुरुंग पुरण्याचें पाप या वेळीं इंग्लिशांना इतकें नडलें कीं, त्यापुढें क. डॉन यांच्या प्रयत्नाचें कांहींएक चालूं शकलें नाहीं. तेव्हां अखेरीस ले. क. डॉन यानें पाठीमागच्या कांहीं पलटणी खंदकांतून उघड्या मैदानावर बाहेर काढल्या. व दोन सिक्स पाऊंडरच्या तोफा उघड्या मैदानावर उभ्या करून

त्यांचा मारा तटाच्या बुरजावर सुरू करण्यांत आला. आणि त्या तोफांच्या आश्रयाखालीं अखेरीस मराठ्यांचा गोळीबार सहन करीत क. डॉनचे हे थोडेसे शिपाई पाण्यानें भरलेल्या खंदकाच्या जवळ जाऊन पोहोंचले. त्यांतील एका उंच शिपायानें खंदकांत बुडी मारून पाहिली, तों पाणी पुष्कळ खोल असल्याचें आढळून आलें, व त्यामुळें खंदकामधून पलीकडे जाणें अशक्य झालें. तेव्हां ते शिपाई आजुबाजूला दुसरी कोणती जागा आहे कीं काय म्हणून पाहूं लागलें. त्या वेळीं त्यांना एक खडबडीत बुरुज ( २१ ) जवळच उजव्या हाताला दिसला. व त्यावरून आपल्याला भिंतीवर चढून जातां येईल, असें त्यांना वाटलें. त्यामुळें खंदकाच्या पाण्यांतून कसेंबसें पलीकडे जाऊन कांहीं लोक त्या बुरजावरून चढून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां त्यांच्यावर तटाच्या भिंतींतिल भोकामधून फारच जोराचा गोळीबार होऊं लागला, व खालून बुरुज चढून त्या तटाच्या भोंकाशीं जों ते शिपाई येत तोंच ते नेमके आंतील तोफांच्या गोळ्यांनीं धाडकन् खालीं फेकून दिले जात. व त्या भिंतीची चढण इतकी अवघड आणि इतकी अरुंद होती कीं, एका वेळीं एकापेक्षां जास्त शिपाई वर चढूं शकत नव्हते. अशी भयंकर स्थिति होती, तरी त्यांतूनही १२ व्या नेटिव्ह पायदळ पलटणींतील कांहीं शिपायांनीं तटावर चढून तेथें आपलें निशाण उभारण्याचे प्रयत्न केले. व त्यांच्या शिवाय आणखी दुसरेही १४ ऑफिसर वर चढून गेलें. परंतु तेथे जास्त शिपाई त्यांच्या मदतीला जाणें शक्य नसल्यामुळें ते त्यांचे प्रयत्न सफळ झाले नाहींत. आणि अखेरीस आता आपले जास्त लोक विनाकारण मराठ्यांच्या तोफांखालीं मरूं देणें बरोबर नाहीं, असें वाटून क. डॉन यानें आपल्या लोकांना परत फिरण्याचा हुकूम केला. व याप्रमाणें ले. क. डॉन यांची मुख्य आणि मधली तुकडी संध्याकाळच्या सुमाराला माघार खाऊन परत फिरली.

क. डॉन यांच्या तुकडीची अशी दुर्दशा चालली असतां कॅ. ग्रँट हे जे आपल्या हाताखालील शिपाई घेऊन उजव्या बाजूनें मराठ्यांवर हल्ला करण्याकरितां गेले होते. त्यांची स्थिति क. डॉनच्या इतकी वाईट झाली नाहीं. त्यांनीं आपल्या बाजूचें मराठ्यांचें खंदक (२३) हस्तगत केलें. व तेथें असलेल्या मराठ्यांच्या ११ तोफाहि ( २४ ) त्यांनीं जिंकून आपल्या छावणीकडे पाठविल्या. परंतु कॅ. ग्रँट यांना जरी इतपत यश मिळवितां आलें, तरी इंग्लिश सैन्याची जी डाव्या बाजूची तुकडी ले. क. टेलर यांच्या हाताखालीं भीमनारायण दरवाज्याकडे पाठविण्यांत आली होती, तिची अवस्था बहुतेक क. डॉन यांच्या सारखीच झाली. त्यांचे जे वाटाडे होते, त्यांनीं त्यांना भलत्याच वाटेनें नेलें. शिवाय वाटेंत मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं अडवून त्यांना बरेंच घोटाळ्यांत घातलें. आणि या गोष्टी खालीं उघड्या मैदानावर चाललेल्या असतांना वरून तटाच्या भोकांमधून इंग्लिशांच्या या तुकडीवर मराठ्यांचा एकसारखा गोळीबार होत होता, तो निराळाच. अशा संकटांनीं चोहों बाजूंनीं या तुकडीला घेरल्यामुळें त्यांनीं भीमनारायण दरवाजा गांठण्याचें लांबच राहून त्यांना माघार खाऊन आपली छावणी मात्र गाठणें भाग पडलें. अशा रीतीनें या तिसऱ्या हल्ल्यामध्यें कॅ. ग्रँट यांना जरी थोडासा जय मिळाला, तरी तो केवळ

तटाच्या बाहेरचाच होता. परंतु तटाच्या भिंतीच्या आंत प्रवेश होण्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर इंग्लिशांच्या या तीन तुकड्यांपैकीं एकीलाहि यश आलें नाहीं. आणि ले. क. डॉन व ले. क टेलर यांचा तर पूर्णच पराभव झाला. आणि इंग्लिशांचें नुकसानाहि फार झालें. या लढाईंत युरोपियन लोकांपैकीं सुमारें ५० लोक मरण पावले आणि पावणे दोनशे लोक जखमी झाले; व या लढाईंतील एकंदर मेलेले आणि जखमी झालेले यांची संख्या सुमारें ९०० पर्यंत जाऊन पोंचली. यावरून या तिसऱ्या हल्ल्यामध्येंहि इंग्लिशांची किती भयंकर हानि झाली, हें लक्षांत येण्यासारखें आहे.

## इंग्लिशांचा चवथा पराभव.

ता. २० फेब्रुवारी १८०५ रोजीं इंग्लिशांच्या भरतपूरच्या तटापुढें वर सांगितल्या-प्रमाणें तिसरा पराभव झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशीं, म्हणजे ता. २१ फेब्रुवारी रोजीं इंग्लिशांनीं त्या तटावर चवथा आणि शेवटचा हल्ला केला. ता. २० रोजीं इंग्लिशांच्या बाजूकडील खंदकांतील शिपायांनीं ले. क. डॉन याचा हुकूम ऐकला नाहीं व आपल्या भित्रेपणानें पुढें जाण्याचें नाकारलें, ही त्या शिपायांच्या हातून इंग्लिशांच्या लष्करी शिस्तीच्या दृष्टीनें अतिशय लज्जास्पद गोष्ट झालेली होती. अशी गोष्ट इतर एखाद्या वेळीं झाली असती, तर लगेच ती पलटण तोडून टाकण्यांत आली असती आणि त्यांतील शिपायांना कडक शिक्षा करण्यांत आल्या असत्या. पण ही वेळ तशी नव्हती. आतांपर्यंत झालेल्या तीन हल्ल्यांमध्यें इंग्लिशाचे पुष्कळ शिपाई मरून गेले होते; त्यांच्या बऱ्याच तोफा नादुरुस्त होऊन पडल्या होत्या; त्यांच्या जवळचा दारुगोळा बहुतेक खलास होत आला होता; आणि त्यांची अन्नसामग्रीहि बहुतेक संपुष्टांत येत चालली होती. अशा स्थितींत आणखी जास्त दिवसपर्यंत येथें वेढा घालून बसणें शक्य नसल्या कारणानें जे थोडेसे शिपाई लॉर्ड लेक यांच्या हाताखालीं शिल्लक राहिले होते, त्यांना या वेळीं नाखुष करण्याची सोय नव्हती. म्हणून ताबडतोब हल्ला करण्याचें ठरवून लॉर्ड लेक यांनीं ता. २१ फेब्रुवारी रोजीं सकाळीं आपलें सर्व सैन्य परेडच्या मैदानावर जमा करण्याचा हुकूम केला. आतां परेडीच्या वेळीं आदल्या दिवशींच्या गैरवर्तनाबद्दल आपल्याला कांहीं तरी कडक शासन होणार, अशी कित्येकांना भीति वाटणें स्वाभाविक होतें. परंतु तसें कांहीं एक झालें नाहीं. उलट लॉर्ड लेक हे आपल्या सैन्यापाशीं त्या दिवशीं सौम्यतेनेंच वागले. परेड ग्राउंडवर आपल्या शिपायांना उद्देशून त्यांनीं असे उद्गार काढलें कीं, काल तुम्ही आपल्या अधिकाऱ्याचे हुकूम ऐकले नाहींत, याबद्दल मला वाईट वाटत आहे. व त्यामुळें आतांपर्यंत तुम्ही निरनिराळ्या ठिकाणीं जी कीर्ति मिळविली होती, ती पूर्णपणें घालविली आहे. परंतु तें गेलेलें यश फिरून मिळविण्याची मी तुम्हांला संधि देत आहें. म्हणून ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आजच्या हल्ल्यामध्यें सामील होण्याकरितां पुढें यावें. अशा गोडीगुलाबीच्या बोलण्यानें शिपायांच्या मनांत उत्साह उत्पन्न करण्यांत आला. आणि त्या योगानें सर्व शिपाई ता. २१ फेब्रुवारीच्या या चवथ्या हल्ल्यामध्यें काम करण्याला मोठ्या उत्सुकतेनें तयार झाले.

ता. २१ फेब्रुवारी रोजीं सकाळीं आपल्या शिपायांचीं मनें अशा रीतीनें अनुकूल करून घेतल्यानंतर लॉर्ड लेक यांनीं तटावर तोफखान्याचा मारा कोठें सुरू करावयाचा, याच्याबद्दलची तजवीज लाविली. आदल्या दिवशींच्या तिसऱ्या हल्ल्याच्या वेळीं तिसऱ्या ( २० ) खिंडाराच्या जवळ जो ( २१ ) बुरुज होता, त्याच्यावर कित्येक शिपाई चढून जाण्याचा प्रयत्न करीत होते, हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याच बुरुजावर आणखी गोळे टाकून तेथें कांहीं थोडीशी वाट करितां आली, तर तेथून तटाच्या भिंतीच्या आंत प्रवेश करितां येईल, असें वाटून त्या धोरणानें तोफांच्या जागा थोडथोड्या बदलून घेऊन त्या बुरुजावर तोफांचा मारा सकाळपासून सुरू करण्यांत आला. त्या योगानें ला बुरुजाच्या बुंधाजवळचा एक बराच मोठा तुकडा उडून गेला, व त्यामुळें त्याच्यावरच्या भारानें तो सगळाच बुरुज कदाचित् खालीं कोसळून पडेल असें वाटूं लागलें. परंतु त्या तटाच्या इतर भागांप्रमाणें तो बुरुजही इतक्या बळकट रीतीनें बांधला गेला होता कीं, त्याच्या तळाशीं जरी हें एक खबदाड पडलें होतें, तरी त्याच्या बाकीच्या भागाला कांहीं एक भंग झाला नाहीं.

इंग्लिशांच्या तोफांनीं अशी पूर्व तयारी करून दिल्यानंतर इंग्लिशांचें सैन्य ता. २१ रोजीं दुपारीं ३ वाजतां तटावर हल्ला करण्याकरितां निघालें. या सैन्यावर ब्रिगेडियर ज. मॉन्सन यांची नेमणूक करण्यांत आली होती, व त्यांच्या हाताखालीं निरनिराळे अधिकारी काम करीत होते. हें सैन्य हल्ला करण्याकरितां चाल करून निघालें, त्या वेळीं ज. लेक हे जवळ उभे होते. व ते आपल्या या लष्कराची सलामी घेत होते, त्यामुळें सैन्यांतलि शिपायांच्या अंगांत एक प्रकारचा उत्साह उत्पन्न झालेला दिसत होता. पण तो उत्साह फार वेळ टिकला नाहीं. कारण, ज्या ( २१ ) बुरुजावरून चढून आपण तटाच्या आंत जाऊं, असें या शिपायांना वाटत होतें, त्या बुरुजाला आज कित्येक नवीन जखमा झालेल्या असतांनाहि तो बुरुज आदल्या दिवशींच्या इतकाच आजहि अभेद्य आणि अनुल्लंघनीय आहे, असेंच त्यांना आढळून आलें. ते शिपाई जेव्हां त्या बुरुजाच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचले, तेव्हां तेथें त्या बुरुजाला पडलेल्या खबदाडामध्यें त्यांना आश्रय घेण्याला थोडीशी जागा मिळाली एवढें खरें; परंतु याच्यापेक्षां दुसरी सोय त्यांना तेथें कांहीं आढळून आली नाहीं. बुरुजाचें बांधकाम बहुतेक अगदीं लंबरेषेमध्यें असल्यामुळें त्या बुरजावर चढून जाणें अशक्य होतें. तरी पण त्या बुरुजाच्या भिंतमिधून आपल्या संगिनी खोंचून आणि त्यांच्यावर पाय देऊन कित्येक शिपाई वर चढण्याचा प्रयत्न करूं लागले. तसेंच तोफांचे गोळे लागून त्या बुरुजाला मधून मधून जीं कांहीं भोकें पडली होतीं, त्यांचाहि थोडासा त्या वर चढणाऱ्या शिपायांच्या हाताला आणि पायाला आधार सांपडत होता. पण इतक्या अडचणींतून एका वेळीं एकेक दोनदोन शिपाई जरी वर चढूं लागले, तरी ते कितीसे चढणार ? आणि याशिवाय हे इंग्लिशांचे शिपाई वर चढत असतां तटावरचे जाट आणि मराठे कांहीं स्वस्थ बसलेले नव्हते. आजूबाजूच्या दुसऱ्या बुरुजांवरून त्यांनीं या बुरुजावर तोफांचा एकसारखा

भडिमार चालू ठेविला होता. शिवाय खालून वर चढून येणाऱ्या शिपायांच्या डोक्यांत वरून लाकडाचे मोठमोठे ओंडे, दगडधोंडे, वगैरे फेकण्यांत येत होते. त्यामुळें वर चढणारा शिपाई तेव्हांच ठार होऊन जात असे. व तो वरून पडतांना एकटाच पडत नसून आपल्या खालच्या शिपायाच्या अंगावर पडून त्यालाहि खालीं नेत असे. अशा कारणांमुळें त्या बुरुजावर चढणें बहुतेक अशक्यच झालें होतें. तरी पण त्यांतूनहि ले. टेंपल्टन हा एक इंग्लिश अधिकारी वर चढण्याचा प्रयत्न करीतच होता. हा फार शूर आणि उत्साही असून त्यानें आपण होऊन या कामावर आपली योजना करून घेतली होती. तो आपल्या हातामध्यें निशाण घेऊन तें त्या बुरुजावर लावण्यासाठीं वर चढत होता. पण जाट आणि मराठे यांनीं चालविलेल्या भडिमारांपुढें बुरुजाच्या शिखरापर्यंत जाणें कोणालाहि अशक्य होतें. तेव्हां ले. टेंपल्टन यानें एवढ्या मोठ्या उत्सुकतेनें आपल्याबरोबर आणलेलें तें निशाण तो बुरुजावर जेथपर्यंत चढला होता, तेथें मध्येंच कोठें तरी त्यानें रोंविलें. पण हें कृत्य तो करीत आहे, इतक्यांत मराठ्याच्या गोळ्यांनीं तो मारला गेला. मे. मेंझिस हा ज. लेक याचा एडिकँप होता. व हा आपल्या कमांडर-इन्-चीफची परवानगी घेऊन मुद्दाम या हल्ल्यांत भाग घेण्याकरितां आला होता. त्यानें ले. टेंपल्टन याचा अयशस्वी झालेला प्रयत्न पाहिला, तेव्हां तो मोठ्या उमेदीनें पुढें सरसावला. व ले. टेंपल्टनपेक्षां त्या बुरुजावर जास्त उंचीपर्यंत चढून तो शिखराच्या अगदीं जवळ आला; पण इतक्यांत मराठ्यांनीं त्यालाहि गोळी घालून खालीं पाडलें. अशा रीतीनें या बुरुजावर चढण्याचे प्रयत्न एकीकडे चालले असतांना त्या बुरुजाच्या आसपासच्या भिंतीवरूनहि चढण्याचा आपापल्या शक्यतेप्रमाणें इतर शिपाईमुद्धां प्रयत्न करीत होते. परंतु या कामांत इंग्लिश शिपायांना कोठेंहि यश आलें नाहीं. कारण, तटावरील लोक या वेळीं अतिशय निकरानें लढत होते; व वरून जें सामान हातीं लागेल, ते खालच्या शिपायांच्या डोक्यावर ढकलून देण्याला या वेळीं सुरवात झाली होती: आणि त्वेषाला सीमा उरलेली नव्हती; तेलांत भिजविलेल्या कापसाचे बोळे पेटवून तें खालीं फेकण्यांत येत होते; आणि मोठमोठ्या कढयांतून तापलेलें तेल घेऊन त्याच्या पिच-काऱ्या खालच्या लोकांच्या अंगावर नेम धरून मारण्यांत येत होत्या. त्याचप्रमाणें मडक्यांत दारू भरून आणि ती पेटवून तीं मडकीं खालच्या लोकांवर टाकण्यांत येत होती. आणि या निरनिराळ्या प्रकारच्या भडिमारामुळें इंग्लिश सैन्यांतील शिपाई लांकडांच्या ओंड्यांनीं ठेचले जात होते; कढत तेलाच्या पिचकाऱ्यांनीं भाजले जात होते; आणि दारूच्या मडक्यांनीं पेट घेत होते. अशा अवस्थेमध्यें इंग्लिशांचा हल्ला फार वेळ चालणें शक्य नव्हातें. तेव्हां आतां यशाची कांहीं एक आशा नाहीं, असें पाहून संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ब्रिगे-डियर ज. मॉन्सन यानें आपल्या सैन्याला माघारें फिरण्याचा हुकूम केला. या हल्लयामध्यें ६९ युरोपियन आणि ५६ नेटिव्ह शिपाई मरण पावले. व ४१० युरोपियन आणि ४५२ नेटिव्ह शिपाई जखमी झाले; म्हणजे सरासरीनें मेलेले आणि जखमी झालेले अशा लोकांची या हल्लयांतील एकंदर संख्या हजाराच्या जवळ गेली.

क. मॉन्सनचा यशवंतराव होळकरानें केलेला पराभव आणि त्यामधून उत्पन्न

झालेला भरतपूरचा वेढा यांच्या संबंधाची ही समग्र हकीकत येथपर्यंत देण्यांत आली आहे. या दोन्हीहि बाबतींत त्या वेळीं इंग्लिशांची किती मोठी नाचक्की झाली होती, हें कोणालाहि कळून येण्यासारखें आहे. इंग्लिश इतिहासकारांनीं या दोन गोष्टींवर आपल्या कल्पनेनें कितीहि पांघरूण घातलें, तरी त्यांतून त्या वेळचा इंग्लिशांचा कमकुवतपणा आणि त्यामुळें त्यांचा झालेला पराभव स्पष्टपणें दिसून येतो. पण तें आपल्या इंडियन लोकांनाच असें वाटतें असें नसून त्या वेळचे प्रसिद्ध सेनापति, ज. वेलस्ली, यांनीं या बाबतींत जें आपलें मत प्रदर्शित केलें आहे, त्यावरूनहि हाच निर्णय सिद्ध होतो. ज. वेलस्ली हेच पुढें लॉर्ड वेलिंग्टन या नांवानें प्रसिद्ध झाले. त्यांनीं वेळोवेळीं केलेले पत्रव्यवहार Wellington Despatches म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांत मॅान्सनची पिछेहाट आणि भरतपूरचा वेढा या विषयासंबंधानें ज. वेलस्ली यांनीं जे उद्गार काढलेले आहेत, ते पुढीलप्रमाणें आहेत.

## MONSON'S RETREAT.

Monson's disasters are really the greatest and the most disgraceful to our military character of any that have ever occurred. The detachment had not two days' provisions, was cut off from its resources by many rivers, on which we had neither bridge nor boat; and all measurss to supply with provisions the only fort ( Rampoora ) to which, in case of emergency, he might have recourse, were omitted. To employ the detachment at all was an error; but the common modes of securing its safety have been omitted.

You will have heard of Colonel Monson's retreat, defeat, disgraces and disasters. He is, however, at last arrived at Agra, he and his detachment, woeful examples of the risk to be incurred by advancing too far without competent supplies and of the danger of attempting to retreat before such an army as Holkar's is. He would have done much better to attack Holkar at once, and he would probably have put an end to the war. At all events, he might have made a better retreat. This is between ourselves, as I am very unwilling to circulate my opinion of the late transactions to the northward. I only hope that they will not induce our late enemies to break out again.

After Colonel Monson's defeat I acknowledge that I considered the peace with the Mahrattas very precarious;

and indeed if the success of Holkar had continued, I consider that we should have had to fight over again not only our battles with the Mahrattas, but those with all the other powers of India, whether considerd as our dependants or our allies. I also believe that the Rajah of Berar, in particular, and very possibly Scindiah, considered the advantages gained by Holkar to have been much greater than they really were; that they anticipated further successes and the former prepared to take advantage of them.

## ASSAULTS OF BHURTPOOR.

The 4th and 5th failures before Bhurtpoor are disastroun events, of witch I apprehend the worst consequences. They must have blundered that siege terribly, for it is certais that, with adequate means, every place can be taken; and having been so long before the place adequate means must have been provided or in his power. The fault lies therefore in the misapplication of them, or, most probably, in the omission to employ all those which were necessary to accomplish the object in view, either through the ignorance of the engineers, or the impetuosity of——'s temper, which could not brook the necessary delay.

हा उतारा थोडा लांब झाला आहे; परंतु त्यांत ज. वेलस्ली यांचा अभिप्राय समाविष्ट झाला असल्यामुळें त्याला एक प्रकारचें विशेष महत्त्व आहे. आणि म्हणूनच तो इतका लांब असूनही मुद्दाम येथें देण्यांत आला आहे या अभिप्रायांतील मुख्य तात्पर्य असें आहे कीं, ज. वेलस्ली यांच्या मताप्रमाणें क. मॉन्सन यांचे हे पराभव इंग्लिशांच्या लष्करी नांवलौकिकाला अत्यंत लांछनास्पद आहेत. क. मॉन्सनच्या तुकडीची या कामावर योजना करणें हीच मोठी चूक होती. व त्या तुकडीच्या संरक्षणाची कांहींच काळजी घेण्यांत आली नव्हती, ही त्याहूनहि विषेष वाईट गोष्ट होय. ज. वेलस्ली यांनीं हा जो अभिप्राय व्यक्त केला आहे, तो गुप्त रहावा, आणि तो बाहेर कोठेंहि फुटूं नये, अशी त्यांची त्या वेळीं इच्छा होती. कारण इंग्लिशांच्या या कमकुवतपणाची बातमी ऐकून इंग्लिशांचे पूर्वींचे शत्रु फिरून इंग्लिशांच्या विरुद्ध बंड करून उठतील कीं काय, अशी त्या वेळीं त्यांना या पराभवांच्यामुळें खरोखर भीति वाटूं लागली होती! पेशवे, भोसले, शिंदे वगैरे मराठे राजांच्यापाशीं आपण पूर्वीं केलेले तह या क. मॉन्सनच्या पराभवामुळें डळमळूं लागतील, अशी त्यांना प्रत्यक्ष दहशत बसली होती. आणि होळकराला जर असेच एका पाठीमागून एक आणखी जय मिळूं लागले, तर मराठ्यांपाशीं आपण नुकत्याच ज्या असई, आरगांव वगैरे ठिकाणीं लढाया लढलों, त्या लढाया आपल्याला फिरून लढाव्या लागतील; इतकेंच नव्हे, तर बाकीच्या राजांशींहि आपल्याला फिरून युद्धें करावीं

लागतील; असें ज. वेलस्ली यांना या वेळीं वाटूं लागलें होतें. त्याप्रमाणें भरतपूरच्या वेढयामध्यें इंग्लिशांना जे एकामागून एक असे लागोपाठ पराभव सहन करावे लागले, त्यांचे दुष्परिणाम किती दूरवर जाऊन पोहोंचतील, याच्याबद्दलहि त्यांना त्या वेळीं कल्पना करतां येत नव्हती. अशा प्रकारचा आपला स्पष्ट अभिप्राय ज. वेलस्ली यांच्यासारख्या सेनापतीनें जो व्यक्त केला आहे, त्यावरूनहि या वेळीं यशवंतराव होळकर आणि भरतपूरचा राजा रणजितसिंग यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें किती मोठें पराक्रम केले होते आणि इंग्लिशांवर आपला किती वचक बसविला होता, याची कोणालाहि कल्पना येण्याजोगी आहे.

भरतपूरच्या तटावरील एकंदर चार हल्ल्यांची हकीकत ही अशा प्रकारची आहे. इ. स. १८०५ या सालचे जानेवारी आणि फेब्रुवारी हे पहिले जवळ जवळ दोन महिने इंग्लिशांनीं भरतपूरच्या तटासमोर आपली तपश्चर्या खर्च करून पाहिली. या सुमारें दोन महिन्यांच्या अवधीमध्यें त्यांचे एकंदर ३ हजारांच्या वर लोक मेलेले आणि जखमी झालेले होते. व यांपैकीं १०० च्या वर नुसते युरोपियन ऑफिसर होते. तटाच्या सभोंवतालच्या खंदकामध्यें इंग्लिशांचे इतके लोक मरून पडले होते कीं, तो खंदक जरी पुष्कळ खोल होता, तरी या इंग्रजी पलटणींतील मेलेल्या शिपायांच्या प्रेतांनीं तो इतका भरून गेला होता कीं, पाण्यांत पाय न बुडवतां त्या प्रेतावर पाय देऊन किल्ल्याच्या आंतबाहेर जाणें अगदीं सोपें झालें होतें. यावरून इंग्लिशांच्या नुकसानीची कल्पना येण्याजोगी आहे. ता. २१ फेब्रुवारीच्या या चौथ्या पराभवानंतर ता. २४ फेब्रुवारी रोजीं इंग्लिशांनीं आपल्या छावणीची दुसरी जागा बदलून ती त्यांनीं भरतपूरच्या ईशान्येच्या बाजूला नेली. व तेथून त्यांनीं पुढील पांचव्या हल्ल्याची तयारी सुरू केली. पण आतां पांचवा हल्ला करण्याजोगा खरोखर दम इंग्रजी सैन्याच्या अंगामध्यें आतांपर्यंतच्या पराभवांच्या योगानें मुळींच राहिला नव्हता. आणि सर्व बाजूंनीं त्यांची हलाखीची स्थिति झाली होती. अशा स्थितींत बाह्यात्कारी रीतीनें जरी त्यांनीं पांचव्या हल्ल्याची भाषा सुरू केली होती, तरी अंतःस्थ रीतीनें त्यांचे निराळेच प्रयत्न चाललेले होते. बाहेरच्या लढाईला आंतील फितुरीची जोड देण्याची इंग्लिशांची नेहमींचीच पद्धत आहे. त्याप्रमाणें या बाबतींतहि यशवंतराव होळकर, मीरखान आणि भरतपूरचा राजा, हे जे तिघेजण इंग्लिशांच्या विरुद्ध एकत्र झाले होते, त्यांच्या आपसांत फूट पाडण्याचे इंग्लिशांचे प्रयत्न जारीनें चाललेले होते. मार्किस वेलस्ली हे आपल्या पत्रांतून लॉर्ड लेक यांना पुढीलप्रमाणें गुप्त रीतीनें सूचना करीत होते.

While the commander-in chief is preparing for the siege of Bhuratpoor, or actually engaged in it, might it not be advisable to endeavour to detach Runjeet Sing from Holkar? Although Bhuratpoor has not fallen, Runjeet Sing is certainly much reduced and alarmed; and Holkar would be hopeless if abandoned by Runjeet Sing.

Might it not be stated to Runjeet Sing that although his fate has been delayed, he must know it to be inevitable that a few weeks more must destroy him altogether; that his

only certainty of escape is to throw himself upon the clemency of the British Government, and renounce Holkar altogether, in which case he will be admitted to pardon, and restored to his possessions?

व या मजकुराला लॉर्ड लेक यांनीं जें उत्तर लिहिलें आहे, त्यामध्यें वरील सूचना अमलांत आणण्याचा प्रयत्न चालू असल्याचा त्यांचा कबूलीजबाब आपल्याला पहावयाला सांपडतो. तें उत्तर असें:—

A correspondence is now going on between me and Runjeet Sing, which I am in hopes will lead to an accommodation sufficiently favourable to the British Government, and prevent any future union of interests between that chief and Jaswantrao Holkar.

ह्या वर दिलेल्या दोन तीन उताऱ्यांवरून हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे कीं, भरतपूरचा राजा आणि यशवंतराव होळकर यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न व्हावा आणि भरत पूरच्या राजानें होळकराला आपल्या मुलखांतून घालवून देऊन इंग्लिशांशीं तह करण्याला तयार व्हावें, अशाबद्दल इंग्लिशांकडून गुप्त रीतीनें खटपटी चाललेल्या होत्या.

त्याचप्रमाणें मीरखानाला होळकरापासून फोडण्यासाठीं इंग्लिशांचे कसे प्रयत्न चालले होते, हें गव्हर्नर जनरल आणि लॉर्ड लेक यांच्या दरम्यानच्या पुढील पत्रव्यवहारावरून व्यक्त होण्यासारखें आहे. गव्हर्नर जनरल, मार्क्विस वेलस्ली, हे लॉर्ड लेक यांना लिहितात कीं:—

Mr. Seton and General Smith should be authorized to offer a settlement of land to such of Ameer Khan's followers as would quit him. Even Ameer Khan himself might be offered a jagheer, if he will quit Holkar's cause, submit to the British Government, and come into General Smith's camp within a stated period of time.

या लिहिण्यांतील तात्पर्य असें आहे कीं, अमीरखानाच्या सैन्यांतील शिपायांना कायमच्या जमिनी तोडून देण्याचा लालूच दाखवावी व त्या आमिषानें त्याच्या सैन्यांतील जितके लोक फोडतां येतील, तितक्यांना फोडण्याचा प्रयत्न करावा; इतकेंच नव्हे, तर खुद्द अमीरखान हाहि जर होळकराचा पक्ष सोडून इंग्लिशांच्या बाजूला येण्याला तयार असेल, तर त्यालाहि एक जहागीर तोडून देण्याविषयींची योजना करावी.

हे जे पत्रव्यवहार वर दिलेले आहेत, त्यांवरून इंग्लिशांचीं गुप्त कारस्थानें आंतून कशीं चाललेलीं असतात, हें लक्षांत येण्यासारखें आहे. दुसऱ्याच्या सैन्यांतील शिपायांना आणि सरदारांना फितूर करण्यामध्यें गैरशिस्तपणा आणि नीचपणा आहे, ही कल्पनाहि कधीं त्यांच्या मनाला शिवत नाहीं. इंग्लिशांच्या विरुद्ध एखादा संघ बनलेला असेल, तर त्यांतून कोण फितूर होण्यासारखा आहे, हें त्यांना मनुष्यस्वभावाच्या धोरणावरून बरोबर ताडतां येतें, व लटपटींत आणि डळमळीत स्वभावाचे जे लोक असतात, त्यांनाच ते आपल्या

फितुरीच्या प्रयोगासाठीं पसंत करतात. प्रस्तुत उदाहरणांत यशवंतराव होळकर, भरतपूरचा राजा आणि अमीरखान, या तिघांचा मिळून या वेळीं इंग्लिशांच्या विरुद्ध जो संघ बनलेला होतो, त्यांपैकीं यशवंतराव होळकराला फोडण्याचा इंग्लिशांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. हा पराक्रमी आणि पाणदार आहे, हा तेजस्वी आणि तिखट स्वभावाचा आहे, हा आपल्या फितुरीच्या मोहपाशामध्यें सांपडण्याला कबूल होणार नाहीं, हें इंग्लिश मुत्सद्द्यांनीं पक्कें जाणलें होतें. म्हणून त्यांनीं त्याच्यापाशीं फितुरीचें एक अवाक्षरहि काढलें नाहीं. पण बाकीचे दोघे हे तशा स्वभावाचे नसल्यामुळें इंग्लिशांनीं त्यांना लालूच दाखविण्याला सुरवात केली; आणि त्यांत त्यांना यशहि आलें. इंग्लिशांच्या अंदाजाप्रमाणें या तीन राजांमध्यें फाटाफूट उत्पन्न झाली; आणि अखेरीस भरतपूरचा राजा आणि इंग्लिश यांच्यामध्यें तहही झाला ! इंग्लिशांशीं आपला तह व्हावा म्हणून भरतपूरचा राजा या वेळीं उत्सुक झाला होता, असें इंग्लिश इतिहासकार लिहितात. पण हें त्यांचें लिहिणें थोडें विसंगत दिसतें. भरतपूरच्या तटासमोर इंग्लिशांचा चार वेळां पराभव झाल्यानंतर तहाची जास्त आवश्यकता स्वाभाविकपणेंच कोणाला बरें वाटेल ? ज्यांचा चार वेळां पराभव झाला आहे त्यांना, किंवा ज्याच्या सैन्यानें चार वेळां विजय मिळविला आहे त्याला ? वास्तविक तहाची आवश्यकता इंग्लिशांनाच जास्त होती, हें कोणीहि सांगू शकेल. पण असें असतानांहि तहाची उत्सुकता रणजितसिंगाच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती, असें इंग्लिश इतिहासकार या ठिकाणीं भासवितात. पण त्याच्या ठिकाणीं अशी उत्सुकता कां उत्पन्न व्हावी ? तर याच्या मुळाशीं वर दिलेल्या पत्रव्यवहारांत दिसून येणारी इंग्लिशांनीं गुप्त रीतीनें चालविलेली कारवाईच कारणीभूत झालेली असली पाहिजे, हें उघड आहे अशा रीतीनें ज्याचा चार वेळां जय झाला, तोच आमच्याशीं तहाची याचना करीत आहे असें भासवून इंग्लिशांनी आपल्या चार पराभवानंतर अखेरीस भरतपूरच्या राजापाशीं ता. ९ एप्रिल १८०५ रोजीं तह केला. या तहाच्या अटींतील मुख्य भाग असा होता कीं, भरतपूरच्या राजानें इंग्लिशांना वीस लाख रुपये द्यावे. व दीगचा किल्ला इंग्लिशांच्या स्वाधीन करावा. या वीस लाखांपैकीं भरतपूरच्या राजानें सतरा लाख रुपये मुळींच दिले नाहींत; व तीन लाख रुपये दिले म्हणून जें इतिहासांत लिहिण्यांत आलेलें आहे, ते तीन लाख रुपये तरी भरतपूरच्या राजानें इंग्लिशांना प्रत्यक्ष दिले असतील किंवा नाहींत, याच्याबद्दल शंकाच आहे. कारण, त्या वेळी त्याच्यापाशीं लढाईच्या खर्चामुळें इतके रुपये शिल्लक असणेंच अशक्य होतें, असें म्हणतात. शिवाय दीगचा किल्ला हाहि तहानंतर पुढे लवकरच इंग्लिशांकडून राजाच्या ताब्यांत परत आला, ही जी या तहाच्या अटीची अंमलबजावणी झाली, त्यावरूनसुद्धां इंग्लिश ग्रंथकार दाखवितात त्याप्रमाणें या तहामध्यें खरोखर इंग्लिशांचा वरचष्मा झालेला नसून केवळ आपल्या लौकिकाच्या बाह्यात्कारी बचावासाठीं त्यांनीं या तहाच्या अटी भरतपूरच्या राजाकडून कबूल करवून घेतल्या होत्या, असेंच म्हणावें लागतें. अशा रीतीनें भरतपूरच्या तटासमोर चार वेळां झालेल्या आपल्या पराभवावर इंग्लिशांनीं जरी या तहाचें पांघरूण घालून घेतलें, तरी त्यांतून इंग्लिशांचे पराभव आणि मराठ्यांची मर्दुमकी ह्या गोष्टी स्पष्टपणें सर्व लोकांच्या निदर्शनाला येत आहेत.

समाप्त.